विदर्भातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास
1891–1970

ISSN - 2249-5134



# Perspectives

A National Interdisciplinary Annual Research Journal

Peer Reviewed Research Journal for Interdisciplinary Studies in Arts Commerce & SocialSciences

**Vol. I**
**Special Issue (VIII)**
**2020**

**Dr. Madhukarrao Wasnik**
**PWS Arts and Commerce College**
**Kamptee Road, Nagpur - 26.**
(Reaccreditated 'B' by NAAC)

**Managing Editor**
Dr.Yeshwant Patil
Principal
Dr.Madhukarrao wasnik P.W.S.Arts and
Commerce College,Nagpur

**Editor**
Dr.Sudesh M.B.Bhowate
Head,Dept.of English & IQAC coordinator
Research Committee
Dr.Madhukarrao wasnik P.W.S.Arts and
Commerce College,Nagpur

**Associate Editor**
Dr.Mahendra Gayakwad
Dr.Megha Ramteke
Dr.Sumedh Nagdeve
Prof.Amruta Dorlikar
Shri.Siddharth Wani
Dr.Vivek Chauhan

**Advisory Committee**
Dr.Mithilesh Awasthi
Dr.Indrajit Orke
Dr.Pradhnya Bagade

Editorial Consultants

Dr.Avinash R.Nikam
Head,Dept. of Economics
PSGVPM's Arts and Commerce College
Shahada Dist.Nandurbar (MS)

Dr.Vimelendra Kumar
Head,Dept.of Pali
Banaras Hindu University (UP)

Dr.Umesh Holani
Dean, Commerce Faculty
Jiwaji University,Gwaliar (MP)

Dr.C.D.Naik
Head, Dept.of Ambedkar
Research Center Mahu (MP)

Dr.Sukhdev Dhanke
Asso.Prof.Dept.of Marathi
Sant Gadge baba Amravati University,
Amravati (MS)

Dr.Dhirendra Shukla
Asso.Prof.Dept.of Hindi
Govt.Mahatma Gandhi
P.G.College (MP)

Dr.Vivek Kumar
Asso.Prof. and Head, Dept.of Sociology
Jawaharlala Nehru University, New Delhi

Dr.Harsh Jagtap
Asso.Prof.Political Science
Savitribai Fule Poona University, (MS)

Dr.Anil Kathare
Head Dept.of History
Shree Shivaji College tq,Kandhar,Nanded (MS)

Dr.C.L.Khatri
Asso.Prof. and Head, Dept.of English
T.P.S.College,Patna (Bihar)

# विदर्भातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास (1890 ते 1970)

**विशेषांक संपादक**

**डॉ.महेंद्र गायकवाड,डॉ.चंद्रशेखर पाटील**

**सहायक संपादक**

**प्रा.आशिष थूल,प्रा.दिपाली सुरवसे**

## Name of Peer Review Committee Member (Refereed Name )

**1)मा.प्रा.डॉ.दीपक गायकवाड**
माजी इतिहास विभाग प्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**2) मा.प्रा.डॉ.संतोष बंसोड**
अध्यक्ष( इतिहास अभ्यास मंडळ)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

3) **मा.प्रा.डॉ.श्याम कोरेटी**
अध्यक्ष( इतिहास अभ्यास मंडळ)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,नागपूर विद्यापीठ, नागपूर

4) **मा.प्रा.डॉ. संगिता मेश्राम**
माजी अधिष्ठाता मानव्यशास्त्रे व
इतिहास विभाग प्रमुख (पदव्यूत्तर शिक्षण विभाग )
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,नागपूर विद्यापीठ, नागपूर

5) **मा.प्रा.डॉ.बी.आर.मस्के**
. इतिहास विभाग प्रमुख
वसंतराव नाईक शासकीय कला व
समाजविज्ञान संस्था,नागपूर

**6) मा.प्रा.डॉ. ताराचंद गेडाम**
प्राचार्य,डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला,वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, सुरतोली (लोहारा )जि.
गोंदिया

7) **मा.प्रा.डॉ.एस.बी. भगत**
प्राचार्य
रामकृष्ण महाविद्यालय ,दारापूर
ता.दर्यापुर जि.अमरावती

**8)मा.प्रा.डॉ. नलिनी टेंभेकर (चिमनकर)**
**सहसंचालक,**
**उच्च शिक्षण,नांदेड विभाग,नांदेड**

**9)मा.प्रा.डॉ.संदेश वाघ**
इतिहास विभाग प्रमुख व अध्यक्ष इतिहास
अभ्यास मंडळ मुंबई विद्यापीठ,मुबई

**10)मा.प्रा.डॉ.यू.एस.सावंत**
इतिहास विभाग प्रमुख
यशवंत महाविद्यालय,नांदेड

About us:

Dr.Madhukarrao Wasnik PWS Arts and Commerce College began its educational crusade From 1968 with a very small strength of students in one of the backward areas of North Nagpur.It has turned into a well established institution catering to nearly four thousand students with an education inspired by the values of the Lord Buddha and Dr.Babasaheb Ambedkar.There are UG and PG Course Programmes in Arts and Commerce Streams.The institution has a well equipped library for the students and Research Cell,and Internet Facilities.With a purpose to promot Research,Pali and Dr.Ambedkar Thought Research Centre has been established which benifits many Research Scholars.Research is a very meaningful activity in the institution.The College has many publications to its credit. The present publication is also another milestone in this direction.Perusing the vision of Dr.Ambedkar,our institution is constantly moving ahead to accomplish its social responsibility of providing equal education to the marginalized section of the society.

## Editorial and Subscription Communication:Subscription

Perspectives
Dr.Madhukarrao Wasnik PWS Arts and Commerce College , Kamptee Road,Nagpur-26
Phone:0712-2653711
e-mail :perspectivepws@gmail.com

InstitutionalRs.300(Annual)
Individual Rs200(Annual)

@ All Rights Reserved will be with Dr.Madhukarrao Wasnik PWS Arts and Commerce College,Nagpur -26

Published by :Principal, Dr.Madhukarrao Wasnik PWS Arts and Commerce College,Kamptee Road,Nagpur-26
Printed by :Panchsheel Graphics,Balabhaupeth,Nagpur

Authors will be responsible for contents and corrections.

For any dispute Juridiction will be Nagpur Court.

## संपादकीय

31 जानेवारी 1920 ला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मुक समाजाला वाचा देण्यासाठी " मुकनायक"या नियतकालीकेपासुन पत्रकारितेची सुरुवात केली व मुक समाजाच्या प्रश्नाना वाचा फोडली.30,31 मे आणि 1जुन 1920 ला छत्रपती शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली नागपूरला संपन्न झालेल्या पहिल्या अस्पृश्य वर्ग परिषदेत बाबासाहेब नागपूर भूमित पहिल्यांदा आले होते.या घटनेच्या या शताब्दी वर्षात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर,विद्यापीठ,संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली इतिहास परिषदेच्या 52 व्या अधिवेशनाचे आयोजन डॉ.मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू.एस.कला व वाणिज्य महाविद्यालयातील इतिहास विभागाने आयोजित करण्याचे ठरले."विदर्भातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास"या विषयावर एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले मुख्य प्रवाहातील इतिहासात या विषयाकडे दुर्लक्ष करण्यात आले.इतिहासात हा विषय वंचित राहला.वंचित,शोषित व पीडित जातींच्या न्याय व हक्कांच्या संघर्षात विदर्भातील आंबेडकरी चळवळीत शेकडो नेत्यांनी व हजारो कार्यकर्त्यांनी अनेक आघाडयांवर त्याग व बलिदानाचे सहकार्य केले.त्यांच्या कर्तृत्वाला लेखबद्ध करणे,नवसंशोधकांचे या विषयाकडे लक्ष आकर्षित करणे.संशोधकांसाठी संदर्भग्रंथ तयार करूण या विषयांवर संशोधकांना प्रेरणा व प्रोत्साहन देण्याचा उद्देशाने या विषयावर विशेषांक प्रकाशित करण्याचे ठरले. आपल्या पुर्वजांनी केलेल्या संघर्षांची भावी पिढींना माहिती असावी याकरिता प्रस्तुत विषयावर 'परस्पेंक्टीव'या राष्ट्रीय शोध पत्रिकेचा विशेषांक काढण्याचे ठरले.

या निमित्ताने या विषयावरिल कागदपत्रांची जुळवा.जुळव करूण नवसंशोधकांना उपयुक्त ठरेल अशा संदर्भ ग्रंथाची निर्मिती करणे,या चळवळीला लाभलेल्या इतिहासाचे व चळवळीचे महत्व अधोरेखित करण्याचा आमचा मानस आहे.तिन्ही विद्यापिठातील आमच्या इतिहास प्रेमी प्राध्यापकांनी व संशोधकांनी आम्हाला उस्फुर्त सहकार्य केले.आंबेडकरी चळवळीतील अनेक नेत्यांवर व कार्यकर्त्यावर अनेकांनी शोध लेख लिहुन आमचा उत्साह द्विगुनित केला.या चळवळीत अनेक नेते व कार्यकर्त्यांनी आपल्या घामाच्या धारांनी चळवळीला सिंचले असुन या चळवळीला राष्ट्र पातळीवर नेले.या सर्वाच्या कार्याचा समावेश शोध पत्रिकेच्या मर्यादांचा विचार करता या विस्तृत विषयाला आम्ही पूर्णपने न्याय देऊ शकलो नाही परंतु एका उपेक्षित व वंचित विषयाला समाजापुढे आनन्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न केला.या शोध पत्रिकेतील लेखांचे मुल्यांकन करण्यासाठी विविध विद्यापीठातील या विषयावर तज्ञ जनांची पियर रिव्हयू कमेटी तयार करण्यात आली.या समितीतील सन्माननिय सदस्यांनी आपल्या व्यस्त कार्यातुन लेखांच्या दुरूस्तीविषयी अनमोल सूचना व मार्गदर्शन केले याविषयी आम्ही त्यांचे आभारी आहोत.महाविद्यालयाचे व्यवस्थापन मंडळ ,प्राचार्य व सहकारी प्राध्यापक मंडळींनी,संशोधन समितीच्या सदस्यांनी आणि विभाग प्रमुख डॉ.सी.एस.पाटील,प्रा.आशिष थुल व प्रा.दिपाली सुरवसे यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्यामुळेच हा विशषांक पुर्णत्वास आला.

डॉ.महेंद्र गायकवाड

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शोध पेपरचे शिर्षक | संशोधकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **विदर्भातील आंबेडकरी चळवळीचे शिलेदार** | | |
| 1 | **विठोबा रावजी मुनपंडे यांचे विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील योगदान** | डॉ.विमल राठोड | 1 ते 4 |
| 2 | **गुरूवर्य किसन फागोजी बन्सोड – दलित स्त्रियांचा उद्धार** | डॉ.आनंद गणवीर | 5 ते 10 |
| 3 | श्री. किसन फागुजी बनसोड : विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील एक खंबीर नेतृत्व | डॉ. कैलाश फुलमाळी | 11 ते 12 |
| 4 | किसन फागुजी बनसोड यांचे लेखन चित्रणातून वंचितांच्या उध्दाराचे कार्य | प्रा.डॉ.प्रमोद बोधाने | 13 ते 14 |
| 5 | वंचीतांच्या अधिकारासाठी झटणारे समाजसुधारक : किसन फागोजी बनसोडे. | डॉ.गोपीचंद कठाणे | 15 ते 17 |
| 6 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीत किसन फागूजी बनसोडेंचे वृत्तपत्रिय योगदान | डॉ. प्रदिप ढोले | 18 ते 20 |
| 7 | आंबेडकरी चळवळीतील देवाजी खोब्रागडे यांचे कार्य | डॉ.अविनाश फुलझेले | 21 ते 25 |
| 8 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील देवाजीबापू खोबरागडे यांचे योगदान | प्रा. डॉ. नरेश कवाडे | 26 ते 29 |
| 9 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील नेते नानासाहेब गवई यांचे सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्य | डॉ.राजू खरडे | 30 ते 32 |
| 10 | महात्मा कालीचरण नंदागवळी यांचे आंबेडकरी चळवळीतील योगदानाचें ऐतिहासिक विश्लेषण | प्रा. पंकज वामन मून | 33 ते 34 |
| 11 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विदर्भातील सांगाती.रेवाराम विठोबा कवाडे | डॉ.यशवंत पाटील | 35 ते 38 |
| 12 | बाबू एल. एन. हरदास यांचे सायमन कमिशन व नागपूर डिप्रेस्ड क्लासेस मधील योगदान | प्रा. आशिष थुल | 39 ते 40 |
| 13 | "डॉ. अम्बेडकर के आंदोलनों में बाबू हरदास एल.एन. का योगदान" | प्रा. किशोर चौरे | 41 ते 44 |
| 14 | धम्मरक्षक अ‍ॅड.बाबू आवळे | डॉ.संजय गजभिये | 45 ते 53 |
| 15 | *हरिदास बाबू आवळे यांचे विदर्भातील समता सैनिक दलातील योगदान* | *डॉ.चंद्रशेखर पाटील* | 54 ते 59 |
| 16 | विदर्भातील आंबेडकर चळवळीत दशरथ पाटील यांचे योगदान | डॉ. अफरोज शेख | 60 ते 62 |
| 17 | गं. म. ठवरे यांचे विदर्भातील शैक्षणिक योगदान : एक अभ्यास | डॉ.लखपती गायकवाड | 63 ते 64 |
| 18 | बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे विदभातील एक राजकीय व सामाजिक नेतृत्व" | अरुण ज्ञानेश्वर बरडे | 65 ते 69 |
| 19 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील बॅ. राजाभाऊ खोंबरागडे यांचे सामाजिक व राजकीय कार्य | .डॉ. अनिल बाभळे | 70 ते 73 |
| 20 | बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील योगदान | रत्नदिप गणवीर | 74 ते 77 |
| 21 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीत रामरतन जानोरकर यांचे योगदान | विनायक जामगडे | 78 ते 80 |
| 22 | दादासाहेब कुंभारे यांचे आंबेडकरी चळवळीत योगदान | डॉ. सुशांत चिमणकर | 81 ते 83 |
| 23 | आंबेडकरी चळवळीत दादासाहेब गवई यांचे योगदान | डॉ.मोहन वानखडे | 84 ते 87 |
| 24 | वैदर्भिय आंबेडकरी चळवळीतील एक ग्रंथप्रेमी शिलेदार श्री वसंत मुन | प्रा.गामिनी मेश्राम | 88 ते 90 |
| 25 | इतिहास संशोधक वसंत मुन | डॉ.लखन इंगळे | 91 ते 92 |
| 26 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील राजकीय व सामाजिक कर्मनिष्ठ नेतृत्व – अ‍ॅड. सखाराम एम. मेश्राम | डॉ.कमलाकर तागडे | 93 ते 95 |
| 27 | विदर्भिय आंबेडकरी चळवळीत डॉ. मधुकरराव वासनिक यांचे योगदान | डॉ. एन.लांडगे | 96 ते 100 |
| 28 | वामनराव गोडबोले यांचे धम्मदीक्षा सोहळयाचे वित्तीय व्यवस्थापन | प्रा.नरेंद्र सरोदे | 101 ते 102 |
| 29 | एक कर्तृत्ववान नेतृत्व मा. नाशिकराव तिरपुडे साहेब | प्रा.असंगवज्र मैत्रेय | 103 ते 104 |
| | **विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील रणरागिनी** | | |
| 30 | विदर्भातील आंबेडकरी महिलांची विसाव्या शतकातील सामाजिक चळवळ | डॉ. टी. जी. गेडाम | 105 ते 108 |
| 31 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीत महिलांचे योगदान | प्रा. डॉ. प्रज्ञा बागडे | 109 ते 113 |
| 32 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीत महिलांचे योगदान | डॉ. सुजाता गौरखेडे | 114 ते 117 |
| 33 | "विदर्भातील आंबेडकरी चळवळीत महिलांचे योगदान" | डॉ. ज्वाला भा. डोहाणे, | 118 ते 120 |

| | | | |
|---|---|---|---|
| 34 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीद्वारा आयोजित अधिवेशनाचे महत्व | प्रा.सचिन बन्सोड | 121 ते 124 |
| 35 | | प्रा.वासंती खांडेकर | 125 ते 131 |
| | **धम्मक्रांती** | | |
| 36 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतरामागील ऐतिहासिक पार्श्वभूमी | डॉ. महेंद्र गायकवाड | 132 ते 137 |
| 37 | बौध्द धर्माचे विदर्भाशी नाते | डॉ. राजेंद्र कांबळे | 138ते 141 |
| 38 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर | डॉ. प्रतिभा पखिडे | 142 ते 144 |
| 39 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतरः एक चिकित्सा | डॉ. विठोबा चंदनखेडे | 145 ते 146 |
| 40 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धम्मक्रांतीविषयक दृष्टीकोण | डॉ. रत्नपाल डोहणे | 147 ते 148 |
| 41 | "धम्मक्रांतीचे महत्व" | डॉ. उमेश जनबंधू | 149 ते 152 |
| 42 | आंबेडकरी धम्म चळवळीपुढील आव्हाने | डॉ.प्रियराज महेशकर | 153 ते 155 |
| 43 | वंचित समाजाच्या धर्मांतराचे परिणाम | प्रा.अभिजीत मेंढे | 156 ते 161 |
| 44 | Dr. Ambedkar and his Dhamma | Dr. Anjali Andrew | 162 ते 163 |
| 45 | नागपुरच्या बौद्ध धम्मदीक्षा समारंभात महारेतरांचे योगदान | डॉ.सुर्यकांत कापशीकर | 164 ते 168 |
| | **समाजिक,राजकीय,वृत्तपत्रिय,साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील चळवळ** | | |
| 46 | विदर्भातील आंबेडकरी समाजाचे सामाजिक समतेचे आंदोलन | प्रा. डॉ. बी.मस्के | 169 ते 172 |
| 47 | डॉ. आंबेडकरांचे श्रमिक कल्याणविषयक तत्वज्ञान आणि मजूर पक्षाचे विदर्भातील योगदान –एक अध्ययन | डॉ.दिपाली दी. भावे | 173 ते 176 |
| 48 | समता सैनिक दलाचे सामाजिक कार्यातील योगदान | डॉ.उज्ज्वला गोंडाणे | 177 ते 179 |
| 49 | पुणे कराराच्या अंमलबजावणीमध्ये डॉ. आंबेडकरांच्या 'स्वतंत्र मजूर पक्षाची' भुमिका | डॉ.वंदना तागडे | 180 ते 182 |
| 50 | बुलडाणा जिल्हयातील महार चळवळीमागील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा | डॉ. किशोर वानखडे | 183 ते 186 |
| 51 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीत, वर्तमानपत्रे, साहित्याच्या माध्यमातून समाज सुधारकांनी दिलेले योगदान | डॉ.सौ. ज्योती खडसे | 187 ते 189 |
| 52 | स्वातंत्र्यपूर्व विदर्भातील वंचितांच्या चळवळीतील वृत्तपत्राचे समाज प्रबोधनातील योगदान | प्रा.सतिश बं. राठोड | 190 ते 191 |
| 53 | 'पश्चिम विदर्भातील सत्यशोधक समाज व आंबेडकरी चळवळीचे कार्य एक तात्विक दृष्टीकोन ' | डॉ. उध्दव कांबळे | 192 ते 193 |
| 54 | पहली गोलमेज परिषद में डॉ. बाबासहब अम्बेडकर की भूमीका को विदर्भ का योगदान | डॉ.अरविंद पुनवटकर | 194 ते 195 |
| 55 | "सामाजिक परिवर्तन के परिप्रेक्ष में आंबेडकरी आंदोलन का योगदान" | प्रा.मनोहर येरकलवार | 196 ते 199 |
| 56 | नागलोक : बौद्ध धम्म के प्रचार और प्रसार मे योगदान | प्रा.दिपाली सुरवसे | 200 ते 201 |
| 57 | विदर्भातील आंबेडकरी आणि बौध्द पर्यटन स्थळ | प्रा.प्रणोती कांबळे | 202 ते 204 |
| 58 | | डॉ.भाऊ लोखंडे | 205 ते 208 |
| 59 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे धम्मक्रांतीचे महत्व | डॉ.अशोक सबाने | 209 ते 211 |

# विठोबा रावजी मूनपंडे यांचे विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील राजकीय व सामाजिक योगदान : एक चिकित्सक अध्ययन

**प्रा. डॉ. विमल राठोड**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. मधुकरराव वासनिक
पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

**सारांश :—** मध्यप्रांत वऱ्हाडातील दलित चळवळीची सुरुवात धार्मिक प्रश्नापासुन झाल्याचे दिसुन येत असले तरी विदर्भातील दलित चळवळीचा आरंभ कोणी केला याबाबत मतभेद दिसुन येतात. “ना. रा. शेन्डे यांनी ‘ग. आ. गवई’ व्यक्ती आणि कार्य या चरित्र ग्रंथामध्ये म्हटले आहे की, विदर्भातीलच नव्हे तर संपुर्ण महाराष्ट्रातील दलित चळवळीचे पहिले मानकरी म्हणून किसन फागोजी बनसोड यांचे नाव घेतले जाते. इ.स. १९०१ साली त्यांनी ‘सन्मान बोधक अस्पृश्य समाज’ स्थापन केला.”[१] परंतु या संस्थेने कोणते कार्य केले त्याची काहीही माहिती मिळत नाही, “किसन फागोजी बनसोडे यांच्या अगोदरच्या पिठीतील एक समाज सेवक महार समाजाच्या उत्कर्षाकरीता अविरत झटत असल्याचे उपलब्ध माहितीवरुन दिसुन येते. विठोबा रावजी मुन संत पंडे या नावाने ते प्रसिद्ध होते.”[२] किसन फागोजी बनसोडे यांनी कार्य सुरु करण्याअगोदर पश्चिम महाराष्ट्रात गोपाळबाबा वलंगकर, शिवबा जानबा कांबळे, व विदर्भात विठोबा रावजी मुनपंडे, अकोल्याला जानोजी खंडारे हे दलित चळवळीत कार्य करीत होते.

**शब्दसंकेत :— अंबाळा तलाव, अंत्यज समाज कमेटी, महार सभा.**

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना :—**महार समाजाच्या उत्कर्षासाठी सतत झटत असलेल्या विठोबा रावजी मूनपंडे यांचा जन्म इ. स. १८६४ साली वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे झाला. काही वर्षानंतर कापसाच्या व्यवसाच्या निमित्ताने इ. स. १८९३ साली नागपूर शहरातील शनिवार पेठेत ते स्थायिक झाले. या व्यवसायामुळे त्यांचे मुंबईपर्यंतच्या दुरदुरच्या प्रदेशात जाणे येणे होते व त्या माध्यमातून त्यांचा अनेकांशी संबंध येत होता. या संबंधातुनच तेथिल महार समाजाच्या सामाजिक स्थितीचे अवलोकन जवळून करण्याची संधी विठोबाजींना प्राप्त झाली. त्यावेळेस सामाजिक कार्य करणाऱ्या लोकांशी देखिल त्यांचा जवळुन संबंध येऊ लागला. त्यांच्याशी भेटी गाठी होऊ लागल्या. त्यातूनच त्यांना समाजकार्य करण्याची प्रेरणा मिळत गेली. आणि पुढे जाऊन त्यांनी आपले संपूर्ण लक्ष धार्मिक चळवळीकडे वळविले. समाजातील लोकांना एकत्रित करण्याकरिता व त्यांचे लक्ष आपल्याकडे वळविण्याकरिता ते तुतारी किंवा शंख वाजवित त्यामुळे ते ‘विठु पोंगाडे’ या नावाने प्रसिद्धीस आले ते गोरक्षण सभेचे प्रचारक होते तर प्रवचण सुद्धा उत्तम दर्जाचे करत होते. भाषण व किर्तणाच्या माध्यमातून त्यांनी दलित समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. विदर्भातील दलित चळवळीची गंगोत्री म्हणून त्यांचा गौरव केला जातो. परंतु एवढ्या विशाल कार्य करणाऱ्या व्यक्तीचे ६ मार्च १९२४ रोजी आकस्मिक निधन झाले.

**अंबाळा तलावावर महारांना स्नानाचा हक्क :—**

“नागपूर जिल्ह्यातील श्रीक्षेत्र रामटेक येथील अंबाळा तलावावर कार्तिक पोर्णीमेच्या यात्रेत महार लोकांना स्नान करण्याची परवानगी असल्याबददलचा हुकुमनामा विठोबा रावजी मुन यांनी १९०३ साली रामटेक देवस्थान कमिटीकडून मिळविला होता.”[३] याच्याही पुर्वी १३/१४ वर्षापासून अंबाडा तलावावर महार लोकांना स्नान करण्याची वहीवाट होती. परंतू ही वहीवाट मध्यंतरीत खंडीत झाल्याचे दिसून येते कारण महारांना अंबाडा तलावावर स्नान करण्यास गारेक्षण कमेटीच्या लोकांकडून बंदी करण्यात आली. “विठोबाजी मुनपंडे यांनी प्रयत्न करुन ही वहीवाट महारांना पुन्हा प्राप्त करुन दिली. आणि पुन्हा तेथे घाट बांधला.”[४] तसेच या घाटाला लागुन असलेली “अंबाडा तलावाकाठची पहाडाची जागा ५०×४० हात गोपाळराव गणेश फडणवीस मालगुजार रामटेक यांचे कडून १९०७ ला विकत घेतली.”[५] आणि महार लोकांच्या पुजेकरीता शिवालय बांधले. अंबाडा तलावावर महारांना बंदी घालण्याचे कारण म्हणजे महार मृतमास व गोमास खातात म्हणून त्यांचा विटाळ केला जातो. म्हणून

"महारांनी गोमास खाणे सोडावे याकरीता विठोबांनी गावोगावी फिरुन महार लोकांच्या सभा घेवून महार लोकांकडून 'गोमास खानार नाही' अशा शपथा घेतल्या. तसेच महार समाजाची कायमची स्नानाची व्यवस्था व्हावी म्हणून विठोबांनी गावोगावच्या भजनी मंडळींना दिडया घेवून बोलावले. व या भजनी दिंडयाचा मोर्चा नागपूरच्या रघुजी राजे भोसलेच्या राजमहालावर नेला"[६] रघुजी भोसले हे रामटेक देवस्थानचे मालक असून सर्व आर्थिक बाबतीत देवस्थानावर त्यांचाच अधिकार होता. त्यांनी "महारांच्या समस्या लक्षात घेवून त्यांना अंबाडा तलावर स्नान करण्याची परवानगी दिली. नंतर काही वेळेनंतर घाट सुद्धा बांधण्यास परवानगी दिली होती."[७]

याच घाटावर मंदीराच्या उभारणीकरीता विठोबांनी गावोगावी फिरुन पैसा, वर्गणी गोळा करणे सुरु केले. तसेच गोरक्षण कमेटी नागपूर यांनी ही मागील अनेक वर्षापासुन आमचे घाटासंबधी महार लोकांकडून वर्गणी रुपाने गोळा केलेला पैसा बांधकामाकरीता मिळविण्यासाठी एक अर्ज केला होता.

विठोबाजी यांनी स्वप्रयत्नाने श्रीक्षेत्र रामटेकच्या अंबाडा तलावावर महारांना स्नान करण्याचा खंडीत झालेला हक्क पुन्हा प्राप्त करुन दिला. या घटनेचा नागपूर जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण विदर्भातील महार समाजावर चांगलाच प्रभाव पडुन त्याच्यात आपल्या हक्का बाबत जाणिव निर्माण होण्यास सुरुवात झाली. तलावावर घाट बांधण्यात आल्यामुळे या परिसरातील महार समाजाला यात्रे निमित्ताने एकत्र येण्याची संधी प्राप्त झाली. हा घाट स्पृश्य समाजापासून अलग असल्यामुळे तेथे बसुन महार समाज आपल्या समाजाच्या विदारक स्थितीवर चर्चा आणि आपल्या हक्काबाबात विचार विनीमय करु लागला. पर्यायाने हे हक्क प्राप्त झाल्याने महार समाजात जाणीव जागृती निर्माण झाली व आपण जर प्रतिकार केला तर आपले हक्क आपल्याला नक्कीच मिळतात याची जवळून जाणीव झाली. अशाप्रकारच्या धार्मिक प्रश्नातून विदर्भातील दलित चळवळीचा प्रारंभ झालेला दिसुन येतो व विठोबाजी मुनपंडे याचे नाव महार समाजात सर्वमुखी पोहचले.

**अत्यंज समाज कमिटी :–** रामटेक येथे कार्तिक पोर्णीमेला रामनवमीची यात्रा भरत असे. रामटेकच्या अंबाडा तलावामध्ये स्नान करणे पवित्र मानले जाई. "१९०६ साली रामटेकच्या रामनवमीच्या यात्रेच्या प्रसंगी महार लोकांची प्रचंड जाहीर सभा झाली. व एक 'अंत्यज समाज कमिटी' विठोबाजी मुनपंडे यांनी स्थापन केली."[८] विदर्भातील दलितांची पहिली सामाजिक संस्था म्हणून 'अंत्यज कमिटी' चा उल्लेख करावा लागेल. या सभेमधून विठोबाजीच्या कार्याचा गौरव करण्यात आला. "विठोबांनी प्रत्येंक गावी सभा घेवून महार लोकांना उपदेशाद्धारे कसाईकाम व गोमास आहारापासून शपथा देवून सोडवणे अशी धर्मसुधारणा व महार लोकांची स्नानासंबधी व्यवस्था आजपर्यंत महार लोकांत कोणीही केली नाही, अशी प्रशस्ती देण्यात आली. व त्यांचे आभार मानण्यात आले. कमिटीने विठोबाजींना या घाटावर अध्यक्ष पंडे मानुन वंशपरंपरेकरीता पिंडदान, संकल्प, दक्षिणा, जी मिळेल ती घेण्याचा अधिकार देऊन सभा रजिस्टर केली."[९]

विदर्भातील दलितांची पहिली सामाजिक संस्था म्हणून कार्य "अंत्यज कमिटी' नी धार्मिक बाबीकडें लक्ष पुरवले"[१०] असल्यामुळे अंत्यज समाज कमिटीने आपले कार्यक्षेत्र निवडलेले दिसुन येते. "गावोगावी जाऊन महार समाजाला धार्मिक बाबतीत उपदेश देणे, महार समाजाने कसाई काम करु नये, मृत प्राण्याचें, गायीचे मांस भक्षण करु नये यासाठी अंत्यज समाज कमिटी महार समाजाचे प्रबोधन करीत असे."[११]

या सभेच्या कार्यावरुन असे दिसुन येते की, सभेने महार समाजाच्या धार्मिक बाबीकडे विशेष लक्ष पुरविले होते आणि महार समाजात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु केला. होता. त्याच बरोबर अंबाडा तलावावर विठोबाजींनी स्वखर्चाने घाट बांधून तेथे महारांच्या स्नानाची जी स्वतंत्र व्यवस्था केली. त्यावरुन स्पृश्य हिंदुप्रमाणेच आपल्या समाजालाही काही प्रमाणात धार्मिक स्वातंत्र्य असावे. याचे बिजारोपण या सभेच्या स्थापनेपासून झालेले दिसून येते. कार्तीक पोर्णीमेला रामटेकला भरणारी यात्रा प्रसिद्ध असल्याने व या यात्रेप्रसंगी स्थापन करण्यात आलेली ही कमिटी विदर्भातील दलित चळवळीला प्रेरक असणे स्वाभाविक आहे.

एकंदरीत एकोणीसाव्या शतकाच्या अंतीम चरणात विदर्भातील दलित चळवळीचा प्रारंभ होऊन विसाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच दलित चळवळीचे क्षेत्र जसजसे विस्तारु लागले तसतसा तिला निश्चित आकार येऊ लागला व नव्या दमासह ती मुळ धरु लागली होती.

**महार सभा, नागपूर १९१२ :–**इंग्रज सरकारच्या शिक्षण धोरणामुळे मिशनरी शाळेतुन अस्पृश्याना नुकतेच शिक्षण मिळु लागले होते. परंतु नागपुर व चंद्रपूर येथे सरकारी शाळामधुन अस्पृश्य मुलांना प्रवेश नाकारल्यामुळे अस्पृश्यांनी मिरवणूका काढल्या होत्या. महार समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा व त्याबद्दलची आस्था वाढावी म्हणून "दि. १८ डिसेंबर १९१२ रोजी जैराम पैकु शेटया यांच्या मोतीबाग येथील वाड्यात विठोबाजींच्या नेतृत्वात खास महार सभा बोलावून महार सभेची स्थापना करण्यात आली."[१२] या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विठोबाजी मुनपंडे हे होते. नंतर १५/०३/१९१३ रोजी आपले अध्यक्षपद करणुजी मालगुजार यांना देऊन ते स्वत: महार सभेचे सेक्रेटरी झाले. १९१४ मध्ये महार सभेचे अध्यक्ष रेव्हरंड फिलीप व सेक्रेटरी बापुजी माधवराव पाटील होते. सभेच्या उपाध्यक्षपदी खालील व्यक्तीचा समावेश होता. "कालीचरण गणोजी नंदागवळी, करणुजी विठ्ठल मालगुजार, विठोबाजी मुन पंडे, गोमा गणेश सावकार, मुकिंदा तुकाराम शेटया मुरारकर, भोबाजी सांगोजी मालगुजार, जाणकोजी सखाराम कॉन्ट्रॅक्टर, सूकाजी गोमाजी बनसोडे पाटील, गणपत गुंडू दलाल, जयराम पैकु शेटया गायकवाड"[१३] महार सभेच्या कार्यकारणीमध्ये त्या काळातील महार समाजातील प्रतिष्ठित मानले जाणारे आर्थिकदृष्ट्या सधन व्यक्तीचा समावेश होता. सुरुवातीला वऱ्हाडातील सदस्यांना स्थान दिसत नसले तरी पुढें "गणेश आक्काजी गवई महार सभेचे सक्रिय सदस्य होते."[१४] नागपूरच्या महार सभेने केवळ नागपूर परिसरातीलच महार समाजाला एकत्र आणण्याचे काम केले नाही तर दलित चळवळीला व्यापक व संघटनात्मक रुप दिले.

**महार सभेचे कार्य :–** नागपूरच्या महार सभेने महार समाजात शिक्षणाचे फार महत्वाचे कार्य केलेले दिसते. दि. १४.०४.१९१३ ला सोमवार रोजी महार जातीतील विद्यावृद्धी व पंच नियम सुधारणा या विषयावर साधक बाधक चर्चा करण्यात आली व त्यावर निर्णय घेण्यात आले. यामध्ये महार समाजातील शिक्षण विषयक, सामाजिक, धार्मिक प्रश्नांच्या अंर्तभाव होता. हल्ली "राजकृपेने विद्येच्या शाळा प्रत्येक ठिकाणी असुन अंत्यज मुले उदरनिर्वाहाच्या अडचणीमूळे निरुपायास्तव शाळा सोडतात त्यास अखेर पास होई पावेतो महार सभेने खर्च पुरवावा. व्यापारानिमित्य शहरात येणाऱ्या आपल्या समाजांच्या लोकांची सोय व्हावी म्हणून धर्मशाळा बांधाव्या, पिण्याच्या पाण्याची जेथे गावात अथवा बाजारापेठेत सोय नाही तेथे विहीरीची सोय करावी. हे उद्देश महार सभेचे होते."[१५] त्याच बरोबर महार समाजात पंचायतीद्धारे पंचायत नियमात आवश्यक त्या सुधारणा घडवून आणणे हा सुद्धा उद्देश या महार सभेचा होता.

महार सभेने केलेल्या कार्याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल. हे कार्य विदर्भातील दलित चळवळीची दीशा दर्शविणारे आहे. राजकृपेने विद्येच्या शाळा प्रत्येक ठिकाणी झाल्या होत्या त्यामुळे महार समाजाला शिक्षणाची पुर्ण जाणीव झाली होती. दारीद्री कुटुंबातील मुले आर्थिक बाबीमुळे मधुनच शाळा सोडतात हे दिसुन येत होते. त्यामुळे "शिक्षणाची इच्छा असुनही शिक्षण घेता येत नसणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी सार्वजनिक फंडाची गरज आहे. याची जाणीव महार सभेच्या कार्यकत्यांना होती म्हणून महार सभेतर्फे त्या कार्यास सुरुवात केलेली दिसते"[१६] त्याचप्रमाणे महार समाजासाठी गावोगावी विहिर बांधण्याची योजना करणे म्हणजे लहानसहान काम नव्हते. परंतु समाजाची गरज म्हणून हे कार्य सभेने हाती घेतले होते ही घटना फार महत्वाची आहे. तसेच पती. पत्नीत वितृष्ट येताच काडीमोड करण्याची प्रथा महार समाजातील नैतीक आचरणावर आघात करणारी ठरली आहे. "आजही महार समाजातील घटस्फोटाचे प्रमाण इतर समाजापेक्षा जास्त असल्याचे वृत्तपत्रातील जाहीर नोटीसा वरुनही अनुमान काढण्यास हरकत नसावी. समाजातील काडीमोडीच्या प्रथेला आळा घालण्याचा पहिल्यांदाच सार्वजनिक प्रयत्न या सभेने केला होता."[१७] या सभेने हाती घेतलेल्या कार्यावरुन असे लक्षात येते की, या सभेने आपला समाजाचा फार बारकाईने अभ्यास केला होता व त्या सर्व समस्यांचे समाधानकारक उपायाद्वारे सोडविण्याचा प्रयत्न सभेने केलेला दिसतो.

महार सभेच्या त्यावेळच्या कार्यावरुन असे दिसते की महार कार्यकर्ते आपल्या समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक उन्नतीकरीता इंग्रजी अधिकारी, ख्रिश्चन मिशनरी आणि अस्पृश्य समाजाप्रती सहानुभूती व सहकार्य असणाऱ्या स्पृश्य हिंदु पुढाऱ्यांच्या पाठिंब्याने कार्य करीत असत. महार सभेचे अध्यक्ष एक ख्रिश्चन मिशनरी रेव्ह. जी. डी. फिलीप होते. यावरुन "मिशनरी अधिकाऱ्यांनी आपल्या सहकार्याने महार कार्यकर्त्यात आत्मीयता निर्माण केली होती. इंग्रज शासकीय अधिकारी व ख्रिश्चन मिशनरी यांच्या प्रयत्नामुळे समाजात शिक्षण प्रसारास उत्तेजन

मिळाले होते. त्यामूळे या समाजात वैचारिक जागृती निर्माण होऊ लागली."[१८] महार सभेने महार समाजात शिक्षणविषयक वैचारीक जागृती निर्माण करण्याचे महत्वाचे कार्य केल्याचे दिसुन येते.

**संदर्भ सूची :–**

१) कोसारे एच. एल., 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास', नेहा प्रकाशन, नागपूर, द्वि. आ. २०१२,पृ क्र ३५
२) कित्ता. पृ. क्र. ३५.
३) कित्ता, पृ. क्र. ३६.
४) कित्ता, पृ. क्र. ३६.
५) कित्ता, पृ. क्र. ३६.
६) ढोले, प्रदिप, 'आंबेडकरी चळवळीचा इतिहास', बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, २०१७, कित्ता, पृ.क्र.३६
७)कित्ता, पृ. क्र. ८९.
८) मुन वसंत, मध्यप्रांत वऱ्हाडातील आंबेडकरपूर्व दलित चळवळ, सुगावा प्रकाशन, प्र. आ. १९८७, पृ. क्र. ५५.
९) कित्ता, पृ. क्र. १४.
१०) पूर्वोक्त पृ. क्र. २२.
११) म्हस्के, बन्सी,'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास',नभ प्रकाशन, अमरावती, प्र. आ. २००२, पृ. क्र. ६३.
१२) पूर्वोक्त, पृ. क्र. ९१.
१३) पूर्वोक्त, पृ. क्र. २६.
१४) महार सभेचा अहवाल, आ. १९१३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, नागपूर.
१५) पूर्वोक्त, पृ. क्र. ४०.
१६) पूर्वोक्त, पृ. क्र. १८.
१७) कित्ता, पृ. क्र. १८.
१८) पूर्वोक्त, पृ. क्र. ४१.

# गुरूवर्य किसन फागोजी बन्सोड – दलित स्त्रियांचा उद्धार

डॉ. आनंद बी गणवीर
मारोतराव पानतावणे महाविद्यालय,
कांद्री–कन्हान जि. नागपूर.

सारांश :– १९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात लोकहितवादी विष्णुबुवा ब्रह्मचारी, म. फुले, आगरकर, बाळशास्त्री जांभेकर, न्या. रानडे, पंडिता रमाबाई, सावित्रीबाई फुले इ. समाजसुधारकांनी स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी समाज जागृती करून एकप्रकारे सामाजिक क्रांती केली. या समाजसुधारकांनी स्त्रियांना त्यांच्या अधिकाराची प्रथमच ओळख करून दिली. स्त्री शिक्षणाने स्त्री सुधारणेचा पाया रचला.[१] स्त्रीच्या दु:खांना प्रभावीपणे वाचा फोडणारे महाराष्ट्रातील पहिले विचारवंत म्हणून लोकहितवादीचे[२] नाव घेतले जाते.समाजातील स्त्रीयांवर होणारे अन्याय, त्यांचे दु:ख नाहिसे करण्यासाठी स्त्री–शिक्षण हाच एक उत्तम उपाय आहे त्या संबंधी ते म्हणतात, ‘‘स्त्रिया सुशिक्षित होतील तेव्हा आपला अधिकार स्थापतील आणि संसार सुखास हानी करणाऱ्या पंडितापासून असा तहनामाच करून घेतील. जर स्त्रियांस थोडे ज्ञान असते तर त्यांनी पंडिताच्या जुलूमांचा विचार करून जे पुनर्विवाह करू नये म्हणतात, त्यांचे श्रीमुखात दिली असती पण अज्ञान व भोळसपणा यामुळे सर्वत्र जुलूम चालतो असा नेम आहे.’’[३]

स्त्रीयांमधील अज्ञान दूर करण्यासाठी म. फुल्यांनी प्रत्यक्ष कृती केली. स्त्रियांसाठी शाळा काढली, स्त्रि शिक्षणाच्या कार्याचा शुभारंभ केला. १९ व्या शतकात समाज सुधारणेचे तत्वज्ञान अनेक थोर विद्वानांनी सांगितले. पण सांगितले ते केले याप्रमाणे कृती करणारे जोतीराव फुले एकमेव समाज सुधारक होते.[४] जोतीबा फुले यांनी इ.स. १८४८ साली पहिली मुलींची शाळा स्थापन केली आणि स्त्रि शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.[५] स्त्रि शिक्षणाबाबत म. फुले म्हणतात, ‘‘आजच्या बालिका भावी राष्ट्रमाता असल्याने त्यांच्या पोटी जन्म घेणारे स्त्रि–पुरूष गुणसंपन्न, बुद्धीमान आणि सुजाण निपजावयाचे असतील तर त्या राष्ट्रमाता सुशिक्षित व सुसंस्कारीत असल्या पाहिजे.’’[६]

म. फुले आपल्या विचारांचा प्रभावीपणे प्रचार करण्यासाठी इ. स. १८४८ साली ‘युगप्रवर्तक’ नावाच्या कार्याची सुरूवात केली. म. फुले यांनी विधवा स्त्रिया, अनाथ बालक यांच्या संगोपणासाठी ‘बालहत्या प्रतिबंधक गृहाची’ स्थापना करून समाजक्रांती घडवून आणली.[७] कोणत्याही प्रगत राष्ट्राचे मुल्यमापन त्या राष्ट्रातील स्त्रिच्या प्रगतीवरून केले जाते. प्राचीन काळात भारतात गार्गी, मैत्रेयी, मंदोदरी आदि स्त्रीयांचा उल्लेख आढळतो. पुढील काळात रजिया सुलतान, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले इ. स्त्रियांचे कार्य आपल्या डोळयापुढे येते. एकंदरीत भारतीय समाजात स्त्री उद्धाराचे कार्य करणारे धुरीण नेहमी भावी पिढीचे मार्गदर्शक राहिले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाने व विचाराने प्रभावीत होऊन अस्पृश्य समाजात कार्य करणारे गुरूवर्य किसन फागोजी बन्सोड हे अस्पृश्य समाजातील आद्य थोर पुरूष होत. त्यांचा जन्म नागपूर जिल्हयातील मोहपा या गावी १८ फेब्रुवारी १८७९ साली झाला.[८]

<u>शब्द संकेत</u> : अस्पृश्यता बोध मंडळ,सन्मार्गबोधक अस्पृश्य समाज,शिक्षण,वृत्तपत्र,स्त्री मजुरांचा प्रश्न,अखिल भारतीय बहिष्कृत परिषद, आणि अस्पृश्य स्त्रियांच्या परिषदांचे व्यापक स्वरूप

<u>संशोधन पद्वती</u> : ऐतिहासिक संशोधन पद्वतिचा अवलंब करण्यात आलेला आहे.

अस्पृश्यता शोध–बोध मंडळाची स्थापना १८९१–९२ : तत्कालीन परिस्थितीत अस्पृश्य समाजाची उच्च वर्णीयांकडून विटंबना व्हायची. ती नष्ट करण्यासाठी गुरूवर्यानी १८९१–९२ साली वयाच्या १६ व्या वर्षी ‘अस्पृश्यता शोध–बोध मंडळाची’ स्थापना मोहपा या गावी केली व मंडळाची स्थापना करून समाजक्रांतीचे रणशिंग फुकंले. अस्पृश्य समाजातील स्त्रियांमध्ये जागृती निर्माण व्हावी हा त्यामागील उद्देश होता.गुरूवर्य बन्सोड यांनी या मंडळाद्वारे आपले लक्ष अस्पृश्यांच्या मुख्य समस्यांवर केंद्रीत केले. अस्पृश्य समाजातील स्त्री–पुरूषांचे अज्ञान, वाईट चालिरीती, अंधश्रध्दा, परावलंबी जीवन या समस्या त्या काळच्या अस्पृश्य समाजास भेडसावीत होत्या. त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न गुरूवर्यानी केला.[९] त्यासाठी इ.स. १८९५ साली ‘‘माझ्या रंजल्या व गाजलेल्या व तीव्र दु:खांनी विव्हळणाऱ्या बांधवाच्या हाकेला ओ देणं आणि त्या सत्कार्यालाच माझा देह विसर्जीत करणं हाच माझा पवित्र धर्म होय. हेच माझे खरे राष्ट्रीय कार्य होय.’’[१०] अशी घोषणा करून अस्पृश्य समाजाच्या कार्याला स्वत:ला वाहून घेतले. त्या कार्यासाठी इ.स. १९०० मध्ये व नंतर नागपूर हीच त्यांनी आपली कर्मभूमी बनविली.

सन्मार्गबोधक अस्पृश्य समाज १९०१: नागपूर येथे स्थायीक झाल्यावर १४ आक्टोबर १९०१ साली अस्पृश्य समाजाच्या ध्येय पुर्तीसाठी 'सन्मार्गबोधक अस्पृश्य समाज' नावाची एक संस्था नागपूर येथे स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून गुरूवर्य बन्सोड यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर भ्रमण करून अस्पृश्य उद्धाराचे कार्य केले. त्यांच्या या कार्यात जाईबाई चौधरी व झुलाबाई मडावी इ. स्त्री कार्यकर्त्यांनी मोठया उत्साहाने भाग घेतला. या संस्थेच्यावतीने ते ठिकठिकाणी जलसा भरवित असत व त्या माध्यमातून जनजागरण करीत असत. 'जलसा' च्या निमीत्ताने स्त्री जीवनाच्या दयनीय परिस्थिती संबंधी माहिती घेऊन त्यावर मार्गदर्शन करायचे. स्त्रीची अशी दयनीय परिस्थिती पाहून गुरूवर्यांना फार दु:ख होत असे. गरिबीमुळे स्त्रियांवर त्यांच्या पतीकडून असह्य छळ होत होता. म्हणून समाजात स्त्रीयांना सन्मानाने जीवन जगता यावं यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असत.[११अ]

गुरूवर्यांचा जन्म अस्पृश्य समाजात झाल्याने जातीय विषमतेच्या अपमानाच्या दु:खाची जाणीव त्यांना होती तेच दु:ख अस्पृश्य स्त्रीच्या वाटयाला आले होते. उच्चवर्णीय स्त्रियांपासून तळागाळातील स्त्रीयांपर्यंत शोषण होत असल्याची जाणीव त्यांना होती. स्त्रियांना शिक्षीत करणे गरजेचे आहे. याच ध्येयाने ''प्रत्येक व्यक्तीने आपली सुधारणा करून घेण्याचा प्रयत्न केल्यास सगळ्या जातीची सुधारणा होण्यास वेळ लागणार नाही. समाजाचे अर्धांग ज्या स्त्रिया त्या अशिक्षित राहिल्यास समाजाची सुधारणा व उन्नती झाली असे म्हणता येणार नाही. ''गृहव्यवस्थेची, मुलाबाळांच्या संगोपण, संवर्धनाची जबाबदारी स्त्रीवर असते. म्हणून सुशिक्षित स्त्री अशिक्षित स्त्रीपेक्षा सरस ठरते.''[११ब]

चोखामेळा मुलींची शाळा १९०७ :(गुरूवर्य बन्सोड यांनी अस्पृश्य स्त्रियांच्या शिक्षणावर विशेष भर दिला. कौटूंबीक जीवनात स्त्रीला महत्वाचे स्थान आहे. कुटूंबावर तीचे नियंत्रण असते. त्यासाठी स्त्री शिक्षित असणे महत्वाचे आहे. अन्य समाजातील स्त्री प्रमाणे अस्पृश्य स्त्रियांना सुद्धा शिक्षण मिळावे यावर त्यांनी भर दिला. अस्पृश्य स्त्री ही आधि शिक्षित झाली तरच कुटूंबात सुसंस्कारित वातावरण निर्माण होईल. शिक्षणामुळे कुटूंबातील मुलामुलींचे ज्ञान संवर्धन योग्य प्रकारचे होईल. अस्पृश्य स्त्रीयांच्या शोषणाची तीव्र वेदना त्यानी अनुभवल्यामुळे इ.स. १९०७ साली नागपूर येथे पाचपावली विभागात 'चोखामेळा मुलींची शाळा' स्थापन केली.[१२]

अस्पृश्य समाजातील प्रत्येक कुटूंबात स्त्री शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे. त्या शिवाय अस्पृश्य वर्गाची प्रगती व उन्नती होणार नाही. कुटूंबातील स्त्रि जर सुशिक्षित व सुसंस्कृत असली तरच त्या कुटूंबातील मुलांवर उत्तम संस्कार घडतील. कुटूंबाचे जीवन प्रगतशील होईल. असे उच्च व उदात्त विचार गुरूवर्यांचे होते.

निराश्रीत हिंद नागरिक वृत्तपत्राची सुरूवात १९१०: अस्पृश्य समाजातील घृणास्पद चालीरीती ला वाचा फोडण्यासाठी गुरूवर्यांनी वृत्तपत्रांच्या माध्यमातून समाज जागृती केली. त्यासाठी त्यांनी इ.स. १९१० मध्ये 'निराश्रीत हिंद नागरिक' वर्तमान पत्राची सुरूवात केली. या वृत्तपत्राच्या माध्यमातून गुरूवर्यांनी समाजाच्या विशेषत: अस्पृश्य स्त्रियांच्या शिक्षणावर भर दिला. स्त्रि शिक्षणाचा प्रसार केला. या वृत्तपत्रातून अस्पृश्य स्त्रियांचे दाहक जीवन त्यांनी समाजा समोर आणले व म्हणून शिक्षणाच्या प्रश्नावर त्यांनी भर दिला.[१३] प्रत्येक अस्पृश्य स्त्री सुशिक्षित व सुसंस्कृत बनावी. तीने आपल्या कुटूंबात चैतन्य निर्माण करावे इ. महत्वपुर्ण बाबींचा परामर्श आपल्या वृत्तपत्रातून घेतला.

म. फुल्यांच्या कार्याचा प्रभाव : म.फुले यांनी अस्पृश्य समाजाच्या प्रगतीसाठी स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले. सावित्रीबाई फुले या सुद्धा अशिक्षित होत्याच. स्त्रीशिक्षणाचा प्रश्न जेव्हा मोठी समस्या बनून त्यांच्या पुढे उभी राहीली त्यावेळी मात्र सावित्रीबाईना शिक्षित करणे अत्यंत गरजेचे आहे म. फुलेंना वाटले. स्त्रीशिक्षणाला सावित्रीबाईनी साथ मिळल्या शिवाय स्त्रीशिक्षणाचे ध्येय पूर्ण होणार नाही याची जाणीव म. फुल्यांना झाली.[१४] प्रथम त्यांनी सावित्रीबाईना सुशिक्षित सुसंस्कृत व सेवाव्रतधारी बनविले.गुरूवर्यांनी पुढे याच पद्धतीचा अवलंब करून अस्पृश्य स्त्रीशिक्षणासाठी तुळसाबाईस म्हणजे स्वत:च्या पत्नीस शिक्षण देण्याचे ठरविले. गुरूवर्यांनी त्यासाठी तुळसाबाईस वर्धा येथील श्रीधर परांजपेच्या 'परांजपे आश्रमात' शिक्षणासाठी पाठविले. परांजपे आश्रमात राहून तुळसाबाईनी दीड ते दोन वर्ष कठोर परिश्रम घेऊन शिक्षण पूर्ण केले. आश्रमातील पवित्र वातावरणाने त्यांच्यात शिस्त व स्वाभिमान जागृत झाला.[१५] तुळसाबाईचे हेच शिक्षण पुढे गुरूवर्यांच्या सामाजीक कार्यात मोलाचे ठरले. अस्पश्य स्त्रियांच्या उद्धारासाठी व त्यांच्यात सामाजिक जागृती निर्माण व्हावी यासाठी तुळसाबाईनी आयुष्याची २६ वर्षे घालविली.

बिडी मजूर स्त्रियांचा प्रश्न: गुरूवर्यांनी इ.स. १९०२ पासूनच आपल्या सामाजीक कार्याची सुरूवात केली. त्यात मुख्यत: अस्पृश्य स्त्रियांच्या ज्वलंत समस्याकडे आपले लक्ष वेधले. गुरूवर्य हे स्त्री उद्धारक होते. म्हणूनच त्याकाळी मध्यप्रांतात भंडारा, कामठी, नागपूर, चंद्रपूर या जिल्हयात मोठया प्रमाणात अस्पृश्य जनता बीडी

मजुरीचा व्यवसाय करीत होती. त्याच सुमारास मध्यप्रांताच्या कायदेकौन्सिल मध्ये तंबाखू वर जास्तीचा कर वाढविण्याचे ठरले. कायदे कौन्सिल मध्ये त्यावेळचे अस्पृश्यांचे पुढारी श्री. हेमचंद्र खांडेकर, श्री. खंडारे श्री. ग. अ. गवई यांनी त्या कर वाढीस कसून विरोध केला.[१६]

गुरूवर्य बन्सोड यांनी बिडी मजुरांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. श्री. ग. म. ठवरे यांच्या सहकार्याने गुरूवर्यांनी बिडी मजुरांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला.[१७] बिडी कारखानदार धर्मदाय फंडाच्या नावाखाली बीडी मजूरांकडून काही रक्कम वसूल करीत असत, त्या फंडातील रकमेचा उपयोग बिडी मजूर स्त्रियांच्या आजारांवर व त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करावा इ. मागण्या त्यावेळी बिडी कारखानदारांकडून मंजूर करून घेतल्या गेल्या.बिडी कारखान्यात स्त्री–पुरूष एकत्र बसून बिड्या बांधत असत, त्यामुळे स्त्रीयांना दुर्व्यवहाराचे जीवन व्यतीत करावे लागत असे. याची जाणीव गुरूवर्यांना होताच त्यांनी स्त्रि–पुरूषांना एकत्रित बसविण्याची व्यवस्था बंद करून स्त्रियांना वेगळे बसविण्याची व्यवस्था केली. स्त्री मजुरांसाठी स्त्रि मॅनेजर ची व्यवस्था केली गेली. या कार्यात गुरूवर्याना मोठे यश आले.[१८]

स्त्री सत्त्वरक्षणाचे कार्य :नागपूर प्रांतात रेल्वे स्टेशन जवळ मोठ्या प्रमाणात संत्र्याचा व्यापार चालत असे. या कामात मोठ्या संख्येत अस्पृश्य स्त्रियां मजुरीचे काम करीत असत. त्यांच्या कामाचा फायदा घेऊन संत्र्याचे व्यापारी अस्पृश्य स्त्रियांशी दुर्व्यवहार करीत.[१९] गुरूवर्यांना या बाबत माहिती मिळताच स्त्रियांना समजावून सांगितले. रात्रीच्या वेळी स्त्रीयांना काम करण्यास मनाई केली. एवढेच नव्हे तर महार तरूणांची संघटना तयार करून अस्पृश्य स्त्री सत्त्वरक्षणाचे काम केले.

अखिल भारतीय बहिष्कृत परिषदेचे आयोजन : (१९२०)

अस्पृश्य समाजातील स्त्रियांचे जीवन उन्नत व्हावे या दृष्टीने गृरूवर्यांनी स्त्रियांना एकत्र आणले. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. सभा संमेलनाचे आयोजन केले. पुरूषांच्या संमेलनात स्त्रियांचे संमेलन आयोजित केले. अशाच प्रकारचे संमेलन गुरूवर्य बन्सोड यांनी नागपूर येथे 'अखिल भारतीय बहिष्कृत परिषद' ३०, ३१ मे व १ जून १९२० रोजी वाय.एम.सी.ए. च्या पटांगणात आयोजित केले. परिषदेचे अध्यक्ष कोल्हापूरचे छत्रपती शाहु महाराज होते. या परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. त्यांनी आपल्या प्रभावी भाषणाचे अस्पृश्य समाजात नवे चैतन्य निर्माण केले. अखिल भारतीय बहिष्कृत परिषद मध्ये स्त्रियांचा मोठ्या संख्येत सहभाग होता. स्त्रियांच्या प्रश्नावर मोठ्या प्रमाणात चर्चा करण्यात आली. अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी शैक्षणिक ठराव मांडण्यात आले. ठरावांवर स्त्रियांनी आपली बोलकी प्रतिक्रीया व्यक्त केली. १ जून १९२० रोजी परिषदेत एक ठराव मांडला तो असा, 'प्राथमिक शिक्षण मुलांना आणि मुलींना मोफत व सक्तीचे शक्य तितक्या लवकर सुरू करावे.' या महत्वपूर्ण ठरावावर आपले मनोगत व्यक्त करताना तुळसाबाई बन्सोड म्हणाल्या ''आमच्या समाजातील बायांना शिक्षण नसल्यामुळे... वरिष्ठ जातीच्या बाया ही आम्हाला दूर लोटतात म्हणून मुलांबरोबर मुलींच्याही शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे आणि मुलींकरिता प्रत्येक जिल्हा निहाय बोर्डिंग पाहिजे'',[२०] एकंदरीत स्त्रीयां मधील शिक्षणाची जागृती होणे गरजेचे आहे. हे यावरून स्पष्ट होते. पुढे रूक्मिणीबाई कोटांगळे यांनी आपले विचार स्पष्ट करताना म्हणाल्या ''शिक्षण नसल्यामुळे आमचा प्रत्येक ठिकाणी दुस्वास केला जातो... इतर वर्गाच्या मुलांमुली बरोबर आमच्या मुलांमुलीस शिक्षण देण्याची सोय झाली पाहिजे.''[२१] अशा प्रकारे मुलींच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणावर आलेला ठराव सर्वानुमते पास झाला.

२२ कलमी योजनेचा प्रस्तावः२ जून १९२० रोजी गुरूवर्य बन्सोड यांनी सभेचे आयोजन करून त्यात अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी नऊ कलमी योजनेचा प्रस्ताव सभे पुढे आणला. श्री. ग. म. ठवरे यांनी नऊ कलमी योजना सभेच्या मंजुरी साठी सभे पुढे सादर केली. योजने प्रमाणे, ''अस्पृश्य स्त्रीयांनी शिक्षण घेतले पाहिजे, त्यासाठी स्वतंत्र शाळा, वसतीगृहे व वाचनालये स्थापन करावी''.[२२] असा महत्वपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात आला. नऊ कलमी योजनेला मान्यता देण्यात आली. याच नऊ कलमी योजनेचा विस्तार करून सर्वस्पर्शी २२ कलमी योजनेची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्रात पुढे करण्यात आली. गुरूवर्यांनी आयोजीत केलेल्या परिषदेची फलश्रृती म्हणजे अस्पृश्य स्त्रियांमध्ये संघटना निर्माण होऊ लागल्या. जाईबाई चौधरी, केशरबाई गवई, यशोदाबाई दहाट, विरेंद्रबाई सोमकुंवर, कौशल्याबाई मसूरकर, सावित्रीबाई दवे, शारदाबाई मोडक रूक्मिणीबाई बोरकर, नागाबाई शेंडे, इ. अनेक दलित स्त्रीयांनी संघटना निर्माण केल्या म्हणून त्या काळच्या मध्यप्रांत वऱ्हाड विभागात अस्पृश्य स्त्रीयांमध्ये शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला.

इंडियन फ्रेंचाईज कमिटी पुढील साक्ष १९३२ :गुरूवर्यांनी अस्पृश्य महिलांना संघटीत व शिक्षित करण्याचे कार्य केले. सोबतच महिलांना त्याच्या अधिकाराची जाणीव करून दिली. अस्पृश्य महिलांनी सार्वजनिक कार्यात सहभाग घ्यावा, प्रांताच्या कायदे कौन्सिल मध्ये सहभागी व्हावे इ. महत्वपूर्ण गोष्टीवर भर दिला. १९३२ मध्ये

इंडियन फ्रेंचाईत कमिटीपुढे आपली साक्ष नोंदवित असताना अस्पृश्य स्त्रियांना मतदानाचा हक्क असावा याला आपला पाठींबा व्यक्त केला.[२३]

गुरूवर्याच्या प्रेरणेने अस्पृश्य स्त्रियांच्या परिषदांचे व्यापक स्वरूप:गुरूवर्य बन्सोड यांनी अस्पृश्य समाजातील रूढी व परंपरेला समुळ नष्ट करण्याचे ठरविले. पुरूशां बरोबरच स्त्रियांनाही सार्वजनीक कार्यात सहभागी करून घेतले. गुरूवर्याच्या या कार्यामुळे भविष्यात मोठ्या संख्येत महिला संघटित झाल्यात. महिलांच्या संघटनेने अस्पृश्य समाजाची सामाजीक परिस्थिती बदलण्यास सुरूवात झाली. त्यांच्या मधील वैचारिक पातळी वाढू लागली. मोठ्या प्रमाणात परिषदांचे आयोजन होऊ लागले. महिलांच्या परिषदांचे व्यापक स्वरूप पुढील प्रमाणे आहे.

१) मोहपा येथे मध्यप्रांत व वऱ्हाड महार परिषदेचे अधिवेशन २३ व २४ फेब्रुवारी १९२४ रोजी आयोजित करण्यात आले. परिषद मध्ये पुढील विचारांवर तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. कापलेले मांस खाऊ नये. पण मृतमांस खायला हरकत नाही या विचारावर वेणुताई भटकर व रंगुबाई शंभरकर यांनी आपला निषेध व्यक्त केला. अस्पृश्य लोकांनी सुधारणेसाठी हिंदू जनतेवर अवलंबून राहू नये असाही ठराव पास करण्यात आला.[२४]

२) अखिल भारतीय दलित कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन : (८ ते १० ऑगस्ट १९३०) नागपूर येथे अखिल भारतीय दलित कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली ८ ते १० ऑगस्ट १९३० रोजी घेण्यात आले. या परिषदेत महिलांचे स्वतंत्र अधिवेशन १० ऑगस्ट रोजी घेण्यात आले. या वेळी महिलांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या गोलमेज परिषदेतील भूमिकेला आपला पाठिंबा दर्शविला.[२५]

३) कामठी येथे १९३२ रोजी झालेल्या परिषदेत मोठ्या प्रमाणात अस्पृश्य स्त्रियांनी भाग घेतला. अजनीबाई देशभ्रतार यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत अस्पृश्य समाजाची समस्या योग्य पणे मांडल्या बद्दल त्यांचा आदरभाव व्यक्त केला.[२६]

४) मध्यप्रांत व वऱ्हाड दलित परिषद (१९३२) : अखिल भारतीय बहिष्कृत परिषद (१९२०) च्या यशस्वीतेने अस्पृश्य महिलांमध्ये सामाजीक जागृती निर्माण झाली. शिक्षणात प्रगती झाली. याचा आणखी प्रचार व्हावा यासाठी ६ नोव्हेंबर १९३२ रोजी नागपूर येथील मेयो हॉस्पीटल समोरिल लक्ष्मी–विजय सभागृहात मध्यप्रांत व वऱ्हाड दलित परिषदेचे आयोजन केले. परिषदेत स्त्री–शिक्षण, राजकीय अधिकारात अस्पृश्य स्त्रीयांचा सहभाग इ. प्रमुख विषयांवर विचार विमर्श करण्यात आला.[२७]

५) ६ एप्रील १९३४ रोजी बोरगाव जि. वर्धा येथे परिषद आयोजित केली. शिक्षणामध्ये स्त्रियांना सवलती उपलब्ध करून देणे. विवाहाबाबत सुधारणा घडवून आणणे इ. ठराव पास करण्यात आले.[२८]

६) मध्यप्रांत व वऱ्हाड अस्पृश्य महिला प्रांतिक परिषद (१९३६) : अनुसयाबाई इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली मध्यप्रांत व वऱ्हाड अस्पृश्य महिला प्रांतिक परिषद आयोजित करण्यात आली. तत्कालीन परिस्थितीत महिलांची सामाजिक व राजकीय क्षेत्रात झालेली जागृती दर्शविणारी ही महत्वपूर्ण परिषद होय.

परिषदेत अस्पृश्य महिलांच्या उद्धारासाठी खालील महत्वपूर्ण ठराव घेण्यात आले.

**i)** प्रांतीय कायदे कौन्सिल मध्ये तीन जागापैकी एक जागा अस्पृश्य महिलांसाठी राखीव ठेवावी.

**ii)** राज्य सरकारने ऑनररी मेजिस्ट्रेट म्हणून अस्पृश्य महिलांची नेमणूक करावी.

**iii)** महिला गिरणी कामगारांच्या पगारात कपात करू नये.

**iv)** ड) प्रांतिक सरकारने अस्पृश्य मुलींना सरकारी शाळेतून मोफत व सक्तीचे शिक्षण द्यावे. अस्पृश्य मुलींना शिष्यवृत्ती देणे, वसतीगृहाची स्थापना करणे इ. महत्वपूर्ण ठराव घेण्यात आले.[२९]

७) मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतातील सर्व अस्पृश्य मुलींना एकत्र यावे. आपल्या विचारांचे आदान प्रदान करावे या उद्देशाने २४, २५ मे १९३६ रोजी कॉटन मार्केट नागपूर येथे संमेलनाचे आयोजन करण्यात आले. संमेलनाच्या अध्यक्षा यशोदाबाई डहाट होत्या. या वेळेस विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. मोठ्या प्रमाणात अस्पृश्य स्त्रियांनी त्यात सहभाग घेतला.[३०]

८) तुमसर येथील परिषद सुभद्राबाई रामटेके यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या अधिवेशनात अस्पृश्य समाजातील मुलींच्या शिक्षणाबाबत ठराव पास करण्यात आला.[३१]

९) उमरेड तालुका महिला परिषद (१९४०) : उमरेड तालुका महिला परिषद २० एप्रील १९४० रोजी सौ. सुलोचनाबाई डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. परिषदेत कायदे कौन्सिल मध्ये अस्पृश्य महिलांसाठी राखीव जागा असावी. प्रत्येक तालुक्यात अस्पृश्य महिलांनी समता सैनिक दल स्थापन करण्यात यावी असे महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.[३२]

१०) शेड्युल्ड कास्ट फेडरेशन (महिला परिषद) नागपूर १९४२ : अखिल भारतीय दलित महिला परिषदेचे आयोजन १८, १९ व २० जुलै १९४२ ला नागपूर येथे मोहनपार्क मध्ये आयोजित करण्यात आले. परिषदेत महिलांची उपस्थिती मोठ्या संख्येत होती. परिषदेत पुरूषांच्या संमेलना बरोबरच महिलांचे संमेलन घेण्याचे ठरले. २० जुलै रोजी अखिल भारतीय दलित महिला परिषद घेण्यात आली. परिषदेला संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या. परिषदेच्या अध्यक्षा सुलोचनाबाई डोंगरे, स्वागताध्यक्ष कीर्तिबाई पाटील जनरल सेक्रेटरी इंदिराबाई पाटील, विरेन्द्रबाई तीर्थनकर होत्या. प्रसंगी स्वागताध्यक्ष किर्तीबाई पाटील म्हणाल्या, ''.... आपली पुरूष मंडळी हक्का करिता लढत असताना आपण मागे राहणे योग्य नाही.''

.... पुरूषांप्रमाणे स्वातंत्र्य मिळविण्यास आम्हीही उत्सुक आहोत. तो आमचा हक्क आहे. व तो आपण अथक चळवळ आणि प्रयत्नाने प्राप्त करायला हवा... आपल्या मध्यप्रांतात स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यांच्यात शिक्षणाची ओढ निर्माण करने आपले कर्तव्य आहे.[३४] परिषदेच्या जनरल सेक्रेटरी इंदिराबाई पाटील म्हणाल्या, ''पुरूषांच्या तुलनेत आपण स्त्रिया शिक्षणात खूप मागे आहोत... स्त्री शिक्षणासाठी आपण लढायला हवे.' अध्यक्षिय भाषणात सुलोचनाबाई डोंगरे म्हणाल्या.. ''शिक्षणाच्या बाबतीत आपण खुप मागासलेले आहोत. आजची बालीका उद्याची माता आहे... शिक्षण नसेल तर सद्‌गुणांचा विकास शक्य नाही.. ''[३५]

आपल्या प्रभावी भाषणाने स्त्रियांनी शिक्षणाबाबत अस्पृश्य समाजात जागृती निर्माण करणे काळाची गरज आहे. हे सिद्ध करून दिले. त्यानंतर खालील ठराव पास करण्यात आले.

**i)** मजुर स्त्रियांकरिता २१ दिवसांची किरकोळ रजा, २० वर्षा नंतर किमान दरमहा १५ रू. पेन्शन योजना लागु करावी. इ. मागण्या मजुरमंत्र्यामार्फत व्हाईसरॉयला पाठविण्यात आल्या.

**ii)** गिरणी मध्ये काम करणाऱ्या स्त्री कामगारांवर देखरेख ठेवण्यासाठी स्त्रियांची नियुक्ती करणे.

**iii)** महिलांच्या शिक्षणाकरिता सरकारी खर्चाने वसतिगृह काढणे, उच्च शिक्षणासाठी अस्पृश्य मुलींना शिष्यवृत्ती देणे.

**iv)** प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे.

**v)** घटस्फोट घेणे व देणे, स्थावर जंगम संपत्तीत वाटा मिळणे इ.[३६]

इं. महत्वपूर्ण ठराव संमेलनात पास करण्यात आले.

वरील ठरावावर महिलांची भाषणे झालीत त्यात सौ. राधाबाई कांबळे, जायीबाई चौधरी, कु. मंजुळा कानफाडे, ललिता गजभीये, कु. सुलोचना नाईक, कु. विरेन्द्रबाई तीर्थकर, कु. चंद्रभागा पाटील, कु. कौसल्या नंदेश्वर आणि इंदिराबाई पाटील, इं. महिलांनी उत्सफुर्त भाषणे केली.

मुल्यांकन : गुरूवर्य किसन फागोजी बन्सोड यांनी दलित स्त्रियांसाठी चळवळी करून स्त्रियांना भारतीय समाजात सन्मानाचे जीवन जगण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या या प्रेरणेने प्रभावीत होवून आज दलित महिलांची स्थिती उच्चभू महिलांच्या बरोबरीत आहे. अशा या महान विदर्भपुत्राचा १० ऑक्टोबर १९४६ रोजी देहावसान झाले.

संदर्भ ग्रंथ


१. मुगणेकर श्री. ग. परिर्तनाचे प्रवाह, १९८२ पृष्ठ. ९६.

२. भारतीय स्त्री; हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेचे मासिक, माणिक महोत्सव, १९६७, पृष्ठ ९७.

३. सहस्त्रबुद्धे पु.ग. : महाराष्ट्र संस्कृती, पृष्ठ ६७८.

४. महात्मा फुले गौर ग्रंथ : १९८२ पृष्ठ क्र. १८१.

५. संपा. शेंडे ना. रा.; दलितोद्धारक गुरूवर्य बन्सोड; श्री. शेष प्रकाशन : भंडारा; १९८१; पृष्ठ ५१.

६. माळी मा. गो.; क्रांती जेती सावित्रीबाई जोतीराव फुले.; प्रथमावृत्ती अशा प्रकाशन; मार्च; १९८० पृष्ठ ४२.

७. संपा. शेंडे ना. रा.; द. गु. ब.; पृष्ठ ५१.

८. कित्ता : पृष्ठ क्र. ३.

९. कित्ता : पृष्ठ क्र. ९.

१०. संपा. शेंडे ना. रा.; कै. ठवरे : चरित्र आणि चारित्र्य; प्रकाशक युगांतर शिक्षण संस्था; प्रथमावृत्ती, १९६५; पृष्ठ क्र. ७४.

११. (अ) संपा. शेंडे ना. रा.; द.गु.ब.; पृष्ठ १०.

११. (ब) संपा. शेंडे ना.रा.; द. गु.ब.; पृष्ठ १०.

१२. शेंडे ना. रा.; कै. ठं. च. आ. चा.; पृष्ठ ७४.

१३. किता, पृष्ठ ५८.
१४. शेंडे ना.; रा. द. मु. ब.; पृष्ठ ६६.
१५. किता. पृष्ठ ६६.
१६. Procceding of the legislative council of Govt. of the C.P. & Berar; Vol. III; 6-8-1923 P.No. 6
१७. शेंडे ना. रा.; द. गु. ब.; पृष्ठ १२२.
१८. शेंडे ना. रा.; द. गु. ब.; पृष्ठ १२२.
१९. शेंडे ना. रा.; द. गु. ब.; पृष्ठ १३८
२०. मुकनायक.; ५ जुन १९२०; पृष्ठ १०.
२१. मुकनायक; ५ जुन १९२०; पृष्ठ १०.
२२. शेंडे ना. रा.; द.गु.ब.; पृष्ठ १४०.
२३. शेंडे ना.रा.द.गु.ब.; पृष्ठ ११३.
२४. पवार उर्मिला, मून मिनाक्षी; आम्हीही इतिहास घडविला; प्रकाशन स्त्री–उवाच; मुंबई, १९८९; पृष्ठ २८.
२५. कोसारे, एच.एल.; विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास; ज्ञान प्रदिप प्रकाशन नागपूर; प्रथम आवृत्ती; १९८४; पृष्ठ १४९.
२६. ज्ञानप्रकाश; १० एप्रील १९३२.
२७. आ.इ.घ.; पृष्ठ २८.
२८. जनता; मे १९३४.
२९. निर्भिड; ८ मार्च १९३६.
३०. आ.इ.घ.; पृष्ठ २३.
३१. आ.इ.घ.; पृष्ठ २२.
३२. जनता; २९ जून १९४०.
३३. पवार उर्मिला, मून मिनाक्षी, आम्हीही इतिहास घडविला, प्रकाशन स्त्री–उवाच, मुंबई, १९८९, पृष्ठ ७६
३४. Report of Depressed class conferencesm Nagpur Session – 1942 All India Depressed classes women's conference second Session – 20th July 1942.
३५. All India Depressed classes women's conference second session – 20 th July 1942.
३६. All India Depressed classes women's conference second Session – 20th July 1942.

# श्री. किसन फागुजी बनसोड : विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील एक खंबीर नेतृत्व

**डॉ. कैलाश फुलमाळी**
इतिहास विभाग प्रमुख,
रेणुका कॉलेज,बेसा,नागपूर

**सारांश** :एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रामध्ये महात्मा ज्योतीबा फुले, न्या. रानडे, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे या सारख्या समाज सुधारकांनी अस्पृश्यता निवारण आणि अस्पृश्य समाजात शिक्षण प्रसार करण्यासाठी ज्या नाना प्रकारच्या चळवळी सुरू केल्या त्यापासून स्फूर्ती घेऊन विदर्भातील श्री. किसन फागुजी बन्सोड यांनी दलित समाजाला उच्च जातीच्या बरोबरीला आणण्याकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापूर्वी आपले मन आणि शरीर झिजविले. आपल्या स्वतःच्या नावाचा डांगोरा न पिटविता अस्पृश्यता निवारण्याकरीता जोरदार प्रयत्न केले. ही विदर्भातील सर्वच जनतेला आणि विशेषतः दलित जनतेला अभिमानाची गोष्ट आहे.

**शब्द संकेत :वृत्तपत्रिय कार्य,शैक्षणिक कार्य, साहीत्यकार, दलित व मजुरांचे पुढारी**

**संशोधन पद्वतीः ऐतिहासिक सेशोधन पद्वतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.**

***प्रस्तावना :*** *श्री. किसन फागुजी बन्सोड यांचा जन्म नागपूर पासून 24 मैल दूर असलेल्या मोहपा या गावी 18 फेब्रुवारी 1879 रोजी झाला. श्री. किसन फागुजी बन्सोड हे त्याकाळातील संपूर्ण महाराष्ट्रातील पहिले नार्मल स्कुल ट्रेंड अध्यापक होते.*[1] परंतू अध्यापकाची नोकरी न पत्करता त्यांनी खऱ्या अर्थाने समाजसेवा करण्याचे ठरविले. दलितांबाबत त्यांच्या मनात प्रथम पासून आस्था होती. तसेच जीवनात त्यांना मानाचे स्थान मिळावे यासाठी प्रयत्नशिल राहीले. कारण त्यांनी स्वतः गरीबीचे जीवन अनुभवले होते. त्यामुळे आपल्या भोवतालच्या दलित समाजाची स्थिती पाहून त्यांचे अंतःकरण कळवळले. वास्तवीक ते अत्यंत अभ्यासु, चिकित्सक आणि कल्पक होते, त्यांचे असामान्य गुण पाहून ब्रिटीश सरकारणे त्यांना मोठया पगाराच्या नोकऱ्या देऊ केल्या. परंतू *''माझ्या बांधवांची स्थिती सुधारणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे आणि या कार्याकरीता मी माझे जीवन वाहून देणार आहे''*[2] असे उत्तर ब्रिटीश सरकारला देवून त्यांनी दलित उध्दाराला वाहून घेतले. समाजिक कार्यायाठी त्यांनी आपले लक्ष दलितांच्या तीन ज्वलंत प्रश्नांवर केंद्रीत केले.

1) अस्पृश्यांचे शिक्षण 2) अनिष्ट चालिरितींचा संपूर्ण नायनाट करणे आणि 3) त्यांच्यामध्ये सत्यप्रवृत्त विचारसरणी व स्वावलंबी जीवनाची निर्मिती करणे असे हे तीन प्रश्न महत्वाचे होते. यासाठी त्यांनी विविध प्रकारच्या योजना आखुन त्या कार्यान्वित करण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न केला. *इ.स. 1901 मध्ये श्री बन्सोड यांनी दसऱ्याच्या मुहूर्तावर ''**सन्मार्ग बोधक अस्पृश्य समाज**'' या नावाची एक संस्था नागपूरला स्थापन करून त्याच्या शाखा महाराष्ट्रभर ठिकठिकाणी प्रस्थापित केल्या. या संस्थेने सतत 20 वर्ष महाराष्ट्रात लोकजागृतीचे कार्य केले.*[3]

**सामाजिक कार्य** : आपले बांधव आपल्या न्याय हक्कासाठी समानतेच्या भूमिकेवर जागृत व्हावे म्हणून त्यांनी *1910 ला ''**निराश्रीत हिन्द नागरीक**'', 1931 ला **विटाळ विध्वंसक**'', 1918 ला ''**मजूर पत्रीका**'' व 1931 ला ''**चोखामेळा**'' अशी चार पत्रके काढली.*[4]

या वर्तमान पत्रातून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून दिली आणि आपले जनजागृतीचे कार्य चालविले. ते स्वतः उत्तम शिक्षक होते. अस्पृश्य मुला–मुलींना शिक्षण देणे हे आपल्यासमोर त्यांनी ध्येय ठेवलेले होते. या उद्देशानेच त्यांनी *इ.स. 1907 मध्ये नागपूरच्या पाचपावली भागात ''**चोखामेळा कन्या शाळेची''** स्थापना केली. त्यानंतर नानासाहेब गवई आणि श्री बनसोड यांनी इ.स. 1914 मध्ये '**चोखामेळा वसतिगृह**' ची स्थापना केली.*[5] दुसऱ्या गावाहून शिक्षणासाठी येणाऱ्या अस्पृश्य विद्यार्थ्यांची सोय व्हावी म्हणून हे वसतिगृह स्थापन करण्यात आलेले होते. याचप्रकारे वसतिगृह अमरावती, अचलपूर, यवतमाळ आणि चिखली या गावात स्थापन करण्यात आले होते. श्री किसनजी बनसोड यांनी जे सामाजिक कार्य केले त्यामुळे श्री विठ्ठल रामजी शिंदे, भालाकार भोपटकर यासारख्या समाजसुधारकांनी त्या काळत श्री बनसोड यांचे कौतुक केले. त्याचबरोबर लोकमान्य टिळकांनी सुध्दा केसरीच्या 1905 मधील 12 व्या अग्रलेखात लिहीले. '' *या कामी त्यास पूर्ण यश येण्यास वरीष्ठ जातीची सहानुभूतीच नव्हे तर त्यांना प्रत्यक्ष मदतीची गरज आहे, असे आम्हाला वाटते.''*[6] दलित स्त्रियांची गुलामगीरी नष्ट करून त्यांना समाजात सन्मानाचे स्थान प्राप्त व्हावे म्हणून त्यांनी आपल्या जीवाचा आटापिटा केला. दलित स्त्रियांकरीता त्यांनी वसतिगृहे स्थापन केले. आजच्या बालकांचे पण उद्याच्या तरूणांचे भवितव्य कसे उज्वल राखता येईल. त्यांच्यात वीरवृत्ती कशी निर्माण करता येईल याची शिकवण त्यांनी गावोगावी हिंडून दिली. त्याचा परिणाम म्हणून विदर्भात श्रीमती जाईबाई चौधरी व आदिवासी श्रीमती झुलाबाई या स्त्री कार्यकर्त्या निर्माण झाल्या. त्याच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनी दलित व आदिवासी स्त्री समाजात मोठे कार्य केले.

**थोर साहीत्यकार :** समाजकारण, राजकारण आणि धर्मकारण या तीन्ही क्षेत्रातील त्यांचे कार्य अत्यंत मोलाचे ठरते. ते संत वाड्.मयाचे केवळ संशोधक आणि अभ्यासकच नव्हते तर त्याबाबत बरीच ग्रंथ निर्मितीही त्यांनी केली होती. इ.स. 1942 साली त्यांनी *'श्री **संत चोखामेळा चरित्र'** प्रकाशित केले.* दलितांच्या दाहक जीवनावर आणि विविध प्रश्नांवर त्यांनी अमाप कवने रचलेली आहेत. ते नाटककारही होते. 'चोखामेळा (देवदर्षन)', 'सत्यसोधक जलसा, ही दान्ही नाटके समाजाच्या खालच्या स्तरात खूप गाजली. त्याचप्रमाणे त्यांनी ***'महार जातीचा इतिहास'*** हा विचारांना चालना देणारा ग्रंथ निर्माण केला. श्री किसन बनसोड यांनी दलितांच्या न्याय हक्कासाठी महाराष्ट्रात

त्याकाळी अत्यंत नावाजलेल्या *'ज्ञान प्रकाश', 'सकाळ', 'सुबोध पत्रिका', 'काळा', 'केसरी', 'राष्ट्रवीर', 'महाराष्ट्र मुमुक्षू', 'मुंबई वैभव'*[7] या वृत्तपत्रात उच्च प्रतीचे अनेक स्फूटलेख लिहिले व दलितांच्या ज्वलंत प्रश्नाकडे जनतेचे लक्ष वेधले.

**दलित व मजुरांचे पुढारी** : लोकमान्य टिळकांचा व किसन बनसोड यांचा बराच संबंध आलेला होता. स्वराज्य प्राप्तीच्या दृष्टीने अस्पृश्य वर्गाचे उत्थान करण्याकरीता काय करावे याबाबत दोघांमध्ये बरीच चर्चा झालेली होती. किसन बनसोड यांनी दलितोव्दाराच्या दृष्टिने जी कार्य चालविली होती. त्याला टिळकांनी उत्तेजन दिले होते. त्याचबरोबर महात्मा गांधीजी यांच्याशी त्यांचा जवळून संबंध आलेला होता. 1920 नंतर जेव्हा–जेव्हा अस्पृश्यासंबंधी प्रश्न उद्‌भवत असत त्यावेळी ते महात्मा गांधीषी विचारविनिमय करीत असत. *इ.स. 1940 साली 'हरिजन' या शब्द प्रयोगाबद्‌दल महात्माजींशी तात्विक चर्चा केली होती. त्यांना 'हरिजन' हा शब्द मान्य नव्हता.*[8] सर्व अस्पृश्य जमातींना जर हा शब्द लागू करावयाचा झाला तर भारतातील सर्व सवर्ण हिंदुची 'हरिजन' म्हणून गणना करा. असा त्यांच्या युक्तिवादाचा मतितार्थ होता. किसन बनसोड हे त्याकाळी दलितांचे व मजुरांचे एकमेव पुढारी होते. मजुरांच्या प्रश्नासबंधी त्यांनी कसोशीने लढत दिली. पक्ष धर्म न बघता त्यांनी या प्रदेशात मजुरांची फार मोठी चळवळ उभारली होती. व्हिटले कमिशन पुढे त्यांनी मजुरांच्या ज्या मागण्या समोर ठेवल्या त्यावरून त्यांचे दूरदर्शित्व दिसून येते इ.स. 1920 साली नागपूर येथे झालेल्या कॉग्रेसच्या अधिवेशनात बॅ. अभ्यंकर, डॉ. मुंजे, लोकनायक अणे यांच्याबरोबर किसन बनसोड हे ही सामील झाले. नागपूर–विदर्भाने जी एकजूट दाखविली त्यामुळे कॉग्रेस यशस्वी झाली यात शंका नाही.इ. स. 1920 मध्येच नागपूर येथे वाय.एम.सी.ए. च्या भव्य पटांगणात *'अखिल भारतीय बहिष्कृत समाजाची' एक प्रभावी परिषद कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली भरली. या परिषदेत प्रथमच डिप्रेस्ड क्लास असोसिएशनचे अध्यक्ष श्री. एम.सी. राजा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नागपूर परिषदेकरीता उपस्थित होते.*[9] परिषद यशस्वी झाली यांचे श्रेय श्री. किसन बनसोड यांच्या अफाट कर्तृत्वाला आहे. इ.स. 1935 साली येवले मुक्कामी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मातंराची प्रतिज्ञा केली तेव्हा किसनजी बनसोड भयंकर बचैन झाले. त्यांनी निरनिराळया प्रदेशांचा दौरा काढला आणि लोकमत आजमाविण्याचा प्रयत्न केला. नंतर त्यांनी डॉ. आंबेडकरांची भेट घेतली. त्यांच्या कार्याबद्‌दल डॉ. आंबेडकरांना पूर्वकल्पना असल्यामुळे त्यांनी त्यांचा सल्ला मनापासून ऐकला. त्यांनी आंबेडकरांना मोठया संयमाने दूरवरचा विचार करून पुढे पाऊल टाका असा सल्ला दिला.[10]

इ.स. 1945 च्या अखेरीला दुर्देवाने किसनजी बनसोड आजारी पडले आणि त्यांना कॅन्सर झाल्याचे आढळून आले. मध्यप्रदेशचे त्यावेळचे आरोग्यमंत्री डॉ. हसन यांनी त्यांना मुंबईला पाठवण्याची व्यवस्था केली. तसेच डॉ. आंबेडकरांनी त्यांची भेट घेवून त्यांना मदत करण्याची व्यवस्था केली. त्यावेळी आजारातून बरे होवून ते नागपूरला आले. परंतु दुर्देवाने नागपूरला आल्यानंतर त्यांच्या आजाराने पुन्हा उचल खाल्ली आणि 10 ऑक्टोंबर 1946 रोजी म्हणजे वयाच्या 67 व्या वर्शी त्यांचे निधन झाले.

**निष्कर्ष :** किसन फागुजी बनसोड यांनी केवळ दलितोध्दाराचे कार्य केले येवढेच त्यांचे महत्व नाही तर ते पहिले मजूर पुढारी, पहिले पत्रकार, पहिले मुद्रक, पहिले लेखक, पहिले कवी आणि पहिले संशोधक होते. याशिवाय त्यांनी स्त्रियांना शिक्षण देण्याचाही प्रयत्न केला.किसन फागुजी बनसोड यांच्यासमोर महात्मा फुले आणि कर्मवरी विठ्ठल रामजी शिंदे यांचा आदर्श होता. त्यांच्याबरोबर त्यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत दौराच केला नाही तर दलितांच्या उन्नतीकरीता त्यांनी अनेक ठिकाणी रात्रीच्या शाळा आणि वसतीगृहे स्थापन केली. नागपूरात पाचपावली विभागात त्यांचे स्वतःचे घर होते पण विरोधकांनी ते जाळून टाकले. परंतू त्यांच्या मनाचा टोल ढळला नाही पुढे त्याच जागी कर्मवीर शिंदे यांनी एक मुलीची शाळा उभारली याचा श्री. किसन बनसोड यांना मोठाच आनंद झाला.किसन बनसोड यांच्या गुणामुळेच ते सर्वांना आवडते झाले. डॉ. आंबेडकरांनी म्हणूनच 'दलित उध्दारकांना वाट दाखविणारा तेजस्वी महर्षी' असे त्यांचे वर्णन केले. राष्ट्राच्या आकांक्षाशी समरस होणारा आणि त्या आकांक्षाना प्रतिसाद देणारा पहिला नेता म्हणून इतिहासात त्यांचे नाव नेहमी करीता अजरामर होईल.

## संदर्भ सुची


1) भगत श्री एम.ई, विदर्भातील दलित विचार आणि नेतृत्व, सुगावा प्रकाशन, पुणे, 2001 पृष्ठ क. 54
2) कित्ता, पृष्ठ क. 59
3) कानेटकर श्री. मा.ज., नागपूर प्रातंचा इतिहास, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, 1935, पृष्ठ क. 38
4) कित्ता,पृष्ठ क. 41
5) कोसारे डॉ. एच.एल, विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, नेहा प्रकाशन नागपूर, 2008 पृष्ठ क.76
6) कोसारे डॉ. एच.एल, दलित स्वातंत्र संग्रामातील सहभाग, नेहा प्रकाशन नागपूर, 2012, पृष्ठ क. 49
7) पगारे डॉ. म. सू , दलित साहित्याचा इतिहास, प्रशांत पब्लीकेशन, जळगाव, 1992, पृष्ठ क. 67
8) कोलारकर डॉ. श.गो, आधुनिक विदर्भाचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर, 2003, पृष्ठ क. 128
9) वक्कानी डॉ. नि.आ, आधुनिक विदर्भ का इतिहास, विदर्भ संशोधन मंडळ, 1985 पृष्ठ क. 94
10) देशमुख ले. श्री. त्रिंबक गोपाळ, मध्यप्रदेश मे मराठी साहित्य की प्रगती का इतिहास, शुल्क अभिनंदन ग्रंथ, भोपाल, पृष्ठ क. 88

# किसन फागूजी बनसोड यांचे लेखन चित्रणातून वंचितांच्या उध्दाराचे कार्य

प्रा. डॉ. प्रमोद मनोहर बोधाने
इतिहास विभाग प्रमुख
महिला महाविद्यालय, गडचिरोली

**सारांश :—**महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासातील आंबेडकरी चळवळ अत्यंत महत्वपूर्ण आहे. परंपरेने नाकारलेले हक्क, माणसाला माणूस म्हणून जगण्याचे हक्क देणारी चळवळ, आत्मभान देणारी चळवळ म्हणून या चळवळीकडे पाहावे लागेल.या चळवळीने सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक इ. क्षेत्रात आपला ठसा उमटविला. दलित म्हणजे आर्थिकदृष्टया, सामाजिक व धार्मिक दृष्टया शोषला गेलेला, अधिकारांची मागणी न करणारा, अशा समाजाला एकत्र आणण्याचे खरे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. [०१] परंतू त्यांच्याही अगोदर चैतन्य हरविलेल्या, निद्रिस्त समाजात चैतन्य ओतण्याचे काम साहित्याच्या माध्यमातून श्री किसन फागूजी बनसोड यांनी केले. साहित्य निर्मिती बरोबरच समाज सुशिक्षित झाल्याशिवाय आपल्याला कसल्याही अधिकारापासून वंचित राहावे लागेल. यासाठी दलितांच्या शाळा काढल्या, वस्तीगृहांची निर्मिती केली आणि दलितांना शिक्षणाचे दालन उघडले त्यांनी स्त्री शिक्षणावर प्रामुख्याने भर देऊन स्त्रियांना शिक्षणाच्या प्रवाहात ओढले.

**शब्द संकेत : कविता, लावण्या, नाटक आणि पत्रकारितेच्या माध्यमातुन वंचितांच्या उध्दाराचे कार्य**

**संशोधन पद्वती :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.**

**१) कविता :—**मराठी काव्य वाड:मय क्षेत्रात आधुनिक काव्यात श्री किसन फागूजी बनसोड हे पहिले दलित कवि होते. दलितांच्या उध्दाराकरीता त्यांच्या मनात आत्मविश्वास जागृत करण्यासाठी श्री. किसन फागूजी बनसोड यांनी आक्रमक पवित्रा घेतला.श्री किसन फागूजी बनसोड हे अखिल महाराष्ट्रातील पहिले विडंबनकार कवि होते. त्यांची काव्यप्रतिमा उपेक्षीतांच्या दु:खद जीवनाशी समरस होणारी, अबोल बांधवात हक्काची जाणिव निर्माण करणारी, प्रत्ययकारी व प्रबोधनकारी होती.[०२]

श्री किसन बनसोडांनी आपल्या काव्यात कोणताही आकस न धरता आणि सवर्ण हिंदूच्या दृष्ट प्रवृत्तीवर कठोर टिका केली नाही तर आपल्या वंचित बांधवांच्या मनात अस्पृश्यतेच्या विरोधात प्रतिकाराची शक्ती निर्माण केली. स्वत:च्या उध्दाराची प्रखर चेतावनी दिली. त्यांच्या कवितेचा विषय म्हणजे अस्पृश्यतेच्या अन्यायाविरुध्दचा लढा होय, कुणाचीही पर्वा न करता आणि आपला स्वाभिमान न गमावता न्यायासाठी, समतेसाठी स्वस्थपणे बसणे अध:पतनाचे व घातकीपणाचे ठरेल अशी तीव्र हाक देतांना ते म्हणतात,

> " मिळवली नाही जगी समता,
> पूढे गति बरी नाही, नाही "

अशाप्रकारे श्री किसन फागूजी बनसोड यांनी जो सल्ला आपल्या समाज बांधवांना दिला तो वाखाणण्याजोगा आहे. अस्पृश्यांच्या अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी, मानवाला या जाचक बंधनातून सोडविण्यासाठी लावणी, पोवाडे, कविता, शाहिरी गीते इ. साहित्याचा आश्रय घेऊन आपले समाजमन अंर्तबाहय बदलवून टाकण्याचा प्रयत्न करीत राहिले.त्यांची लेखणी समाजातील जातीभेद, विषमता व अस्पृश्यता यांचे समुळ उच्चाटन करण्यासाठी कार्यरत राहिली त्यांनी अस्पृश्यतेचे खरे दु:ख अनुभवले होते म्हणून त्यांच्या मनात हे आगीचे लोळ निर्माण झाले व त्याचा खराखुरा अविष्कार त्यांच्या काव्यसंपदेतून आला.[०३]

**२) विटाळावर केलेल्या कविता :—**विटाळावर कविता करतांना श्री किसन फागूजी बनसोड म्हणतात की, हे परमेश्वरा स्वर्गात बसून तू आमचा अंत पाहू नकोस. तू जर कृपावंत आहेस तर आम्हाला या जाचातून समुळ सोडव. या समाजकंटकांनी जगात विद्या असून आम्हाला विद्येपासून वंचित ठेवले, जातीभेद मानुन आपल्यापासून दुर ठेवले ते आमच्या सावलीचाही विटाळ मानतात. तेव्हा परमेश्वरा, तू स्वर्गात बसून काय करतोस! तू आमचे रक्षण कर.पुढे समाजाला उद्‌देशून म्हणतात की, हे जन हो तुम्ही मला विटाळ दाखवा. तो या भुमीवर कोठे आहे. असा प्रश्न ते समाजाला करतात, त्यांना विटाळाची विलक्षण चिड होती म्हणून समाजाला विटाळ कोठे आहे! असा प्रश्न वारंवार विचारतात.या जगात शास्त्रकर्त्यांने आपल्या हातात विटाळरुपी शस्त्र घेऊन आपणांस दास बनवून ठेवले. पारतंत्र्याची बेडी पायात पडली अस्पृश्यांना सवर्ण हिंदू पेक्षा हिन दर्जाचे गणल्या जात होते. जातीभेदाचे सैन्य उभारुन आपल्यामध्येच मत्सर, हेवेदावे निर्माण केले आणि ते आम्हाला छळतात. आमच्या व्देषातील भेदाभेदाचा, विटाळाचा व गृहयुध्द व अंतर्गत अशांतता याचा भरपूर फायदा उचलून ब्रिटीशांनी आपले दास बनविले.तेव्हा आपल्या कवितेतून महार बांधवांच्या मनात त्यांना विरत्व व शौर्य निर्माण करावयाचे आहे. कवितेतून त्यांनी महारावर कोणीकोणी अत्याचार केला व ब्रिटीशांनी भारतातील या अनिष्ट चालिरितीचा कसा फायदा घेतला व भारतीयांना कसे गुलाम बनवून ठेवले ही सर्व माहिती देवून आपल्याच बांधवांच्या मनात ते चैतन्य निर्माण करु पाहतात. तेव्हा त्यांना विटाळाचे किती चटके सहन करावे लागले असतील याची सविस्तर कल्पना येते.

**३) लावण्या :–**श्री किसन फागूजी बनसोड यांनी केवळ कविताच लिहिल्या नाहीत तर सामान्य जनतेला आपला उपदेश पटावा म्हणून सामान्य जनांची आवड कोणती हे ओळखून लावणी वाङ:मय सुध्दा लिहिलेले दिसून येते.‘ सांगू किती तुम्हाला ’ या लावणीतून कवि आपल्या अस्पृश्य बांधवात विचार जागृत करतांना त्यांना सार्वत्रिक शिक्षणाच्या कायदयाची माहिति करुन देतात.तत्कालीन समाज कंटकांच्या जाचामुळे श्री किसन फागूजी बनसोड यांनी आपल्या समाज बांधवांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करायचा होता. दलितांच्या लाजिरवाण्या केल्या जाणाऱ्या ओंगळ कामाबद्दल व ओंजळीन दुसऱ्याचे पाणी पिण्याबद्दल त्याची तिव्र शब्दात निर्भत्सना करुन ‘ थु तुमच्या तोंडावर ’ या जहाल लावणीत महार वतनदारावर प्रचंड टिका करतांना दिसतात.[०४]

आपल्या काव्यातून अस्पृश्यतेविरुध्द जणूकाही लढाच पुकारला. विटाळ आणि अस्पृश्यता यांचा गुलाम बनलेला आपला समाज त्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी श्री किसन फागूजी बनसोड यांनी आपल्या लावण्यातून अत्याचाराची जननी ‘रुढी’ यावर प्रहार केलेले आढळून येतात. हे कार्य करतांना समाजाला आवडणाऱ्या साहित्यातून बहूजन समाजात रुढ असलेल्या त्यांच्या मनात भिनलेल्या मनोरंजनाच्या माध्यमातून बोध केला पाहिजे हे तत्व त्यांनी जाणले आणि लावण्याचा आधार घेऊन समाज प्रबोधन केले.

**४) नाटक :–**श्री किसन फागूजी बनसोड यांनी १९२४ साली ‘ चोखामेळा ’ हे नाटक लिहिले. आगतिकतेच्या कोंडीत सापडलेल्या चोख्याची वेदना चित्रित करता करताच त्यांना या समाजात विषमता, अन्याय छळ कसा चालू आहे. याचेही चित्रण केले.[०५] तसेच ‘ सनातन धर्माचा पंचरंगी तमाशा ’ त्यांनी १९३२ मध्ये लिहिला. हा तमाशा लिहिण्यामागे त्यांचा मुख्य हेतू हाच होता की, ज्या जातीत त्यांनी जन्म घेतला त्या जातीवर होणारा परंपरागत अत्याचार त्यांनी अनुभवला होता. तेव्हा समाजसुधारणा करण्याच्या एकमेव उद्देशाने या तमाशाचे प्रयोजन केले.सनातन धर्माचा पंचरंगी तमाशा ’ पाटलांच्या तोंडातून जो वृत्तांत आपल्या महार बांधवांना ऐकविला तो अंत्यंत मार्मिक आहे त्या शब्दातून त्यांनी आपल्या संपूर्ण बांधवांच्या मनात विचार जागृती केली. त्यांच्या मनात जातीभेद, वर्णभेद इ. ब्राम्हणाविरुध्द बंड पुकारले व खरोखर त्या अत्याचारातून मुक्त व्हायचे असेल तर त्याकरीता तुम्ही नेटाने प्रयत्न करणे आवश्यक आहेत. याव्दारे अस्पृश्य बांधवांना एक दिशा प्राप्त करुन दिली. एक विकासाचा मार्ग त्यांनी यातून सांगितला. दलितातील विद्रोही मने जागे केले. पण हे सर्व करतांना ‘ सत्याची कास धरुनच कोणतेही कार्य करा, माणसाप्रमाणे वागा ’ हा संदेशही दिला.श्री किसन फागूजी बनसोडांनी ‘ जलसा ’ या नाटकाव्दारे समाजातील जे वाईट नितिनियम होते. रुढी आणि परंपरेने अंध झालेला जो समाज होता. माणसात जी अमानुषता होती, दांभिक प्रवृत्ती होती, देव भोळेपणा होता. तसेच विटाळासारखी जी अनिष्ट रुढी होती जिच्यामुळे सर्व दलित समाज वेदना करीत होता. अशा भयानक समाज परिस्थितीत आपल्या असंख्य समाज बांधवांच्या मनात समाज सुधारणेचे बिज श्री किसन फागूजी बनसोडांनी आपल्या वाङ:मयात पेरले.[०६]त्यांनी आपल्या नाटकातून व तमाशातून जे विचार मांडलेत ते त्रिकालाबाधीत सत्य आहेत. माणूसकीला धरुन आहेत. नव्हे तर माणुसकी जागृत करणारे आहेत.नाटक, तमाशा लिहितांना समाज सुधारणा व समाज जागृती हाच उद्देश होता. त्यांना उत्कृष्ट वाङ:मय निर्मिती करावयाची नव्हती. समाजाच्या गतिशिलतेसाठी कशाची गरज आहे हे ओळखून समाज जागृतीसाठी लेखणी उचलली.

**५) पत्रकारिता :–**समाजात अत्याचाराच्या विरोधात न्याय हक्काची जाणीव निर्माण करण्यासाठी वृत्तपत्र हे प्रभावी साधन ठरेल हे ओळखून त्यांनी वेगवेगळे वृत्तपत्र काढले. ‘मराठा दिनबंधू’,(१९०१), ‘निराश्रीत हिंदू नागरिक’(१९१०), ‘विटाळ विध्वंसक’(१९१३), ‘मजूर पत्रिका’(१९१८), ‘चोखामेळा’(१९३१) इ. वृत्तपत्र काढले.[०७]समाज जागृतीचे विचार संपूर्ण महाराष्ट्रात प्रसारीत व्हावे हा त्यांचा निर्धार होता आणि म्हणून संत चोखामेळाचे अभंगही संपादीत केले.

**मुल्यांकन** :एकंदरीत दलित संघटनांच्या माध्यमातून, साहित्यातून, पत्रकारीतेतून तत्कालीन परिस्थितीचे यथार्थ दर्शन आणि आपले विचार व्यक्त करुन संपूर्ण दलित समाजात सामाजिक, शैक्षणिक जागृती घडवून आणण्याचे अत्यंत महत्वपूर्ण कार्य श्री. किसन फागूजी बनसोड यांनी केले.

**संदर्भ ग्रंथ :–**

१) प्रा. राऊत गणेश, प्रा. राऊत ज्योती – महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (१८१८ ते १९६०), डायमंड पब्लीकेशन, पुणे, तृ.आ. २००७, पृ.क्रं.१६७

२) शेंडे ना. रा. दलित उध्दारक गुरुवर्य बनसोड, श्रीशेष प्रकाशन, भंडारा १९८१, भंडारा, १९८१, पृ.क्रं.९४

३) कित्ता – पृ.क्रं.९६

४) कित्ता – पृ.क्रं.९५

५) फडके भालचंद्र – दलित साहित्य – वेदना व विद्रोह, श्री विद्या प्रकाशन पुणे, १९७७, पृ.क्रं.१०४

६) मेश्राम डॉ. योगेंद्र – दलित साहित्य – उद्गम आणि विकास, श्री मंगेश प्रकाशन १९९८, पृ.क्रं.१७९

७) शेरे डॉ. निलकंठ – डॉ. आंबेडकर आणि दलित वैचारीक वाङ:मय, सुविधा प्रकाशन, पुणे, व्दि.आ.,२००७

# वंचीतांच्या अधिकारासाठी झटणारे समाजसुधारक : किसन फागोजी बनसोडे.

**डॉ. गोपीचंद वाय. कठाणे**
**स्व. राजेन्द्रसिंह उर्फ बाबा व्यास कला, वाणिज्य**
**महाविद्यालय, कोंढाळी, जि. नागपूर**

---

**सारांश :** केवळ महाराष्ट्रतच नव्हे तर भारतखंडातही लोकोत्तर कार्याची बिजे रुजविणारे दलित समाजातील अग्रस्थानी असलेले एक थोर आद्य दलितोध्दारक म्हणजे किसन फागोजी बनसोडे हे होय. त्यांचा जन्म 18 फेब्रुवारी 1878 रोजी मोहपा प्राचीन नाव मधुपुरी येथे मधूगंगेच्या पवित्र तीरावर झाला. त्यांचे आडनाव बंदसोडे असे होते.[1] पूर्वीच्या काळी सर्पदंश झाल्यावर मांत्रिक मंत्रबंध घालित असे. नागपंचमीला ते सोडल्या जाई. हे पुण्यकर्म किसन फागोजी करीत असे. आपल्या आयुष्यात केवळ बालपण सोडले तर बाकी सर्व काळ त्यांनी दलितोध्दारासाठी, मानवतेसाठी, स्वातंत्र्यासाठी आणि समता, न्याय प्रस्थापनेसाठी घालविला. ते दलितांमधील पहिले सुशिक्षित व सुजाण होत. 1892 साली ते प्रशिक्षित अध्यापक झाले. तत्कालीन आंग्ल अधिकाऱ्यांनी त्यांना लठ्ठ पगाराची जागा देवू केली पण त्यांनी ती नाकारली. ''माझ्या बांधवांचे आत्मे जळत असतांना आणि त्यांच्यावर निर्घृणपणे जुलूम करुन त्यांचे गरीबांचे संसार उध्वस्त केले जात असतांना उघडया डोळयांने बघतांना स्वतःचे कल्याण करुन घेण्याइतपत मी स्वार्थी व शुद्र नाही उलट रंजल्या गांजल्यांची सेवा करणे हाच माझा धर्म आहे''[2] असे रोखठोक उत्तर देण्यास ते कचरले नाही. बालपणापासून गुरुवर्य किसन फागुजी बनसोडे यांना अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले असतांना त्यांनी अस्पृश्यतेच्या विरुध्द लढयाची शपथ घेतली. बालवयातच त्यांच्यावर घडलेल्या जबर अपघातातून त्यांनी खेडयापाडयातून 'बालसंघटना' निर्माण करुन बालमने दलितांच्या उध्दारासाठी जागृत करण्याचा प्रयत्न केला.[3]

**शब्द संकेत :वृत्तपत्रिय कार्य,साहित्य,जलसा,नाटक,शैक्षणिक कार्य,स्त्री उद्धाराचे कार्य आणि बहिष्कृत परिषदांच्या आयोजनात भाग**

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

प्रस्तावना : 1891–92 साली आपल्या किशोर वयातच त्यांनी समाजक्रांतीचे बिजारोपण केले. त्याचे प्रत्यंतर म्हणजे मोहपा या गावी 'अस्पृश्यता शोध बोध' या नावाने पहिली पताका फडकविली.[4] अस्पृश्य वर्गामध्ये त्यांच्या दयनीय अवस्थेविषयी जागरुकता निर्माण होवून त्यांच्यातील अमंगलपणा नाहीसा करण्यावर त्यांचा भर होता. अस्पृश्यांनी आपला ओंगळपणा टाकून देवून शुध्द आहार व आचार विचार शुध्द राखावेत असे आवाहन ते करु लागले. परिस्थिती कितीही दाहक असली तरी मुलांना शिक्षण दिलेच पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. आपल्या बोलण्याला कृतीची जोड देवून त्यांनी रात्रीच्या शाळा व वाचनालये उघडली. यासाठी स्वतःजवळील पैसाही खर्च केला. विशेष करुन त्यांनी समाजकार्य करतांना अस्पृश्यांचे शिक्षण व संस्कृती, दलितांमधील ओंगळ चालीरीती व अंधश्रध्दाळू, रुढी यांचा नायनाट व सत्प्रवृत्त विचारसरणी व स्वावलंबी जीवनाची निर्मिती या तीन महत्वपूर्ण प्रश्नांकडे त्यांनी लक्ष दिले. केवळ शाब्दिक उपदेशच न करता विधायक स्वरुपाच्या विविध योजना त्यांनी कार्यान्वित केल्या. इ.स. 1900 मध्ये नागपूर येथील पाचपावली विभागात दलितोध्दारार्थ कार्य करायला सुरुवात केली.

14 आक्टोंबर 1901 रोजी ध्येयाच्या परिपूर्तीसाठी विजयादशमीच्या शुभ पर्वावर 'सन्मार्गबोधक अस्पृश्यसमाज' नावाची संस्था नागपूरला स्थापन केली.[5] बापूजी शेंडे, दामोदर खापर्डे, गोविंदराव बोरकर, रामाजी डोंगरे, श्रीमती जाईबाई चौधरी, श्रीमती सुलाबाई मडावी यांनी गुरुवर्यांना साथ दिली. त्यांच्या अथक परिश्रमामुळे त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक संस्थेच्या कार्याचा प्रभाव महाराष्ट्रभर पडला.सन्मार्गबोधक अस्पृश्य समाज' या संस्थेमार्फत महाराष्ट्राबाहेरही लोकजागृतीचे त्यांनी कार्य केले. महात्मा फुलेप्रमाणे त्यांनी 'सत्यशोधक मंडळ' स्थापन करुन जलशाच्या माध्यमातून दलितोध्दारक कार्य केले. दलितांचे कौटुंबिक जीवन सुखात जावे म्हणून त्यांनी अनेक खेडयापाडयात ज्ञान केन्द्रे उभारली. रात्रीची शाळा, वाचनालये, प्रहसने, गीतगायन, कथाकथन ही केन्द्राची प्रमुख अंगे होती. अशाप्रकारे गुरुवर्य बनसोडे शिक्षण संस्थाचे पहिले खंबीर संस्थापक व प्रवर्तक होत.

दलित स्त्रियांच्या शिक्षणावर सुध्दा त्यांनी कटाक्षाने लक्षदिले. स्त्रीच्या बळावर कुटूंब चालत असते म्हणून ती पहिल्यांदा शिक्षित व्हायला पाहिजे. यातूनच इ.स. 1907 साली नागपूर येथील पाचपावली विभागात 'चोखामेळा मुलीची शाळा' स्थापन केली.'[6] दलितोध्दाराचे कार्य करतांना त्यांच्यावर सवर्ण हिंदूकडून दुर्धर प्रसंग ओढवले पण ते डगमगले नाही. ते म्हणतात, ''ही उफाळणारी ज्वालाच माझ्या जीवन व कार्याचे मोल सिध्द करण्यास समर्थ आहे''[7] कसलीही उसंत न घेता आपले कार्य त्यांनी चालू ठेवले.नागपूर येथे विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशनची एक शाखा 1908 ला काढली होती. या शाखेच्या

संचालनाची जबाबदारी किसन फागुजी बनसोडे यांनी सांभाळली. दलितांवर होणाऱ्या घोर अन्यायाचा घोर निषेध त्यांनी आपल्या मराठी 'दिनबंधू' आणि 1931 साली संपादित केलेल्या 'चोखामेळा' या वृत्तपत्रातून केले''[8]

1914–18 या कालखंडात एकीकडे पहिल जागतिक महायुध्दाने पेट घेतला असतांना गुरुवर्यांनी अखिल भारताचा दौरा काढून प्रथम लोकमान्य टिळक, नामदार गोखले, न्यायमूर्ती रानडे, महात्मा गांधी, पंडित मदनमोहन मालवीय, सरदार वल्लभभाई पटेल या थोर नेत्यांच्या भेटी घेवून अस्पृश्यता निवारण्याच्या प्रश्नावर त्यांनी सर्वस्पर्शी चर्चा घडवून आणली.[9] अखिल भारतीय बहिष्कृत परिषद नागपूरला भरवून दलित व अन्य जमातीमध्ये नवचैतन्य आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला.[10] 30, 31 मे व 1 जून 1920 रोजी नागपूर येथील वाय.एम.सी.ए. च्या भव्य पटांगणात कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय बहिष्कृत परिषद भरविली. अशाप्रकारे या ऐतिहासिक परिषदेचे प्रवर्तक गुरुवर्य ठरतात. या परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर देखील होते.

राष्ट्रीय जीवनात अथवा सामाजिक जीवनात वृत्तसृष्टीला विशेष महत्व आहे. गुरुवर्य बनसोड यांनी 1902 साली मराठा दिनबंधू, हे वृत्तपत्र सुरु केले. या वृत्तपत्राचे घोषवाक्य होते 'दुःखीताचे दुःखीविमोचनार्थ आणि मानवतेच्या पुरस्कारार्थ'. या वृत्तपत्रातून त्यांनी समतेसाठी प्रत्येकाने लढण्यास सज्ज असावे असे आवाहन केले.[11] 1910 साली गुरुवर्यांनी 'निराश्रित हिंद नागरिक', 1933 साली 'विटाळ विध्वंसक' 1918 साली 'मजूर पत्रिका' व 1931 साली 'चोखामेळा' हे साप्ताहिक सुरु केले. निराश्रीत हिंद नागरिक या वृत्तपत्रातून दलित स्त्रियांचे दाहक जीवन विषद करुन त्यांच्या शिक्षणावर भर दिला. तसेच मजूर पत्रिका' या वृत्तपत्रातून श्रमजीवी वर्गावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य केले. अशाप्रकारे गुरुवर्यांनी आपल्या लेखनीने दलित वर्गात अन्यायाप्रित्यर्थ न्याय व समतेसाठी व्यापक जागृती निर्माण केली.

इ.स. 1880 ते 1946 या स्वातंत्र्यपूर्व कालखंडात म. ज्योतीबा फुले, लोकहितवादी हरिभाऊ आपटे, वि.रा. शिंदे, श्री.म. माटे, प्र.के. अत्रे, साने गुरुजी  हे ध्येयवादी साहित्यकार होवून गेले. पण हे सर्व दलितेत्तरातील होते. असामान्य प्रतिभेचा सिध्दहस्त पुरुष डॉ. आंबेडकर हे अपवाद सोडता गुरुवर्य बनसोडे हे त्या आधीही उच्च म्हणविणाऱ्या साहित्यपंडितांच्या प्रभावळीत प्रतिभेच्या जोरावर चमकत होते. पुढे अस्पृश्यांना डॉ. आंबेडकरांमुळे पुणे करारानुसार जे राजकीय अधिकार मिळाले त्यामागे 1879 ते 1946 या प्रदिर्घ कालखंडात बनसोडे यांनी अस्पृश्योध्दारार्थ केलेल्या तपस्येचे ते फलित होते असे महटल्यास चुकीचे ठरणार नाही.

अस्पृश्यांच्या केवळ सावलीने विटाळ होत होते तिथे बनसोडेने यश येणे अशक्य वाटत होते. पण जगात अशक्य काहीच नाही हे त्यांनी सिध्द करुन दाखविले. 'जनहो ऐका कथा व जोहार मायबाप', गुलामांचा गुलाम' यासारख्या प्रहसनातून त्यांनी जातीभेद व विषमतेचे दर्शन घडविले. सत्तेचा हव्यास न बाळगता, कोणत्याही पक्षाला बांधले न जाता त्यांनी आपले राजकारणपटूत्व सिध्द केले होते. स्वातंत्र्यप्राप्तीच्या यज्ञसिध्दीत थोर नेत्यांच्या खांदयाला खांदा भिडवून स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी टाकलेले पाऊल दृष्टीआड करता येणार नाही. 1920 ला अखील भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसचे अधिवेशन नागपूर येथे भरले त्यांचे श्रेय इतर नेत्यांप्रमाणेच गुरुवर्यांकडे जाते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी अस्पृश्यतेचा प्रश्न सोडवून राष्ट्रीस एकता निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. लोकमान्य टिळक व गुरुवर्य बनसोड यांचे निकटचे संबंध निर्माण झाले होते. इ.स. 1920 नंतर म. गांधीशीही त्यांचा संबंध आला होता. इ.स. 1940 साली गांधीनी अस्पृश्यांना हरिजन म्हटले. त्याबद्दल गुरुवर्यांनी गांधीशी चर्चा करुन 'हरिजन' हा शब्द अमान्य केला. 1928–35 या काळात गुरुवर्यांनी म. गांधीच्या असहकार व स्वदेशी चळवळीत भाग घेतला होता.[12] खादी निर्माण करण्यावर भर देवून त्यातून दलितांचा आर्थिक प्रश्न सुटू शकतो यासाठी त्यांनी प्रयत्न केला.

प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणूकीत दलितांना योग्य ते स्थान दिले जावे, दलित वर्गातून योग्य उमेदवाराची निवड काँग्रेसने करावी, त्यासाठी इतर राजकीय पक्षाशी सहकार्य करावे अशी मागणी गुरुवर्यांनी केली. तसे पत्र त्यांनी म. गांधीना लिहून प्रत्यक्ष भेटही घेतली. पुढे डॉ. आंबेडकरांनी 1936 साली स्वतंत्र मजूर पक्षामार्फत सार्वत्रिक निवडणूकीत भाग घेतला. त्यास गुरुवर्याची साथ होती. 1917–18 मध्ये भारताचे स्टेट सेक्रेटरी एडवीन सॅम्युअल मॉन्टेग्यू यांनी भारताला भेट दिली. तेव्हा दलित वर्गाच्या एका शिष्टमंडळाने आपल्या तक्रारी त्यांच्यासमोर मांडून प्रांतिक कायदेमंडळात दलितांच्या प्रतिनिधीत्वाच्या हक्काला मान्यता मिळविली. 1922 ला प्रिन्स ऑफ वेल्स दिल्लीला आलेअसताना तेव्हा किसन फागोजी बनसोडे व गणेश आकाजी गवई यांनी दिल्ली गाठून दलितांच्या ज्वलंत प्रश्नांविषयी निवेदन सादर केले.[13] 1925 मध्ये व्हाईसराय लार्ड इर्विन यांची भेट घेतली. ब्रिटीशांनी दलितांना न्याय मिळवून दिला त्यात गुरुवर्यांची महत्वपूर्ण भूमिका होती.

इ.स. 1929 मध्ये सायमन कमिशनसमोर दलितांच्या शैक्षणिक व सामाजिक प्रश्नाबाबत दलितांच्या नेत्यांच्या साक्षी झाल्यात त्यात गुरुवर्य बन्सोड यांची साक्ष विशेष महत्वपूर्ण होती.[14] इंडियन फ्रेन्चाईज कमिटीने प्रसारित केलेल्या प्रश्नावलीवर

नेता म्हणून नव्हे, तर दलितोध्दाराचा एक प्रबळ प्रवर्तन म्हणून गुरुवर्यांनी 'मतदारांची पात्रता' स्त्रियांना मतदानाचा हक्क, अस्पृश्य वर्ग व मजूरांना प्रतिनिधीत्व यासंबंधी आपली भूमिका विषद केली.

1930–31 मध्ये झालेल्या गोलमेज परिषदामध्ये डॉ. आंबेडकरांनी विभक्त मतदारसंघाची मागणी केली असतांना काही दलित नेते, विरोध करीत पण गुरुवर्यांनी तटस्थ भूमिका घेवून डॉ. आंबेडकरांची समजून घालण्याचा प्रयत्न केला. अशाप्रकारे संघर्षमय परिस्थितीत त्यांनी समन्वयवादी भूमिका घेवून अस्पृश्योध्दार केलेला दिसून येतो. यातूनच 1927 च्या बाबासाहेबांनी घडविलेल्या महाड सत्याग्रहाचे गुरुवर्यांनी समर्थन केले.[15]

दलितांची शोचनीय अवस्था व अस्पृश्यता यामुळे गुरुवर्य बैचेन असायचे. 1907–08 च्या सुमारास अनेकदेशामध्ये घुमश्चक्री सुरु झाली असतांना ब्रिटन साम्राज्यवादाकउे वळला असतांना युध्द केव्हाही होण्याची स्थिती निर्माण झाली असतांना हिंदुस्थानात सैन्यभरतीची केन्द्रे निर्माण होवू लागली. तेव्हा गुरुवर्यांनी महारांची अधिकाधिक सैन्यात भरती करावी जेणेकरुन अस्पृश्यता नष्ट होईल व त्यांचा आर्थिक प्रश्न सुटेल म्हणून त्यांनी दमदार तरुणांची चळवळ सुरु केली. पुढे 1939–45 या काळात 'महार बटालियन' यांनी अभिमानास्पद कामगिरी केली.कामगारांच्या दुर्दशेबद्दल व्हीटने कमिशनकडे निवेदन देवून कामगारांचे प्रश्न पोटतिडकीने मांडले. मजूरांकडून घेतला जाणारा 'धर्मदाय फंड' बंद करण्यात येवून या फंडाचा वापर मजूरांच्या आपतप्रसंगी कामी यावा असा प्रयत्न केला.

**मुल्यांकन** :अशाप्रकारे 19 व्या शतकाच्या शेवटी आणि 20 व्या शतकाच्या प्रारंभी दलितोध्दाराचीजी सकस बीजे पेरल्या गेली त्याचे श्रेय गुरुवर्यांना जाते. दलितांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय हक्कासाठी लढा देणारे ते अग्रणी ठरतात.ब्रिटीश राजवटीतील अत्यंत प्रतिकूल व दाहक काळात पददलित जातीचा कैवार घेवून समानतेचा व मानवतेचा संदेश देणारे ते आधुनिक काळातील महान पुढारी ठरतात. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेवून पुढे एक मोठी प्रभावळ निर्माण झाली. शेवटी अपूरे कार्य पूर्ण करण्याचा आर्शिवादपर सल्ला देत वयाच्या 67 व्या वर्षी 10 आक्टोंबर 1946 रोजी गुरुवर्यांनी प्राण सोडला. शरीराने जरी ते नसले तरी कार्यकर्तृत्वाने मात्र आजही अमर आहे. आंबेडकरपूर्व दलित चळवळीतील एक लुकलूकणारा तारा असेच गुरुवर्याचे वर्णन करावे लागेल.

**– संदर्भ ग्रंथ –**


1 शेंडे, ना.रा. – 'दलितोध्दारक गुरुवर्य बनसोडे', श्रीशेष प्रकाशन, गणेशपूर भंडारा, 20 मार्च 1981, पृष्ठ क्र. 5.

2.तत्रैव – पृष्ठ क्र. 13

3.तत्रैव – पृष्ठ क्र. 57

4.मोरे, दिनेश – आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (1818–1960), कैलास प्रकाशन,पुणे, डिसेंबर 2006, पृष्ठ क्र. 368

5.खिलारे, शशिकांत – 'आंबेडकरी चळवळ' प्रज्ञा प्रकाशन, सांगली, फेब्रुवारी 2013, पृष्ठ क्र. 33

6.डोंगरे, कृष्णकांत कवडूजी – 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत नागपूर शहराचे योगदान' बहुजन साहित्य प्रसार केन्द्र, नागपूर, 14 आक्टोंबर 2012, पृष्ठ क्र. 95

7.शेंडे, ना.रा. – 'दलितोध्दारक गुरुवर्य बनसोडे', श्रीशेष प्रकाशन, गणेशपूर भंडारा, 20 मार्च 1981, पृष्ठ क्र. 60.

8.मोरे, दिनेश – आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (1818–1960), कैलास प्रकाशन, पुणे, डिसेंबर 2006, पृष्ठ क्र. 368

9.शेंडे, ना.रा. – 'दलितोध्दारक गुरुवर्य बनसोडे', श्रीशेष प्रकाशन, गणेशपूर भंडारा, 20 मार्च 1981, पृष्ठ क्र. 58.

10.कोसारे, एल.एच. – 'विदर्भातीलदलित चळवळीचा इतिहास, ज्ञानदीप प्रकाशन, नागपूर, 1984, पृष्ठ क्र. 49.

11.डोंगरे, कृष्णकांत कवडूजी – 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत नागपूर शहराचे योगदान' बहुजन साहित्य प्रसार केन्द्र, नागपूर, 14 आक्टोंबर 2012, पृष्ठ क्र. 94, 95

12.कोसारे, एल.एच. – 'विदर्भातीलदलित चळवळीचा इतिहास, ज्ञानदीप प्रकाशन, नागपूर, 1984, पृष्ठ क्र. 45.

13.शेंडे, ना.रा. – 'दलितोध्दारक गुरुवर्य बनसोडे', श्रीशेष प्रकाशन, गणेशपूर भंडारा, 20 मार्च 1981, पृष्ठ क्र. 109

14.पानतावणे, गंगाधर – 'दलित वैचारिक वाङ्मय', पृष्ठ क्र. 11

15.मून, वसंत – मध्यप्रांत वऱ्हाडातील डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळ' सुगावा प्रकाशन, पुणे, ऑगस्ट 1987 पृष्ठ क्र. 76.

# विदर्भातील आंबेडकरी चळवळीत किसन फागूजी बनसोडेंचे वृत्तपत्रिय योगदान

प्रा.डॉ. प्रदिप शामरावजी ढोले
इतिहास विभाग प्रमुख
स्व. पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य
महिला महाविद्यालय, वरूड,जि. अमरावती, महा.444906

---

**सारांश** : इंग्रजी सत्तेपाठोपाठ पाश्चात्य संस्कृती भारतात येताच भारतीय समाज व्यवस्थेत सुधारणेच्या उषः कालास प्रारंभ झाला. पाश्चात्य संस्कृतीने समाज जिवन ढवळणून निघून नव्या जडणघडणीस सुरूवात झाली. यातुनच आपल्या समाज व्यवस्थेकडे नव्याने पाहण्याची दृष्टी उदयास येऊन समाजाची नव्याने बांधणी होऊ लागली यामुळे हजारो वर्षापासुनच्या प्रचलित समाज व्यवस्थेला प्रचंड हादरे बसू लागले. गतीहीन विकलांग, प्रज्ञाहत झालेल्या समाजाला आत्मपरिक्षण करण्याचा अवसर प्राप्त झाला. पाश्चात्य सत्ता व संस्कृतीने स्वत्वशून्य आणि आंकाक्षाहीन बनलेल्या समाजात आधुनिक जीवनमुल्यांची पायाभरणी करून येथील समाज जीवनात कितीतरी बदल घडवून आणलेत. पारंपारिक शिक्षणपध्दतीला छेद देवून नव्या जाणीवेचे नवे शिक्षण सुरू झाल्याने येथील समाजात नवे सामर्थ्य आणि नवे संस्कार रूजलेत. यातूनच जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी आणि समाजचिंतन सुरू होऊन सामाजिक पुर्णबांधणीला आणि समाजपरिवर्तनास सुरूवात झाली. म्हणुनच ब्रिटीश सत्तेचे या देशात आगमन म्हणजे नवपरिवर्तनाचे, प्रबोधनाचे मानचिन्ह होय असेच म्हटले पाहिजे.

**शब्द संकेत :** वृत्तपत्रिय कार्य,स्त्री उद्धाराचे कार्य,आणि वंचित समाजाला जागृत करण्याचे कार्य

**सशोधन पद्धती** :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.

प्रस्तावना: ब्रिटीश सत्तेमुळे भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात जे प्रबोधन घडले त्यातुनच नवनवे क्षेत्र विकसित झाले. त्यापैकीच वृत्तपत्र हे एक होय. वृत्तपत्र म्हणजे विचारप्रसाराचे प्रभावी साधन असुन लोक शिक्षण आणि लोक सेवा हि वृत्तपत्रांच्या निर्मितीची प्रेरणा होय. म्हणजेच वृत्तपत्रे हि एका अर्थाने समाजाला माहिती आणि ज्ञान देणारी विद्यापिठे आहेत.महाराष्ट्राच्या अपृश्य समाजातील गोपाळबाबा वलंगकर हे पहिले समाजसुधारक, वक्ते, कवी आणि पत्रकार होय. महात्मा फुलेंच्या समाजिक चळवळीतून प्रेरणा घेऊन स्वसमाजोन्नतीसाठी आपले सारे आयुष्य खर्ची घालणाऱ्या वलंगकरांनी 1886 साली ब्रिटीश फलटणीतून निवृत्त झाल्यानंतर दलितोध्दाराच्या कार्याला सुरूवात केली. 'दीनबंधू','सुधारक' यासारख्या दलित वृत्तपत्रातुन दलित समाजाच्या कैफियती मांडून अन्याय, अत्याचाराविरूध्द बंड करून दलित समाजाला संघटीत करण्याच्या हेतूने सन 1890 साली गोपाळबाबांनी 'अनार्य दोषपरिहार मंडळा' ची स्थापना केली होती.[1]

'आम्हा नीच मानलेल्या वर्गाच्या दोषाचा परिहार होऊन त्यांची उन्नती व्हावी आणि त्यास आपले सृष्टीव्यवहारातील मनुष्यपणाचे हक्क मिळावे' म्हणुन गोपाळबाबांनी आपल्या धर्म व देश बांधवांना विनंती करून दाद मागितली.[2] आपल्या मताचा प्रचार करीत असतांना त्यांनी कथा, किर्तने, सभा, परिषदा भरवून अस्पृश्यांवर आर्य हिंदूनी कशी बंधने लादली आहेत याबद्दल वेद, स्मृती,गीता, महाभारत, संत वाड.मय, पुराणे यातील उदाहरणे देऊन अस्पृश्यांना आपल्या माणुसकिच्या हक्काबद्दल जागृत केले. गोपळबाबा वलंगकरांचे वृत्तपत्रीय लेखन हे त्यांच्या अंतःकरणात गदगदणारा दलितमुक्तीचा स्फोटच होता. समाजपरिवर्तनाच्या ध्येयाने प्रभावित झालेल्या गोपळबाबांनी आपल्या वृत्तपत्रीय लेखातून कधी परखडणे, कधी तर्कशुध्द पध्दतीने तर कधी अंतर्मुख होऊन आपले स्पष्ट व सडेतोड विचार व्यक्त केलेत. आपल्या विचाराविषयीचा विश्वास, प्रतिस्पर्ध्याला बुध्दीनिष्ठ आणि तर्कनिष्ट पध्दतीनी उत्तर देण्याची त्यांची उपहासगर्भ शैली आणि त्यातील संयमपणा यामुळे गोपाळबाबांचे वृत्तपत्रीय लेखन प्रासंगिक असले तरी, ज्या समस्यांचा शोध घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला त्या समस्या व तद्नुषंगिक जीवन आणि वेदना या खास प्रासंगिक व तात्कालिक नव्हत्या आणि म्हणुनच या पहिल्या दलित पत्रकारांच्या लेखनाला एक शाश्वत अधिष्ठान लाभले होते यात शंका नाही. आपल्या समाजाची दुःखे वेशीवर टांगून त्यांना त्यांचे न्याय हक्क मिळवून द्यावेत. त्यांचा दोषपरिहार करून त्यांना आत्मोध्दाराचा मार्ग दाखवावा आणि त्यांच्याविषयी उच्चवर्णियांच्या मनात सहानुभूती निर्माण करावी हे विविध उद्देश नजरेसमोर ठेवून शिवराम जानबा कांबळे यांनी 1 जुलै 1908 रोजी 'सोमवंशीय मित्र' नावाचे मासिक सुरू केले होते. 9 बाय 6 इंच च्या आकाराचे आठ पृष्ठांचे हे मासिक फक्त एक आण्याच्या मोबदल्यात त्यांनी सर्वसामान्य जनतेपर्यत पोहचविले. आपल्या अज्ञानी बांधवांना ज्ञानाच्या प्रकाशात आणून त्यांच्यातील दुर्गूणांचा नायनाट करावा या प्रमुख प्रेरणेने प्रभावित होऊन त्यांनी 'सोमवंशीय मित्र' चालविले होते.[3]

पश्चिम महाराष्ट्रात ज्याप्रमाणे गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे हया दलित समाजातील कार्यकर्त्यांनी आपल्या वृत्तपत्राव्दारे अस्पृश्य, दलित समाजात जागृती घडवून नवचैतन्य निर्माण केले. त्याचप्रमाणे विदर्भात किसन फागूजी बनसोडे यांनी आपल्या वृत्तपत्राव्दारे दलित समाजाची दुःखे जगाच्या वेशीवर टांगून त्यांच्या अंतःकरणात अस्मितेची ज्योत पेटविण्याचे महत्वपुर्ण कार्य केलेत. इ.स. 1901 मध्ये त्यांनी 'मराठा दिनबंधू' या नावाचे साप्ताहिक सुरू केले होते. अस्पश्य समाज समाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या दीन झाला असून आपल्यावरील अन्यायाच्या प्रतिकारास, समतेच्या पुरस्कारास आणि आपल्या न्याय हक्कासाठी सुसज्ज व्हावा म्हणून या वृत्तपत्रातून किसन फागूजी बनसोडे यांनी दलितांवर होणाऱ्या अन्यायाच्या घटना प्रकाशित करून त्यावर आपले परखड मत नोंदविले. या साप्ताहिकाच्या पहिल्याच अंकात महार व मराठा जातीची उत्पत्ती एकच आहे. हे स्पष्ट केल्याने विदर्भातच नव्हे तर संपुर्ण महाराष्ट्रात एकच खळबळ माजली होती.[4]

यानंतर ऑगस्ट 1910 साली नीच, अस्पृश्य मानलेल्या व मागासलेल्या महारादी लोकांच्या सुधारणेसाठी 'निराश्रीत हिंद नागरीक' हे दुसरे साप्ताहिक सुरू करून या साप्ताहिकाच्या ध्येयधोरणासंबंधी किसन फागूजी बनसोडे म्हणतात. '' अस्पृश्य मानलेल्या समाजाच्या सुधारणेला ज्या ज्या प्रयत्नाची आवश्यकता आहे त्यात वर्तमानपत्र चालविणे हाही एक अत्यंत आवश्यक आणि महत्वाचा प्रयत्न होय. चळवळीचा प्रसार करण्याचे व लोकजागृती करण्याचे हे एक मुख्य साधन होय.[5]

या वृत्तपत्रात किसन फागूजी बनसोडे यांनी विशेषतः दलित स्त्रियांचे दाहक जीवन व त्यांच्या शिक्षणाच्या प्रश्नावर भर देऊन प्रत्येक दलित स्त्री सुशिक्षीत व सुसंस्कृत बनावी आणि तिने आपल्या कुटूंबात आनंद निर्माण करावा याकडे लक्ष वेधले. सन 1913 साली सुरू केलेल्या ' विटाळ विध्वसंक' या आपल्या तिसऱ्या साप्ताहिकात त्यांनी अस्पृश्यतेवर जहाल कोरडे उगारून आणि जुन्या दुष्ट चालीरिती व अंधश्रध्दा, देवधर्म यांचा सोदाहरण परामर्थ घेऊन मानवतेची व सेवाधर्माची नांदी दुमदुमविली होती. हे वृत्तपत्र सुरू करण्यास किसन फागूजी बनसोडे हयांना गोंदियाचे कालीचरण नंदागवळी हयांनी अर्थसहाय्य करून मोलाची मदत केली होती. हे वृत्तपत्र एकाच वेळी नागपुर व गोंदियाहून प्रसिध्द केले जात असे. सन 1918 मध्ये त्यांनी 'मजुर पत्रिका' हे चौथे साप्ताहिक खास मजुरांच्या चळवळींना उठाव देण्यासाठी सुरू केले होते. या वृत्तपत्रातून श्रमजिवीवर्गावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडून मजुरांचे प्रश्न धसाला लावण्यासाठी युक्तिवाद व बुध्दीवाद कसाला लावण्याचा प्रयत्न करण्यात येत. दिवसेदिवस जातीभेदाबरोबरच आर्थिक विषमता कशी उग्ररूप धारण करीत आहे आणि भांडवलदारवर्ग श्रमजिवीवर्गाची कशी पिळवणूक करीत आहे, याचे जहाल चित्रण या वृत्तपत्रातुन केले जात असे.[6]

किसन फागूजी बनसोडे यांच्या वृत्तपत्र लेखनांचे निरीक्षण केल्यास त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनांची तळमळ दोन प्रकारची असल्याचे दिसून येते. एक ते हिंदू समाजाला विनंती करून अस्पृश्यांना समानतेने वागवा असे आवर्जुन सांगतात तर दुसरीकडे अस्पृश्य समाजातील अंतर्गत दोषांवर प्रहार करून त्यांनी आपल्या हक्कासाठी जागृत व्हावे, सामर्थ्य संपादन करावे असा आग्रह धरतात.

विदर्भातील दलित, अस्पृश्यं समाजाला जागृत करून त्यांच्यातील दोष अनिष्ट रूढींवर प्रचंड प्रहार करून आपल्या हक्काची जाणीव निर्माण करून देण्याचे कार्य किसन फागूजी बनसोडे यांनी आपल्या वृत्तपत्राव्दारे केले.इतकेच नव्हेतर दलितांच्या न्याय हक्कासाठी, त्यांचेवर होणाऱ्या जुलूमांची दाद लावून घेण्यासाठी, त्यांना विविध प्रकारे जागृत करण्यासाठी महाराष्ट्रातील त्या काळात अत्यंत नावाजलेल्या 'वऱ्हाड समाचार', 'महाराष्ट्र केसरी', 'ज्ञानप्रकाश', 'काळ', 'मुमुक्षू', 'सुबोधपत्रिका', 'मुंबई वैभव', 'देशसेवक' इ. वृत्तपत्रातुन समाज, धर्म, संस्कृती या विषयांवर अनेक लेख लिहुन प्रचंड लोकजागृती केली होती. ही वृत्तपत्रे आर्थिक अडचण, वाचक वर्गाचा अल्प प्रतिसाद, कागद टंचाई अशा अनेकविधी कारणांनी वारंवार बंद करावी लागली असली तरीही किसन फागुजींचा ध्येयवाद ढळला नाही. तर लोकजागृतीने झपाटलेल्या किसन फागुजी बनसोडे हयांनी 1931 साली 'चोखामेळा' नावाचे आणखी एक पत्र सुरू करून बंद पडलेल्या 'निराश्रित हिंद नागरीक' चा 1 जानेवारी 1943 पासुन पुर्नप्रारंभ करण्याचे जाहिर केले. म्हणुनच दलित चळवळीचे व साहित्याचे समीक्षक डॉ. गंगाधर पानतावणे ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरानंतर वृत्तपत्रांचा व्याप वाढविणारे किसन फागूजी बनसोडे हे एकमेव पत्रकार होत'' असे म्हणतात.

अस्पश्य समाजात स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव निर्माण करून त्यांच्यात अन्यायाची चीड व न्यायाची चाड निर्माण करण्यासाठी किसन फागूजी बनसोडे हयांनी आपली लेखणी झिजवली. इ.स. 1901 ते 1936 या 35 वर्षाच्या प्रदिर्घ कालखंडात आपल्या पाच वृत्तपत्राव्दारे किसन फागूजी बनसोडे यांनी आपल्या तेजस्वी लेखणीचे दर्शन घडवून दलित वर्गात अन्यायाप्रित्यर्थ आणि न्यायासाठी व समतेसाठी प्रतापी झुंज घेण्यास जी सर्वस्पर्शी व्यापक जागृती निर्माण केली त्याला दलित वर्गाच्या इतिहासात दुसरी तोड नाही. म्हणुनच 'गुरूवर्याची वृत्तपत्रे हि समाजक्रांती घडवून आणण्याचे प्रभावी अस्त्र ठरले होते.[7] हे किसन फागूजी

बनसोड यांचे चरित्रकार श्री. ना.रा.शेंडे यांचे मत मान्य करण्यास हरकत राहत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुध्दा 31 जानेवारी 1920 च्या मुकनायकांच्या मनोगतात ''खास अस्पृश्यांच्या हिता–हिताची चर्चा करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्वकाळात जी वृत्तपत्रे निघत त्यात 'सोमवंशीय मित्र' बरोबरच किसन फागूजी बनसोडेंच्या 'निराश्रित हिंद नागरीक' आणि 'विटाळ विध्वंसक' या पत्रांचा उल्लेख केला होता.[8]

किसन फागुजी बनसोडे यांनी विदर्भातील अस्पृश्य समाजात जागृती निर्माण करून त्यांना आपल्या हक्कांची जाणीव व्हावी म्हणुन संस्था, परिषदा, शिक्षणकेंद्र,उद्योगशाळा, अशा विविध माध्यमांचा अवलंब केलेला दिसत असला तरी वृत्तपत्र व वृत्तपत्रीय लेखन हया अत्यंत प्रभावी माध्यमांचा त्यांनी केलेला उपयोग अनुपम आहे. याशिवाय सन 1914 साली कालीचरण नंदाडावळी यांनी 'दिनबंधू' हे स्वतंत्र साप्ताहिक तर नानासाहेब गवई यांनी 'बाहीकृत भारत' नावाचे पाक्षिक वृत्तपत्र सुरू केले होते. या वृत्तपत्रातही प्रसिध्द होणारे समाजिक, धार्मिक, शैक्षणिक विषयावरील लेख, दलितवर्गाला उत्तेजन देणारे व अस्पृश्योध्दाराच्या दृष्टींने क्रांती घडवून आणणारे असत.

**निष्कर्ष :–** मराठा, दिनबंधू, निराश्रीत हिंद नागरीक, विटाळ विध्वंसक, मजुर पत्रिका, वऱ्हाड समाचार, महाराष्ट्र केसरी, ज्ञानप्रकाश, काळ, मुमुक्षू, सुबोधप्रत्रिका, मुंबई वैभव, देशसेवक, चोखामेळा, इत्यादी दलित व दलित्तेतर वृत्तपत्रे, नियतकालीके व साप्ताहिकातून किसन फागूजी बनसोडे यांनी आपल्या समाजाचे अत्यंत विदारक चित्रण समाजापुढे मांडून त्यांच्यात सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक जागृती व सुधारणा करण्याचे प्रयत्न केलेले दिसून येतात. यातुनच दलित चळवळीचा उदय, विकासाची वाटचाल सुरू झाली असे म्हणणे असंयुक्तीक होणार नाही.

**संदर्भसुची :–**

1) निर्मळ, डॉ. हरीशचंद्र :– दलितांची नियतकालिके, 1987, पृ. 10
2) पानतावने, डॉ. गंगाधर :– पत्रकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, 1987, पृ. 17
3) निर्मळ, डॉ. हरिशचंद्र :– उपरोक्त, पृ. 12,13
4) शेंडे, ना.रा. (ले.व.संपा) :– दलितोध्दारक, गुरूवर्य बनसोड, 1981, पृ. 41
5) पानतावणे, डॉ. गंगाधर :– उपरोक्त, पृ. 58
6) शेंडे, ना.रा. (ले.व.संपा) :– उपरोक्त, पृ. 58
7) तत्रैव, :– पृ. 58,59
8) मून, वसंत (संपा) :– डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बाहिष्कृत भारत आणि मूकनायक, 1990, पृ. 347

# आंबेडकरी चळवळीतील देवाजी खोब्रागडे यांचे कार्य

**डॉ.अविनाश दिगंबर फुलझेले**
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख
डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर –10

**सारांश :** विदर्भात आंबेडकरी चळवळीतील प्रमुख नेत्यांपैकी देवाजी खोब्रागडे एक होते. ते चंद्रपूर जिल्ह्यतील असून, त्यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नासंबंधी व्ऱ्हाड–विदर्भात भरीव असे कार्य केले. त्यांनी अस्पृश्य समाजात जागृती करुन डॉ. आंबेडकरांचे विचार तळागाळात पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले होते. विदर्भातील दलित चळवळीतील नेत्यांमध्ये त्यांचे नाव अग्रक्रमात येते. त्यांनी दलितांचे प्रश्न मोठ्या शिताफीने मांडून त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला होता. विदर्भात आंबेडकरी चळवळ रुजविण्यात त्यांनी मोलाचे परिश्रम घेतले. आयुष्यभर डॉ. आंबेडकरांचा संदेश व विचार सामान्यांपर्यंत पोहचवून भक्कम पायावर दलित संघटना घडवून आणण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले होते. या उच्च शिक्षणाविषयी बाबासाहेबांनी दिलेल्या संदेशाची अंमलबजावणी स्वतःच्या घरी केली. देवाजी हे श्रीमंत व्यक्ती असले तरी त्यांनी सामान्य कार्यकर्त्यासारखे राहून आंबेडकरी चळवळ मोठ्या निष्ठेने या प्रांतात पसरविली. ह्या त्यांच्या कार्यामुळे आंबेडकरी चळवळीत त्यांचे नाव मोठ्या सन्मानपूर्वक घेतले जाते. एकूण त्यांच्या आंबेडकरी चळवळीतील कार्याचा आढावा या संशोधनपर लेखात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**शब्द संकेत :–** अस्पृश्य, उच्च शिक्षण , दलित व मागासलेले, विदर्भ.

**संशोधन पद्धती :–** ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करुन उपलब्ध साहित्याचा शास्त्रीय  दृष्टीने परिक्षण करुन मूल्यमापन केले गेले.

**गृहीत तत्वे :–** देवाजी खोब्रागडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार तळागाळात पोहचविला व दलितांना जागरूक करण्याचा प्रयत्न केला.

**प्रस्तावना :–**डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्वी विदर्भात अस्पृश्यांच्या जागृतीचे काम सुरु झाले होते. डॉ. आंबेडकरांच्या समाजकारणातील प्रवेशानंतर त्यांच्या विचार व कृतिकार्यक्रमामागे मोठा दलित वर्ग उभा राहिला. त्यात विदर्भातील देवाजी भिवाजी खोब्रागडे यांचाही सामावेश होता. त्यांनी संपूर्ण आयुष्य डॉ. आंबेडकरांचा विचार संपूर्ण मध्यप्रांत व व्ऱ्हाडात तळागाळातील समाजात पोहचविण्याचा प्रयत्न केला. डॉ. आंबेडकरांच्या संदेशानुसार स्वतःच्या पैश्याने त्यांनी आपल्या मुलाला उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठविले. तेव्हा त्यांच्या संपूर्ण कार्याचा मागोवा या लेखात घेतला आहे.

**सुरुवातीचे कार्य :** देवाजी भिवाजी खोब्रागडे यांचा जन्म 2 जानेवारी 1899 मध्ये झाला. त्यांनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर 11 वी हायर सेकंडरी मध्ये प्रवेश घेतला. पण त्यात ते नापास झाल्याने तिथून त्यांचे शिक्षण बंद झाले.[1] पुढे त्यांनी आपला मोठा भाऊ पत्रूजी सोबत मिळून बल्लारशाह येथे लाकडाचा व्यवसाय सुरू केला. त्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे त्यांचा व्यवसाय लवकरच भरभराटीला आला. हा व्यवसाय करत असतांनाच दोघाही भावांनी आपले समाजकार्यास सुरुवात केली होती. श्री देवाजी खोब्रागडे यांनी 1923 पासून आपल्या सामाजिक कार्याला सुरुवात केली होती आणि अस्पृश्यांची स्थिती सुधारण्याच्या महत्त्वाच्या कार्यास त्यांनी वाहून घेतले होते.[2] सुरुवातीपासूनच ते बाबासाहेबांचे एकनिष्ठ कार्यकर्ते होते. विदर्भातील मोठे पुढारी आणि 1927 पासून बाबासाहेबांच्या कार्याचे, चळवळीचे व त्यांच्या तत्त्वज्ञानाचे संबंध लोन विदर्भात त्यांनी पसरविले होते.[3] अस्पृश्यांना गुलामगिरीतून मुक्त करण्याच्या डॉ. बाबासाहेबांच्या सर्व चळवळीत त्यांनी प्रामुख्याने भाग घेतला होता. त्यावेळी विदर्भातील महत्त्वपूर्ण दलितांचे पुढारी श्री. गणेश आकाजी गवई यांच्या अध्यक्षतेखाली 29, 30 मे 1927 रोजी चंद्रपूर येथे 'चांदा जिल्हा बहिष्कृत परिषद'  झाली होती. या परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. पत्राजी भिवाजी खोब्रागडे होते.[4] अशाप्रकारे हे दोघेही भाऊ तन, मन, धनाने अस्पृश्यांच्या मुक्तीच्या चळवळीत सहभागी झाले होते.

देवाजी खोब्रागडे यांनी सुरु केलेल्या समाजकार्यामुळे ते या भागात सर्व परिचित झाले होते. त्यांच्या असणाऱ्या जनसंपर्कामुळे व त्यांनी चालविलेल्या कामामुळे ते 1929 ते 1934 पर्यंत चांदा म्युनिसिपल कमिटीचे सभासद झाले होते.[5] याकाळात त्यांनी डॉ. आंबेडकरांचे विचार दलित समाजाला माहित व्हावे म्हणून ठिकठिकाणी सभेला जावून त्यांचे विचार पसरविण्यात पुढाकार घेतला होता. अशीच एक परिषद 31 मे व 1 जून 1934 रोजी श्री. चोखामेळा चांदा तालुका परिषदेचे अधिवेशन श्री. विक्रम बुटानी शेंडे, मालगुजार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या परिषदेला चांदा, ब्रह्मपुरी, हिंगणघाट, आरमोरी अशा दूरदूरच्या भागातून बरीच मंडळी आली होती. या परिषदेमध्ये जवळजवळ वीस ठराव पास झाले. या ठरावात प्रामुख्याने पुणे करारास पाठिंबा, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या किंवा सरकारी नोकऱ्यात अस्पृश्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या मिळाव्यात,

सार्वजनिक विहिरी, तळी अस्पृश्यांना खुली असावीत, मुला– मुलींच्या शिक्षणाचा प्रसार होईल अशी चळवळ उभारावी, डॉ बाबासाहेबांच्या कामगिरीस पाठिंबा, अनिष्ठ रुढींचा त्याग वगैरे प्रमुख ठराव होते. हे सर्व ठराव पास झाल्यानंतर या ठरावावर देवाजी खोब्रागडेंनी भाषण केले[6] व या ठरावाचे महत्त्व उपस्थित जनतेला समजावून सांगितले.

**धर्मांतराच्या घोषणेस पाठींबा** 1935 मध्ये डॉ. आंबेडकरांनी येवला परिषदेत धर्मांतराची घोषणा केल्यावर स्पृश्य समाजाकडून त्यांचा सर्वत्र विरोध होवू लागला. तेव्हा त्यांच्या समर्थनात श्री. देवाजी खोब्रागडे यांनी सभा घेतल्या. चंद्रपूर शहरात 25 ऑक्टोबर 1936 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या फोटोची मोठी मिरवणूक प्रमुख रस्त्यावरून काढण्यात आली. या मिरवणुकीनंतर एक सभा घेण्यात आली. या सभेत श्री. देवाजी भिवाजी खोब्रागडेंचे सडेतोड भाषण झाल्यानंतर त्यांच्या पुढाकाराने सर्वानुमते हिंदू लोकांकडून होत असलेल्या अस्पृश्यतेचा जुलूम व छळ नाहीसा करण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धोरणाला अनुसरून धर्मांतराला पाठिंबा देत आहोत, असा ठराव पास करण्यात आला.[7] 25 जुलै 1937 रोजी अस्पृश्य वर्गाची एक सभा श्री. देवाजी खोब्रागडे यांच्या अध्यक्षतेखाली बल्लारशा जिल्हा चंद्रपूर, येथील कौलारी फैलाच्या मराठी शाळेत संपन्न झाली. त्यावेळी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर व आपले संघटन कार्य' या विषयावर एस.टी. वानखेडे यांचे व्याख्यान झाले. त्यांनतर खोब्रागडेंच्या अध्यक्षतेखाली धर्मांतराच्या चळवळीस पाठिंबा देणारा ठराव पास करण्यात आला.[8] 8 ऑगस्ट 1937 रोजी चंद्रपूर येथे श्री. एम.के. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्य समाजाची एक मोठी सभा झाली. या सभेत 'अस्पृश्य समाज व धर्मांतर' या विषयावर श्री. देवाजी खोब्रागडे यांचे भाषण झाले.[9] त्यानंतर डॉ. आंबेडकरांच्या सामुदायिक धर्मांतरास पाठिंबा देणारा ठराव पारित करण्यात आला. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेनंतर अनेक ठिकाणी स्वतःहून अस्पृश्यांनी धर्मांतर केले. तेव्हा या संदर्भात 1 ऑक्टोबर 1937 रोजी चंद्रपूर येथे अस्पृश्यांची एक सभा मोहम्मद अब्दुल रहमान मास्तर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेत डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेविषयी विचारविनिमय झाल्यावर या सभेत समाजात एकी व्हावी या दृष्टीने भाषणे झाली. त्यावेळी लोकांच्या खोट्या आमिषाला बळी न पडता डॉ. बाबासाहेबांनी धर्मांतराची आज्ञा केल्याशिवाय कोणीही धर्मांतर करू नये, असे ठरविण्यात आले. यावर श्री. देवाजी खोब्रागडेंचे भाषण झाल्यावर सभा बरखास्त करण्यात आली.[10] 24 ऑक्टोबर 1937 रोजी चंद्रपूर येथे दलित फेडरेशनच्या विद्यमाने श्री. चोखामेळा विद्यार्थी बोर्डिंगचे सेक्रेटरी श्री. राघव कावरू कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली 'दलित समाज उन्नती व चालू राजकीय परिस्थिती' या विषयावर श्री. देवाजी खोब्रागडे यांचे भाषण झाले. त्यात त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या संकल्पानुसार कार्य करण्याचे सांगून, समाजातील लोकांची दिशाभूल करणाऱ्या लोकांचा त्यांनी या सभेत निषेध केला.[11] अशाप्रकारे त्यांनी धर्मांतराच्या बाजूने विदर्भात जागृती करण्याचा प्रयत्न केला.

**उच्च शिक्षणास महत्त्व :**श्री. देवाजी यांनी शिक्षणाचे त्यातल्यात्यात उच्चशिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. त्यांनी त्यांचा मुलगा भाऊराव उर्फ राजाभाऊ याला बाबासाहेबांच्या भेटीला घेऊन गेले होते. त्यावेळी त्यांनी बाबासाहेबांच्या मार्गदर्शनानुसार राजाभाऊला स्वखर्चाने उच्च शिक्षणाकरिता लंडनला पाठवले.[12] एवढेच नाही तर त्यांनी आपल्या सर्व म्हणजे पाच मुले व दोन मुली यांना उच्चप्रतीचे शिक्षण दिले. 1947 मध्ये श्री. देवाजी खोब्रागडे हे बल्लारपूर म्युनिसिपल कमिटीचे चेअरमन होते.[13] मध्यप्रांत व वऱ्हाड मध्ये स्थानिक संस्थेच्या अध्यक्ष पदावर विराजमान होण्याचा पहिला मान त्यांनीच पटकाविला होता.[14] याचा फायदा घेऊन त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 55 वा वाढदिवसा निमित्याने बल्लारशाह येथे 14 एप्रिल 1947 रोजी सतत 14 दिवस पोवाडे, गायन, सभा, सहभोजन, शारीरिक खेळ, बौद्धिक चळवळी व समता सैनिक दल आणि समतासेविकांचा लेखन–वाचनाचा असे बौद्धिक व शैक्षणिक कार्यक्रम त्यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. त्यानंतर या सर्व कार्यक्रमात ज्यांनी पहिला नंबर पटकावला त्यांना 27 एप्रिल 1947 रोजी देवाजींच्या हस्ते बक्षीस वितरणाचा कार्यक्रम पार पडला.[15] त्यांचा शैक्षणिक संस्थांशीही जवळचा संबंध होता. अशाप्रकारे त्यांनी डॉ. आंबेडकरांचा उच्चशिक्षणाचा संदेश आपल्या घरात व समाजात रुजविण्याचा प्रयत्न केला.

**1937 ची स्वतंत्र मजूर पक्षाची निवडणूक** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1936 मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. त्यानंतर मुंबई इलाख्याबरोबरच मध्यप्रांत व वऱ्हाड येथेही 1937 साली होणारी निवडणूक या पक्षाने लढवायची असे ठरविले होते. त्यामुळे या भागातही उत्साह निर्माण झाला होता. ठिकठिकाणी उमेदवार निवडीच्या सभा होवू लागल्या. अशीच एक जाहीर सभा 22 डिसेंबर 1936 रोजी चंद्रपूर येथे श्री. चोखामेळा विद्यार्थी बोर्डिंग जवळ श्री. भुसाबुवा शिवराम सातारडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. ही सभा होणाऱ्या प्रांतिक कायदे मंडळाच्या निवडणुकीत बाबासाहेब आंबेडकरांच्या धोरणानुसार स्थापन झालेल्या मध्यप्रांत दलित फेडरेशनच्या वतीने कोण लायक व योग्य उमेदवार उभा करावा याची शहानिशा करण्याकरिता झाली. त्यानुसार चंद्रपूरचे श्री. देवाजी भिवाजी खोब्रागडे यांनी आजपर्यंत जी समाजसेवा केली ती लक्षात घेऊन त्यांना मध्यप्रांत असेंब्लीमध्ये उमेदवार म्हणून निवडून देण्याचा प्रयत्न करू. त्याप्रमाणे चांदा ब्रह्मपुरी खेडे विभागातील लोकांनी त्यांनाच मते देऊन निवडून द्यावे, अशी विनंती करणारा ठराव या सभेत पास झाला.[16] या ठरावावर राघव काउरू कांबळे मास्तर चांदा व भुजंग दास भिवाजी चांदा यांची भाषणे झाली. पुढे डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षातर्फे त्यांनाच उमेदवारी देण्यात आली. त्यानंतर श्री. देवाजी भिवाजी खोब्रागडे सी.पी. अँड बेरार फेडरेशन उपाध्यक्ष आणि विठ्ठलराव साळवे जनरल सेक्रेटरी सी.पी. अंड बेरार फेडरेशन यांनी चांदा तहसील व ब्रह्मपुरी तहसील मध्ये ठिकठिकाणी दौरे काढून सभा घेतल्या. त्यानुसार 28 डिसेंबर 1936 ला चांदा येथे श्री. विठोबा रघु बसंत यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात येऊन देवाजी खोब्रागडे यांना पाठिंबा देण्यात आला. 1 जानेवारी 1937 ला

ब्रह्मपुरी येथे विठोबाजी रघुनाथ संत उमरेडकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन श्री देवाजी भिवाजी खोब्रागडे यांना निवडून देण्याचा ठराव पास झाला. तर 4 जानेवारी 1937 ला नागपुर येथे सभा होऊन खोब्रागडे यांना निवडून देण्याचा ठराव पास केला गेला. 10 जानेवारी 1937 रोजी घुगूस येथे गजानन राजिराम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेतही देवाजी खोब्रागडे यांना बहुमताने निवडून देण्याचा ठराव पास केला. त्याच दिवशी बल्लारपूर येथेही सभा झाली. 12 जानेवारी 1937 ला सिंदेवाही येथे हरी धनुजी सावकार ग्रामपंचायत मेंबर यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली व खोब्रागडे यांना निवडून देण्याचा ठराव पास करण्यात आला. त्याचप्रमाणे दुर्गापुर ,ताडाळी, मूल, सावरगाव येथे सभा होऊन देवाजी खोब्रगडे निवडून देण्याचे आश्वासने देण्यात आली.[17] त्यानंतर 17 जानेवारी 1937 रोजी मुल जिल्हा चंद्रपूर येथे पंधरा–वीस खेडे मिळून श्री. लक्ष्मण भडके वैद्य मूल यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. या सभेस बराच जनसमुदाय जमला होता. या सभेत, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्ष आणि दलित फेडरेशन पार्लमेंटरी बोर्डाने संमती दिल्यावरून श्री. देवाजी भिवाजी खोब्रागडे चांदा मध्यप्रांत असेंबलीच्या निवडणुकीत उमेदवार आहेत. त्यांची कामगिरी व हुशारी आणि काम करण्याची शैली पाहून त्यांनाच प्रांतीय असेंब्लीमध्ये निवडून द्यावे,' असा ठराव पास करण्यात आला.[18] अशाप्रकारे त्यांनी संपूर्ण भागात दौरे काढून हा भाग पिंजून काढला. चांदा–ब्रह्मपुरी खेडे विभागाची जनरल निवडणूक 8 फेब्रुवारी 1937 रोजी झाली. निवडणुकीच्या दिवशी कुणीतरी दुष्टपणाने त्यांच्या इमारती लाकडाच्या मोठ्या वखारीला आग लावली. या आगीत त्यांचे हजारो रुपयाचे नुकसान झाले.[19] या घटनेला न घाबरता त्यांनी धैर्याने काम केले. या निवडणुकीचा निकाल 18 फेब्रुवारी 1937 रोजी लागला. त्यात श्री. देवाजी भिवाजी खोब्रागडे यांना 5133 मते, गजभिये तळोधी 1107 मते, कानप्याचे मालगुजार यांना 366 मते मिळाली.[20] त्यानुसार श्री. देवाजी भिमाजी खोब्रागडे हे निवडून आले. तेव्हा जमलेल्या मंडळींनी विजयी उमेदवारास फुलांच्या माळा घालून मिरवणूक काढली. मिरवणुकीनंतर श्री. दशरथ लक्ष्मण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या अभिनंदनाची सभा घेण्यात आली. अशाप्रकारे श्री. देवाजी मध्यप्रांत–वऱ्हाड असेंब्लीत स्वतंत्र मजूर पक्षातर्फे निवडून गेले.

**मध्यप्रांत–वऱ्हाड असेंब्लीतील कार्य:** श्री. देवाजी खोब्रागडे यांनी कायदेमंडळात स्वतंत्र मजूर पक्षाच्या भूमिकेनुसार कार्य केले. नागपूरचे श्री. हरदास एल. एन. यांनी सभागृहात पेन्शन विषय कपात सूचना मांडली होती. यास श्री. खोब्रागडे यांनी आपला पाठिंबा जाहीर केला होता. 17 सप्टेंबर 1937 रोजी यावर बोलतांना खोब्रागडे म्हणाले होते की, '...अगदी गरीब स्थिती केवळ दहा–बारा रुपये दरमहा पगारावर राहणारे लोक आपल्या पगारातून काहीही बचत करू शकत नाहीत आणि म्हणून म्हातारपणी नोकरी सोडल्यानंतर त्यांच्याजवळ स्वखर्चास काहीच उरत नाही. शेकडो रुपये पगार मिळविणाऱ्या अंमलदारांनाही पेन्शन मिळण्याची व्यवस्था आहे. परंतु आपल्या लहानशा पगारात भागविणाऱ्या नोकरांसाठी मात्र पेन्शनची सध्या व्यवस्था नाही...' त्यामुळे या कपात सूचनेला खोब्रागडे यांनी पाठिंबा व्यक्त केला.[21] मात्र वित्तमंत्री डि.के. मेहता यांनी 1936 पासूनच पेन्शनच्या कायद्यात बदल करून दहा रुपये पेन्शन मिळण्याचा नियम केला गेला असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे श्री. हरदास यांनी आपली कपात सुचना मागे घेतली होती.

20 सप्टेंबर 1937 रोजी ऑनररी मॅजिस्ट्रेटच्या नेमणूका संदर्भात सभागृहात चर्चा झाली. त्यावेळी श्री. खोब्रागडेंनी काँग्रेस पक्षाने सुरुवातीला ऑनररी मॅजिस्ट्रेट पदाचा बहिष्कार केल्याचे आठवण करून दिली. मात्र आता काँग्रेसच्या लोकांना मॅजिस्ट्रेट व्हायचे असल्याने काँग्रेसला असहमत असलेल्या लोकांना या पदावरून काढून टाकणे अन्यायाचे होईल, असे ठासून सांगितले. त्याच बरोबर या पदाकरिता सुचविलेली निवृत्त माणसाच्या नियुक्तीस त्यांनी विरोध केला. कारण अस्पृश्य लोक नोकरीत नसल्याने त्यांच्या रिटायरमेंटचा प्रश्नच उद्भवत नव्हता. तेव्हा ऑनररी मॅजिस्ट्रेट पदावर निवृत्त व्यक्ती नियुक्त केल्या तर अस्पृश्य समाजाचे लोक मॅजिस्ट्रेट बनणारच नाही.[22] असा प्रश्न त्यावेळी त्यांनी उपस्थित केला होता.

8 ऑगस्ट 1939 रोजी श्री. डी. बी. खोब्रागडे यांनी सी.पी. अँड बेरार कायदेमंडळात "प्रांतिक सरकारला अशी शिफारस आहे की, गेल्या वर्षापेक्षा यावर्षी जास्त नापिकी झाल्यामुळे आणि शेतकरी पूर्ण महसूल देऊ शकत नसल्याने 50 टक्के जमीन महसुलाची सूट देण्यात यावी", असा ठराव मांडला होता.[23] 1932 पासूनच राज्यात नापिकी सुरू होवून दिवसेंदिवस त्याचा परिणाम गरीब शेतकऱ्यावर कसा होत गेला, हे सदनाला पटवून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. 1937 पेक्षा 1938–39 मधील परिस्थिती अधिकच खराब झाल्याने शेतसारा देण्याची ताकद शेतकऱ्यात मुळीच उरली नव्हती. तेव्हा हा ठराव कसा शेतकऱ्यांच्या हिताचा आहे व वऱ्हाडात वर्षानुवर्ष कापसाच्या येणाऱ्या गाड्यांची संख्या घटत असल्याने सर्वत्र नापिकी असल्याचे पटवून देतांना त्यांनी विक्रीसाठी येणाऱ्या कापसाच्या गाड्यांचे उदाहरण दिले. त्यानुसार अकोल्यामध्ये 1936 –37 मध्ये 2,19,236, सन 1937– 38 मध्ये 1,63,357 आणि 1938– 39 मध्ये 1,18,968 गाड्या आल्या. तर अमरावती मध्ये 1936– 37 मध्ये 2,22,608, सन 1937– 38 मध्ये 1,79,978 आणि 1938 –39 मध्ये 1,02,601 गाड्या आल्या. तसेच बुलढाण्यात 1936 –37 मध्ये 1,66,414, सन 1937– 38 मध्ये 1,07,200 आणि 1938– 39 मध्ये फक्त 96,599 एवढ्याच गाड्या आल्या तर यवतमाळमध्ये 1936– 37 मध्ये 1,48,904 तर 1937– 38 मध्ये 1,76,962 आणि 1938 –39 मध्ये तर फक्त 87,006 गाड्या आल्या होत्या.[23] या आकड्यांवरून कापसाचे पीक वर्षानुवर्ष कसे घसरत चालले आहे आणि गेल्या दोन वर्षात कापसाचे पीक कसे निम्म्यावर आले हे स्पष्ट केले. वऱ्हाड हे कापसाचे माहेरघर असल्याने येथील कापसाच्या उत्पादनावरून संपूर्ण प्रांतातील पिकाबाबतची कल्पना येईल याबाबत त्यांनी सदनाला अवगत करून दिले. कापसाच्या पिकाकरिता येणारा खर्च व त्यातून येणारे उत्पन्न याचा विचार केला तर खर्चापेक्षा उत्पन्न कमी असल्याने शेतकऱ्यावरील कर्जाचा बोजा 1930 मध्ये 80 कोटी रुपयांचा होता तो आता दुपटीने झाला असल्याने तो त्वरित दूर करण्यासाठी

सरकारने उपाय योजले पाहिजेत, अशी विनंती खोब्रागडे यांनी त्यावेळी सदनाला केली होती. तेव्हा सरकारला खरोखरच शेतकऱ्यासाठी काही करावयाचे असेल तर त्यांनी शेतकऱ्यांमध्ये 50ः सूट देणारा त्यांनी मांडलेला ठरावा एकमताने पास करावा अशी देवाजी खोबरागडेंनी सरकारला विनंती केली होती.[24] मात्र त्यांनी मांडलेला ठराव बहुमताच्या आधारावर तत्कालीन सरकारने फेटाळला होता.

सी.पी. अँड बेरार कायदेमंडळात सरकारतर्फे मंदिर प्रवेशाचे बिल सदनामध्ये मांडले गेले होते. त्यावेळी 16 ऑगस्ट 1939 ला श्री. डी. बी. खोब्रागडेंनी हे बिल सिलेक्ट कमिटीकडे पाठवण्याचा प्राईम मिनिस्टर साहेबांनी मांडलेल्या ठरावाला कसून विरोध केला होता. कारण अस्पृश्यांनी मंदिर प्रवेशाची मागणी केली नव्हती. त्यांची रोजगाराची व मजुरांना जास्त मजुरीची मागणी होती. त्यामुळे त्यांचे असे म्हणणे होते की, मंदिर प्रवेशाने अस्पृश्यांचे कोणतेही भले होणार नाही आणि या बिलात अस्पृश्यांना मंदिर प्रवेशास बंदी करण्याचा गुन्हा हा कॉग्निझेबल अफेन्स समजला असता तर या बिलाला महत्त्व प्राप्त झाले असते. पण तसे न केल्याने केवळ मंदिराचे ट्रस्टी मनावर घेतील तर मग आम्हाला मंदिर प्रवेशास परवानगी मिळणार असल्याने असे बंदिस्त देव दर्शन घेण्यासाठी आम्ही तयार नाही. तेव्हा सरकारला खरोखरच अस्पृश्यांची अस्पृश्यता घालवायची असेल तर त्यांनी या बिलात, 'कोणत्याही सार्वजनिक देवळात जाण्यास अस्पृश्यांना मज्जाव नसावा, असे जर कोणी नाकारेल तर त्याला वारंट शिवाय गिरफ्तार करून चालान करण्यात येईल,'[25] असे नमूद केले असते तर खरोखरच काँग्रेस पक्षाला अस्पृश्यता दूर करावयाची आहे, असे दिसून आले असते. पण तसे न केल्याने त्यांनी या बिलाला विरोध केला होता.

श्री. खोब्रागडे यांनी सदनात आलेले म्युनिसिपालिटी दुरुस्ती विधेयकाला 17 ऑगस्ट 1939 रोजी विरोध केला होता . कारण या बिलाच्या दुरुस्ती नंतर अस्पृश्यांचा केवळ एकच व्यक्ती म्युनिसिपालिटी मध्ये जाणार होता आणि या मुळे अस्पृश्यांच्या हक्कावर गदा येणार होती. त्यापेक्षा लोकसंखेच्या आधारावर आरक्षण दिले पाहिजे.[26] त्यामुळे एकापेक्षा जास्त प्रतिनिधी म्युनिसिपल कार्पोरेशन मध्ये सहभागी होतील. परंतु अशा प्रकारचे जास्त प्रतिनिधी निश्चितपणे येण्याची काहीच सोय या बिलात केली नसल्यामुळे या बीलाने अस्पृश्य समाजाचे नुकसान होईल म्हणून यास खोब्रागडेंनी विरोध केला होता.

कायदेमंडळात जेव्हा युद्धाच्या संदर्भातला ठराव आणला गेला, त्यावेळी 7 नोव्हेंबर 1939 ला श्री. खोब्रागडे यांनी सरकारला स्पष्ट बजावले की, ब्रिटिश सरकारने भारतीय लोकांशी विचारविनिमय न करता इंग्लंड आणि जर्मन युद्धात भारतालाही सामील करून घेतले. हा दोष ब्रिटिश सरकारचा नसून काँग्रेसचा आहे. कारण ज्यावेळी युद्धाचे ढग जमा होऊ लागले होते, त्यावेळी महात्मा गांधींच्या आज्ञेनुसार मध्यवर्ती कायदे मंडळावर काँग्रेस पक्षाने बहिष्कार घातला होता. त्याचा असा परिणाम झाला की, गव्हर्नर जनरल ने आपल्या अधिकारातून भारताला युद्धात सामील करून घेतले. त्यामुळे या युद्ध परिस्थितीत भारताचा समावेश हा केवळ काँग्रेसच्या चुकीमुळे झाला आहे. तरी काँग्रेस मात्र अल्पसंख्यांक लोकांना विश्वासात न घेता ब्रिटिश सरकार सोबत स्वतः वाटाघाटी करीत आहे. याचाच अर्थ काँग्रेस कडून अल्पसंख्यांकांना विचारात घेतल्या जात नाही. म्हणून आमचा कांग्रेस सोबत झगडा आहे. आम्हाला जोपर्यंत उच्चवर्गीय सारखे सामाजिक, धार्मिक व राजकीय दर्जा जोपर्यंत प्राप्त होणार नाही, तोपर्यंत हा झगडा सुरूच राहणार.[27] म्हणून 1935 च्या राज्यघटनेनुसार अल्पसंख्यांकाच्या हिताला पूर्ण संरक्षण, तसेच अस्पृश्यांच्या अधिकृत संस्था व अधिकृत प्रतिनिधी जोपर्यंत घटनेला मान्यता देणार नाही तोपर्यंत अशी कुठलीही घटना आम्ही स्वीकारणार नाही, अशी सूचना यानिमित्याने त्यांनी सरकारला केली होती. अशाप्रकारे श्री. देवाजी खोब्रागडेंनी विधिमंडळातील कामकाजात भाग घेऊन आपले योगदान दिले होते.

श्री. देवाजी खोब्रागडेंनी सदनातील प्रश्नोत्तराच्या तासात सहभागी होवून अनेक प्रश्न मांडले होते. 8 डिसेंबर 1937 रोजी प्रश्नोत्तराच्या तासात श्री. देवाजी खोब्रागडे यांनी, नागपूर शहरात बेघर असलेल्या आणि सर्वसाधारणपणे रस्त्यावर व रेल्वे पुलावर पडलेल्या गरीब आणि निराधारांच्या राहण्यासाठी सराई किंवा आश्रम बनवण्यास सरकार प्रयत्नशील आहे काय? असा प्रश्न विचारला होता.[28] त्यावर अशी कुठलीही योजना सरकारची नाही असे उत्तर मंत्री डॉ खरे यांनी दिले. 9 डिसेंबर 1937 रोजी श्री. देवाजी खोब्रागडे यांनी या प्रांतातून परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना कॉलरशिप देण्यात येतात काय? आणि सध्या दिलेल्या आहेत काय? असा प्रश्न उपस्थित केला.[29] त्यावर सभागृहाच्या सभापतीने असा प्रश्न उद्भवत नाही, असे उत्तर दिले. यावरून या प्रश्नाला उत्तर देण्याचे टाळाटाळ केल्याचे दिसून आले. एकंदर सभागृहात श्री. खोब्रागडे यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता, हे दिसून येते.

**मुल्यांकन :–** श्री.देवाजी यांनी आंबेडकरी चळवळ विदर्भातील कानाकोपऱ्यात पोहचविण्यात मोलाचे योगदान दिले. त्यांनी आंबेडकरी चळवळीला सरळ हस्ते आर्थिकदृष्ट्या मदत करून चळवळीला भक्कमपणे उभे करण्यास मदत केली. डॉ. आंबेडकरांच्या प्रत्येक चळवळीत श्री. खोब्रागडे यांचा सहभाग होता. स्वतंत्र मजूर पक्षाच्या शाखा विदर्भात पसरविण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेनंतर या धर्मांतराला पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांनी अहोरात्र मेहनत घेतली होती. त्यासाठी ठिकठिकाणी सभा घेऊन याचे महत्त्व अस्पृश्यांना पटवून देण्याचे कार्य त्यांनी केले होते. 1937 च्या निवडणुकीतील त्यांचा विजय हा त्यांच्या लोकप्रियतेची साक्ष पटवून देणारी गोष्ट होती. त्यांनी सभागृहात अस्पृश्य, शेतकरी, मजूर, गरिबाचे प्रश्न मांडून त्यांचा आवाज सरकारपर्यंत पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले होते. स्थानिक स्वराज्य संस्थेतही त्यांनी महत्त्वपूर्ण काम केले. त्यांचा मुलगा बॅरिस्टर राजाभाऊ राजकारणात आल्यानंतर त्यांचा वयोमानानुसार सहभाग कमी होत गेला. तरी 1956 मध्ये डॉ. आंबेडकरांनी चंद्रपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा दिली त्यात त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. पुढे त्यांचे 28 जून 1966 रोजी निधन झाले. एकंदरीत त्यांचे कार्य नव्या पिढीच्या तरुणांना प्रेरणादायी असे आहे.

**संदर्भ :–**

1.रामटेके, पी.टी., 'बाबासाहेबांचे निष्ठावंत सहकारी देवाजी बापू खोबरागडे,' प्रकाशक पि. टी. रामटेके, भद्रावती, 2003, पृ.15.
2.प्रबुद्ध भारत, मुंबई, शनिवार, 16 जुलै 1966, वर्ष 10, अंक 34, पृ. 3.
3.कित्ता.
4.बहिष्कृत भारत, मुंबई, शुक्रवार, 3 जून 1927, वर्ष 1, अंक 5, पृ.7.
5.प्रबुद्ध भारत, 16 जुलै 1966, पृ. 3.
6.जनता, मुंबई, शनिवार, 23 जून 1934, वर्ष 4, अंक 24, पृ. 2.
7.जनता, 7 नोव्हेंबर 1936, वर्ष 5, अंक 38, पृ. 6.
8.जनता, 14 ऑगस्ट 1937, वर्ष 6, अंक 24, पृ. 7.
9.जनता, 21 ऑगस्ट 1937, वर्ष 6, अंक 25, पृ. 5.
10.जनता, 30 ऑक्टोबर 1937, वर्ष 6, अंक 35, पृ. 2.
11.जनता, 13 नोव्हेंबर 1937, वर्ष 6, अंक 36, पृ. 2.
12.मेश्राम, व्ही. डी. (संपा.), 'बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे सुवर्णमहोत्सव स्मरणिका' 25 सप्टेंबर 1975, प्रकाशक व्हि. डी. मेश्राम, साप्ताहिक प्रजासत्ताक, चंद्रपूर, 1975, पृ. 23.
13.प्रबुद्ध भारत, 16 जुलै 1966, पृ. 3.
14.गरुड, कोल्हापूर, रविवार, 25 मे 1947, वर्ष 21, अंक 5, पृ. 3.
15.कित्ता.
16.जनता, 2 जानेवारी 1937, वर्ष 5, अंक 45, पृ. 7.
17.जनता, 23 जानेवारी 19 37, वर्ष 5, अंक 48, पृ. 6.
18.कित्ता, पृ. 3.
19.जनता, 27 फेब्रुवारी 1937, वर्ष 6, अंक 3, पृ. 5.
20.कित्ता, पृ. 2.
21.Central Provinces and Berar Legislative Assembly Proceeding, Vol- l, July-September 1937, Pp-495.
22.कित्ता, पृ. 655– 656.
23.कित्ता.
24.C. P. B. L. A. P. Vol- VI, August 1939, Pp. 328-329.
25.कित्ता, पृ. 765.
26.कित्ता, पृ.868–884.
27.C. P. B. L. A. P. Vol- VI, August 1939, Pp. 399&401-
28.C. P. B. L. A. P. Vol- II, December 1937] Pp. 72-
29.कित्ता, पृ. 128.

## विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील देवाजीबापू खोब्रागडे यांचे योगदान

**प्रा. डॉ. नरेश कवाडे**
**इतिहास विभाग प्रमुख,**
**यशवंत महाविद्यालय, वर्धा**

**सारांश :–**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व मानवजातीचे कल्याण करणारे मुक्तीदाते ठरले. त्यांच्या विचाराने शोषीतांना योग्य दिशा मिळाली. त्यामधूनच आंबेडकरी आंदोलनाला जागतिक स्वरूप प्राप्त झाले. शतकानुशतके अस्पृश्य समाजावर होत असलेला अन्याय त्यांनी पाहिलेला होता. त्याचे चटके स्वतः त्यांना सोसावे लागले होते. पदोपदी त्यांचा होत असलेला अन्याय पाहून त्यांचे मन अतिशय दुःखी होत होते. म्हणूनच माझ्या समाजावर होत असलेला अन्याय मी दूर केल्या शिवाय राहणार नाही याची तळमळ त्यांना होती. हळूहळू त्यांनी अस्पृष्य समाजातील लोकांना जागृत करून आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची वाचा फोडून पुढील लढयासाठी त्यांना संघटीत केले. त्यातून महाडच्या चवदाळ तळयाचा सत्याग्रह, मनुस्मृती दहन, काळाराम मंदीर प्रवेश सत्याग्रह या माध्यमातून अस्पृश्य समाजाला न्याय मिळवून देण्याचे कार्य त्यांनी चालविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विदर्भातील अनेक कार्यकर्त्यांना संघटीत करून आपली चळवळ अधिक व्यापक केलेली होती. त्या कार्यकर्त्यांमध्ये देवाजीबापू हे सुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विश्वासू व प्रामाणिक कार्यकर्ते होते. त्यांनी विदर्भातील आंबेडकरी चळवळीत अत्यंत मोलाची भूमिका पार पाडलेली आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या आंदोलनातील देवाजी बापू खोबरागडे एक निष्ठावंत व विश्वासू कार्यकर्ते होते. विदर्भातील आंबेडकरी चळवळ घराघरात पोहचिवण्यासाठी देवाजीबापू खोबरागडे यांचे प्रयत्नांची विशेष दखल घ्यावी लागते. ते आपल्या कार्यकर्तृत्वाने उच्च पदावर पोहचलेले होते. आर्थिक, सामाजिक अशा दोन्ही पातळयावर समाजाला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी यासाठी त्यांची धडपड सुरू होती. देवाजीबापूंनी डॉ. आंबेडकरांच्या शब्दावर आपले जीवन चळवळीला बहाल केले. व त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेवून अस्पृश्य समाजाच्या वस्त्यांमध्ये आंबेडकरी चळवळीला मजबूत पायावर उभे केले होते. विदर्भातील चंद्रपूर जिल्हा सर्व बाबतीत मागासलेलाच होता. अस्पृश्यांची स्थिती तर अतिशय बिकट होती. उत्पन्नाचे साधन नाही, विद्या नाही, राजकारणापासून कोसो दूर असे त्यांचे गुलामीचे जीवन होते अशाही परिस्थितीत आपल्या प्रतिभा संपन्न, विलक्षण नेतृत्वातून त्यांनी आपला विकास घडवून आणला. सर्वप्रथम त्यांनी आर्थिक विकासावर भर दिला. त्याचबरोबर सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक आणि शैक्षणिक अशा विविध क्षेत्रांना त्यांनी स्पर्श केला.

**शब्द संकेत :जीवनचरित्र,सामाजिक ,राजकीय,धम्मदीक्षा समारोहाचे आयोजन आणि शैक्षणिक कार्य**

**संशोधन पद्धती :** :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना :** देवाजीबापू खोबरागडे यांचा कालखंड 2 जानेवारी 1899 ते 28 जून 1966 हा आहे. या काळात त्यांनी आंबेडकरी चळवळील भरीव कार्य केलेले आहे. देवाजीबापूंचा जन्म चंद्रपूरच्या दादमहल वॉर्डात 2 जानेवारी 1899 ला झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिवाजी आणि आईचे नांव पैकाबाई असे होते. भिवाजी व पैकाबाई यांना सहा अपत्ये झाली. 'भिवाजी सध्याच्या पोंभूर्ण तालुक्यातील देवाडा या गावी राहायचे. पण, मूळचे ते सध्याच्या गडचिरोली जिल्हयातले होते. त्या वेळेस चांदा जिल्हा विस्ताराने फार मोठा होता. चंद्रपूरच्या पूर्व दिशेला गडचिरोली जिल्हयात खोबरागडी नामक नदी आहे या नदीच्या किनाऱ्यावर निवास करणारे खोबरागडे असला प्रघात पडला असे हे खोबरागडे कुटुंबाचे मूळ शोधता येईल.[1] तिथून भिवाजी चंद्रपूरला आले तिथे ते फळांच्या बागा ठेक्यांनी घेवून व्यवसाय केला.

देवाजी दोन वर्षाचे असतांना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. परंतु खचून न जाता त्यांच्या आईने आपल्या कुटुंबाचे पालनपोषण केले देवाजीचे शिक्षण हायर सेकंडरीपर्यत झाले. ते दहाव्या वर्गात असतांना नगिनाबाग येथील इंदिराबाई शेंडे सोबत त्यांचा विवाह झाला. त्याचवर्षी देवाजीबापू दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेले होते. तिथूनच त्यांनी शिक्षण सोडून दिले. त्यानंतर त्यानी व्यवसाय सुरू केला. बल्लारशहा येथे पाच एकर जागा विकत घेतली व तिथे इमारती लाकडाचा व्यवसाय चालविला त्या व्यवसायात भरभराट झाली व त्यांच्या हाताखाली 200 ते 300 मजूर काम करीत होते. उत्तरोत्तर त्यांचा व्यवसाय प्रगती पथावर गेला. त्यामुळे खोबरागडे कुटुबाला मान प्रतिष्ठा मिळाली व ते सधन कुटुंब म्हणून ओळखल्या जात होते. अशा प्रकारचा व्यवसाय करीत असतांना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतही सक्रीय सहभाग घेतला. व त्यात महत्वाची भूमिका पार पाडली.

**देवाजीबापू यांचे सामाजिक कार्य :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व चिंतनाचे मध्यवर्ती केन्द्र समाज आहे. समाज संकल्पनेत राजकीय, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक अशा सर्वांचा ते विचार करतात, तेव्हा सामाजिक विकास म्हणजे वरील सर्व बाबींचा विकास ओघानेच येतो. समाजात पसरलेल्या वाईट आणि अनावश्यक विचार धारेविरूध्द त्यांना जागृत करून वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी, नवचैतन्य निर्माण करण्यासाठी डॉ. आंबेडकरांचे उभे आयुष्य खर्ची पडले. देवाजीबापूंनी त्यांचा आदर्श ठेवत आपल्या समाजकार्याला सुरूवात केली. 'मानवी जिवनाच्या प्रगतीला मारक अशा हिंदूधर्माच्या भावना व धर्मग्रंथ यांची जनतेवर जी पकड बसलेली होती तिच्या विरूध्द अनेक संतांनी व धर्मसंस्थापकांनी बंडे उभारली तरी ती पकड त्यांना सोडविता आली नाही'[2] अस्पृष्य समाजामध्ये अनेक जुन्या चालीरीती व पोटजाती होत्या ब्रिटिश काळात शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे समाजातिल सुशिक्षीत लोकांच्या मनावर सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न चालविले. त्यातूनच 'मई 1920 मे डॉ. आंबेडकर की प्रेरणा तथा प्रयत्न से नागपूर मे छत्रपती राजर्षी शाहू महाराज की अध्यक्षता मे अखिल भारतीय बहिष्कृत परिषद हुई. इस परिषद को यशस्वी बनाने में चंद्रपूर के पत्रुजी भिवाजी खोबरागडे तथा देवाजी भिवाजी खोबरागडे का प्रमूख हाथ था'[3] अस्पृश्यांना सामाजिक दृष्टया जागृत आणि संघटित करण्यासाठी ही परिषद आयोजित करण्यात आली होती. पोटजातीमध्ये असलेला भेदाभेद नट करण्यासाठी ही परिषद महत्वाची ठरली. कारण परिषदेमध्ये कार्यकर्त्यांपुढे स्वयंपाक कोणत्या पोटजातीनी करावा असा पेच निर्माण झाला होता तेव्हा सर्वांनी मिळून स्वंयपाक तयार केला. देंवाजीबापू यामध्ये प्रत्यक्ष सहभागी झालेले होते.

1932 ला कामठी येथे अखिल भारतीय दलीत कॉग्रेसचे दुसरे अधिवेशन झाल्यानंतर प्रांतिक दलित परिषदा घेण्यात आल्या आणि अस्पृश्य समाजाचा पाठींबा डॉ. आंबेडकरांना असल्याचे जाहीर केले. अशाच प्रकारची मध्यप्रांतीय दलित परिषद दलित कॉग्रेसच्या वतीने चंद्रपूर येथे 29 जून 1932 रोजी घेण्यात आले. या परिषदेचे अध्यक्ष विनायक तुलाराम साखरे होते. अस्पृश्य मानलेल्या लोकांच्या धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीसंबंधी विचार करणे हा परिषदेचा हेतू होता. परिषदेचे स्वागताध्यक्ष देवाजीबापू खोबरागडे होते 'सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय क्षेत्रात समतेच्या विचाराचा प्रवाह हळूहळू सर्व भारतात पसरू लागला. भारतातील धार्मिक तत्वाचे धागे काही ठराविक मोजक्या लोकांच्या फायद्यासाठी आणि सोयीसाठी सामाजिक आणि आर्थिक विचारांच्या धाग्यात विणले गेले होते. 'जातीभेद' संस्था ही सामाजिक आणि धार्मिक व्यवस्था ती तर असमानतेच्या अन्याय कल्पनांनी बरबरटलेली तेव्हा अशा कल्पनाविरूध्द आवाज उठवून बहिष्कृतात जागृती करण्याचे धाडस देवाजीबापूनी दाखविले.[4]

देवाजी बापूंनी अस्पृश्योध्दारोचे कार्य हाती घेतल्यानंतर मागे वळून पाहणे त्यांना मान्य नव्हते. अस्पृश्योन्नतेची त्यांचे नाव जुळून गेले होते. अस्पृश्यांना जागृत करण्याचे त्यांचे प्रयत्न सुरूच होते. त्याकरीता विविध सभांचे आयोजन करीत. ' अशिच एक परिषद सावली, जिल्हा चंद्रपूर येथे 31 मे ते 1 जून 1934 रोजी चोखामेळा चांदा तालुका परिषदेच्या माध्यमातून घेण्यात आली. परिषदेचे अध्यक्ष विक्रम बुटानी शेन्डे होते. परिषदेत पुणे करारास पाठिंबा देणे, सार्वजनिक विहिरी, तळी अस्पृश्यांना खुली असावी, डॉ. आंबेडकरांच्या अस्पृश्योध्दाराच्या कार्यास पाठिंबा देणे असे ठराव पारित करण्यात आले.[5] या ठरावावर ठेवाजीबापू यांनी स्वाक्षरी केली. हिंदू धर्मातील असलेली विषमता या विरोधात देवाजीबापूंनी आवाज उठविला.

विदर्भात समाजजागृतीचे कार्य सुरू होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच अस्पृश्यांचे एकमेव पुढारी याची जाणीव सामान्य माणसापर्यंत पोहोचविण्याचे कार्य चालू होते. समाजातील वाईट प्रथा नष्ट झाल्या पाहिजेत यासाठी नियम तयार करण्यात आले होते. अस्पृश्यांच्या परिषदा घेवून कुर प्रथा नाश कराव्या यासाठी दलित नेते कार्यरत होते. त्यामध्ये देवाजीबापू यांचे हे महत्वाचे योगदान होते. याचवेळी अस्पृश्यांच्या रक्षणासाठी 'समता सैनिक दल' स्थापन करण्यात आले होते. तेव्हा देवाजीबापू यांनी दादमहल वार्ड येथेही 'समता सैनिक दलाची' स्थापना केलेली होती. समाजकार्य करण्यासाठी या दलाची प्रमूख भूमिका होती. देवाजी बापूंची पत्नी इंदिराबाई पतीच्या खांद्याला खांदा लावून समाजकार्य करीत होती.

**देवाजीबापूंचे राजकीय कार्य :** सामाजिक प्रश्नांची सोडवणूक राजकीय पातळीवरून करणे आवश्यक असते असे देवाजीबापू यांना वाटत होते. अस्पृश्य समाजाला आपला विकास घडवून आणतांना ज्या अग्निदिव्यातून मार्गक्रमण करावे लागले त्याचा विचार करता कोणत्याही एकाच बाबीवर अवलंबून राहणे योग्य नव्हते. अनेक समस्या पुढे असतांना त्या सोडविल्याशिवाय आपल्या समाजाचा विकास होणार नाही याची पूर्ण जाणीव कार्यकर्त्यांना होती म्हणूनच राजकीय क्षेत्रातील पदार्पण त्यांना योग्य वाटले. म्हणूनच देवाजीबापूंनी राजकारणात पदार्पण करून अस्पृश्यांना न्याय मिळवून दिला. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1936 साली स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केल्यानंतर प्रांतीय शाखा स्थापन करण्यात आल्या. वऱ्हाड मध्य प्रांत विभागातून स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करण्यात आली'.[6] या पक्षाच्या माध्यमातून 1937 च्या सार्वत्रिक निवडूका लढविण्यात आल्या. 'सन 1937 मध्ये देवाजीबापू

स्वतंत्र मजूर पक्षातर्फे मध्यवऱ्हाड प्रंतातून एम.एल.ए. करीता उभे होते. ज्यादिवशी निवडणूक होती त्याच दिवशी त्यांचा लाकडाचा डेपो जाळण्यात आला.परंतु ते डगमगले नाही व परिस्थितीला समोर गेले. निवडून आल्यानंतर राजकारणाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्राकडे वाटचाल केली. आपला समाज शिक्षीत व्हावा, समाजातील मुलांनी खूप शिकून मोठ व्हाव आणि समाजाचा उध्दार करावा हा हेतू त्यांचा होता. देवाजीबापूंचे मोठे बंधू पत्रूजी खोबरागडे बल्लारपूरचे प्रथम सरपंच होते.'[7] जानेवारी 1949 ला बल्लारपूर येथे नगरपरिषद स्थापन झाल्यानंतर देवाजी खोबरागडे बल्लारपूर नगरपरिषदेचे पहिले नगराध्यक्ष झाले.7 त्यामाध्यमातून अस्पृश्यांच्या हिताचे अनेक निर्णय त्यांनी घेतले. नगरपरिषदेचा कारभार हाती घेण्याच्या एक दिवस आधी रात्री आग लागून सर्व कागदपत्र जळून राख झाली. नगरपरिषदेची आर्थिक स्थिती त्यावेळी फारच हलाखीची होती. देवाजीबापूंचा पिंड समाजसेवेचा असल्याने त्यांनी स्वतःची रक्कम खर्च करून नगरपरिषदेचे काम सुरू केले.

रिपब्लिकन पक्ष स्थापनेतदेखिल त्यांचे मोठे योगदान आहे. नागपूर येथे झालेल्या सभेला ते उपस्थित होते. त्यांचे सोबत ठेकेदार मंडळी देखिल नागपूरला गेली होती. रिपब्लिकन पक्षाच्या पार्लमेंटरी बोर्डची सभा सुरू होती. देवाजी बापूमुळे ही सभा जवळून पाहण्याचा योग कार्यकर्त्यांना आला. देवाजीबापूंनी आपला मुलगा बॅ. राजाभाउ खोबरागडे यांना चळवळीत झोकून दिलेले होते. त्यांचा वारसा घेवून त्यांनी पुढील कार्य मोठया आनंदाने केलेले होते.

**चंद्रपूरच्या धम्मदीक्षा समारंभाचे आयोजन :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात अभूतपूर्व धम्म क्रांती घडवून आणली. त्यातून प्रेरणा घेवून देवाजी बापू खोबरागडे यांनी धम्मकार्याला स्वतःला वाहून घेतले. बुध्दतत्वज्ञान घराघरात पोहोचविण्याचे कार्य केले. बुध्दाचा शांतीचा संदेशच जगाचा विकास घडवून आणू शकतो असा त्यांचा ठाम विश्वास होता. आणि म्हणूनच त्यांनी धम्मकार्याला सुरूवात केली. '8 ऑगष्ट 1937 रोजी एस.के. कांबळे यांचे अध्यक्षतेखाली अस्पृश्य समाजाची सभा झाली या सभेत धर्मांतरास पाठींबा देणारा तसेच पोलिस खात्यात अस्पृश्य उमेदारावास घेण्यात येण्याबद्दल ठराव परित करण्यात आले. या ठरावावर एस. टी. वानखेडे, कौसल्यादेवी वानखेडे, देवाजी खोबरागडे यांची भाषणे झाली.[8] बौध्द धम्माच्या प्रकाशाने आपले स्वतःचे, आपल्या दलित समाजाचे किंबहुना आपल्या सर्व देशबांधवाचे जीवन उजळून टाकण्ययाचा त्यांनी निर्धार केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी नागपूर येथे अशोक विजयादशमीच्या दिवशी दि. 14 ऑक्टोंबर 1956 रोजी बुध्दाच्या धम्माची जाहिररीत्या दीक्षा घेतली व त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या आपल्या सुमारे पाच लाख अनुयांयांना या धम्माची दीक्षा दिली. त्या दिवसापासून पुढे बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतरही महाराष्ट्रात बौध्दधम्म दीक्षेचे अनेक समारंभ झाले व महाराष्ट्रातील बाबासाहेबांची अरनुयायी असलेली अस्पृश्य जनता बुध्दानुयायी झाली.'[9] हा धम्म सोहळा यशस्वी करण्यासाठी देवाजीबापू खोबरागडे यांचे मोलाचे योगदान आहे. तन, मन, धनाने त्यांनी धम्म सोहळयात सहभाग दर्शविला.

नागपूर येथिल धम्मदीक्षा सोहळानंतर चंद्रपूर येथे धम्मदीक्षा सोहळा आयोजित करण्यात आला. चंद्रपूर शहर म्हणजे देवाजीबापूंचे जन्मस्थान होते. त्यामुळे परिसरातील अस्पृश्यांची स्थिती त्यांनी अगदी जवळून पाहिली होती. त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराची त्यांना जाणीव होती. हिंदू धर्म शास्त्रांचा समाजावर किती पगडा आहे हे त्यांना माहित होते आणि म्हणूनच या जाचातून अस्पृश्यांची सुटका करण्यासाठी त्यांनी धम्म दीक्षा कार्यक्रमाचे आयोजन चंद्रपूर येथे घडवून आणले. कार्यक्रमासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माईसाहेब, नानकचंद रत्तू, बॅ. राजाभाऊ खोबरागडे हे 16 ऑक्टोबरला सकाळी पाच वाजता नागपूरहून निघाले. धम्म दीक्षेने संपुर्ण परिसर बुध्दमय झाला होता. पांढऱ्या कपडयातील स्त्री–पुरूषांच्या चेहऱ्यावर उत्साह आणि आनंद दिसत होता. सायंकाळी डॉ. आंबेडकरानी उपस्थितांना धम्माची दीक्षा दिली.

देवाजी बापू खोबरागडे यांनी आपल्या नेतृत्वातून अस्पृश्य समाजाच्या व्यथांना पुढे आणले. हिंदू धर्मातंगत आपल्या समाजाचा विकास होणार नाही याची त्यांना पूर्ण खात्री होती म्हणूनच त्यांनी बौध्द धम्माच्या प्रसारासाठी प्रयत्न केले. त्यामुळे वऱ्हाड प्रांतात बोध्द धम्माचा प्रसार झालेला पाहायला मिळते.

**देवाजीबापूंचे शेक्षणिक कार्य :** देवाजीबापू खोबरागडे यानी स्वतः उच्चशिक्षण घेतले नसले तरीही त्यांचे शिक्षणाबद्दलेचे प्रेम कमी झालेले नव्हते. आपल्या मुलांना दिलेले उच्च शिक्षण आणि आपल्या अस्पृश्य समाजाच्या शिक्षणासाटी केलेला खटाटोप त्याची साक्ष दते. इंग्रज लोकांच्या उदार धोरणामुळे शिक्षणाचा विस्तार या समाजाचा होवू लागला. 'बल्लारपूर येथे सार्वजनिक वाचनालय सुरू केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुंबई वरून जणता पेपर निघत होता. त्यात त्यांचे विचार आणि आदेश असत, पेपर वाचण्यासाठी जागा अपूरी पडत असल्याने स्वतःची कृष्णा वार्ड येथील जागा वाचनालयाकरिता दिली.'[10]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य मुलांच्या शिक्षणासाठी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. तेव्हा महाविद्यालयाच्या बांधकामासाठी उच्च प्रतिचे सागाचे लाकूड कट साईज मध्ये पाठविले. डॉ. आंबेडकरांचा प्रत्येक शब्द

आदेश मानून ते कार्य करीत होते. डॉ. आंबेडकरांनी उच्च शिक्षणासाठी ज्या विद्यार्थ्यांना विदेशात पाठविले त्यामध्ये बॅ. राजाभाउ यांचा समावेश होता. राजाभाउ सोडता इतर विद्यार्थी शासनाची शिष्यवृत्ती घेवून गेले मात्र देवाजी बापू श्रीमंत असल्याने राजाभाउंना स्वखर्चाने पाठविण्याची सुचना डॉ. आंबेडकरांनी केली. क्षणाचाही विलंब न करता देवाजीबापूंनी त्याची अंमलबजावणी केली.चंद्रपूर जिल्हयात अस्पृश्यांच्या शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प होते. अस्पृश्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले होते. तरीही अस्पृश्य विद्यार्थी आपली प्रगती करू लागले. ते देवाजी बापूंच्या सहायाने 'काही विद्यार्थी त्यांच्या सहयोगाने मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद येथे शिक्षणासाठी गेले. देवाजीबापू फिमेल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सदस्य होते. अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतांना निवासाची व्यवस्था व्हावी म्हणून चंद्रपूर येथे 'चोखामेळा वस्तीगृहाची' स्थापना केली. हळूहळू त्यांची प्रेरणा घेवून बॅ. राजाभाउ खोबरागडे यांनी चंद्रपूर व परिसरात अनेक शैक्षणीक दालने सुरू केलेली होती. त्यामुळे या परिसराती मुलांचा मोठया प्रमाणात फायदा झालेला होता.

**निष्कर्ष:** देवाजीबापू खोबरागडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निष्ठावान अनुयायी होते. विदर्भातील आंबेडकरी चळवळीचे ते पाईक होते. त्यांच्याबरोबर इतरही अनेक सहकारी कार्य करीत होते. देवाजीबापू खोबरागडे यांनी अतिशय बिकट परिस्थितीत सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविला. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी चळवळ उभारलेली होती. तीच चळवळ देवाजीबापू खोबरागडे यांनी विदर्भात उभारलेली होती. त्यांच्या या कार्यामुळे अस्पृश्य समाजावर होत असलेला अन्याय दूर होवू शकला.

देवाजीबापू खोबरागडे यांनी समाजकारण पूर्ण करण्याकरीता राजकारणाचा स्विकार केला. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष, शेडयुल्ड कास्ट फेडरेशन, व नंतर रिपब्लिकन पक्षाची उभारणी केलेली होती. त्यामुळे या पक्षांतर्गत कार्य त्यांनी केले व त्यामाध्यमातून त्यांनी अनेक समस्या सोडविलेल्या होत्या. शिक्षण क्षेत्रातही त्यांचे कार्य मोठे होते. धम्म क्रांती यशस्वी करण्यामध्ये त्यांचा मोठा वाटा होता. चंद्रपूरच्या धम्म दीक्षेची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर होती. त्यांनी ती त्यांनी अतिशय उत्तम पध्दतीने पार पाडलेली होती. चंद्रपूर सारख्या मागासलेल्या भागात लाखो लोकांना धम्म दीक्षा दिल्यामुळे लोकांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडून आले. आणि त्यांना एक नवीन ओळख मिळाले. माणूस म्हणून जगण्याचा त्यांना अधिकार मिळाला. या मागे देवाजी खोबरागडे यांचे कार्य अत्यत मोलाचे ठरलेले आहे.

**संदर्भसूची**

01.मेश्राम, व्ही.डी.महाराष्ट्राचे शिल्पकार बॅ. राजाभाऊ खोबरागडे',महाराष्ट्र राज्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई,प्र. आ. 2003, पृष्ठ क्र. 4

02.चांगदेव खैरमोडे डॉ. भिमराव रामजी आंबेडकर खंड 1 सुगावा प्रकाशन पुणे, 2002 पृष्ठ क्र. 129

03.रामटेक, पी.टी.बाबासाहेबांचे निष्ठावंत सहकारी देवाजीबाबू खोबरागडे संकेत प्रकाशन नागपूर,प्र.आ. 2003 पृष्ठ क्र. 27

04.ताकसांडे, प्रसेन.बॅ. राजाभाउ खोबरागडे यांचे आंबेडकरी आंदोलनातील योगदान– पी.एचडी. प्रबंध 2015 पृ.क्र. 83

05.रामटेके, पृष्ठ क्र. 30

06.कित्ता , पृष्ठ क्र. 35

07. कित्ता पृष्ठ क्र. 37

08. कित्ता, पृष्ठ क्र. 38

09.ताकसांडे, प्रसेन पूर्वोक्त, पृष्ठ क्र. 88

10.मेश्राम, पी.टी.पूर्वोक्त, पृष्ठ क्र .37

# विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील नेते नानासाहेब गवई यांचे सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्य

प्रा. डॉ. राजु भा. खरडे
आर.बी.व्यास कला वाणिज्य
महाविद्यालय कोंढाळी

**सारांश :** अमरावती जिल्हयातील भूगाव या लहान खेडयात जन्मलेल्या श्री नानासाहेब गवळी यांनी आपल्या दलितोध्दार कार्याची सुरूवात आजची भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतून केली होती. नानासाहेब गवई यांच्यावर विठ्ठल रामजी शिंदे यांचा मोठा प्रभाव असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सामाजिक कार्याला सुरूवात केली. दलित वर्गात जाणीव जागृती करून, ख्रिश्चन धर्मांतराचे लोण त्यांनी थांबविले. 1911 ला जन्मगावी भुगाव येथे तीन दिवसीय अधिवेशन घेवून दलित समाजाच्या विकासाकरीता सहा ठराव पास करण्यात आले. या अधिवेशनाला 2500 दलित आले होते. त्याचबरोबर इतर समाजातील काही महत्वपूर्ण पुढारी सुध्दा हजर होते. नानासाहेबांनी 1914 ला अमरावतीत 'बहिष्कृत भारत' नावाचे पाक्षिक पत्रक काढून, विदर्भातील दलित वर्गात मोठया प्रमाणात जनजागृती घडवून आणली. 1917 ला 'डिप्रेस्ड इंडीया असोसिएशन' नावाची संस्था स्थापन करून, नानासाहेबांवर विदर्भातील लोकांमध्ये जनजागृती करण्याची जबाबदारी टाकली असता, त्यांनी ती उत्कृष्ठरित्या सांभाळली होती. मॉटेग्यूला भेट देणाऱ्या शिष्टमंडळात विदर्भातील नेत्यांमध्ये नानासाहेब गवई सुध्दा होते. त्यांनी कमेटीसामोर भक्कमपणे दलित वर्गाची बाजू मांडली. शेवटी नानासाहेब गवई यांच्या प्रयत्नांना यश येवून मध्यप्रांत–वऱ्हाड कायदेमंडळात नानासाहेब गवई व कालीचरन नंदागवळी यांना घेण्यात आले. नानासाहेब 1920 ते 1945 पर्यंत सतत 25 वर्षे कायदेमंडळात असल्याने दलित वर्गासाठी त्यांनी भरीव कार्य करून, त्यांना न्याय मिळवून दिला. 1934 ला कायदेमंडळात अस्पृष्यता निवारण बिल पास केले. त्याच बरोबर त्यांनी कुळाला शेती लागवडीकरीता पाच वर्षे देण्यात यावी, मालगुजारी नष्ट करण्यात यावी, द्विभार्या प्रतिबंध कायदा इ. प्रश्नांना कायदेमंडळात वाचा फोडली व काही बाबतीत कायदा करण्यात त्यांना यश सुध्दा आले. नानासाहेब गवई हे नागपूर विद्यापीठाचे काही काळ सभासद असल्याने त्यांनी विद्यापीठातील दलित विद्यार्थ्यांसंबंधीचे अनेक प्रश्न व समस्या सोडविल्याने त्याचा मोठा फायदा विदर्भतील दलित व मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना झाला. नानासाहेब गवई यांनी केलेल्या कार्याचे अवलोकन केल्यानंतर असे दिसून येते की, त्यांनी केलेले कार्य खरोखरच महान असून, त्याचा मोठा फायदा दलित व मागासलेल्या वर्गाला होवून हा वर्ग विकासाच्या दिशेने वाटचाल करू लागला. श्री नानासाहेब गवई हे विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील एक महत्वपूर्ण नेते होते. हे त्यांच्या कार्यावरून आपल्या लक्षात येते.

**शब्द संकेत :भुगावचे अधिवेशन,पारित प्रस्ताव,बहिष्कृत भारत पाक्षिक,डिस्प्रेड इंडिया असोशिएशनचे कार्य**

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना** : एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात अनेक समाजसुधारकांनी समाजसुधारणा कार्यात स्वतःला झोकुन दिले. त्याचप्रमाणेच विदर्भात मागासलेल्या व दिलीत वर्गात सुधारणा व्हावी म्हणुन जानूजी खंडारे, फत्तुजी शेन्डे, देवाजी खोब्रागडे, किसन फागुजी बन्सोड, नानासाहेब गवई, कालीचरण नंदागवळी, हेमचंद्र खांडेकर, श्रीमती जनाबाई चौधरीसह अनेक आंबेडकरवादी नेत्यांनी सतत प्रयत्न केले. त्याचा फायदा होऊन समाजजागृती घडून येण्यास मदत झाली. किसन फगुजी बन्सोड विदर्भातील पहिले दलित नेते असून त्यांच्या सोबत नानासाहेब गवई यांनी कार्य केले होते. 20 व्या शतकाच्या प्रारंभीचा काळ अस्पृश्यांच्या दृष्टीने अतिशय कठीण होता. त्या काळात समाजकार्यात व अस्पृश्योध्दार कार्यात आपले सर्वस्व झोकुन देणारे नेत म्हणजे अमरावती जिल्हयातील भुगावचे श्री नानासाहेब गवई होय.

नानासाहेब उर्फ गणेश आकाजी गवई यांचा जन्म अमरावती जिल्हयातील भुगांव येथे 26 आक्टोबर 1888 रोजी झाला. लहानपणापासूनच त्यांना समाजकार्याची आवड होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलितांसाठीच्या कार्यापासून प्रेरणा घेवून विदर्भातील अनेकांनी सामाजिक कार्यात व दलित आंदोलनात स्वतःला झोकुन दिले. त्यात नानासाहेब गवई एक होते. वयाच्या विसाव्या वर्षी नानासाहेब गवई मुंबईला गेले व श्री विठ्ठल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दलितोध्दाराचे कार्य सुरू केले. त्यांच्यावर विठ्ठल रामजी शिंदे यांचा मोठा प्रभाव होता. जन्म जरी अमरावती जिल्हयात झाला असला तरी नानासाहेबांनी आपल्या कर्याची सुरूवात मुंबईतुन केली. ख्रिश्चन मिशनरी दलितांना अनेक प्रकारची आमिषे दाखवुन त्यांना धर्मांतर करायला लावीत, हे पाहून श्री नानासाहेब गवई यांनी प्रथम या धर्मांतराला प्रतिबंध करण्यासाठी धडाडीने पुढे पाऊल टाकले, व दलित बांधवांना समजाविले, त्याचा चांगला परिणाम होऊन धर्मांतराला मोठया प्रमाणात प्रतिबंध बसला.[1] 1909 मध्ये भुगांव येथे ''महार लायब्ररी'' नावाचे वाचनालय, तर 1910 मध्ये अमरावती येथे ''महार सुधारक मंडळ'' नावाची संस्था काढून विदर्भात दलितोध्दार कार्याला त्यांनी

सुरूवात केली.[2] 1910 मध्ये नानासाहेबांनी प्रार्थना समाजाची दिक्षा घेवून या समाजाची धार्मीक वृत्ती लक्षात घेवून, नानासाहेबांनी ''भजन समाजाची'' निर्मीती केली. या भजन समाजामार्फत त्यांनी जनजागृती घडवुन आणली.[3]

**भुगावचे विशाल अधिवेशन :**इ.स. 1911 मध्ये नानासाहेबांच्या जन्मगावी भुगांव येथे एक विशाल अस्पृश्योध्दारक अधिवेशन भरविण्यात आले. 16,17 आणि 18 मे 1911 असे तिन दिवस अधिवेशन चालले. या अधिवेशनाला विदर्भाच्या निरनिराळया भागातून सुमारे 2500 दलित आले होते. त्याच बरोबर श्री न.भ. द्रविड, श्री लक्ष्मणराव कैकीनी, श्री विठ्ठलराव शिंदे, सौ. जनाबाई शिंदे, रा. बी. महाजनी, श्री ह.ब. पुरचुरे, सौ. इंदिराबाई पुरचुरे, पा. स. केळकर, श्री गोविंदराव काणे, नि.स. भोगले, गजाननराव बेलकर, श्री खळतकर, इ. प्रमुख पाहुणे सुध्दा महाराष्ट्राच्या निरनिराळया भागातून आले होते. हे महार संमेलन श्री चिव्हाजी आकाजी गवई यांच्या अध्यक्ष्यतेखाली यशस्वी पार पडुन त्यात सहा महत्वपुर्ण ठराव पारित करण्यात आले ते पुडील प्रमाणे,

1) आपण व आपली पत्नी यांचे पालन पोषण करण्याची शक्ती, आपणाला व्यवसायाद्वारे/नोकरीद्वारे/उद्योगाद्वारे प्राप्त झाल्याशिवाय कोणीही विवाह करू नये. समाजात बालविवाह होता कामा नये.

2) विवाहाच्या वेळी मुला–मुलींच्या माता–पित्यांनी हुंडा देवु नये.

3) दारू, भांग, गांजा यांचे सेवन करू नये

4) चौथा महत्वपुर्ण ठराव शिक्षणासंबंधीचा होता.

अ) सर्वमाता–पित्याने आपल्या मुलामुलींना नियमितपणे शिक्षण द्यावे.

ब) हिंदुस्तान सरकारने प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करावे.

क) शालेय शिक्षणक्रमात फि वाढविण्याचे नविन नियम आलेले आहे, त्याचा कमीतकमी दलितवर्गावर तरी अनिष्ट परिणाम होणार आहे. त्यामुळे त्या नियमाची अंमलबजावणी करू नये.

5) महार लोक विवाहाच्या प्रसंगी शक्तीबाहेर खर्च करतात. त्याकरीता त्यांना कर्ज काढावे लागते. त्यांनी या सवयीचा त्याग करावा. शेतकरी लोकांकरीता सरकारी बॅकाप्रमाणे, सहकारी बॅका स्थापन कराव्यात.

6) जाती–जातीत जी द्वेषभावना आहे ती नष्ट करून लोकांनी समाजात एकोपा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करावा.

या परिषदेत स्पृश्य आणि अस्पृश्य नेते सामील झाले असल्याने समाजावर त्याचा चांगला परिणाम झाला.[4] इ.स. 1914 मध्ये अमरावती येथे नानासाहेबांनी ''बहिष्कृत भारत'' नावाचे एक पाक्षिक पत्रक काढून विदर्भातील दलित वर्गात जनजागृती व समाजसुधारणा घडवून आणली.[5] भारताला स्वराज्याचे अधिकार देण्यासंबंधी चर्चा करण्यासाठी मॉन्टेग्यू भारतात येणार म्हणून निरनिराळे पक्ष आपापल्या मागण्या मांडण्यासाठी तयारी करीत होते. हाच दृष्टीकोण सामोर ठेवून 1917 मध्ये ''डिप्रेस्ड इंडीया असोसीएशन'' नावाची संस्था स्थापन करून या संस्थेमार्फत काय मागण्या मांडावयाच्या याविषयी लोकांमध्ये जनजागृती करण्याची जबाबदारी नानासाहेब गवई यांच्यावर सोपविण्यात आली होती. 'डिप्रेस्ड इंडीया असोसिएशन' च्या वतीने मॉन्टेग्यू–चेम्स फोर्ड यांच्याकडे सादर करावयाचा मेमोरंडम तयार करून, एक शिष्टमंडळ तयार करण्यात आले, या शिष्टमंडळात कोल्हापूरचे राव बहादुर, नागपूर भागातील किसन फागुजी बन्सोड तर अमरावतीचे नानासाहेब गवई आणि वासनिक यांचा समावेश होता. या शिष्टमंडळाने मेमोरंडम सादर करून राजकरणात दलितांना वाटा मिळवा अशी मागणी केली. त्यानंतर सरकारने कमेटीची स्थापना केली, त्या कमेटीसामोर नानासाहेब गवळी यांनी भक्कमपणे दलितवर्गाची बाजू मांडली. या सर्व प्रयत्नांना शेवटी यश आले आणि 70–72 सदस्य असलेल्या मध्यप्रांत–वऱ्हाडच्या कायदेमंडळात डिप्रेस्ड क्लासेसच्या दोन दलित सदस्यांना म्हणजे श्री नानासाहेब गवई व गोंदीयाचे श्री कालीचरण नंदागवळी यांना घेण्यात आले.[6] श्री नानासाहेब गवई 1920 ते 1945 पर्यंत सतत 25 वर्षे मध्यप्रांत–वऱ्हाड असेंब्लीचे गव्हरर्नर नियूक्त सभासद होते. या काळात त्यांनी दलितोध्दाराचे भरीव कार्य केले. 1934 मध्ये असेंब्लीत अस्पृश्यता निवारण बिल आणले, व ते पास करण्यात आले. हयाचे श्रेय निश्चितच नानासाहेब गवई यांना जाते. त्याचबरोबर त्यांनी कुळाला शेती ही पाच वर्षासाठी देण्यात यावी, मालगुजारी नष्ट करण्यात यावी, द्विभार्या प्रतिबंध कायदा इं. प्रश्नांना कायदेमंडळात त्यांनी वाचा फोडली व काही प्रमाणात कायदा करण्यात त्यांना यश सुध्दा आले.[7] दलितोध्दाराच्या ह्या कार्याला त्यांना असेंबलीतील कालीचरण नंदागवळी यांनी मोठी मदत केली. त्याचबरोबर नानासाहेब गवई यांनी दलितांच्या विकासाचा दृष्टीकोन, साऊथ बरो कमेटी, लोथीयन कमेटी, सायमन कमिशन इ. कमिशन समोर सुध्दा मांडला.[8] नानासाहेब गवई काही काळ नागपूर विद्यापिठाचे सभासद असल्याने, त्यांनी विद्यापीठातील दलित व मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या संबंधीचे अनेक प्रश्न सोडवून, येणाऱ्या समस्यांचे निराकरण केले. नानासाहेबांना आपल्या दलित बांधवाबद्दल अतिव आदर असून, दलित समाजात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक जागृती होवून त्यांचा विकास व्हावा. तसेच राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात सुध्दा दलित वर्गाने उंच

शिखर गाठावे असे वाटत होते.[9] अशा प्रकारे नानासाहेब गवई यांनी सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात फार महत्वपूर्ण कार्य करून, आपल्या दलित बांधबांना त्यांच्या अस्मितेची जाणिव करून दिली. ही गोष्ट सर्वांनी मान्य केली आहे. विदर्भातील त्यांचे हे कार्य लक्षात घेऊन नानासाहेब गवई हे विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील एक महत्वपूर्ण नेते होते असेच म्हणावे लागेल.

**निष्कर्ष** :विदर्भातील आंबेडकर चळवळीतील नेते श्री नानासाहेब गवई यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे दलित व मागासलेल्या वर्गात जागृती घडुन येऊन, हा वर्ग विकासाच्या दिशेने वाटचाल करू लागला. त्याच बरोबर मध्यप्रांत–वऱ्हाड कायदेमंडळात दलित व मागासवर्गाच्या समस्या मांडुन, काही प्रमाणात कायदे करण्यात नानासाहेब गवई यांना यश आले. ह्याचा फायदा निश्चितच दलित व मागासलेल्या वर्गाला होऊन ह्या वर्गाची प्रगती घडून येण्यास मदत झाली.

संदर्भ

1) आधुनिक विदर्भाचा इतिहास ले. डॉ. श.ग. कालारकर, मंगेश प्रकाशन नागपूर पृ.क्र. 518,519
2) गणेश आकाजी गवई व्यक्ती आणि कार्य : ले. ना.रा. शेंडे, प्रकाशन, युगांतर शिक्षण संस्था नागपूर 1968, पृ.क्र 13
3) आधुनिक विदर्भाचा इतिहास ले. डॉ. श.ग. कालारकर, मंगेश प्रकाशन नागपूर पृ.क्र. 518
4) कित्ता पृ.क्र. 515,516
5) गणेश आकाजी गवई व्यक्ती आणि कार्य : ले. ना.रा. शेंडे, प्रकाशन, युगांतर शिक्षण संस्था नागपूर 1968, पृ.क्र 13
6) आधुनिक विदर्भाचा इतिहास ले. डॉ. श.ग. कालारकर, मंगेश प्रकाशन नागपूर पृ.क्र. 518
7) आंबेडकरी चळवळीचा इतिहास, ले. प्रदिप ढाले, प्र.आ.बहुजन साहित्य प्रसार केंद्र नागपूर 2017 पृ.क्र 36
8) आधुनिक विदर्भाचा इतिहास ले. डॉ. श.ग. कालारकर, मंगेश प्रकाशन नागपूर पृ.क्र. 519
9) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत नागपूर शहराचे योगदान, ले. कृष्णकांत डोंगरे प्र.आ. बहुजन साहित्य प्रसार केंद्र नागपूर 2012 पृ.क्र 100

# महात्मा कालीचरण नंदागवळी यांचे आंबेडकरी चळवळीतील योगदानाचें ऐतिहासिक विश्लेषण

**प्रा. पंकज वामन मून**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
श्रीसाईबाब लोकप्रबोधन आर्ट्स कॉलेज वडनेर,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा

---

**सारांश :–**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीकारी मानवमुक्तीच्या लढ्याात विदर्भाच्या पुण्यभुमीला वगळता येणे कठिण आहे. विदर्भाच्या इतिहासातील :महात्मा' म्हणून ज्यांचा गौरव केला जातो त्या कालीचरण नंदागवळी यांनी आपल्या कार्याने डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वातील चळवळीची पूर्व तयारी करुन ठेवणाऱ्या विदर्भातील आंबेडकरपूर्व दलित नेतृत्वापैकी एक होते. त्यांनी आपल्या कार्याचा ठसा विदर्भातील नव्हे तर महाराष्ट्राच्या समाजमनावर उमटला आहे. विदर्भातील जितक्या प्रमुख संस्था, सभा, संमेलने व परिषदा झाल्या. त्या सर्वांशी त्यांचा संबध आला. गोंदिया येथे स्वःखर्चाने मुलींच्या शाळा, दलित वृत्तपत्रांना आर्थिक मदत, गोंदिया येथे प्रेसची स्थापना, प्रांतीक कौसीलात दलितांचे शिक्षण, दलित वसतीगृहांना सरकारी अनुदान, सार्वजनिक विहिरी, धर्मशाळा यांचा सार्वजनिक उपभोग घेण्याचा हक्क, सरकारी नोकरीत दलितांचा प्रवेश इत्यादी बाबत त्यांनी कसोशीने प्रयत्न केलेत. कालीचरण नंदागवळी यांच्या दलितोद्धार कार्याने विदर्भातील दलित चळवळीला गती प्राप्त झाली. दलित चळवळीतील त्यांचे कार्य महत्वपूर्ण आहे.

**शब्दसंकेत :–** कालीचरण नंदागवळी, मुलींची शाळा, भारतीय महार पंचायत, अखिल भारतीय अस्पृश्य परिषद, मध्यप्रांत वऱ्हाड प्रांतीक कौसील

**संशोधन पद्धती** : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

.**कालीचरण नंदागवळी यांचे प्रारंभिक जीवन :–**विदर्भात डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वातील चळवळीची पुर्वतयारी करुन ठेवणाऱ्या दलित नेत्यांमध्ये कालीचरण नंदागवळी यांचे कार्य महत्वपूर्ण आहे. कालीचरण नंदागवळी हे गोंदिया येथिल रहिवासी असून "त्यांचा जन्म 1883 साली भंडारा जिल्ह्यातील बोथली (लांजी) येथे एका सदन कुटुंबात झाला."[1] कालीचरण नंदागवळी हे भंडारा जिल्ह्यातील एक सधन मालगुजार व गोंदिया म्युनिसिपल कमेटिचे सदस्य होते. यांनी आपले माध्यमिक शिक्षण गोंदिया येथे पूर्ण केले. शिक्षण घेत असतानाच आपल्या अस्पृश्य बांधवाची दीन अवस्था त्यांच्यावर केले जाणारे अमानुष अत्याचार पाहून हदय द्रवले होते व म्हणून जीवनाच्या सुरुवातीच्या काळातच त्यांना सामाजिक व शैक्षणिक कार्याला सुरुवात केली. ते महानुभवपंथीय, शुद्ध शाकाहारी आणि आध्यात्मिकता जोपासणारे गृहस्थ होते.

**कालीचरण नंदागवळी यांचा दलितोद्धार :–**शिक्षणाच्या अभावामुळे अस्पृश्य समाजावर ही स्थिती आली आहे हे ओळखून "1910 साली गोंदिया येथे सर्वप्रथम मुलींसाठी शाळा सुरु केली." तर अस्पृश्य समाजात अंधकाराचे जे भयानक साम्राज्य पसरलेले होते ते दूर करुन त्यांना ज्ञानाचा प्रकाश मिळावा म्हणून उदय वाचनालयाची स्थापना केली. सोबतच दलित वर्गाच्या समस्या दू करण्याकरिता किसन फागोजी बनसोडे यांनी सुरु केलेल्या 'विटाळ विध्वसंक', चोखामेळा हे पत्रे चालविण्यास हातभार लावला यासाठी त्यांनी गोंदियाला एका प्रेसची स्थापना केली"[3] सन 1913 साली नागपूर येथे भरलेल्या महार परिषदेचे ते उपाध्यक्ष होते. सन 1914 साली त्यांनी 'भारतीय महार पंचायत' नावाची संस्था स्थापन करुन त्या संस्थेद्वारा इ. स. 1916 मध्ये अस्पृश्यता निवारणाच्या दृष्टीने एक जंगी परिषद भरविली. 23, 24 मार्च 1918 रोजी श्रीमंत सर सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत फ्रेंच पुलाच्या प्रांगणात भरलेल्या पहिल्या अस्पृश्य निवारक परिषदेत ठरावाच्या समर्थनात कालीचरण नंदागवळी यांनी भाषण दिले. मे 1920 मध्ये नागपूर येथे 'अखिल भारतीय अस्पृश्य परिषद' नागपूरला कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली भरली. या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरही उपस्थित होते. या परिषदेचे स्वागताध्यक्षीय भाषणात अस्पृश्यांच्या समस्यांची कैफियत मांडली. "ते म्हणाले, अस्पृश्यांना पशूप्रमाणे वागविण्यात येते, हिंदुस्थानात एकंदर एकपंचमांश म्हणजे सहा कोटी लोक अस्पृश्य गणले जातात. आमच्यात चोखामेळा सारखे महासंघ निजपले, मग आम्ही अस्पृश्य का? आमच्या शोर्याविषयी तर सरकारची खात्री पटली आहे. अकार्टच्या व कोरेगावच्या लढाईत सरकारला अस्पृश्य जातीनेच मदत केली. म्हणून हिंदूनी अमेरिकेची गुलामगिरी नष्ट केली. त्याप्रमाणे ही अस्पृश्यसुद्धा घालविण्याचा प्रयत्न करा. असा विचार मांडला."[4] तर दरवर्षी अशीच परिषद भरविण्यास कायम फंड असावा म्हणून श्री. कालीचरण नंदागवळी यांनी 1000 रुपयांची देणगी दिली होती. नागपूरातील

तरुण युवकांनी सन 1916 ला 'मध्यप्रांत तरुण महार संघ' स्थापन केला होता. यामध्ये त्यांनी सहभाग घेऊन संघटन कौशल्य सुद्धा दाखविले होते.

**राजकीय मंचावरुन कालीचरण नंदागवळी यांचे कार्ये :–**

सन 1914 साली कालीचरण नंदागवळी गोंदिया नगरपरिषदेचे सदस्य व 1916 ला अध्यक्ष म्हणून निवडून आले. "नगरपरिषदेचे सदस्य असतांना त्यांनी अस्पृश्य वस्त्या करीताच नव्हे, तर दुर्लक्षित अशा भंगी समाजाकरिता विशेष कार्य केल्यामुळे भंगी समाजातर्फे त्यांना 1923 साली मानपत्र अर्पण करण्यात आले."[5] 1919 च्या मॉटेग्यूं चेम्सफोर्ड कायद्याने दलतांना कौन्सिलांत प्रतिनिधीत्व मिळताच मध्यप्रांत वऱ्हाडाच्या प्रांतिक कौन्सिलमध्ये ग. भा. गवई व कालीचरण नंदागवळी यांची सरकारतर्फे नियुक्ती करण्यात आली होती. 1920 ते 1923 या काळात त्यांनी दलितांचे शिक्षण, दलित वसतीगृहांना सरकारी अनुदान, सार्वजनिक विहिरी, धर्मशाळा यांचा सार्वजनिक उपयोग घेण्याचा हक्क, सरकारी नोकरी दलितांना प्रवेश इत्यादी बाबत कसोशिने प्रयत्न केलत. "सार्वजनिक विहिरी, बावडी, तिर्थस्थळातील स्नानांचे घाट व सराई यांचा वापर करण्याचा अस्पृश्यांना इतरांच्या बरोबरीने हक्क असावा असा ठराव श्री. कालीचरण नंदागवळी यांनी 13 ऑगस्ट 1923 रोजी कौन्सिलमध्ये मांडला व ग. भा. गवई यांनी पाठींबा दिला."[6] नंदागवळीचे विधिमंडळातील अस्पृश्योद्धाराचे कार्य पाहून त्यांना 1932 च्या परिषदेचे स्वागताध्यक्ष नेमले. मात्र महात्मा गांधी असहकार आंदोलन सविनय कायदेभंग आणि मिठाच्या सत्याग्रहात सहभाग घेतल्याने कालीचरण नंदागवळी यांना स्वागताध्यक्ष पदावरुन काढले व तुलाराम साखरे यांची निवड करण्यात आली. परंतु तरीही त्यांनी आपल्या समाज सुधारणेच्या कार्याची गती मात्र कधीही कमी होऊ दिली नाही.

सन 1930 पासून ते बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित वर्ग परिषदेचे अध्यक्ष होते. तर स्वतंत्र मजुर पक्षाच्या बिडी संघटनेचे देखिल ते अध्यक्ष होते. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित फेडरेशन, स्वतंत्र मजुर पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशनमध्येही त्यांनी काम केले मात्र काही नेत्यांमधील वैचारिक मतभेदामुळे त्यांनी राजकीय निवृत्ती घेतली. मात्र नंदागवळींनी मध्यप्रांत वऱ्हाडच्या विधिमंडळात केलेले कार्य कुणीही विसरणार नाही. त्यांनी संमत केलेल्या ठरावामुळे येथिल अस्पृश्य त्यांच्या व कार्यकर्त्यांच्या राजकीय सत्ता प्राप्त करण्यासंबंधीच्या आशा पल्लवित झाल्या हे मान्य करावे लागेल.

**मुल्यांकन** :समग्र अस्पृश्य जातीच्या हिताकडे त्यांचे लक्ष असे पुढे त्यांना मध्यप्रांतातील जनता महात्मा नंदागवळी' म्हणु लागले. कालीचरण नंदागवळी यांचा पिंड हा समाजसेवेचा होता. दलित वर्गाच्या सुधारणेसाठी त्यांनी मोलाचे कार्य केले. कालीचरण नंदागवळी हे विदर्भातील दलित चळवळीचे आधारस्तंभ बनले. विदर्भातील जितक्या प्रमुख संस्था, सभा, संमेलने व परिषदा झाल्या. त्या सर्वांशी त्यांचा संबध आला. गोंदिया येथे स्वःखर्चाने मुलींच्या शाळा, दलित वृत्तपत्रांना आर्थिक मदत, गोंदिया येथे प्रेसची स्थापना, प्रांतीक कौसीलात दलितांचे शिक्षण, दलित वसतीगृहांना सरकारी अनुदान, सार्वजनिक विहिरी, धर्मशाळा यांचा सार्वजनिक उपभोग घेण्याचा हक्क, सरकारी नोकरीत दलितांचा प्रवेश इत्यादी बाबत त्यांनी कसोशीने प्रयत्न केलेत. कालीचरण नंदागवळी यांच्या दलितोद्धार कार्याने विदर्भातील दलित चळवळीला गती प्राप्त झाली. दलित चळवळीतील त्यांचे कार्य महत्वपूर्ण आहे.

**संदर्भ सूची :–**

1)नगराळे, मोहन, 'विदर्भातील दलित चळवळ (डॉ. आंबेडकरांच्या महानिर्वानापर्यंत)', प्रकाशक डॉ. प्रदिप हाडके, नागपूर, प्र. आ. 2015, पृ.क्र. 88.

2)ढोले, प्रदिप, 'आंबेडकरी चळवळीचा इतिहास', बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, प्र. आ. 2017, पृ. क्र. 78.

3)कोसारे, एच. एल., 'विदर्भातील दलित चळवळीचा इतहास', नेहा प्रकाशन, गुरुनानकपूरा, नागपूर, पृ. क्र. 491.

4)पूर्वोक्त पृ. क्र. 89.

5)पूर्वोक्त पृ. क्र. 68.

6)मून, वसंत, 'मध्यप्रांत वऱ्हाडातील आंबेडकरपूर्व दलित चळवळ', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, 1978, पृ. क्र. 47.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विदर्भातील सांगाती - रेवाराम विठोबा कवाडे

डॉ. यशवंत व्ही.पाटील
प्राचार्य
डॉ. मधुकरराव वासनिक
पी.डब्ल्यू.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

**सारांश** :डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनकार्य ऐतिहासिक दृष्टया फारच मोलाचे आहे. भारताच्या सर्वागीण प्रगतीसाठी आणि जनसामान्याच्या उद्धारासाठी त्यांनी वेचलेले संपूर्ण जीवन हे भारतीय इतिहासाचे तेजस्वी पर्व आहे किंबहुना मानवी स्वातंत्र्याच्या इतिहासाचे ते एक सोनेरी पाण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत विदर्भ प्रांताचे योगदान महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्राची उपराजधानी म्हणून विदर्भ प्रांतातील नागपूर शहराला फार मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ आज ज्या भक्कम पायावर उभी आहे. ती मुख्यत विदर्भातच, याचे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नागपूर शहर, शहरातील कार्यकर्ते यांचे फार मोठे पाठबळ होते. आणि येथील जनतेवर त्यांचा पूर्ण विश्वास होता. आजही सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक या चळवळीचे केंद्रबिंदू म्हणून विदर्भातील नागपूर व नागपूर शहरातील आंबेडकरी कार्यकर्ते यांच्या कामाची दखल घेतली जाते.

१९ व्या शतकाच्या शेवटच्या काळात या विभागातील काही लोक इंग्रजी शिक्षण घेऊन तयार झाले होते. त्यांना पदोपदी येत असलेल्या अस्पृश्यतेच्या सामाजिक, धार्मिक व आर्थिक बंधनाची जाणीव ही त्यांच्या नवीन विचारांना बैचेन करीत होती. महार  पंचायतीचे पुढारी, साधू संत संन्यासी, कोतवाल आणि शेटे मंडळींनी तयार केलेल्या मनो दृ भूमिकेतून तत्कालीन शिकलेल्या नवयुवकांनी तसेच समाजिक कार्यकर्त्यांनी अस्पृश्य समाजाचे पुढारीपण आपल्या हाती घेतले, फलस्वरूप विदर्भातील दलित चळवळीचे आधारस्तंभ हीच मंडळी आंबेडकरोत्तर काळात ठरली.

विदर्भातील पहिल्या पिढीचे दलित गिरणी कामगार, शिक्षक, रेल्वे कामगार, मालगुजार इत्यादी क्षेत्रात निष्ठेने आणि प्रमाणिकपणे आपले योगदान देत होते. त्यातीलच एक आंबेडकरी व्यक्तिमत्व म्हणून रेवारामजी कवाडे नव्या पिढीला माहित करून घेणे गरजेचे आहे. रेवारामजी कवाडे हे आंबेडकरपूर्व काळापासून ते आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतरही दलित चळवळीला डॉ. आंबेडकरांच्या विचार आणि धोरणाने पुढे नेणारे वैदर्भिय दलित नेते म्हणून ओळखले जातात.

**शब्द संकेत** :सिद्धार्थ मिल मजदुर संघ,नागपूर गिरणी मजुर संघ,स्वतंत्र्य मजुर पक्षतील कार्य व समता सैनिक दल.

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना** : रेवारामजी कवाडे यांचा जन्म १८९८ ला विठोबाजी कवाडेंच्या घरी नागपूर येथे झाला. त्यांनी इम्प्रेस मिलमध्ये गिरणी कामगार म्हणून काम सुरु केले. यादरम्यान कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी 'सिद्धार्थ मिल्स मजदूर संघाची' निर्मिती केली. नागपूर एम्प्रेस मिलमध्ये काम करणाऱ्या अस्पृश्य स्त्रियांच्या बदमाश गुंडापासून बचाव करण्यासाठी 'श्री रेवारामजी कवाडे यांनी महार तरुणांबरोबर विचार विनिमय करून नागपूर येथे १९२६ मध्ये 'मध्यप्रांतीय तरूण महार संघाची' स्थापना केली. तरूण महार संघाच्या रेवाराम कवाडे, तुलाराम साखरे, दौलत बारसे या कार्यकर्त्यांनी महार दिंडी काढून नागपुरातील प्रमुख देवळामध्ये प्रवेश केला. तो तरूण महार संघाचा एकदिवशीय लॉगमार्च होता. त्यांनी या गिरणी मजूर संघाच्या स्थापने पासून १९४४ ४५ सालापर्यंत पदाधिकारी म्हणून कार्य केले.[१]

विदर्भातील दलित चळवळीला प्रेरक ठरणारी घटना म्हणजे नागपुरात टाटांनी १८७७ साली सुरु केलेल्या एम्प्रेस मिल्स ही होय. या एम्प्रेस मिल्समध्ये अस्पृश्य कामगारासाठी घरे, शाळा बांधून दिल्या. नंतर कामगाराच्या प्रश्नाकडेही लक्ष पुरविले. पंडित रेवाराम कवाडे हे एक मजुराचे नेते असल्याने ते मजुरांच्या समस्या सोडविण्यात पुढाकार घेत असत. १९२७ ला 'नागपूर गिरणी मजूर संघ' स्थापन करण्यात आला.[२] त्यात रेवाराम कवाडे एक कार्यकर्ते होते. नागपुरातील मजूर चळवळ अड. आर. एस. रुईकर यांच्या मार्गदर्शनाने चालत असे. मात्र रुईकरांनी मजुरांची चळवळ ही राष्ट्रीय कॉंग्रेसच्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न केल्याने रेवाराम कवाडे, सीताराम हाडके, विठ्ठल साळवे इत्यादी मजूर

कार्यकर्त्यांनी रुईकरांचा विरोध करायला सुरवात केली. १९४० मध्ये मॉडेल मिलमध्ये तीन महिने संप घडून आला असता पण या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी लेबर डायरेक्टर पी. के. सेन यांनी रेवाराम कवाडेना चर्चेसाठी बोलाविले. त्यात रेवाराम कवाडेनी महार मजुरांच्या समस्या सोडविण्यासाठी कार्य आणि उपयायांची चर्चा केली.३ या कामगार चळवळीमध्ये रेवाराम कवाडेनी कामगार संघटना स्थापून त्यातील दलितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समता आंदोलनात एकत्रित करण्याचे कार्य केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाने प्रभावित झालेले रेवाराम कवाडेनी मध्यप्रांतात त्यांच्या राजकीय संघटनाचे मजबुतीकरण केले. १९३६ ला हरदास एल. एन यांच्या निधनानंतर विदर्भातील दलित चळवळीचे छत्र हरपले असता रेवाराम कवाडेनी आपल्या कार्य कर्तुत्वाने विदर्भातील दलित चळवळीचा आधार भक्कम केला. रेवाराम कवाडेनी स्वतंत्र मजूर पक्ष येथे वाढविला. मार्च १९३६ ला हरदासंच्या निधनामुळे रिकाम्या झालेल्या नागपूरच्या जागेची पोटनिवडणूक ठरली. रेवाराम कवाडेनी या जागेसाठी स्वतंत्र मजूर पक्षातर्फे हरदास बाबूंचे जिवलग मित्र गौरीशंकर गजबे यांना तिकीट देण्याचे सुचविले. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या जागेसाठी गोविंदराव मेश्राम यांचे नाव पुढे केल्याने रेवाराम कवाडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविलेल्या नावाला अनुमोदन देऊन त्यांच्यासाठी प्रचारकार्य केले. रेवाराम कवाडेनी आपला अहंभाव बाजूला सारून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाला पूर्ण निष्ठेने स्वीकारले.[४] त्यांनी दौलतराव बारसे, सीताराम हाडके, विठ्ठलराव साळवे यांच्यासारख्या सहका—याना हाती घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मिशन येथे परिणामकारक रीतीने चालविले.

रेवारामजी कवाडे यांनी स्वतंत्र मजूर पक्षाचे कार्यवाह म्हणून उल्लेखनीय कार्य केले. १९३६ च्या प्रांतीय निवडणुकीत पक्षाच्या प्रचाराचे मोठे कष्टाचे काम त्यांनी केले. स्वतंत्र मजूर पक्षाचे पाच उमेदवार निवडून आणले. त्यांनी दशरथ पाटील यांनी सुरु केलेल्या 'समता' या साप्ताहिकांचे मुख्य संपादक म्हणून काही काळ काम केले. तसेच सिद्धार्थ वसतिगृह, रमाबाई वसतिगृह स्थापन करून अस्पृश्य बांधवांच्या मुला—मुलींच्या शिक्षणाची सोय केली. १९४२ ला नागपूर येथील अखिल भारतीय बहिष्कृत परिषदेत स्वंतत्र मजूर पक्ष बरखास्त करण्यात येवून 'शेड्युल कास्ट फेडरेशन' हा नवा पक्ष स्थापना करण्यात आला. त्या परिषदेचे रेवाराम कवाडे हे सरचिटणीस होते.[५] डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रेमाराम कवाडे यांचा अतिशय जवळचा संबंध असल्याचे दिसते.

हिंदुस्थान देशातील हजारो वर्षाच्या इतिहासातील परममंगल असा भाग्याचा दिवस २० मार्च १९२७ हा होय. अस्पृश्याच्या या धर्म संग्रामात नागपूर शहरातून रेवाराम कवाडे, किसन फागोजी बनसोड, कालीचरण गणुजी नंदागवळी, विठोबा रावजी मूनपांडे, रामचंद्र डोमाजी वासनिक या सारखे अनेक कार्यकर्ते आपल्या शेकडो सोबत्यासह दूरवरच्या महाड येथील 'चवदार तळ्याचे पाणी' चाखण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बरोबर प्रत्यक्ष हजर होते. त्यांच्या सोबत स्त्री कार्यकर्ता तुळसाबाई बनसोड, जाईबाई चौधरी, राधाबाई कांबळे, रुक्मिणीबाई नारायणे यांचा सुद्धा संबंध होता.

नागपूर शहरातील महार नव तरुणांनी या आर. एस.एस संघटनेच्या सामाजिक द्वेषमूलक भावनेला शह देण्याकरिता 'समता सैनिक दलाच्या शाखा' आपल्या महार वस्त्या वस्त्यात सुरु केल्या. त्याच बरोबर सार्वजनिक आखाडे सुरु झाले. रेवारामजी कवाडे यांनी तरूण कार्यकर्ते आपल्या घराजवळील पटांगणात दररोज गोळा करून समाजात समता सैनिक दलाबद्दल जनजागृती करीत होते. 'आपण येथील भारतीय मातीची खरी लेकरे आहोत, येथील जमीन आपले अंथरून असून संपूर्ण निळे आकाश आपले पांघरून आहे.' अशी भावना रेवाराम कवाडे यांनी नागपुर शहरातील तत्कालीन महार तरूण मंडळीसमोर व्यक्त केली. तरूण मंडळी रेवाराम कवाडे यांच्या नेतृत्वात एकत्र येत एका काठीला ' निळा झेंडा' लाऊन त्या निळ्या झेंडयाखाली एकत्र होऊ लागली होती. अस्पृश्य वर्गाची अस्पृश्यता घालवायची असेल तर त्या करिता सामर्थ्य प्राप्त केले पाहिजे आणि असे सामर्थ्य तरुणांनी संघटीत झाल्याशिवाय प्राप्त होणार नाही, ह्याची जाणीव ज्या महार तरुणांना त्या काळी झाली. त्यांनी निळ्या झेंड्याखाली समता सैनिक दलाच्या शाखा आपल्या वस्त्यात लावण्यास सुरवात केली. पुढे ते अस्पृश्याच्या स्वाभिमानाचे प्रतीक झाले.

अस्पृश्य वर्गाची अस्पृश्यता घालवायची असेल आणि त्यांना सर्वसामान्य हिंदू नागरिकाप्रमाणे सामाजिक अधिकार पाहिजे असतील तर त्यांना समाजिक स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. हे डॉ आंबेडकरांचे विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी नागपूर शहरात अखिल भारतीय डिप्रेस्ड क्लासेस मिशनद्वारा

कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली दलित समाजाच्या निरनिराळ्या संघटना बांधण्याचे कार्य चालू होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाला राजकीय हक्क मिळवून देण्याकरिता आटोकाट प्रयत्न चालविला होता. त्याची जाणीव करून देण्याकरिता तसेच सामाजिक हक्का विषयी जागृती करण्याकरिता मध्यप्रांत दलित फेडरेशनने नागपूर शहरात प्रचार सभेचे कार्यक्रम हाती घेतले होते. त्यात प्रामुख्याने रेवाराम कवाडे यांची महत्वाची भूमिका होती[६] याव्यतिरिक्त शंकरराव मेश्राम, विठ्ठलराव साळवे, रामचंद्र दुधे, लक्ष्मण नारायणे, विनायक चंगोले इत्यादी कार्यकर्ते सहभागी होती.

नागपूर शहरात 'सैनिक' योगदानात रेवाराम कवाडे यांचे काम अतुलनीय आहे. नागपूर शहरात डिस्ट्रीक वार कमिटी सरकारी आदेशाने येथील सिटी मजिस्ट्रेट 'आर.एस.एस.आर.मुरे' यांच्या अध्यक्षतेखाली दि. १६ आक्टोंबर १९४१ ला अस्तित्वात आली. त्यास 'महार रेकमेंट बोर्ड' असेही म्हणत असत. या बोर्डद्वारे नागपूर शहर आणि कामठी येथे मोठया प्रमाणावर 'महार' सैनिकांची भरती करण्यात आली.[७] या महार रिक्रयुमेंट बोर्डात रेवाराम कवाडे एक सदस्य म्हणून काम बघत होते. त्याच्या कामाची दखल घेत पुढे त्यांची निवड समितीवर वर्णी लावण्यात आली.

सन १९४१ ४२ हे वर्ष अनेक राजकीय घडामोडींचे ठरले. भारतातील विविध घटकांना राजकीय सत्तेत सहभागी करून घेण्याची योजना घेऊन २२ जानेवारी १९४१ ला क्रिप्स कमिशन आले. क्रिप्स कमिशनचा मुस्लीम लीग बरोबरच राष्ट्रीय कॉंग्रेसनेही विरोध करून फेटाळला. क्रिप्स कमिशन दलितविरोधी असून त्याने अस्पृश्य समाजाचा घात केला म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही याचा निषेध केला. क्रिप्सने जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रश्न केला की तुम्ही मजुरांचे की अस्पृश्यांचे प्रतिनिधी? तेव्हा ते म्हणाले अमेरिकेतील निग्रोपेक्षाही हिन येथील अस्पृश्यांना वागविले जाते म्हणून अस्पृश्यांच्या हक्कांकरिता लढू नये काय? तेव्हापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतातील सर्व अस्पृश्यांच्या एक मध्यवर्ती राजकीय पक्ष काढण्याची गरज भासू लागली. याच विचारातून त्यांनी दिल्ली येथे ३० व ३१ मार्च १९४२ ला प्रांतनिहाय अस्पृश्य नेत्यांची सभा आपल्याच निवासस्थानी बोलाविली होती. या सभेसाठी मध्यप्रांतातून रेवाराम कवाडे, हि. ल. कोसारे, दशरथ पाटील यांना सभेसाठी बोलाविले होते. या सभेत नागपूर येथे जुलैमध्ये एक परिषद आयोजित करण्याचे ठरले, तेथे 'शेड्युल कास्ट फेडरेशन' या पक्षाची स्थापना करण्यात येईल असा ठराव पारित करण्यात आला.[८] यामध्ये रेवाराम कवाडे सरचिटणीस पदावर कार्यरत होते. मध्यप्रांतातील नेत्यांनीही व्यवस्था करावी असे ठरले होते. मध्यप्रांताची संपूर्ण जवाबदारी त्यावेळी रेवाराम कवाडे यांनी स्वतःच्या खांद्यावर घेतली. व ती यशस्वीरित्या पार पाडली. या साठी नागपुरातील कस्तुरचंद पार्कवर मोठ्या योजनाबद्द पद्धतीने करण्यासाठी रेवाराम कवाडे यांनी परिश्रम घेतले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची दीक्षा नागपूरलाच घ्यावी यासाठी पुढाकार घेणाऱ्याच्या यादीत रेवाराम कवाडे यांचे नाव अग्रक्रमावर होते. बौद्ध धम्माची दीक्षा नागपूरलाच का ? यावर रेवाराम कवाडे म्हणतात 'नागपूर ही नागवंशीय लोकांची भूमी आहे. आणि नागवंशीय लोक या भारतातील मूलनिवासी आहेत. त्यामुळे या ऐतिहासिक भूमीवर हा ऐतिहासिक सोहळा व्हावा.' अशी त्यांची मनोकामना होती. ती मनोकामना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पूर्ण केली. या गोष्टीबद्दल त्यांना सार्थ अभिमान वाटत होता. या बौद्ध धम्म सोहळ्यात त्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबतीला बौद्ध धम्माची दीक्षा घेणाऱ्या व्यक्तीच्या यादीत त्यांचे नाव घेतले जाते. विशेष म्हणजे त्यांनी या सोहळ्यासाठी अहोरात्र कष्ट उपसले होते. १९३५ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जिल्हा नाशिक येथील येवले मुक्कामी धर्मांतराची घोषणा केली. तेव्हापासून रेवाराम कवाडे यांनी विदर्भातील खेड्यापाड्यात जाऊन सभा, संमेलने व जयंती कार्यक्रम आयोजित करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेला पाठिंबा जाहीर करणारी भाषणे करून त्याबाबत अस्पृश्य समाजात जागृती आणली. नंतर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करणारी धम्मदीक्षा सोहळा नागपूर येथे घडवून आणण्यात रेवाराम कवाडे यांचा मौलाचा वाटा आहे. यावरून रेवाराम कवाडे हे पुरोगामी विचारांचे एक आदर्श दलित नेते होते हे दिसून येते. रेवाराम कवाडे यांचे कार्य आणि विचार आजच्या काळातही तरूण आंबेडकरी पिढीला व चळवळीला महत्वाचे व मार्गदर्शक ठरणारे आहेत.

**निष्कर्ष -**

१. रेवाराम कवाडे हे विदर्भातील आंबेडकरपूर्व काळापासून तर आंबेडकरांच्या महापरीनिर्वाणानंतरही दलित चळवळीला डॉ. आंबेडकरांच्या विचार आणि धोरणाने पुढे घेऊन जाणारे वैदभीय दलित नेते होते.
२. विदर्भातील पहिल्या पिढीचे दलित गिरणी कामगार, शिक्षक, रेल्वे कामगार, मालगुजार इत्यादी क्षेत्रात निष्ठेने आणि प्रमाणिकपणे आपले योगदान देत त्यांनी आपल्या कार्याची प्रचीती समाजाला दिली.
३. स्वतंत्र मजूर पक्ष, आल इंडिया डिप्रेस्ड क्लास फेडरेशन, समता सैनिक दल, सिद्धार्थ मजूर पक्ष, नागपूर गिरणी मजूर संघर्ष या सारख्या संघटन बांधणीत रेवाराम कवाडे यांचे योगदान अभूतपूर्व आहेत.
४. रेवाराम कवाडे यांनी कधीही कोणत्याही पदाची लालसा मनात निर्माण होऊ दिली नाही. उलट आपल्या सहकारी बांधवांना पुढे करत त्यांच्या हातात नेतृतावाची धुरा दिली. व त्यांच्या सोबत काम करत राहिले. यावरून त्यानी डॉ. आंबेडकरांचे मिशन परिणामकारक सार्थ ठरविण्यात महत्वाची भूमिका बजावली हे सिद्ध होते.
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर नगरीत बौद्ध धम्माची दीक्षा घ्यावी यासाठी अहोरात्र मेहनत घेतली. इतकेच नव्हे तर बौद्धमय भारत घडविण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेकरांचे स्वप्न शेवट पर्यंत पूर्णत्वास नेण्यासाठी रेवाराम कवाडे कठीबद्ध राहिले.

**संदर्भ -**

१. नगराळे मोहन विदर्भातील दलित चळवळ (डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणापर्यंत) - प्रकाशक - प्रदीप हाडके, नागपूर, प्रथम आवृत्ती - २०१५, पृक्र. १००.

२. दलित कामगार चळवळ - देशोन्नती लेख. कामगार दिन

३. नगराळे मोहन - विदर्भातील दलित चळवळ (डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणापर्यंत) - प्रकाशक - प्रदीप हाडके, नागपूर, प्रथम आवृत्ती २०१५, पृक्र. १००.

४. डोंगरे कृष्णकांत - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत नागपूर शहरांचे योगदान बहुजन साहित्य प्रसार केंद्र नागपूर, प्रथम आवृत्ती २०१२, पृक्र. ६०

५. कित्ता, पृक्र. २२७.

६. कोसारे एच. एल - विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास - बहुजन साहित्य प्रसार केंद्र नागपूर, प्रथम आवृत्ती २००० पृक्र. १६५.

७. कित्ता २६४.

८. नगराळे मोहन - विदर्भातील दलित चळवळ (डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणापर्यंत) - प्रकाशक - प्रदीप हाडके, नागपूर, प्रथम आवृत्ती - २०१५, पृक्र.१०१.

# बाबू एल. एन. हरदास यांचे सायमन कमिशन व नागपूर डिप्रेस्ड क्लासेस मधील योगदान

**प्रा. आशिष गजानन थुल**
इतिहास विभाग
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व
वणिज्य महाविद्यालय, कामठी रोड, नागपूर

**सारांश :** सन 1928 मध्ये भारतात येणारे सायमन कमिशन याचा जरी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने विरोध केला असला तरी या देशातील शोषित वर्ग त्याकडे सुधारणावादी आशेने पाहत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कमिशनला दिलेले निवेदन हे 85 पानाचे असून सर्वसमावेशक स्वरुपाचे होते. ज्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रप्रेम किती मोठे होते हे दिसून येते. याच धर्तीवर नागपूर येथे सी. पी. डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशन व डिप्रेस्ड क्लासेस कॉन्फरन्स यांनी संयुक्तपणे दिले. ज्यामध्ये विविध वर्गाचे प्रतिनिधी असून अस्पृश्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व राजकीय सुधारण्याच्या मागण्या केल्या. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सायमन कमिशनसारख्या महत्वपूर्ण समितीसमोर साक्ष देण्याची जबाबदारी बाबू एल. एन. हरदास यांच्यावर सोपविली व ती त्यांनी सार्थ ठरविली.

**शब्दसंकेत :–** इंडियन स्टॅट्युटरी कमिशन, बहिस्कृत हितकारीणी सभा, राष्ट्रीयत्वाची भावना, डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशन, डिप्रेस्ड क्लासेस कॉन्फरन्स, गव्हर्नरचे अधिकार.

**संशोधन पद्धती** : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.

**1) सायमन कमिशनचे स्वरुप :**लखनौ कराराप्रमाणे 1919चा भारत सरकार कायदा दहा वर्षे कसा राबविला जातो, हे पाहून सत्तांतराचे जादा हक्क पुढे कसे देण्यात यावेत, याची तपासणी करण्यासाठी व त्याप्रमाणे शिफारस करण्यासाठी एक रॉयल कमीशन नेमण्यात आले. अशी तरतुद लखनौ कराराप्रमाणे 1919 च्या (मोर्ले.मिंटो कायदा) भारत सरकार कायद्यामध्येच करण्यात आली होती. त्यामुळे असे कमीशन नेमणे हे कोणाच्या मर्जीवर ठेवले नव्हते. व्हॉईसरॉय, भारत सेक्रेटरी, ब्रिटिश सरकार यांच्यावर कायद्यानेच असे कमीशन नेमण्याचे बंधन लादण्यात आले होते. त्यामुळे या कमीशनला 'इंडियन स्टॅटयुटरी कमीशन' संबोधण्यात आले होते. स्टॅटयुटरी म्हणजे कायद्याने बंधनकारक. या कमीशन मधील सर्व सदस्य युरोपियन होती त्यात भारतीयांचा समावेश नव्हता. यामुळे भारतीयांमध्ये असंतोष पसरला होता. जिथे जिथे कमिशन गेले तिथे कमिशनला काळे झेंडे दाखविण्यात आले. पंजाब मध्ये हे कमीशन लाहोर येथे असतांना लाला लजपतराय यांनी निदर्शनाचे नेतृत्व केले. त्याप्रसंगी लाला लाजपतरायांवर लाठीचार्ज करण्यात आला. त्यात ते जबर जखमी झाले. लवकरच त्यांचे निधनही झाले. ब्रिटिश सरकारने भारतीयांना आवाहान केले की तुम्हाला ज्या काही सुधारणा हव्या आहेत त्या आम्हाला सादर करा त्यावर विचार केला जाईल.

**2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सायमन कमिशनला निवेदन :**सन "1928 च्या फेब्रुवारी महिन्यात सायमन कमिशन भारतात आले. या कमिशनचे अध्यक्ष सर जॉन सायमन असल्याने त्यांच्या नावाने कमिशन ओळखले जात होते."[1] त्या कमिशनमध्ये "बिट्रीश मजुर पक्षाचे मेजर ॲटली, लॉर्ड बर्नहॅम, लॉर्ड फॉक्स, हॉर्टशॉर्न, कॅडोगन इ. सभासद होते."[2]

सायमन कमिशनला आपले निवेदन सादर करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे भावी राज्यघटनेचा आराखडा व अस्पृश्य वर्गाचे हक्क असे महत्वाचे प्रश्न होते. "एक निवेदन अस्पृश्य वर्गाच्या खास सरंक्षणात्मक हक्काबाबतचे होते; तर दुसरे निवेदन अस्पृश्य वर्गाच्या शिक्षणबाबतचे होते. ही दोन्ही निवेदने म्हणजे 21 ऑगस्ट 1928 रोजी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' या संस्थेच्या वतीने दामोदर हॉल, परेल मुंबई येथील त्यांच्या ऑफीसमधून सादर करण्यात आली होती."[3] यामध्ये त्यांनी बहिष्कृत वर्गाचा विचार केला नाही तर 85 पानाच्या त्या प्रदीर्घ निवेदनात प्रांताच्या फेरवाटणीच्या द्विदल राज्यपद्धती विरुद्ध एकदल राज्यपद्धती, गव्हर्नराचे स्थान, प्रांतीक कायदे मंडळ, प्रौढ मतदान हक्क, लखनौ करार, प्रांतीक स्वायत्तता, सार्वजनिक नोकऱ्या सारखे भारताच्या राष्ट्रीय विकासाशी संबंधित मुद्दे हाताळले होते. भारताच्या भावी राज्यघटनेच्या आराखड्याचा एवढा विस्तृत व खोल अभ्यास त्यावेळी क्वचित कोणी केला असेल असे राष्ट्रीय कार्य करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना केवळ 'अस्पृश्यांचे पुढारी' असे म्हणणाऱ्यांना लोकद्वेष्टे व राष्ट्र विरोधीच म्हटले पाहिजे.सायमन कमिशन समोर भाष्य करतांना "आज जर राष्ट्राला कोणत्या गोष्टीची गरज असेल तर ती जनतेच्या मनात एक राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याची होय. आपण प्रथम भारतीय असून नंतर हिंदु, मुसलमान, सिंधी किंवा कानडी अशी भावना निर्माण करण्यापेक्षा, आपण प्रथमतः भारतीय व नंतरही भारतीय आहोत अशी भावना निर्माण केली पाहिजे. याकरिता ज्यामुळे संकुचित प्रांतभिमानाची व पक्षभिमानाची वाढ होईल अशा सर्व गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजते."[4] असे डॉ. आंबेडकरांनी त्यात म्हटले आहे.

**3) नागपूर डिप्रेस्ड क्लासेसतर्फे सायमन कमिशनला निवेदन :**सायमन कमिशनला सादर करावयाचे निवेदन 24 फेब्रु. 1929 ला झालेल्या सी. पी. डिप्रेस्ड क्लासेस कॉन्फरन्समध्ये मान्य करण्यात आले. सायमन कमिशनला देण्यात आलेले निवदेन इंग्रजीत छापलेले आहे. हे निवदेन "अध्यक्ष सी. पी. डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशन व सेक्रेटर, सी. पी. डिप्रेसड क्लासेस कॉन्फरन्स, नागपूर यांचे तर्फे देण्यात आले. ते 24 फेब्रु 1929 चे असून ऑफीसचा पत्ता आहे – सेक्रेटरी, सी. पी. डिप्रेस्ड क्लास असोसिएशन, ऑफिस विश्राम हॉल लकडंगज, सर्कल, 15/10 इतवारी नागपूर सिटी." सायमन कमिशन समोर साक्ष देण्याकरिता व अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी म्हणून महारांचे प्रतिनिधी खालील प्रमाणे होते.

"जी. टी. मेश्राम, नागपूर
के. जी. नंदागवळी, गोंदिया

के. जी. बनसोडे, मोहपा
हरदास एल. एन., कामठी
संभाजी शिवाजी गोडघाटे, नागपूर

चांभाराचे प्रतिनिधी –
रतिराम एम. एल. सी., बिलासपूर
हिरालाल पूरण राज पंडवार, नागपूर

मांगाचे प्रतिनिधी –
दैबती देवाजी बेवाडे

भंगी समाजाचे प्रतिनिधी –
साधुराम मझबी, जबलपूर"[5]

या निवेदनात अस्पृश्य समाजाच्या परिस्थितीचा उल्लेख करून असे म्हटले आहे कि "शिक्षणाचा थोडासा लाभ या समाजाला मिळाला असला, तरी या प्रांतातील 20 टक्के असलेल्या दलित समाजास अद्यापही अस्पृश्य म्हणूनच वागविले जाते. त्यांना सार्वजनिक विहिरी, मंदिरे यात प्रवेश नाकारण्यात येतो. सवर्ण हिंदूंची अस्पृश्य समाजाच्या बाबतीत हजारो वर्षापासूनची वागणूक लक्षात घेवून या बहिष्कृत समाजाच्या उद्धाराकरिता, भारताला मिळणार असलेल्या राजकीय सुधारणात, समाजाचे राजकीय अस्तित्व मान्य करुन त्यांच्या राजकीय हक्कांची तरतुद करण्यात यावी."[6]

**4) नागपूर डिप्रेस्ड क्लासेसतर्फे सायमन कमिशनसमोर केलेल्या मागण्या**

1) अस्पृश्य पददलित अल्पसंख्य समाजाचे हक्क सुरक्षित रहावे म्हणून गव्हर्नरास खास अधिकार असावेत.
2) अस्पृश्य समाजाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात विधिमंडळ, स्थानिक संस्था, युनिर्व्हसिटी यात स्वतंत्र प्रतिनिधीत्व असावे.
3) सरकारी नोकऱ्यात व स्थानिक संस्थामध्ये या समाजाला नोकरीत प्रवेश मिळावा आणि त्याच्याकरिता कमीत कमी शैक्षणिक मर्यादा ठेवण्यात यावी.
4) मंत्रिमंडळात या समाजाला प्रतिनिधीत्व मिळावे आणि त्यांचा पगार व त्यांचेवरील विश्वास प्रगट करण्याचा अधिकार त्या समाजाच्या विधी मंडळातील सभासदांनाच असावा.
5) अस्पृश्य समाजाच्या शैक्षणिक प्रगतीकरिता खास शिक्षण निधी असावा.
6) कोणतेही विधेयक किंवा ठराव जे या प्रांतातील अस्पृश्य किंवा अल्पसंख्य समाजाच्या हितसंबंधाशी निगडित असतील, त्याला विधी मंडळातील याच समाजाच्या तीन चतुर्थांश सभासदांचा विरोध असेल तर, पुढे रेटण्यात येवू नये.

**5) बाबू एल. एन. हरदास यांची सायमन कमिशनसमोर साक्ष :** सायमन कमिशनला सादर करावयाचे निवदेन 24 फेब्रुवारी 1929 ला झालेल्या सी. पी. डिप्रेस्ड क्लासेस मध्ये मान्य करण्यात आले होते. "निवेदनावर सही करणारी पहिली व्यक्ती म्हणजे गणेश आकाजी गवई त्यांनी सी. पी. डिप्रेस्ड क्लास असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून सही केली होती. दुसरी सही बाबू एल. एन. हरदास यांची होती. त्यांनी सी. पी. डिप्रेस्ड क्लासेस कॉनफरन्सचे सचिव म्हणून सही केली होती."[7]

गवई यांनी नंतर आपली वेगळी परिषद घेतली होती. परंतु सायमन कमीशनला सादर करावयाच्या निवेदनाबाबत गवई तयार झाले असावे. "1929 च्या सी. पी. डिप्रेस्ड परिषदेला गवई आणि ठवरे यांनी विरोध करुन आपला स्वतंत्र सुभा निर्माण केला होता."[8] गवईची भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विरोधी होती याबाबत आंबेडकरांना पूर्व कल्पना असल्यामुळे त्यांनी सायमन कमिशनसमोर साक्ष देण्याकरिता एल. एन. हरदास यांना तारेने सुचविले. त्याप्रमाणे बाबू हरदास यांची साक्ष सायमन कमिशन समोर झाली. त्यामध्ये जे निवेदन डॉ. आंबेडकरांकडून देण्यात आले होते त्याचाच पुनरुच्चार केला असावा. एल. एन. हरदास यांनी डॉ. आंबेडकरांच्या बाजूने निष्ठेने उभे राहून भावी राजकीय धोरणांची मजबूती या प्रांतात करण्यास त्यांनी बहुमोल सहकार्य दिले. आणि इथूनच पुढे बाबू एल. एन. हरदास हे मध्यप्रांत वऱ्हाडातील दलित समाजाचे लोकप्रिय नेते झाले.

**संदर्भसूची**

1) कांबळे, बि. सी., 'समग्र आबेडकर चरित्र', खंड 5, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ. क्र. 11.
2)कित्ता पृ. क्र. 12.
3)पृ. क्र. 20.
4)कोसारे, एच. एल., 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास', नेहा प्रकाशन, गुरुनानक, नागपूर, पृ. क्र. 150.
5)कित्ता पृ. क्र. 154.
6)कित्ता पृ. क्र. 151.
7)सिद्धार्थ, संघर्षसूत 'लोकप्रीय बाबू हरदास एल. एन.', प्रदिप गायकवाड, राष्ट्रीय संघटक, समता सैनिक दल कार्यालय, नागपूर, प्र. आ 2013,पृ. क्र. 17.
8)कित्ता, पृ. क्र. 151.

## "डॉ. अम्बेडकर के आंदोलनों में बाबू हरदास एल.एन. का योगदान"

**प्रा. किशोर शेषराव चौरे**
इतिहास विभाग प्रमुख
म.ज्यो. फुले महाविद्यालय,
बल्लारपूर, जि. चंद्रपूर–442701

**गोषवारा : हम उसी को याद करते है, जो इतिहास का निर्माण करते है।** महाराष्ट्र में अस्पृश्य उद्धारक आंदोलन के जनक महात्मा जोतीराव फुले थे। उन्होने उन्नीसवी षताब्दी के मध्य में अस्पृष्य वर्ग के लड़के और लड़कियों के शिक्षा के लिए स्कूल खोले, शिक्षा के माध्यम से इन लोगों में ग्यान कि ज्योत प्रज्वलीत करने का महान कार्य किया. ब्राह्मणो के विरोध में उन्होने सत्यशोधक आंदोलन शुरू किया। इस आंदोलन से अनेक समाजसुधारों का उदय हुआ। उसमें कोल्हापूर के राजर्षी छत्रपती शाहू महाराज है। 1919 में शाहूजी महाराज का परिचय डॉ. बाबासाहब अम्बेडकरजी से हुआ. शाहूजी महाराजने डॉ. अम्बेडकरजी को आर्थिक सहाय्य दिया और अस्पृश्य समाज के आंदोलन को गती दी। डॉ. बाबासाहब अम्बेडकरजीने भारत कि सामाजिक परिस्थिती ध्यान में लेकर सामाजिक और आर्थिक न्याय के एकता (सद्‌भावना) के लिए दलित आंदोलन गतीमान किया। डॉ. बाबासाहब अम्बेडकरजी समाज जागृती का कार्य पश्चिम महाराश्ट्र में कर रहे थे। उसी प्रकार विदर्भ में बाबू हरदास एल.एन. कार्य कर रहे थे।

**शब्द संकेत :** डॉ. अम्बेडकर, आंदोलन, बाबू हरदास एल.एन., सायमन कनिशन, गोलमेज परिषद, पुणे करार, जयभिम, महारट्टा, ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस.

**उद्देश :**(1)डॉ. अम्बेडकर के आंदोलन में बाबू हरदास एल.एन. के योगदान का अध्ययन करना।
(2)बाबू हरदास एल.एन. के कार्यो का अध्ययन करना।
(3)बाबू हरदास एल.एन. के विचारो का अस्पृश्य लोगों पर परिणामो का अध्ययन करना।

**गृहितके :**(1)डॉ. अम्बेडकर के आंदोलन में बाबू हरदास एल.एन. का योगदान महत्वपूर्ण है।
(2)बाबू हरदास एल.एन. के विविध कार्य सामाजिक, आर्थिक, धार्मिक और राजकीय भेदभाव को दुर करने में सहाय्यक रहे है।
(3)वर्तमान परिस्थिओं में बाबू हरिदास एल.एन. के सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विचार प्रेरणादायी है।

**शोध पद्धती :**प्रस्तुत संशोधन मुख्यतः द्वितीय सामग्री पर आधारित है। इस संशोधन में लिखीत संदर्भ ग्रंथ, इंटरनेट, प्रकाशित संशोधित लेख, साप्ताहिके, समाचारपत्र इत्यादी सहित्यों का आधार लिया गया है।

**प्रस्तावना :**बाबू हरदासजीका जन्म 6 जनवरी 1904 को नागपूर जिले के कामठी तहसील महार परिवार में हुआ था। उनके पिता का नाम लक्ष्मणराव नगरारे था। पिताती रेल्वे में क्लर्क के पद पर थे। हरदास ने मॅट्रीक कि पढ़ाई सन 1920 में पटवर्धन हायस्कूल, नागपूर से उत्तीर्ण की। बाबू हरदास सुरू से ही डॉ. बाबासाहब अम्बेडकर के आंदोलन से जुड़े हुए थे और उनका देहांत 12 जनवरी 1939 में हुआ। सिर्फ 35 वर्ष कि अल्पायु में ही चल बसे थे। सच है, इतिहास गढने के लिए लम्बी उम्र की दरकार नहीं होती। इतने कम समय में वे इतना काम कर गए कि लोग उनका नाम लेना गर्व का सबब समझते है।

डॉ. बाबासाहब अम्बेडकरजीने वऱ्हाड प्रांत ;**C.P. & Beror)** में दलित आंदोलन चलाया था। उसमें बाबू हरदास एल.एन. इन्होंने महत्वपूर्ण भूमिका निभाई।

**बाबू हरदास एल.एन. और सायमन कमिशन :**डॉ. बाबासाहेब अम्बेडकरजीने सायमन कमिशन के आगे जो साक्ष दी। तब बाबू हरदास को बाबासाहेब ने सायमन कमिशन के आगे साक्ष देने के

लिए बुलाया था। बाबू हरदासजीने डॉ. बाबासाहब कि तरफसे एकनिष्ठतापूर्ण सायमन कमिशन के सामने बाबासाहब ने जैसा निवेदन में नमूद किया था वैसेही साक्ष दी। भावी राजकीय योजनाओं की मजबूती के लिए मध्यप्रान्त में बाबू हरदास ने डॉ. बाबासाहब को बहुमोल सहकार्य किया। इसी महत्वपूर्ण घटना कि वजसे बाबू हरदास एल.एन. मध्यप्रांत वऱ्हाड में दलित समाज के लोकप्रिय नेता बन गये।

**ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस और बाबू हरदास एल.एन. :**

7 और 8 अगस्त 1930 में कस्तूरचंद पार्क, नागपूर में डॉ. बाबासाहब अम्बेडकरजी के अध्यक्षता में अखिल भारतीय दलित काँग्रेस परिषद का पहिला अधिवेशन हुआ। इस अधिवेशन को सफलतापूर्वक बनाने में बाबू हरदासजीका महत्वूपर्ण योगदान रहा।ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लास का दुसरा अधिवेशन उन्होने कामठी में लिया। इस अधिवेशन को सफल बनाने के लिए उन्होने दिन–रात मेहनत ली। 7 मई 1932 में डॉ. बाबासाहब अम्बेडकरजी की अध्यक्षता में यह अधिवेशन लिया गया।

**द्वितीय गोलमेज परिषद और बाबू हरदास एल.एन. :** इंग्लंड के गोलमेज परिषद में जब गांधीजीने अस्पृश्यों के नेता हम ही है, डॉ. अम्बेडकर नही ऐसी बात बोली। तब बाबू हरदास ने हजारों टेलीग्राम कामठी से इंग्लंड भेजकर कहाँ कि अस्पृश्यों के नेता गांधी नही डॉ. अम्बेडकर है, ऐसा कहकर इंग्रजों के मन में डॉ. अम्बेडकर के प्रति सहानुभूती पैदा की।

**बाबू हरदास और पुणे करार** :डॉ. बाबासाहेब अम्बेडकरजीने अस्पृश्यों के लिए जो पृथक मतदार संघ और संयुक्त चुनाव में मत देणे का अधिकार प्राप्त किया। 19 और 20 अगस्त 1932 को सांप्रदायिक निर्णय ब्रिटन पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड इन्होने डॉ. बाबासाहब कि तरफ से Round Table Conference में निर्णय घोषित होने के बावजूद महात्मा गांधीने पृथक (स्वतंत्र) मतदार संघ का विरोध किया। और पुणे के येरवडा जेल में 20 सप्टेंबर 1932 को आमरण उपोषण शुरू किया। बाद में महात्मा गांधी और डॉ. बाबासाहब अम्बेडकर के बीच में पुणे करार हुआ।

डॉ. बाबासाहेब अम्बेडकर और गांधीजी के बीच में पुणे करार होने के बाद डॉ. बाबासाहेब अम्बेडकर, बाबू हरदास और अस्पृश्य लिडर गांधीजी के साध मिले। उस समय डॉ. बाबासाहब अम्बेडकरजीने सभी अस्पृश्यों लिडरो का परिचय गांधीजी को करके दिया। तब गांधीजी बोले, अब मै मेरा बचा हुआ जीवन दलित लोगों के लिए खर्च करूंगा। उदाहरण के तौर पर देवालय, तालाब यही नही तो हिंदू लोगों को इसके बारें में बताऊंगा। गांधीजी के यह विचार एकाग्रतासे सुनते हुए उनका वाक्य खत्म होने के पहले बाबू हरदास गांधीजी को कहते है, "महात्माजी हमारे पूर्वोजोने हजारों साल देवालय के पत्थर के मूरत के सामने नतमस्तक होते आये; हमारे सर पर बाल नही रहे। इसके बजाये हमारे अस्पृश्य बांधव किस प्रकार विद्वान बनेंगे इसके लिए आप अपना उर्वरित जीवन अर्पित करे।" इस तरह के विचार सूनकर गांधीजी स्तब्ध रह गये।

**जयभीम के जनक :**जयभीम शब्द आज दलित पिछड़ो कि अस्मिता और एकता का प्रतीक बन चुका है। हर दलित पिछड़ा युवा उत्साह से 'जयभीम' के साथ एक–दुसरे का अभिवादन करते है। 'जयभीम' शब्द कि उत्पत्ती महाराष्ट्र में हुई। इस जयभीम शब्द के जनक बाबू हरदास एल. एन. थे।

जयभीम शब्द का संबोधन पहली बार भरी सभा में प्रयोग कर इतिहास का निर्माण किया था। जैसे हिन्दुओं में नमस्कार, मुस्लीमों में आदाब–अर्ज, और ईसाईयों में गुड मार्निंग का सम्बोधन प्रचलित है। ठिक उसी प्रकार दलित और बुद्धिस्टों में 'जयभीम' का जयघोष प्रचलित है।

जयभीम शब्द का सम्बोधन पहली बार उनके मन में एक मुस्लीम व्यक्ति को देखकर आया। वे उस समय कार्यकर्ताओं (मित्र के साथ) के साथ घुमते हुए रास्ते में एक मुस्लीम युवक को दुसरे मुस्लीम ने 'अस्सलाम–अलेकुम' कहते हुए सुना, जवाब में दुसरे मुस्लीम व्यक्ति ने भी 'वालेकुम–सलाम' कहा। इन दो व्यक्तिओ में आदर कि भावना थी। इन दोनो का वादसंवाद सुनने के बाद बाबू हरदास मुल्लाजी को इनका अर्थ पुछने लगे। मुल्लाजीने इसका अर्थ बताया 'सलामती हो तुम पर अल्लाह की ओर से'। तब बाबू हरदास ने सोचा कि हमें एक–दुसरे से अभिवादन करने के लिए क्या कहना चाहिए। तब उन्होने विचार करके 'जयभीम' बोलने का और प्रतिउत्तर में दुसरे व्यक्तिने पहिले व्यक्ति को 'बलभीम' कहने का यह युक्ती बाबू हरदास को सूची और यह परंपरा आगे चलती रही। जयभीम का प्रसार और प्रचार करने के लिए उन्होने अपने साथीओं को गाव–गाव भेजा।

इस तरहसे 'जयभिम' बोलकर नमस्कार करने का सिलसिला शुरू था, तब बाबू हरदास को लगा कि, 'बलभीम' यह शब्द योग्य नही लगता। तब उन्होंने बसाया कि, 'बलभीम और जयभीम' ये दो शब्द अलग–अलग लगते है। इसलिए उन्होंने पुन्हा (पुन्हः) अपने साथिओं को कहाँ कि 'जयभीम'। बोलनाही उचित लगता है। इसलिए सबने एकही शब्द बोलने का वो याने 'जयभीम'। 19 जनवरी 1937 को स्वतंत्र मजदूर पार्टी के तरफ से प्रांतीक कौन्सील में उनका चलय होने के बाद उन्होने 'जयभीम' का नारा दिया। इसलिए बाबू हरदास को जयभीम के जनक भी कहाँ जाता है।

**नाशिक सत्याग्रह को समर्थन :**1927 को डॉ. बाबासाहब अम्बेडकरजीने महाड का चवदार तालाब सत्याग्रह जो समता के लिए किया, उससे संपूर्ण भारत के अस्पृश्य लोगों का ध्यान डॉ. बाबासाहब के तरफ खिचा गया। बाबू हरदास उन्होने भी 1927 साल में रामटेक के पास अंबाळा तालाब पर अपने समाज के लिए अलग व्यवस्था करने के लिए आंदोलन किया और जाहिर सभा की। इस कारण विदर्भ के अम्बेडकरी लोगो का ध्यान उन्होने अपने इधर खिचा।

1927 में किसन फागुजी बनसोडे कि मौजूदगी में नागपूर के पास स्थित रामटेक में दलित समुदाय से आव्हान किया कि, वे रामटेक के मंदिर में पूजा न करे और नही गंदे अम्बाडा तालाब में नहाये।

अस्पृश्यो को मंदिर में प्रवेश नही था। मंदिर के बाहर ही रहके उन्हे पूजाअर्चा करनी पड़ती थी। इसलिए समानता के लिए नाशिक सत्याग्रह किया। कालाराम मंदिर प्रवेश आंदोलन में भाग लेने के लिए एक दल भेजा।

**बाबू हरदास एल.एन. का शैक्षिक कार्य :**डॉ. बाबासाहेब अम्बेडकरजी के आंदोलन के खंबीर कार्यकर्ते व्हाड प्रांत में बाबू हरदास एल.एन. ने शिक्षा प्रसार का कार्य हात में लिया। उन्होंने अस्पृश्यों के शिक्षा के लिए रात–दिन परिश्रम लिया। कई नाईट स्कूल खोले। महिलाओं कि दशा सुधारने के लिए एक प्रशिक्षण केंद्र खोला। कामठी में उन्होने संत चोखामेळा पुस्तकालय खोला था।

**बाबू हरदास एल.एन. के अन्य कार्य :**1921 में उन्होंने दलितो में जागृति लाने के लिए एक अखबार 'महारठ्ठा' निकाला। बीड़ी मजदूरों का शोषन रोकने के लिए सहकारिता के आधार पर काम शुरू किया। वे प्रांतीय बीड़ी मजदूरसंघ के सेक्रेटरी भी थे।बाबू हरदास ने महार समाज को संगठित करने के लिए सन 1922 में एक संगठन तैयार किया था। वे इसके महासचिव थे। हिन्दू अत्याचारों से समाज के लोगों कि रक्षा करने इन्होंने 'महार सेवक संघ' नामक एक युवाओं को स्वयं–सेवी संगठन बनाया था।

नाग विदर्भ के महार समाज के लोग अपने उपजाती में विभाजीत होकर आपस में नफरत के नजर से देखते थे। बाबू हरदास चाहते थे कि डिप्रेस्ड कास्ट में जितनी जातियाँ

आती है, वे सब एक बॅनर के निचे आएं। दर असल, वे इन जातियों में उप–जाति की बाधाएं खत्म करना चाहते थे। संत चोखामेला की पुण्यस्मृती के समारोह में वे इन सभी उप–जातियों के लोगों को आमंत्रित कर सह–भोजन का आयोजन करते थे। उपजातियों की दीवार तोड़ने के लिए बाबू हरदास इन्होंने पुरे नाम में आनेवाले सरनेम को काटकर उपजातिर्विहन कृतीका अस्पृश्य समाज में नया आदर्श निर्माण किया।

सन 1923 में बाबू हरदास ने मध्य–प्रांत और बेरार के वायसरॉय से आग्रह किया था कि विधान परिषद, डिस्ट्रीक लोकन बोर्ड और नगरपालिकाओं में डिप्रेस्ड क्लॉस के लोगो को नामित कर उन्हे प्रतिनिधित्व दिया जाए, ताकि विधायिका और कार्यपालिका में उनकी सहभागिता सुनिश्चित हो सके।बाबू हरदास हर प्रकार के अन्ध–विश्वास, सडी–गडी परम्पराओं के विरूद्ध थे। इस निमित्य उन्होंने 'मंडई महात्मे' नामक पुस्तक लिखकर समाज के लोगों में वितरित किया। इसी प्रकार 'वीर बालक' नामक एक नाटक मंचन भी किया था।

इस तरह बाबू हरदास एल.एन. ने अम्बेडकरी आंदोलन में योगदान दिया।

**समारोप :**अम्बेडकरी आंदोलन में बाबू हरदास एल.एन. इनका राजकीय, सामाजिक व आर्थिक योगदान अत्यंत महत्वपूर्ण रहा है। अफसोस है, बाबू हरदास लम्बी उम्र नहीं जी सके। वे मात्र 35 वर्ष कि अल्पायु में ही चल बसे, किन्तु इतने कम समय में वे इतना काम कर गए कि लोग उनका नाम लेना गर्व समझते है। जिस दिन बाबू हरदास का परिनिर्वाण हो गया था, उस दिन उनको श्रद्धांजली देते समय बाबासाहब ने कहाँ था की, "बाबू हरदास के रूप में मेरा दाहिना हाथ चला गया।"

महार समाज को इकठ्ठा करके उनमें बाबासाहब अम्बेडकर के विचारो की बीज डालने का महत्वपूर्ण कार्य बाबू हरदास एल.एन. इन्होंने बहुत ही समर्पित भाव से किया। उनके निधन से समाज की अपूर्णीय क्षति हुई। बाबू हरदास की शव यात्रा में लाखो लोग शरीक हुए थे। उन्हे कन्हान नदी के तट पर दफनाया गया। अब इस स्थान संक्रांति के दिन विशाल मेला लगता है। जिस में दलित जनता अपने प्रिय नेता को श्रद्धांजली अर्पित करती है।

**संदर्भ ग्रंथसूची :**

(1)कोसारे, एच.एल., 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास', ज्ञान प्रदिप प्रकाशन, नागपूर, प्र.आ. 1984, पृ. 15, 40, 176, 374.

2)मेश्राम, बी.एन., 'बाबू हरदास एल.एन. यांचे जीवन चरित्र', बुद्धविहास संचालक मंडळ हरदास नगर कामठी, प्र.आ. 6 जानेवारी 1982, पृ. 93, 80, 81, 89, 91, 113.

(3)बोरकर, मिलींद (संपा.), 'अभिवादन विशेषांक', जानेवारी 2007, पृ. 28.

(4)रामटेके, पी.टी., 'जयभीमचे जनक बाबू हरदास एल.एन.' लेखक प्रकाशन– पी.टी. रामटेके, शिवाजी नगर, भद्रावती, चंद्रपूर, प्र.आ. 6 जानेवारी 2000, पृ. 20, 67, 78.

(5)https://www.baudhyoug.org2016/10 (बहुजन न्यूज 30–05 सितम्बर 2015)25th February, 2019

(6)ambedkartimes.blogspot.com (Ambedkar Times : जयभीम क`जनक बाबू हरदास) 25th February, 2019

# धम्मरक्षक ॲड. बाबू हरिदास आवले

**डॉ. संजय गजभिए**
M.Com., M.A. (Economics, Ambedkar Thoughts, Pali & Prakrit, Political Science, Sociology, Public Administration, A.I.H.C. & Archaeology, Buddhist Studies), NET (Pali), NET (Buddhist, Jaina, Gandhian, and Peace Studies), M.Phil. (Ambedkar Thoughts), Ph.D. (Ambedkar Thoughts)

**सारांश** : आंबेडकरी आंदोलन में विदर्भ प्रांत से अहम भूमिका निभानेवाले नेताओं में बाबू हरदास एल.एन. के बाद ॲड. हरदास बाबू आवले का नाम बड़े गौरव के साथ लिया जाता है। 1939 में बाबू हरदास एल.एन. के निधन से विदर्भ प्रांत में आंबेडकरी आंदोलन को आगे ले जाने के लिए जो क्षती निर्माण हुई थी उस क्षती को हरिदास बाबू आवले ने 1940 में विद्यार्थी अवस्था में आंबेडकरी आंदोलन में कूदकर भरने का काम किया। ॲड. हरिदास बाबू आवले ने ऑल इंडिया समता सैनिक दल का अध्यक्ष पद, भारतीय रिपब्लिकन पार्टी का उपाध्यक्ष पद बड़ी बखुबी से संभालने का काम किया। समता सैनिक दल पर जब पाबंदी लगाई गई ॲड. हरिदास बाबू आवले को सरकार द्वारा जेल में भी डाला गया। जब उच्च न्यायालय द्वारा बाबासाहेब के दिक्षा समारोह को राजनीतिक सभा ठहराया गया, हरिदास बाबू आवले ने सर्वोच्च न्यायालय में मामला ले जाकर धर्मांतर समारोह को राजकीय समारोह का दाग लगने से बचा लिया। आज दिक्षाभूमि पर जो धम्मस्तूप शान के साथ खड़ा दिखाई देता है उस भूमि को बचाने के लिए ॲड. हरिदास बाबू के संघर्ष को कभी भूलाया नहीं जा सकता। दिक्षा भूमि पर बाबासाहेब का जो जिंवत रूपी पुतला दिखता है उसकी निर्मिती में भी ॲड. हरिदास बाबू आवले का अमूल्य योगदान है। ऐसे महान विदर्भवादी नेता का जीवन भी बाबासाहेब के विचारों का प्रचार–प्रसार करते समाप्त होना एक निस्वार्थ और सच्चे कार्यकर्ता का जिवंत उदाहरण है

**शब्द संकेत :** सामाजिक,राजकीय,धार्मिक तथा सांस्कृतिक कार्य,समता सैनिक दल,रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया पक्ष का कार्य

**संशोधन पद्धती** : ऐतिहासिक संशोधन पद्धतीका स्वीकार किया गया है।

**प्रास्ताविक :** धम्मरक्षक बाबू हरिदासजी आवले के पूर्वज नागपुर से 27 मील की दूरी पर स्थित उमरेड के निवासी थे। आयुष्मान आत्माराम और तुलसीराम आवले यह दोनों भाई उमरेड से रोजी–रोटी की तलाश में कामठी पधारे। आयुष्मान आत्माराम के पुत्र का नाम दामाजी था। ॲड. बाबू हरिदास दामाजी आवले के पुत्र थे। बाबू हरिदास आवले का जन्म कामठी (केन्टोंमेंट) में 1 जुलाई, 1916 को हुआ।[1] धम्मरक्षित बाबू हरिदास आवले के दादाजी आयुष्मान आत्माराम एवं उनके भाई आयुष्मान तुलसीराम ने भंडारा से झारसीगुड़ा तक का रेलमार्ग बनाने का ठेका लिया था। इसी कालावधी में विदर्भ में भंडारा स्थित वैनगंगा नदी का पूल बनाया गया। यह पूल बाबूजी के दादा आत्माराम, पिता दामाजी और तुलसीराम की चिरंतन यादगार है।

धम्मरक्षीत बाबू हरिदास आवले के पिता दामाजी को तीन बेटे थे। बड़े बेटे का नाम रामदास, दूसरे बेटे का नाम हरिदास और तीसरे बेटे का नाम गिरीराज शंकर था। बाबू हरिदास आवले ने मैट्रीक की परीक्षा रायपुर से पास की। विद्यार्थी अवस्था से ही इन्हें समाजिक कार्य करने की लगन थी। महाविद्यालयीन शिक्षा ग्रहण करने के लिए बाबूजी रायपुर से नागपुर आए। नागपुर गव्हर्मेंट सायंस कॉलेज से उन्होंने बी.एससी की परीक्षा उत्तीर्ण की।[2]

नागपुर स्थित नकाशा नामक बस्ती में बाबू हरिदास आवले पन्द्रह–बीस स्वयंसेवकों को लेकर विद्यार्थी अवस्था से ही समता सैनिक दल की परेड़ पढ़ाया करते थे। कौन जानता था कि एक मजदूर बस्ती में साधारण परेड पढ़ानेवाला यह युवक भविष्य में इतना महान निपुण राजनीतिज्ञ बनेगा?

## बाबू हरिदास आवले की संगठन कुशलता

सन् 1942 में बाबासाहेब आंबेडकर द्वारा नागपुर में ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट फेडरेशन की स्थापना की गई। सन् 1944 में बाबूजी मध्यप्रांत बराबर प्रांतीय फेडरेशन के संगठन मंत्री चुने गये थे। बाबूजी के संगठन कुशलता का की एक उदाहरण यहां प्रस्तुत करना अत्यंत आवश्यक है। सन् 1945 में बाबूजी ने मध्यप्रदेश के छत्तीसगढ़ विभाग से सतनामी समाज के चौदाह हजार लोगों को शेडयूल्ड कास्ट फेडरेशन में शामिल करा लिया था। इसलिए दिनांक 4 नवम्बर, 1945 को आयुष्मान शंकरनाथा खैरमोडे की अध्यक्षता में डेव्हीड मील मैदान, सैतान चौकी मुम्बई में एक आमसभा हुई। उस आमसभा में मुम्बई स्थित मध्यप्रदेश अछूत सेवक समाज के मंत्री ने अभिनंदन प्रस्ताव रखा। इस प्रस्ताव का ॲड. आर.डी. भंडारे ने भी समर्थन किया था।[3]

**बाबूजी समता सैनिक दल के उत्कृष्ट अधिवक्ता एवं राजनीतिज्ञ :**1948 में भारत के सभी विरोधी नागरिक सामाजिक संगठनों पर कांग्रेस सरकार द्वारा बंदी लगाई गयी थी। बाबूजी मध्यप्रांत व्हाड समता सैनिक दल के अध्यक्ष थे। मध्यप्रदेश में पं. रविशंकर शुक्ला मंत्रीमंडल ने जनसुरक्षा कानून के अंतर्गत ॲड बाबू हरदास हावले जी को तीन महिने जेल में बंदी बना रखा था।

कारागृह से रिहा होते ही बाबूजी पर सामाजिक, राजनीतिक और पार्टी संगठन की अनेक जिम्मेदारियां आ पड़ी थी। यह सारा व्याप संभालकर वे वकालत का अध्ययन करते रहे। हर वर्ष बाबूजी उत्तीर्ण होते रहे। 1953 में बाबूज ने एलएल.बी. की उपाधी प्राप्त की।

जनता में हर्ष हुआ। नागपुर नागरिक समिति द्वारा बाबू हरिदास आवले का नागपुर महानगरपालिका भवन में भव्य समारोह के साथ शानदार स्वागत किया गया। इसी समय जनता की ओर से इस निस्वार्थ कर्मयोगी को कर्मवीर की उपाधी से विभुषित किया गया था।

डॉ. बाबासाहेब आबेडकर ने 14 अक्टूबर, 1956 को नागपुर में धर्मांतर कार्यक्रम आयोजित किया था। 1957 में सार्वजनिक चुनाव थे। कुछ नेताओं को ऐसा लग रहा था कि धर्मांतर का समारोह चुनाव के बाद होना चाहिए था। इसके लिए उंटखाना में बैठक भी बुलाई गई थी। इस बैठक में बाबूजी भी उपस्थिति थे। बाबूजी ने अपनी कोट की जेब से बाबासाहेब का पत्र निकालते हुए कहा था कि, यह बाबासाहेब का पत्र है इसमें धर्मांतर समारोह के सम्बन्ध में लिखा है। ऐसे अनेक चुनाव आएगे और जाएंगे। परंतु धर्मांतर का समारोह निश्चित है यह होकर रहेगा इसमें किसी भी प्रकार का परिवर्तन नहीं किया जाएगा।''[4]

बाबूजी को सादगी में कोई पछाड़ नहीं सकता था। कहीं पर भी सो जाना, खाने लायक जो कुछ भी मिले खा लेना। जनता पर कभी कोई बोझ नहीं डालना। न बीड़ी, न सिगारेट, न दारू और न किसी प्रकार का नशा करना। यात्रा भी तिसरे दर्जे में करते थे। वे हाईकोर्ट के वकील थे सफर में भी केस की तैयारी करते थे। बाबूजी झूठी शान शौकत से बहूत दूर थे।इनका अंग्रेजी भाषा पर इतना कमांड था। परंतु वे वह प्रायः हिन्दी में भाषण करते थे। एक–एक शब्द चुन–चुन कर बोलते, जरूरत से कुछ भी अधिक नहीं। बहुत से गैर–दलित उनका हिन्दी में विद्वतापूर्ण भाषण सुनने के लिए उमड़ पड़ते थे।शिक्षा प्रसार उनका प्रिय विषय था। विद्यार्थियों के लिए नागपुर में नालंदा होस्टल की स्थापना उनकी सोच का एक प्रबल प्रमाण है।बाबूजी सितार बजाने में कुशल थे। वे उत्तम गीत गायन भी करते थे। बाबू हरदास एल.एन. के बाद इसी कामठी में जन्मे दूसरे हरदास अर्थात् बाबू हरदास आवले को डॉ. बाबासाहेब आंबेडकर अपना प्रिय, विश्वासु और निष्ठावान प्रतिनिधी मानते थे।

**''समाज'' यही मेरा घर ऐसा बाबूजी का दृढ़ संकल्प :** ॲड हरिदास आवले ने वकालत करने का निश्चय किया। घर गृहस्थी की अड़चने सिर्फ आयुष्मान रामदास बाबू पर पूर्ण निर्भर होने के कारण आर्थिक संकट स्वाभाविक था। परंतु जनसेवा के कारण उसे दूर करना संभव नहीं हुआ। अतः बाबूजी अपनी आर्थिक प्रगती करने में सदैव असमर्थ रहे और ''समाज'' यही मेरा घर ऐसा बाबूजी ने अपना दृढ़ संकल्प कर लिया।1946 और 1952 में विधानसभा और 1955 और 1957 में संसद के लिये शेडयूल्ड कास्ट फेडरेशन के उम्मीदवार की हैसियत से चुनाव में उतरे थे। यहां बाबूजी की पराजय हुई। लेकिन जनता ने हजारों वोट देकर इनके प्रति अपना प्रेम और विश्वास व्यक्त किया था।

सन् 1955 में लोकसभा के लिए भंडारा निर्वाचन से शेडयूल्ड कॉस्ट फेडरेशन से बाबू हरिदास आवले को प्रत्याशी घोषित किया गया था। उस समय बाबासाहेब ने आवले बाबू को चुनकर लाने के लिए एक अपील प्रकाशित की थी। उसमें कहा गया था कि[5], ''नागपुर प्रांत के भंडारा मतदार संघ में अछुतों के लिए आरक्षित पार्लियामेंट की सीट का उपचुनाव 1 और 6 मई, 1955 को हो रहा है उसके लिए शेडयूल्ड कॉस्ट फेडरेशन के आयुष्मान हरिदास आवले, बी.एससी., एएल.बी को प्रत्याशी बनाया गया है। माननीय हरिदास आवले यह वकील होते हुए भी पूरा समय फेडरेशन के कार्य में लगाते है इस चुनाव के लिए उन्हें आर्थिक सहायता करे और भंडारा मतदार संघ के चुनाव में मतदाताओं ने अपना किंमती वोट माननीय आवले के 'हाथी' चुनाव चिन्ह् की पेटी में डाला।''डॉ. बाबासाहेब आंबेडकर का 6 दिसम्बर, 1956 को महापरिनिर्वाण हुआ। उस समय उनको ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट फेडरेशन की ओर से 30 दिसम्बर, 1956 को नागपुर में श्रद्धांजली अर्पित करते समय बाबूजी ने महत्वपूर्ण भाषण दिया था। उस समय उनपर भारतीय दंड विधान संहिता की धारा 153ए और 505 लगाकर न्यायालय में मामला दायर किया। उस मामले में बाबूजी निर्दोष रिहा कर दिये गये।

बाबू हरिदास आवले ने नवम्बर, 1958 को चैत्यभूमि की सभा में लाखों आंबेडकरवादियों के सामने जाहीर सभा में कहा कि[6], ''मैं डॉ. बाबासाहेब आंबेडकर के सिद्धांतों पर नहीं चल रहा होगा तो मुझे इस ताड के पेड़ पर लटकाकर मेरी बोटी–बोटी अलग कर दो।''

**बाबू हरिदास आवले की लोकप्रियता :** 1959 में नागपुर उमरेड निर्वाचन क्षेत्र के उपचुनाव में बाबूजी सांसद के लिए रिपब्लिकन पार्टी के अनुयायी के रूप में हाथी चुनाव चिन्ह लेकर स्वतंत्र उम्मीदवार रहे। लेकीन पार्टी में मचे घमासान के कारण बाबूजी ने चुनाव से कुछ दिन पूर्व अपनी उम्मीदवारी वापस ले ली। लेकिन चुनाव के नियमानुसार पेटियां रह गई थी। इनके मतदाताओं ने पेटी में मत के साथ नोट भी डाले थे।एक ही पार्टी के दो उम्मीदवार होने पर (बाबूजी और बैरिस्टर राजाभाऊ खोब्रागड़े) एक की ओर से बाबूजी के दल पर हिंसात्मक प्रहार हो रहे थे। लेकिन बाबूजी ने संयम धैर्य से गंभीरतापूर्वक परिस्थिति को संभालकर अपने लोगों को शांति बनाये रखने को बाध्य किया था। क्योंकि विरोधी गुंडो ने रक्तपात और हिंसात्मक मार्ग अपनाया था। ऐसी परिस्थिति में शांति स्थापित करने का सहनशीलतापूर्वक इतना महान उदाहरण बिरले ही देखने को मिलता है। चुनाव के किसी भी मतदान केन्द्र पर ना टेबल, ना कुर्सी, ना प्रचारक, ना कार्यकर्ता का ठिकाना। क्योंकि बाबूजी के ऐसे आदेश भी थे। संगठन शक्ति के आधार पर पोलिंग बुध की व्यवस्था करना संभव बात है। लेकिन सिद्धांत और तत्व पर अमल करनेवाले बाबू हरिदास आवले ने मतदाताओं से वोट देने को नहीं कहा। मतदान के दिन बाबूजी कार्यवश मुम्बई की ओर रवाना हुये थे। बगैर प्रचार के इतनी बड़ी संख्या में वोट प्राप्त हो जाना आश्चर्य जनक बात है। जनता का कर्मवीर आवले बाबू के कार्य पर अत्यन्त प्रेम और विश्वास हो जाने के कारण यह मतदान भारत के चुनाव में एक अनोखा मतदान हुआ है।

**रिपब्लिकन पार्टी की स्थापना।** बाबूजी ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट फेडरेशन के मंत्री चुने गये थे। 3 अक्टूबर, 1957 को डॉ. बाबासाहेब आंबेडकर के परिनिर्वाण के बाद उनकी इच्छानुसार रिपब्लिकन पार्टी की दीक्षाभूमि नागपुर में स्थापना की गई।[7] बाबूजी को रिपब्लिकन पार्टी का उपाध्यक्ष चुना गया। 1958 में अखिल भारतीय रिपब्लिकन पार्टी के अंतर्गत सैद्धांतिक मतभेद निर्माण हुए। एक पार्टी जिसमें बाबासाहेब को यह कहनेवाले का "डॉ. बाबासाहेब ने क्या किया, अछूत समाज को गड्डे में उतार दिया। डॉ. बाबासाहेब के विरोधी कांग्रेसी तथाकथित कहनेवाले नेताओं ने उनका फुलमालाओं से स्वागत किया। जिसे विकृत प्रवृत्ति का संच कहना चाहिए। ऐसे कम्युनिस्ट विचार प्रवाह में प्रवाहित हो गये। उस गुट को दुरूस्त गुट दूसरा आवले गुट के नाम से प्रसिद्धी प्राप्त किया। डॉ. बाबासाहेब के सिद्धांतों कि रक्षा करने के उद्देश्य से कुछ साथियों ने बाबासाहेब के ध्येय और सिद्धांतों को अपनाया था।व्यक्ति के नाम से पार्टी को पहचाना जाना बाबूजी को अच्छा नहीं लगा। इसलिए उन्होंने 13 मई, 1959 को नागपुर में अखिल भारतीय रिपब्लिकन पार्टी (दुरूस्त) को पुनर्जिवित करके पार्टी सुचारू रूप से चलाने के लिए सुदृढ़ कार्यकारिणी का गठन किया। प्रतिनिधियों द्वारा बाबूजी अखिल भारतीय रिपब्लिकन पार्टी के अध्यक्ष चुन लिये गये।[8]

**धैर्यशाली बाबू हरिदास आवले :** विरोधी कहनेवाले गुट ने अधिवेशन का मंडप जलाने का अलोकतांत्रिक कृत्य किया। 10 मई, 1959 को रिपब्लिकन पार्टी की स्थापना के लिए अन्य प्रांतों से नागपुर रेलवे स्टेशन पर आए कार्यकर्ताओं को विरोधी पार्टी के गुंडों ने हमला किया। पत्थरों की बौछार से सारा रेलवे स्टेशन भर गया। गुंडों ने खुले आम लाठी, भाले, तलवार और शस्त्रों से हमला किया था।इतने बड़े युद्ध समान हमले में बाबूजी ने अपने लोगों को आदेश दिया था कि लाठियां, अवजार और पत्थरों की मार से हमें घबराना नहीं चाहिए। अपने विचारों से कोई भी विचलीत नहीं होगा। हम सिर्फ अपनी सुरक्षा करें। हमारी ओर से किसी को भी चाहे शत्रू ही क्यों न हो, हानि नहीं पहुंचना चाहिए। बाबूजी की सहनशीलता और उपरोक्त संयमशील उपदेश को सुनकर ऐसा लगता है की, इस प्रकार स्थितप्रज्ञ सहनशील कर्मयोगी कोई महान विचारक ही हो सकता है।विरोधी पार्टी की ओर से वर्षा की तरह पत्थर का हमला जारी था। अनेक लोग घायल हुये। खुन की धारायें बहने लगी। वीर मैदान में खुन से लथपथ गिरने लगे जैसा घमासान युद्ध हो रहा है। रिपब्लिकन दल में हिंसावादी परप्रांतिय दलाल मौजूद थे। इतना होने पर बाबूजी अपने विचारों से जरा भी पिछे नहीं हटे।इस युद्ध के पश्चात भविष्य में उनका सच्चा इतिहास निर्माण हो रहा था। अधिवेशन शांतिपूर्ण सम्पन्न हुआ। विरोधीयों के आंतक, उत्पाद, रक्तपात करने पर भी लाखों की संख्या में जनता ने अधिवेशन में भाग लिया था।

**शांती दूत बाबू हरिदास आवले :** 20 जनवरी, 1959 को ब्रम्हदेश की सर्वोच्च न्यायालय के सर न्यायाधीश और विश्व बौद्ध परिषद के अध्यक्ष माननीय यू–चान–टून का नागपुर में आगमन हुआ। उस समय स्वागतकर्ता बौद्ध समाज, जिनका नेतृत्व बाबूजी और उनके सहयोगी अनेक कार्यकता शामिल थे। विरोधी भाईयों ने स्वागतकर्ता बौद्धों पर शस्त्र और पत्थरों की वर्षा की थी। इस युद्ध के समय बाबूजी भगवान बुद्ध की शांति अहिंसा के प्रतीक के रूप में अपने समुदाय को शांत रखने में पूर्ण सफल रहे। इस समय हमलवार थक गये थे। स्वागतकर्ता बौद्धों की विजय हुई।

शांति अहिंसा का प्रयोग सफल हुआ। गुडों की पराजय तथा नैतिक पतन हुआ। उस समय बाबूजी नागपुर रेल्वे स्टेशन के सामने एक टॅक्सी में बैठे हुए माननीय अतिथि यू–चान–टून की प्रतिज्ञा कर रहे थे। इतने में गुंडों ने बाबूजी के मोटर को शस्त्रों सहीत घेर लिया था। यह युद्ध की रणभूमी में बाबूजी अपने विचारों से जरा भी विचलीत नहीं हुये।वहां पर गुंडों ने जंबिया से वार करना चाहा, लेकिन बाबूजी ने उसपर दया करते हुए उसे शांत किया। गुंडा न जाने क्यों स्वाभाविक ही लज्जित होकर पीछे हट गया। लोगों ने गुंडे को पकडने का प्रयास किया। तब बाबूजी ने कहा, "इसे जाने दो वह स्वयं एक दिन अवश्य पश्चाताप करेगा।" वास्तव में जब कभी आज उस गुंडे को बात करने का अवसर प्राप्त होता है तो वह बाबूजी के प्रति आदर प्रकट करता है। बाबूजी के रवैये के कारण पत्थर दिल मानव हृदय में भी परिवर्तन होता है। यह इस बात का सुंदर अनुपम उदाहरण है।

**छोटीशी कुटिया में निवास :** इतने महान विचारों का प्रणेता एक छोटीशी कुटिया में रहता था। हरिदास नगर स्थित कमाल चौराहे के पश्चिम की ओर बस्ती में जाने पर अंतिम भाग पर मजदूर गरीब बस्ती में एक छोटासा मकान दिखाई देता था। यह अॅड. बाबू हरिदास आवले का घर था। बाबूजी जैसे धम्मरक्षक के इस मकान को देखकर कोई भी नया आदमी मान्य नहीं करेगा की बाबूजी ऐसे घर में रहते थे। बाबूजी की गृहस्थी जेष्ठ बंधू रामदास बाबू जो जिला कचेरी में टायपिस्ट थे उनके भरोसे चलती थी। कोई ज्ञात व्यक्ति यह कहेगा की बाबूजी तो पूर्व एम.एल.ए. थे। उनका मासिक वेतन कहा जाता होगा? इस प्रश्न के उत्तर में एक उदाहरण देना आवश्यक है।बाबूजी का त्यागपूर्ण जीवन का उदाहरण इसके लिए पर्याप्त हो सकता है। महाराष्ट्र विधान परिषद् का कुछ माह का मानदेय भत्ता आदि कुल मिलाकर रू.1000/– (रूपये एक हजार केवल), 1960 में मिला था। घर के लोग आशा लगाए बैठे थे कि, बाबूजी घर गृहस्थी के लिए कुछ आर्थिक सहायता करेंगे। लेकिन उन्होंने तो अपना पूरा जीवन जनसेवा में समर्पित कर दिया था। उनको गृहस्थी की ओर देखने का समय कहां था? उनको दो कन्या, एक पुत्र और पत्नी की व्यवस्था करने का समय ही नहीं मिलता था। इन्हें मानदेय भत्ता मिलते ही 500 रूपया एज्युकेशन सोसायटी और 100 रूपया अकोला के संस्थान को दान दिया था। बाकी रूपये से किताबें खरीद ली थी।[9]

कर्मवीर का हृदय मानवप्रेम से भरा हुआ था। शत्रू के लिए भी वे उसी तरह बर्ताव करते थे, जैसे अपनों के लिए किया जाता है। अतः उनके पास पहुंचने पर शत्रू भी अपने आपको धन्य अनुभव करता था। इसी कारणवश इतने महान संकटों से गुजर जाने के

पश्चात उनका संगठन अधिक बलशाही हो गया था। त्याग और तपस्या के कारण बाबासाहेब के ध्येय, धोरण, तत्वज्ञान, सिद्धांत निति जो कम्युनिस्टों के साथ बैठक समाप्त करने का तथाकथित कहनेवाले नेताओं ने रचा था। उनके पंजों से जनता को बचाकर निस्ःवार्थी बुद्धी से जनसेवा कर रहे थे।

**सिद्धांतों की लड़ाई :** बाबू हरिदास आवले डॉ. बाबासाहेब आंबेडकर के बताये सिद्धान्तों से कभी भटकते नहीं थे और बड़े से बड़े विद्वानों से भी सिद्धांतों के लिए लड़ पड़ते थे। यह बात उनके जीवन में घटी घटनाओं से हम उसको समझ सकते है। एक दिन कॉमरेड ए.बी. बर्धन साहेब नागपुर जिला ॲडव्होकेट बार असोसिएशन के रूम में पधारे तब बाबूजी ने बर्धन साहेब से हालचाल पूछा। कुशलक्षेम की बात होने पर बाबूजी कम्युनिस्ट आंदोलन के बारे में बर्धन साहब से वार्तालाप करने लगे तब बर्धन साहेब बोले, "हमारा आंदोलन तो रोटी, कपडा और मकान के लिए रहता है।" तब बाबूजी बर्धन साहब को तपाक से बोले, "बर्धन जी, मैं आपके सभी कार्यकर्ताओं को रोटी, कपड़ा और मकान मुहैय्या करा सकता हूँ। तब बर्धन साहेब बोले वो कैसे? बाबू आवले बोले, 'सभी कम्युनिस्ट कार्यकर्ताओं को अगर जेल भेज दिया जाये तो रोटी, कपड़ा और मकान की समस्या चुटकी में हल हो जायेगी लेकिन वहां स्वतंत्रता नहीं मिलेगी।' डॉ. बाबासाहेब आंबेडकर के आंदोलन और कम्युनिस्ट आंदोलन में यही फर्क है।[10] आंबेडकरी आंदोलन रोटी, कपड़ा और मकान के साथ–साथ आदमी को लोकतांत्रिक तरिके से स्वतंत्र विचार रखने की अनुमति मांगता है। और कम्युनिस्ट हुकूमशाही, आदमी की स्वतंत्रता दबाने की बात करता है। यही आंबेडकरी आंदोलन और कम्युनिस्ट आंदोलन में फर्क है। यह बात हंसी मजाक में समाप्त हो गयी। इस बात से हमें यह पता चलता है, कि बाबूजी मजाक में भी अपने आंदोलन की बात कितनी बुनियाद के साथ रखते थे।उस समय नागपुर मध्यप्रदेश की राजधानी थी। उसके मुख्यमंत्री पंडित रविशंकर शुक्ला थे। आवळे बाबूजी के पिताजी व्यवसाय के कारण रायपूर में स्थायिक हुए थे। इस कारण पंडित रविशंकर शुक्ला से उनकी पहचान थी। बाबूजी उन्हें चाचाजी कहकर पुकारते थे।एक समय की बात है, आवले बाबू और उनकी पत्नी लष्करीबाग, नागपुर का अपना बांस का मकान मिट्टी से छाप रहे थे। उस समय पंडित रविशंकर शुक्ला का आगमन हुआ। आवले बाबू बनियान पर ही थे। उनका शरीर भी मिट्टी से भरा हुआ था। उस समय पंडित रविशंकर शुक्ला उनके घर आए। उनसे कहा, "तु मेरे बेटे के समान है। तेरा राजकीय और सामाजिक दबाव है। तू नेता है। मै तुझे मंत्रिमंडल में शामिल करता हूँ। इस झोपड़ी में रहने की अपेक्षा बंगला देता हूं।" इसपर आवले बाबू ने उत्तर दिया कि, "मै इस झोपड़ी में सुख–समाधान से रहता हूँ। मै डॉ. बाबासाहेब आंबेडकर का अनुयायी हूँ। मुझे मंत्री बनना होगा तो परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर के सपनों की सरकार आने के बाद मंत्री बनूगा। तुम्हारे गुलामी का बंगला नहीं चाहिए।" इसपर पंडित रविशंकर शुक्ला ने कहा, 'तु जैसा उपर से काला है वैसा ही भीतर से भी काला है। और वे गुस्से से गाड़ी में बैठकर निकल गए।[11]

इस प्रकार घर पर चलकर आए मंत्री बनने के अवसर को बाबूजी ने ठुकरा दिया। आज का नेतृत्व मंत्री बनने के लिए गुलामी स्वीकार करने को तैयार है। और उसके लिए अपनी पार्टी की अपेक्षा दूसरे के पार्टी की चिंता करना अपना कर्तव्य समझता है। इसके लिए अपनी पार्टी को गिरवी रखता है। उसके ताल पर नाचता है। कभी अछूतों की बस्ति में आंबेडकरी विचारों के विरोधी जाने की हिंमत नहीं करते थे। वहां पर आंबेडकरी विचारों के विरोधी सामाजिक संगठनाओं की शाखाएं लगना शुरू हुई है। इसके लिए रिपब्लिकन पार्टी का नेतृत्व जिम्मेदार है।

**दीक्षा भूमि पर भगवान बुद्ध का स्तंभ :** सभी को मालूम होगा की नागपुर की पवित्र दीक्षाभूमि पर भगवान गौतम बुद्ध का स्तंभ एक रात में बाबूजी के नेतृत्व में तैयार किया गया था। उस समय सरकार की तरफ से दीक्षाभूमि स्तंभ के बारे में नोटीस निकला था कि यह स्तंभ संस्था के कौनसे पदाधिकारी ने स्थापित किया। उसी ने इसकी जिम्मेदारी लेनी चाहिए की, यह स्तंभ मैने बनवाया है। "किसी ने जिम्मेदारी नहीं ली तो, यह स्तंभ नोटीस के तिसरे दिन तोड दिया जाएगा।" बाबूजी ने यह जिम्मेदारी स्वयं पर लेकर कहा कि, 'यह स्तंभ मैने बनवाया है। सरकार मुझे दंडीत करे या सजा दे, मैं उसे भोगने के लिए तैयार हूं।" बाबूजी पर सरकार की ओर से कोई कार्यवाही नहीं हो सकी।[12] नागपुर की जिस भूमि पर बाबासाहेब ने धम्मक्रांति की थी वह पवित्र दिक्षाभूमी बौद्धों को दि जाये इसके लिए दिनांक 21 जुलाई, 1960 को बंबई विधान परिषद् में बाबू हरिदास आवले इन्होंने मुख्यमंत्री यशवंतराव चौहान के सामने प्रस्ताव रखा था।[13] इस प्रस्ताव में यशवंतराव आंबेडकर ने उपप्रश्न पूछा था कि दिक्षाभूमि की जगह किसे दी जाएगी? इसपर बाबू हरिदास आवले ने उत्तर देते हुए हा था कि, "अध्यक्ष महाराज यह दीक्षाभूमि किसे देनी चाहिए इसके बारे में अत्यंत प्रामाणिक रूप से मैनें अपने विचार रखे है। और अब भी रखना चाहता हूँ। भारतीय बौद्ध महासभा को यह भूमि न दी जाय यह मेरी कदापी मंशा नहीं है। भारतीय बौद्ध महासभा जिसके अध्यक्ष सम्माननीय सदस्य भैय्यासाहेब आंबेडकर है वह अगर बौद्धों का विश्वास संपादन करती है तो वह भूमी उनको देने में मुझे कोई आपत्ति नहीं है। इसके अलावा दूसरी एक भारतीय बौद्ध महासभा और है जिसके सेक्रेटरी माननीय वामनराव गोडबोले जी है, जिन्होंने दीक्षा समारोह की व्यवस्था की थी उस भारतीय बौद्ध महासभा को यह जमीन दी गई तो भी मुझे कोई आपत्ती नहीं है। इसके अलावा नागपुर में 'परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिति' नाम की एक संस्था है। उसको भी यह भूमी दी गई तो मुझे आपत्ती नहीं है। जो संस्था लोगों के पैसों का अपव्यय नहीं करती, रजिस्टर्ड है और अपने हिसाब–किताब ठिक रखती है। संस्था का काम उसके बॉयलॉज (संविधान) के अनुसार चलता है। उस संस्था की सारी बाते देखकर यदि सरकार को समाधान हो तो उसे या और कोई नई संस्था निर्माण हो, जो जनता का विश्वास संपादन करे और जनकल्याणकारी कार्य कर सके, उसे भी सरकार यह भूमि दे, दे तो भी मुझे कोई आपत्ति नहीं है।

इसके विषय में मै और क्या कहू? वास्तव में यह भूमि किसको दी जानी चाहिए इसका निर्णय करना सरकार का काम है यह सरकार को ही तय करना है। मैं बौद्ध हूं। एक बौद्ध के नाते जितनी सेवा मैं कर सकता हूँ, उतनी करने का प्रयास करता हूँ। यह भूमि चाहे यशवंतराव आंबेडकर को दी जाय या और किसी को दी जाय उससे मुझे कोई सरोकार नहीं।'' विधान परिषद् में दीक्षाभूमि की जमीन बौद्धों को सौपने हेतु अॅड. बाबू हरिदास आवले के प्रामाणिक प्रयास से पता चलता है कि बौद्ध धम्म के प्रति उनकी कितनी आस्था थी। यह भूमि आगे चलकर बौद्धों की पवित्र भूमि बने यहीं उनकी प्रामाणिक मंशा रही है। आज उनकी यह मंशा साकार हो चुकी है।

**समता सैनिक दल का कार्य :** अॅड. बाबू हरिदस आवले ने 1940 से समाजकार्य शुरू किया। डॉ. बाबासाहेब आंबेडकर द्वारा स्थापित समता सैनिक दल में एक सच्चे आंबेडकरी सैनिक की हैसियत से समाजकार्य करते रहे और एक कुशल संघटक, अनुशासनप्रिय सैनिक के साथ ही कार्यकर्ता को प्रशिक्षण देकर समाजसेवा के लिए कार्यकर्ताओं को तैयार करने का काम किया। डॉ. बाबासाहेब आंबेडकर के दर्शन पर प्रामाणिक निष्ठा होने के कारण 1957 में बाबू हरिदास आवले को ऑल इंडिया समता सैनिक दल का राष्ट्रीय अध्यक्ष बनाया गया।[14]

**जेल में बंद किया गया :** 1948 में गांधीजी की हत्या के बाद राजकीय संघटनाएं और समता सैनिक दल पर बंदी लगाई गयी थी। समता सैनिक दल के **कार्यकर्ता बाबू हरिदास आवले, हरबाजी गोंडाणे, टी.बी. काबले, होलूजी खापर्डे** आदि कार्यकर्ताओं को रायपुर की जेल में बंद किया गया था।[15]

इस समय बाबासाहेब आंबेडकर ने भाऊराव गायकवाड को पत्र लिखा कहा था कि[16], ''समता सैनिक दल पर बंदी लाई गई होगी, कुछ कार्यकर्ताओं को जेल में डाला गया होगा फिर भी मैं इसे बंद करने के पक्ष में नहीं हूं। यह बंदी अधिक दिनों तक रहनेवाली नहीं है। इतना तो कष्ट सहना ही चाहिए।''बाबू हरिदास आवले 1957 में समता सैनिक दल के अध्यक्ष रहे। इनके मार्गदर्शन में अनेक समता सैनिक शारीरिक, मानसिक और बौद्धिक दृष्टि से प्रशिक्षित हुए थे।

**कामठी में समता सैनिक दल की दहशत :** बौद्ध बनने के बाद बौद्धों ने मंदिर में जाना बंद कर दिया था। वे बुद्धधम्म के अनुसार आचरण करने लगे। उन्होंने अपना स्वतंत्र अस्तित्व निर्माण किया जिसके कारण सवर्णों में खलबली मची थी। कल के अछूत आज सीना तानकर चलते है यह सवर्णों को बर्दाश्त नहीं होता था। जिसके कारण आए दिन बौद्धों पर अत्याचार की घटनाओं में वृद्धी होती रही।

आवले बाबू के सम्बन्ध में एक घटना बताना आवश्यक है। कामठी में दादासाहेब कुंभारे के सामाजिक कार्य में आंबेडकरी विचारों के विराधी लोग अडंगा डालने का काम किया करते थे। इस दृष्कृत्य को रोकने के लिए उन्होंने अॅड. बाबू हरिदास आवले से बात की थी। इसे रोकने के लिए बाबू हरिदास आवले ने कार्यकर्ताओं की सभा बुलायी और कामठी में जो सवर्ण गुंडा दादासाहेब कुंभारे के आंदोलन में दहशत फैलाया करता है उस विट्ठल उस्ताद को सबक सिखाने की भी योजना बनायी। इसके तहत कुछ समता सैनिक दल के सैनिकों को कामठी भेजा था। इस योजना का पता गुंडों तक चलने से वे शांत रहे। इससे पता चलता था की दादासाहेब कुंभारे के गुप्त सभा में गुंडों को प्रत्येक घटना की खबर देनेवाला व्यक्ति बैठा रहा होगा। जिसकी पूरी खबर उन तक पहुंचती रही इसलिए बाबू हरिदास आवले ने किसी को न बताते हुए तीन व्यक्तियों को इस मिशन पर लगाया और किस प्रकार उनको कार्य करना है इसकी योजना उन्होंने तीनों को बतायी थी। यह तीन व्यक्ति थे लिलाधर माटे, वासुदेव गाणार और राजाराम गणवीर। उस ऊंचे पुरे सवर्ण गुंडे विट्ठल उस्ताद को सबक सिखाने के लिए यह तीनों समता सैनिक दल के सैनिकों ने सुबह वह गुंडा विट्ठल उस्ताद काम पर निकला तो उसे घेरकर बेरहम पिटा और मर गया समझकर छोड़ दिया। यह खबर जब बस्ती में पता चली तो उन्हें पकड़ने के लिए लोग दौडने लगे। **यह समता सैनिक भी भागे किंतु लिलाधर माटे और राजाराम गणवीर पकडे गये। वासुदेव गाणार भागने में सफल हुए इन्होंने अॅड. दादासाहेब कुंभारे को को जाकर यह घटना बतायी। अॅड. दादासाहेब कुंभारे ने पोलिस की मदत से सवर्णों की चुंगल से समता सैनिक लिलाधर माटे और राजाराम गणवीर दोनों को छुडवाया।**[17]

इस घटना से कामठी शहर में दहशत फैल गयी। समता सैनिक दल की कामठी में दहशत निर्माण होने से किसी सवर्णों की दुबारा हिम्मत नहीं हुई। किसी देहात में हो रहे अन्याय अत्याचार की खबर आवले बाबू को जब पता चलती थी वे तुरंत समता सैनिक दल के कार्यकर्ताओं को वहां भेजते थे। उस समय सवर्णों में यह डर पैदा हो गया था कि, इनके लोगों पर अत्याचार किए तो यह लोग हमें जान से मार देंगे। इस प्रकार जनता का हौसला बढ़ाने का महान कार्य समता सैनिक दल के माध्यम से अॅड. हरिदास आवले बाबू करते रहे।

**दीक्षाभूमि का विकासकार्य :** पवित्र दीक्षा भूमी बौद्धों को धार्मिक कार्य करने के लिए दी जाय। ऐसा ठराव बाबूजी ने 21 जुलाई, 1960 को बंबई विधान परिषद् में रखा था। तब सरकार ने कुछ दिन के बाद यह दिक्षा मैदान बौद्धों को दिया। पवित्र दीक्षाभूमी पर ''धम्मचक्र प्रवर्तन दिन'' मनाने के लिए और प.पू. बाबासाहेब आंबेडकर के दर्शन लेने के लिए जनता एक जगह आती है। दीक्षाभूमी के संचालकों की ओर से दिक्षाभूमि पर डॉ. बाबासाहेब आंबेडकर का पुतला बनाया नहीं गया था। इस कमी की भरपाई करने के लिए जनता की ओर से एक एक पैसा जमा करके बाबासाहेब का सुंदर पुतला बाबूजी के नेतृत्व में तैयार किया गया और वह पुतला स्मारक समिति के अध्यक्ष कर्मवीर दादासाहेब गायकवाड को दीक्षा भूमि पर जनता के दर्शन के लिए दान किया गया।भगवान बुद्ध का स्तंभ और प.पू. बाबासाहेब का सुंदर पुतला बौद्धों के दर्शन के लिए दीक्षाभूमी पर बनाने का महत कार्य बाबूजी के हाथों से होना बहुत बड़ी बात है। बाबूजी के अंतःकरण की प्रेरणा से निर्माण हुआ यह कार्य आज भी पवित्र दीक्षाभूमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर की मूर्ति के रूप में जीवित है।अॅड. हरिदास बाबू आवले ने विदर्भ में कम्युनिस्ट विचारधारा को बड़ी मात देकर रिपब्लिकन पार्टी को संकट से बचाया था इस बात को साधारण आदमी भी मान्य करेगा। यह सारा श्रेय आदरणीय बाबूजी को ही है। उन्होंने सारा संघर्ष अपने कांधे पर लेकर बाबासाहेब के सिद्धांत की रक्षा करने का प्रण किया था। विरोधी कम्युनिस्ट नीति को अपनाने वाले माननीय आर.डी. भंडारे ने बाबूजी पर आरोप लगाया था कि इन्होंने स्वतंत्र बौद्ध स्थान मांगा था। यह भाषण देने से उनको दंड हुआ था। यह

समाचार प्रबुद्ध भारत समाचारपत्र में प्रकाशित हुआ था। तब बाबूजी ने नागपुर न्यायालय में मानहानी का दावा किया था। इस केस में हर एक को 300 रूपया जुर्माना हुआ था। जुर्माना न देने पर हर एक को 3 माह के कारावास की सजा भुगतने का निर्णय माननीय न्यायाधीश महोदय ने दिया था। यह मामला धारा 500 के अंतर्गत चलाया गया। फैसला दिनांक 27.12.1962 स्थानिक समाचारपत्रों में प्रकाशित हुआ था। तथाकथित नेताओं पर बाबूजी ने पच्चीस हजार रूपया मानहानी का दावा किया था। लेकिन माननीय दादासाहेब गायकवाड आदि ने पवित्र दीक्षा भूमि पर भगवान बुद्ध के मूर्ती के सामने दिनांक 28.9.1963 को वंदना के समय प्रतिज्ञा की ''हम आपस के मतभेद भूल गए है'' इसलिए ऐसे निःस्वार्थ, कठोर, कर्तव्यनिष्ठ, त्यागी बाबूजी ने यह उपरनिर्दिष्ट दावा वापस ले किया।

**धम्मदीक्षा को अवैध ठहराया गया। :** रिपब्लिकन पार्टी के अंतर्गत राजनीतिक झगडे हो जाने से परम पूज्य डॉ. बाबासाहेब ने दी हुई ''धम्मदीक्षा'' नागपूर हाइकोर्ट बेंच ने अवैद्य घोषित की थी। उसमें बौद्ध दीक्षार्थी पूर्व न्यायाधीश भवानीशंकर नियोगी शामिल थे। लेकिन बाबासाहेब की कार्यप्रणाली पर निष्ठा रखनेवाला कर्मवीर बाबूजी आवळे ने प्रण कर लिया था कि, हमारे पूजनीय शास्ता परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर के उपर भारत देश का कोई भी आदमी किचड़ नहीं उडा सकता। हम जान की बाजी लगाकर ''बौद्ध धम्म दीक्षाविधी'' पर किचड नहीं लगने देंगे। ऐसा दृढ़ संकल्प के मुताबिक उन्होंने कार्य करके बतलाया है।

**महाराष्ट्र विधान सभा का निर्वाचन क्षेत्र 190 नागपूर नं.3 अनुसूचित जाति की आरक्षित जगह के लिए 27 फरवरी, 1962 को हुए चुनाव में डॉ. डी.पी. मेश्राम चुनकर आए परंतु वे बौद्ध थे। वे अनुसूचित जाति के लिए आरक्षित सीट से चुनाव कैसे लड़ सकते है? यह प्रश्न निर्माण करके पंजाबराव शंभरकर ने उनके विरूद्ध कोर्ट में केस दायर की।** उच्च न्यायालय तक यह मामला गया। हायकोर्ट ने डॉ. बाबासाहेब आंबेडकर की बौद्ध दीक्षा के बारे में जो निर्णय दिया उस कारण भारत की विशेषतः महाराष्ट्र की नवबौद्ध जनता में संभ्रम निर्माण हुआ। वह निर्णय था, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर ने बुद्ध धम्म की जो दिक्षा दी थी वह धम्म दीक्षा विधी नहीं थी। वह एक राजकीय सभा थी।'' नागपुर उच्च **न्यायालय के बेंच के न्यायाधीश कोतवाल और गोखले के समक्ष अपने बयान में डॉ. डी.पी. मेश्राम ने बताया कि, ''मै बौद्ध नहीं महार ही हूं'' डॉ. बाबासाहेब आंबेडकर को दिक्षा देने का अधिकार नहीं था। यह दिक्षा कानूनन नहीं।** हायकोर्ट के पूर्व न्यायाधीश और गुरूबंधू कहलाने वाले भवानी शंकर नियोगी ने समस्त बौद्ध जनता के सामने कानून का पेचप्रसंग निर्माण करके न्यायालय के सामने बौद्ध जनता और डॉ. बाबासाहेब आंबेडकर की मानहानी की थी।

इस कारण बौद्ध समाज जागृत हुआ और यह बौद्ध समाज पर लगा कलंक धोकर निकालने के लिए ॲड. हरिदास बाबू आवले आगे आए उनके साथ बौद्ध समाज संपूर्ण ताकत के साथ खड़ा रहा।अपने अनुयायीयों के बालते हुए हरिदास आवले ने कहा, ''बौद्ध धम्म की दीक्षा लेने के बाद हम महार ही ऐसा जाहीर करना यह बात गलत है। हमारे भाईयों ने बुद्ध धम्म और समाज की पर्वाह नहीं की। हम महार है, इतना ही नहीं बल्कि हम बावणे, लाडवण, कोसरे, बारके, आंधवन कहलवाने वाले लोग आज समाज में विद्यमान है। आगे भी रहेंगे, ऐसा डर निर्माण किया जा रहा है। उन्होंने इससे आगे कहा, **''न्यायमूर्ती कोतवाल का निर्णय देखकर हमारा यह स्पष्ट मानना है कि, उनका उद्गार बौद्ध धम्म का आंदोलन जड़ से समाप्त करनेवाला है। बौद्ध धम्म और डॉ. बाबासाहेब आंबेडकर का धार्मिक स्थान कायम रखने के लिए इन उद्गारों को धो डालना चाहिए।** इस महान और पुण्य कार्य के लिए प्रत्येक बौद्ध ने, बाबासाहेब के अनुयायीयों ने आपस के सारे मतभेद भुलकर सर्वोच्च न्यायालय में जाने के लिए तन–मन–धन से सहायता करनी चाहिए।''

सुप्रिम कोर्ट के सामने, सर्वोच्च न्यायालय में डॉ. डी.पी. मेश्राम ने अपना मत रखा कि, **''लाखो लोग गावों से इस समारोह में आए थे, उनको पिने का पानी देने के लिए जलप्रदाय विभाग में मैं कार्यरत था।** यह प्रसिद्ध विद्वान वकील सेटलवाड के युक्तीवाद के सामने वे टिक नहीं पाए और सर्वोच्च न्यायालय ने मेश्राम को बौद्ध घोषित किया।नागपुर हाईकोर्ट बेंच के न्यायमूर्ती कोतवाल और गोखले के निर्णय का अभिप्राय इस प्रकार था, ''यदि यह सारे सबूत मान्य किए जाने समान है फिर भी यह विधी करने से ही कोई आदमी और उसका परिवार पिढ़ियों से मानते आ रहा धर्म छोड़ने के लिए विधिवत समर्थ है ऐसा कैसे माना जा सकता है? हम यह भी नहीं समझ पा रहे है कि, धर्म कैसे स्विकार सकते है? .... ''त्रिसरण, पंचशील और 22 प्रतिज्ञा के बारे में बोलना पड़ता तो हमे उलटे ऐसा लगता है कि, वह केवल सामुदायिक सभा के लिए ही खास तौर पर बनाए गए थे। और यह तिनों विधी महार जाति के लोगों की भावना उद्दिपित करने के लिए ही कही गई।'' ..... ''डॉ. आंबेडकर समान राजकीय नेता की ओर से की गई थी। इस बात को ध्यान में रखते हुए ऐसा लगता है कि, यह सभा धर्मदीक्षा समारोह की नहीं थी। यह अन्य किसी भी उद्देश्य के बिना स्वेच्छा से बौद्ध धर्म ग्रहण समारोह न होकर अछूतों का सामाजिक आर्थिक पिछड़ेपण के विरूद्ध रोष बतानेवाली सभा थी।''सर्वोच्च न्यायालय के न्यायाधिश माननीय पी.बी. गजेन्द्रगडकर के साथ न्यायाधिश माननीय के.एन. वांछू, माननीय एम. हिदायतुल्ला, माननीय रघुवीर दलाल, माननीय जे.आर. मुधोळकर इत्यादी ने निर्णय दिया कि[18],

1)14 अक्टूबर, 1956 को डॉ. बाबासाहेब आंबेडकर के द्वारा सम्पन्न हुआ समारोह प्रामाणिक दिक्षा समारोह था।

2)एक उपासक होकर भी उन्हें दिक्षा देने का अधिकार था। कोई भी बौद्ध उपासक अबौद्ध इन्सान को बौद्ध धम्म में उसका स्विकार कर सकता है।

3)त्रिसरण, पंचशील द्वारा धर्म ग्रहण की प्रकट घोषणा भी धर्म परिवर्तन के लिए पर्याप्त है।

यह निर्णय दिनांक 27 अक्टूबर, 1964 को प्रसिद्ध हुआ था। अपने निर्णय के अभिप्राय में सर्वोच्च न्यायालय ने भी स्पष्ट किया है कि, इस घटना से यही सिद्ध होता है कि, बौद्ध धम्म ग्रहण करने के बाद भी केवल अपने वैयक्तिक स्वार्थ के लिए इस प्रकार के विरूद्ध मार्ग का **स्वीकार करके जनता को कुमार्ग पर ले जाकर उनका सर्वनाश करना है। जिसे आप लोग महापुरूष कहते है ऐसे पूजनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर के**

**कार्य आप मिट्टीपलीत करने के प्रयास में थे।** इस घटना के कारण ऐसा ध्यान में आता है कि, आप कितना भी सच कह रहे होगे फिर भी सारे सबूत यही गवाही देते है कि आप (डी.पी. मेश्राम) बौद्ध धर्मीय है।'' ''हायकोर्ट द्वारा दिए गए निर्णय को निरस्थ करके चुनाव अधिकारी के निर्णय को फिर से मान्यता देते है।''सर्वोच्च न्यायालय के निर्णय से पंजाबराव शंभरकर को विजयी घोषित किया गया और वे विधायक बने या डी.पी. मेश्राम की हार होकर उनकी विधायकी गयी इसे बौद्ध समाज की दृष्टी से विशेष महत्व नहीं है। डॉ. बाबासाहेब आंबेडकर ने 14 अक्टूबर, 1956 को की ऐतिहासिक धम्मक्रांति, धर्मपरिवर्तन दिन यह भारत के सर्वोच्च न्यायालय द्वारा भी बौद्ध धर्म दिक्षा का दिवस निश्चित किया गया।

भारत के सुप्रीम कोर्ट का निर्णय जाहीर होने के बाद नागपुर की जनता ने कर्मवीर बाबू हरिदास आवले को **''धम्मरक्षक'' की उपाधी देकर उनका सम्मान किया था।** लेकीन यह बात उनको अच्छी नहीं लगी जिसे उन्होंने स्पष्ट रूप से बतलाया यह धम्मरक्षक की उपाधी मेरे लिये अयोग्य बात है। आप लोगों में कितना ही बड़ा नेता क्यों न हो, तो भी यह किताब उनको देना ठीक नहीं है।यह बौद्ध धम्म रक्षण का महान कार्य बाबूजी ने जान की बाजी लगाकर पूर्ण किया है। इसलिए उनको बौद्ध जनता कोटी–कोटी धन्यवाद देती रहेगी। बाबूजी का महान त्याग, धैर्य देखकर जनता में फैला हुआ असंतोष दूर हो गया है। दीक्षाविधी समारोह और परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर के कार्य को लगाया हुआ कलंक बाबूजी ने अथक मेहनत करके धो डाला। **बाबूजी अपने भाषणों में कहते थे कि ''बौद्ध धम्म की दीक्षा लेकर मै महार ही हूँ, ऐसा कहनेवाला दुष्ट पुरूष फिर से पैदा नहीं होना चाहिए।''**

**कर्मवीर बाबू हरिदास आवले ने 2 दिसम्बर, 1964 को धम्मचक्र प्रवर्तन स्थल सारनाथ से घोषणा की थी कि, ''मैं जो बोलूंगा वह मै नहीं बोलूंगा। मैं जो बोलूंगा वह भगवान बुद्ध तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर बोले थे वह बोलूंगा। यह बोलने से दूनिया की कोई भी शक्ति मुझे रोक नहीं सकती।''**

**पुस्तक प्रेमी अॅड. हरिदास आवले :** बाबूजी के निजी ग्रंथालय में अनेक प्रकार की पुस्तकें थी जो विज्ञान, कानून, समाजविज्ञान, राजनीति, दर्शन, धर्म, कला और साहित्य से संबंध रखती थी। जब भी वे किसी शहर में जाते थे कई पुस्तकें अवश्य खरीद लेते थे।[19]

**विदर्भ सेनानी बाबू हरिदास आवले :** परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर द्वारा लिखित ''राज्य पुनर्रचना'' ग्रंथ के मूताबिक बाबूजी पृथक विदर्भ का आदोलन चला रहे थे। लेकिन बाबासाहेब के सच्चे अनुयायी कहनेवाले इसके विरूद्ध जाकर जनता में अपना स्थान कायम रखने की कोशिश कर रहे थे। कुछ भाई कांग्रेस में शामिल हो गये है। लेकिन आज विदर्भ की जनता जागृत हो गई है। अब विदर्भ का बच्चा–बच्चा विदर्भ राज्य हासिल करने के लिए, अपना बलिदान देने के लिए कटिबद्ध हो गया है।

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर ने कहा था कि, जब तक अल्पसंख्यांक जनता राजसत्ता प्राप्त करके शासन की बागडोर अपने हाथों में नहीं लेगी, तब तक उनकी उन्नति नहीं होगी। इसलिए भारत में छोटे–छोटे राज्य स्थापित होना चाहिये। ऐसा महान संदेश इस ग्रंथ के द्वारा बाबासाहेब ने दिया है। इसलिए बाबूजी और उनके साथीदार अपनी ताकत के मुताबिक बाबासाहेब के विचार जनता के सामने रखते हुए कार्य कर रहे थे। **विदर्भ राज्य मिलाने के लिए बाबूजी 9 अगस्त, 1970 को एक हजार कार्यकर्ताओं के साथ दिल्ली गये थे।** यह बात इतिहास में पहली बार हुई है। बाबूजी ने भारत के राष्ट्रपती महामहीम वी.वी. गिरी और माननीय प्रधानमंत्री इंदिरा गांधी को विदर्भ राज्य बनाने के संबंध में एक निवेदन पेश किया था। उसमें कहा है कि, विदर्भ की जनता विदर्भ राज्य का कार्यभार संभालने के याग्य हो गई है। ''हम विदर्भ का जापान समान विकास करेंगे।'' इस प्रकार बाबू हरिदास आवले ने भारत की प्रधानमंत्री माननीया इंदिरा गांधी के सामने रखे थे। बाबूजी कहते थे कि, ''विदर्भ का बालक जन्म लेते ही जय विदर्भ जय भारत कहेगा।''[20]

पृथक विदर्भ क्रांति की ज्वला अपने वीर साथीदारों के साथ सन् 1972 के अंत तक पूरी करेंगे। ऐसी प्रतिज्ञा करके यह पृथक विदर्भ राज्य बनाने की उन्होंने आवाज लगाई थी। भविष्य में परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जनता यह पूजनीय महान ग्रंथ ''राज्य पुनर्रचना'' का चिंतन करते हुए, जयविदर्भ का आवाज बुलंद करेगी। यह बात बाबूजी कहते थे। उनकी भविष्यवाणी कब तक पूरी होगी यह भविष्यकाल ही बतलायेगा।बाबूजी का जनता में श्रद्धायुक्त स्थान है। उनकी कर्मठ सेवा, त्याग बलिदान के बल पर उन्होंने अपने लिए जनता के दिल में विशेष स्थान प्राप्त कर लिया। इस प्रकार बाबूजी भगवान बुद्ध के धम्म की, स्थित प्रज्ञा, शांती, अहिंसा के पूर्ण रूप से प्रतीक और परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर के सच्चे निष्ठावंत अनुयायी थे। बाबूजी एक अध्ययनशील, भविष्यदृष्टा नेता थे। उनके विचारों में सदैव स्फुर्ती थी। इनका वक्तव्य विचारों का खाद्य था। बाबूजी माने हुये वक्ता थे। इनके जीवनकाल में जो महाभयंकर घटनायें घटित हुई उससे वे जरा भी विचलीत नहीं हुये, न अपने स्थान से हटे, इससे यह सिद्ध होता है की बाबूजी विरक्त वृत्ति के महामानव थे। इतनी शांती, संयम तथा सहनशीलता सर्वसाधारण आदमी में देखने को नहीं मिलती।

**रिपब्लिकन एकता :** परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर ने 59 वर्ष पूर्व नागपुर में बौद्धधम्म की दीक्षा दी थी। इस धम्मभूमी में बाबूजी और बैरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे के बीच सामाजिक और राजनीतिक झगड़े चल रहे थे। इन्होंने 1970 के धम्मचक्र प्रवर्तन के शुभ अवसर पर यह संघर्ष खत्म कर डाला। बाबूजी रिपब्लिकन पार्टी आंबेडकरवादी के अध्यक्ष थे। माननीय दादासाहेब गायकवाड की रिपब्लिकन पार्टी ने कांग्रेस यूती पसंद कर ली थी। बैरिस्टर खोब्रागडे और अन्य साथीदारों को लगता था कि, कांग्रेस के साथ यूती करने से कांग्रेस समाज और पार्टी को भविष्य में खत्म कर देगी। कांग्रेस रिपब्लिकन युती खत्म होने के बाद माननीय दादासाहेब गायकवाड और बैरिस्टर राजाभाउ खोब्रागडे के बीच गहरी दरार पड़ गई थी। यह बात आंबेडकरवादी रिपब्लिकन पार्टी के अध्यक्ष और अॅड. हरिदास आवले बाबू और उनके अन्य साथीओं ने सोचा

कि, "रिपब्लिकन पार्टी के बीच जो दरारे दिन–ब–दिन बढ़ती जा रही है यह बात बाबासाहेब के अनुयायीयों के लिए ठिक नहीं है।" उसे एकता के रूप में 1970 के धम्मचक्र प्रवर्तन दिवस के अवसर पर मिटा देने का बाबू आवले ने निश्चय किया था।

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर के रिपब्लिकन पार्टी के भीतर एक गूट के बजाय चार गुट हो गये है। यह बात बाबूजी को अच्छी नहीं लगने के कारण उन्होंने "रिपब्लिकन पार्टी की एकता" करने में मैं सफल हो जाउंगा, ऐसा निर्धार करके सभी गुटों के नेताओं से पार्टी की एकता के लिए प्रयास शुरू किया। "रिपब्लिकन पार्टी (एकता)" का मंडप दैनिक पत्र तरूण भारत और नागपुर टाइम्स छापखाने के बीच में डाला था। उसपर शुभ्रवस्त्रधारी दो चिन्ह् लहरा रहे थे। आज के पवित्र दिन में नागपुर शहर में रिपब्लिकन पार्टी की एकता होने जा रही है, यह हवा भारत देश के कोने कोने में फैल गई थी। नागपुर शहर में हर प्रांत के नेतागण उपस्थित हो गये थे। रिपब्लिकन पार्टी एकता का वातावरण निर्माण करने के लिए रात–दिन की परवाह न करते हुए बाबूजी और अन्य नेतागण प्रयास कर रहे थे। ऐसे समय दादासाहेब गायकवाड की गिरी हुई हालत हो जाने के बाद रिपब्लिकन पार्टी का ताज दूसरे के सर रखना दादासाहेब को पसंद नहीं था।सारी परिस्थिति का निरीक्षण करने के बाद बैरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे और ॲड. हरिदास बाबू आवले ने एक पार्टी में आने का फैसला किया। यह बात नागपुर शहर में हवा की तरह फैल गई। परमपूज्य डॉ. बाबासाहेब के मिशन को आगे बढ़ाने के लिए सब बुद्धीवादी नेताओं ने एक झंडे के नीचे आना पसंद कर लिया था। एक कार्यकर्ता की हैसियत से कार्य करने की उनकी कार्यशैली प्रभावदर्शक थी वे अनुशासान प्रिय होने के कारण उनके कर्यों में कठोरता थी। उनके भाषणों की प्रभावशीलता से विरोधी घबरा जाते थे। जिसकी वजह से उन्हें कई बार जेल में बंद किया गया। उनपर कोर्ट केसेस चलाएं गए। उनके कार्य से समाज में नवचेतना निर्माण होती थी और विरोधियों में घबराहट पैदा होती थी।

**बाबू हरिदास आवले और बैरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे में एकता और सत्कार :** नागपुर शिवराज नगर के रिपब्लिकन पार्टी के अधिवेशन में एक ही मंच पर बैरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे के नेतृत्व में ॲड. हरिदास बाबू आवले एक जगह आने के बाद जनता में बहुत हर्ष दिखाई दे रहा था। यह संघर्ष कोई व्यक्तिगत नहीं था। यह बाबासाहेब आंबेडकर के सिद्धांत की लड़ाई थी। भविष्य में माननीय दादासाहेब गायकवाड की पार्टी एक जगह आ जायेगी ऐसा आशावाद आवले बाबू ने शिवराज नगर के अधिवेशन में व्यक्त किया था। सन् 1970 के धम्मचक्र प्रवर्तन के दिन रिपब्लिकन पार्टी एकता के मंच पर हरिदास बाबू आवले का बहुत बड़ा सम्मान किया गया था। उस सन्मान के उत्तर में बाबूजी ने चंद शब्दों में कहा था कि[21], 'हमारे एकमेव पूजनीय नेता बाबासाहेब आंबेडकर ऐसे नीतिमान चारित्र्यवान थे की, उनके चारित्र्य पर कोई भी सज्जन आदमी किचड़ नहीं उछाल सकता। इसी प्रकार मंच पर बैठे रिपब्लिकन पार्टी के नेताओं ने पूज्य बाबासाहेब आंबेडकर का आदर्श सामने रखते हुए चरित्रवान होने की प्रतिज्ञा करनी चाहिए।" "आज आप और हम मिलकर एक हजार गुना काम क्यों न हो, लेकिन बाबासाहेब ने बताये हुये सिद्धांत, दर्शन जैसा ही रिपब्लिकन पार्टी का कार्य होना बहुत जरूरी बात है। रिपब्लिकन पार्टी को आगे बढ़ाने के लिए, मुझे अपनी जान का बलिदान देने का समय आया तो भी मैं अपने जान का बलिदान देने का आश्वासन देता हूँ।"उन्होंने आगे कहा कि, मेरे जीवन का अंत इसके पहले होने का समय आया था लेकिन मैं आज तक जीवित हूँ। यह मेरा जीवन जैसे मुद्दल रक्कम के उपर ब्याज रहता है, वैसा है। और उस ब्याज के जीवन पर मेरा कोई अधिकार नहीं है। यह मेरे जीवन पर परमपूज्य डॉ. बाबासाहेब के अनुयायीयों का पूर्ण अधिकार है। यह मैं ध्यान में रखकर मेरा जीवन समाजहित और पार्टी हित के लिए समर्पण करने का निर्णय लिया है।

सत्कार समारोह में दिया हुआ वचन पुरा करने के लिए दिनांक 6 मार्च, 1971 के लोकसभा मध्यावधि चुनाव में ऑल इंडिया रिपब्लिकन पार्टी के अधिकृत उम्मीदवार ॲड. कर्मवीर हरिदास आवले **नागपुर–उमरेड लोकसभा क्षेत्र में चुनाव के लिए खडे थे।** उनका चुनाव चिन्ह् घोडा था। उनका प्रतिनिधित्व प्रभावी था। वह परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर के ध्येय धोरण के सच्चे नेता थे। बाबासाहेब के विचार पर बाबूजी की बड़ी निष्ठा और श्रद्धा थी।इस चुनाव में जनता का उत्साह तारिफे काबिल था हर जगह बस्ती–बस्ती में घोडे के अलावा कोई दुसरा उनके मुकाबले नजर नहीं आ रहा था। 6 मार्च, 1971 चुनाव की घडी नजदीक आ रही थी। प्रचार सभाओं का जोर बढ़ता जा रहा था।

**सभा में उमडी भीड़ :** इंदोरा से कमाल चौक के रास्ते के बीच बुद्धनगर के सामने रास्ते पर सचदेव फोटो स्टूडिओ है। उस दूकान के सामने चबुतरा बना हुआ था। उस चबुतरे पर ॲड. हरिदास बाबू आवले की प्रचार सभा रखी गयी थी। रात 8.00 बजे दुकान बंद होने के बाद सभा शुरू हुई। उस समय मंच पर बाबू हरिदास आवले, पंजाबराव शंभरकर, राजाभाऊ शंभरकर आदि नेता उपस्थित थे। सभा में अपार भीड हेने के कारण बसों का मार्ग बदल दिया गया था। बाबू हरदास आवले का भाषण शुरू हुआ। उन्होने अपने भाषण में कहा[22], **"पार्लमेंट में जाने के बाद सबसे पहले मैं दिक्षाभूमि पर बुद्ध विश्वविद्यालय की स्थापना करूँगा।"** यह कहते ही उनका सिर माईक पर चिपग गया आवाज बंद हो गयी किसी की समझ में नहीं आ रहा था कि अचानक यह क्या हो गया। वे नीचे गीरने ही वाले थे कि वहा उपस्थित कार्यकर्ताओं और बैरिस्टर खोब्रागडे आदि ने उन्हें संभाल लिया तथा तुरंत अस्पताल ले गये। उनको अस्पताल ले जाते समय रास्ते में ही उनका 2 मार्च, 1971 का 55वर्ष की आयु में निधन हो गया।बाबूजी का जीवन राजकीय, धार्मिक, सामाजिक संघर्ष करते करते ही खत्म हो गया है। यह एक सैद्धांतिक, नैतिक, तत्वनिष्ठ नेता थे। इनके चले जाने के बाद समाज और भारत देश की बहुत बड़ी हानि हुई।3 मार्च, 1971 को उनकी अंतिम यात्रा निकली। उस अंतयात्रा में 3 लाख से भी अधिक लोग शामिल हुए थे। जनता अपनी डबडबायी आखों से आवळे बाबू को अंतिम बिदायी दे रही थी। हलकी बुदाबांदी हो रही थी। प्रकृती भी आवळे बाबू को अश्रुपूरीत श्रद्धांजली अर्पण कर रही है ऐसा आभास हो रहा था। उन्हें जब अग्नि देने की बात आयी और किसी ने कहा कि, आवले बाबू के लडके को बुलाओं' इस समय बैरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे आंसू पोछते हुए सामने आये और कहा, "मै उसका लड़का हूँ मैं उनके देह को अग्नी दूंगा।" उनकी अंतयात्रा में शामिल लाखों जनता ने यह साबित कर दिया की आवळे बाबू के प्रती नेताओं की दुर्भावना स्वार्थवश थी।

उन्होंने रिपब्लिकन पार्टी और समाज को दिया हुआ वचन चुनाव के संग्राम में पूरा किया। कर्मवीर, धर्मवीर विदर्भ सेनानी बाबूजी आवले रिपब्लिकन पार्टी को मैं इमानदार रहूंगा ऐसा जनता को बतलाते हुए यह विदर्भ वीर संग्राम सेनानी जनता जनार्दन को छोड़कर चले गये।

**उपसंहार :** बाबू हरिदास आवले ने डॉ. बाबासाहेब आंबेडकर के सभी आंदोलनों में एक साधारण सैनिक के तौर पर भाग लिया। उन्होंने कभी भी किसी भी पद और सत्ता की लालसा नहीं रखी। इससे दूर रहने में ही उन्होंने धन्यता मानी। तब और आज भी रिपब्लिकन पार्टी के अनेक नेता सत्ताधारियों के तलवे चाटकर समाज को गिरवी रखकर पद और सत्ता प्राप्त करते है। इस महान बुद्धीवादी, त्यागी, चारित्र सम्पन्न, निष्ठावान, धम्मरक्षक, ध्येयवादी बाबू हरिदास आवले से प्रेरणा लेकर इनके मार्ग पर चलने का प्रण करनेवाले कार्यकर्ता और नेता ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर का आंदोलन रूपी रथ आगे लेकर जा सकते है।

**संदर्भस्रोत –**

1)जामगडे विनायक, ॲड. बाबू हरिदास आवळे गौरव विशेषांक, कर्मवीर बाबू हरिदास आवळे विचार प्रबोधन मंच, नागपुर, पृष्ठ सं.31
2)खापर्डे वसंत, ॲड. बाबू हरिदास आवळे गौरव विशेषांक, कर्मवीर बाबू हरिदास आवळे विचार प्रबोधन मंच, नागपुर, पृष्ठ सं.17
3)डॉ. संजय गजभिए, धम्मक्रांति से धम्मस्तूप तक, सम्यक प्रकाशन दिल्ली, 2019, पृष्ठ सं.665
4)वही, पृष्ठ संख्या 666
5)आवळे दीक्षित, ॲड. बाबू हरिदास आवळे गौरव विशेषांक, कर्मवीर बाबू हरिदास आवळे विचार प्रबोधन मंच, नागपुर, पृष्ठ सं.14
6)डॉ. संजय गजभिए, धम्मक्रांति से धम्मस्तूप तक, सम्यक प्रकाशन दिल्ली, 2019, पृष्ठ सं.667
7)वही, पृष्ठ सं.668
8)वही, पृष्ठ सं.668
9)वही, पृष्ठ संख्या 670
10)वही, पृष्ठ संख्या 671
11)वही, पृष्ठ संख्या 671
12)थूल कृष्णा, बाबू हरिदास आवळे गौरव विशेषांक, कर्मवीर बाबू हरिदास आवळे विचार प्रबोधन मंच, नागपुर, पृष्ठ सं.64
13)वही, पृष्ठ सं.67
14)जामगडे विनायक, बाबू हरिदास आवळे गौरव विशेषांक, कर्मवीर बाबू हरिदास आवळे विचार प्रबोधन मंच, नागपुर, पृष्ठ सं.31
15)खापर्डे वसंत, ॲड. बाबू हरिदास आवळे गौरव विशेषांक, कर्मवीर बाबू हरिदास आवळे विचार प्रबोधन मंच, नागपुर, पृष्ठ सं.17
16)डॉ. संजय गजभिए, धम्मक्रांति से धम्मस्तूप तक, सम्यक प्रकाशन दिल्ली, 2019, पृष्ठ सं.673
17)लोखंडे भालचंद्र, ॲड. बाबू हरिदास आवळे गौरव विशेषांक, कर्मवीर बाबू हरिदास आवळे विचार प्रबोधन मंच, नागपुर, पृष्ठ सं.40–41
18)डॉ. संजय गजभिए, धम्मक्रांति से धम्मस्तूप तक, सम्यक प्रकाशन दिल्ली, 2019, पृष्ठ सं.675–77
19)डॉ. एम.आर. आवळे, ॲड. बाबू हरिदास आवळे गौरव विशेषांक, कर्मवीर बाबू हरिदास आवळे विचार प्रबोधन मंच, नागपुर, पृष्ठ सं.19
20)डॉ. संजय गजभिए, धम्मक्रांति से धम्मस्तूप तक, सम्यक प्रकाशन दिल्ली, 2019, पृष्ठ सं.678–679
21)वही, पृष्ठ संख्या 681
22)आवळे दीक्षित, कर्मवीर बाबू हरिदास आवळे गौरव ग्रंथ, कर्मवीर बाबू हरिदास आवळे विचार प्रबोधन मंच, नागपुर, पृष्ठ सं.16

## *हरिदास बाबू आवळे यांचे विदर्भातील समता सैनिक दलातील योगदान*

*प्रा. डॉ. चंद्रशेखर संपतराव पाटील*
*इतिहास विभागप्रमुख*
*डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यु.एस. महाविद्यालय*

***सारांश :****डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या मानवमुक्तीच्या लढ्याला अस्पृश्य समाजाचे संरक्षण मिळावे यासाठी स्थापन झालेल्या समता सैनिक दलासारख्या शिस्तबद्ध संघटनेचा परिचय आवळे बाबूंना विद्यार्थी जीवनापासून आला. ते समता सैनिक दलाच्या संघटनेकडे आकर्षित झाले. मध्य प्रांत वऱ्हाडातील अस्पृश्य समाजावर सवर्णांकडून होणाऱ्या अन्वनित शोषणाला थांबविण्यासाठी त्यांनी 'समता सैनिक दला'चा एक सैनिक म्हणून कार्यास सुरुवात केली. मध्य प्रांत वऱ्हाडातील समता सैनिक दलाचे झुंजार सेनानी बाबू हरदास एल.एन. यांचे 12 जानेवारी 1939 रोजी कामठीला निधन झाले. त्यांच्या निधनामुळे समता सैनिक दलाच्या कार्याची अपरिमित हानी झाली. ही हानी पुढे बाबू आवळे यांनी भरून काढली.*

***शब्दसंकेत :****अखिल भारतीय समता सैनिक दल, मध्य प्रांत वऱ्हाड, कुशल संघटक, अ.भा. दलित बहिष्कृत परिषद, अस्पृश्य, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, कॅम्प, समता गॅझेट, निमलष्कर, गुप्तहेर, ऑल इंडिया वर्किंग कमेटी, धर्मांतर, शिबिर, प्रेसिडियम.*

***संशोधन पद्धती :ऐतिहासिक संशोधन पद्धततीचा अवलंब करण्यात आलेला आहे.***

***प्रस्तावना :****डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गाला मानवीय मूलभूत हक्क प्राप्त व्हावेत याकरिता लोकशाही मार्गाने अनेक सत्याग्रह केलेत. त्यात महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह नाशिक, अंबादेवी मंदिर सत्याग्रह अमरावती इ. महत्त्वपूर्ण होते. त्यात महाडचा सत्याग्रह हा मानवमुक्तीचा प्रथम सत्याग्रह होता. अस्पृश्य समाज हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली संघटित होत होता. म्हणूनच अस्पृश्य समाजातील सेवानिवृत्त सुभेदार व सैनिक यांच्याशी विचारविमर्श केला व अस्पृश्य बांधवांच्या संरक्षणाकरिता अस्पृश्य उद्धाराच्या चळवळीला मजबुती प्रदान करण्यासाठी सुभेदार सैनिकांनी मनाचा निश्चय केला. त्यांच्या कल्पनेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संमती दर्शविली.*

***मध्य प्रांत व वऱ्हाड प्रांतात समता सैनिक दलाची स्थापना व विस्तार :****''महाडच्या सत्याग्रहाच्या पाच दिवसांपूर्वी म्हणजेच रविवार 13 मार्च 1927 रोजी मुंबईमध्ये सुभेदार सवादकर यांच्या सहकार्याने समाज समता सैनिक दलाची स्थापना करण्यात आली.''[1] 'अखिल भारतीय समता सैनिक दल' या नावाने संघटना नावारूपस आली. संघटनेचा प्रचार व प्रसार जलद गतीने होऊ लागला. दलाचा विस्तार होऊ लागला म्हणूनच मुंबई येथील समता सैनिक दलाच्या मेळाव्यात सैनिकाचा विस्तार पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते की, ''समता सैनिक दलाच्या शाखा फक्त मुंबईतच नसून त्याचा प्रचार व प्रसार सी.पी.मध्ये प्रांतादी निरनिराळ्या प्रांतात सुरू आहे.''[2]*

*डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या समता सैनिक दलाच्या विस्तृत कार्याचा परिचय मध्य प्रांत व वऱ्हाडातील विशेषतः नागपुरातील अस्पृश्य पुढाऱ्यांना झाला म्हणूनच समता सैनिक दलाचे कार्य सुव्यवस्थितपणे पार पडावे व समता सैनिक दलाच्या शाखा स्थापन व्हाव्यात या हेतूने (मध्य प्रांत वऱ्हाड) नागपुरात समता सैनिक दल कार्यकारी मंडळाचे गठन 14 जानेवारी 1932 रोजी करण्यात आले. या कार्यकारिणीमध्ये विठ्ठल नगरारे, पुंडलिक भोईर, विठ्ठलराव साळवे, बाबू हरदास एल.एन., पतितपावन दास, रेवाराम कवाडे, आर.आर. पाटील, वाय.टी. गायकवाड, रामटेके आणि ए.जी. मानके इत्यादींचा समावेश होता.[3]*

***हरिदास बाबू आवळे यांचा समता सैनिक दलात प्रवेश आणि कार्य :****डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दलाच्या कार्याचा परिचय मध्य प्रांत व वऱ्हाडातील कार्यकर्त्यांना झाला होता. ते अशिक्षित असले तरी निष्ठावंत होते. त्यामुळेच दलाचे कार्य सुरळीतपणे पार पडावे यासाठी वाकर रोड, नागपूर येथे सभा घेण्यात आली. पुढे दलाचे कार्यालय उत्तर नागपुरातील मिल कामगार राहत असलेल्या अस्पृश्यांच्या नवा नकाशा या वसाहतीमध्ये उघडण्यात आले. या कार्यालयात दलाच्या*

शाख सर्वत्र स्थापण्याच्या संदर्भात अनेक सभा घेण्यात आल्या. यादरम्यान समता सैनिक दलाच्या विस्ताराकरिता जे अहोरात्र झटत होते. त्यात विद्यार्थी म्हणून हरिदास बाबू आवळे यांचाही समावेश होता. ते स्वतः समता सैनिक दलाचा पोशाख घालून, हातात झेंडा घेऊन परेड करीत असत व सर्व सैनिकांस शिस्तीने वागण्यास शिकवित. ते स्वतः बौद्धिक वर्ग घेऊन आंबेडकरी तत्त्वज्ञानाची ओळख करून सैनिकांना प्रशिक्षित करीत असत.[4]

बाबू आवळे हे समता सैनिक दलातील सक्रिय कार्यकर्ते, कुशल संघटक असल्यामुळेच समता सैनिक दलाचे कार्य मध्य प्रांत व वऱ्हाडामध्ये गतिमान झाले. त्यामुळेच त्यांनी सामाजिक कार्य करणाऱ्या तरुणांना प्रशिक्षण देवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान सांगून युवकांना सामाजिक संघर्ष करण्यासाठी तयार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.[5] हरिदास बाबू आवळे 1942 ला समता सैनिक दलाचे प्रांतिक अध्यक्ष बनले व नंतर मध्य प्रांत वऱ्हाडात समता सैनिक दलाचा विस्तार व्हावा याकरिता रात्रंदिवस झटत राहिले.

**अ.भा. समता सैनिक दलाच्या प्रथम राष्ट्रीय अधिवेशनातील बाबू आवळे यांचे कार्य :** संपूर्ण भारतातील अस्पृश्यांना संघटित करण्यासाठी नागपूर शहरी अ.भा. दलित बहिष्कृत परिषद दि. 17 ते 19 जुलै 1942 ला आयोजित केली. या परिषदेप्रसंगी समता सैनिक दलाचे प्रथम राष्ट्रीय अधिवेशनसुद्धा घेण्यात आले होते. परिषदेच्या यशस्वितेकरिता बाबू आवळे हे पूर्णवेळ समता सैनिक दलाचे कार्यकर्ते असल्यामुळे त्यांनी रात्रंदिवस फिरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे लोण अस्पृश्य समाज असलेल्या खेड्यापाड्यात, जिल्हा, तहसिलीत सभा–संमेलने, शिबिरे घेऊन पोहचविले. त्यामुळेच दलाच्या शाखा स्थापन झाल्यात व हजारोंनी सैनिक 1942 च्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या स्थापनेच्या वेळी त्या परिषदेत हजर होते.[6]

मध्य प्रांत व वऱ्हाडातील समता सैनिक दलाचे संघटन कौशल्य, शिस्त, अनुशासन बघून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले की, ''तुम्ही ही कल्पना मुंबईपासून उसनी घेतली पण संघाच्या विस्तारामध्ये मुंबईला किती तरी मागे टाकलेले आहे हे प्रत्यक्ष दिसत आहे. त्यामुळे ही संघटना चालू ठेवावी एवढेच नव्हे तर प्रत्येक प्रांतात तिच्या शाखा उघडाव्यात व दलित वर्गातील प्रत्येक तरुण तिचा सभासद होईपर्यंत तिचा विस्तार करण्यात आला पाहिजे.''[7]

समता सैनिक दलाचे प्रथम राष्ट्रीय अधिवेशन यशस्वी करण्यासाठी बाबू आवळे यांनी अविश्रांत परिश्रम घेतले. त्यामुळेच अधिवेशनप्रसंगी मध्य प्रांत वऱ्हाडातील सैनिक मोठ्या संख्येने शिस्तीने उपस्थित होते याची प्रचिती स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आली व त्यांनी प्रशंसासुद्धा केली. ते म्हणालेत की, ''मध्य प्रदेशात उभारण्यात आलेले हे स्वयंसेवकाचे विस्तृत दल पाहून मला फार आनंद होत आहे. प्रथमतः हे स्वयंसेवकाचे विस्तृत दल 1927 साली मुंबईत सुरू करण्यात आले होते. आपल्या सर्वसामान्य चळवळीचा समता सैनिक दल हा एकसंघ असा विभाग आहे. आपल्या चळवळीचे ते एक अत्यंत भक्कम असे साधन आहे.'[8]

अ.भा. समता सैनिक दलाच्या प्रथम राष्ट्रीय अधिवेशनप्रसंगी अनेक महत्त्वपूर्ण ठराव संमत करण्यात आले. समता सैनिक दलाचा राष्ट्रीय पातळीवर विस्तार होण्यासाठी पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. समता सैनिक दलाचे अध्यक्ष सरदार गोपालसिंग यांनी बाबू आवळे यांचे मध्य प्रांत व वऱ्हाडातील कार्य बघून त्यांना मध्य प्रांत वऱ्हाड समता सैनिक दलाचे अध्यक्ष नियुक्त केले व त्यांच्या नेतृत्वात खालील पदाधिकाऱ्यांची कार्यकारिणी गठीत केली. 1. एच.डी. आवळे, रायपूर (अध्यक्ष) 2. ए.एल. कोसारे, नागपूर (कार्यकारी अध्यक्ष) 3. नीलकंठराव बागेश्वर – जनरल सेक्रेटरी 4. डब्लू.एल. वाघमारे, नागपूर (कमाडिंग अधिकारी) 5. एस.ए. गायकवाड, अकोला – सदस्य 6. देविदास सो. सहारे, हिंगणघाट – सदस्य आणि 7. पुरुषोत्तम वैद्य, गोंदिया – सदस्य.[9]

**समता सैनिक दल नागपूर शिबिरातील हरिदास बाबू आवळे यांचे कार्य :**

समता सैनिक दलाचा हा कॅम्प नागपूरजवळ कोराडी मुक्कामी कोलार नदीच्या निसर्गरम्य परिसरात 26 ते 28 नोव्हेंबर 1944 ला तीन दिवसीय घेण्यात आला. शिबिरात समता सैनिक दलाचे

*प्रांतिक शाखेचे अध्यक्ष हरिदास बाबू आवळे तसेच अ.भा. समता सैनिक दलाचे जनरल सेक्रेटरी आर.आर. पाटील, प्रांतिक जनरल सेक्रेटरी नीलकंठ वागेश्वर दलाचे कमांडर डब्ल्यू.एल. वाघमारे हे उपस्थित होते. शिबिराचे अध्यक्षस्थानी डॉ. डी.पी. मेश्राम हे होते. त्यांच्या हस्ते शेकडो सैनिकांच्या उपस्थितीत ध्वजारोहण झाले. तसेच नागपूर नगर फेडरेशनचे अध्यक्ष एस.एल. कासारे इत्यादी शे.का. फेडरेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.*[10]

### *हरिदास बाबू आवळे यांचा समता सैनिक दल कामठी–कन्हान शिबिरातील सहभाग :*

*आंबेडकरी चळवळीतील झुंजार सेनानी बाबू हरिदास एल.एन. यांनी समता सैनिक दलात बजावलेल्या उल्लेखनीय कार्याचा परिचय दलाच्या सैनिकांना व्हावा या हेतूने दि. 14–15 जानेवारी 1947 ला दोन दिवसीय शिबिराचे आयोजन एल.एन. हरदास यांच्या स्मारकाजवळ कन्हान नदीच्या तीराजवळ करण्याचे ठरले असून या शिबिराला अ.भा. समता सैनिक दलाचे अध्यक्ष श्रीमान सुबय्या साहेब, आंध्रप्रदेश हजर राहतील तर कॅम्पचे उद्घाटन बाबू आवळे मध्य प्रांत व वऱ्हाड समता सैनिक दलाचे अध्यक्ष यांच्या हस्ते होईल असे घोषित करण्यात आले.*[11]

*या दोन दिवसीय शिबिरात आवळे बाबू व त्यांच्या दलाचे सर्व पदाधिकारी दोन दिवस शिबिरार्थीसोबत निवासी राहिलेत व त्यांना सर्व प्रकारचे प्रशिक्षण व मार्गदर्शन त्यांनी केले. समता सैनिक दलाच्या या शिबिरात सहभागी झालेला प्रत्येक शिबिरार्थी चारित्र्यसंपन्न बनावा व एक आदर्श नागरिक म्हणून त्यांनी समाजात समता प्रस्थापित करण्याकरिता कसोशीने प्रयत्न करावा. तसेच आंबेडकरी चळवळीशी एकनिष्ठ राहून आंबेडकरी संगठन वाढविण्यास मदत करावी यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केला.*[12]

### *अ.भा. समता सैनिक दलावर निर्बंध, बाबू आवळे यांना कारावास व सुटका :*

*हरिदास बाबू आवळे हे कुशल संघटक असल्यामुळेच मध्य प्रांत वऱ्हाडमध्ये समता सैनिक दलाचा विस्तार झाला. दलाचे कार्य सुरळीत सुरू असतानाच 30 जानेवारी 1948 रोजी महात्मा गांधींची हत्या झाली. त्यामुळे देशात अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले. गांधीच्या हत्येमागे एखाद्या राजकीय संघटनेचा किंवा संस्थेचा कट असेल अशी तत्कालीन सरकारची धारणा होती आणि म्हणूनच मध्य प्रांत वऱ्हाड प्रांतिक सरकारने 10 फेब्रुवारीच्या गॅझेटमध्ये एक हुकूम काढून समता सैनिक दल, बजरंग दल, शिवाजी दल, राष्ट्रीय स्वयंसेवक दल ही निमलष्करी स्वरूपाची तीन स्वयंसेवक दले बेकायदा ठरविल्याचे जाहीर केले. त्या संघटनेवर प्रांतिक सरकारने प्रतिबंध घातला.*[13]

*मध्य प्रांत वऱ्हाड समता सैनिक दलातील अस्पृश्य पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना तत्कालीन प्रांतिक सरकारने 9 फेब्रुवारी 1948 ला रात्री तीन वाजता अटक केली. त्यात मध्य प्रांत वऱ्हाड शेड्युल कास्ट फेडरेशन सरचिटणीस समता सैनिक दलाचे अध्यक्ष बाबू हरदास आवळे अ.भा. समता सैनिक दलाचे मुख्य कार्यवाह आर.आर. पाटील मध्य प्रांत वऱ्हाड शेड्युल कास्ट स्टुडन्ट फेडरेशनचे अध्यक्ष एन.एच. कुंभारे तसेच नवी शुक्रवारी येथील मारोतराव मुरारकर, सुखदेवे, धंदे, हरिश्चंद्र वासनिक, एल.बी. शेंडे, सुपरिटेन्डेट महादेव निकोसे, बाबुराव रामटेके कामठीतील लहू नितनवरे, जे.टी. बावनगडे, वाय.बी. गायकवाड, भानखेडा येथील काशीनाथ राजाराम किटके अशा एकंदर चौदा कार्यकर्त्यांना पकडले होते.*[14]

*समता सैनिक दलावर प्रांतिक सरकारने बंदी घालून बाबू आवळे व त्यांच्या विश्वासू कार्यकर्त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. या घटनेचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला होता व बी.के. गायकवाड यांना 16 मार्च 1948 ला पत्र पाठविले. त्यात डॉ. आंबेडकरांनी तत्कालीन प्रांतिक सरकारवर टीका केली. डॉ. आंबेडकर म्हणतात की, ''हंगामी सरकारने एका संस्थेवर बंदी घालणे योग्य मानले म्हणून एखादी संस्था विसर्जित करणे पूर्णपणे चुकीचे आणि भेकडपणाचे आहे. जर समता सैनिक दलाच्या काही सभासदांना अटक आणि तुरुंगवास झाला तर त्यांनी सहन केले पाहिजे.*[15]

*बाबू हरिदास आवळे हे दि. 8 सप्टेंबर 1948 ला सुटणार म्हणून साऱ्या नागपूर शहरात वंदता होती. आनंदाने पुलकित होऊन सकाळपासूनच समता सैनिक दलाच्या सैनिकांनी त्या दिवशी जेलच्या फाटकावर पहारा दिला पण सायंकाळचे सात वाजेपावेतो बाबूच्या आगमनाची वाट पाहावी लागली. सात*

*महिन्याच्या खडतर कारावासानंतर शेवटी हरिदास बाबू आवळेंची सुटका झाली. आनंदी जनतेने त्यांचे भव्य स्वागत केले व पुष्पमाला अर्पण केल्या. याप्रसंगी भाऊराव बोरकर, बी.एस. सेक्रेटरी कोतवाल कामगार युनियन लक्ष्मण गजभिये, रामचंद्र नगरारे, आकांत माटे, एच.बी. गोंडाणे, एन.एच. कुंभारे बी.ए. यांनी त्यांचे स्वागत केले.*[16] *सत्कारप्रसंगी बाबू आवळे यांनी म्हटले की, ''आपल्या साऱ्या अस्पृश्यांचे पुढारी फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. त्यांनी स्थापन केलेल्या संस्थेचा आदर इभ्रत, मानमरातब राखणे हे आपले आद्यकर्तव्य ठरते. त्यामुळे मानवमुक्तीच्या लढ्यात प्रत्येक स्वयंसेवकाने, नेत्यांनी पक्षाच्या ध्येयासाठी सारसर्वस्व पणाला लावण्यातच आपल्या आयुष्याची इतिश्री असून त्यातच अस्पृश्यांचे कल्याण आहे.''*[17]

***हरिदास बाबू आवळे यांची धर्मांतर कार्यक्रमातील भूमिका :***

*उत्तर विभागातील पाचपावली या अस्पृश्यांच्या वस्तीत गुप्त सभेचे आयोजन केले होते. या सभेत बाबू आवळे व इतर समता सैनिक दलाचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. सभेला संबोधून बाबू आवळे यांनी म्हटले की, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतर कार्यास कोणत्याच असामाजिक तत्त्वांनी, व्यक्तींनी, संघटनांनी विरोध करू नये. जे धर्मांतर सोहळ्याला विरोध करतील या असामाजिक तत्त्वाचा नायनाट करण्यासाठी नागपुरातील समता सैनिक दलाचे सैनिक सज्ज आहेत.''*[18]

*त्या गुप्तहेर विभागात समता सैनिक दलाचे उंटखाना शाखेचे तरुण स्वयंसेवक सैनिक भालचंद्र लोखंडे यांना स्वतंत्र मजूर पक्षाच्या सदर कार्यालयात ठेवण्यात आले होते. तसेच धर्मांतराच्या दोन दिवसापूर्वी 12 ऑक्टोबर 1956 ला संध्याकाळी नागपुरात बर्डी येथील शेड्युल कास्ट फेडरेशनच्या मुख्यालयात ऑल इंडिया वर्किंग कमेटीची बैठक होती. या कमिटीतील पुढाऱ्यांना संरक्षण प्रदान करावे याकरिता भालचंद लोखंडे व इतर समता सैनिक दलाचे स्वयंसेवक उपस्थित होते. प्रत्यक्ष सहभाग होता.*[19]

*डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ऐतिहासिक धर्मांतर सोहळ्याच्या इतिहास सुवर्णक्षरांनी लिहिल्या जाणार असून भारतात पुन्हा बौद्धधम्माचे पुनरुज्जीवन होणार याकरिता धर्मांतराच्या दिवशी 14 ऑक्टोबर 1956 ला हरिदास बाबू आवळे, बॅ. राजाभाऊ खोब्रागडे तसेच मुंबईचे समता सैनिक दलाचे अध्यक्ष माधव ससाळेकर, बादशहा साळवी आणि इतर पुढाऱ्यांनी दीक्षा मैदानावरील मुख्य पेंडालची पाहणी सकाळी 8 ते 9 च्या दरम्यान केली. कोणत्याही असामाजिक तत्त्वांनी मंडपाच्या खाली बॉम्ब किंवा विनाशक स्फोटके ठेवली तर नाही याची पाहणी केल्यानंतरच सकाळी 10 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पाच लाख अनुयायांसोबत धम्मदीक्षा घेतली. नंतर त्यांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना संबोधित केले. अशा प्रकारे ऐतिहासिक धर्मांतर सोहळा संपन्न झाला*[20] *धर्मांतराचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडावा याकरिता मध्य प्रांत वऱ्हाड समता सैनिक दलाचे प्रमुख ॲड. हरिदास बाबू आवळे व इतर समता सैनिक दलाचे स्वयंसेवक यांनी प्रयत्नाची पराकाष्ठा करून धर्मांतर सोहळा यशस्वी करण्यात मोलाची भूमिका बजावली.*

***मध्य प्रांत व वऱ्हाड समता सैनिक दलाचा अकोला येथील मेळावा :***

*डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या धर्मांतरानंतरही देशात नवबौद्धांवर ठिकठिकाणी अन्याय–अत्याचार, शोषण इत्यादी नित्याचाच घटना होत्या. त्यामुळे हजारो कुटुंब उद्ध्वस्त होत असत. अशा परिस्थितीत असहाय नागरिकांना ताबडतोब व तत्परतेने राहण्यास निवारा तयार करून देण्याची योजना आखण्याच्या उद्देशाने समता सैनिक दलाचे अध्यक्ष हरिदास बाबू आवळे यांनी एक अभिनव योजना पक्षापुढे मांडली. तिच्यातील एक भाग म्हणजे सर्व सोयीने युक्त अशा झोपड्या बांधणे ही होय. अशी एक झोपडी बांधून दाखविण्याचे प्रात्यक्षिक कार्यक्रमाच्या वेळी झाले. झोपडीत स्वयंपाक खोलीसह एकूण चार खोल्या होत्या. दहा स्वयंसेवकांनी ही खोली उभारली.*[21]

***समता सैनिक दल शिबिर वर्धा जिल्हा आपटी येथील हरिदास बाबू आवळेंचा सहभाग :***

*डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता सैनिक दलाची मुहूर्तमेढ हिंदुस्थानात रोवली असून त्यांच्या अकाली निधनानंतर नागपूर येथील पवित्र दीक्षा मैदानावर 3 ऑक्टोबर 1957 रोजी दहा*

*लाख लोकांच्या मेळाव्यात अ.भा. समता सैनिक दलाच्या चौथ्या अधिवेशनप्रसंगी अ.भा. समता सैनिक दलाच्या अध्यक्षपदाची धुरा सोपविण्यात आली होती. देशपातळीवर दलाचे पुर्नसंघटन व्हावे या हेतूने मान्यवर नेत्यांच्या आदेशाप्रमाणे वर्धा जिल्हा समता सैनिक दलाचे शिबिर आपटी या खेडेगावी दि. 15 व 16 फेब्रुवारी 1958 रोजी घेण्यात आले.*

*समता सैनिक दलाच्या दोन दिवसीय शिबिराकरिता सर्वश्री बाबू हरिदास आवळे अ.भा. रिपब्लिकन पक्षाचे उपाध्यक्ष तसेच अ.भा. समता सैनिक दलाचे नवनियोजित अध्यक्ष आर.आर. पाटील कार्यवाह समता सैनिक दल पी.टी. मधाळे आमदार मुंबई, श्रीमती ईश्वरीबाई हैद्राबाद, भगवतीप्रसाद मौर्य अलीगढ प्रेसिडियम सदस्य हे गणमान्य पुढारी प्रामुख्याने हजर राहणार आहे. मध्य प्रांत वऱ्हाडातील समता सैनिक दलाचे शिबिर वर्धा जिल्ह्याच्या वतीने आयोजित केलेला असून संपूर्ण भारतातील समता सैनिक दलाचे प्रमुख गणमान्य मंडळी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करणार असून सर्वांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा अशी विनंती सर्व स्वयंसेवकांना करण्यात आली होती.*

***निष्कर्ष** :अ.भा. समता सैनिक दलातील बाबू आवळे यांचे कार्य निश्चित तरुणांना भविष्यात प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा प्रामाणिकपणे निःस्वार्थ, निर्भीडपणे समता सैनिक दलाचा कुशल संघटन म्हणून आवळे बाबूंनी आयुष्याच्या शेवटपर्यंत प्रचार व प्रसार केला आणि समता सैनिक दलाची संघटना मजबूत करण्यावर बाबू आवळे यांचा भर होता. त्यामुळेच संपूर्ण भारतात आंबेडकरी चळवळ गतिमान झाली. समता सैनिक दलाच्या संरक्षणामुळेच त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने संपूर्ण भारतात शाखा निर्माण करून विस्तार केला. राष्ट्रीय पातळीवर समता सैनिक दलाची संघटनशक्ती निर्माण होऊ शकली. देशात हजारो वर्षांपासून मानवीय मूलभूत अधिकारापासून मुकलेल्या समाजामध्ये स्वाभिमान, शिक्षण, संघटनशक्ती निर्माण करून सामाजिक ऐक्य प्रस्थापित होऊ शकले. हे बाबू आवळे यांचे उल्लेखनीय कार्य कोणीही नाकारू शकत नाही. म्हणून नागपूरजवळील चिचोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक वस्तूसंग्रहालयाजवळील समता सैनिक दलाच्या प्रशिक्षण केंद्राला ॲड. हरिदास बाबू आवळे यांचे नाव देण्यात आलेले असून त्यांचे सहकारी मित्र एल.आर. बाली यांच्या अध्यक्षतेखाली कोनशिलेचे उद्घाटन करण्यात आले. बाबू आवळे यांचे समता सैनिक दलातील कार्य दलातील सैन्यांना भविष्यातही प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही.*

***संदर्भसूची :***

*1)कांबळे बी.सी. (संपा.), सा. रिपब्लिकन, वर्ष 2 रे, अंक 9, 16 जून 1960, मुंबई*

*2)मून, वसंत (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड 18, भाग 2, पृ. 243*

*3)कोसारे एच.एल., 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास',ज्ञानप्रदीप प्रकाशन नागपूर, प्र.आ. 1984, पृ. 199*

*4)जामगडे विनायक, 'आंबेडकरी चळवळीत ॲड. हरिदास बाबू आवळे यांचे योगदान', डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर, प्र.आ. 2002, पृ. 4–5*

*5)जामगडे विनायक (संपा.), 'ॲड. बाबू हरिदास आवळे गौरव विशेषांक', कर्मवीर हरदास बाबू आवळे प्रकाशन समिती नागपूर, 2 मार्च 2006, पृ. 17*

*6)कित्ता, पृ. 17*

*7)डॉ. गाजरे मा.फ., (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड 1,अशोक प्रकाशन नागपूर,1981,पृ. 97*

*8)कित्ता, पृ. 97*

*9)अ.भा. समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष गोपालसिंग यांनी मध्य प्रांत व वऱ्हाड समता सैनिक दलाचे ज. सेक्रेटरीला पाठविलेले, नागपूर दि. 23 फेब्रु. 1942 ला हरिदास बाबू आवळे अध्यक्षच्या नियुक्तीचे पत्र – खाजगी संग्राहक भालचंद्र लोखंडे*

*10)जामगडे विनायक (संपा.), 'ॲड. बाबू हरिदास आवळे गौरव विशेषांक', 2 मार्च 2006, पृ. 53*

*11)समता सैनिक दल कार्यकारी मंडळ नागपूर नगरच्या वतीने आर.आर. पाटील जनरल सेक्रेटरी ऑल इंडिया समता सैनिक दल यांच्या माहितीसाठी कामठी–कन्हान शिबिराच्या पूर्वतयारीच्या संदर्भातील, दि. 8 जाने. 1947 दलाचे पत्रक*
*12)जामगडे विनायक (संपा.), 'ॲड. बाबू हरिदास आवळे गौरव विशेषांक', 2 मार्च 2006, पृ. 53*
*13)पान्हेकर सुरेश हरदास, 'नागपूर जिल्ह्यातील महार चळवळीचा इतिहास', अप्रकाशित लघुशोध प्रबंध, एम.फिल. इतिहास, नागपूर विद्यापीठ नागपूर, 1982–83, पृ. 116*
*14)कित्ता, पृ. 116*
*15)निंबाळकर वामन (संपा.), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दादासाहेब गायकवाडांना लिहिलेली पत्रे', प्र. आ. फेब्रु. 2011, प्रबोधन प्रकाशन नागपूर, पृ. 307*
*16)कांबळे बापू चंद्रसेन (संपा.), जनता, अंक 17, वर्षे 12, 25 सप्टेंबर 1948, मुंबई, पृ. 6*
*17)सुखदेवे डी.डब्ल्यू. (संपा.), 'कर्मवीर बाबू हरिदास आवळे यांचा जीवनसंघर्ष', कर्मवीर आवळे प्रकाशन समिती नागपूर, प्र.आ. 1984, पृ. 1*
*18)समता सैनिक दलातील निडर सैनिक भालचंद्र लोखंडे यांची 12/7/2010 ला प्रत्यक्ष घेतलेली मुलाखत*
*19)कित्ता*
*20)कित्ता*
*21)रूपवते दा.ता. (संपा.), प्रबुद्ध भारत सा. (संपा.), वर्ष 2 रे, अंक 46, बुद्धभूषण प्रिटिंग प्रेस मुंबई, जाने. 1958, पृ. 4*
*22)वर्धा जिल्हा समता सैनिक दल कॅम्प आपटी आयोजकातर्फे दि. 15–16 फेब्रु. 1958 रोजीचे शिबिरांच्या यशस्वितेकरिता काढलेले पत्रक, संग्राहक भालचंद्र लोखंडे*
*23)कित्ता, दि. 15–16 फेब्रु. 1958 रोजीचे पत्रक*

# विदर्भातील आंबेडकर चळवळीत दशरथ पाटील यांचे योगदान

**डॉ. अफरोज हनिफ शेख**
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख
श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

**सारांश :** नागपूर जिल्ह्यातील लहानशा गावात जन्माला आलेल्या दशरथ पाटील यांचे संपूर्ण जीवन आंबेडकर चळवळीला वाहून गेलेले दिसून येते. उच्च शिक्षण न घेता समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी धडपड करुन आर्थिक सहाय्य केले. तर त्यांच्या गावामध्ये अस्पृश्यांवर जो अन्याय, अत्याचार झाला त्या विरोधात आवाज उठवून शोषितांना न्याय मिळवून दिला तसेच त्यांच्या रोजगार निर्मितीचा मार्ग मोकळा करुन दिला. यातुनच त्यांच्या नेतृत्वाचा परिचय संपूर्ण समाजाला झाला व ते पुढे आले. तर स्वतंत्र मजुर पक्षाने निवडणुकीचे तिकिट न देताही स्वतःच्या लोकप्रियता व कार्यकतृत्वाच्या भरोशावर विजय मिळविला व पक्षात काम करण्याची इच्छा व्यक्त करुन आपले समाजप्रेम दाखविले. नंतरच्या काळात अनेक महत्वपूर्ण पदे त्यांनी भुषविली व त्याच्या माध्यमातून चळवळीला गतिशील ठेवण्याचे कार्य केले. भारत संत समाज, चोखामेळासारख्या संघटनाच्या माध्यमातून विदर्भातील दलित चळवळीत आपले महत्वपूर्ण योगदान दिले.

**शब्दसंकेत :–** भारतीय डिप्रेस्ड क्लासेस, वर्धा मतदार संघ, स्वतंत्र मजुर पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, समता साप्ताहिक, भारत संत समाज.

**संशोधन पद्धती** : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.

**दशरथ लक्ष्मण पाटील यांचे प्रारंभिक जीवन :–**दशरथ पाटील यांचा जन्म बेला, ता. उमरेड, जि. नागपूर या ठिकाणी झाला. त्यांच्या वडीलांचा शेतीचा व्यवसाय होता. त्यांच्याकडे चार–पाच गावांची मालगुजारी होती. लहानपणापासुनच त्यांना सामाजिक, धार्मिक व राजकीय कार्याची आवड होती. "नागपूरचे फागोजी बन्सोड, कामठीचे एल. एन. हरदास, विठोबा रावजी मुनपंडे, कालीचरण नंदागवळी, ग. आ. गवई व ओगले नेत्यांचा सहवास त्यांना लाभला व सर्वांनी मिळून अस्पृश्यांच्या उत्थानाकरिता पुढाकार घेतला".[1] सन 1920 मध्ये नागपूरला पहिले अस्पृश्य समाजाचे अधिवेशन छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्या कार्यक्रमाला बाबासाहेब आले असतांना उच्च शिक्षित महार समाजाचा नेता म्हणून मध्यप्रांत व वऱ्हाड भागातील बहुतेक पुढारी कार्यक्रमाला हजर होते. स्वतः दशरथ पाटील कार्यक्रम यशस्वी करण्यास झटत होते. अस्पृश्यांना न्याय मिळवून दयावयाचा असेल तर कायदे आवश्यक आहेत यावर पाटलांचा विश्वास होता. दशरथ पाटील हे श्रीमंत असून देखिल त्यांना अस्पृश्यतेचे चटके बसत होते. दशरथ पाटीलांनी दलितोद्धाराच्या कार्यासाठी उच्च शिक्षणाची गरज जाणवू दिली नाही. त्यांनी स्वतः इयत्ता 4 थी पर्यंतच मराठी शिक्षण घेतले व याच प्राथमिक शिक्षणाच्या आधारे दलितांमध्ये स्वाभिमान, आत्मोद्धार, समता या मूल्यांचे बीजारोपण केले.

**बेला येथे अस्पृश्यांचा छळ व दशरथ पाटीलांची भूमिका :–**

नागपूर जिल्ह्यातील बेला हे गाव बोरखेडी स्टेशनवरुन मैलावर बसले आहे. सन 1920 ला नागपूरला काँग्रेसचे अधिवेशन भरले. या अधिवेशनामध्ये महात्मा गांधीच्या असहकार चळवळीचा ठराव मंजुर करण्यात आला होता. त्यामुळे काँग्रेसचे कार्यकर्ते सभासद मोहिम बनविण्याच्या कामात लागले होते. "काँग्रेसचे पुढारी श्री. शेषमल बेल्यात अस्पृश्य लोकांना सभासद बनविण्याचा प्रयत्न करीत होते. ही गोष्ट श्री. दशरथ पाटील, सीताराम पाटील व इतर कार्यकर्त्यांना आवडली नाही व त्यांनी सभा बोलाविली आणि त्यात ठरविले अस्पृश्य समाजाच्या लोकांनी सभासद बनु नये."[2] या प्रश्नावरुन हिंदूनी अस्पृश्यांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. दशरथ पाटीलांनी सुद्धा डॉ. आंबेडकर नवीन संघटना निर्माण करत आहे त्यामुळे सभासदत्व घ्यायचे असल्यामुळे काँग्रेसचे सभासदत्व नाकारले परिणामी शेषमल व कार्यकर्त्यांनी संपूर्ण बाजारात फिरुन कोणत्याही अस्पृश्यांना माल विकायचा नाही तर ज्या महारांची स्वतःची दुकाने होती त्यांना दुकाने लावू दिली नाही. आठवड्याचा बाजार बंद झाल्यामुळे उपासमारीची वेळे लोकांवर आली तेव्हा सर्व अस्पृश्य लोक दशरथ पाटलांच्या वाड्यावर गेले. पाटील म्हणाले "आपण आपल्या लोकांकरिता वेगळे दुकान चालु करु. सध्या ज्वारी, दाळ, मिरची हे घेऊन जा थोडेफार एकमेकाकडून उसने घ्या".[3] दुसऱ्या दिवशी पाटलांनी स्वतः 2000 रु. व इतरांचे 500 रुपये घेऊन बाजूच्या सिंदी रेल्वे येथे बाजार आणण्यासाठी बैलगाड्यांनी गेले. दशरथ पाटलाने अब्दुल करीम बोहराच्या दुकानातुन माल घेतला".[4] हे तेथिल काँग्रेस मंडळी व बेल्याच्या काँग्रेसीच्या माहित होताच मोठ्या संख्येने त्यांनी बोहराच्या दुकानाबरोबर दशरथ पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांवर हल्ला चढवला व त्यांच्या सर्व मालाची नासधुस केली. त्यांना तेथुन आपला जीव वाचविण्यासाठी पळून जावे लागले. अनेक महारांच्या घराच्या झडत्या घेण्यात

आल्या व अनेकांना मारहाणही करण्यात आली. "अशा परिस्थितीत विठ्ठल बूवा गणवीर यांनी पोलीस स्टेशन दंगलीचा व लुटमारीचा रिपोर्ट दिला त्याकरिता त्याने स्त्रिचा वेश धारण केला होता. पोलीसांनी दशरथ पाटील व त्यांच्या 11 साथीदारांना पोलीस ठाण्यात आणून संरक्षण दिले".[5] ही गोष्ट कॉंग्रेसच्या लोकांना कळली ते दशरथ पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना मारुन टाकण्याच्या उद्देशाने जमावासह पोलीस स्टेशनवर गेले त्यांच्या हातात टेंभे, कुऱ्हाडी, भाले व काठ्या होत्या. आलेला जमाव पाहून दरोगासुद्धा पेचात पडला दशरथ पाटलासह पोलीस स्टेशनही जाळणार ही धास्ती त्याला वाटली पण तो जमावाला समोर गेला आणि म्हणाला "देखो दशरथ पाटील को हमने बंद किया है। उसका क्या करना आप बताओ, आपका जो भी नेता होगा उसको आगे भेजो।"[6] त्यांचा प्रमुख गणपतराव झाडे हा समोर आला त्याला आत नेऊन खुर्चीवर बसवले व पिस्तोल घेऊन दरोगा त्याच्या समोर उभा राहीला आणि म्हणाला. जमावाला परत जाण्यास सांग नाहीतर छातीत गोळी घालतो. गणपत झाडे घाबरला व त्याने जमावाला परत जाण्यास सांगितले. सकाळीच वर्धा येथिल पोलीस अधिक्षक कडून चौकशी करण्यात आली. दशरथ पाटील व आपल्या इतर साथीदारासह रिकाम्या बंड्याा घेऊन बेल्यास परतले. सर्व महार त्यांची आतुरतेने वाट पाहत होते. अशा वेळी दशरथ पाटलाने लोकांकडून 3 हजार रुपये जमा केले व स्वतः 3 हजार रुपये देऊन स्वतंत्र बाजार अस्पृश्यासाठी उभारला. आवश्यकतेच्या पोटी सुतार, लोहार तयार झालेत. दशरथ पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नागपूरच्या कमिशनला रोजगार निर्मिती करण्यासाठी विनंती केली त्यानुसार ब्राह्मणाला गिट्टीचा ठेका देण्यात आला व महार समाज कामाला लागला. सिंदीच्या लुटमारीचा निकाल वर्धा कोर्टात लागला. यामध्ये आठ गुन्हेगारांना शिक्षा ठोठावली तर जे फरार होते त्यांच्या संपत्तीचा जाहीरनामा काढला. पोलीसांद्वारे जप्ती सुरु असतांना गावातील कॉंग्रेसीच्या स्पृश्य लोकांनी पोलीसावर हल्ला चढवला त्यामध्ये अनेक पोलीसांना मार खावा लागला. दशरथ पाटलांना हे माहीत होताच त्यांनी सीताराम पाटील यांना नागपूरच्या पोलीस उपअधिक्षकाकडे पाठविले व स्वतः वर्धा येथ पोलीस अधिक्षकाकडे गेले. ताबडतोब पोलीस ताफा येऊन दंगलकर्त्यांना पकडण्यात आले. या काळात मोठ्या प्रमाणात अस्पृश्याचे आर्थिक नुकसान स्पृश्यांनी घडवून आणले याचा व सिंदी रेल्वे येथे झालेले नुकसान भरपाईची रक्कम सरकारने 65 हजार रुपये लावली व नुकसानग्रस्त लोकांना त्याचे वाटप केले.

**राजकीय कार्य :–**8 व 9 ऑगस्ट 1930 ला नागपूर येथे 'अखिल भारतीय डिप्रेस्ड क्लासेस'ची परिषद भरवली या परिषदेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या परिषदेच्या स्वागत समितीत दशरथ पाटील उपाध्यक्ष होते. दोन वर्षानंतर सन 1932 मध्ये कामठी येथे भारतीय डिप्रेस्ड क्लासेस कॉंग्रेसची दुसरी परिषद भरली. "परिषदेच्या स्वागत मंडळात दशरथ पाटील हे उपाध्यक्ष असून या परिषदेच्या यशस्वीतेसाठी बाबू हरदास एल. एन. यांना त्यांनी तन, मन, धनाने मोलाचे सहकार्य केले."[7] याच परिषदेत 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस फेडरेशन' ही भारतातील सर्व अस्पृश्यांची मध्यवर्ती संस्था म्हणून स्थापन करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. या फेडरेशनच्या प्रतिनिधीक कमिटीत दशरथ पाटील हे मध्यप्रांत वऱ्हाडच्या कार्यकारिणीतील एक सदस्य म्हणून निवडले गेले. हे त्यांच्या दलित चळवळीत केलेल्या योगदानाची पावती आहे, असे म्हणता येईल. "20 ऑगस्ट 1935 ला दशरथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गड्डीगोदाम येथे एक सभा झाली. या सभेत दशरथ पाटीलांनी वर्धा मतदास संघ हा राखीव व्हावा याची मागणी केली".[8] "3 मे 1936 ला डॉ. आंबेडकरांचे निवडणुकीच्या प्रचारार्थ नागपूर येथे आगमन झाले. कस्तुरचंद पार्क येथे दशरथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली डॉ. आंबेडकरांच्या उपस्थितीत एक दलित संम्मेलन घेण्यात आले".[9] तर 5 मे 1936 ला श्री. दशरथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली 'वर्धा जिल्हा अस्पृश्य परिषद' सिंदी येथे घेण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 14 जानेवारी 1937 ला स्वतंत्र मजुर पक्षाच्या उमेदवाराची यादी जाहीर केली त्यामध्ये दशरथ पाटील यांना तिकिट देण्यात आले नव्हते तर त्यांच्या ऐवजी पतितपावणदास यांना तिकिट देण्यात आले होते. दशरथ पाटील हिंगणघाट–वर्धा मतदारसंघात स्वतंत्र उमेदवार म्हणून उभे राहीले व जनतेने दिलेल्या प्रेमामुळे निवडूनसुद्धा आले व नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पत्र पाठवून स्वतंत्र मजुर पक्षात काम करण्याची इच्छा व्यक्त केली. केवढे हे मोठेपण, समाजप्रेम दशरथ पाटलात असलेले आपल्याला दिसून येते. तर 1954 ला बाबासाहेबांच्या भंडारा–रामटेक निवडणुक प्रचारातही त्यांनी महत्वपूर्ण कार्य केले. या व्यतिरिक्त वेगवेगळ्याा मंचावरुन अध्यक्षपदाचा स्वीकार करुन विदर्भातील दलित चळवळीला सतत पुढे नेण्याचे कार्य केले.

**दशरथ पाटील यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य :–**

बाबू एल. एन. हरदास हे सामाजिक कार्य करीत असतांना अनेकदा दशरथ पाटलांनी त्यांना आर्थिक सहाय्य केले. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची वाढ करण्यासाठी आर्थिक सहाय्य करण्याचे आव्हान केले असता दशरथ पाटीलांनी 250 रु. ची थैली डॉ. आंबेडकरांना भेट दिली. त्यांनी नागपूरला अस्पृश्य मुलांना शाळा–महाविद्यालयाचे शिक्षण घेण्याकरिता त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था करुन दिली. तर नागपूरला नवी वस्ती येथे चोखामेळा वसतीगृह सुरु केले.

रेल्वे, सैन्यात इत्यादी ठिकाणी लोकांना नोकऱ्या देण्याचे प्रयत्न दशरथ पाटलांनी केले. "सन 1921 साली 'चोखामेळा' समाजाची सभा दशरथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेऊन मुलामुलींचे शिक्षण सक्तीचे केले होते".[10] गावातील अस्पृश्यांच्या मुलांच्या शिक्षणाला योग्य असा वाव व संधी मिळत नव्हती म्हणून गावातील आपल्या अस्पृश्य बांधवांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आपल्याच वाड्यात शाळा सुरु करुन त्यांच्यासाठी शिक्षणाची दारे मोकळी केली. "आपल्या समाजातील दृष्ट रुढींचा, परंपराचा नायनाट करण्यासाठी, त्यांच्यात जाणिव जागृती वाढविण्यासाठी, लोक शिक्षणासाठी 'समता' हे साप्ताहिक नागपूरहून चालविण्यास ते आर्थिक मदतही करत होते. ते या साप्ताहिकाचे संस्थापक, तर रेवाराम कवाडे हे संपादक होते".[11] त्यांनी भारत संत समाजाची स्थापना करुन समाज सुधारणा घडवून आणल्या तर चोखामेळा सुधारक मंडळाच्या माध्यमातून अस्पृश्य वर्गातील लोकांमध्ये धार्मिक, सामाजिक व राजकीय सुधारणा घडवून आणल्या होत्या.

**मुल्यांकनः** वरील दर्शविलेल्या दशरथ पाटलांच्या कार्याच्या वर्णनावरुन दशरथ पाटलांनी मध्यप्रांत वऱ्हाडात अस्पृश्यतेच्या प्रथेविरुद्ध लढ्यात, अस्पृश्य बांधवाची सेवा करण्याचे डॉ. आंबेडकरांच्या विचारसरणीचे प्रामाणिकपणे पालन करण्याचे, तसेच त्यांनी स्थापन केलेल्या राजकीय पक्षाचा पाया भक्कम करण्याचे निष्ठेने कार्य केले. त्यासाठी त्यांनी स्वतःचे सर्व धन या कामी वापरले हे कुणालाही नाकारता येत नाही. त्यांनी अस्पृश्य समाजाच्या प्रगतीकरिता कोणत्याही लोभाची व मोहाची अपेक्षा न करता बाबासाहेबांच्या विचाराने कार्य केले. त्यांच्या या प्रामाणिक व त्यागाच्या कर्तव्याबद्दल आंबेडकरी समाज त्यांचा ऋणी आहे. तरीही विदर्भातील दलित चळवळीच्या इतिहासकारांनी, नेत्यांनी दशरथ पाटलांच्या कार्याची वस्तुनिष्ठपणे दखल घेतलेली नाही त्यांची स्मरणिका प्रसिद्ध केली नाही व जन्मशताब्दी वर्ष ही साजरे केले नाही, अशी खंत व्यक्त केली जात आहे.

**संदर्भसूची :–**

1)पाटील, विकास, 'आमच्या चार पिढ्यांची समाजसेवा', प्रबुद्ध भारत पुस्तकालय, प्र. आ. 2017, पृ. क्र. 61.
2)भांगे, हंसराज (संपा.), बाबांचे शिलेदार, आंबेडकरी चळवळीचे सहकारी सत्कार मंच, नागपूर, प्र. आ. 2015, पृ. क्र. 49, 50.
3)कित्ता, पृ. क्र. 49.
4)कित्ता, पृ. क्र. 49.
5)कित्ता, पृ. क्र. 49.
6)पाटील, विकास, 'आमच्या चार पिढ्यांची समाजसेवा', प्रबुद्ध भारत पुस्तकालय, प्र. आ. 2017, पृ. क्र. 61.
7)नगराळे, मोहन, 'विदर्भातील दलित चळवळ (डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणा पर्यंत)', प्रदिप हाडके, नागपूर, प्र. आ. 2015, पृ. क्र. 96.
8)कित्ता, पृ. क्र. 96.
9)कित्ता, पृ. क्र. 96.
10)कित्ता, पृ. क्र. 52.
11)कित्ता, पृ. क्र. 95.

# गं. म. ठवरे यांचे विदर्भातील शैक्षणिक योगदान : एक अभ्यास

**डॉ. लखपती गायकवाड**
इतिहास विभाग प्रमुख
महिला कला महाविद्यालय, उमरेड

**सारांश :–** गं. म. ठवरे हे किसन फागोजी बनसोड यांना आपले गुरु मानून त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेऊन समोर जात होते. दलित्तोद्वार, समाजसेवा, अस्पृश्यांना शिक्षण हेच त्यांच्या जीवनाचे मुख्य उद्दिष्ट होते. अस्पृश्यांच्या शिक्षण विकासाकरिता नागपूरच्या व आजुबाजुच्या परिसरात शाळा, वसतीगृह व वाचनालय स्थापन करुन त्यांना प्रवाहात आणण्याचे कार्य केले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे समजून व शिक्षणाचे महत्व ओळखून त्यांनी या कार्याला जोमाने सुरुवात केली. शिक्षणाबरोबरच सामाजिक कार्यातही ते मागे न राहता अग्रणीय असलेले आपल्याला दिसून येते. त्याकरिता त्यांना विविध संघटना स्थापन करुन त्या माध्यमातून अस्पृश्यांचा सामाजिक स्तर उंचावण्याचा प्रयत्न केला. तर अनेकांना वस्त्रे आणि पुस्तके देऊन आपल्या उदारमतवादी व्यक्तीमत्वाचे दर्शनही घडवून दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबरोबर स्वतंत्र मजुर पक्षात हिरीरीने भाग घेतला परंतु कालांतराने ते काँग्रेसमध्ये गेले परंतु त्यांनी अस्पृश्यता उद्‌गाराचे कार्य मात्र बंद केले नसून त्याला सतत गतीच दिल्याचे त्यांच्या चरित्रातून दिसून येते. काही कारणामुळे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराला पाठींबा दिला नव्हता कारण ते त्यावेळेस काँग्रेसचे सदस्य म्हणून कार्यरत होते. परंतु त्यांनी शेड्‌युल्ड कास्ट फेडरेशनमध्ये केलेले कार्य आपल्याला विसरता येणार नाही. एकूणच दलित उद्‌धारासाठी त्यांनी केलेले कार्य स्पृहनीय आहे.

**शब्दसंकेत :–** सेंट्रल प्रोव्हिजंस एण्ड बेरार डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशन सोसायटी, सायमन कमिशन, नागपूर डिस्टिक्ट कौन्सिल, रावसाहेब, ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस असोशिएशन, सी. पी. अँण्ड बेरार कॉटन अँण्ड टेक्सटाईल्स वर्कर्स युनियन.

**संशोधन पद्धती** : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**प्रारंभिक जीवन :–**दलित चळवळीत आपले जीवन वाहुन घेणाऱ्या पुढाऱ्यापैकी एक महत्वाचे नाव श्री. रावसाहेब गंगाराम मठाजी ठवरे हे होय. ''श्री. गंगाराम ठवरे यांचा जन्म २३ एप्रिल, १९०२ रोजी भंडारा जिल्ह्यातील जांब या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण जांब येथे झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्यांना तुमसरला पाठविण्यात आले. परंतु शिक्षण न घेता ते नागपूरला १९१६ ला वापस आले.''[१]

''श्री. गं.म. ठवरे हे कट्टर महानुभावी पंथीय होते. अस्पृश्यांना संघटीत करुन त्यांना महानुभाव श्रेत्रात रुपांतरीत करण्याच्या उद्देशाने त्यांनी 'महानुभाव पंथीय अस्पृश्य समाज' या संस्थेची स्थापना केली.''[२] श्री. ग.म. ठवरे यांची लोकसेवा व दलितोद्धारांच्या सर्व क्षेत्रातील सर्वस्पर्शी प्रेरणाशक्ती म्हणजे गुरुवर्य कि. फा. बनसोडे हेच होते.

**शैक्षणिक योगदान :–**''इ.स. १९२० मध्ये त्यांनी नागपूर येथे एक प्राथमिक शाळा व पुस्तकालयची सुरुवात केली. १९२२ मध्ये त्यांनी नागपूर येथे दलितांमध्ये शिक्षणाचा प्रचार प्रसार करण्याच्या हेतुने 'सेन्टल प्रोव्हिजस एण्ड बेरार डिस्प्रेड क्लासेस एज्युकेशन सोसायटी ची स्थापना केली.''[३] या सोसायटीने डिप्रेस्ड नाईट स्कुल, सदरबाजार, राजाराम लायब्ररी, सदर बाजार, डिप्रेस्ड मुलींची शाळा, सदर बाजार, डिप्रेस्ड क्लासेस नाईट स्कुल, तुमसर, स्विपर मुलीची शाळा, भालदारपुरा, डिप्रेस्ड मुलींची शाळा, इंदोराचौकी, बिडी कामगार वाचनालय, तुमसर, डिप्रेस्ड क्लासेस मुलांचे होस्टेल, भंडारा, यासारख्या शाळा, वाचनायले, वसतीगृहे निर्माण करुन संपुर्ण विदर्भात शिक्षणाचे जाळे विस्तारीत केले. श्री. ठवरे यांची शिक्षणाची महती पटवून देणारी भाषणे, गरजवंताना कपडे, पुस्तके देऊन शिक्षणासाठी दलितांना प्रेरीत करण्याचे कार्य त्यांनी केले.

**राजकीय मंचावरुन सामाजिक कार्य :–**दलितांच्या उत्थानासाठी महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरु व कॉग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांपुढे त्यांनी दलितांची कैफियती मांडल्या. ''१५ ऑगष्ट, १९२८ ला नवी दिल्ली येथे सायमन कमिशन पुढे साक्ष दिली व ब्रिटीश सरकारने दलितांमध्ये शैक्षणिक प्रसार करण्याची मागणी करुन अस्पृश्य मुला मुलींसाठी सक्तीची शिक्षणव्यवस्था निर्माण करण्याचा आग्रह धरला.''[४] श्री. ठवरे यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी स्पृहणीय कार्य केल्याचे दिसून येते.

रावसाहेब ठवरे यांनी विविध क्षेत्रात प्रभावी कार्य केले. ते १९२८-१९२९ ला मध्यप्रांत नागपूर डिस्टिक्ट कौन्सीलचे ते सरकार नियुक्त सभासद होते. १९३४-१९३८ आणि १९४०-१९४४ या कालावधीत त्यांनी ऑनररी मॅजिस्टेट म्हणून न्यायदानाचे कार्य केले."१९३५-१९३६ ला ते नागपूर सेंट्रल जेलचे तपासणी १९४१-४२ ला रिकृटींग ऑफीसर व युद्ध समितीचे सभासद म्हणून युद्ध काळात महत्वाचे कार्य केले. त्यांच्या कार्याची पावती म्हणून ब्रिटीश सरकारने त्यांना 'रावसाहेब' ही उपाधी बहाल केली."[५] त्यांनी १९२६ ते १९४४ या काळात 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस असोशिएशनचे' सहसचिव म्हणून कार्य केले. "१९३८ साली नागपूर येथे भरलेल्या अखिल भातीय हिंदु महासभेच्या २० व्या अधिवेशनाच्या स्वागत समितीचे ते अध्यक्ष होते. १९४१ साली मध्यप्रांत हिंदु महासभेच्या कार्यकारी मंडळावर त्यांची सभासद म्हणून निवड करण्यात आली. त्यांनी जी. ए. गवईच्या डिप्रेस्ड क्लास असोसीएशन मध्ये सक्रियपणे कार्य केले."[६]

श्री. ठवरे यांचे मजुर चळवळीच्या निमित्ताने डॉ. आंबेडकरांशी संबध आला. मध्यप्रांतात स्वतंत्र मजुर पक्षात ठवरेनी सहभाग घेतला. ''इ.स. १९४२ ला डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजुर पक्ष बरखास्त करुन शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केल्यानंतर मध्यप्रांतात स्वतंत्र मजुर पक्षाचे कार्य श्री. ठवरेंनी सांभाळले. व प्रांतातील गिरणी कामगार, बिडी कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.पुढे त्यांनी स्वतंत्र मजुर संघटना सी.पी. अॅड बेरार कॉटन अॅण्ड टेक्सटाईल्स वर्क्स युनियन' काढली"[७]

इ.स. १९५२ च्या लोकसभेच्या निवडणूकीत भंडारा लोकसभा मतदार संघातून कॉग्रेस पक्षाकडून त्यांनी निवडणूक लढविली. परंतु ते पराजित झाले व नंतर कॉग्रेस पक्षातर्फे ते राज्यसभेवर निवडून आले. "३ एप्रिल १९५२ते १६ ऑगष्ट १९५२ या अल्पकाळात राज्यसभेचे सभासद होते. वयाच्या ५० व्या वर्षी दिल्ली येथे १६ ऑगष्ट १९५२ ला त्यांचे निधन झाले."[८]

कै. ठवरे हे धर्मांतर विरोधी होते. त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या धर्मातराच्या घोषणेचा विरोध केला. कै. ठवरे यांनी शेवटपर्यत दलितांच्या उत्थानासाठी वेगवेगळया माध्यमांचा वापर करुन कार्य केलेले दिसून येते.

**संदर्भ सूची :–**

१) मोहनदास, नैमिसराय, 'भारतीय दलित आंदोलन का इतिहास', राधाकृष्ण पेपर बॅक्स, प्रकाशन, न्यु दिल्ली, प्र. आ. २०१७, पृ. क्र. २९७

२)Https://en. Wikipedia.org/wiki/gangaram thavare

३) पूर्वोक्त, पृ. क्र. २९८.

४) पूर्वोक्त, पृ. क्र. २९८.

५) शेंडे ना. रा., 'कै. ठवरे चरित्र व चारीत्र', प्रकाशन युगांतर शिक्षण संस्था, १९६८, पृ. क्र. ४९.

६) नगराळे, मोहन, 'विदर्भातील दलित चळवळ', डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणापर्यंत', प्रकाशक, प्रदिप हाडके, नागपूर, २०१५, पृ. क्र. ९१, ९२.

७) ढोले, प्रदिप, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वतनमुक्ती चळवळ', नभ प्रकाशन, अमरावती, प्र. आ. २०१५, पृ. क्र. ३८.

८) डोंगरे, कृष्णकांत, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत नागपूर शहराचे योगदान', प्रकाशक बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, प्र. आ. २०१२, पृ. क्र. २०४.

# " बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे विदभातील एक राजकीय व सामाजिक नेतृत्व"

**– अरुण ज्ञानेश्वर बरडे**
**– स्कूल ऑफ स्कॉलर्स, अमरावती.**
**barun.sa85@gmail.com**

**सारांश** : प्रस्तुत शोधनिबंधामध्ये डॉ.बाबासाहेबांचे अस्पृश्य निवारणाचे कार्य व त्यांनी घडवलेले नायक बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या कार्याचा व भूषविलेल्या विविध पदांचा, त्यांच्या नेतृत्वाचा व बाबासाहेबांना त्यांच्या हयातीत दिलेल्या साथीचा व त्या नंतरच्या कार्याचा उहापोह केलेला आहे.

**शब्दसंकेत :** 1)सत्यशोधक चळवळ, 2)सामाजिक समता 3)बार ॲट लॉ, 4)अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, 5)रिपब्लकन पक्ष, 6)मतदार संघ 7)पोट निवडणुक 8) प्रस्थापीत पक्ष कॉंग्रेस 9)समता सैनिक दल 10)बौध्द धर्म पुनरुज्जिवन 11)अशोक विजयादशमी 12) 22 प्रतिज्ञा नव दीक्षीतांची आचार संहिता 13) बौध्द धर्माचा सरनामा 14) पीपल्स एज्युकेशन सोसायटी, 15) प्रेसीडियम इत्यादी.

**संशोधन पद्धती** :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावनाः** ''महाराष्ट्रातील अस्पृश्योध्दारक चळवळीचे जनक महात्मा ज्योतिराव फुले होत! एकोणविसाव्या शतकाच्या मध्यामध्ये त्यांनी अस्पृश्य मुला–मलींच्या शिक्षणाकरिता स्वतंत्र शाळा सुरु करुन प्रथमतः या दिशेने पाऊल टाकले. हजारो वर्षाच्या धार्मिक व सामाजिक गुलामगीरीमुळे अस्पृश्य समाज आपल्या माणुसकीच्या हक्कांना मुकला होता. त्यांच्या जिवनात शिक्षणाद्वारे जाणिवेची ज्ञानज्योत प्रज्वलीत करण्याचे महान कार्य ज्योतिरावांनी हाती घेतल.''1 सनातन हिंदू धर्माच्या बुरसटलेल्या रूढीप्रीय चातुर्वर्ण्य व जातिभेदाविरुध्द ज्योतिरावांनी फुंकलेले क्रांतीचे रणशिंग होते. अशा क्रांतीची मशाल पूढे अनेक महापुरुष समाजसुधारकांनी तेवत ठेवण्याची मनिषा मनाशी बाळगून पददलीतांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा देण्याचे कार्य चालविले. त्यात राजर्षी श्री छत्रपती शाहू महाराज, डॉ. भिमराव आंबेडकर, इत्यादींची नावे प्रामुख्याने घ्यावी लागेल. ब्राम्हणी धर्माविरुध्द ज्योतिरावांनी जी सत्यशोधक चळवळ सुरु केली, त्या चळवळीचे हेच ते म्होरके होय.

''पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाने भारतात एक अभूतपूर्व क्रांती घडुन आली. या क्रांतीची इतिहासकारांनी, लेखकांनी ज्या प्रमाणात दखल घ्यायला हवी होती, दुर्दैवाने ती घेतली नाही, ही वस्तुस्थिती आहे. देशाच्या स्वातंत्र्याचा लढा,ब्रिटिश राजवटीत पुरोगामी–प्रतिगामी विचारसरणीत संघर्ष या तुलनेत शेकडों वर्षे सर्व प्रकारच्या आणि त्यातही मानसिक गुलामगिरित पिचत पडलेल्या एका अख्ख्या समाजात मानवी जीवन उपलब्ध करुन देण्यासाठी झालेला संघर्ष कमी महत्वाचा नव्हता परंतु या संर्घषाला, मानवाच्या मुक्ती लढ्याला सुध्दा अस्पृश्यतेच्याच नजरेने पाहण्यात आले आणि लेखनीचा स्पर्श होऊ दिला नाही.'' 2

डॉ. आंबेडकरांच्या नंतर दलित चळवळी पुढे रेटणे जेवढी आवश्यक बाब होती तेवढीच ती कठीणही होती. ज्यांनी ज्यांनी हा क्रांतीरथ पुढे नेण्याचा प्रयत्न केला त्यात दिवंगत बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे स्थान आगळे–वेगळे, वैशिष्टयपूणे आणि महत्त्वाचे आहे. यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे जीवन ही चळवळ होती. त्यांच जीवनचरित्र हा चळवळीचा इतिहास होता असं म्हटलयास वावगं ठरणार नाही. भारतात सामाजिक समता प्रस्थापनेचा लढा यशस्वी होण्यासाठी तो बुध्दीवादाच्या पायावर उभा असणे आवश्यक आहे. केवळ भावनेच्या आहारी जाऊन यश संपादन करता येणार नाही. नव्हे प्रयत्न झालाच तर दलीतांनाच त्याची झळ पोहचते याचाही अनुभव अनेकदा आला आहे. डॉ. आंबेडकरांनी उपलब्ध करुन दिलेल्या बुध्दीवादाची कास धरुनच दलितांच नेतृत्व करणाऱ्यांना पुढे जावं लागणार आहे. डॉ. आंबेडकरांच्या नंतर ज्यांनी हा प्रयत्न केला त्यात बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. कारण बॅरिस्टरांनी खुद बाबासाहेबांसोबत काम केलेले असून, ते बाबासाहेब नावाच्या प्रखर व तेजोमय भट्टीतून तावून व सुलाखून बाहेर पडलेलं नेतृत्व होय ज्यांनी पुढे हा अस्पृश्योध्दाराचा लढा निरंतर सुरु ठेवला.

**व्यक्ती परिचयः–** एका वेळेस बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उजवा हात समजण्यात येते होते. ते खरोखरच बाबासाहेब आंबेडकरांचे वारस होते. मग सामाजिक क्षेत्र असो किंवा धार्मिक क्षेत्र लोकांना रिपब्लीकन पक्षाशी जोडण्याचे कार्य असो अथवा दलितांमध्ये शिक्षण प्रचार व प्रसार करण्याचे काम असो बॅरिस्टर राजाभाऊ हे नेहमी बाबासाहेबांच्या खांदयांला खांदा लावून उभे राहायचे.

बाबासाहेबांच्या अशा महान शिलेदाराचा जन्म दिनांक 25 सप्टेंबर 1925 ला महाराष्ट्रातील चंद्रपूर (चांदा ) येथे झाला. त्यांचे लहानपणीचे नाव भाऊराव असे होते. परंतु प्रेमाने त्यांना राजाभाऊ म्हणून हाक मारायचे. त्यांच्या वडिलांचे नाव देवाजी खोब्रागडे तर आईचे नाव इंदिराबाई असे होते. राजाभाऊंचे सुरुवातीचे शिक्षण हे जुबीली हायस्कुल चंद्रपूर येथेच झाले. त्यानंतर त्यांनी 1943 मध्ये इंटर–सायंसची परीक्षा नागपूर सांयस कॉलेज मधून व ठ ।ए ची परीक्षा 1945 मध्ये मॉरिस कॉलेज, नागपूर येथून पास झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गदर्शनावरुन ते लंडन स्थित लिंकन्स् कॉलेज मधून बॅरिस्टर ॲट लॉ ही पदवी परीक्षा पास होवून भारतात परत आले व आपले जीवन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला समर्पित केले. बॅरिस्टर राजाभाऊमध्ये विद्यार्थी दशेमध्ये असतांनाच नेतृत्व गुण होते. ते मध्यप्रदेश शेड्युल्ड कास्ट स्टुडंट फेडरेशनचे सचिव म्हणून निवडून आले. ते या पदावर 1943 ते 1945या कालखंडात कार्यरत होते. ते वयाच्या अवघ्या 27 व्या वर्षी चंद्रपूर नगरपरिषदेच्या अध्यक्ष पदावर निवडून आले. 1952–55 असा कार्यकाळ. या वेळी त्यांनी अनेक विकास कार्य शहरामध्ये मार्गस्थ केली. 1953 मध्ये ते नागपूर प्रदेश शेड्युल्ड कास्ट फेडरेशन चे अध्यक्ष म्हणून निवडून आले. बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे हे वयाच्या 33 व्या वर्षी 1958 मध्ये राज्यसभेवर निवडून आले. लगेच पुढच्या वेळेत 1966 मध्ये ते पुन्हा राज्यसभेवर निवडून गेले. त्यांना राज्यसभेच्या उपाध्यक्ष पदाची धुरा सुध्दा सांभाळावी लागली. 1961 ते 1972 या कालखंडात ते राज्यसभेचे उपाध्यक्ष होते. एकूण 18 वर्षे ते राज्यसभेचे खासदार होते.

''त्यांनी अनेक देशांच्या दौरा सुध्दा केलेला आहे. त्यात आर्यलॅड, फ्रांस, स्वित्झरलॅड, इटली, जर्मनी, यू.एस.ए हॉग–कॉग, चीन, भूतान आर्यलॅड आणि सीलोन. सप्टेबंर 1965 मध्ये त्यांनी अमेरिका सरकारच्या निमंत्रणावर यू.एस.ए चा दौरा केला. तेथे त्यांनी मार्टीन ल्युथर किंग द ज्युनिअर यांची भेट घेऊन मानवी हक्कांच्या प्रश्नावर चर्चा केली.''3 बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे हे कांतीकारी नेता होते. ते अस्पृश्यांच्या, गोर–गरीबांच्या उत्थानाकरिता आपल्या शेवटच्या घटके पर्यंत झटत होते. पददलितांचा उध्दार, सामाजिक समानता, आर्थिक सबलता व राजकीय प्राध्यान्य हे वंचित बहुजनांना, पददलितांना मिळाले पाहिजे या साठी परिश्रम घेतले. अस्पृश्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सदैव प्रयत्नशिल असलेल्या हया नेत्याचा मृत्यू दिनांक 09 एप्रिल 1984 ला झाला व पुन्हा एकदा हा सामाजिक विस्थापलेला समाज पोरका झाला.

**बॅरिस्टर राजाभाऊंची राजकिय जडण–घडणः–** ''चांगले शासन नसेल तर चांगले कायदे असुनही ते तुमचे कल्याण करु शकणार नाहीत'' हे उद्‌गार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे असून त्याला साजेशे सरकार असणे अगत्याचे आहे, असा बॅरिस्टर साहेबांचा समज पक्का बनलेला होता. व त्यांनी आपल्या साजकिय जीवनात पूर्णपणे अंगिकार केला होता. असे खंबीर राजकिय नेतृत्व घडविण्यासाठी त्यांना घरुनच नेतृत्व गुणाचे बाळकडू त्यांच्या वडीलांकडून मिळाले होते म्हणजेच एम.एल.ए. देवाजी खोब्रागडे कडून मिळाले होते . बॅरि. राजाभाऊ त्यांच्या वडीलांसोबत अनेक सभा व संघटनांच्या बैठकिसाठी जात.तोच वारसा त्यांच्या व्यक्तीत्वांमध्ये संचारला होता.

त्याच बरोबर, जेव्हा त्यांचा डॉ. बाबासाहेबांसोबत संपर्क आला, बॅरिस्टर राजाभाऊ इतके प्रभावित झाले की, त्यांच्या व्यक्तीमत्वात एक आमुलाग्र बदल घडून आला. महत्त्वाचा एक बदल म्हणजे, त्यांच्या विद्यार्थी दशेतला '' बॅरि. राजाभाऊंना सायंस मधून शिकण्याची ईच्छा होती. परंतु बाबासाहेबांच्या दर्शनाने ती मावळली. बाबासाहेब राजाभाऊंचे आदर्श होते. आता राजाभाऊंना बाबासाहेबांसारखं बॅरिस्टर व्हायचे होते. समाजकार्य करावयाचे होते. त्यासाठी त्यांनी विज्ञान शाखा सोडून ठ ।ए ला प्रवेश घेतला. याच काळात ते महाविद्‌यालयातील शेड्युल्ड कास्ट स्टुडंट फेडरेशन महासचिव झाले.''4 ''राजाभाऊंनी या संघटनेसाठी आजुबाजुच्या परिसरातील विविध महाविद्‌यालयात जाऊन शे.का. स्टुडेंट फेडरेशनच्या शाखा स्थापन केल्या. विद्‌यार्थ्यांना बाबासाहेबांच्या चळवळीचे महत्त्व पटवून दिले. त्यांना या फेडरेशनमध्ये सहभागी करुन घेतले. बाबासाहेबांच्या चळवळशी राजाभाऊ असे विद्‌यार्थी देशेपासूनच जुळलेले होते.''5

राजाभाऊ चळवळीचे काम जोमाने करत. त्याच बरोबर अभ्यास सुध्दा करत. ते कधीही नापास झाले नाहीत. ते 1945 पर्यंत शे.का.स्टु. फेडरेशनचे महासचिव होते. व तेव्हाच मॉरीस कॉलेज, नागपूर येथून B.A. ची परीक्षा पास झालेत. समाजाची सेवा करायची असेल तर खूप शिकले पाहिजे हे त्यांना माहीत होते. विद्यार्थी दशेत फक्त अभ्यासाचीच पुस्तके न वाचता त्यांनी ग्रंथालयातून इतिहास, राज्यशास्त्र व मराठी साहित्याचे अनेक ग्रंथ वाचलेत. याच वैचारिक लेखन वाचनातून त्यांची वैचारीक जडण–घडण झाली. देवाजी खोब्रागडे यांनी राजाभाऊंना स्कॉलरशाप वर परदेशात शिक्षणासाठी न पाठवता स्वःखर्चाने पाठविण्याचा विचार बाबासाहेबांना बोलून दाखविला. व त्या ऐवजी एखादी दलीत मुलगा पाठवावा अशी विनंती केली. त्यानुसार देवाजींनी स्वःखर्चाने भाऊरावांना परदेशात पाठविले. व ते बॅरिस्टर होऊन भारतात परतले. मायदेशात परतल्यानंतर देवाजी बाबासाहेबांची राजभाऊनां भेट घालण्यास घेऊन गेले असता, बाबासाहेबांनी हा मुलगा समाजसेवेसाठी माझ्या झोळीत टाका, अशी ईच्छा देवाजींकडे व्यक्त केली. त्याच क्षणी देवाजींनी बाबासाहेबांचा शब्द खाली पडू न देता, राजाभाऊंना बाबासाहेबांच्या समाजकार्यस समर्पित केले. बॅरि. राजाभाऊ नावा प्रमाणेच राजा होते. राजपद सांभाळायला जे सर्वगुण पाहीजेत ते सर्व त्यांच्यात होते. ते अतिशय दयाळू, उदार, कर्तव्यदक्ष व न्यायी होते. '' भारतात परत आल्या वर राजाभाऊंनी पुन्हा शे.का. स्टु. फेडरेशनच्या कामाला सुरवात केली. एक उच्च शिक्षित तरूण, बॅरिस्टर सामान्यातल्या सामान्य लोकांबरोबर चळवळीत एकजीव झाला. मात्र बाबासाहेबांनी ज्या तरूणांना सरकारी खर्चाने विदेशात पाठविले होते. ते चळवळीपासून दूर राहीलेत. त्यांनी चळवळीत बाबासाहेबांना सहकार्य केले नाही. त्यांनी आपल्या स्वतःच्या उदर निर्वाहासाठी मोठमोठया हुद्‌यावर नोकरया केल्या. ते स्वार्थी निघाले''6

नागपूर प्रदेश शे.का. फेडरेशनच्या कार्यकारीणीची बैठक 1953 मध्ये झाली. या बैठकीत सर्व संमतीने त्यांना नागपूर प्रदेश शे.का. फेडरेशनचे अध्यक्षपद बहाल करण्यात आले. नागपूर प्रदेशचे अध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी संघटना बांधणीला फार महत्त्व दिले. संपूर्ण नागपूर पदेशातील लहानमोठी शहरे, गावे त्यांनी पालथी घातली. सर्व कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेतल्या. प्रत्यक्ष भेटून त्यांच्यात नवचैतन्य निर्माण केले. संघटनेचे जाळे सर्व दूर पसरविले. त्यांच्या कार्यकुशलतेने जनताही समाधानी होती. अशा प्रकारे बॅरि. राजाभाऊ खोब्रागडेची सामाजिक व राजकीय नाळ जुळली.

**1954 ची भंडारा पोटनिवडणुक व राजाभाऊंचे नेतृत्व :–**बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे हा विदर्भातील झंझावात होता. त्यांनी पददलित सामान्यांपासून तर दस्तुरखुद्द डॉ. बाबासाहेबांना सुध्दा प्रभावित केले होते. डॉ. बाबासाहेबांचा बॅरिस्टर साहेबांवर खुप विश्वास होता. त्यांनी राजाभाऊची कार्यकुशलता व बाणेदारपणा स्वतः अनुभवला होता. म्हणूनच राजाभाऊ वर खूप मोठी जबाबदारी सोपविण्याचे ठरविले होते. त्या अनुंषगाने डॉ. बाबासाहेबांनी 27 ऑगस्ट 1955 ला अ.भा.शे.का. फेडरेशनची कार्यकारी मंडळाची सभा बोलवून बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांची पक्षाचे राष्ट्रीय कार्यवाह म्हणून नेमणूक केली.

1952 सालच्या लोकसभा निवडणुकीत अ.भा.शे.का. फेडरेशनच्या अनेक उमेदवारांना पराभव स्विकारावा लागला होता. त्यात डॉ. बाबासाहेबांच्या सुध्दा कॉग्रसने साम–दाम–दंड–भेदाचा वापर करुन पराभव केला. प्रत्यक्षात बाबासाहेबांसारखा कायदेपंडित संसदेमध्ये मार्गदर्शक म्हणून पाहिजे असताना त्यांना तेथे येण्यापासून रोखण्याचे काम प्रत्थापीत पक्षाने केले होते. या देशातील अनेक समस्यांची व प्रश्नांची उत्तरे ज्याच्याजवळ होती त्यालाच संसदेबाहेरचा रस्ता दाखविण्यात आला होता.अशातच मे 1954 मध्ये भंडरा लोकसभा मतदार संघाची पोटनिवडणूक जाहीर झाली. बाबासाहेबांनी ही निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या मागे खुप सारी कामे होती. प्रचारासाठी त्यांच्याजवळ फारसा वेळ नव्हता. त्यामुळे या प्रचाराची सर्व धुरा नागपूर प्रदेश शे.का. फेडरेशनच्या खांद्यावर येऊन पडली. बॅरिस्टर राजाभाऊंनी ही जाबाबदारी समर्थपणे सांभाळली. मतदार संघात बाबासाहेब प्रचारासाठी फारच थोडे आलेत. परंतु बाबासाहेबांना निवडून आणण्यासाठी बॅरि.राजाभाऊंनी स्वतः जवळून पाण्यासारखा पैसा खर्च केला. प्रचारा दरम्यान बाबासाहेब व बॅरिस्टर साहेब यांचा घनिष्ट संबंध आला. राजाभाऊंनी घेतलेले कष्ट व केलेला प्रचार याचा त्यांना प्रत्यय आला होता. राजाभाऊंच्या रूपाने तरूण, तडफदार, बुध्दिमान, कष्टाळू व प्रामाणिक कार्यकर्त्याचे दर्शन यावेळी बाबासाहेबांना झाले. ''या मतदार संघर्षात बाबासाहेबांना 1 लाख 32 हजार 483 मते पडलीत. परंतु ते 8 हजार 381 मताने पराभूत झालेत. कॉगेसचे उमेदवार भाऊराव बोरकर विजयी झाले.'' 7 भंडारा पोटनिवणुकीत ते पराजीत होतील याची कल्पना बाबासाहेबांना असुन सुध्दा बॅरि. राजाभाऊनी प्रयत्नांची शर्यत करुन बाबासाहेबांचा प्रचार केला. म्हणून बरिस्टर साहेब बाबासाहेबांचे विश्वासपात्र बनलेत व त्यांना पक्षाचे राष्ट्रीय कार्यवाह नेमून त्यांचा गौरव केला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मपरिवर्तनाची घोषणा व बॅरिस्टर राजाभाऊंचे कार्यः–**

1935 च्या बाबासाहेबांच्या येवला येथील घोषणे नुसार त्यांना हिंदू धर्माचा त्याग करुन बौध्द धर्म स्विकारावयाचा होता. परंतु पक्षातील अनेकांचा विरोध होत असतांना, बॅरिस्टर साहेबांनी मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पूर्ण साथ दिली. बॅरि. राजाभाऊना अ.भा.शे.का. फेडरेशनचे राष्ट्रीय कार्यवाहक त्या उद्देश्यपूर्तीसाठीच नेमण्यात आले होते.

बाबासाहेबांनी 'नागपूर' येथे बौध्द धम्म दिक्षा घेण्याचे ठरविले. त्या अनुषंगाने नागपूर प्रदेश पक्षाचे विशेष महत्त्व. बॅरि. राजाभाऊ हे याच विभागातील असल्यामुळे त्यांच्यावर खूप जाबाबदारी होती. हा धम्मदीक्षा कार्यक्रम कसा अयशस्वी होईल यासाठी कॉगेस व बाबासाहेबांचे विरोधी यांचे प्रयत्न चालू होते. अशा धाम–धूमीत हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्याचा प्रण बॅरि. राजाभाऊनी व त्यांच्या साथीदारांनी केला होता. त्यातच बॅरि. राजाभाऊनी चंद्रपूर येथे सुध्दा बाबासाहेबांनी असाच कार्यक्रम करावा यासाठी आग्रह केला.व बाबासाहेबांनी त्यास संमती दर्शवली. चंद्रपूर येथे धम्मदीक्षा कार्यक्रम घेण्याचा निश्चय करुन तो 16 ऑक्टोबर 1956 म्हणजेच नागपूरच्या कार्यक्रमानंतर लगेच दोन दिवसांनी करण्याचे बाबासाहेबांनी ठरविले. '' नागपूरला 14 आक्टोबर 1956 ला म्हणजेच 2500 वर्षांनी अशोक विजायादशमीच्या दिवशी हा बौध्द धर्म पुनरुज्जिवनाचा धम्म दीक्षा समारंभ होणार असल्याचे बाबासाहेबांनी जाहीर केले. यासाठी नागपूर मध्ये जय्यत तयारी करण्याचे आदेश दिले. नागपूरच्या धम्मदीक्षा कार्यक्रमाची तयारी करण्यासाठी पं. रेवारामजी कवाडे, यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन झाली होती. या दीक्षा सोहळयासाठी सर्वजन झटत होते. नागपूरचा हा बौध्द धम्म स्वीकार सोहळा ऐतिहासिक व्हावा यासाठी वामनराव गोडबोले, सदानंद फुलझेले, मा.डो. पंचभाई, आर.आर. पाटील यासह शेकडो कार्यकर्ते काम करीत होते.''8

बबासाहेब दिल्लीवरुन नागपूरला 11 ऑक्टो. 1956 ला आले. त्यांच्यासोबत माईसाहेब आंबेडकर व नानकचंद रत्तू होते. यावेळी बाबासाहेबांच्या जीवाला धोका असल्यामुळे त्यांना कर्नलबाग वस्तीतील समता सैनिक दलाच्या सैनिकांचे सरंक्षण कवच देण्यात आले होते. सोहळयाची तयारी अंतीम टप्प्यात सुरु होती. 12 ऑक्टोबरला अनेक कार्यकर्ते त्यांना भेटून व मार्गदर्शन घेऊन कार्यक्रमाची तयारी करीत होते. रेवारामजी कवाडे, वामनराव गोडबोले, दादासाहेब गायकवाड,व बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या देखरेखी खाली तयारी सुरु होती.

'' 13 आक्टोबरला बाबासाहेबांनी दोन पत्रकार परिषदा घेतल्या त्यात त्यांनी सांगीतले की, मी गांधीजींना आश्वासन दिले होते की, हिंदू धर्माला कमीत कमी हानीकारक असणारा मार्ग स्विकारीन. 'बौध्द धर्म भारतीय संस्कृतिचेच अंग आहे' पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देतांना ते म्हणाले , 'अस्पृश्य हे माणुसकी मिळवण्यासाठी धडपडत आहेत. सवलतीसाठी अस्पृश्य राहने योग्य नाही. बौध्द धर्म विश्वधर्म आहे.' नविन रिपब्लीकन पक्ष आपण स्थापन करणार असल्याचेही त्यांनी घोषित केले.''9

14 ऑक्टोबर 1956 चा दिवस उजाडला. दीक्षाभूमीवर अथांग जनसागर उमळला होता. स्त्री–पुरुष मिळून सुमारे चार–पाच लाख लोक उपस्थित होते. दीक्षादाना साठी त्यावेळचे वयोवृध्द भिक्खू महास्थवीर चंद्रमणी व त्याचे चार सहकारी भिक्खू उपस्थित होते. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब व माईसाहेब आंबेडकरांना त्रिशरण–पंचशील देऊन धम्मदीक्षा देण्यात आली. त्यानंतर डॉ. बाबासाहेबांनी सर्व उपस्थितांना त्रिशरण–पंचशील तथा स्वतःतयार केलेल्या 22 प्रतिज्ञा वदवून घेऊन धम्मदीक्षा दिली. उपस्थीतांपैकी प्रत्येकाला बाबासाहेबांचे अनुकरण करावयाचे होते. इतक्या मोठ्या संख्येने एकाच वेळी एकाच स्थळी व एकाच नेत्याच्या आवाहनाला साद देऊन धर्मांतराचा सोहळा पार पाडलाय हे असे गेल्या 2500 वर्षाच्या इतिहासात कधीही झाले नव्हते. सोबतच बाबासाहेबांनी तयार केलेल्या 22प्रतिज्ञा म्हणजे बौध्द धर्माचा सरनामाच होता. किंबहूना ती नवदीक्षीत बौध्दांची आचार संहीताच होती. बाबासाहेबांचे अनुयायी आनंदात होते. त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या तत्त्वांवर आधारीत व प्रज्ञा, शील, करुना व मैत्री या भावनेने ओतप्रोत भरलेला बुध्द धर्म स्वीकारला होता. दुस–या दिवशी सुध्दा जवळपास तेवढ्याच लोकांना बाबासाहेबांनी बौध्द धम्माची दीक्षा दिली. '' आपण बौध्द धर्म का स्वीकारला! याचेही विवेचन त्यांनी यावेळी केले. यावेळी ते म्हाणाले, 'जरी दलीत वर्ग बौध्द धर्मात गेला तरी त्यांना मिळालेल्या सवलती सरकारला नाकारता येणार नाहीत. राज्यघटना हे माझ्या श्रमाचे फळ आहे. मी हया सर्व सवलती अबाधीत ठेवण्यास समर्थ आहे.''10

**चंद्रपूर येथील धम्मदीक्षा व बॅरि. राजाभाऊंचे योगदान :–**

बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे 14 तारखेच्या कार्यक्रमानंतर 16 तारखेच्या चंद्रपूर येथील कार्यक्रमासाठी झटत होते. कारण नागपूरच्या कार्यक्रमानंतर चंद्रपूरला 16 तारखेला येतो हा शब्द बॅरिस्टर साहेबांना बाबासाहेबांनी दिला होता. बॅरि. राजाभाऊंवर चंद्रपूरचा कार्यक्रम यशस्वी करण्याची जबाबदारी येऊन पडली. चंद्रपूरच्या धम्मदीक्षा समारंभाची तुलना नागपूरच्या सोहळयाशी होईल याची त्यांना जाणीव होती. बाबासाहेबांचे सहकारी म्हणून त्यांना नागपूरच्या कार्यक्रमावरही लक्ष देणे आवश्यक होते. इतकेच नव्हे तर या कार्यक्रमासाठी सर्वतोपरी सहकार्यही त्यांना करायचे होते. हया दोन्ही जबाबदा–या बॅरिस्टर साहेबांनी अत्यंत यशस्वीपणे सांभळल्या. चंद्रपूरला धम्मदीक्षा सोहळा संपन्न होणार यासाठी बाबासाहेब येऊन धम्मदीक्षा देणार ही बातमी चंद्रपूर परिसरात वा–यासारखी पसरली. कार्यक्रमाला फक्त 22 दिवस उरले होत, व येवढया कमी अवधीत हा यशस्वी करायचाच हा चंग चंद्रपूरच्या कार्यकर्त्यांनी आपल्या मनाशी बांधला होता. नागपूरच्या कार्यक्रमा सारखाच त्याच तोलामोलाचा हा कार्यक्रम करण्यासाठी खोब्रागडे परिवारांनी व तेथील सर्व कार्यकर्त्यांनी दिवस–रात्र मेहनत करायची अशी खुणगाठ बांधली.

'' बाबासाहेब तसेच माईसाहेब सकाळी चंद्रपूरला पोचले. तेव्हा देवाजी खोब्रागडे व चंद्रपुरच्या जनतेने त्यांचे भव्य–दिव्य असे स्वागत केले. धम्मदीक्षा स्वीकारण्यासाठी त्या दिवशी चंद्रपूरच्या दीक्षाभूमीवर अलोट गर्दी आसळली होती. कार्यक्रमाची व्यवस्था व उपस्थिती पाहून बाबासाहेब आनंदीत झाले. बॅरि. राजाभाऊ त्यांच्याजवळच बसले होते. चांदावासीयांसाठी हा अपूर्व योग होता. बाबासाहेबांना पाहताच उपस्थीतांची बाबासाहेत आंबेडकरांचा जयघोष केला. भगवान बुध्दांचा जयजयकार केला. स्वागत सोहळयानंतर बाबासाहेब बौध्द धम्मदीक्षा देण्यासाठी उभे झाले. त्यांनी सर्वांना उभे राहण्याचे आवाहन केले. त्यांनी सर्व उपस्थीतांना त्रिशरण–पंचशील व 22 प्रतिज्ञा ग्रहण करण्यास सांगीतले. सर्वांनी बाबासाहेबांचे अनुकरण केले. आपण सर्व बौध्द धम्माची दीक्षा घेऊन बौध्द झालात'' 11 अशी घोषणा बाबासाहेबांनी केली. बाबासाहेबांचे हे वाक्य ऐकताच जनसमुदायात आनंदाची लाट परसली. कार्यक्रम येवढ्या हीरीरीने व उत्साहाने मोठया दिमाखात पार पाडण्याचे श्रेय हे बॅरि. राजाभाऊंना आहे हे बाबासाहेब जाणत होते. म्हणून बाबासाहेबांनी धन्यवाद पर शाबासकीची थाप बाजूलाच असलेल्या बॅरिस्टर साहेबांनी साहेबांच्या पाठीवर दिली. ती शाबासकी मिळताच राजाभाऊ कृत्यकृत्य झाल्यासारखे वाटले असावे.

**डॉ. बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाल्यानंतर बॅरि. खोब्रागडेंचे योगदानः–**

बबासाहेबांचे अचानक 6 डीसेंबरला महापरीनिर्णान झाले. 7 डीसेंबरला त्यांच्यावर मुंबई येथे अग्निसंस्कार झाला. व त्यानंतर 9 डिसेंबरला 1956 ला रविवारी सायंकाळी 5 वाजता शिवाजी पार्क, दादर येथे मुंबईच्या नागरिकांच्या वतीने जाहीर शोकसभा घेण्यात आली. या शोकसभेत बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी बाबासाहेबांना श्रध्दांजली वाहिली. यावेळी त्यांनी संपूर्ण जनसमुदायाला बाबासाहेबांच्या मार्गदर्शना शिवाय प्रगती नाही याची जाणीव करुन दीली.

आपल्या खांद्यावर बाबासाहेबांनी जी धूरा दिली आहे, ती पूढे न्यावी लागेल थांबून उपयोग नाही याची जाणिव दादासाहेब गायकवाड, बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे, दत्ता, कट्टी बी.सी. कांबळे, आर. डी. भंडारे, धनश्याम तळवटकर, दादासाहेब रूपवते आदि नेत्यांना झाली. त्यांनी एकमेकांशी चर्चा करणे व पुढची दिशा कशी असावी याबद्दल चिंतन करणे सुरू केले. 16 डिसेंबरला नाशिक येथे बैढक घ्यायचे ठरले. त्या ठिकाणी पूढे काय, या बद्दल सर्व नेत्यांनी गंभीरपणे चर्चा केली.

ब–याच लोकांना 14 ऑक्टोबरला दीक्षा समारोपाला उपस्थीत राहणे शक्य न झाल्याची खंत होती. त्यामध्ये प्रामुख्याने अहमदनगर मधील जनता असून तेथे धर्मदीक्षा समारोह भरवून दीक्षा घेण्याचा आग्रह जनतेनी तेथील नेते रोहम व रूपवते यांच्याकडे धरला होता. त्याप्रमाणे 31 डिसेंबर व 1 जानेवारी असे दोन दिवस कार्यक्रम ठरले. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या संस्थेच्या पदाधिका–यांना निमंत्रणे पाठविण्यात आली. 31 डिसेंबरला नगरला जवळपास सर्वच कार्यकार्ते येऊन पोहचले. बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या संघटनेतील पदधिका–यांची बैठक होती.

" डॉ. आंबेडकारांनी (1) ऑल इंडिया समता सैनिक दल, (2) अ. भा. शे. का. फेडरेशन (3) पीपल्स एज्युकेशन सोसायटी (4) अ.भा. बौध्द महासभा (5) शे.का. इम्प्रुव्हमेन्ट (6) व कनिष्ठ गाव कामगार असोसिएशन या संस्था व साप्ताहिक प्रबुध्द भारत हे वर्तमानपत्र स्थापन केले होते. या सर्वांवर बाबासाहेबांचे नेतृत्व होते. या सर्व संस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वानुमते मध्यवर्ती अध्यक्षीय मंडळ( प्रेसीडीयम) स्थापन करण्यात आले. या सर्वोच्च मंडळात सात जणांची निवड करण्यात आली. 1) बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे ( अध्यक्ष) 2)दादासाहेब गायकवाड, 3) जी.टी. परमार 4) ए रत्नम 5) आर. डी. भंडारे 6) के.बी. तळवटकर 7) बी. सी. कांबळे . या बैठिकिच्या अध्यक्षस्थानी सुध्दा बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे हेच हाते." 12

यानंतर अहमदनगर मधील जमलेल्या उपस्थितांना त्रिशरण पंचशील तसेच 22 प्रतिज्ञा वदवून बौध्द धर्माची दीक्षा देण्यात आली. हा कार्यक्रम आयोजीत करुन बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे व इतर नेते मंडळीनी बाबासाहेबांचा वारसा चालविण्याचा निणर्य इतर नेते मंडळीनी बाबासाहेबांचा वारसा चालविण्याचा निर्णय घेतला होता. दुस–या दिवशी म्हणजेच 1 जाने. 1957 ला अ.भा. शे.का. फेडरेशनच्या वर्किंग कमेटीची बैठक सुरु झाली. या बैठकीत सर्वानुमते बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे शे.का.फेडेरेशनचे अध्यक्षपद देण्यात आले. त्यावेळी ते अवघे 37 वर्षाचे होते. त्यांनी बाबासाहेबांच्या काळात अ.भा.शे.का. फेडरेशनच्या सरचिटणीस पदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली होती. शिवाय बॅरिस्टर साहेबांनी बाबासाहेबांसोबत कार्य केलेले होते. त्यांच्या कार्यकुशलतेच्या प्राचय सर्वांनाच आला होता. म्हणून बॅरिस्टरांवर एवढी मोठी जाबाबदारी बाबासाहेबांच्या नंतर देण्यात आली.

**समारोपः–** हिंदुस्थानची राजकीय परिस्थीती बदलत होती. काळ बदलत होता. परंतु अस्पृश्यता व जातिभेद यांनी जखडलेला नि जर्जर झालेल्या पददलित समाज आपल्या नशिबाची शतकानुशतके चालत आलेली अस्पृश्यतेची गुलामगीरी नष्ट होण्याची वाट पहात होता आणि असमंतात प्रकाश उजळावा तसा डॉ. आंबेडकारांचा भारतीय राजकारणात उदय झाला. त्यांनी अस्पृश्यता निवारण त्यांचे आर्थिक व राजकीय सबलीकरण करण्यासाठी एक महान क्रांती केली. या क्रांतीत त्यांची साथ दिली येथील बुध्दिवादी जनतेने सामाजिक गुलामगीरीच्या बेडया झुगारुन रणकंदन करण्यास बाबासाहेबांचे शिलेदार नेहमीच सज्ज असत. त्यात एक महत्त्वाचा क्रांतिनायक म्हणजे विदर्भातील उच्च विद्या विभूषीत व्यक्ती. बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे ज्यांनी बाबासाहेबांचा वारसा त्यांच्या पश्चात निरंतर चालू ठेवला व अस्पृश्यांना न्याय मिळवून देण्यात आपल्या ज्ञानाचा व पदाचा पूर्णपणे उपयोग करुन घेतला.

**संदर्भसूची**

1) कोसारे एच. एल. वि.द.च इ. नेहा प्रकाशन, पान नं 58
2) घोडेस्वार रामाजी ( संकलन ) बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांची भाषणे खंड–1 संकेत प्रकाशन , पान न. 5
3) Kamble Dipankat Devesh, Blog on Roundable india co. in
4) खोब्रागडे फुलचंद्र, सुर्याचे सांगाती, संकेत प्रकाशन, पान नं. 81
5) प्रा. जंजाळ प्रकाश, आंबेडकरी क्रांतिनायक बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे, बॅरि. खोब्रागडे प्रतिष्ठान, पान नं 24
6) कित्ता, पान नं. 25
7) मून वसंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, National Bool Trust, India 2002, पान नं. 161
8) प्रा. जंजाळ प्रकाश आंबेडकरी क्रांतिनायक बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे, बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे प्रतिष्ठान. पान नं.29
9) मून वसंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, National Bool Trust, India 2002, पान नं. 168
10) कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, Popular Prakashan , पान. नं. 558
11) प्रा. जंजाळ प्रकाश आंबेडकरी क्रांतिनायक बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे, बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे प्रतिष्ठान. पान नं.33
12) ) कित्ता, पान नं. 26

## विदर्भातील आंबेडकरी  चळवळीतील बॅ. राजाभाऊ खोंबरागडे यांचे सामाजिक व राजकीय कार्य

**प्रा.डॉ. अनिल चहादेव बाभळे**
**इतिहास विभाग प्रमुख**
**आर. एस. बिडकर महाविद्यालय, हिंगणघाट**

**सारांश** -पिढयानपिढया हिंदु धर्माने वर्णव्यसस्थेचा आधार घेवून इथल्या अस्पृश्य समाजाला गुलामगिरीत लोटले. त्या गुलामगिरीचे चटके डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पाऊलोपाऊली सोसावे लागले. अपमानाचे जिवन त्यांना जगावे लागले. इथे माणूस म्हणून अस्पृश्यांना जगण्याचा अधिकारच नव्हता. लहानपणापासून हे दुःख बाबासाहेबांच्या वाटयाला आलेले होते. शाळेत असतांना संवर्ण मुलांबरोबर बसण्यास मनाई केल्या जात होती, शाळेतील पिण्याच्या पाण्याचा माठ याला हात लावण्याची परवानगी नव्हती कारण म्हणजे अस्पृश्याने हात लावला तर माठ बाटेल अशी अमानवी समजूत होती. अस्पृश्य समाजाला सार्वजनीक ठिकाणी पाणी पिण्याचा अधिकार नव्हता. मंदीरात प्रवेश नव्हता. शिक्षणाचा अधिकार नव्हता. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपुर्ण आयुष्य समाजाच्या उध्दाराकीरता वाहून दिले. कारण बॅरीस्टरची पदती घेूवून आल्यांनंतरही त्यांना असूपृश्य समजून त्यांचा जागोजागी अपमान केला जात होता. हे पाहून माझ्या अज्ञानी समाजाची काय अवस्था असेल हे त्यांनी जाणले. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजाच्या उध्दाराकरिता वाहून दिले. माझ्या समाजाला यौय तो मानसन्मान, स्वाभीमान, न्याय व अधिकार मिळवून देईल अशी त्यांची घोषणा होती. त्याकरीता त्यांनी अनेक प्रकारची आंदोलने केली. या आंदोलनाचा प्रभाव विदर्भावर सुध्दा पडलेला होता. विदर्भात अनेक ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सभा सम्मेलन घेवून आपल्या कार्याचे महत्व पटवून दिले. हिंदु समाज आपल्याला मानसन्मानाने जगू देणार नाही त्याकरीता अस्पृश्य समाजाने शिक्षण घेवून व संघटीत होवून आपल्या अधिकाराकरीता झटले पाहिजे. म्हणूनच विदर्भातील अनेक पुढारी डॉ. आंबेडकरांच्या चळवळीत सहभागी होवू लागले. विदर्भातील या उच्च शिक्षित तरूणांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा घेवून चळवळीत भाग घेतला. त्यातील बाबासाहेबांचे विश्वासू कार्यकर्ते म्हणजे बॅ. राजाभाऊ खोबरागडे हे होय. ते बाबासाहेबांचे मानस पूत्र होते.

**शब्द संकेत : जीवनचरित्र,सामाजिक,राजकीय आणि रीपब्लीकन चळवळीतील योगदान**

**संशोधन पद्धती :**ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.

**बॅ. राजाभाऊ खोबरागडे यांचे जिवन चरित्र** :बॅ. राजाभाऊ यांचा जन्म 25 सप्टे. 1925 रोजी नशीनाबाग चंद्रपूर येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नांव देवाजीबापू तर आईचे नांव इंदीराबाई असे होते. त्यांचे वडील डॉ. आंबेडकरांच्या चळवळीने प्रभावीत झालेले होते. व ते सामाजिक विषमतेविरूध्द लढत होते. डॉ. आंबेडकरांनी विदर्भातील अमरावतीच्या अंबादेवी मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा याकरीता सत्याग्रह केला. त्यात देवाजीबापू आपल्या सहकाऱ्यांसोबत सहभागी झालेले होते. आणि ते डॉ. आंबेडकरांच्या समतेच्या लढयातील एक शिपाई बनले.[1] त्यामुळे वडिलांच्या सामाजिक कार्याचा प्रभाव राजाभाऊंच्या बालमनावर पडला. राजाभाऊचे प्राथमिक शिक्षण नगरपरिषदेच्या सेकंड जटपूरा या शाळेत झाले. याचवेळी ते भारत सेवा संघात नैतिक व कवायतीचे शिक्षण घेण्यास जात होते. 1941 साली जिल्हा परिषद ज्युबिली हायस्कुल मधून राजाभाऊंनी मॅट्रिकची परीक्षा पास केली. पुढे त्यांनी इंटर सायन्सची परीक्षा सायन्स कॉलेज नागपूर येथून दिली. त्यानंतर ते मॉरिस कॉलेज नागपूर येथून 1945 साली बी.ए. ची पदती प्राप्त केली. त्याचवेळी त्यांनी विद्यार्थ्यांचे संघटन निर्माण केलेले होते. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने राजाभाऊ यांना उच्च शिक्षणासाठी विलायतेत पाठविले. त्यांनी लंडन येथील लिंकन्समधून बॅरिस्टर–ॲट–ला हि पदवी 1950 मध्ये प्राप्त करून भारतात परत आले. आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजाला व्हावा ही राजाभाऊची तळमळ होती. त्यामुळेच राजाभाऊंनी समाजाच्या कल्याणाकरीता स्वतःला झोकूण दिले. कारण जेव्हा देवाजीबापू व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट झाली त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी देवाजी बापू यांना राजाभाऊस समाजाला दान द्या असे म्हटले असतांना देवाजी बापूंनी काही विचार न कराता बाबासाहेबांच्या चळवळीसाठी बॅ. राजाभाऊला दान दिल.[2] तेव्हापासून बॅ. राजाभाऊ खोबरागडे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक चळवळीत व कार्यात प्रत्यक्ष सहभागी राहिलेले आहे.

**बॅ. राजाभाऊ खोबरागडे यांचे सामाजिक कार्य** :बॅ. राजाभाऊ खोबरागडे यांचे वडील देवाजीबापू यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची ओळख लहाणपणीच करून दिलेली होती. डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक आंदोजनातून त्यांना दिशा मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांची प्रेरणा स्त्रोत होते. आंबेडकरी चळवळीचा मुख्य गाभा हा सामाजिक सुधारणा हा होता. विषमतेविरूध्द लढा देवून अस्पृश्यांना न्याय देणे हा मुख्य उद्देश होता. म्हणूनच या कार्यात बॅ. राजाभाऊ खोबरागडे यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणावर विशेष भर दिला. स्वतः उच्चविद्याविभूषित असल्याने शिक्षणाचे महत्व त्यांना कळले होते. "मानवतेला

अपमानीत करणारी आणि या देशाला पांगळे करणारी अन्यायकारी समाज रचना उलथवून टाकावयाची असेल तर शिक्षण हे पहिले प्रकरण आहे असे बाबासाहेबांना वाटत असे"[3] याच हेतूने बॅ. खोबरागडे यांनी बाबासाहेबांच्या विचारांना चालना दिली. याच हेतूने शैक्षणिक कार्य सुरू केले. त्यांचे शैक्षणिक विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या विचारावर आधारित होते. "भारतीय घटनेच्या 41 कलमान्वये 6 ते 14 वर्षे वयाच्या सर्व मुलामुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था असून सूध्दा भारताने या ना त्या कारणाने अजूनपर्यंत ही योजना राबविली नाही. मुलांमध्ये चांगले वर्तन, नियमितपणा, शील या गुणांची जोपासना करून त्यांना जबाबदार नागरिक बनविण्यासाठी मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना अंमलात आणलीच पाहिजे अशी मागणी ब्. राजाभाऊंनी राज्यसभेत केली.[4] एवढेच नव्हे तर ब्. राजाभाऊ खोबरागडे यांनी राज्यसभेत असतांना इंग्लंड, बेल्जियम, फ्रान्स, डेन्मार्क या देशांनी शिक्षण क्षेत्रात कशी प्रगती केली याचा तपशील सादर केला. मुलांना साक्षर बनविण्याऐवजी त्यांना उत्तम नागरीक बनविले पाहिजे. त्यावर त्यांचा भर होता. बॅ. राजाभाऊंनी अस्पृश्यांना शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा सल्ला दिला. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे म्हणून आपल्या शाळा व वस्तीगृहे असणे अत्यावश्यक आहे त्यातून प्रत्येक जिहयात किंवा तहसिलींच्या जागी आतापासून आपण आपल्या शेक्षणिक संस्था स्थापन केल्या तर भविष्यातील धोका टळू शकतो असे मला वाटते.[5]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबादला कॉलेज स्थापन केल्यामुळे विदर्भातील विद्यार्थांना त्याचा फायदा होत आहे. ती बाब लक्षात घेवून बॅ. राजाभाऊ म्हणतात की, मराठवाडयातील विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी अधिकाधिक वाढत असल्यामुळे इकडील विद्यार्थ्यांना या कॉलेजात प्रवेश मिळविणे अडचणीचे जाईल तेव्हा विदर्भातच कॉलेज स्थापन करून येथील कॉलेज शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करता येईल.[6] म्हणूनच बॅ राजाभाऊ खोबरागडे अस्पृश्यांच्या शिक्षणावर भर देत असतांना अनेक शैक्षणिक संस्थांची स्थापना केली. 1966 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर एज्यूकेशन सोसायटीची स्थापना केली. या सस्थेचे राजाभाऊ अध्यक्ष होते. या संस्थेद्वारा 1972 साली डॉ. आंबेडकर कॉलेज, ब्रम्हपूरी, डॉ. आंबेडकर विद्यालय ब्रम्हपूरी,1965 व 1966 साली डॉ. आंबेडकर होस्टेल ब्रम्हपूरी येथे सुरू केले.[7] त्याचबरोबर 1967 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमेरियल सोसायटी चंद्रपूर ही संस्था स्थापन केली. त्याद्वारे 1970 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज चन्द्रपूर येथे सुरू करण्यात आले. तसेच सिध्दार्थ विद्यालय चंद्रपूर 1961, डॉ. आंबेडकर हायस्कूल नान्होरी 1961, डॉ. आंबेडकर होस्टेल चंद्रपूर 1961, डॉ. आंबेडकर होस्टेल वरोरा 1967, डॉ. आंबेडकर होस्टेल नान्होरी 1964 इत्यादी संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाचा व्यापक प्रसार केला व त्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली करून दिली. या शेक्षणिसक संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण, मागासवर्गीय भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळू लागले. त्यातून अनेक नामवंत विद्यार्थी मोठमोठया पदावर पोहचले व त्यांच्या जिवनात आमुलाग्र बदल झाले. हे केवळ बॅ. राजाभाऊ खोबरागडे यांच्या मुळे शक्य झाले.

शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे ओळखून विदर्भातील मागासलेल्या भागातील गोर गरीब, दिन–दुबळया, शोषीतांना शिक्षणाचे दरवाजे खुले व्हावी हा त्यांचा सातत्याने प्रयत्न राहिलेला आहे. म्हणूनच त्यांची शिक्षणविषयक तळमळ स्पष्ट होत असतांना दिसते. त्यामुळेच 26 जून 1959 ला मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण असतांना बॅ. राजाभाऊ त्यांनी आपल्या शिष्टमंडळासहीत भेट घेतली व त्यांनी शैक्षणिक सवलती, भूमिहीन मजूर, शेतकरी वर्गाची पडीत जमीन, सरकारी नोकरी व शिक्षण संस्थेत राखीव जागा, मराठवाडयातील विद्यार्थी वस्तीगृहे आणि नागपूर दीक्षा मैदान बौध्दांच्या नावाने देण्याविषयी एक निवेदन देण्यात आले. त्यात बॉ. राजाभाऊ यांनी मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरीता राखीव निधीची तरतूद सरकारने करावी जेणे करून त्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण मिळू शकेल[8]

सामाजिक सुधारणा करीत असतांना समाजाला शिक्षीत करणे हे त्यांचे महत्वपूण ध्येय होते. ज्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाला शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे खणकावून सांगितले त्याचप्रमाणे त्यांच्या पावलावर पावूल ठेवून बॅ राजाभाऊ यांनी ही दुर्गम भागात शिक्षणाचे महान कार्य चालविले. त्यांच्या कार्याची दखल एक खोर शिक्षणतज्ञ म्हणूनच घेतल्या गेलेली आहे. 1979 ला ब्रम्हपूरीला डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या कोनशिला समारंभ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षतेखाली रिपब्लीकन पक्षाचे अध्यक्ष बॅ. राजाभाऊ होते. ते अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, आजवर शैक्षणिक क्षेत्र ही विशिष्ठ वर्गाची मक्तेदारी होती. शिक्षण घेणारे व देणारे या मक्तेदारीची कोंडी फोडणे व हे शिक्षण बहूजन समाजापर्यंत पोहचविणे करणे याकरीता महाराष्ट्रात प्रयत्न होत आहेत. डॉ. आंबेडकर महाविद्यालय त्यांचे मूतिमंत उदाहरण आहे.[9]

बॅ. राजाभाऊ यांचा पिंड सामाजिकतेचा होता. तो त्यांच्या वडिलांकडूनच मिळालेला होता. या दोघांवरही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा प्रभाव होता. समाजामध्ये व्रिषमता सर्वत्र कार्यरत असून त्याचा बिमोड केल्याशिवाय समाजाच्या सर्व घटकात समानतेची मूल्ये रूजणार नाहीत, असा त्यांचा दुर्दम्य आत्मविश्वास होता. म्हणूनच बॅ. राजाभाऊ यांनी अस्पृश्यांना न्याय मिळवून देण्याकरीता सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला महत्व दिले. अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणी घेण्यास केलेली मनाई, मंदीरात प्रवेशाकरीता केलेली मनाई, अस्पृश्य समजून केलेला अपमान या विराधोत त्यांनी आंदोलने केली व अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात आवाज उठविला.

**बॅ. राजाभाऊ यांचे राजकीय कार्य**

आंबेडकरी चळवळीला आणि विचारांचा प्रभाव बॅ. राजाभाऊ खोबरागडे यांच्यावर होता. बाबासाहेबांची प्रेरणा घेवून त्यांनी आपल्या राजकीय जीवनाला प्रांरभ केला. आपल्या वडिलांच्या उपदेशातून व बाबासाहेबांच्या सहवासातून त्यांची जडणघडण झाली. आणि म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जसे राजकीय प्रणाली ही सर्व समश्यांचे निरासरण करणारी आहे. त्यात आपण सहभागी झालो पाहिजे असे म्हणायचे तसेच बॅ. राजाभाऊ यांनी सुध्दा राजकीय क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केलेली आहे. विद्यार्थी दशेपासूनच त्यांनी राजकारणात भाग घेवून विद्यार्थि संघटन निर्माण केले तसेच त्यांच्या कडून अनेक प्रकारची आंदोलने सुध्दा झालेली आहे. 1943–1945 या कालावधीत बॅ. राजाभाऊ हे मध्य प्रदेश शेडयुल्ड कास्ट स्टुडंट फेडरेशनचे सचिव होते. सचिव म्हणून त्यांनी या काळात विद्यार्थ्यांकरीता उल्लेखनिय कार्य केले. बॅ. राजाभाऊ यांनी स्टुडंट फेडरेशनतर्फे भव्य मोर्चाचे आयोजन केले आणि अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या मागणीसाठी बुलंद आवाज उठविला.[10] म्हणजेच विद्यार्थी दशेपासूनच त्यांच्यावर राजकीय आंदोलनांचा प्रभाव पडलेला होता.जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रोत्साहाने राजाभाऊ हे उच्च शिक्षणाकरीता परदेशात गेले त्यावेळी बॅरिस्टरची पदवी 1950 ला प्राप्त केल्यानंतर ते भारतात परत आले. व त्यांनी शेडयुल्ड कास्ट फेडरेंशनच्या कार्यात स्वतःला झोकून दिले. बॅ. राजाभाऊ यांच्या राजकीय जिवनाची सुरवात चंद्रपूर पासून झाली ते 1952 ते 1955 या काळात नगरपरिषदेचे उपाध्यक्ष होते. त्यावेळी त्यांनी लोकोपयोगी निर्णय घेतले. याच कार्याची नोंद रिपब्लिकन चळवळीने नेते व्ही. डी. मेश्राम म्हणतात, 'येथील गोलबाजारात अनेक दलित इसमोची दुकाने आजही आहेत. राजाभाऊंनी नगरपालिकेचे उपाध्यक्ष असतांना दलितांसाठी 50 वर्षापूर्वी दुकानांची ही व्यवस्था करून दिली ही दलित कुटुंबे आजही या धंद्यावर ताठ जिवन जगत आहेत. या अर्धशतकात त्यांच्या कुटुंबातील अनेक मुले–मुली शिक्षण घेवून विविध क्षेत्रात पुढे गेलेली आहेत.''[11] म्हणजेच बॅ. राजाभाऊ यांनी चंद्रपूर मध्ये नगरपरिषदेच्या माध्यमातून गोर गरीबांना अनेक अधिकार प्राप्त करून दिलेले दिसून येते.

नागपूर येथे शेडुल्ड कास्ट फेडरेशच्या कार्यकारिणीची बैठक 1953 मध्ये झाली. या बैठकीत सर्वानुमते बॅ. राजाभाऊ यांनी नागपूर प्रदेश शेडुल्ड कास्ट फेडरेशनचे अध्यक्षपद बहाल करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बॅ. राजाभाऊ खोबरागडे यांच्यावरती जबाबदारी टाकलेली होती. त्यानंतर बॅ. खोबरागडे यांनी संघटना मजबूत करण्याला महत्व दिले. त्यांनी नागपूर प्रदेशातील लहान मोठी शहरे, गांवे त्यांनी पालथी घातली.सर्त कार्यकत्यांच्या भेटी घेंतल्या. प्रत्यक्ष भेटून त्यांच्यात नवचैतन्य निर्माण केले. संघटनेचे जाळे सर्वदूर पसरले[12] त्यामुळे स्वाभाविकच राजकीय वलय निर्माण करण्यात त्यांचा मोठा वाटा असल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्यावेळेस भंडारा लोकसभा निवडणूकीत उभे होते. तेव्हा त्यांच्या प्रचाराची धूरा बॅ. राजाभाऊंनी साभाळली त्यावेळी प्रचारादरम्यान त्यांनी घेतलेली मेहनत पाहून 1955 मध्ये बॅ. राजाभाऊ शेडयुल्ड कास्ट फेडरेशनच्या सरचिटणीसपदी नियुक्ती केली. याबद्दल डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उत्तारार्धात ज्या काही तरूणांवर भिस्त राखली होती त्यात बॅ. खोबरागडे यांचे फार वरचे स्थान आहे'.[13] यावरून बॅ. राजाभाऊ हे बाबासाहेब आंबेडकरांचे अत्यंत विश्वासू होते हे स्पष्ट होते.

6 डिसे. 1956 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाल्यानंतर बॅ. राजाभाऊ शे.का.फे. चे अध्यक्ष झाले. डिसे. 1956 ते ऑक्टो. 1957 पर्यंत ते या पदावर कार्यरत होते. या काळात राजाभाऊ यांच्या रूपाने राजकीय क्षितीजावर एक दैदीप्यमान तारा उदयास आला. व त्यांनी पक्ष बांधणीला सुरूवात केली. 1957 च्या लोकसभेच्या निवडणूकीच्या प्रचाराची धूरा राजाभाऊ यांच्याकडे होती. राजाभाऊ चे नेतृत्व व दादासाहेब गायकवाड यांच्या मार्गदर्शनात शे.का.फे. निवडणूक लढविली. व त्यात जी.के. मोन, बी.सी. कांबळे, भाउराव गायकवाड, एस.के. दिघे, हरिहरराव सोळुंके व बी.जी. सोळंके निवडून आले. तर गुजरातमधून चरणराम परमार, म्हैसरमधून डी.ए. कटटी व मद्रासमधून एन. शिवराज निवडून आले. या यशानंतर बॅ. राजाभाऊ यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकीतही शे.का.फे. व संयुक्त महाराष्ट्र समिती मिळून जोमाने प्रचार केला त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात 17 आमदार निवडून आलेले होते. तसेच मुंबई महानगरपालीकेतही घवघवीत यश मिळविले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 13 ऑक्टोंबर 1956 रोजी नागपूर येथे वर्तमानपत्राचे बातमीदारांना मुलाखत देतांना, जाहीर केले करी, मी नवा प्रभावी विरोधी पक्ष काढणार आहे, त्या पक्षाचे नाव 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' असे राहिल परंतु लगेच त्यांचे महापरिनिर्वाण झाल्यामुळे त्यांची इच्छा पूर्ण होवू शकली नाही. परंतु पुढे 3 ऑक्टोंबर 1957 रोजी 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' या पक्षाची स्थापना झाली. त्याचे अध्यक्ष एन. शिवराज तर सचित बॅ. राजाभाऊ खोबरागडे हे होते. बॅ. राजाभाऊंनी रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेनंतर त्यांच्या प्रसारासाठी सभ्रंचे आयोजन करून पक्षाचे विचार जनसामान्यापर्यत पोहोचविले. रिपब्लिकन पक्ष म्हणजे केवळ राजकीय संघटन नव्हते तर ते सामाजिक संघटनही होते हे पटवून देण्याचे कार्य केले. रिपब्लिकन पक्षाने विरोधी पक्ष म्हणूनही महत्वाची जबाबदारी पार पाडलेली होती.

बॅ. राजाभाऊ खोबरागडे हे वयाच्या 33 व्या वर्षी राज्यभेचे सदस्य झालेले होते. ते जवळपास अठरा वर्षे राज्यसभेचे सदस्य होते. त्यावेळी त्यांनी देशासमोर असलेल्या अनेक समस्यांना वाचा फोडली. विविध प्रश्न व समस्या पोटतिडकिने संसदेसमोर मांडले. तसेच राज्यसभेत बौध्दांच्या सवलती, बढतीमध्ये दलितांना राखीव जागा इत्यादी प्रश्न उचलून धरले. त्याचप्रमाणे आमच्या समाजावर जागोजागी होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात आवाज उठविला. औद्यागिक विकासावर भर दिला पाहिजे व बेकारीची समश्या दूर झाली पाहिजे असेही त्यांनी राज्यसभेत ठणकावून सांगितलेले होते त्यांनी भूमिहिनांचा सत्याग्रह घडवून आणलेला होता. बुध्द धम्माची दिक्षा समारंभ आयोजित करण्यामध्ये त्यांचा महत्वाचा वाटा होता.

**निष्कर्ष** बॅ. राजाभाऊ खोबरागडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेंतलेला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर अस्पृष्योन्नतीच्या चळवळीला निश्चित मार्गाने आणि निश्चित स्थळी पोहोचविण्याचे कार्य राजाभाऊंनी केले. ते परिवर्तनवादी झुंझार व्यक्तिमत्व होते. त्यांच्या अस्पृष्यांविषयीच्या तळमळीची, आपुलकीची आधुनिक काळातील लोकांना जाणीव झाली पाहिजे. बॅ. राजाभाऊंनी डॉ. आंबेडकरी आंदोलनातील सामाजिक, राजकीय क्षेत्रात भरीव कार्य केलेले आहे. हे कार्य करीत असतांना आंबेडकर निष्ठा कधीही ढळू दिली नाही. आंबेडकर नावाला गालबोट लागेल असे आचरण त्यांच्या हातून घडले नाही. त्यांच्या सामाजिक जिवनातील कार्याचा विचार करता आपले जिवन अस्पृश्यांच्या हिताकरीता अर्प्रण केल्याचे दिसून येते. विदर्भातील आंबेडकर चळवळीतील ते एक शिपाई होते

संदर्भसूची

01.मेश्राम, व्ही. डी.,महाराष्ट्राचे शिल्पकार बॅ. राजाभाऊ ,खोबरागडे' म.रा.साहित्यआणिसास्कृतिकमंडळमुंबई,प्र.आ.2003,पृष्ठ,क्र.4
02.रामटेक, पी.व्ही, 'बाबासाहेबांचे निष्ठावंत सहकारी, देवाजीबाबू खोबरागडे', संकेत प्रकाशन नागपूर, प्र. आ. 2003, वृ.क. 43
03.ताकसांडे, प्रसेन बॅ. राजाभाउ खोबरागडे यांचे आंबेडकरी चळवळीत योगदान, पी.एचडी. प्रबंध रा.तुम नागपूर, 2015 पृ. 86
04.घोडेस्वार, रामाजी, 'बॅ. राजाभाउ खोबरागडे यांची भाषणे' खंड 1, बुध्द विहार बांधकाम समिती, चद्रपूर, प्र. आ. 1987 पृ.क्र. 182
05.0पूर्वोक्त, पृष्ठ क., 80
06.कित्ता, पृष्ठ क. 63
07.खोबरागडे, फूलचंद,'सुर्याचे सांगाती',संकेत प्रकाशन नागपूर प्र. आ. 2016, पृष्ठ क., 93
08.बाभळे, बा.सी., संपादक, ''साप्ताहिक सिध्दार्थ जगत'' वर्धा 24 सप्टे. 1982, पृष्ठ 14
09.कांबळे, बी.आर., संपादक ''साप्ताहिक प्रजासत्तक, चद्रंपूर, 15 जाने. 1979, पृष्ट 77
10.प्रा. डॉ. भडके, इसादास, बॅ. राजाभाउ खोबरागडे, आंबेडकरी चळवळ आणि विचार, सुरो वर्ल्ड पब्लिकेशन मुंबई, 2018, पृ.क्र. 149
11.मेश्राम, व्ही,डी., ''महाराष्टाचे शिल्पकार बॅ. राजाभाउ खोबरागडे''महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प्र.आ.2003 पृ.क्र.13
12.प्रा. डॉ, भडके, इसादास, पूर्वोक्त, पृष्ठ क. 151
13.पूर्वोक्त, पृष्ठ क.152

## बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील योगदान

संशोधक विद्यार्थी
रत्नदिप राजेन्द्र गणवीर
डॉ.म. वा. पी.डब्लू.एस. कला व
वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

**सारांश :**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महत्त प्रयासांनी उभारलेली चळवळ म्हणजेच ''आंबेडकरी चळवळ'' होय. बुद्ध, फुले, शाहू यांना आदराचे स्थान देऊन आपल्या चळवळीत त्यांचे विचार पेरण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर केले. म्हणूनच फुले, शाहू, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अंगीकारलेला मार्ग म्हणजेच आंबेडकरी चळवळ! बाबासाहेबांनी प्रज्ञा, शील, करुणा या बुद्धाच्या तत्वा बरोबरच स्वाभिमान समाजाच्या चळवळीमध्ये रुजविला. एवढेच नव्हे तर विद्या, चरित्र ,स्वाभिमान या बाबींना त्यांनी त्यांच्या आराध्यदैवत असे संबोधिले.[1]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, राजकीय व धार्मिक क्रांतीचे रणसिंग फुंकले. क्रांती लढा यशस्वी होईपर्यंत होईस्तर लढला गेला. या लढ्यातून असंख्य कार्यकर्ते समाजात निर्माण झाले. ह्या लढयाला यशस्वी करण्यासाठी अनेक पुढारी व कार्यकर्त्यांनी जिवाचे रान केले. या लढ्यातून अनेक दलितांना प्रेरणा, स्फूर्ती व शक्ती मिळाली. त्यांच्या कार्यामुळे नवीन तेज व स्वाभिमान निर्माण झाला. या सामाजिक, राजकीय व धार्मिक कार्यात विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्याच्या आंबेडकरोत्तर चळवळीतील बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे स्थान मोठे आहे. विदर्भाच्या दलित चळवळीच्या इतिहासाचे सुवर्णपान आहे.

इंग्लंडला उच्च शिक्षणासाठी बाबासाहेबांनी ज्या 14 विद्यार्थ्यांची यादी तयार केली त्यात बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे नाव होते. सन 1949 ला लिकन इन लंडनमधून बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे बार–ॲट–लॉ ची पदवी घेऊन भारतात परतले.[2] त्यानंतर त्यांनी चंद्रपूरच्या जिल्हा व सत्र न्यायालयात वकिलीचा व्यवसाय सुरू केला. परंतु बाबासाहेबांनी राजाभाऊ खोब्रागडे यांच्या वडिलांना म्हणजे, देवाजी बापूंना म्हणाले 'आपल्या जेष्ठ पुत्रास माझ्या झोळीत दया अशी विनंती केली. देवाची बापू ही मागणी कशी नाकारणार? त्यांनी तात्काळ ही मागणी मान्य केली.[3] त्या नंतर त्यांनी आपल्या जन्मभूमीतून राजकीय जीवनास सुरुवात केली. सन 1952 ते 55 पर्यंत चंद्रपूर नगरपालिकेचे ते उपाध्यक्ष राहिले. नगरपालिकेचे उपाध्यक्ष असताना दलितांसाठी 50 वर्षांसाठी दुकानाची व्यवस्था करून दिली होती. ही दलित कुटुंबे आपला उदरनिर्वाह दुकानाच्या भरोशावर आजही करीत आहेत. त्यातून अनेक कुटुंबातील मुले, मुली शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात पुढे गेलेली आहेत.

**शब्दकुंजी** : अखिल भारतीय शेडयूल कास्ट फेडेशन, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, भूमीहिनांचा सत्याग्रह, धम्म चक्र प्रवर्तन, प्रेसिडीयम, सरचिटणीस

**सशोधन पद्धती :ऐतिहासिक संशोणन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना :**1964 ला बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी देशातील खेड्यापाड्यात राहाणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांसाठी देशव्यापी भूमिहीन सत्याग्रहाला सुरुवात केली. देशातील सारे भूमिहीन शेतमजूर एकत्र आले. या राष्ट्रव्यापी सत्याग्रहामुळे तुरुंगाची जागादेखील कमी पडू लागली होती. खेड्यापाड्यात प्रचार करून तेथील मरगळलेल्या, तेजोहीन झालेल्या ग्रामीण जनतेला नवचैतन्य निर्माण झाले. बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी हजारो सत्याग्रही सोबत स्वतःला अटक करून घेतली. शर्ते शेवटी तत्कालीन प्रधानमंत्री लालबाहादूर शास्त्री यांच्यासमोर जमले व वाटाघाटी करून भूमिहीनांना जमिनी देण्याचा निर्णय घेतला. याचा फायदा भारत भरातील शेतमजुरांना सोबतच विदर्भातील अनेक भूमिहीनांना त्याच्या हक्काच्या जमिनी मिळाल्या.सध्या देशात सर्वत्र लहान राज्याची मागणी जोर धरू लागली आहे. गतकाळातील केंद्र सरकारने छत्तीसगड, झारखंड, उत्तराखंड, तेलंगाना या छोट्या राज्यांची निर्मिती केली. विदर्भ राज्याची मागणी बॅरि. राजाभाऊनी त्या काळातच उचलून धरली होती. विदर्भ राज्य सर्वगुणसंपन्न असल्यामुळे विकासास पूरक वातावरण तयार करून विदर्भ भरभराटीस येऊ शकतो असे त्यांना नेहमी वाटायचे, म्हणूनच त्यांनी लहान राज्याच्या निर्मिती करिता राज्य पुनर्रचना आयोग नेमावा अशी मागणी केली होती.[4]

विदर्भातील चंद्रपूर येथील सरदार पटेल महाविद्यालयात आयोजित वाणिज्य अभ्यास मंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगी आपले मत व्यक्त करताना बरि. राजाभाऊ खोब्रागडे म्हणाले की ''भारताच्या अर्थनियोजनावर्ती टीका केली, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा समोर बोलतांना ते म्हणाले नियोजन केवळ नियोजनासाठी नसते त्यामागे सामाजिक उद्दिष्टे असतात, हरितक्रांतीच्या प्रयोगामुळे खेड्यांमध्ये नवीन श्रीमंत

जमीन मालकांची जात निर्माण होऊन खेड्यातील शेतमजुरांची त्याच्याकडून राजकीय व सामाजिक कोंडी करण्यात येते. हे चित्र म्हणजे आमच्या अर्थ नियोजनाच्या सफलतेचे धोतक आहे.''[5]

बाबासाहेबांच्या धम्मदीक्षा नंतर ग्रामीण भागात काही धम्मदीक्षेचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. 1957 मध्ये एप्रिल महिन्यात चंद्रपूर जिल्ह्यातील बोरगाव येथे अशाच प्रकारच्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. बोरगाव हे गाव गोंडपिपरी तालुक्यात आहे. बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या हातून दीक्षा घ्यायची असे बोरगाव येथील संयोजन समितीने ठरविले. विशेष म्हणजे या कार्यक्रमात बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांना 'छोटे बाबा' ही पदवी बोरगाव वासियांनी बहाल केली.[6]

बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे विदर्भ खान कामगार संघाचे अध्यक्ष होते. चंद्रपूर जिल्ह्यातील खाणीमध्ये कामगारांचे शोषण केले जात होते. त्यावर राजाभाऊ खोब्रागडे यांनी वेळीच आवाज उठवून खान मालकांच्या विरोधात निषेध सभा घेतल्या. त्यांनी कामगारांची होणारी पिळवणूक व खान मालकांच्या दहशतवादी धोरणावर कडाडून हल्ला चढविला. या कामगारांवरील आत्यार न थांबल्यास उग्र आंदोलन उभारावे लागेल असाही इशारा त्यांनी दिला. 1971–72 ला विदर्भातील चंद्रपूर या जिल्ह्यात रावण दहन बंदचे आंदोलन उभे केले. या आंदोलनामुळे शहरात खूप तणाव निर्माण झाला. तत्कालीन जिल्हाधिकार्यांनी ही भयावह परिस्थिती बघून बॅरि. राजाभाऊंना मार्गदर्शनासाठी बोलावले राजाभाऊ उभे झाले, आणि ठणक आवाजात म्हणाले या देशाचा खरा इतिहास बुद्धी परस्परपने दाबण्याचा प्रयत्न होत आहे. आम्ही बुद्धाचे उपासक शांतताप्रिय आहोत, ज्यांना शांतता हवी त्यांनी कटकारस्थानाचा इतिहास झित्कारला पाहिजे.[7] हे शब्द एकूण जिल्हाधिकार्यां सहित सर्व सभागृह सुन्न झाले .यावरून त्यांच्या शब्द शैलीची महती दिसून येते.

**बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे आणि धर्मांतरण सोहळा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर समतेचा लढा लढवीत असताना त्यांना हिंदू धर्मातून झालेला विरोध अस्वस्थ करत होता. 'मी हिंदू म्हणून जन्मलो परंतु, मी हिंदू म्हणून मरणार नाही' ही त्यांची घोषणा तब्बल 24 वर्षांनी साकार होताना दिसत असताना राजाभाऊ त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. ऑगस्ट 1956 ला बाबासाहेबांनी राजाभाऊ सोबत दिल्ली निवासस्थानी अत्यंत महत्वपूर्ण चर्चा आणि वाटाघाटी केल्या. दिल्लीहून परततांना राजाभाऊ वर्धा येथे थांबले असता पत्रकारांशी बोलतांना ते म्हणाले, बाबासाहेब येत्या ऑक्टोबर महिन्यात हिंदू धर्म सोडणार हे निश्चित आहे.[8] त्यावेळी राजाभाऊंची ही मुलाखत खूप गाजली त्यांनी बाबासाहेबांचा विश्वास संपादन केला होता, हे त्यांचे मूर्तिमंत उदाहरण होय. 14 ऑक्टोबर 1956 ला बुद्ध धम्म दीक्षा समारोह नागपूर येथे संपन्न झाला. या एतिहासिक धम्मदीक्षा सोहळयाची जबाबदारी राजाभाऊंनी आपल्या समर्थ खांद्यावर घेतली होती. सुमारे पाच लाख लोकांची व्यवस्था धम्मदीक्षा स्थळी सुव्यवस्थितरित्या करण्यात आली होती. त्यानंतर लगेच तिसऱ्या दिवशी राजाभाऊच्या खास आग्रहास्तव त्यांचा जन्म स्थळी चंद्रपूर येथे धम्मदीक्षा सामारोहाचे आयोजन केले गेले. चंद्रपूर येथील दीक्षाभूमी नागपूर नंतरची दुसऱ्या क्रमांकाची ऐतिहासिक भूमी झालेली आहे. त्यानंतर लगेच 6 डिसेंबर 1956 ला बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले. एका महा सूर्याचा अस्त झाला. आंबेडकरी चळवळीचे पुढे काय? हा यक्षप्रश्न चिन्ह समाजापुढे उभा राहिला. परंतु त्या प्रश्नाचे उत्तर बाबासाहेबांचे राजकीय मानसपुत्र असलेले राजाभाऊंनी पूर्ण करण्याची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली. राजकीय सत्ता हस्तगत करणे आणि भारत बौद्धमय करणे ही बाबासाहेबांनी पाहिलेली स्वप्ने त्यांनी साकार करण्याच्या विडा उचलला. अखिल भारतीय शेड्युल कास्ट फेडरेशनचे संमेलन कोंढणपूर येथे भरले असता त्यांनी बौद्ध धम्माची दीक्षा का? यावर 8 डिसेंबर 1956 ला भाषणात स्पष्ट केले, पत्रकार परिषदेनंतर दिलेले भाषण 13 जून 1957 ला भंडारा जिल्ह्यातील चिखली या गावी अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या अध्यक्ष या नात्याने दहा हजार अस्पृश्य बांधवांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यात ते म्हणतात, 'जातीवाद नष्ट करण्यासाठी नुसत्या अशपृश्यानीच नव्हे तर संपूर्ण भारतातील जनतेनी बौद्ध धर्माचा अंगिकार करावा व जातीयता नष्ट करावी.'[9] यावरून त्यांची बौद्धधर्म विषयीची तळमळ दिसून येते, बाबासाहेबांचे भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न पूर्णत्वास नेण्यासाठी त्यांनी दिक्षार्त्यांना सदउपदेश वेळोवेळी व वेगवेगळया ठिकाणी केले होते.

**बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांची विदर्भातील राजकीय कारकीर्द** :सन 1955 मध्ये बाबासाहेबांनी राजाभाऊ यांच्या खांद्यावर एक जबाबदारीचे ओझे ठेवले. बाबासाहेब स्वतः ज्या ऑल इंडिया शेड्युल कास्ट फेडरेशन चे अध्यक्ष होते त्या राजकीय संघटनेचे सरचिटणीस पद राजाभाऊंना दिले. बाबासाहेबांना राजाभाऊ सारखा नेता हवा होता म्हणून राजाभाऊ पेक्षा जेष्ठ असलेल्या नेत्यांना सोडून बाबासाहेबांनी सरचिटणीसपदी त्यांची निवड केली. या पदासाठी अनेक दावेदार होते. परंतु भविष्याचा वेध घेऊन राजाभाऊंची निवड केली गेली. राजकीय क्षेत्रातील ही फार मोठी जबाबदारी होती. त्यांना हे पद देऊन बाबासाहेबांनी आपल्या राजकीय

मानसपुत्र म्हणून घोषित केले. अगदी तरुण वयातच राजाभाऊंच्या कर्तुत्वाला देशव्यापी आयाम मिळाला. सार्वत्रिक निवडणुकीत बाबासाहेब भंडारा लोकसभा निर्वाचित क्षेत्रामधून उमेदवार म्हणून उभे होते, त्या निवडणूक प्रचाराची धुरा राजाभाऊ कडे होती. राजकीय संघटनेच्या बांधणीसाठी संपूर्ण देशात त्यांचे भ्रमंती सुरु झाले. समाजातील विषमता मूलक तत्त्वांच्या विरुद्ध त्यांनी भक्कम असे व्यासपीठ उभे केले. बाबासाहेबांनी ज्या राजकीय, सामाजिक संघटना उभारल्या त्यांच्या उद्देश सामाजिक अन्यायाविरुद्ध लढाई व दलितांचे उत्थान हा होता. या लढाईत राजाभाऊंनी तन–मन–धनाने स्वतःला वाहून घेतले.

बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी समाज कारणांबरोबरच उदात्त प्रमेये जोपासली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चळवळीचे नागपूर हे मुख्य केंद्र होते. तर बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे नागपूर हे ठिकाण राजकारणाचे मुख्य केंद्र होते. महाराष्ट्राची उपराजधानी म्हणजेच नागपूर होय. विदर्भातील अग्रगण्य शहरात नागपूरचा अव्वल स्थान आहे. नागपूरला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती, अशा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या करकमलाद्वारे पावन झालेल्या भूमीला त्यांनी राजकारणाच्या केंद्रबिंदू मानले. नागपूरच्या राजकारणात त्यांच्या खूप दबदबा होता. नागपुरातील महानगरपालिकेत महापौर व उपमहापौर पद रिपब्लिकन पक्षाकडे असावे अशी त्यांची मनःपूर्वक इच्छा होती. आपल्या इच्छेची पूर्ती करण्यासाठी व रिपब्लिकन पक्षाचे महापौर व उपमहापौर पद मिळवण्यासाठी त्यांनी नगरसेवक निवडून आणण्यात मेहनत घेतली. त्यांच्या मेहनतीला व राजकीय समीकरणांना पाहून पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे मनस्वी स्वागत केले. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या राजकीय नेतृत्वाने महाराष्ट्राच्या उपराजधानीत अखेर श्री. रामरतन जानोरकर या सुदर्शन समाजाच्या नेत्यांला महापौरपदी बसवले. बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या स्वप्नाची पूर्ती झाली व नागपुरात त्यांनी नवा इतिहास घडवून आणला.[10]

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया :**भारतीय संसदीय लोकशाहीत राजकीय पक्षांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्याशिवाय संसदीय लोकशाहीची संकल्पनाच करता येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संसदीय लोकशाहीला राजकीय पक्षाद्वारे बळकटी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 30 सप्टेंबर 1956 रोजी नवी दिल्ली येथे अखिल भारतीय शेड्युल कास्ट फेडरेशन ची बैठक बोलावली. या बैठकीत सरचिटणीस म्हणून तातडीने बॅरि. राजाभाऊ खोब्रागडेंना आपली सर्व कामे सोडून बैठकीला जाणे भाग पडले. सदर बैठक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली. भारतात लोकशाही कायम टिकवायची असेल तर बलवान विरोधी पक्ष असणे अत्यंत आवश्यक आहे, यावर सविस्तर चर्चा झाली. आणि नव्या पक्षाला अखिल भारतीय रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया असे नाव देण्याचे ठरले.[11]

6 डिसेंबर 1956 ला बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले. आणि पुढची जबाबदारी बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या खांद्यावर आली. अशातच देशात सार्वत्रिक निवडणुकाचा कार्यक्रम 9 मार्च 1957 ला घोषित करण्यात आला. पक्षातर्फे राजाभाऊवर निवडणुकीची जबाबदारी देण्यात आली. महाराष्ट्रातून 6 खासदार आणि 17 आमदार निवडून आले. परंतु चंद्रपूर मतदारसंघातून स्वतः बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे पराभूत झाले. त्यानंतर शेड्युल कास्ट फेडरेशन या पक्षाच्या कार्यकारिणीची सभा 21 एप्रिल 1957 ला नागपूर येथे बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इच्छेनुसार रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाची स्थापना करण्याच्या कार्यक्रमावर चर्चा करण्यात आली. त्यानंतर 3 ऑक्टोबर 1957 ला शेड्युल कास्ट फेडरेशन चे शेवटचे अधिवेशन बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. शे.का. फेडरेशन हा पक्ष बरखास्त करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष स्थापन झाल्याचे जाहीर केले.[12] या नव्या पक्षाचे अध्यक्ष मद्रास प्रांतातील वयोवृद्ध दलित नेता व डॉ. बाबासाहेबांचे अत्यंत निकटचे सहयोगी एन. शिवराज यांचे नाव जाहीर करण्यात आले, तर सरचिटणीसपदी बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.[13] या घटनेनंतर तब्बल पाच महिन्यांनी बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे महाराष्ट्रातील विधानसभेत रिपब्लिकन पक्षाच्या सतरा आमदाराच्या पाठिंब्याने राज्यसभेवर निवडून गेले.रिपब्लिकन पक्षाची राजकीय व संसदीय क्षेत्रात यशस्वी कारकीर्द कित्तेक वर्ष सुरळीत सुरू राहिली. परंतु त्यानंतर पक्षाची घटना तयार नाही त्यामुळे प्रेसिडीयमला पदावर राहण्याचा अधिकार नाही. या मुद्द्यावर तत्कालीन नेत्यांमध्ये मतभेद सुरू झाले. अशा प्रकारे रिपब्लिकन पक्षात दोन गट पडले. रिपब्लिकन पक्षाचे दोन्ही गट एकमेकांवर कुरघोडी करण्यात मग्न असतानाच 1962 सार्वत्रिक निवडणुका येऊन ठेपल्या. रिपब्लिकन पक्षाचे दोन्ही गट एकमेकाविरुद्ध उभे राहिले, यामध्ये मतांचे विभाजन होऊन रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार पराभूत झाले. त्याचा परिणाम असा झाला की आंबेडकरी जनतेच्या व कार्यकर्त्याच्या विश्वास रिपब्लिकन नेत्यांवर हळूहळू कमी होऊ लागला.

एन.शिवराज यांचे दुःखद निधन झाल्यानंतर अध्यक्ष म्हणून दादासाहेब गायकवाड यांची निवड करण्यात आली. त्यांनी अनपेक्षितपणे कॉंग्रेस आणि रिपब्लिकन पक्षाच्या ठराव मांडला. त्यांच्या विरोध बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी केला कारण ''कॉंग्रेस हे जळते घर आहे त्या घरात जाईल तो खाक होईल'' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते. हा मुद्दा बॅरि. खोब्रागडे यांनी उचलून धरला या कालावधीत दादासाहेब गायकवाड यांना पक्ष घाताचा झटका बसला याचा फायदा घेत रा.सु.गवई यांनी बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांना रिपब्लिकन पक्षातून काढून टाकले. 1966 मध्ये बॅरि. खोब्रागडे यांनी आपला वेगळा रिपब्लिकन पक्ष स्थापन केला. आता रिपब्लिकन पक्षाचे तीन गट दिसू लागले होते. हा प्रकार सुरू असतानाच हरिदास आवळे बाबू कॉंग्रेस पक्षाच्या सत्ते पासून दूर राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धोरणानुसार चालणाऱ्या रिपब्लिकन खोब्रागडे गटात बिनशर्त आपल्या सहकार्यांचा सोबत सामील झाले. त्यामुळे या गटाच्या राजकीय शक्तीत वाढ झालेली होती. बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी भ्रष्ट कॉंग्रेस पक्षावर हल्लाबोल केला.

**निष्कर्ष** :बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे देशाच्या इतिहासातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक व वैचारिक जडणघडणीचे पृष्ट होते. एका ऐश्वर्यसंपन्न दलित कुटुंबात त्यांचा जन्म झाला तरी सुद्धा ऐश्वर्य सुख स्वतःच्या वाट्याला कधीच येऊ दिले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतावादी लढ्याला खरी धार देण्याचे कार्य केले.संपूर्ण भारताचा विचार करता ज्या भूमीत त्यांच्या जन्म झाला त्या भूमीची कधीच आपली नाती तुटू दिली नाही. विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यातील जातपुरा याठिकाणी जन्म घेऊन सर्व विदर्भाशी इनाम एतबार प्रामाणिकपणा दाखविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोबत चळवळीत आणि आंबेडकरोत्तर चळवळीत एकूण सतत 35 वर्षे समाजसेवेच्या माध्यमातून अद्वितीय राजकीय कारकीर्द गाजवली. दलित शोषितांसाठी अहोरात्र कष्ट उपसले कार्यकर्त्यांना राजकारण व समाजकारणाचे धडे दिले. परंतु कुन्हा प्रती ही सूडाची भावना कधीच बाळगली नाही. विदर्भ वरील विशेष प्रेम असल्यामुळे विदर्भ हे स्वतंत्र राज्य व्हावे ही मनोमन इच्छा होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लहान राज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी विदर्भ राज्याची मागणी उचलून धरली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आचार व विचार अमलात आणून प्रत्यक्ष कृतीत उतरवणारा अखेरच्या क्षणापर्यंत सामाजिक विषमतेचे विरुद्ध युद्ध पुकारणारा कार्यकर्ता प्रेरणास्त्रोत, दीपस्तंभ व स्फूर्तीस्थान राहिलेला हा राजाभाऊ देशातील समतावादी लढ्यातील बाबासाहेबांच्या नंतरचे मोठे सेनानी होते.

**संदर्भ :**

1.सुखदेवे, के. ना., आंबेडकरी चळवळीची दिशा काय? सोनामा प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती 2007 पृ. क्र.4
2. मेश्राम, व्हि. डि., महाराष्ट्राचे शिल्पकार समता संग्रामाचे सेनानी–बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प्रथम आवृत्ती 2003 पृ.क्र 9.
3. कित्ता पृ.क्र.9.
4. मेश्राम,व्ही.डी., महाराष्ट्राचे शिल्पकार समता सेनानी–बॅरि.राजाभाऊ खोब्रागडे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प्रथम आवृत्ती 2003 पृ. क्र. 23.
5. कित्ता क्र. 26.
6. खोब्रागडे, कुसुम, (प्रकाशिका) समता सेनानी फुलचंद खोब्रागडे, चंद्रपुर प्रथम आवृत्ती पृ.क्र.32
7. मेश्राम, व्हि. डि., महाराष्ट्राचे शिल्पकार समता संग्राम सेनानी बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प्रथमावृत्ती 2003 पृ.क्र. 31.
8. घोडेस्वार, रामाजी, बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांची भाषणे खंड 1, संकेत प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती 2009, पृ.क्र. 19.
9. कित्ता पृ.क्र. 33
10. सुखदेवे, के. ना., आंबेडकरी चळवळीची दिशा काय? सोनामा प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती 2007 पृ. क्र.112
11. डोंगरे, कृष्णकांत, आंबेडकरी चळवळीची दिशा व दशा डॉक्टर बहुजन साहित्य प्रसार केंद्र नागपूर, प्रथमावृत्ती 2019 पृ. क्र.118.
12. कित्ता पृ.क्र.120.
13. जंजाळ, प्रकाश, (प्राध्यापक) बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे, समीक्षा प्रकाशन पुणे, पृ. क्र.150.

# विदर्भातील आंबेडकरी चळवळीत रामरतन जानोरकर यांचे योगदान

**विनायक जामगडे**
आंबेडकरी विचारवंत

**सारांशः—** दलित, पिडीत, शोषित अस्पृश्य समाज अचेतन अवस्थेत जगत होता. माणूसकी हरवून बसलेला समाज पशुवत जीवन जगत होता त्यांच्यात जनजागृतीचे काम करणाऱ्यामध्ये अग्रस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर असून मानव मुक्तीच्या चळवळीच्या माध्यमातून निर्जिव असलेल्या समाजात जीव ओतण्याचे कार्य करुन स्वाभिमान चेतविला आत्मतेज निर्माण करुन मानवाला माणूसकीची जाणिव करुन दिली. ह्या मानवमुक्तीच्या चळवळीच्या प्रभाव सर्वदूर पसरु लागला. त्यात अनेक ध्येय वेडे तरुणांनी चळवळ व्यापक व गतीशील करण्याच्या हेतूने स्वत:ला झोकून दिले. त्यापैकी बाबू रामरतन जानोरकर एक होत. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या पक्षामध्ये नागपूर शहराचे सचिव म्हणून रामरतन जानोरकर यांनी महत्वाची भूमिका पार पाडली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरासोबत धर्मांतराच्या सोहळ्यात त्यांचा सक्रिय सहभाग असून बाबासाहेबांच्या हस्ते बुद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत बुद्ध धम्माचे पालन केले.

**शब्दसंकेत :— रिपब्लिकन पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, धम्मदीक्षा,**

**संशोधन पद्धती : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रारंभिक जीवन :—**रामरतन जानोरकर यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३१ ला नागपूरातील ठक्करग्राम या सफाई मजूदर वस्तीत झाला. लहान असतानाच आई वडिलांची छत्र छाया हरविली. त्यांचे लालन पालन पोषण शिक्षण त्यांचे काका मुन्नीलाल जानोकर यांनी केले. अत्यंत विपरीत परिस्थितीत शिक्षण घेऊन त्यांनी एम. ए. ही पदवी मिळविली. लहानपणापासून अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले. अनेकदा स्पृशाच्या सामानाला हात लागला म्हणून मार खावा लागला. अपमान शिवीगाळीला समोर जावे लागले. अशा सामाजिक विषमतेच्या व्यवस्थेत जगताना द्या ह्या व्यवस्थेविरुद्ध त्यांचे मन पेटून उठत असे. समानतेचे स्वप्न त्यांना पडत असे ह्या सर्व पार्श्वभूमीवर आंबेडकरी चळवळीचा विचार त्यांना आकर्षित करु लागला व त्यांनी ह्या मानवमुक्तीच्या, स्वाभिमानाच्या माणूसकीच्या चळवळीत स्वत:ला वाहून घेतले. जीवनाच्या शेवटपर्यंत त्यांचे आंबेडकरी निष्ठा तसूभरी ढळली नाही. तर प्रखरतेनेती प्रगट झाली. त्यांनी शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, भारतीय बौद्ध महासभा, मजूर संघटना, सहकारी चळवळ, शिक्षण संस्था, बुद्ध जन महासभा, रिपब्लिकन पक्ष ह्यात प्रमुख पदावर राहून कार्य केले. दलितावर होणारे अन्याय अत्याचार त्या विरुद्ध संघटनेद्धारे संघर्ष करुन पिडीताना न्याय मिळवून देण्याचे काम केले. अस्पृश्यांना विहिरीवर सवर्ण पाणी भरु देत नव्हते. त्यांचा प्रश्न हाती घेवून पाणी भरण्याची चळवळ राबविली व दलितांना दिलासा दिला.

**रिपब्लिकन पक्षातील कार्य :—**रिपब्लिकन पक्षाच्या जडणघडणीत बाबू रामरतन जानोरकर यांचा सहभाग होता. रिपब्लिकन पक्षाचे नेतृत्व सिद्धांतापासून दूर जात होते. लोकशाही प्रणालीचा दुरुपयोग करु लागले होते. त्यांना दुरुस्त करण्यासाठी दुरुस्त रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यात आली त्यात बाबू हरिदास आवळे सोबत बाबू रामरतन जानोरकर खांद्याला खांदा लावून सोबत राहिले. सोबतच रिपब्लिकन पक्षाच्या एकतेच्या प्रक्रियेत सामील होऊन रिपब्लिकन पक्षात पडलेली फुट त्यामुळे समाजाचे होणारे नुकसान ह्याकरिता रिपब्लिकन पक्षात एकता घडवून आणली त्यात बाबू रामरतन जानोरकर यांचा सिंहाचा वाटा रिपब्लिकन पक्षाच्या फुटीत व एकतेच्या प्रक्रियेत बाबू रामरतन जानोरकर समाजाच्या हिताकरिता सामील होत असत. रिपब्लिकन पक्ष एकसंघ कसा राहील याची चिंता त्यांना सतावित असे. एकतेसाठी अविश्रांत परिश्रम घेत असत.

**धर्मांतर कार्यातील योगदान :—**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला धम्मदिक्षेचा समारंभ घडवून आणला. धम्मदिक्षेचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तयार झालेल्या कमेटित बाबू रामरतन जानोरकर यांचा समावेश होता. त्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांचे हस्त धम्मदीक्षा ग्रहण करुन बुद्ध धम्मात प्रवेश केला. बुद्ध धम्माच्या प्रचार व प्रसार करीता भ्रमण करुन अनेक धम्मदिक्षेचे सोहळे आयोजित करुन अस्पृश्य समाजाला बुद्ध धम्माची दीक्षा दिली.

नागपूरच्या दीक्षा भूमीवर बुद्धाची मुर्ती बसविण्याकरिता कार्यकर्त्यासोबत आपला सहभाग दिला. बाबू रामरतन जानोरकर यांनी सामान्य माणसापासून नगर सेवकापर्यंत सर्वांना बुद्ध धम्माची दीक्षा दिली.

सन १९६४ ला उद्‌भवलेले प्रकरण म्हणजे बुद्ध धम्म घेतलेल्या व्यक्तीला आरक्षित जागेवर निवडणूक लढविता येत नाही ह्या प्रकरणात बाबू रामरतन जानोरकर यांनी डी. पी. मेश्राम पासून आकांत माटे, देवाजी भगत, वासुदेव डोंगरे आदि नगर सेवकांना धम्मदीक्षा दिली होती व कोर्टासमोर साक्ष देतांना सांगितले की मी बाबाच्या आदेशानुसार व दिलेल्या अधिकारान्वये बुद्ध धम्माची दीक्षा दिली. ह्या प्रकरणात डी. पी. मेश्राम अपात्र ठरविण्यात आले. त्यांनी मुंबई हायकोर्टाच्या नागपूर बेंच समोर अपील केले. त्यावेळी डी. पी. मेश्राम यांची बाजू कोर्टासमोर मांडण्यासाठी माजी न्यायमुर्ती भवानी शंकर नियोगी यांना वकील पत्र देण्यात आले.

भवानी शंकर नियोगी १४ ऑक्टोबर १९५६ ला झालेल्या धम्मदीक्षेच्या वेळी बाबासाहेबासोबत दीक्षा घेण्यास हजर होते. त्यांनी बुद्ध धम्माची दीक्षा घेवून २२ प्रतिज्ञेचे पालन करण्याचे जनतेसमोर जाहीर केले. तेच भवानी शंकर नियोगी उच्च न्यायालयासमक्ष आपल्या पक्षकाराची बाजू मांडताना म्हणाले की मी वकीली व्यवसाय सोडून बराच काळ लोटला आहे. माझे शरीरसुद्धा थकले आहे. मी अंगावरचा काळा कोट काढून खुंटीला टांगला होता परंतु हिंदू धर्मावर होणारा आघात व बुद्ध धम्माचा प्रसार हे रोकण्याकरिता मी आज कोर्टासमोर उभा आहे व त्यांनी आपल्या युक्तीवादाने १४ ऑक्टोबर १९५६ च्या दिवशी झालेल्या धम्मदीक्षेचा सोहळा नसून ही राजकीय सभा होती असे कोर्टाला पटवून दिले व तसा न्यायाधिशाकरवी निर्णय दिला. बुद्ध धम्म चळवळीवर संकट कोसळले होते कारण ह्या निर्णयामुळे कोणीच बुद्ध वैध ठरु शकत नव्हता. म्हणून कर्मवीर बाबू हरिदास आवळे यांच्या नेतृत्वात सर्वोच्च न्यायालयात अपिल करण्याचे ठरले. त्यासाठी जन जागृतीच्या सभा घेऊन लोकांना सत्य परिस्थितीची जाणीव करुन दिली. ह्या कामी बाबू रामरतन जानोरकर यांनी महत्वाची भूमिका वठविली. कायदेशीर बाजू समजविण्यासाठी दिल्लीला जे लोक गेले होते त्यात बाबू रामरतन जानोरकर यांचा समावेश होता. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांनी दोन्ही बाजूचे युक्तीवाद ऐकून घेतले. आपला निर्णय दिला की १४ ऑक्टोबर १९५६ ला बाबा साहेबांनी दिलेली धम्म दीक्षाच होती. ती राजकीय सभा नव्हती व बुद्ध धम्माच्या चळवळीवर आलेले संकट दूर झाले म्हणून आज बुद्ध म्हणून वावरु शकतो. म्हणून बाबू रामरतन जानोरकर विनोदाने म्हणत की मी सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरविलेला धर्मगुरु आहे.

**कामगार कल्याण :–**बिडी मजुरांच्या प्रश्नावर यशस्वी लढा देऊन त्यांना न्याय मिळवून दिला. सफाई कामगारांना महापौर असतांना घरांचा लोंबकळत असलेला प्रश्न सोडविला. सफाई कामगारांना बढती मिळवून दिली. मेहतर को–ऑपरेटिव्ह सोसायटी निर्माण करण्यात महत्वपूर्ण भूमिका रामरतन जानोरकर बाबूची होती. त्यांना मिळालेली सत्ता ही गरीबांच्या उत्थानाकरिता राबविली. एकदा शहरांचे महापौर झाल्यावर दुसऱ्यांदा नगर सेवकाची निवडणुक लढवायची नाही असे जाहीर करुन दुसऱ्या कार्यकत्यांची सोय करुन दिली. ते आजन्म काँग्रेस विरोधी होते. रिपब्लिकन पक्षाच्या एकतेच्या प्रक्रियेत असताना रामदास आठवले सोबत ते होते. त्यांना उत्तर नागपूरच्या विधानसभेच्या जागेकरिता निवडणुकीत रिपब्लिकन पक्ष व काँग्रेस पक्ष यांच्या युतीचे उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले. त्यावेळी त्यांच्यावर पक्ष नेतृत्वापासून तर कार्यकर्त्याचा दबाव होता की त्यांनी पंजा ह्या चिन्हावर निवडणुक लढवावी. जर लढविली असती तर कदाचित निवडूण सुद्धा आले असते परंतु त्यांच्या विवक बुद्धीला ही गोष्ट पटत नव्हती. त्यांनी डोंगा चिन्ह घेऊन व निवडणूक लढविली व निवडणूक हारले आपल्या तत्वाशी तडजोड केली नाही. ह्यात भर सिद्धांतिक भूमिकेचा पाठ पुरावा करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लहान राज्याचा पुरस्कार केला होता. एका भाषेचे अनेक राज्य असू शकते ही मांडणी केल्यामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीला विरोध करुन वेगळा विदर्भ राज्य अस्तित्वात यावे ह्यासाठी आंदोलन झाले त्यात वेगळ्या विदर्भ राज्याच्या निर्मितीकरीता आंदोलनाचे नेतृत्त केले. त्यासाठी जेलमध्ये सुद्धा गेले. बाबासाहेबांचा विचार सर्व स्तरातील लोकापर्यंत पोहचविण्याकरीता विदर्भ चळवळीत सामील होणे गरजेचे आहे असे बाबू रामरतन जानोरकर आंबेडकरवाद्यांना सांगत असत. सत्तेचे विकेंद्रीकरण झाले तर सत्ता दलितांना मिळू शकते म्हणून विदर्भ राज्याकरिता रिपब्लिकन पक्षाच्या सर्व गटांनी पाठिंबा द्यावा असे आवाहन करीत असत. बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्यासोबत पक्षात काम करीत असतांना लहान राज्य निर्मितीच्या ठराव रिपब्लिकन पक्षाच्या अधिवेशनात

मंजूर करुन घेतला. विदर्भ राज्य निर्मिती करीता झालेल्या प्रत्येक आंदोलनात सहभाग घेवून वेगळ्या विदर्भाचा पुरस्कार केला परंतु खेदाने म्हणावे लागते की विदर्भ चळवळीचा इतिहास लिहतांना कर्मवीर बाबू हरिदास आवळे बाबू रामरतन जानोरकर यांच्या नावाचा उल्लेख केला जात नाही. बाबू रामरतन जानोरकर प्रखर विदर्भवादी होते ते ज्या ज्या रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यासोबत होते. त्यांना पक्षाची वेगळा विदर्भ राज्यासंबधी ठराव पास करुन विदर्भ आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला. छत्तीसगडमधील सतनामी समाजाच्या लोकांना आंबेडकरी चळवळीत संमेल्लीत होण्याकरिता बाबू रामरतन जानोरकर यांनी प्रवृत्त केले. अनेक सतनामी लोकांना बुद्ध धम्माची दीक्षा देऊन त्यांना बुद्ध धम्माची जीवन पद्धती अंगिकारण्यास बाध्य केले. वेगळ्या छत्तीसगढ राज्याच्या निर्मिती आंदोलनात सुद्धा महत्वाची भूमिका बाबू रामरतन जानोरकर यांनी वठविली.

रिपब्लिकन पक्षात एकता घडवून आणण्यामध्ये बाबू रामरतन जानोरकर यांचा सिंहाचा वाटा होता. रिपब्लिकन पक्षाच्या फुटीत व एकतेच्या प्रक्रियेत बाबू रामरतन जानोरकर समाजाच्या हिताकरिता सामील त्यांना आमदार पदाची व मंत्रीपदाची ऑफर दिली गेली. त्यासाठी त्यांना कॉंग्रेस पक्षात सामील होण्याकरिता सांगीतले परंतु मी शेवटपर्यंत रिपब्लिकन पक्षासोबत राहील बाबासाहेबांना त्यांच्या विचारांना धोका देऊ शकत नाही. म्हणून आलेली संधी सोडून दिली. गरीबीत जगले शेवटपर्यंत झोपडीतच राहीले त्यांना कोणत्याही प्रकारच्या महालांनी भूलविले नाही.

स्वाभिमानाने आंबेडकरवादी म्हणूनच त्यांनी या जगाचा निरोप घेतला अशा आंबेडकरनिष्ठ बाबू रामरतन जानोरकरांना आदरांजली अर्पण करु या व अपूर्ण कार्य पुढे नेण्यास प्रवृत्त होऊ. या देशातील सर्व अस्पृश्य समाजातील जातींना आपल्यावर लादलेल्या धार्मिक गुलामगिरीची जाणीव होवून मानव मुक्तीच्या चळवळीत सामील होऊन समतेचे आंदोलन तीव्र करतील त्या दिवशी बाबू रामरतन जानोरकर यांच्या स्वप्नाची पूर्ती होईल.

**संदर्भ सूची**

१) सपा. जामगडे विनायक, बाबू रामरतन जानोरकर ७८ वी जयंती स्मरणिका, ८ ऑगस्ट, २००९.

२) भांगे, हंसराज (संपा), 'बाबांचे शिलेदार', आंबेडकरी चळवळीचे सहकारी सत्कार मंच, नागपूर प्र. आ. २०१५.

३) कोसारे, एच. एल., 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास (स्वातंत्र्यपुर्व काळ)', नेहा प्रकाशन, गुरूनानकपुरा, नागपुर.

४) डोंगरे, कृष्णकांत, 'आंबेडकरी चळवळीची दिशा आणि दशा', बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपुर, प्र. आ. २०१८.

५) पाटील चंद्रशेखर, 'आंबेडकरी चळवळीचे सेनानी बाबू आवळे', बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपुर, प्र. आ. २०१६.

६) जामगडे, विनायक, 'आंबेडकरी चळवळीत ॲड. हरिदास बाबु आवळे यांचे योगदान', प्रकाशन, डॉ. बाबासाहेब अध्यासन, नागपुर विद्यापीठ, नागपुर, प्र. आ. २००९

# दादासाहेब कुंभारे यांचे आंबेडकरी चळवळीत योगदान

प्रा.डॉ. सुशांत सुमनचरण चिमणकर
राज्यशास्त्र विभाग
डॉ.म.वा.पीडब्ल्यूएस महाविद्यालय, नागपूर

**सारांश** :डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत आणि आंबेडकरोत्तर चळवळीत विदर्भातील त्याकाळातील युवा पिढीनी भरीव कामगिरी केली. त्याचे पडसाद पुढे भारताच्या जडणघडणीत दिसून आले आहे. देशात दलित, शोषित, पिडीत समाजावर अन्याय अत्याचार सुरु असतांना त्यावर लढा उभारण्याचे काम विद्यार्थी दशेतच नागपूर लगत कामठी येथील एका तरूण वयाच्या युवकाने केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बाळकडू मिळालेल्या दादासाहेब कुंभारे यांनी आयुष्यभर बाबासाहेबांच्या विचारांची गुलामगिरी करून त्यांचे स्वप्न साकार करण्याचा विडा जणू पूर्णत्वास नेला. जनसामान्यातून आलेले व्यक्तिमत्व दादासाहेब कुंभारे हे राष्ट्रीय व्यक्तिमत्व झाले. राज्य सरकार व केंद्र सरकार यांनी त्यांच्या कार्याची दखल घेतली.

बिडी मजुराचे नेते म्हणून प्रसिद्धीस आलेले दादासाहेब कुंभारे डॉ. बाबासाहेब यांच्या भंडारा येथील निवडणुकीच्या प्रचारादरम्यान प्रकाश झोतात आले. आणि त्यांच्या राजकीय कार्यकीर्दीला सुरवात झाली. पुढे त्यांनी मागे वळून कधीही बघितल नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने नागपूर येथील पवित्र दीक्षाभूमीवर महाविद्यालय उभे करण्यात त्यांचा मोठा वाटा राहिला आहे. संसदेतील वरिष्ठ सभागृहाचे प्रतिनिधित्व करीत असतांना खासदार म्हणूनही त्यांचे योगदान महत्वाचे होते. मजूर आणि दलितांच्या समस्यावर राज्यसभेत त्यांचे प्रभावी आणि तर्कपुर्ण भाषण होत असे. ते श्रम मंत्रालयाच्या 'संसदीय सल्लागार समितीचे' प्रमुख सदस्य होते.

चवथी आशिया खंडाची बौद्ध परिषद जपानच्या टोकियो शहरात झाली. त्या परिषदेला ते भारत सरकारचे प्रतिनिधी म्हणून गेले होते. संसदेमधील त्यांचे कार्य स्पृहनीय असल्यामुळे सप्टेंबर १९७५ मध्ये लंडन येथे झालेल्या ६२ व्या आंतर संसदीय परिषदेला भारताचे प्रतिनिधी म्हणून त्यांची निवड झाली. रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य व्हावे म्हणून त्यांनी बरेच प्रयत्न केले. अशा विदर्भ पुत्राचे महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या जडणघडणीत मौलाचा वाटा आहे.

**शब्दकुंजी** – डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दादासाहेब कुंभारे, बिडी कामगार, दीक्षाभूमी, भूमिहीन आंदोलन, संसदीय कार्य.

**संशोधन पद्धती : ऐ**तिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा प्रभाव तत्कालीन असंख्य तरुणांवर पडला व त्यांनी आपले उभे आयुष्य जनसामान्याच्या उत्थानाकरिता वेचले यामधील एक महनीय व्यक्तिमत्त्व म्हणजे नारायण हरिचरण कुंभारे उर्फ अँड. दादासाहेब कुंभारे होय. त्यांचा जन्म २३ मार्च १९३० रोजी नागपूर जवळ कामठी येथे झाला. घरात अठराविश्वे दारिद्रय असतांना सुद्धा त्यांच्या वडिलांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने मुलाला शिक्षण देण्याचे ठरविले. मट्रिक पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर १९४२ मध्ये उच्च शिक्षण नागपूरला शिकत असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा प्रभाव दलित तरुणांवर मोठया प्रमाणात होऊ लागला होता. आणि त्यामुळे हे तरुणही समाजकार्य करण्यास प्रवृत्त झाले होते. दादासाहेब ह्या कार्यात अग्रणी होते. ते नागपुरातील चोखामेळा वसतिगृहात राहून आपले महाविद्यालीयीन शिक्षण घेत होते. त्यांच्या बंडखोर अशा व्यक्तीमत्वाची जाणीव चोखामेळा वसतीगृहातील एका घटनेने होते. चोखामेळा वसतिगृहात महात्मा गांधीच्या सत्काराचा आणि मानपत्र भेटीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गांधीजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील वैचारिक मतभेद असल्याने व १९३२ मध्ये पुणे करार झाल्याने दलित समाजाच्या विरोधाला गांधीजींना सामोरे जावे लागत होते. चोखामेळा वसतिगृहात कार्यक्रमासाठी गांधीजीचे आगमन होताच दादासाहेबांच्या नेतृत्वात अस्पृश्य विद्यार्थ्यानी या कार्यक्रमाचा बहिष्कार केला. सोबतच निषेधही केला आणि हा कार्यक्रम उधळून लावला परंतु यामुळे त्यांना वसतिगृहातून काढण्यात आले.[१]

दादासाहेब कुंभारेच्या व्यक्तिमत्वाची जाणीव अशी वेगवेगळ्या घटनामधून जाणवते तशी ती त्यांनी आपल्या तारुण्याच्या उंबरठयावर असतांना केलेल्या साहित्य निर्मितीमधूनही जाणवते. ते स्वतः अतिशय सजग असे कवी आणि लेखक होते. १९४० च्या दरम्यान नागपूरला इंदोरा वस्तीमध्ये स्थापना झालेल्या 'आंबेडकरी साहित्य मंडळाच्या' कार्यकर्त्यांनी जी साहित्यिक चळवळ, त्या वेळी गतिशील केलेली होती. त्या चळवळीच्या प्रभावाने दादासाहेब कुंभारे प्रभावित झालेले होते. त्यांनी १९४२ साली झालेल्या अखिल भारतीय दलित परिषदेच्या निमित्याने 'ह्दयीचे बोल' या नावाने एक कवितांचे संकलन संपादित करून प्रकाशित केले. त्यात स्वतः त्यांनी 'नवा संदेश' आणि 'जगात एकटेच' अशा दोन कविता लिहिल्या होत्या[२]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दलात दादासाहेबांनी प्रवेश केला होता. परंतु देशातील राजकीय यंत्रणेमुळे समता सैनिक दलावर बंदी लादण्यात येऊन दादासाहेब व अन्य कार्यकत्यांना अटक करण्यात आली. त्यामुळेच विषमतावादी व्यवस्थेशी कायद्याच्या चौकटीत राहूनच संघर्ष करण्याचा संकल्प दादासाहेब कुंभारेचा होता. त्यांनी एल.एल.बी ला प्रवेश घेतला. नागपूर येथील कारागृहात असतांनाच त्यांची एल.एल.बी ची परीक्षा सुरु झाली होती, म्हणूनच नागपूर मध्यवर्ती कारागृह प्रशासनाने विद्यार्थी फेडरेशनचे दादासाहेब कुंभारे व समतासैनिक दलाचे अध्यक्ष श्री. हरिदास आवळे यांना परीक्षा देण्यासाठी १३ दिवसाच्या परोलवर सोडण्यात

आले होते. परीक्षा १३ मार्च १६४८ ला संपून दि. १४ मार्च १६४८ रोजी सकाळी १० वाजता पुन्हा ते तुरुंगात गेले. त्यांना निरोप देण्याकरिता बरेच समता सैनिक दलाचे कार्यकर्ते हजर होते[३]

महाविद्यालयीन जीवनात सामाजिक चळवळीत कार्य करीत असतांनाच त्यांचे लक्ष बिडी कामगारांकडे गेले. विदर्भ आणि विदर्भाचा पूर्वांचल प्रदेश बिडी मजुरांच्या श्रमासाठी प्रसिद्ध होता. गुजरातमधून आलेले स्थायी झालेले भांडवलदार या गरीब श्रमिकांच्या कामगारांचा कुणी वाली राहिला नव्हता. कामठी शहरातील अनेक वयोवृद्ध आणि तरूण कार्यकर्ते दादासाहेब कुंभारेना वकील व्हावे. आणि बाबू हरिदास यांचा वारसा पुढे चालवावा असा आग्रह करीत होते. बिडी कामगारांची दयनीय अवस्था कुंभारे साहेबांना पूर्णपणे माहित होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वारसा घेऊन त्यांनी मजूर, मजदूर, कामगार वर्गासाठी व त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य केले. त्यांच्या या कार्यामुळेच बिडी मजुरांचा पाठिंबा मोठया प्रमाणावर मिळू लागला व मजुरांचे बळ त्याच्या पाठीमागे उभे राहिले. बिडी या उद्योगापुरतेच दादासाहेब कुंभारे यांचे कार्य सीमित नव्हते, तर तुमसर, मनसर, कांद्री, कन्हान, गुमगांव माईन, डोंगरी बुज्रूक आदि ठिकाणी जे खनिज संपत्तीचे साठे होते तिथेही श्रम करणारा वर्ग होता. त्यांच्याही मागण्याकडे आणि कल्याणकडे लक्ष दिले. मिल मजूर व इतर कामगारासारखे कायदे व सवलत बिडी मजुरानांही मिळवून दिल्याशिवाय राहणार नाही असे विचार ते आपल्या भाषणातून मांडत असत.

१६४५ मध्ये भंडारा मतदारसंघाची पोटनिवडणूक जाहीर झाली. या पोटनिवडणुकीत कांग्रेसकडून पुनमचंद रांका, तर आरक्षीत जागेकरिता भाऊराव बोरकर उमेदवार होते. त्यांच्या विरोधात प्रजा समाजवादी पक्षाचे अशोक मेहता सर्वसाधारण जागेकरिता, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेडयुल कास्ट फेडरेशन या पक्षाकडून राखीव जागेवर निवडणूकीत उमेदवार होते. भंडारा जिल्ह्यातील बिडी कामगार मोठया प्रमाणात असल्याने दादासाहेब कुंभारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रचार जोरात केला. या निवडणूकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पराजित झाले. परंतु दादासाहेब कुंभारेचा निवडणूक प्रचाराच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संपर्क आल्याने त्यांनी दादासाहेबांची प्रशंसा करून आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत शोषित, पिडीत, गरीब व दलितांची निस्वार्थ सेवा करण्याकरिता आशीर्वाद दिला[४]

दादासाहेब कुंभारेनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आशीर्वाद घेवून प्रत्यक्ष कृती कार्यक्रमांना प्रारंभ केला. बिडी मजुरांना घेऊन जेल भरो आंदोलन सुरु केले. प्रतिनिधी मंडळामार्फत विधानभवनावर मोर्चे घेऊन गेले. त्यामुळे शासनाला बिडी मजुरांच्या अनेक प्रश्नांची आणि अडचणीची जाणीव करून दिली. तत्पूर्वी १६४६ मध्ये त्यांनी शेडयुल कास्ट फेडरेशनचे मुखपत्र म्हणून 'सिद्धार्थ' या नियतकालिकाचे संपादनही केले होते. या नियतकालीकातील अग्रलेखाचे विषय आणि त्यांची भाषा अतिशय आशयदहन असून त्यातून दादासाहेब कुंभारेचे व्यक्तिमत्वाचे, सामाजिक बांधिलकीच्या निष्ठेचे प्रत्यंतर येते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाचे महापरिनिर्वान ६ डिसेंबर १६५६ ला झाल्यानंतर नागपूर मध्ये त्यांच्या स्मृतीपित्यर्थ स्मारक समिती उभी राहिली. या समितीच्या निर्मितीमध्ये दादासाहेब कुंभारेचे मौलाचे सहकार्य लाभले होते. पुढे त्यांची नियुक्ती १६७८ मध्ये अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे सचिव म्हणून झाली. ते राजकारणात रमले, परंतु त्यांचे राजकारण समस्त दलितांचे प्रेरणास्त्रोत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रमाणे समाजधारणेसाठी होते. सामाजोद्वारासाठी होते. दादासाहेब राजकारणाच्या जुगारात समाजाचा डावलण्याचा करंटया राजकारण्यासमोर एक आव्हान म्हणून नेहमीच उभे ठाकले. हातावर पोट घेऊन जगणाऱ्या गोरगरीब जनतेच्या आशा–आकांक्षाना पायदळी तुडवून आपलाच गळा भरण्याचे गळाभरू राजकारण दादासाहेबांनी केले नाही. तर गरीब, पिडीत जनतेच्या आशा आकांक्षांना पल्लवित करून जगण्याची नवी जिद्द, नवी उमेद त्यांनी त्यांच्यात निर्माण केली. त्यांच्या राजकारणाला आंबेडकरी नित्तीमतेची किनार होती. समाजकल्याणाचे ध्येय त्यात अंतनिहित होते.

दादासाहेब कुंभारेनी १६६१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजोद्वाराच्या चळवळीतील अमर सेनांनी बाबू हरदास एल. एन. यांच्या स्मृती पित्यर्थ 'हरदास एज्युकेशनल अंड कल्चरल सोसायटी' ची निर्मिती कामठी केली. दादासाहेब कुंभारेच्या कार्याला पाहून कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी त्यांची नियुक्ती परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या कार्याध्यक्ष पदावर केली (१६६३) यावेळी स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांना दिला. परंतु याकरिता नेमकी पैशाची अडचण होती. त्यामुळे दादासाहेब कुंभारे यांनी भंडारा जिल्ह्यातील पैसे गोळा करण्याकरिता भंतेजीच्या कार्यक्रमांचे आयोजनकरून एक आठवडाभर फिरून त्यांनी पैसे गोळा केले. एवढेच नव्हे तर दीक्षाभूमीवरून निघणारे 'दीक्षाभूमी पाक्षिक' या पाक्षिकावर जेव्हा आर्थिक संकट कोसळले. तेव्हा दादासाहेब कुंभारेनी पाच हजार रुपयाची मदत करून ते नियमित चालू राहावे यासाठी पर्यंत केले.

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीची आर्थिक स्थिती नाजूक असतांनाच्या काळात समितीने दीक्षाभूमीवर डॉ. आंबेडकर महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय घेतला. परंतु विद्यापीठ नियमानुसार ३० ते ४० हजार रुपये जमा केल्याशिवाय महाविद्यालय सुरु करणे शक्य नव्हते. या गोष्टीची कल्पना त्यांना असल्याने या संबधात श्री. मनोहरभाई पटेल यांच्याशी चर्चाशी चर्चा करून ३० हजार रुपये त्यांच्याकडून घेतले. हे दादासाहेब कुंभारेचे त्यांच्याशी असलेल्या संबधाचा परिचय देते. पुढे महाविद्यालयाला अनुदान न आल्याने महाविद्यालय बंद पडण्याच्या स्थितीत होते. तेव्हा त्यांनी ही बाब रुचली नाही. दादासाहेब कुंभारे हे समितीच्या कार्याध्यक्षपदी होते. तेव्हा

त्यांनी कामठी बिडी उत्पादक मजदूर संघाकडून कर्ज घेऊन सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्याचे वेतन वाटप केले. अशाप्रकारे महाविद्यालयावर आलेले संकट त्यांनी मोठया परिश्रमाने दूर केले[५]

रिपब्लिकन पक्षाच्या १९६४ च्या बेघरांना भूमी आंदोलनातही दादासाहेब कुंभारेनी प्रमुख भूमिका वठविली होती. त्यांच्या बिडी मजुरांच्या दीर्घकालीन आंदोलनाचा परिणाम म्हणजे १९६४ साली बिडी मजुरांना आय. डी. कायदा औदौगिक विवाद कायद्याखाली मजुरांचा दर्जा प्राप्त झाला. कुंभारे साहेब आता बिडी मजुरांमध्ये प्रचंड लोकप्रिय हृदय सम्राट झाले होते. शासनही त्यांच्या कार्याची आणि प्रस्तावांची दखल घेत होते. कारण मजूर कायद्याच्या अभ्यासा तज्ञ कायदेपंडित म्हणून दादासाहेब कुंभारेनी नावलौकिक केले होते. म्हणूनच पुढे महाराष्ट्र शासनाने त्यांना 'त्रीपक्ष समिती' आणि 'स्थायी समिती' वर आवर्जून नियुक्ती केली होती[६] हा त्यांच्या कार्याचा शासनाने केलेला सन्मान होता.

१९७२ मध्ये राज्यसभेवर त्यांची निवड होऊन केंद्र सरकारने त्यांच्या कार्याची व कर्तुत्वाची पावती बहाल केली. १९७२ मध्येच केंद्र शासनाने सरकारी सेवेत पदबढती (पदोन्नती) मध्येही आरक्षणाची तरदूत केली. ही तरतूद सर्व विभागातील पूर्णपणे लागू करण्यामध्ये त्यांचे योगदान महत्वाचे आहे. पुढे ते केंद्रशासनाच्या 'आरक्षण क्रीयान्वय उपसमितीचे' अध्यक्ष झाले. तेव्हा 'एयर इंडिया' चे तत्कालीन चेयरमन श्री. जे. आर. डी. टाटा यांनी सरकारी संस्थामध्ये आरक्षणाला विरोध केला. तेव्हा दादासाहेब कुंभारेनी त्यांना संसदीय समितीपुढे बोलावले आणि आपले बुद्धिवादी तर्क देऊन त्यांना 'एयर इंडिया' आणि 'इंडियन एयरलाईन्स' मध्ये आरक्षण लागू करण्यास बाध्य केले.[७]

खासदार म्हणूनही त्यांचे योगदान महत्वाचे होते. ते संसदेच्या कार्यात मोठया आवर्जून भाग घेत.मजूर आणि दलितांच्या समस्यावर राज्यसभेत त्यांचे प्रभावी आणि तर्कपुर्ण भाषण होत असे. सर्व सदस्य लक्ष देऊन त्यांचे विचार ऐकत असत. दादासाहेब कुंभारे श्रम मंत्रालयाच्या 'संसदीय सल्लागार समितीचे' प्रमुख सदस्य होते. त्यामुळे त्यांनी असंघटीत आणि भूमिहीन मजुरांच्या विशेषतः बिडी मजुरासाठी कायदे बनविण्यामध्ये महत्वाची भूमिका वटविली. त्यांनी ग्रामीण भागात अनु.जाती–जमाती च्या लोकांवर होणाऱ्या अन्याय अत्याचारला थांबविण्यासाठी संसदेत उपयुक्त सूचना करून 'प्रोटेक्शन ऑफ सिव्हील राईट अक्त' ला प्रभावी बनविण्यात महत्वाचे कार्य केले. आज संसदेत असलेल्या अनुसूचित जाती जमाती संसदीय फोरमच्या स्थापनेचे श्रेय दादासाहेब कुंभारेना दिले जाते. दादासाहेब कुंभारे यांच्या प्रेरणेनेच दिल्लीत 'जन सामाजिक न्याय समिती' ची स्थापना झाली. त्यामुळेच या समिती सोबत न्यायमूर्ती श्री. वि. आर. कृष्णाअय्यर, तत्कालीन केंद्रीय मंत्री श्रीमती सत्थावाणी मुत्थ्यू, न्यायमूर्ती श्री. वरदाजन यासारख्या व्यक्तीचे ऋणानुबंध जुळले गेले. केंद्र सरकारच्या 'राष्ट्रीय एकात्मता कौन्सिलच्या' संचालन समितीचे ते सदस्य होते. चवथी आशिया खंडाची बौद्ध परिषद जपानच्या टोकियो शहरात झाली. त्या परिषदेला ते भारत सरकारचे प्रतिनिधी म्हणून गेले होते. संसदेमधील त्यांचे कार्य स्पृहनीय असल्यामुळे सप्टेंबर १९७५ मध्ये लंडन येथे झालेल्या ६२ व्या आंतर संसदीय परिषदेला भारताचे प्रतिनिधी म्हणून त्यांची निवड झाली.[८] अशा प्रकारच्या सन्मान महाराष्ट्रातील विदर्भप्रांतातील एकमेवाद्वितीय व्यक्तीला प्राप्त होणे कमालीचेच म्हणावे लागेल.

रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य व्हावे यासाठी ते नेहमीच झटले. हा पक्ष एकसंघ व्हावा असे त्यांना नेहमी वाटत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीचे लोण सातत्याने सर्वदूर पसरत राहून 'मी सारा भारत बौद्धमय करीन' ही बाबासाहेबांनी केलेली भीम प्रतिज्ञा पूर्ण व्हावी अशी त्यांची तळमळ होती. राज्यसभेची सदस्यता संपल्यानंतर त्यांनी मजूर चळवळीत आणि आंबेडकरी चळवळीचे पुनरुत्थान केले. समाजाच्या सर्व आघाडयावर समाजाच्या विकासासाठी त्यांनी केलेले कार्य समाज कधीही विसरणार नाही. बिडी मजुरांच्या विकासासाठी लढा देत असतांना दि. १४ अक्टोबर १९८२ ला गोंदिया शहरात सकाळी ६ वाजता जात असतांना वाटेतच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका येवून त्यांचे दुखद निधन झाले. दादासाहेब कुंभारे यांचे कामगार आणि आंबेडकरी चळवळीतील भरीव कार्य भारतीयांच्या व विशेषतः विदर्भ वासीयांच्या चिरकालीन स्मरणात राहील.

**संदर्भ** :

१. दादासाहेब कुंभारे एक आंबेडकरी चळवळीचे आधारस्तंभ – लेख देशोन्नती वृत्तपत्र दि. २३ मार्च २०००.
२. दादासाहेब कुंभारे एक आंबेडकरी चळवळीचे आधारस्तंभ – लेख देशोन्नती वृत्तपत्र दि. २३ मार्च २०००.
३. पान्हेकर सुरेश हरदास, "नागपूर जिल्ह्यातील महार चळवळीचा इतिहास", अप्रकाशित लघुशोध प्रबंध, एम.फील. (इतिहास), नागपूर विद्यापीठ नागपूर १९८२ दृ १९८३, पृक्र. ११६.
४. दादासाहेब कुंभारे एक आंबेडकरी चळवळीचे आधारस्तंभ – लेख देशोन्नती वृत्तपत्र दि. २३ मार्च २०००.
५. दादासाहेब कुंभारे एक आंबेडकरी चळवळीचे आधारस्तंभ – लेख देशोन्नती वृत्तपत्र दि. २३ मार्च २०००.
६. मोहन नगराळे दृ विदर्भातील दलित चळवळ, प्रकाशक – डॉ. प्रदीप हाडके, नागपूर, प्रथम आवृत्ती –२०१५, पृक्र.१११.
७. संसदेतील आंबेडकरी नेत्याचे कार्यकर्तृत्व – महानायक वृत्तपत्र दि. १४ एप्रिल २००५
८. संसदेतील आंबेडकरी नेत्याचे कार्यकर्तृत्व – महानायक वृत्तपत्र दि. १४ एप्रिल २००५

# आंबेडकरी चळवळीत दादासाहेब गवई यांचे योगदान

प्रा. डॉ. मोहन दे. वानखडे
पाली प्राकृत विभाग प्रमुख
डॉ.आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर

**सारांशः** 'माणूस शब्दाने दुखावल्या जातो त्याची वेदना शस्त्रापेक्षा भयंकर असते' आणि या प्रवृत्तीतून वैरभावना निरंतर वाढत राहते, म्हणूनच तथागत बुद्धांनी उपदेश दिला की, 'वैराने वैर शांत होत नाही तर अवैरानेच वैर शांत होतो.'[1] दुःखापासूनही मुक्त होता येते, आणि सदासर्वकाळ दुःखाचेच रडगाणे गात राहण्याची वेळ मनुष्यावर येत नाही. कारण सदासर्वकाळ दुःखाचे रडगाणे गात बसल्यास मार्ग मिळत नाही. यासाठी स्वतःच्या कार्याबद्दल बिनधास्तपणे सम्यक विचाराने कार्यरत राहिल्यास 'प्रज्ञा, शील, करूणा, मैत्री' यागुणांनी युक्त व्यक्ती जीवनात कधीच पराभूत होत नाही. पण आपल्या कार्याबद्दल अढळ निष्ठा हवी. आज राग, लोभ, द्वेष, मोह, माया, मत्सर इत्यादींनी समाज लिप्त आहे परंतु कोणत्याही व्यक्तीला, समाजाला, देशाला कुशलपूर्वक जीवंत राहायचे असेल तर जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा आनंददायक असला पाहिजे. रोज शेकडो विमानांतून हजारो बॉम्बचा वर्षाव डोळ्यासमोर होत असतांना चर्चिले डोक्याने शांत राहुन योग्य तो निर्णय घेत होता, याचे कारण त्याची विनोदी जीवनदृष्टी. याच जीवनदृष्टीने दादासाहेब गवई यांनी अगदी हसत–हसत अनेक प्रसंगावर मात केली. अनेक गंभीर आणि किचकट प्रश्न आपल्या मोहक आणि मनमिळावू स्वभावाने विरोधकांचे सुद्धा मन जिंकून सोडविण्याची कसब त्यांच्या व्यक्तिमत्वात होती. जनतेचे प्रश्न ते थंडी, ऊन, वारा, पाऊस याची पर्वा न करता धैयाने, हिंमतीने सोडवायचे,[2] हे करीत असतांना ते कधीच जात, धर्म, पंथ इत्यादींचा विचार करीत नसत. मग ते कार्य व्यक्तीचे असो, समाजाचे असो, त्यामध्ये ते कुठलाच भेदभाव करीत नसत.
त्यांनी आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात वयाच्या 17 व्या, 18 व्या वर्षापासूनच केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रचार–प्रसार खेडोपाडी फिरून ते करायचे, लोकांनी मेलेली गुरे–ढोरे ओढु नये, सामाजिक प्रश्नांना संघटीत होऊनच सोडविणे शक्य आहे याचे महत्त्व ते समाज प्रबोधनातून करीत असत. समाजामधून त्यांच्या सामाजिक कार्याला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळायचा. मग तो प्रश्न भूमीहिनांचा सत्याग्रह असो, रोजगार हमी योजनेचा असो, मंडल आयोगाचा असो, मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा असो, बौद्धांच्या सवलतींचा प्रश्न असो, राखीव जागांचा असो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग ॲन्ड स्पीचेसच्या प्रकाशनाचा असो, दलितांवर होणा–या अत्याचारांचा असो, महार वतनाच्या जमीनीचा असो, मागासवर्गीय समाजाच्या बॅकलॉगचा असो, मालेगाव, भिवंडी, ठाणे, कल्याण मुंबईत झालेल्या दंगलीचा असो, जातीवादाने त्रस्त झालेल्यांच्या असो, शेतमालाच्या भावविषयी असो, शेतमजुरांच्या प्रश्नांविषयी असो, आदिवासींचे प्रश्न असो, गिरणी कामगारांचे प्रश्न असो, रिडल्स प्रकरण असो इत्यादी अनेक सामाजिक कार्य त्यांनी जनतेच्या पाठिंब्याने यशस्वी करून दाखविले.

**शब्द संकेतः** माणूस, तथागत, दुःख, वैर, दृष्टिकोण, समाज, जातीवाद, भूमीहिन, सत्याग्रह

**संशोधन पद्धती** : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना** : दादासाहेब गवईंने विद्यार्थीदशेपासूनच अंगी प्रौढता अंगिकारली व स्वतःला विधायक कार्यात झोकून दिले. त्यावेळी कर्मयोगी संत गाडगेबाबा यांनी समाजातील अनिष्ट चालीरितींविरुद्ध तथा अंधश्रद्धे विरुद्ध मोहिम राबवून जनजागृती घडवून आणण्यास जीवनभर प्रयत्न केला. या चळवळीत दादासाहेब गवई यांनीही विद्यार्थीदशेतच खारीचा वाटा उचलून अमरावती जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण विदर्भभर अंधश्रद्धे विरुद्ध जनजागृती केली व सामान्य माणसाला आवर्जुन सांगितले की, पुत्रप्राप्ती अथवा धनसंपत्ती ही ईश्वरासमोर बक–याचा बळी देऊन कदापिही होत नाही. तर कठोर परिश्रमाने व शिक्षणाच्या माध्यमातून मानवाचा सर्वांगिण विकास होतो. अनेक ठिकाणी दादासाहेबांनी संत गाडगेबाबा यांच्या समवेत फिरून व्याख्याने दिली. गाडगेबाबांच्या समवेत एका पात्रात जेवण्याचेही भाग्य दादासाहेबांना लाभले.[3] हा दादासाहेबांच्या जीवनातील अतिशय महत्त्वाचा व दुर्मिळ योग होता. दादासाहेब गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जो अभूतपूर्व 'भूमीहिनांचा सत्याग्रह' झाला होता, त्यामध्ये दादासाहेब गवईंचे योगदान उल्लेखनिय होते. संपूर्ण अमरावती जिल्हा जणू दादासाहेब गवईंच्या नेतृत्वात या आंदोलनात उतरला होता. दादासाहेब गवई यांच्या नेतृत्वाखाली 25000 सत्याग्रहींनी एकाच दिवशी

स्वतःला अटक करवून घेऊन तुरुंगवास पत्करला. दादासाहेबांच्या नेतृत्वात मिळत असलेला अभूतपूर्व प्रतिसाद लक्षात घेऊन दादासाहेब गायकवाड यांनी आपल्या इतर कार्यकर्त्यांना सांगितले की, 'तुम्ही देखील त्यांचा कित्ता गिरवून कार्यास लागा.'[4] यावरून दादासाहेब गायकवाड हे दादासाहेब गवईच्या कार्यकर्तृत्वावर फार समाधानी होते, हे स्पष्ट होते.

महारांना त्यांच्या इमानदारीबाबत गावकुसातल्या जमीनी दिल्या होत्या. या कायद्यान्वये महारांनी करावयाची गुलामगिरीची कामे रद्द करून जमीनीचा ताबा महारांना द्यावा असे विधेयक 1900 साली खुद्द बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई वरिष्ट सभागृहात आणले होते आणि महारांची गुलामगिरी काही अंशी संपविली असली तरी कायद्यात काही पळवाटा राहिल्या, त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील गावकुसा नजिकच्या जमीनी गावातल्या कुळांनी गडप केल्या. रा. सु. गवई यांनी त्यावेळचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्याकडून एक प्रशासकीय आदेश काढला की, 'महार वतनाच्या खरेदी–विक्रीचे व्यवहार हे जर कलेक्टरच्या किंवा सक्षम अधिका–याच्या मार्फत झाले नसतील तर ते गैर समजावेत. त्याच्या थोडा बहुत फायदा होऊन 25 ते 30 हजार एकर जमीन पश्चिम महाराष्ट्रात वतनदार महारांना परत मिळली.[5] दादासाहेबांच्या या कार्यामुळे अनेक निराधारांना आधार मिळाला.

रोजगार हमी योजनेमध्ये सुद्धा दादासाहेब गवई यांचे योगदान आहे. याविषयी आपला अहवाल सादर करतांना प्रस्तावनेत त्यांनी पुढील विचार मांडले. 'भारतीय संविधानाच्या 41 व्या अनुच्छेदामध्ये देशातील प्रत्येक नागरिकाला रोजगार मिळविण्याचा हक्क प्राप्त करून दिलेला आहे. त्या तरतुदीस अनुसरून राज्य शासनाने सन 1972 मध्ये राज्यातील ग्रामीण भागातील अंगमेहनतीचे काम करण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक व्यक्तीला रोजगार मिळवून देण्याच्यादृष्टीने रोजगार हमी योजनेचा अंगिकार केला. राज्यातील सुमारे 65 टक्के लोक ग्रामीण भागात राहत असून सुमारे 80 टक्के लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन शेती व शेतमजुरी आहे. या शेतमजुरांना ही योजना सुरू होण्यापूर्वी केवळ शेतीच्या हंगामातच काम मिळत होते व उर्वरित कालावधीत त्यांना बेकार रहावे लागत होते. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात उत्पादक कामे सुरू करून बेरोजगारी व अर्ध बेरोजगारीचा प्रश्न सोडवावा हया उद्देशाने प्रेरित होऊन ही योजना 1972 ला सुरू करण्यात आली.'[6] या योजनेमुळे महाराष्ट्रातील बेरोजगारीचा प्रश्न सुटून विना हंगामाच्या काळात त्यांच्या हाताला काम मिळाले.

मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात याव्यात याकरिता रा. स. गवई यांचे सुरुवातीपासूनच प्रयत्न सुरू होते. आपल्या देशातील समाजरचनाच मुळी जातीय व्यवस्थेवर आधारीत असल्यामुळे काही जाती मागे राहिल्या तर काही पुढे गेल्या. सर्वांना बरोबरीने आणल्याशिवाय आपआपसातला भेदभाव, आर्थिक फरक कमी होणे शक्य नव्हते हे दादासाहेब गवईयांनी ओळखले होते. म्हणून मंडल आयोगाच्या शिफारशी त्वरीत लागु कराव्यात याकरिता ते सुरूवातीपासूनच प्रयत्न करीत होते. त्या अनुषंगाने त्यांनी विधान परिषदेत दिलेली भाषणे महत्वाची आहेत.[7] ती वाचून ते मंडल आयोगाच्या शिफारशी लागू व्हाव्यात म्हणून किती प्रयत्न करीत होते ते लक्षात येते.मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याविषयीचा प्रश्न अनेक वर्षापासून रेंगाळत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी जे कार्य केले आहे ते पाहता ठरावाची अंमलबजावणी कधीच व्हायला हवी होती. 27 जुलै 1978 रोजी मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नाव द्यावे हा ठराव सभागृहाच्या दोन्ही सदनामध्ये मंजूर करण्यात आला होता. तरीही याविषयी दंगली उसळल्या होत्या. बौद्ध समाजातील लोकांच्या घरांना आग लावण्याचे प्रकार घडले. त्यांच जे काही उपजीविकेचे साधन होते, ते नष्ट करण्यात आले. या पार्श्वभूमीवर दादासाहेब गवई मराठवाड्यात दंगल झाल्यानंतर जवळजवळ अकरा दिवस मराठवाड्यात फिरले. घरे–दारे, झोपड्या उद्ध्वस्त झाल्या होत्या. त्यांनी हिंदू व बौद्ध यांच्या जवळजवळ 25–30 बैठका घेतल्या. सभागृहामध्ये सुद्धा त्यांनी याविषयी आपले मत मांडताना म्हटले की, आपण सर्व मराठवाड्याच्या जनतेचे प्रबोधन करू इच्छितो. आपण एकत्र येतो, भाषण देतो ते जनतेचे प्रतिनिधी म्हणून. खरी जनता ही महाराष्ट्राच्या द–याखो–यात राहते. त्या जनतेचे प्रबोधन करण्याची जबाबदारी आपण सर्वांनी स्वीकारली पाहिजे. केवळ सामाजिक कार्यकर्त्यांनी नव्हे तर माननीय मुख्यमंत्र्यानीसुद्धा तेव्हा हिमालयाएवढे नेतृत्व असणा–या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला दिले तर मराठवाड्याची अस्मिता खुलून दिसेल. ज्या डॉ. बाबासाहेबांनी सर्वप्रथम मराठवाड्याच्या मागास भागाची

जाणीव ठेवली, ज्यांनी प्रथम शिक्षणाची ज्ञानगंगा तेथे नेली, त्या महान नेत्याची आपण जाणीव ठेवली पाहिजे. म्हणून या सभागृहामार्फत आपल्या सर्व सामाजिक कार्यकर्त्यांना बाहेरच्या कार्यकर्त्यांना माननीय मुख्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, आपण सर्वांनी समाज प्रबोधनाचे काम केले तर मराठवाड्यातील जनता ही यापेक्षा वेगळा निर्णय घेईल असे मला वाटत नाही. म्हणून आपण सर्वांनी मराठवाड्यातील सर्व जनतेचे प्रबोधन केले पाहिजे.[8] कालांतराने या प्रश्नावर तोडगा काढून हा प्रश्न सोडविण्यात आला. परंतु या आंदोलनात अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन ते आपल्या प्राणप्रिय बाबासाहेबांच्या नावासाठी शहीद झाले.

1978 मध्ये दादासाहेब गवई हे विधान परिषदेचे सभापती होते. केंद्रामध्ये जनता पार्टीचे सरकार होते. बौद्धांच्या सवलती करिता व अन्य मागण्यांकरिता दादासाहेब गवई, एन. एच. कुंभारे, आर.मुगम हे दिल्लीच्या बोटक्लब येथे उपोषणास बसले. तब्बल चौदा दिवसांच्या उपोषणानंतर तिघांच्याही प्रकृत्या ढासळल्या होत्या. इंदिरा गांधी यांनी उपोषणाच्या मंडपाला भेट देऊन या सरकारकडून बौद्धांना सवलती संबंधीची अपेक्षा करू नका पुढेमागे आपले सरकार आल्यानंतर त्या सवलतीचा विचार आपण करू असे म्हणाल्या. उपोषण संपल्यानंतर एका जाहीर सभेत उपोषण समितीचा समारोप झाला. समारोपानंतर हजारो कार्यकर्त्यांसह अटक करवून घेण्यात आली. जेलमधून सुटका झाल्यानंतर बौद्धांच्या सवलती कशा आवश्यक आहे, यासंबंधी प्रवचनासारखी दादासाहेब गवई यांची भाषणे होऊ लागली. पुढे या विषयासंबंधीची त्यांनी स्वतंत्र पुस्तिकाही काढली. याच तत्त्वाचा स्वीकार व्हि. पी. सिंगांनी बौद्धांच्या सवलती देण्याच्या बाबतीत केला. नव्हे त्या संबंधित संसदेत जे विधेयक पास झाले त्यातही दादासाहेब गवई यांनी लिहिलेल्या पुस्तिकेतील तत्वांचा स्वीकार करण्यात आला.

दादासाहेब गवई यांचे कार्य समाजामध्ये, विधान परिषदेमध्ये त्या–त्या कार्याची शान वाढविणारे होते. तसेच त्यांचे कार्य राज्यसभेमध्ये सुद्धा होते. डॉ. बाबासाहेबांविषयी अरुण शौरी यांनी आपल्या 'Worshiping false God' या स्वःलिखीत पुस्तकात विपर्यस्त व आक्षेपार्ह विधान केले होते. या विधानाने दादासाहेब दुःखी झाले होते. आपल्या श्रद्धास्थानाविषयी सत्याला बाजूला सारून केलेले विधान ते सहन करू शकत नव्हते. भाजपचे नेते रामदास अगरवाल यांचा भारताच्या संविधानाची समीक्षा करण्यात यावी हा अशासकीय प्रस्ताव सदनात प्रलंबित होता. या सुधारणा प्रस्तावावरील सभागृहातील चर्चेच्या वेळी आपला राग व्यक्त करण्याची संधी त्यांना चालून आली. आपल्या भाषणाची सुरुवात त्यांनी मी या ठरावाचा माझ्या हातांनी आणि नखांनी विरोध करतो या वाक्याने करून सभागृह जिंकले. ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानामुळे आज प्रत्येक भारतीयाला समान हक्क मिळाले आहे, ख–या अर्थाने स्वातंत्र्य आज भारतीय उपभोगतो आहे. ज्या संविधानामुळे आजचे उच्चपदस्थ आपल्या खुर्चीला टिकून आहेत आणि भारताचा अशांत व राजकीयदृष्ट्या अस्थिर पाकिस्तान झाला नाही. त्याच संविधानाचे शिल्पकार असलेल्या बाबासाहेबांविषयी सत्तारूढ पक्षातील एका कार्यकर्त्याने आपल्या पुस्तकातून असत्य विधान केलेले आहे. एकीकडे स्वार्थासाठी डॉ. बाबासाहेबांच्या नावाचा उदोउदो करून दुसरीकडे या असत्य विधांनाकडे दुर्लक्ष करून त्या पदाधिका–याला बक्षिस म्हणून राज्यसभेतील जागाच नाही तर त्याचा मंत्रिमंडळातही समावेश करण्यात आलेला आहे. अशी अरुण शौरी यांचे नाव न घेता दादासाहेबांनी आपल्या चर्चेवरील भाषणाने सुरुवात केली. सत्ताधा–यांनी याला विरोध करताच दादासाहेब म्हणाले, मी सत्य प्रतिपादन केलेले आहे. पुस्तकातील विधान असत्य असल्याचे मी सप्रमाण सिद्ध करून देऊ शकतो. तेव्हा माफी मागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. विरोधी पक्षांनी ही आपली मागणी उचलून धरली. या सर्व गोंधळात सभागृहातील कामकाज ठप्प पडले. याच विधेयकावर पुढच्या आठवड्यात चर्चा होणार होती, त्यासाठी दादासाहेबांनी जय्यत तयारी केली होती. चर्चेच्या प्रारंभीच दादासाहेब उभे राहिले (शौरीच्या) विधानांची असत्यता सिद्ध करण्याची परवानगी द्यावी, मी पुराव्यानिशी सिद्ध करण्यास तयार आहे अशी मागणी सभापतींना केली. त्यामुळे सभागृहात दोन्ही बाजूने गोंधळ झाला. तेव्हा दादासाहेब माइक मध्ये जोराने म्हणाले, 'मला जर सिद्ध करण्याची परवानगी मिळत नसेल तर माझा निषेध मी असा व्यक्त करतो.' हे वाक्य संपवून लागलीच त्यांनी ते पुस्तक हातात घेतले व पुस्तकातील पाने फाडून सभागृहातच भिरकावले. त्यांच्या या कृतीने सभागृहात बॉम्बस्फोट झाल्यासारखा गोंधळ उडाला. दादासाहेब सभागृहातून बाहेर पडतात सर्व विरोधी पक्ष सदस्यांनी व पत्रकारांनी त्यांना जनू गराडाच घातला. त्यांनी भविष्याची चिंता न करता केलेल्या या धाडसी कृत्याचे सर्वच विरोधी पक्ष सदस्यांनी व

पत्रकारांनी आपल्या लेखणीतून कौतुक केले. पुढे कित्येक दिवस देशाच्या कानाकोप–यातून अभिनंदनाची पत्रे येत होते. सांगण्याचे तात्पर्य असे की, दादासाहेब गवई यांच्या मध्ये असे चातुर्य होते की आपले मत मांडण्याची संधी देत नसाल तर अशा प्रतिकूल परिस्थितीवर सुध्दा मात करून महासंधी प्राप्त करून घेत असत.

**समीक्षाः**संसदीय कामकाज पद्धतीचा भरपूर उपयोग करून जनतेच्या सर्वव्यापी प्रश्नावर अनेक आयुधे वापरून त्यांनी जनतेच्या प्रश्नांला न्याय मिळवून दिला. दादासाहेब गवई सभागृहात भाषण करण्याकरिता उभे राहिले की, सभागृहात टाचणी पडली तरी आवाज ऐकू येईल अशी शांतता पसरायची. अन्याय, अत्याचाराच्या प्रश्नांसंबंधी तर ते शासनावर तुटून पडायचे.दादासाहेब गवई यांनी अनेक देशांना भेटी देऊन त्यांनी आपल्या देशाची बौद्ध संस्कृती सांगून मान उंचावली. त्यांचा पहिला विदेश दौरा 1968 मध्ये झाला त्यावेळी दादासाहेब गवई विधानपरिषदेचे उपसभापती होते. विदेशात परिषदेला जाण्याचा पहिला मान स्पीकर व चेअरमनचा असतो. कोणाला पाठवायचे याचा निर्णय मुख्यमंत्री घेतात. जागतिक बौद्ध परिषदेलासुद्धा दादासाहेब अनेक वेळेस जाऊन आले.

एवढया व्यस्त जीवनात सुद्धा त्यांना वाचनाचा व लिखाणाचा छंद होता. प्रामुख्याने प्रवासामध्ये सुद्धा ते वाचन व लिखाण करायचे. म्हणूनच ते 1. फिफ्थ फाईव्ह इयर प्लॅन इन रिलेशन टू शेड्युल कास्ट ॲन्ड शेडयूल ट्राईब 2. सर्विस प्रिव्हिलेजेस टू शेड्युल कास्ट 3. बौद्धांच्या सवलती संपूर्ण कैफियत 4. कास्ट वॉर ओव्हर रिझर्वेशन 5. निमित्त राखीव जागांचे रणकंदन वर्णवर्चस्वाचे 6. डॉ. बाबासाहेब आंबेडकर डिझर्व ऑफ दि कंन्ट्री 7. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय जनतेला प्रकट पत्र इत्यादी पुस्तकांमधून त्यांनी समाजाला दिशादर्शक देण्याचे काम केले. संविधानाचा सखोल अभ्यास त्यांचा होता. संविधानातील प्रत्येक कलम जणू त्यांच्या मुखपाठ होती. या ज्ञानाच्या भरोषावरच त्यांनी संपूर्ण जीवनभर सत्ताधा–यांवर व विरोधी पक्षावर एखाद्या राजाप्रमाणे सत्ता गाजविली, ती ही प्रज्ञा, शील, करुणा व मैत्री या बुद्ध तत्वज्ञानातील मूल्यांची जोपासना करीत, म्हणूनच आजही दादासाहेब गवई त्यांच्या कार्याच्या माध्यमातून अजरामर आहेत, त्यांना व त्यांच्या कार्याला विसरता येणे अशक्य आहे

**संदर्भ ग्रंथः**


1. धर्मरक्षित, भिक्खू, धम्मपद
2. धम्मचक्र प्रवर्तन दिन समारोह स्मरणिका 1982
3. गायकवाड, ज. वि., दादासाहेब एक अलौकिक व्यक्तिमत्व, दापोडी, पुणे, 2004. पान 259
4. गायकवाड, ज. वि., दादासाहेब एक अलौकिक व्यक्तिमत्व, दापोडी, पुणे, 2004. पान 281
5. हरकारे, अरुण, कृतार्थ जीवन श्री. रा. सु. गवई व्यक्ती आणि कार्य
6. हरकारे, अरुण, कृतार्थ जीवन श्री. रा. सु. गवई व्यक्ती आणि कार्य पा. 207
7. हरकारे, अरुण, कृतार्थ जीवन श्री. रा. सु. गवई व्यक्ती आणि कार्य पा. 214
8. हरकारे, अरुण, कृतार्थ जीवन श्री. रा. सु. गवई व्यक्ती आणि कार्य पा. 232
9. गायकवाड, ज. वि., दादासाहेब एक अलौकिक व्यक्तिमत्व, दापोडी, पुणे, 2004. पान 35

## वैदर्भीय आंबेडकरी चळवळीतील एक ग्रंथप्रेमी शिलेदार श्री वसंत मून

प्रा. गामिनी मेश्राम,
इतिहास विभाग प्रमुख,
डॉ. मधुरकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस.कला
व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर

**सारांश** :वसंत वामन मून यांचा जन्म नागपूर येथील शनिवारीत झाला. वडील विधुर होते. त्यांना चार मुली व एक मुलगा अशी अपत्ये होती. आईला ते व बहीण मालती असे दोन अपत्य. नंतर वडिलांच्या त्रासामुळे सदाशिव लोहकरे त्यांच्या आईचे वडील यांच्याकडे बर्डीला राहायला आले. त्यांचे नाव पहिल्या वर्गात सीताबर्डीच्या नॉर्मल हायस्कूलमध्ये टाकण्यात आले. त्यावेळी आजोबा कामठीला सिनेमा थिएटरमध्ये मॅनेजर होते. आजोबा युरोपियन अधिकाऱ्याबरोबर पार्ट्यांना जात. नागपूर ते कामठी असा त्यांचा प्रवास टांगा–घोडागाडीने असे. त्यांच्याबरोबर 3–4 कुत्री असायची म्हणून त्यांना कुत्तेवाला किंवा टांगेवाला सदाशिव म्हणायचे. वसंतरावांच्या लहानपणी आजोबांकडे विदर्भातील नेते लक्ष्मणराव ओगले, बेल्याचे दशरथ पाटील, सीताराम हाडके, रेवाराम कवाडे, फागोजी बन्सोड इत्यादी यायचे. त्यामुळे त्यांच्याशी परिचय होता.[1]

**शब्द संकेत :–**जनता वर्तमान पत्र, ऑफिसर्स ट्रेनिंग सेंटरचे सभासद, शेडूल्ड कास्ट फेडरेशन विद्यार्थी संघटनेचे सदस्य, सिक्वेंदू लेख संग्रह, पुणे करार विरोधी आंदोलनामध्ये जेल, ग्रंथालयाची निर्मिती.

**संशोधन पद्धती** :– ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा यात वापर केला जाईल.

**प्रस्तावना** : आजोबा वारल्यानंतर त्यांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली. आजोबांचा सावत्र मुलगा लक्ष्मण लोहकरे याने कोर्टातून डिक्री आणली आणि त्यांच्या आईला व त्यांना घराबाहेर काढले. ते आईसह मामा नारायण धाबर्डे यांच्याकडे बेल्याला गेले. आईची प्रकृती बरी नव्हती. काही दिवस ते तेथे राहिले. मामांनी एक कुडव ज्वारी व थोडे पैसे दिले होते. त्यांची मराठी तिसरीची परीक्षा होती म्हणून ते आईसह बर्डीला वापस आले. आईला व त्यांना जो आधार होता तो नाहीसा झाला होता. त्यांची वणवण सुरु झाली. आईने कधी घराबाहेर पाऊल टाकले नव्हते. मजुरी कशी करतात हेही तिला माहीत नव्हते. दगड–मातीचे काम ती करु शकत नव्हती. अशा परिस्थितीत शेजारी–पाजारी नवऱ्याकडे जा, असे सांगत. ती काही दिवस विचार करत राहिली आणि एक दिवस शुक्रवारी तलावाच्या शेजारी पारशी कुटुंब राहत होते. त्यांना विटाळ होत नसे, त्यांच्याकडे काम करायला लाली. एक–दोन रुपये मिळायचे. कसे बसे तरी भागत होते, त्यांची व बहिणीची उपासमार होत होती म्हणून एक दिवस गावात भीक मागणाऱ्यांना फिरताना बघून तेही भीक मागायला गेले व पहिल्याच घरी वस्तीत येणाऱ्या मांगीचे अनुकरण करीत ओरडले. ''ए बाई भाकर–तुकडा वाढावं बाई' असे म्हणताच एक वयस्क माणूस बाहेर आला नि म्हणाला, 'असे पळता ही हाणू पेकाटात0' त्यांना हा अनुभव अनपेक्षित होता. पुन्हा ते भीक मागायला गेले नाही. बर्डीतच ओळखीच्या बाईच्या घरी मागील एका खोलीत राहात होते.[2] 1935 च्या धर्मांतराच्या घोषणेनंतर वेगाने विचारमंथन सुरु झाले. बाबासाहेबांचे विचार जिकडे–तिकडे गाजू लागले. वस्तीत प्रल्हाद आणि पुंडलिक कवाडे जनता पत्र घेत. वस्तीत मठ होता. देऊळ हंसापुरीच्या माणके महार सावकारांनी बाधून दिले होते. देऊळ पंचकमिटीचे होते. एकदा बांगर सावकाराने हक्क सांगितला तेव्हा सर्व गावातील लोक जमा झाले व पंचकमिटी तयार करुन कमिटीचा अधिकार सांगितला. या मठामध्येच चळवळीच्या चर्चाही होत. काही वस्तीत माणसे मिलामध्ये कामाला जायची. तरुणांनी जनता पत्रातील बाबासाहेबांचा लेख वाचला होता. हिंदूचे देव पुजायचे नाहीत. सण करायचे नाही. तेव्हा तरुणांसह वसंत मून स.सै.दलच्या शाखेच्या माध्यमातून हे विचार घरोघरी जाऊन पटवून देत होते. वामनराव गोडबोले यांनी ऑफिसर्स ट्रेनिंग सेंटर उघडले होते. ते मुलांना मिलटरी पद्धतीचे शिक्षण देत व अन्याय–अत्याचाराविरुद्ध लढण्याची प्रेरणा देत. वसंतराव त्यांच्याबरोबर राहात असत. पूजाअर्चा व सण पाळणे बंद करुन आंबेडकर जयंती, चोखामेळा जयंती पाळायला लागले. मार्गदर्शक वामनराव गोडबोले होते.[3]

शे.का.फे.च्या स्थापनेनंतर म्हणजे 1942 ला शे.का.वि.फे.ची स्थापना करण्यात येऊन निवडणुका घेण्यात आल्या. त्यांच्या वस्तीत मिडलस्कूलच्या वर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सदस्य करण्यात आले. त्यांनी सुद्धा सभासदत्व स्वीकारले. 1946 ला नागपूरला शे.का.वि.फे.चे अधिवेशन घेण्याचे निश्चित झाले. व्ही.डी.चहांदे अध्यक्ष, तर डी.के.

रामटेके, डी.एम.मोटघरे, हरबाजी गोंडाणे, कु.कौसल्या नंदेश्वर, शांता शंभरकर बंगालचे विश्वास आणि मद्रासचे ओ. महीपती सदस्य होते. दि. 25 व 26–12–1946 ला अधिवेशन पार पडले. बाबासाहेब राज्य घटनेच्या कामामुळे येऊ शकले नाही. विद्यार्थी परिषदेनंतर नागभीडचे नामदेव नागदेवते यांच्याबरोबर विद्यार्थी फेडरेशनच्या शाख निर्माण कण्याचा त्यांनी उपक्रम केला. 1946 च्या पुणे कराराविरोधी सत्याग्रहात जेलमध्ये ते गेले. बाबासाहेबांच्या चळवळीचा वस्तीच्या सांस्कृतिक जीवनावर बराच परिणाम झाला.

बी.ए. झाल्यानंतर त्यांनी डेप्युटी अकाउंट जनरल, पोस्ट ॲण्ड टेलिग्राम या कार्यालयात लिपिकाची नोकरी पत्करली. पुढे ती 1954 ला सोडली. कारण प्राध्यापक होण्यासाठी त्यांना एम.ए. करायचे होते; परंतु एम.ए.ची गुणपत्रिका चुकीची दिली. नंतर दुरुस्त करुन मिळाली, पण ते तृतीय श्रेणीत पास झाले व प्राध्यापक होण्याचे स्वप्न राहून गेले. याच सुमारास नायब तहसीलदाराची जाहिरात आली व त्यांनी अर्ज केला. दि. 23.04.1955 ला सौंसर या ठिकाणी नायब तहसीलदार पदावर ते रुजू झालेत.[4]

1956 साली वस्तीमध्ये हस्तलिखित काढायचे ठरविले. लेख जमविण्याचे काम त्यांच्याकडेच आले. राम तिरपुडे यांच्याकडे सजावटीचे काम देण्यात आले. राम तिरपुडे हा बाबासाहेबांचा चेहरा बारकाईने चितारायचा. या अंकात गौतम बुद्ध, बाबासाहेब, काही कविता, काही नाटयछटा, मोठया लेखकांची उदाहरणे इत्यादींचा समावेश होता. त्याचप्रमाणे वैचारिक लेखही यात होते. त्यांचे नाव 'शुक्केंदू' असे होते. शुक्लपक्षातील चंद्राप्रमाणे वाढावा ही अपेक्षा संपादकीयांनी व्यक्त केली होती. दि. 20.08.1953 ला सीताबर्डी क्रीडा मंडळ स्थापन करण्यात आले. वस्तीमध्ये मुलांना फुकट दूध वाटण्याचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला होता. त्यावेळी युनोस्कोतर्फे दूध पावडरचे डबे यायचे. दूध बनविण्याचे काम घनश्याम व दीनानाथ वराडे करीत असत. वस्तीमध्ये प्राध्यापकांचे, साहित्यिकांचे, चळवळीच्या कार्यकर्त्यांची भाषणे ठेवली जात असत. मुंबईवरुन आलेल्या साहित्यिकांचे भाषण आवडीने ठेवले जात असे.

1954 साली बाासाहेब भंडाऱ्याच्या निवडणुकीकरिता नागपूरला माउंट हॉटेलमध्ये आले होते. त्यांच्यासोबत दादासाहेब गायकवाड, राजभोज व स्थानिक नेते असायचे. बाबासाहेबांना सीताबर्डीतील त्यांच्या मोहल्ल्यात आणावयाचे त्यांनी ठरविले व तसे वामनराव गोडबोले यांना सांगितले. बाबासाहेब देवस्थानात काचेच्या चौकोनात उभ्या बुद्ध मूर्तीची कमिटीची पाहणी करण्याकरिता मोटारीने आलेत; परंतु लाऊडस्पीकरचा आवाज व लोकांची गर्दी पाहून परत गेलेत. एक दिवस वसंतराव, राम तिरपुडे, गोविंदा मेश्राम, प्रेम गोडबोले अशी आठ–दहा मंडळी वामनराव गोडबोलेंबरोबर हस्तलिख्ता व राम तिरपुडेंनी काढलेले बाबांचे चित्र घेऊन बाबासाहेबांना भेटायला गेले. बाबासाहेबांनी तलम पांढऱ्या कापडाचा बंगाली सदरा आणि पायजामा घातला होता. आरामखुर्चीत 'टाइम्स' वाचत ते बसले होते. वामनराव त्यांच्या पायाजवळ जाऊन बसले. वसंतराव व इतरांनी नमस्कार केला. जवळून पाहण्याची ही त्यांची पहिलील वेळ होती. राम तिरपुडे यांनी फ्रेम केलेला बाबांचा फोटो दिला व त्यांचे हस्तलिखित बाबासाहेबांना दाखविले. बाबांनी एक एक पान पाहिले व वाचले. बुद्धांचा लेख कोणी लिहिला? त्यांनी सांगितले आमच्या पुंडलीक मुघाटेनी. बाबासाहेबांनी विचारले बुद्धासंबंधी काय चालले आहे? वसंतरावांनी म्हटले, आमच्या वस्तीत बौद्ध धर्मासंबंधी वर्ग भरवीत असतो. डॉ. नियोजी व अ.रा. कुळकर्णी समजाऊन सांगतात. त्यावर बाबासाहेब म्हणाले, ते हायकोर्टाचे जज नियोजी, ते ब्राह्मण? अगोदरही बौद्ध धर्मात प्रवेश घेणारे ब्राह्मण होते. त्यांनीच बौद्ध धर्मात भेसळ केली. विद्यार्थ्यांना शिकवले त्याप्रमाणे ते आम्हाला सांगत होते. त्यांनी विचारले, 'बाबासाहेब बौद्ध धर्म आत्म मानत नाही. तरीही पुनर्जन्म कसा होऊ शकतो हा प्रश्न अनेकजण आम्हाला विचारतात. याचे समाधान अजूनपर्यंत झाले नाही. बाबासाहेब म्हणाले. 'अरे हे बघा, एका मेणबत्तीने दुसरी मेणबत्ती पेटते की नाही. तेथले चैतन्य दुसरीत गेले की नाही. तसा हा पुनर्जन्म आहे. म्हणजेच मेणबत्ती विझवा तिची चेतना दुसऱ्या ठिकाणी प्रादुर्भूत होते. यालाच पुनर्जन्म म्हणतात. मेल्यानंतर स्वर्ग पाहून कोणीही पुनर्जन्म घेत नसतो. 'पुस्तक चाळता चाळता बाबासाहेब म्हणाले, 'हा लेख कोणी लिहिला. त्यांनी म्हटले बाबासाहेब 'मी लिहिला,' त्या लेखाचे नाव होते 'पोटजातीयतेचा भस्मासुर' बाबासाहेब म्हणाले, 'तुम्ही यासाठी काय करता? 'ते म्हणाले, 'आमच्या दलात पोटजाती पाळत नाही. सर्व पोटजातींचे लोक आहोत.' तेव्हा बाबासाहेब म्हणाले, 'मासिक राहू द्या.' दोन–तीन दिवसांनी ते गेले. बाबासाहेब आमच्या हस्तलिखितावर आपला अभिप्राय नाही. तेव्हा बाबासाहेबांनी पान उघडले व त्यावर लिहिले. श्म्गबमससमदज ूपसस ूवतजील व ंमिउनसंजपवदश म्हणजे 'अप्रतीम अनुकरण करण्यायोग्य'[5]

ते नायब तहसीलदार या पदावर रुजु झाल्यानंतर त्यांनी बाबासाहेबांकरिता वामनराव गोडबोले सोबत दिल्लीला संत्री पाठविली होती. ती संत्री बाबासाहेबांना खूप आवडली.बाबासाहेबांनी धम्मदीक्षा घेण्योच जाहीर केले आणि हा कार्यक्रम यशस्वी करण्यीच जबाबदारी वामनराव गोडबोले व त्यांच्या सहकाऱ्यांवर सोपविली. ते गोडबोले यांच्या कार्यालयात सुटीच्या दिवशी काम करीत होते. त्यांच्याबरोबर कर्नलबाग, बर्डीचे कार्यकर्ते होते. पण पत्रव्यवहाराचे काम माणिक पंचभाई यांच्याकडे होते. 9 ते 15 तारखेपर्यंत सर्व सतत राबत होते. मैदान साफसफाईपासूनचे व्यवस्था करण्याइतपतचे काम ते करीत होते. एक महत्वाची घटना म्हणजे बाबासाहेब नऊ वाजता स्टेजवर येणार, अशी सूचना मिळाली. ते दीक्षेच्या मैदानावरील तयारी पाहात होते. सर्व स.सै.द.च्या शाखांना निरनिराळया ठिकाणी नेमू दिले होते. स्टेजजवळ दुसरे सैनिक दिसले तेव्हा त्यांनी त्यांना विचारले कर्नलबागचे सैनिक कोठे आहेत. ते बाजूलाच होते. त्यांना स्टेजजवळ ठेवून स्टेजची पाहणी करायला वर चढले तर खुर्च्या दिसल्या नाही. त्यांनी रेवाराम कवाडेंना विचारले. बाबासाहेबांना बसण्याकरिता खुर्च्या कोणत्या आहेत? त्यांनी सांगितले, सदानंद फुलझेले आणायला गेले आहेत. पण आता पावणे नऊ वाजलेत ते आणणार केव्हा? तेव्हा वेळ न दवडता एका सैनिकास बरोबर घेतले. रोडचया पलीकडे एका गृहस्थाच्या घरी गेले. घरमालक घरी केनच्या खुर्चीवर बसलेले होते. त्यांनी खुर्ची देण्याची विनंती केली. गृहस्थाच्या बोलण्यावरुन तो मुसलमान वाटला. तो म्हणाला यकीनन, त्यांनी व सैनिकाने 1–1 खुर्ची डोक्यवर घेतली व स्टेजवर ठेवली आणि तेवढयात बाबासाहेब आले. रेवाराम कवाडे म्हणाले, 'तुम्हाला हे कसे सुचले?' ते म्हणाले, 'टिनाच्या फोल्डिंग खुर्चीवर बाबासाहेब बसू शकले नसते आणि सदानंद फुलझेलेंचा पत्ताही नव्हता म्हणून मला युक्ती सुचली' दीक्षा कार्यक्रम आटोपल्यानंतर ते 4–5 दिवसांनी ते त्यांच्या कामावरुन रुजू झाले.

दीक्षेच्या कार्यक्रमानंतर ते लग्नाचा विचार करु लागले. कमीत कमी मॅट्रिक पास आणि पोटजातीबाहेरची मुलगी मागायची. एक दिवस दलातील भानुदास वराडे यांना सायकलवर घेऊन खलाशी लाईन वस्तीत माधवराव सोनटक्के यांची मुलगी दाखवण्याकरिता घेऊन गेले तेव्हा त्यांची कन्या मिनाक्षी पसंत पडली. तसे तेही माधवरावांना पसंत होते; परंतु आपल्या पोटजातीची नाही, असे दोन्ही कुटुंबीयांच्या नातलगांना वाटत होते. पण ते ठाम होते. 14 में 1958 रोजी त्यांचे लग्न झाले. लग्नाने त्यांच्या चळवळीच्या कार्यात फरक पडला नाही. त्यांच्या पत्नीने त्यांच्या स्वभावाशी जुळवून घेले. पूर्वी सामाजिक कार्याचा अनुभव नसतांनाही तिच्या परीने ती सामाजिक कार्यात रस घेऊ लागली. सामाजिक, धार्मिक जाणिवेला वाचा फोडण्यासाठी तिने लेखणी हाती घेतली आणि कथा, कविता लिहू लागली. त्यांच्या तीन मुली व एक मुलगा डॉ. मिलिंद हेही सामाजिक चळवळीत वावरत आहेत. बुद्ध धर्माचे व आंबेडकर चळवळीचे बाळकडू त्यांना लहानपणापासूनच मिळाले. वसंतरावांची आई मिलची नौकरी सोडून त्यांच्याबरोबर राहू लागली. आई 19.1.1992 रोजी मुंबईलाच मृत्यु पावली. तिला घरी नेईपर्यंत सर्व नातलग आले. या सर्वांजवळ तिच्या आतिथ्याच्या, प्रेमाच्या स्मृती होत्या. त्यांच्या पत्नीने ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह वुमेन्स ऑर्गनायझेशनमध्ये भाग घेणे सुरु केले होते आणि 'आम्ही मैरणी' हे मासिक सुरु केले. यशोधरा महिला मंडळ स्थापन केले या मंडळाच्या त्या अध्यक्ष आहेत.जीवनात घडणाऱ्या घटना तुम्हाला कुठे नेतील याचा नेम नाही. माणसाने हिमतीने धैर्याने पुढे जायचे असते. आलेल्या संकटांचा सामना करताना आपला आदर्श व ध्येय सोडायचे नसते. महाराष्ट्र शासनाने बाबासाहेब आंबेडकरांच्या इंग्रजी वाडमयाच्या संपादनाचे काम त्यांच्याकडे सोपविले व त्यांनी ते आनंदाने पार पाडले. हनुमाननगर या ठिकाणी आंबेडकर चळवळीतील संपूर्ण साहित्याची, पत्रांची, लेखांची, कविता, कादंबरी, मासिके, लेख प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांची अद्ययावत लायब्ररी समाजाच्या हितासाठी सुरु केली.

**संदर्भ :–**

1) बाबांचे शिलेदार, प्रकाशन हंसराज भांगे,आंबेडकरी चळवळीचे सहकारी संस्कार मंच, नागपूर, प्र.आ.2015,पा.नं.195,
2) कित्ता, पा.नं.196
3) कित्ता, पा.नं.197
4) कित्ता, पा.नं.198
5) कित्ता, पा. नं.198

# इतिहास संशोधक : वसंत मून

डॉ लखन भिकाजी इंगळे
अर्थशास्त्र विभाग
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व
वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

**सारांश :—**बाबासाहेबांनी नागपूर येथे जो धम्मदीक्षेचा कार्यक्रम घडवून आणला त्यामध्ये वसंत मूनचे एक कार्यकर्ता म्हणून मोठे योगदान आहे. डॉ. गंगाधर पाणतावणे त्यांच्या विषयी लिहीतात, "हि बघा गंगाधरराव, दी प्रॉब्लेम ऑफ रुपी ची पहीली आवृत्ती, हे बाबासाहेबांचे दूर्मीळ फोटो, ही जनता ची जुनी फाईल, हे सत्यशोधक समाजाचे जलसे, ही जूनी हॅडबिल, ही पहा. बाबासाहेबांनी लिहलेली अर्थशास्त्राची उत्तरपत्रिका आणि ही पहिलीत, ही आहेत. परदेशातल्या वृत्तपत्रात बाबासाहेबांसबंधी प्रकाशित झालेल्या माहितीची कात्रण"[१] त्यांच्या बाबासाहेब व इतर चळवळीतील कार्यकर्त्यांचे सहित्य गोळा करण्याची तसेच वेगळी होती. त्यांन उत्कृष्ट संशोधक म्हणण्यास भाग पाडले. त्यांनी गोळा केलेल्या साहित्याचा आंबेडकरी चळवळीवर लेखन करणारया साहीत्यिक, प्राध्यापक व संशोधकाला त्याची मोठ्या प्रमाणात मदत होत आहे. त्यांचे हे कार्य पाहून महाराष्ट शासनाने बाबासाहेब आंबेडकरांच्या इंग्रजी वाडमयाच्या संपादनाचे काम त्यांच्याकडे सोपविले. नागपूर येथील हनुमाननगर या ठिकाणी आंबेडकर चळवळीतील संपूर्ण साहित्याची, पत्राची,लेखांची, कविता, कांदबरी, मासीके, लेख प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाची अद्ययावत लायब्ररी समाजाच्या हितासाठी सुरु केली. त्या लायब्ररीची सर्व पुस्तके व इतर दस्तावेज त्यांच्या मुलामुलींनी राष्टसंत तुकडोजी महाराज नागपूर युनिव्हरसीटीच्या आंबेडकर विचारधारा अध्ययनचा विभागाला एप्रिल २०१६ मध्ये दान म्हणून दिलीत. ही त्यांची समाजाकरीता मोठीच मोलाची देणगी आहे. त्याची 'वस्ती' हे आत्मचरित्र अतिशय गाजलेली ज्यामध्ये त्यांनी त्यांचा संपूर्ण जीवणप्रवास कोरलेला आहे. यासोबतच दलित चळवळीशी संबंधित लेखन व अनेक संशोधनपर लेख लिहिलेत.

**शब्दसंकेत :—** वस्ती, संशोधक, चरित्र ग्रंथ, वाचनालय

**संशोधन पद्धती : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना :—** वसंत मून यांचा जन्म २२ जानेवारी, १९३२ रोजी नागपूर येथे झाला. नागपूरच्या बर्डी परिसरात लहानपन गेले. वडिल अतिशय दारुडे असल्यमुळे आईची परिस्थिती बिकट होती. आईतिच्या वडीलाकडून चांगल्या परिस्थितीतून असल्यामुळे तिला अशा वातावरणात खुब हलाकिचे जीवन जगावे लागले. वसंत मूनचे वडिलांना चांगला पगार असतांनही केवळ दारुच्या व्यसनामुळे ती घरच्या गरजा पूर्ण करु शकत नव्हते. अशा वातावरणात आई शेजारीकडे काम करुन कसेतरी जीवनव्यापन करु लागली. अशा वातावरणात वसंत मून मोठे होवून ग्रॅज्यूएट झाले. व पुढे जाऊन बाबू व नंतर नायब तहसीलदार झाले. यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्व प्रकारचे अनमोल साहित्य महाराष्ट्र सरकार यांच्या वतीने प्रचंड परिश्रम घेऊन प्रसिद्ध केले. हा भारताच्या इतिहासातील मानदंड आहे, दीर्घ अभ्यास, प्रचंड चिकाटी, सातत्य, मदत मिळो न मिळो याची तमा न बाळगता मून यांनी हे कार्य केले आहे.

**विदर्भातील इतिहास संशोधक वसंत मून :—**"१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षा भूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या ऐतिहासिक धर्मांतराच्या कार्यातही संपूर्ण मैदानाची व्यवस्था पाहण्याचे महनीय कार्य वसंत मून यांनी सचिव आयुष्यमान वामनराव गोडबोले यांचे बरोबर केले याचाही याक्षणी विसर पडत नाही."[२]

वसंत मून हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चळवळीत तरबेज झालेला हा गडी आहे. भगवान गौतम बुद्धाचा धम्म, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पूर्णपणे आत्मसात करुन त्यात जीवन जगलेला हा मनुष्य आहे. त्याचा अविष्कार त्यांचे आत्मचरित्र 'वस्ती' यामध्ये तर दिसतेच परंतु त्याहीपेक्षा गेली चाळीस वर्षे त्यांनी यावर जे लेखन केले त्याच्या खुणा विस्तृतपणे दिसतात. तसा अविष्कार त्यांच्या अनेक ग्रंथातून दिसतो. सहृदय चिंतनशीलता हा त्यांचा स्थायीभाव आहे. "स्त्रियांना शिक्षण द्यायची गरज आहे काय? हा लेख त्यांच्या ऐन संस्कारक्षम वयात त्यांच्या वाचनात आला आणि त्याला उत्तर देण्यासाठी त्यांनी लेखनी सरसावली — त्यांनी उत्तर दिले. स्त्रियांना शिक्षण द्यायची गरज आहे."[३]

वसंत वामनराव मून यांच्यावर 'वाचन' संस्कृतीचा प्रभाव अत्यंत मोठा होता. मून वाचतात हे पाहून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दलाचे खंदे सैनिक त्यांना पुस्तके विकत आणून देत. तर "बालाजी प्राथमिक शाळेत असतांना शिक्षणक त्यांच्याकडून पुस्तके वाचून घेत असत आणि तेथेच लिखाणातले स्फूल्लिंग त्यांच्यात रुजले गेले. हस्तलिखिते तयार करण्याचा त्यांना छंद जडला. सन १९५५ मध्ये पहिली कथा प्रसिद्ध झाली आणि लिहिण्याला छपाईचे मोल असते."[४] याचा प्रभाव त्यांच्या मनावर जडला.मून यांची तहसिलदार म्हणनू पहिली नेमणूक

नागपूर पासून ७५ मैल लांब छिंदवाडा, जिल्हा सौसर या ठिकाणी झाली. विचार प्रगल्भ करायचे असेल तर पुरोगामी साहित्य वाचले पाहिजे, प्रतिगामी नको. ही त्यांची धारणा होती. शिक्षणाचे स्वरुप बदलले तरी शिक्षणाचे महत्व अपरिहार्य असते हे त्यांच्या मनावर ठसले होते. त्यांनी स्त्री शिक्षणावर भर दिला. "१९५८ ते १९६० च्या दरम्यान त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा इंग्रजी ग्रंथ 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट' चे 'जाती व्यवस्थेचे समुळ उच्चाटन' असे मराठीत रुपांतर केले."[५] तसे पाहीले तर १९५२ पासूनच मून यांना लिहिण्याची प्रेरणा मिळाली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चळवळीत संपूर्ण न्हाऊन निघाल्यामुळे त्यांचे लिखाणही तसेच रसरशीत आणि ज्वालाग्राही झालेले होते. 'भाडोत्री प्रचारकापासून सावध रहा' हे पुस्तक स्वखर्चाने आणि आदरणीय वामनराव गोडबोले यांच्या प्रेरणेने १९५३ मध्ये छापले व प्रसिद्ध केले.

१९६० मध्ये नागपूर या ठिकाणी वसंत मून यांनी आपले घर बांधल्यावर, "१९६५ च्या आसपास कामा निमित्ताने बदली ठिकाणी असतांना अनेक पुस्तकांचा साठा त्यांना मिळाला होता आणि त्याचेच फलीत म्हणून नागपूर येथील घरात त्यांनी ग्रंथालय उघडले. पुढे त्याचेच रुपांतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च इंस्टिट्यूट, ४४७, हनुमान नगर, नागपूर–४४०००९ या ठिकाणी करण्यात आले."[६] देश विदेशातील अनेक अभ्यासक येथे अभ्यासासाठी येऊन गेलेत. "अमेरिकन विदुषी डॉ. एलिनार झेलीएट यांनी बाबासाहेबांच्या जीवन दर्शनावर आपला पीएच. डी. प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळविले आहे. आज त्यांचे अनेक विद्यार्थी येथे येत असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथाची समिक्षा 'बुद्ध धम्म प्रदीप' या नावाने वसंतराव मून यांनी केलेली आहे. त्याचप्रमाणे १९९० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन आणि कार्य मराठीसह एकंदर सात भाषामध्ये प्रसिद्ध आहे."[७] अनेक प्रकारचे चिकित्सक, समिक्षात्मक वाड.मयही त्यांच्या नावावर आहेत. इतिहास संशोधकाची मर्मभेदक दृष्टी त्यांना लाभलेली असल्याने त्यांनी अनेक तथाकथित संशोधकाच्या संशोधनातील फोलपणा सप्रमाण सिद्ध केलेला आहे. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समग्र वाड.मय छापणे या कामी स्वत:ला वाहून घेतले. वसंत मून दिवसभ चर्च गेटला राहत असत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संदर्भ पेपर चाळत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समग्र वाड.मय आतापर्यंत एकूण १ ते १७ खंड महाराष्ट्र शासन यांच्या वतीने प्रकाशित झालेले आहेत. वसंत मून यांनी एकूण खंडा १७ ते २० तयार करुन महाराष्ट्र शासनास छापण्यासाठी उपलब्ध करुन दिले आहेत.

**मुल्यांकन :–**आदरनिय वसंत वामनराव मून आजच्या घडीला आपल्यातून निघून गेले आहेत. त्यांच्या कार्यकतृत्वाचा दीर्घ आलेख पाहता खरोखरच त्यांचे कार्य गौरवास्पद आहे. डॉ. एलिनार झेलिएट या अमेरिकन विदुषी द्वारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन आणि त्यांच्या चळवळीची सर्व जगाला ओळख करुन देण्याचे महत कार्य आदरनिय वसंत मून यांच्यामुळेच शक्य झाले आहे. हे निर्विवाद सत्य आहे. म्हणून स्मृतिशेष वसंत मून यांच्या कार्यास विनम्र अभिवादन व आदरांजली.

## संदर्भ सूची :–

१) मनोहर, यशवंत (संपा.), 'वसंत मुन व्यक्ती आणि कार्य',प्रकाशन डॉ. बाबसाहेब आंबेडकर रिसर्च इंस्टिटयुट, नागपूर, प्र. आ. २००४, पृ. क्र. १७

२) भांगे, हंसराज (संपा), 'बाबांचे शिलेदार'आंबेडकरी चळवळीचे सहकारी सत्कार मंचनागपूर प्र.आ.२०१५, पृ. क्र. २४२.

३)ढोले, प्रदिप, 'आंबेडकरी चळवळीचा इतिहास', बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपुर, प्र. आ. २०१७, पृ. क्र. १२२.

४)पूर्वोक्त, पृ. क्र. ६८.

५)पूर्वोक्त, पृ. क्र. ६९.

६)पूर्वोक्त, पृ. क्र. ७०.

७)पूर्वोक्त, पृ. क्र. ७१, ७२.

# विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील राजकीय व सामाजिक कर्मनिष्ठ नेतृत्व – ॲड. सखाराम एम. मेश्राम

प्रा. डॉ. कमलाकर पी.तागडे
प्रमुख समाजशास्त्र विभाग
डॉ. मधुकरराव वासनिक
पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय नागपूर

---

**सारांश** –विदर्भातील आंबेडकरी चळवळीचा जेव्हा आपण सैध्दांतिक दृष्टिकोनातून विचार करतो तेव्हा आपणाला जाणीव होते की, कोणे एकेकाळी ज्या समाजाला चालण्याचा अधिकार नव्हता, बोलण्याचा अधिकार नव्हता, तो समाज आपल्या अधिकारापासून पूर्णपणे वंचित होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वामूळे विदर्भातील अस्पृश्य बांधवांचा स्वाभिमान व आत्मसन्मान जागृत झाला. डॉ. आंबेडकरांच्या प्रभावी आणि आत्मिय तळमळीमुळे दलित समाजाने आपली अढळ श्रध्दा त्यांच्या ठायी केंद्रित केली आणि त्यांनी सांगितलेल्या आत्मोध्दाराच्या प्रत्येक विचाराचे पालन करण्याचा ठाम निर्धार त्यांनी केला." [१] त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या चळवळीला सशक्त करण्याकरिता कर्मभूमि म्हणून नागपूरची निवड करतात. याच नागभूमिमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसमवेत दलित बांधवांच्या उध्दाराकरिता रात्रंदिवस कार्य करण्याकरिता विदर्भातील अनेक दलित समाजातील कार्यकर्ते डॉ. आंबेडकरांना सहकार्य करतात.

विदर्भातील आंबेडकरी चळवळीना सक्रीय व सशक्त करण्याऱ्यापैकी ॲड. सखाराम मेश्राम हे एक आंबेडकरी विचारांचे कर्मनिष्ठ नेतृत्व. या नेतृत्वाने आपल्या कार्याचे प्रतिबिंब आंबेडकरी समाजामध्ये उमटविले. त्यांनी स्वत:ला समाजकारण व राजकारणाविषयी झोकून दिले. समता सैनिक दलात सक्रिय राहून, डॉ. बाबासाहेबांनी केलेल्या आंदोलनामध्ये तसेच सभा सम्मेलनामध्ये आवार्जून हजर राहीलेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता. डॉ. बाबासाहेबांच्या आदेशानुसार पुणेकरांच्या निषेधार्थ नागपूर येथील सत्याग्रहात आवळे बाबू, ठवरे, आर.व्ही. कवाडे, आर.आर. पाटील यांच्या समवेत ॲड. सखाराम मेश्राम यांनी भाग घेतला होता. मध्यप्रदेश कायदेमंडळात मजुरांचे प्रतिनिधी म्हणून स्व. मजूर पक्षातर्फे रा. ठवरे यांनी सखाराम मेश्राम यांना उमेद्वारी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यास नेहमीच पांठिबा देत राहिले. ज्या लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विरोध केला त्या लोकांच्या सभा ॲड. सखाराम मेश्राम यांनी उधळून लाविल्यात. विदर्भातील आंबेडकरी आंदोलनात अतिशय प्रभावी होण्यामध्ये ॲड. सखाराम मेश्राम यांचे योगदान अतिशय महत्वपूर्ण आहे.

"भारतातील दलित चळवळ ही भारतीय समाजात खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणारी चळवळ होती असे मत गेल आम्व्हेट यांनी मांडले आहे."[२] विदर्भातील आंबेडकरी चळवळीमध्ये ॲड. सखाराम मेश्राम यांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

**शब्द संकेत** –महाडचा सत्याग्रह, समता सैनिक दल, मध्यप्रांतीय दलित परिषद,स्वतंत्र मजूर शेडथूल कास्ट विद्यार्थी फेडरेशन धम्म दिशा सोहळा

**अध्ययन पध्दती** – ऐतिहासिक अध्ययन पध्दतीचा उपयोग करून अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करून प्राथमिक व द्वितीय स्तोत्रांचा उपयोग करण्यात आले आहे.

**प्रस्तावणा** –विदर्भातील आंबेडकरी चळवळ ही अतिशय वैचारीक आणि संघटनपूर्ण चळवळ होती. आंबेडकरापूर्वी दलित चळवळीचे जे स्थान होते. त्यापेक्षा अधिक क्रियाशिल आणि प्रभावी चळवळ ही डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वालने विकसित झाली.मतदान केंद्र बुधवारी विभागात होते. निवडणूकीतील परिस्थिती ही फार तप्त होती. ॲड. सखाराम मेश्राम यांच्या वतीने अनेक पूरूष व महिला कार्यकर्त्या निवडणूक प्रचाराचे कार्य करित होत्या. रूईकरांना निवडणूकीत विजय मिळणे दुरापारच वाटत होते. मतदाराच्या वेळी भांडण होऊन पोलिसांनी

लाठीचार्ज (लाठीहल्ला) केला. सखाराम मेश्राम हे आपल्या कार्यकर्त्यांना वाचविण्याकरिता स्वत: समोर आले. पोलीसांनी त्यांच्यावरही लाठी चालविली तरीही सखारामजी डगमगले नाहीत. पूढे पोलिसांना गोळीबार करावा लागला. त्या गोळीबारामध्ये रामदास डोंगरे हे मृत्यूमूखी पडलेत. त्या निवडणूकीत रूईकर विजयी झाले

**महाडच्या सत्याग्रहात सहभाग—**२४ जाने. १९३२ रोजी महाडच्या सत्यग्रहात भाग घेऊन नागपूरला परतलेल्या समता सैनिक दलाच्या कार्यकर्त्यांचे नागपूर रेल्वे स्टेशनवर स्वागत केले त्यावेळी त्यांच्या सोबत शंभर (१००) कार्यकर्ते उपस्थित होते. कस्तुरचंद पार्क येथे याच समता सैनिक दलाच्या कार्यकर्त्यांचा जाहीर सत्कार झाला त्यावेळीसुध्दा अॅड सखाराम मेश्राम उपस्थित होते.

**आंबेडकरी सभा—परिषदांमध्ये सहभाग व संरक्षण —**देवाजी खोब्रागडे यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या मध्यप्रांतीय दलित परिषदेसाठी चोखामेळा वस्तीगृहातील विद्यार्थ्यासह हजर राहिले. २३ ऑगस्ट १९३२ रोजी तत्कालीन गव्हर्नर मॉटेग्यू व बॅटलर यांचा इंदोरा या ठिकाणी सत्कार घेण्यात आला होता. त्यावेळी या कार्यक्रमात हजर होते. १४ एप्रिल १९३३ रोजी चंद्रपूर येथील **'पूणे करार'** स्मृती दिवसाचा कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पुढाकार व सहभाग होता. जाईबाई चौधरी यांनी स्थापित केलेल्या चोखामेळा मुलीच्या शाळेकरिता सुप्रिटेंटचे कार्य सांभाळले. २८ फेब्रुवारी १९३४ रोजी अकोला येथे आयोजित सर्वपंथीय संताच्या परिषदेकरिता उपस्थित राहिलेत. ४ नोव्हेंबर १९३४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करण्याची घोषणा केली होती त्या घोषणेस पाठिंबा देण्यासाठी प्रचार व प्रसार सभेकरिता वस्तीगृहातील विद्यार्थ्यासह सहभाग घेतला होता. एल.एन. हरदास यांनी १९, २०, २१ मे, १९३५ रोजी कामठी येथे मेथडिस्ट स्कूल पटांगण या ठिकाणी म. प्रांत अस्पृश्य विद्यार्थी संमेलन आयोजित करण्यात आले होते त्या ठिकाणी अॅड. सखाराम मेश्राम आरमोरीचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष एम.बी. नियोगी होते.

०३/०९/१९३६ चा सत्याग्रह म्हणजे डॉ. बाबासाहेबांच्या आदेशानुसार पुणेकरांच्या निषेधार्थ, नागपूर येथील सत्याग्रहामध्ये आवळेबाबू, ठवरे, आर.व्ही. कवाडे, आर.आर.पाटील यांच्यासह अॅड सखाराम मेश्राम यांनी भाग घेतला. जेव्हा दलित पुढाऱ्यांना तुरूंगामध्ये डांबण्यात आले होते तेव्हा अॅड. निसार अली सोबत अॅड. सखाराम मेश्राम यांनी त्यांना सोडविण्याचे प्रयत्न केले. वर्ष १९४० मध्ये अॅड. सखाराम मेश्राम हे समता सैनिक दलाचे अध्यक्ष होते. त्याचबरोबर एक प्रसंग असा घडला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचे नेते नाहीत हे सांगण्यासाठी जे लोक डॉ. बाबासाहेबांचे विरोधी असणाऱ्या हरिजनांनी व्यंकटेश थिएटर येथे एक सभा आयोजित केली होती. ही सभा अॅड सखाराम एम. मेश्राम यांनी आपल्या सहकार्यांच्या मदतीने उधळून लावली. व चिटणीस पार्कच्या सभेत हजर राहून डॉ. बाबासाहेब दलितांचे नेते आहेत हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला. विदर्भामध्ये पुढाकार घेऊन अॅड. सखाराम मेश्राम यांनी शे.का.फे. च्या विस्ताराकरिता अथक प्रयत्न केले आहेत. १९४२ ते १९४८ पर्यंत ते नागपूर नगर अध्यक्ष होते. १२/१२/१९४५ ला जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूरला आले असता त्यांच्या स्वागताकरिता डी.पी. मेश्राम यांच्यासोबत अॅड. सखाराम मेश्राम रेल्वे स्टेशनवर हजर होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा भंडारा मतदार संघात उमेद्वार म्हणून घोषित झाले तेव्हा त्यांच्या प्रचाराकरिता बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे, अॅड. बाबु आवळे, अॅड. सखाराम मेश्राम आणि पंजाबराव शंभरकर यांनी अथक प्रयत्न केले. कारण त्यांच्यावरती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव होता. अशा या महान खंबीर नेतृत्वाचा अस्त ०७/०७/१९७४ ला मेयो हॉस्पीटल येथे सकाळी १०.३० वाजता निधन झाले. नागपूर महानगर पालिकेत त्यांच्या कार्याची दखल घेऊन सदर येथील अंजुमन कॉम्प्लेक्स जवळ अॅड. सखाराम मेश्राम यांचा पुतळा बसविला (२४/०१/१९७६) ला मुंबईचे मेअर श्री. मेहता यांच्या हस्ते व बॅ. खोब्रागडे यांच्या उपस्थितीत पुतळ्याचे अनावरण झाले. या चौकाला सखाराम मेश्राम चौक व इंदोरा चौका पर्यंतच्या रस्त्याला सखाराम मार्ग आणि मंगळवारी बगीचाला सखाराम मेश्राम पार्क असे नावं देण्यात आले. नागपूर डिस्ट्रिक्ट बार असोसिएशन च्या कार्यालयात त्यांचे छायाचित्र लावण्यात आले. अशा या महान कर्मनिष्ठ नेतृत्वाला निळा सलाम!

**मुल्यांकन –**शोधनिबंधावरून असे लक्षात येते की, ॲड. सखाराम मेश्राम हे एक कर्मनिष्ठ नेतृत्व आंबेडकरी चळवळीमध्ये सक्रिय असल्यामुळे आंबेडकरी समाजाला राजकिय, सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा लाभ मिळाला. त्यांनी सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा लाभ मिळाला. त्यांनी समाजाकरिता शैक्षणिक संस्था काढून समाजाला काहीतरी देण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांनी ३० वर्षे प्रॅक्टिस करून आंबेडकरी समाजाला कायदेविषयक मार्गदर्शन करून वकिली व्यवसाय सुरू केला. पैसे न घेता ही अनेक लोकांना न्याय मिळवून दिला. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावरती असल्याने त्यांनी समाजाकरिता स्वत:ला समर्पित केले होते.१४ ऑक्टोबर, १९५६ मध्ये झालेल्या धम्मचक्र परिवर्तनाच्या सोहळ्यात सखाराम मेश्राम यांनी अतिशय महत्वाची जबाबदारी पार पाडली. दिक्षाभूमीवर येवू न शकलेल्या लोकांसाठी भैय्यासाहेब आंबेडकरांच्या हस्ते, कोराडी महादुला येथे महास्थविर चंद्रमणी यांच्या उपस्थित धम्म चक्र प्रवर्तन (दीक्षा) समारंभ आयोजित करण्यात आला. व कार्यक्रमाचे सखाराम मेश्राम व हंसराज गजभीये प्रमुख आयोजक होते. यावेळी भैय्यासाहेब आंबेडकर, श्री. मेश्राम यांच्या घरी येवून गेले. रिपब्लीकन पक्षाच्या स्थापनेपासून तर या पक्षाच्या विस्ताराकरिता तसेच या पक्षाच्या ऐक्याकरिता सखाराम मेश्राम यांचे योगदान महत्वाचे आहे. अशा या महान आंबेडकरी कर्मनिष्ठ नेतृत्वाने केलेल्या कार्याचा व्याप खूप मोठा आहे. त्यांच्या कार्याचा आलेख मोठा असल्याने संशोधकाने काहीच कार्याचा आढावा घेतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाचा त्यांना सहवास लाभला त्यामुळे त्यांनी आंबेडकरी समाजातील अस्पृश्य बांधवांच्या हिताकरिता निस्वार्थपणे कार्य केले. त्यांनी जर ठरविले असते तर दुसऱ्या ते ही कॉंग्रेसमध्ये जाऊन इतर रिपब्लिकन नेत्यासारखे मंत्री बनले असते. परंतु त्यांनी आंबेडकरी समाजासोबत प्रामाणिकता दाखविली.

**संदर्भ सूची**

१) कोसारे एच.एल. (१९८४):'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास'पेज नं. ८ नेहा प्रकाशन, नागपूर

२)Gail Omveat &"The Dalit Liberation movementPatankar Bharatin Colorial period
Feb. 1979, Page No. 415

३) संपादक – खोब्रागडे सुनील :'जनतेचा महानायक' दैनिक वृत्तपत्र"कर्मनिष्ठ आंबेडकरी सेनानी स्मृतीशोध ॲड. सखाराम मेश्राम" या शिर्षकाअंतर्गत रविवार दि. ६ जुलै, २०१४, पेज नं.४

**सहायक संदर्भ सुची**

१.प्रा. बनसोड प्रवीण (२०१४)वंचितांना अधिकार देणारा महात्मा दैनिक देशोन्नती ११–०४–२०१४

२.डॉ. खांडेकर भालचंद्र (२०१४)डॉ. बाबासाहेब आंबेडकर :जीवन, कार्य एवं विचार' पेज नं. १९६,निरमय क्रिएटिव नागपूर.

३.डॉ. खांडेकर भालचंद्र (२०१४)डॉ. बाबासाहेब आंबेडकर :जीवन, कार्य एवं विचार' पेज नं. १८५,निरमय क्रिएटिव नागपूर

४.डॉ. खांडेकर भालचंद्र (२०१४)डॉ. बाबासाहेब आंबेडकर :जीवन, कार्य एवं विचार' पेज नं. १९

५.संपादक (१९९३)डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ' महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृति मंडळ मुंबई – ४४०००१
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय पुणे – ४११००१ प्रथमावृत्ती : २५ डिसेंबर १९९३

६.डॉ. कराडे बी.एम. (२००९)भारतीय समाज प्रश्न आणि समस्या श्री मंगेश प्रकाशन नागपूर

# विदर्भिय आंबेडकरी चळवळीत डॉ. मधुकरराव वासनिक यांचे योगदान

प्रा. डॉ. एन. डब्ल्यु. लांडगे
(डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग)
डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यु.एस.
कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

**सारांश** :आंबेडकर पश्चात जी वंचित समूहाची चळवळ विदर्भात अस्तित्वात होती त्यातील बरेच पुढारी हे खरचं चळवळ समोर नेत होते की मागे नेत होते. हा एक संशोधनाचा वेगळा विषय ठरेल. कारण काही अपवाद वगळता बरेच लोक राजकीय पटलावर आपली पोळी शेकण्याच्या कार्यक्रमाला अग्रक्रम देत असत. परंतु यातील मोजके अल्पसंख्यांक नेते मात्र प्रामाणिकपणे अणि सातत्याने आपले सामाजिक–सांस्कृतिक आणि शैक्षणिक योगदान देवून आंबेडकरी चळवळ गतीमान ठेवत होते. स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा सर्वागिण प्रगतीची गुरूकिल्ली म्हणून शिक्षणाला अग्रक्रम देवून बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना करून त्या माध्यमातून 20–30 च्या दशकात महाविद्यालये आणि वस्तीगृहांची स्थापना करून मागासवर्गीयांच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. (परंतु दूदैवाने वैदर्भिय आंबेडकरी चळवळीत नाममात्र पुढाऱ्यांनी हा बाबासाहेबांचा वारसा पूढे नेला.) त्यांच्या या चळवळीला सुरवातीच्या काळात म्हणजे 1920 च्या दशकात व पूढे सुद्धा खऱ्या अर्थाने विदर्भाने म्हणजे नागपूरने मौलाची साथ देवून आंबेडकरी इतिहासात आपले नाव अजरामर केले आहे. शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या बऱ्यास सभा नागपूरात खासकरून उत्तर नागपूरात आयोजित करण्यात आले होते. त्या सभेसाठी कित्येकदा दस्तूरखूद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उपस्थित होते.[1]

प्रत्यक्ष बाबासाहेबांचा सहवास या भूमिला लाभल्यामुळे येथील वंचित जनमानस प्रभावित होवून चळवळी प्रती समर्पित झाला होता. यातीलच एक दुसऱ्या पीढीतील तरुण, तडफदार, जिद्दी, संघर्षषील डॉक्टर मधुकरराव शामरावजी वासनिक यांनी उत्तर नागपूरातून आंबेडकरी चळवळीची धूरा सांभाळून चळवळी प्रती आपले शैक्षणिक, राजकीय, वैद्यकीय आणि सामाजीक योगदान देणे सुरु ठेवले आहे.

**शब्दसंकेतः शिक्षण अस्पृश्य, कॉंग्रेस, विधान परिषदेत निवड, पी.डब्ल्यु.एस. ची स्थापना, निकाय–त्रैमासिक, बेझनबाग कार्य.**

**संशोधन पद्धती : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना** :–डॉ. मधुकर शामरावजी वासनिक यांचा जन्म दिनांक 23 जानेवारी 1935 रोजी भंडारा शहरातील गणेशपूर येथे झाला. वडिलांचे नाव शामराव ठुमकुजी वासनिक, मॅट्रिक उत्तीर्ण. आईचे नाव कमलाबाई शामराव वासनिक. वडिलांचा बीडी बांधणी हा व्यवसाय होता. त्यामुळे घरची आर्थिक परिस्थिती बेताचीच होती, तरी सुद्धा त्यांचे वडिल तत्कालीन मॅट्रिक परिक्षा पास झाले होते. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीने वासनिक परिवार सुद्धा प्रभावीत होवून भारावून गेला होता. कारण भंडारा लोकसभा मतदार संघातून डॉ. आंबेडकरांनी निवडणूक लढवली होती. त्यामुळे या विभागात डॉ. आंबेडकरांचा विशेष प्रभाव होता. ''शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा।'' हा संदेश वणव्याप्रमाणे सर्वत्र पसरला होता. अस्पृश्य समाजाच्या अपरिमीत दुःखाचे कारण दारिद्र्य होते आणि या दारिद्र्यातून मुक्त होण्याचा एकच मार्ग होता आणि तो म्हणजे शिक्षण. शामरावजी वासनिक यांना सुद्धा असेच वाटायचे की, आपल्या मुलांनी खूप शिकावे. डॉक्टर, इंजिनियर व्हावे. न्यायधिश, सरकारी अधिकारी होवून समाजाची सेवा करूण आंबेडकरी चळवळ पूढे न्यावीत.[2]

अशा प्रकारचे संस्कार वासनिक परिवारावर झाले होते. तसेच हा परिवार भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सुद्धा सक्रिय सहभागी झाला होता. 1942 च्या 'भारत छोडो' या आंदोलनात त्यांचा चुलत भाऊ कमल वासनिक हे शहीद झाले होते. तर त्यांचे दुसरे चुलत बंधू प्रेमनाथ वासनिक हे सुद्धा गोवा मुक्ती आंदोलनामध्ये सक्रिय सहभागी होते. तदनंतर, ते विधानपरिषदेवर निवडून गेलेत (MLA).देशभक्ती आणि समाजकार्याचे संस्कार असलेल्या परिवारात डॉक्टरांचे बालपण संस्कारीत होवू लागले होते. अशातच त्यांच्या वयाच्या 14 व्या वर्षी त्यांच्या वडिलांचे आकस्मित निधन झाले. परिवाराची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर येवून पडली. त्यावेळी सर्व दुःख पचवून आई कमलाबाई मोठ्या निर्धाराने उभ्या राहिल्या. मधुकर, रविंद्र आणि भरत या तीन मुलांच्या पालनपोषण आणि शिक्षणाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. सर्वांचे प्राथमिक शिक्षण भंडाऱ्यातच झाले. आर्थिक परिस्थिती अतिशय बेताची असल्यामुळे शिक्षणासाठी दूर जावू शकत नव्हते. परिवाराला अशा बिकट प्रसंगी आर्थिक हातभार लावता आला पाहिजे याची जाणीव वडिलबंधू असल्यामुळे डॉक्टर मधुकरराव वासनिक हे वयाच्या 19 व्या वर्षी मध्यप्रदेश मधील सागर येथे महार रेजिमेंट मध्ये काही महिण्यासाठी कामाला लागलेत.[3]

अतिशय प्रतिकुल परिस्थितीवर मात करून शिक्षणासाठी पैश्याची जूळवाजूळव करून गर्व्हमेंट सायन्स कॉलेज, नागपूर ला येवून इंटर पास केल्यानंतर त्यांनी गर्व्हमेंट मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. 1960 मध्ये त्यांनी M.B.B.S. वैद्यकिय पदवी प्राप्त केली व त्यानंतर 1965 मध्ये DCH ही पदवी संपादन केली. या सोबतच कायद्याचा सखोल अभ्यास करण्यासाठी त्यांनी L.L.B. आणि L.M.M. सोबतच लोकप्रसाशनामध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केली.[4]

**समर्पित वैद्यकिय सेवा :—**डॉ. मधुकरराव वासनिक यांनी M.B.B.S. ची वैद्यकिय पदवी प्राप्त केल्यानंतर नागपूरातील उत्तर विभागात वैद्यकिय सेवा प्रारंभ केली. वैद्यकिय क्षेत्रात गरूड झेप घेतल्यानंतरही त्यांनी आपल्या स्वभावात कोणताही अहंमभाव निर्माण होवू दिला नाही. उलट आपले पाय सदैव जमीनीवरच स्पर्श करतील याची ते काळजी घेत. त्यामुळे लवकरच त्यांची ख्याती व लोकप्रियता संपूर्ण परिसरात व समाजबांधवात वृद्धीगत होवू लागली. परिणामतः त्यांना आपल्या दवाखान्याच्या चार विभागात शाखा सुरू कराव्या लागल्यात. त्यांच्या स्वतःच्या राहत्या घरी इंदोरा चौक, गड्डीगोदाम आणि सदर अशा भागात त्यांची रूग्णेसेवा दिनरात्र अविरत सुरू असे.[5]

जायन्टस इंटरनॅशनल लायन्स क्लब व इतर सामाजीक संघटनांच्या वतीने आरोग्य शिबिरे आयोजीत केलेत. दीन—दलित गरिब रूग्णांना पैश्या अभावी अकाली मृत्यू येवू नये म्हणून त्यांनी मोफत तपासणी केली. औषधे दिली, मोफत रोगनिदान शिबिरे भरवली. माजी केंद्रीय स्वास्थ्य मंत्री सुशिला नायर यांना 1975 मध्ये पराभूत करून नागपूर मेडिकल फॅकल्टीचे डीन झाले. तेव्हा त्यांनी मेडिकल कॉलेजमध्ये सर्व प्रकारच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात. तेथील भ्रष्टाचार समाप्त करावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केलेत. वैद्यकिय सेवा ही सेवाधर्मी व्हावे. निव्वळ स्वार्थी धंदेवाईकपणा नसावा. यासाठी त्यांनी इमानदारी आणि प्रामाणिक वातावरण निर्मितीवर भर दिला.

वायू प्रदूषण संदर्भात प्रचार व जणजागृतीसाठी सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी त्यांनी नागपूरातील डॉक्टरांच्या चमूचा मोर्चा भिवंडीला आयोजीत करून मोर्चाचे सफल नेतृत्व केले. {MPCC (i)} कित्येकदा गंभीर आजारी रूग्णांना आपल्या स्वखर्चाने मेयो किंवा मेडिकलला नेऊन त्यांना भर्ती करीत असत. त्यांच्या या मनमिळावू, त्यागी स्वभाव व प्रचंड मेहनतीमूळे नागपूर विद्यापीठातील मेडिकल विभागात लोकप्रिय अधिष्ठाता म्हणून सुद्धा नावलौकिक प्राप्त केले.[6]

1976—77 मध्ये त्यांच्याच पूढाकाराने ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेडिकल असोसिएशन'' स्थापन झाले. तसेच पूर्वीचे मेयो हॉस्पिटल हे नागपूर महानगर पालिका चालवित होते. परंतु हे रूग्णालय महाराष्ट्र शासनाने चालवावे व लोकांना अत्याधुनिक सुविधा मिळाव्या यासाठी सातत्याने प्रयत्न करून ती मागणी पूर्णत्वास नेण्याचे महत्वपूर्ण कार्य यशस्वी केले.

बालरोगतज्ञ म्हणून त्यांनी बऱ्याच आरोग्य शिबिरांचे आयोजन केले होते. त्यांच्या या वाढत्या लोकप्रियतेमुळे 1970 च्या दशकात उत्तर नागपूरमध्ये सर्व सुविधा युक्त हॉस्पिटलची स्थापना करून श्रम मंत्री श्री. बाबू जगजीवनराय व मा. गृह राज्यमंत्री स्व. श्री. बाळासाहेब देसाई यांच्या हस्ते उद्घाटन केले. नागपूरातील इंदोरा विभागामध्ये असंघटीत अत्यल्प वेतनधारक श्रमिकांच्या तथा मोलकरीनचे काम करण्याऱ्या गोर—गरिब स्त्रियांच्या लहान मुलांसाठी 'बालविहार'ची स्थापना केली.[7]

**डॉ. मधुकरराव वासनिक यांचे राजकीय योगदान :** डॉ. मधुकर वासनिक यांच्या राजकीय जीवनाची सुरूवात सामाजिक क्षेत्रातून झाली आहे. राजकारण हे सेवेचं माध्यम असल्याचं ते मानतात. नागपूरच्या महानगरपालिकेपासून त्यांनी राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवले. नागपूरच्या माजी महापौरांना पराभूत करून 1986 मध्ये ते नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष होते. 1970 मध्ये निवडून येऊन स्थायी समितीचे अध्यक्ष बनले. ते सहा वर्षे नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष होते. 1977 मध्ये काँग्रेसचे विभाजन झाले. त्यावेळी त्यांनी इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस (इं) पक्षात प्रवेश केला. काँगेसचा विचार, इंदिराजी गांधी, राजीवजी गांधी आणि सोनियाजी गांधी यांचे स्वप्न जनसामान्यांपर्यंत नेण्यासाठी ते अहोरात्र कार्य करीत आहे. संघटनेच्या पातळीवरही त्यांनी महत्वपूर्ण पदे भूषवली. डॉक्टर साहेब नागपूर नगर काँग्रेस कमेटीचे उपाध्यक्ष (1977) होते. प्रदेष काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीसपदावरही (1983—85) त्यांनी महत्वपूर्ण कार्य केले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या काग्रकारिणीवरही ते सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांची या कार्यातील तडफदारी लक्षात घेऊन पक्षाने त्यांच्यावर विधानपरिषदेची जबाबदारी टाकली. डॉक्टर साहेब 1990 ते 1995 पर्यंत महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य होते. या कालावधीत त्यांची जे कार्य केले. जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी जे प्रयत्न केलेत ते थोडक्यात पुढील प्रमाणे.

**विदर्भ विकासाचे आंदोलन :–**

- विदर्भाचा विकास झालाच पाहिजे. उद्योगांचे प्रमाण M.I.D.C. मध्ये वाढले पाहिजेत.
- नागपूरला मिनी मंत्रालय ठेवा. अकोला कराराचे पालन करा. विदर्भ आणि मराठवाड्यासाठी तातडीने वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यात यावी.
- महाराष्ट्रातील दलितावरील अत्याचाराला प्रतिबंध बसविण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात अप्पर जिल्हाधिकारी हे पद निर्माण केले.
- बिडी मजूरांच्या समस्या.
- चैत्यभूमी स्मारक, दीक्षाभूमीचे जलद विकास करणे व त्याकरिता वाढीव निधी मंजूर करून घेतले.
- पोलीसांची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे. नक्सलाईट परिसरात 30 टक्के राखीव महिला पोलिसांची भरती करण्यात यावी. (04.12.1991)
- हिंगणा गोळीबारासाठी कारणीभूत कामगार आयुक्तावर कारवाई करणे. (08.08.1990)
- नागपूरातील मनोरमा बलात्कार हत्याकांडेचा तपास C.I.D. कडून काढून C.B.I. ला सोपविले. (14.07. 1994) 8 वर्षे प्रलंबित निकालाला त्वरीत न्याय मिळवून दिला.
- कळमेश्वर गोळीबार संदर्भात पर्यावरण पूरक आणि औद्योगिक प्रेरणादायक प्रस्ताव मांडणे व तो पारित करून घेणे.[8]

**पूरग्रस्तांना न्याय मिळाला,मोवाड पूरग्रस्तांचे पुनर्वसन :–**दिनांक 29 व 30 जुलै 1991 रोजी झालेला अतिवृष्टी व वर्धा नदीच्या पूरामूळे नागपूर विशेषतः मोवाड व नरखेड व अमरावती झालेली जीवीत हानी, लागवडीखाली जमीनीची हानी व वित्त हानी विचारात घेता आपादग्रस्त गावांचे व त्या गावांतील जनतेचे पुनर्वसनाचा प्रश्न नागपूरच्या अधिवेशनात दिनांक 28.12.1993 ला सरकारला निवेदन दिले. व दिनांक 25.11.1994 ला नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात दाखल करून सरकारला मोवाड–वरूडची सत्यस्थिती निदर्शनात आणून पुनर्वसन कार्य जोमात करण्यास भाग पाडून स्थानिक लोकांना न्याय मिळवून दिला.[9]

गोवारी हत्याकांड – मनुच्या चातुवर्ण समाजव्यवस्थेचा परिणामामुळे चेगराचेगेरीत 124 लोकांचा मृत्युमुखी पडलेल्या गोवारी बंधूंना 2 लाखाची नुकसान भरपाई देण्याची मागणी लावुन धरली[10]

**जागृत आमदार :–**विधान परिषदेत डॉ. मधुकरराव वासनिक यांनी विदर्भाच्या विकासाची वैद्यकिय आणि शैक्षणिक क्षेत्रातील भ्रष्ट्राचाराचे प्रश्न सातत्याने मांडले. विदर्भातील अनेक आमदारांना प्रश्नांची मांडणी करता येत नाही किंवा त्यांना प्रश्नांचे आकलन होत नाही असे म्हटल्या जाते. परंतु डॉ. मधुकरराव वासनिक यांची सदनातील कामगिरी या गैरसमजला छेद देणारी आहे. प्रत्येक प्रश्नांवर अभ्यासपूर्ण व पाटतिडकीने ते बोलतात. त्यावेळी सभापतीसह सारे सभागृह शांतपणे त्यांचे म्हणणे एकूण घेतात. या संदर्भात दैनिक लोकमत ने त्यांच्या गौरव जागृत आमदार "Hero ot the Day" म्हणून सुद्धा केलेला आहे. दिनांक 07.12.1995.[11]

मनोरमा हत्याकांड, मेडिकल कॉलज मधील भ्रष्ट्राचार, डाळ घोटाळा प्रकरण लावून धरून सरकारकडून न्याया मिळवून दिला.

**डॉ. मधुकरराव वासनिक यांचे शैक्षणिक योगदान :** डॉ. मधुकरराव वासनिक यांचे विशेष योगदान म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठामध्ये आचार्य पदवी प्राप्त करण्यासाठी महाविद्यालय मा. संशोधन तर महाराष्ट्रात सुद्धा केंद्राची मान्यता प्राप्त करून दिली आहे. त्यामुळे विदर्भातच नव्हे तर हे एकमेव महाविद्यालय आहे. ज्यामध्ये डॉ. आंबेडकर विचारधारा आणि पालि हे विषय B.A. तथा M-A. ला शिकविले जातात. संपूर्ण भारतात डॉ. आंबेडकर विचारधारा हा विषय सर्वप्रथम याच महाविद्यालयात डॉ. मधुकरराव वासनिक यांनी पालि विभूषण तथा माजी पालि विभाग प्रमुख डॉ. बालचंद खांडेकर सरांच्या सहकार्याने सुरू केला. जेणे करून विद्यापीठाच्या स्तरावरून डॉ. आंबेडकरांचे विचार वंचित समुहापर्यंत तळागळात पोहचतील आणि विद्यापीठ अभ्यासक्रमानुसार त्यांचे अध्ययन व पारायन होईल. तसेच या विषयात विद्यार्थ्यांना पदव्युत्तर उच्च संधोधन कार्य सुलभ व्हावे म्हणून डॉ. आंबेडकर विचारधारा अध्ययन केंद्र तथा पालि–प्राकृत अध्ययन केंद्राची मान्यता प्राप्त करून आचार्य पदवीच्या एकूण सहा विषयात संशोधक विद्यार्थ्यांना नवे दालन उपलब्ध करून दिल्यामुळे नागपूर विद्यापीठातील तमाम विद्यार्थी याच महाविद्यालयात आचार्य पदवी तथा उच्च संधोधनाचा लाभ घेतात.[12]

डॉक्टर साहेबांच्या जीवनशैलीत शिक्षणाला अधिक महत्वाचे स्थान आहे. त्यांनी ज्या कष्टाने शिक्षण मिळवून ध्येयाची शिखरं गाठली, तशीच शिखरं इतर समाजबांधवांनी सुद्धा पदाक्रांत करावी, अशी त्यांची इच्छा

आहे. शिक्षणामुळं माणूस घडतो, या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर त्यांचा ठाम विश्वास आहे. डॉक्टर साहेबांच्या नावामागे लागलेल्या पदव्या, त्यांची शिक्षणाबद्दलची आस्था प्रगट करायला पुरेश्या आहेत. डॉक्टरी व्यवसाय जोमान सुरू असताना, त्यांनी इंदोरा चौकात सर्व सोयींनी युक्त हॉस्पिटल बांधण्यासाठी जागा विकत घेतली होती. पण त्या जागेवर उत्तर नागपूरात दलित, मागासवर्गीय समाज राहतो. त्या भागात त्यांच्या शिक्षणाची गरज भागविणारे एकही महाविद्यालय नव्हते. म्हणून डॉ. आर. आर. भोळे, बलराज अहेर, डॉ. सनकाळे, वामनराव गेडाम इत्यादी सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी 1967 मध्ये पीपल्स वेलफेअर सोसायटीची स्थापना करून 1968 मध्ये पी. डब्ल्यु. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदोरा नागपूर तथा 1984 मध्ये इंदिरा गांधी कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर येथे स्थापन केलेत. त्यांनी महाविद्यालयासाठी जागा देणारे डॉक्टर 1995 पर्यंत किरायाच्या घरात राहिले. त्यांच्या या त्यागामुळे हजारो विद्यार्थ्यांना ज्ञानाची ज्ञानपोयी उपलब्ध झाली. नागपूरला इंडियन इन्स्टिट्युट ऑफ युथ वेलफेयर या संस्थेची स्थापना करून युवकांना समाजसेवेचे धडे देणारे केंद्र निर्माण केले. या संस्थेद्वारे वर्षभर शैक्षणिक प्रशिक्षणाद्वारे युवा नेतृत्व विकसीत करण्याचे कार्य सुरू आहे. भारतात या प्रकारचे कार्य करणारी ही एकमेव संस्था आहे. डॉ. वासनिक विधानपरिषदेचे सदस्य असतांना तत्कालीन भाजप–सेना युती सरकारने मागावर्गीयांना शैक्षणिक आरक्षणापासून वंचित करणारे 12 शासकीय आदेश काढले होते. या शासकीय आदेशांविरूद्ध डॉक्टरांनी विधानपरिषदेत अभ्यासपूर्ण भाषणे केली आणि ते शासकीय आदेश रद्द करायला सरकारला बाध्य केले.[13]

नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी मोलाचे कार्य केले. त्यांच्या कार्याची दखल घेतल्यामुळेच नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरूपदी त्यांची निवड करण्यासाठी अनेकदा चर्चा सुद्धा झाली होती. महाविद्यालय स्थापन करणे आणि ते उत्तम स्थितीत सुरू ठेवणे हे काम सहाव्या दशकात वंचित समूहातील तत्कालीन व्यक्तीकडून आर्थिकदृष्ट्या इतके सोपे नव्हते. परिस्थिती अतिशय प्रतिकुल होती. याला कारण म्हणजे उत्तर नागपूरची कुप्रसिद्ध 68 ची जातीय दंगल. या दंगलीमध्ये बरेच जीवीत व आर्थिक हानी बौद्ध तथा मुस्लिम समाजाला सहन करावी लागली होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाअंतर्गत B.A. आणि B.Com ची पदवी ते पदयुत्तर शिक्षण तथा M.C.V.C. अंतर्गत व्यवसायिक प्रशिक्षण सुद्धा विद्यार्थ्यांना या महाविद्यालयातून घेण्याची संधी प्राप्त झालेली आहे. या सोबतच B.C.A., B.A. तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (IGNOU) सुद्धा माहविद्यालयात संलग्न केल्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण अर्थवट सोडले आहे किंवा नौकरीमुळे अशक्य असलेल्यांना सुद्धा उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे.[14]

**महाराष्ट्रात आरोग्य विज्ञान विद्यापिठाची स्थापना :–**1993 मध्ये महाराष्ट्र राज्यात एकुण 36 मेडिकल कॉलेजेस होते. त्यापैकी 11 शासकिय व 25 खाजगी होती. हा वाढता पसारा लक्षात घेता यासाठी एक स्वतंत्र आरोग्य विद्यापीठ आंध्रप्रदेश, तामिळनाडू व हरियाणा राज्याच्या धर्तीवर असावे. म्हणून राज्य सरकारशी संपर्क साधून त्याची परिपूर्ण माहिती महाराष्ट्राचे तत्कालीन आरोग्य मंत्री सुश्री पुष्पाताई हिरे यांना सादर करून सदरहु विद्यापीठ राज्यात का स्थापन करण्यात येवू नये? म्हणून डॉ. मधुकरराव वासनिक यांनी सातत्याने पाठपूरावा केला. 27 जूलै 1993 पासून सलग 1994 पर्यंत विधानपरिषदेत प्रश्न मांडून हा प्रश्न लावून धरला. त्याचीच फलश्रुती म्हणून अखेर 1995 ला राज्यात आरोग्य विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय मान्य करण्यात आला. हे विद्यापीठ नागपूरला स्थापन व्हावे अशी डॉक्टरांची आंतरीक इच्छा होती. यासाठी त्यांनी सरकारकडे आपली मागणी लावून धरली. मोर्चे, धरणे, वृत्तपत्राच्या माध्यमातून लेख प्रसिद्ध करून नागपूर शहरातील मुख्य स्थळांच्या भिंती रंगवून जनमत जागृत करण्याचा प्रयत्न केला. परंतु डॉ. वासनिक या विद्यापीठ स्थापनेचे 'हिरो' बनतील या भितीपोटी सरकारने ओढून तानून नाशिकला स्थापन केले.[15]

**असाध्य एड्स आजारा विरोधी सरकार दरबारी लढा :–**डॉ. मधुकर वासनिक साहेब विधानपरिषद सभासद होते, तेव्हा त्यांनी विधान मंडळात प्रश्न उपस्थित करून निवेदन देवून एड्स विरोधी जनजागृती केली. तसेच यावर सरकारला आवश्यक खबरदारी युक्त उपाय सुचविलेत. यासोबतच हत्तीपाय रोगाची साथ 1993 मध्ये नागपूरला पसरली होती. जवळपास 50 टक्के रूग्ण प्राथमिक तपासणीत आढळून आली होती. यावर त्यांनी प्रश्न उपस्थित करून सरकारचे कान टोचले होते. परिणाम स्वरूप सरकारला याची दखल घ्यावी लागली आणि नागपूर जिल्ह्यात सात रात्रीचे चिकित्सालयांना मंजूरी देण्यात आली.[16]

**सामाजिक क्षेत्रातील कामगिरी :–**डॉक्टर साहेबांचा मूळ पिंड समाजसेवकाचा आहे. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. गांधी, यांच्या विचारातील समता, बंधुता आणि न्यायाच्या संकल्पना प्रत्यक्ष व्यवहारात, समाज जीवनात रूजल्या पाहिजेत. यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या जीवनातील अनेक निर्णय वरील मूल्यत्रयींच्या वर्तुळातूनच घेतले जातात. वैद्यकिय, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील त्यांची वाटचाल सामाजिक बांधिलकीच्या विचारानेच प्रभावित झालेली आहे. त्यांच्या अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक संघटनांशी निकटचा

सक्रिय संबंध आहे. आज संपूर्ण देशात दलित साहित्याची निर्मिती होत आहे. तथापि, महाराष्ट्रातील दलित साहित्यिकांना सन्मानाने विचारपीठ सर्वप्रथम डॉ. मधुकरराव वासनिक यांनी मिळवून दिले. या संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. म. ना. वानखेडे होते, तर उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक बाबुराव बागुल हे होते. डॉक्टर साहेबांनी स्वागताध्यक्षाची भूमिका पार पाडली. तथा 'निकाय' या मासिकाचे संपादनही केलेले आहे. बॅरि.राजाभाऊ खोब्रगडे,प्राचार्य म.ना.वानखेडे,बाबुराव बागुल,डॉ.गंगाधर पानतावने,दया पवार,डॉ.वि.भी.कोलते ,इलिनार झेलियट इ. भाग घेतला होता.साहित्य, कला क्षेत्र असो, की कामगारांचे प्रश्न असोत, डॉक्टर साहेबांचा नेहमीच पुढाकार असतो. महाराष्ट्र बिडी कामगार संघटनेचे ते जनरल सेक्रेटरी होते. त्यांचे भंडारा व नागपूर जिल्ह्यात या क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे.[17]

**राजकीय क्षेत्रातील कामगिरी :–**आजचे राजकारण गुंड, माफिया, समाजविरोधी तत्त्वांनी गजबजलेले आहे. अनिष्ट स्पर्धा, भ्रष्टाचार, अनितीमत्तेमुळे सुजाण, शिक्षित, सुसंस्कारित व्यक्तींना राजकारण नकोसे वाटायला लागते. अशा विपरित वातावरणात डॉ. मधुकर वासनिकांचे राजकारणात असणे आशादायी वाटते. त्यांच्या कार्याला अधिक गती मिळावी व त्यांच्याकडून विदर्भिय आंबेडकरी चळवळीत उत्तरोत्तर समाज सेवेची अशीच भर पडावी, समाजाची सेवा घडावी, यासाठी त्यांना दीर्घ आयुष्य व आरोग्य लाभो एवढीच प्रार्थना करतो

**<u>संदर्भग्रंथ सुची :–</u>**


1) बाबांचे शिलेदार, आंबेडकरी चळवळीचे सहकारी, सत्कार मंच, नागपूर, प्रथम आ. 2015, पान क्र. 49
2) प्रज्ञापथ – सुवर्ण महोत्सव (1968–2018), Dr. Madhukarrao Wasnik : A Visionary Ambedkar Politician and Educationalist – Dr- Sudesh Bhowate, Page No. 101.
3) कित्ता – पान क्र. 102
4) कित्ता – पान क्र. 103
5) डॉ. मधुकर वासनिक यांची विधान परिषदेत गाजलेली भाषणे (1990–95), प्राचार्य .अंबादास वानखेडे, पान क्र. 4
6) प्रज्ञापथ – सुवर्ण महोत्सव (1968–2018), पीपल्स वेलफेअर सोसायटी, नागपूर, दिनांक 29.10.2019, डॉ. मधुकरराव वासनिक, पी.डब्ल्यु.एस. कला वाणिज्य महाविद्यालय, प्रा. डॉ. भाऊ लोखंडे, पान क्र. 15
7) कित्ता – पान क्र. 16
8) डॉ. मधुकर वासनिक यांची विधान परिषदेत गाजलेली भाषने (1990–95) संपादन – प्रभाकर पावडे, 4 मार्च 2000, पान क्र. 20
9) कित्ता – पान क्र. 26
10) कित्ता – पान क्र. 27
11) कित्ता – पान क्र. 72
12) प्रज्ञा–पथ, सुवर्ण महोत्सव (1968–2018) पी.डब्ल्यू.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय एवं शैक्षणिक प्रेरणा केंद्र, प्रा. वासंती खांडेकर, पान क्र. 33
13) प्रज्ञा–पथ, सुवर्ण महोत्सव (1968–2018) उत्तर नागपूर की शैक्षणिक प्रगती में पी.डब्ल्यू.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय की भूमिका, डॉ. चंद्रशेखर पाटील, पान क्र.72.
14) प्रज्ञा–पथ, सुवर्ण महोत्सव (1968–2018) सुवर्ण महोत्सवाचा महामेरू : डॉ. मधुकरराव वासनिक, डॉ. सुशांत चिमणकर, पान क्र.54
15) डॉ. मधुकर वासनिक यांची विधान परिषदेत गाजलेली भाषने (1990–95) संपादन – प्रभाकर पावडे, 4 मार्च 2000, पान क्र. 33
16) कित्ता पान क्र. 35
17) कित्ता पान क्र. 71

# वामनराव गोडबोले यांचे धम्मदीक्षा सोहळयाचे वित्तीय व्यवस्थापन

नरेंद्र हे.सरोदे
अर्थशास्त्र विभाग (संशोधक विद्यार्थी )
डॉ.मधूकरराव वासनिक पी.डब्लू.एस कॉलेज
कामठी रोड, नागपूर

**सारांश** : वामनराव मोतीरामजी गोडबोले यांचा जन्म 1 जानेवारी 1922 नागपूरमधील सीताबर्डितील महारपुऱ्यात झाला. बुध्द जयंतीच्या कार्यक्रमात वामनरावांनी मोठया प्रमाणात आपला सहभाग नोंदवला. घरची आर्थीक परिस्थीती बरोबर नसतानाही चळवळीत काम करायला मागे पूढे पाहिले नाही. व सतत चळवळीत काम करित राहिले. हे सर्व करत असताना दोनदा घर सोडावयाची वेळ आली, वाटेल ते काम करायचे व राहायचे. मात्र चळवळीच्या कार्यात कधीच खंड पडू दिला नाही. अनेकदा चळवळीच्या कामासंबंधाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वामनदादाला दिल्ली,मुंबईला बोलावून घेतले. समता सैनिक दलात स्वयं स्फूर्तीने काम करून दलाच्या विकासात महत्वाची भूमिका बजावली तर विशेष प्रशिक्षित दिलेली सैनिकांची तूकडी निर्माण केले ज्याचे प्रत्यक्षात बाबासाहेबांनी तालीम बघीतली व प्रशंसा देखिल केली. भारतीय बौध्दजन समीती स्थापन करून सहा हजार सभासद त्याकरिता तयार केले. व त्यांचे पैसे मुख्य कार्यालयाला पाठवून दलित चळवळ सतत गतिशील ठेवली[1]

**शब्द संकेत :समता सैनिक दल,भारतीय बौद्धजन समिती,बुद्ध जयंतीचे आयोजन,धम्मदीक्षा सोहळयात सहभाग.**

**संशोधन पद्धती :** ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

प्रस्तावना :वामनराव गोडबोले हे मुळात फुटबाल खेळण्यात पटाईत होते. बाबासाहेबांच्या समता सैनिक दलाची बातमी त्यांच्या कानावर होती त्यामुळे त्यांनी सुध्दा नागपूर मध्ये समता सैनिक दलाच्या शाखा सुरू केल्या ऑफीसर ट्रेनीग सेंटर इमामवाडा, धरमपेठ, धंतोली, अजनी, सिरसपेठ, वकीलपेठ इत्यादी बऱ्याच ठिकाणी शाखा उघडल्यात. त्यांच्या शाखेचा ड्रेस खाकी हाफपॅट व खाकी हाफ शर्ट, पांढरे मोजे व काळे बुट असा होता. एकुण 1100 से सैनीक त्यांच्या दलात होते अशा प्रकारे ते आपल्या सैनिका मार्फत चळवळीसाठी लागणारी वर्गणी जमा करीत असत व ते डॉ. बाबासाहेबांना प्रत्येक्ष भेटी मध्ये देत असत. दिनांक 8 मे 1956 ला शासकीय आर्थीक मदत घेवून त्यांनी नागपूरातून बुध्द जयंती निमित्त भव्य मिरवणूक काढली यासाठी त्यांनी सरकार कडून 1200 रूपये अनुदार प्राप्त केले होते.

14 ऑक्टा. 1956 च्या धम्मदीक्षेच्या कार्यक्रमात तर त्यांनी अतिशय महत्वपूर्ण भूमिका बजावली. जागेच्या प्रश्नावरून वाद निर्माण झाला होता व जागा बदलण्याचे ठरले होते. परंतु वामनदादांनी दीक्षाभूमीचीच जागा ठेवण्यात यावी असे बाबासाहेबांना कळविले. व बाबासाहेबांनी ही तसे ऐकूण त्यांचीच बाजू घेवून त्या संबधीची तार बॅरिस्टर खोब्रागडे यांना पाठविली. बॅरीस्टर खोब्रागडे खूश होउन त्याना तसा निरोप वामन दादांना कळविला. पोटाची भूक भागविण्याची सोय नसतांनाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपला आदर्श मानून चळवळ सतत गतिशिल ठेवली. (2)

1955 ला वरळी येथे बौध्द जयंतीच्या विसर्जन सभेत बाबासाहेबांनी एक घोषणा केली. भगवान बुध्दांच्या धर्माशिवाय पर्याय नाही. ही बातमी वर्तमानपत्रात वाचल्याबरोबर ते बाबांना भेटायला मुबंईला गेले. बाबांची भेट घेतली. बाबसाहेब म्हणाले '' मी भारतीय बौध्द जन समिती स्थापन करीत आहे आणि वार्षिक 1 रू. सभासद शुल्क आहे. वामनरावंनी सांगितले, मी याआधीच बुध्ददूत सोसायटी काढलेली आहे. तेव्हा बाबासाहेब म्हणाले, बुध्ददूत सोसायटीचे रूपांतर भारतीय बौध्दजन समितीमध्ये करून कार्य करावे. त्यांनी सभासद बनवून शाखा चालविण्याचे आश्वासन दिले. नागपुरात बुध्द वंदनेचे पुस्तक भन्ते संघरक्षित यांनी दिले होते. त्याचे मराठीत अनुवाद मा. डो. पंचभाई यांनी केले. भारतीय बौध्दजन समिती स्थापना करून सहा हजार सभासद तयार केले. त्याचे पैसे मुख्य कार्यलयाला पाठविले व त्याची पावती रजिस्टर वर चिकटवून ठेवली. त्याचवेळी बुटी बिल्डिंग सीतबर्डी येथेही भारतीय बौध्दजन समितीचा बोर्ड लावून आवळे बाबू , रामरतन जानोरकर, पंजाबराव शंभरकर हेही समितीच्या नावाने कार्य करू लागले. याच काळामध्ये बाबांनी आपले घर सिध्दार्थ कॉलेजच्या

मुलांना राहण्यासाठी दिले होते. बाबासाहेब भगवान बुध्दांचे चित्र काढीत होते भगवान बुध्दाचे. बाबांना मी बौध्दजन समितीबद्दची माहीती दिली. त्यानंतर बाबांनी त्यांना 26 अलीपूर रोड, दिल्लीच्या बंगल्यावर बोलावले होते. ते जेव्हा पोहोचले तेव्हा बैठक सुरू होती. ते गॅरेजजवळ बसून होते. सभा संपल्यावर बाबांनी त्यांना बोलावून घेतले. बौध्द दीक्षा विधी त्यांना दाखविली 22 प्रतिज्ञा दाखविल्या. ते म्हणालेत यात काही विशेष नाही यावर बरीच चर्चा झाली. बाबासाहेब सगळेच एकाच वेळी दीक्षा घेऊ नका अगोदर तुम्ही दीक्षा घ्या, आणि मग तुम्ही स्त्री–पुरूष जनसमुदायस 22 प्रतिज्ञांनी दीक्षा म्हणजे एक बौध्द उपासक जे अबौध्द आहे त्यांना दीक्षा देऊ शकल्यामुळे कोणालाही हा अधिकार आपोआप येईल. (3)

14 ऑक्टोबर च्या दिवशी 40 बाय 20 बौध्द पध्दती नुसार सजावट केलेला स्टेज वर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माई साहेब सकाळी 9 वाजता उपस्थित झाले. बाबासाहेब व माई साहेब बुध्द मुर्ती कडे तोंड कडुन व हाथ जोडून भंते चंद्रमणी समोर उभे राहीले दोघांच्याही गळयात कमल पुष्प माला होत्या चंद्रमणी यांनी बाबासाहेब व माई साहेबांना दीक्षा दिली नंतर बाबासाहेब डायसवर आलेत आणि जनसमुदयास '' बंधु आणि भगिनींनो आम्ही दोघांनी ही तुमच्या समोर भंते चंद्रमणी कडून दीक्षा घेतलेली आहे आणि आत ज्या कोणाला आमच्या कडुन दीक्षा घ्याची असेल त्यांनी हाथ जोडून उभे व्हावे. मी जे म्हणेल ते सर्वांनी म्हणावे, मंचासमोर बसलेला अफाट जनसमुदाय उभा झाला. बाबासाहेबानी त्यांच्या कडुन 22 प्रतिज्ञा वदवून घेतल्या हा कार्यक्रम 1 तास चालला. या कार्यक्रमाचे फिल्म डिहीजनच्या वतीने हा कार्यक्रम चित्रीत करण्यात आला होता.

धम्मदीक्षा सोहळयासाठी त्यांनी वर्गणी द्वारे बरीच मोठी रक्कम संकलीत केली होती यासाठी त्यांनी 200 पुस्तके छापली होती प्रसाराकरिता हिंदी व इग्रजी मध्ये हॅडबील छापली होती. स्वयं सेवकाकरिता 5000 कार्ड छापण्यात आले होते बाहेरगावून येणाऱ्या दीक्षार्थीची नोंद घेण्याकरिता 36 रजिस्टर ठेवले होते. 3 ॲम्बेसिडर टॅक्सी ठरवण्यात आल्या होत्या लाऊड स्पिकरची व्यवस्था श्री. मोरे यांनी सांभाळली होती पिण्याच्या पाण्याचे 100 नळ लावण्यात आले होते. या कामामध्ये तत्कालील नगरसेवक श्री. फुलझेले यांनी मोलाचे सहकार्य केले होते. (4)

अशाप्रकारे वामनराव गोडबोले यांनी धम्मदीक्षेचा कार्यक्रम नागपूरा मध्ये घेण्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भाग पाडले आणि कार्यक्रम यशस्वी करून दाखविला. याला प्रमुख कारण म्हणजे गोडबोल यांचे संघठन कौशल्य आणि लोक वर्गणीतून जमा केलेला निधी होय. बाबासाहेबांच्या म्हणन्या प्रमाणे त्यांनी 13 मे 1957 ला पहीली बौध्द जयंती '' भारतीय बौध्द महासभे तर्फे नागपूर मध्ये आयोजीत केली. तसेच दिनांक 6 डिसेंबर 1960 ला त्यांनी अखिल भारतीय बौध्द कार्यकर्तो धम्म सम्मेंलन आयोजीत केले होते पाच दिवसीय हा कार्यक्रम होता. हया कार्यक्रमात मडके बुआ तथा तुकाराम, गणपत पाटील यांनी सुध्दा सहयोग केला होता. चिचोली या ठिकाणी 14 एकड च्या जागेत बौध्द विहार, संग्रहालय, लायब्ररी तयार करून बौध्द प्रशिक्षण केंद्र उभारून धम्म प्रचार आणि प्रसाराचे कार्य आजही केले जाते. अशा या शांतीवन परिसरात या कर्मठ बौध्द प्रिय बाबासाहेबांच्या शिष्याचे निधन दिनांक 27 मे 2006 ला झाले.

संदर्भ

(1) बाबांचे शिलेदार – प्रकाशक हंसराज भांगे, आंबेडकरी चळवळीचे सहकारी संस्कार मंच, नागपूर प्र. आ. 2015 पान नं. 111

(2) कित्ता – प्रकाशक हंसराज भांगे, आंबेडकरी चळवळीचे सहकारी संस्कार मंच, नागपूर प्र.आ. 2015 पान नं 116

(3) कित्ता ––– पानं नं 117

(4) कित्ता ––– पान नं 130

# एक कर्तृत्ववान नेतृत्व मा. नाशिकराव तिरपुडे साहेब

प्रा. असंगवज्र मैत्रेय
नागार्जून ट्रेनिंग इन्स्टीटयूट
नागलोक, नागपूर.

**सारांश :** मा. नाशिकराव तिरपुडे साहेब यांचे कार्य विदर्भापूर्तेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात ज्यांनी अस्पृश्योद्धाराचे स्मरनिय कार्य केले आहे. त्यांच्यातील धडाडी, सामाजीक प्रश्नांची जाण इत्यादी गोष्टी मुळे आयु. नाशिकराव तिरपुडे याना ओळखलें जाते ते अभ्यासु मंत्री, कुशल प्रशासक, नामवंत विधिमंडळपटू , समाज सुधारक आणि थोर शिक्षणतज्ञ होते. मजुरांच्या सम्मस्या बद्दल व त्यांच्या भवितव्या बद्दल कार्य करणारे नेते म्हणुन त्यांची जनसामाण्या मध्ये असनाने ओळख ही सामाण्य मानसाला देखील प्रभावित करणारी होती. सामाजिक आणि राजकिय प्रश्नांची त्यांना सखोल जान होती. महाराष्ट्र विधानमंडळातील अनेक खात्याची मंत्री पदे भूषविताना त्यांना अनेक मुलभुत स्वरुपाचे निर्णय घ्यावे लागले. धरणग्रस्तांसाठी घरबांधनी असो, झोपडपट्टी वासियांच्या पूर्नस्थापनेचा प्रश्न असो अथवा विद्यार्थ्यासाठी केलेल्या शैक्षिणिक सोयी सवलती असो अशा प्रत्येक निर्णयाच्या पाठीमागे त्यांची खंबीर मनोवृती दिसुन येते. मुळातच काही व्यक्ती सामाजिक जानीवेची वृत्ती घेवुन जन्माला येतात, त्यापैकिच स्वः नाशिकराव तिरपुडे होय.

**शब्दसंकेत :– बिडी कामगार,भिक्षा प्रतिबंधक विधेयक,मागासवर्गियांकरिताकार्य व शैक्षणिक कार्य**

**संशोधन पद्धती : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

प्रस्तावना : – स्वः नाषिकराव तिरपुडे यांचा जन्म भंडारा जिल्हयातील गणेशपूर येथे 16 जानेवारी 1921 रोजी झाला. नागपूर येथील मॉरिस कॉलेज मधुन त्यांनी 1942 साली पदवी प्राप्त केली. सुरवातीच्या काळात भंडारा येथेच वकिली केली. 1954 मध्ये सर्वप्रथम मध्यप्रदेशातील मंत्रीमंडळात उपमंत्री म्हणुन त्यांचा समावेश झाला. या नंतर त्यांच्या कडे क्रमशः गृहनिर्माण,आदिवासी कल्याण गृह व वने, पर्यटन इ. विभागाचे मंत्री म्हणून कार्यभार सोपवण्यात आला होता. अखिल भारतीय कॉग्रेसचे सरचिटणीस देखील होते. या शिवाय पत्रकारिता हा देखील त्यांच्या आपुलकिचा विषय होता.

**कार्य** :– सामाजिक , राजकिय , शैक्षणिक कार्य करताना अनेक चढ–उतार त्यांच्या वाटयाला आले पण ते डगमगले नाहीत. त्यांचे कार्य अविरत सुरुच होते.

**<u>1) बिडी कामगारांसाठींचे कार्य</u>** :–नागपूर तसेच मध्यप्रदेशातील बिडी कामगारांना त्यांनी 1947 ते 1950 या काळात संघटीत केले. त्यासाठी त्यांनी मोठे आंदोलन उभारले. य्यासाठी त्यांना कारावास देखील भोगावा लागला. शेवटी त्यांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या. व प्रथमच बिडी कामगारांचे वेतन निश्चित करण्यात आले. तसेच या व्यवसायात असणारी ठेकेदारी पद्धत बंद करण्याचे आवाहन देखील त्यांनी सरकारला केले. व 1959 साली ते स्वतः समाजकल्याण मंत्री असताना या उदयोगातील ठेकेदारी पद्धत बंद केली. व बिडी मजुरांना न्याय मीळवुन दिला. नागपूर,चंद्रपूर,बालाघाट,यवतमाळ या राज्यात त्यांनी दौरा केला. आणि सुमारे 3 लाख बिडी कामगारांना त्यांनी संघटीत केल्याचा हा परिणाम होता.

**<u>2) भिक्षा प्रतिबंधक विधेयकाची अमंलबजावणी</u>** :–भिक्षा प्रतिबंधक विधेयकाची प्रभावी अमंलबजावणी करण्याचा महत्वाचा निर्णय त्यांनी आपल्या मंत्रीपदाच्या काळात घेतला. यामागे तीन महत्वाचे उद्देश होते एक तयांना त्यापासुन पावावृत्त करणे, दुसरे त्यांना काम उपलब्ध करून देणे आणि तिसरे त्यांचे पूर्नवसन करणे. ज्यांना विशिष्ट रोगामुळे भीक मागाण्याची वेळ येते त्या रोगी महारोग, अंध, क्षयरोगी यांना वेगवेगळया बेगर्स मध्ये ठेवण्यात आले. व तयांच्या औषधोपचार व खाण्याची सोय करण्यात आली. या मोहीमेबद्दल विरोधी पक्षाने देखील त्यांची

प्रशंसा केली होती. या शिवाय एखाद्याला अंध,अपंग बनवुन भिकेला लावणे, त्यांच्या टोळया बनवुन धंदा करणे अशा टोळीवाल्यांचा बिमोड करण्यात आला. याचाच परिणाम म्हणुन 14 हजार चांगले उद्योगी बनले.

**3) मागासवर्गीय व दलितांसाठीचे कार्य** :—समाजातील अस्पृश्यता व मागासलेपणा च्या निर्मूलनासाठी आपल्या मंत्रीपदाच्या काळात त्यांनी अनेक महत्वपूर्ण बाबीनी अमंलबजावणी केली. व धडाडीचे निर्णय घेतले. नवीन समाज निर्मीतीच्या ध्येयाने प्रेरित होवुन अस्पृश्यता निवारणाचा कार्यक्रम त्यांच्याच प्रेरणेने हाती घेण्यात आला. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी अनेक प्रकारच्या शिष्यवृत्या, निशुल्क शिक्षण,वसतीगृहाची सोय इ. गोष्टी नाशिकराव तिरपुडे यांनी केल्या. सरकारी नोकऱ्यामंध्ये मागासवर्गीय नोकरांची टक्केवारी राखता यावी यासाठी किमान शैक्षणिक पात्रतेत सूट देण्याचे लोकसेवा आयोगाला निर्देश देण्यात आले याशिवाय मागासवर्गीयांसाठी धरेबांधणी , आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन, विविध अनूदान वाटप या सारख्या अनेक सुधारणा माननीय तिरपुडे च्या कार्यकालामध्ये त्यांनी करून घेतल्या. या पाठीमागे त्यांची दलीतवर्गा बद्दलची आस्था दिसुन येते. व या वर्गाला विकास प्रवाहात आणणे हा त्यांचा यामागचा प्राजंळ उद्देश्य होता.

**4) युगांतर शिक्षण संस्था** :—महाराष्ट्रातील नागपूर येथे कार्यरत असलेली युगांतर शिक्षण संस्था ही नाशिकराव तिरपुडेंच्या अंतर्गत विविध संस्था कार्यरत आहेत. त्यात प्राथमिक विद्यालये, मुलामुलींची वसतीगृहे, वरिष्ठ — कनिष्ठ महाविद्यालये, शिवणकला महाविद्यालये व आरोग्य सेवा ( दवाखाने व संशोधन केंद्रे) याचा समावेश होतो. आजच्या जलद इंटरनेटच्या काळाने देखील युगांतर आपली वाटचाल व आपले स्वतःचे स्वान टिकवुन आहे. नाशिकराव तिरपुडे यांनी लावलेल्या या रोपटयाचे आज एका विशालकाय वृक्षात झाले आहे.

सारांश

नाशिकराव तिरपुडे यांच्या अव्रिरत कार्यामुळे त्यांच्र्ूातील तेज कधीच लपले नाही. दलितांवर हजारो वर्ष झालेल्या अन्यायाची प्रतिक्रिया म्हणुनच कि काय त्यांच्या वृत्तीत एक कणखरपणा जाणवतो त्यांचे सामाजिक कार्य असले मंत्रीपदी असताना घेतलेले धडाडीचे निर्णय व त्याची अमंलबजावणी असेल किंवा त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य असेल जीवनाच्या प्रत्येकच क्षेत्रात त्यांच्या निश्चयीपणाचे दर्शन होते. मानवी कल्याणाचा सतत विचार करणारा एक नेता ज्याचा एकच ध्यास होता विदर्भ व महाराष्ट्राचा विकास विकासासाठी आवशक असणारी दुरदृष्टी त्यांच्यात होती. व त्याचबरोबर एक विचारी व सोज्वळ त्यक्तीमत्वाचे ते धनी होते हे त्यांच्या कार्यातून आपणास जाणवते अशा या युगंधराचा मृत्यू 19 में 2002 रोजी झाला.

**सदंर्भ सुची** :—


1) लोखंडे भाऊ — नागपूर त्रिशताब्दीय इतिहास परिषद — मा.त्रि.इ. परिषद प्राकाशन

2) महात्मे अनिल — विधिमंडळातील नाशिकराव तिरपुडे —युगांतर शिक्षण संस्था

3) नवभारत टाईम्स मुबंई — 1958 Evening News of India — 1957

4) कै. ठवरे — चरित्र आणि चारित्र्य

# विदर्भातील आंबेडकरी महिलांची विसाव्या शतकातील सामाजिक चळवळ

**प्रा. डॉ. टी. जी. गेडाम**
**प्राचार्य**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, सुरतोली लोहारा, जि. गोंदिया

**सारांश :–**विसाव्या शतकात विदर्भातही वर्णव्यवस्थेतून निर्माण झालेली जातिव्यवस्था कडक बनली होती. रुढी–परंपरा व ग्रंथप्रामाण्य यांना समाजात विशेष महत्व होते. यामुळे जातितिल लोकांना त्यांचा जाच सहन करावा लागे. त्यातही समाजात अतिशय निम्न दर्जा असलेल्या महिलांची स्थिती तर अतिशय दयनिय व करुणाजनक होती. या काळात आपल्या समाजातील महिलाही दोन भागात विभागल्या गेल्या होत्या. पहिला भाग उच्चवर्णीय महिलांचा तर दुसरा भाग निम्न वर्णातील महिलांचा. स्मृतींनी व धर्मग्रंथांनी लादलेली नानाप्रकारची बंधने उच्चवर्णातील महिलांना निमुटपणे मान्य करावी लागत. 'बाल विवाह, बालजरठ विवाह, बहुपत्नीत्व, विधवा केशवपन, विधवा विहाला बंदी, सतीप्रथा अशा अनेक अयोग्य परंपरा उच्चवर्णीय समाजात प्रचलित होत्या. उच्चवर्णीय महिलांना आचार विचारांचे कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. यामुळे महिलांची प्रगती खुंटली होती. डबक्यातील पाण्याप्रमाणे त्यांचे जीवन बणलेले होते."[1] एकंदरीत उच्चवर्णातील महिला या पुरुषांची मालमत्ता समजल्या जाऊ लागल्या होत्या. परंतु निम्न वर्णातील महिला किंवा आंबेडकरी समाजातील महिला या अशा दास्यातून काही प्रमाणात मुक्त होत्या. आंबेडकरी समाजातील महिला घटस्पोट घेऊ शकत होती व नंतर ती दुसऱ्या व्यक्तीसोबत विवाहसुद्धा करु शकत होती. आंबेडकरी महिलेला नवऱ्याच्या मृत्यूनंतर केशवपन करावे लागत नसे. आंबेडकरी समाजात सतीची चालही प्रचलित नव्हती. या समाजात बाल विवाहाची प्रथा मा होती. परंतु पुनर्विवाहाला मान्यता असल्यामुळे यातुन कोणतीही समस्या उद्भवत नव्हती. एकंदरीत आंबेडकरी महिलेला पुरुषांच्या बरोबरीचे स्वातंत्र्य नसले तरी उच्च वर्णीय महिलांसारखी सामाजिक व धार्मिक बंधनेही नव्हती. आंबेडकरी महिलेला पुरुषाबरोबरच घराबाहेर पडून उदरनिर्वाहासाठी सर्वच प्रकारची कामे करावी लागत. हे करताना तिचे शोषन होत असले तरी आंबेडकरी महिलेला आपल्या सामाजिक अधिकारांसाठी आंबेडकरी पुरुषांबरोबर फारसा संघर्ष करावा लागला नाही. कारण आंबेडकरी महिला व आंबेडकरी पुरुष या दोघांचेही सामाजिक प्रश्न सारखेच होते.

**शब्दसंकेत :–** वर्णव्यवस्था, आंबेडकरी चळवळ, महाड सत्याग्रह, धर्मांतर , महिला परिषद,

**संशोधन पद्धती** :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.

**विदर्भातील आंबेडकरी महिलांच्या चळवळीला प्रारंभ :** आंबेडकरी महिलांच्या चळवळीचा प्रारंभ प्रामुख्याने 1927 च्या महाड येथिल चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून झालेला दिसून येतो. त्या अगोदर 1920 ला नागपूर येथे झालेल्या बहिष्कृत परिषदेत महिलांची उपस्थिती होती. श्रीमती तुळसाबाई बंदसोडे व रुक्मिनीबाई यांनी आपल्या घरगुती भाषेत भाषणे देऊन मुलींना शिक्षण देण्यात यावे असा विचार मांडला होता. 1906 ला नागपूर येथे 'महार सभा' स्थापन झाली होती, त्या सभेच्या कार्यकारिणीत श्रीमती तुळसाबाई बंदसोडे या एकमेव महिला सदस्य होत्या हा काही अपवाद वगळला तर आंबेडकरी महिला सक्रीयपणे चळवळीत उतरल्या त्या 1927 च्या महाड सत्याग्रहापासूनच.

**महाड सत्याग्रहातील डॉ. आंबेडकरांचे प्रेरक भाषण :** दि. 27 डिसेंबर 1927 ला महाड परिषदेत बाबासाहेब आंबेडकरांनी तेथे उपस्थित असलेल्या महिलांना उद्देशून भाषण केले होते त्यात ते म्हणतात, 'घर प्रपंचाच्या अडचणी ज्याप्रमाणे स्त्री व पुरुष मिळून सोडवितात, त्याचप्रमाणे समाजाच्या अडचणीही स्त्री–पुरुषांनी मिळून सोडविल्या पाहिजे. फक्त पुरुषांनीच ते काम करायचे म्हटले तर खुप अवधी लागले, पण स्त्रियांनीही त्यांना सहकार्य केले तर यशप्राप्ती लवकर होईल. स्त्रियांनी यापुढे नेहमी परिषदेला हजर राहीले पाहिजे.' खरे तर अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न फक्त पुरुषांचाच नसून तुमचाही आहे. कारण तुम्ही पुरुषांना जन्म दिला. आम्हाला इतर लोक जनावरापेक्षाही कमी लेखतात. आमची सावली सुद्धा ते आपल्या अंगावर पडू देत नाही. आम्हाला कुठेही सन्मानाची नोकरी सुद्धा मिळत नाही. कायस्थ व इतर स्पृश्य बायांच्या पोटी जन्मलेल्या मुलात व तुमच्या पोटी जन्मलेल्या मुलात काय अंतर आहे. ब्राम्हणांच्या स्त्रियात जेवढे शील आहे. तेवढे शील तुमच्यातही आहे. त्याच्यात जेवढे पातिव्रत्य आहे. तेवढे तुमच्यातही आहे. मग तुमच्यापोटी जन्मलेल्या बालकांना सर्व ठिकाणी कां अपमानित केले जाते. याचा तुम्ही कधी विचार केला काय? जर विचार केला असता तर पुरुषांच्या आधी तुम्ही स्त्रियांनी सत्याग्रह केला असता. तुम्ही प्रतिज्ञा करा की, अशा कलंकित स्थितीत आम्ही यापुढे जगणार नाही. समाजोन्नती करण्याचा जसा पुरुषांनी निश्चय केला तसा तुम्हीही करा. सर्व जुन्या गलिच्छ चालीरिती सोडून द्या आपल्या काही चालीरितीवरुन आपण अस्पृश्य म्हणून चटकन ओळखले जातो. म्हणून ज्या गोष्टीमुळे लोक आपल्याला अस्पृश्य म्हणून ओळखतात त्या साऱ्या गोष्टी तुम्ही बंद करा. वरिष्ठ वर्गाच्या बाया ज्या पद्धतीने लुगडी नेसतात त्या पद्धतीने लुगडी नेसा. गळ्यामध्ये भाराभर गळसऱ्या व हातात कोपरभर कथलाच्या किंवा चांदीच्या गोठपाठल्या घालू नका. दागिण्याऐवजी चांगल्या कपड्यावर खर्च करा आणि दागिणा घालायचाच असेल तर तो सोन्याचा करुन घाला. नाहीतर घालू नका. मेलेल्या जनावरांचे मांस खाणे बंद करा. मुला–मुलींना शिक्षण द्या'

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या भाषणाचा महिला वर्गावर तात्काळ परिणाम झाला. हा परिणाम तेथे उपस्थित असलेल्या महिला वर्गापुरता मर्यादित राहीला नाही तर बाबासाहेबांचे हे भाषण सर्वच आंबेडकरी महिलांसाठी प्रेरणा देणारे ठरले. या भाषणामुळे

आंबेडकरी वर्गिय महिलांमध्ये प्रचंड जागृती घडून आली. आता ही आंबेडकरी महिला घरातून बाहेर पडून सार्वजनिक कार्यात सहभागी होऊ लागली. त्यांच्यात एक नवा आत्मविश्वास निर्माण झाला आणि हा आत्मविश्वासच आंबेडकरी महिलांच्या चळवळीत हुंकार ठरला.

**विदर्भातील आंबेडकरी महिलांच्या परिषदा :** कोणत्याही चळवळीला सुरुवात करायची असेल तर प्रथम संघटना बांधणे आवश्यक असते. डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणेमुळे यांच्या प्रेरणेमुळे आंबेडकरी महिलांमध्येही जागृती घडून आली. त्या संघटीत होऊ लागल्या व यातूनच त्यांचे संघटन आकाराला येऊ लागले. हळूहळू विदर्भात आंबेडकरी महिलांच्या लहान–मोठ्याा संघटना उभ्या राहिल्या.

'दि. 8 व 9 ऑगस्ट 1930 ला नागपूर येथे अखिल भारतीय दलित कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनातच आंबेडकरी महिलांची परिषद घेण्यात आली. या परिषदेचे अध्यक्षस्थान पुण्याच्या सौ. गुणाबाई गडेकर यांनी भुषविले होते. या परिषदेच्या स्वागताध्यक्षा अमरावतीच्या सौ. शेवंताबाई ओगले या होत्या. तर सेक्रेटरी सौ. तुळसाबाई बंदसोडे नागपूर या असून या परिषदेला असंख्य महिला उपस्थित होत्या.'दि. 28 मार्च 1934 ला मलकापूर येथे बुलढाणा जिल्ह्यातील अस्पृश्य महिलांची परिषद घेण्यात आली. परिषदेचे अध्यक्षस्थ्ज्ञान मिसेस कमलाबाई रेग यांनी भुषविले होते. या परिषदेत काही ठरावही पास करण्यात आले. त्या 1) अस्पृश्य मुलां–मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था सरकारी रिपोर्टप्रमाणे करणे. 2) शादरा बिलाची अंमलबजावणी करणे. 3) अस्पृश्यांच्या मुलां–मुलींना नार्मल स्कूलमध्ये जास्त सवलती देणे इत्यादींचा समावेश होता.एप्रिल 1934 ला तुमसर येथे अस्पृश्य महिलांची सभा सौ. सुभद्राबाई रामटेके यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सा सभेत सर्व महिलांनी आपापल्या मुलांना शिक्षणाची गोडी लागेल असे प्रयत्न करावे आणि आपणही थोडेफार शिक्षण घेण्याचा प्रयत्न करावा असा ठराव पास करण्यात आला.1 मार्च 1934 ला पाचपावली, नागपूर येथे नागपूर जिल्हा दलित महिला परिषद घेण्यात आली होती. सौ. भगिरथीबाई थोरात या परिषदेच्या अध्यक्षा होत्या या परिषदेत डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेला पाठिंबा देण्यात आला.[2]

दि. 24, 25 मे 1936 ला नागपूर येथे मध्यप्रांत वऱ्हाड येथिल अस्पृश्य विद्यार्थीनींचे संम्मेलन घेण्यात आले. या संम्मेलनाच्या स्वागताध्यक्षा सौ. यशोदाबाई डहाट ह्याा होत्या. या संम्मेलनात अस्पृश्य समाजातील मुली ज्या शिक्षण घेण्यासाठी वसतिगृहात होत्या त्या सर्व मुली उपस्थित होत्या. नागपूरात अंबाझरी रोडवर सौ. अंजनाबाई देशभ्रतार व त्यांचे पती कै. कृष्णराव देशभ्रतार यांनी हे वसतिगृह स्थापन केले होते. या संम्मेलनात विद्यार्थीनींचे संघटन व त्यांचे शिक्षण यावर विचार करण्यात आला. या संम्मेलनात अनेक महिलांनीही सहभाग घेतला होता.[3]

'दि. 20 एप्रिल 1940 ला उमरेड येथे उमरेड तालुका महिला परिषद घेण्यात आली. सौ. सुलोचना डोंगरे या परिषदेच्या अध्यक्षा होत्या. या परिषदेत महिलांचाही समता सैनिक दल स्थापन करावे. असेंब्लीत महिलांना राखीव जागा असाव्यात असे ठराव पास करण्यात आले.

या दरम्यान महिलांमध्ये फार मोठी सामाजिक जागृती घडून येत होती. आंबेडकरी महिलांच्या अनेक स्वतंत्र संघटना तयार होत होत्या. एवढेच नाही तर महिला, पुरुषांच्या संघटनामध्येही सहभागी होत होत्या. 6 एप्रिल 1934 ला बोरगांव जि. वर्धा येथिल अस्पृश्य परिषदेतही अनेक आंबेडकरी महिलांचा सहभाग होता. या परिषदेत स्त्री शिक्षणासाठी सवलती द्याव्यात, विवाह पद्धतीत सुधारणा घडवून आणावी असे ठराव घेण्यात आलेत. "8 नोव्हेंबर 1936 ला बडनेरा जि. अमरावती येथे वऱ्हाड कामदार महार परिषदेचे अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनात अनेक पुरुषांबरोबरच सौ. द्रोपदाबाई बनसोड, सौ. सोनाबाई शंभरकर, सौ. तुळसाबाई या महिलांचीही भाषणे झाली होती."[4]

**अस्पृश्य महिला सुधारक मंडळे :** 26 एप्रिल 1936 ला अस्पृश्य महिलांची सभा नागपूर येथिल इमामवाडा वस्तीत घेण्यात येऊन 'अस्पृश्य महिला सुधारक मंडळाची' स्थापना करण्यात आली, या सभेच्या अध्यक्षा सौ. जानकीबाई फुले ह्याा होत्या. अस्पृश्य महिलांमध्ये सुधारणा घडून याव्यात, त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहून आपली उन्नती घडवून आणावी, आपले अधिकार मिळविण्याचा प्रयत्न करावा हा या मंडळाचा उद्देश होता. मंडळाच्या अध्यक्ष म्हणून विरेंद्राबाई तिर्थकर यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षा सौ. अंजलीबाई देशभ्रतार व जनरल सेक्रेटरी सौ. राधाबाई कामळे ह्याा होत्या.1 जानेवारी 1938 ला धरमपेठ, नागपूर येथे श्रीमती सखुबाई मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्य महिलांची सभा घेण्यात आली. या सभेत श्रीमती रमाबाई आंबेडकर महिला संघ स्थापन करण्यात आला. या सभेत सौ. अंजलीबाई देशभ्रतार यांचे भाषण झाले. त्या म्हणाल्या, अस्पृश्य समाजातील स्त्रियांची सुधारणा व उन्नती करुन घ्यायची असेल तर आपल्याला स्वाभिमानाची व स्वावलंबनाची चळवळ सुरु करावी लागेल व समाजाचे निस्वार्थपणे कार्य करावे लागेल दुसरे कुणी येऊन आपली सुधारणा करतील ही आशा सोडून दिली पाहिजे.

2 नोव्हेंबर 1940 ला कामठी येथे अस्पृश्य महिलांची सभा घेण्यात आली. या सभेत 'भगिनी मंडळ' या संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेच्या अध्यक्षा सौ. भागाबाई मानवटकर व सेक्रेटरी सौ. जानकीबाई मानवटकर, सहसेक्रेटरी सौ. द्रोपदाबाई डहाट ह्याा होत्या.

ऑगस्ट 1936 ला कामठी नागपूर येथे 'अस्पृश्य सुधारक लग्न सहाय्यक मंडळ' स्थापन करण्यात आले. या संस्थेचे अध्यक्ष श्री. हरिप्रसाद माणके हे पुरुष असले तरी सहसेक्रेटरी सौ. अंजनाबाई देशभ्रतार व सदस्य विरेंद्राबाई तिर्थकर व सौ. द्रोपतीबाई साखरकर ह्याा होत्या.ही काही प्रमुख मंडळे होती, याशिवायही संपूर्ण विदर्भात अनेक लहान–मोठी मंडळे स्थापन झालेली होती. ठिक–ठिकाणी अस्पृश्य संघटित होऊन सामाजिक कार्य करु लागल्या होत्या. यातुनच त्यांना चळवळीचे भान प्राप्त झालेले होते. सुरुवातीला आंबेडकरी महिला अतिशय दुर्बल मानली जात होती. उदरनिर्वाहासाठी ती घराबाहेर पडून कुठेही कामासाठी जात असल्यामुळे तिच्या दुबळेपणाचा व असहाय्यतेचा फायदा घेऊन तिला फुस लावणे, बाटवणे, तिच्यावर जबरदस्ती करणे, छेडखाणी करणे, पळवून नेणे इत्यादी प्रकार नित्याचे झाले होते. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेमुळे अस्पृश्य समाजात जागृती घडून आल्यावर या स्त्री अत्याचारांचा सामना करण्याकरिता, विदर्भातील आंबेडकरी महिलांचे संरक्षण करुन त्यांना आत्मबल देण्याकरिता 'महार तरुण संघाने' पुढाकार घेतला होता. त्यांच्या या संघर्षामुळेच दलित महिलांवरील अन्याय–अत्याचार कमी झाले. या संघर्षात या तरुणांबरोबर काही महिलाही सामिल झाल्या होत्या.

1927 च्या डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वातील महाड सत्याग्रहात आंबेडकरी महिलांचा सहभाग तर होताच, पण त्यानंतरही डॉ. आंबेडकरांनी सुरु केलेल्या 1930 च्या काळाराम मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहातही आंबेडकरी समाजातील महिला सहभागी झाल्या होत्या. काळाराम मंदिर सत्याग्रहात सिताबाई, गीताबाई गायकवाड, रमाबाई गायकवाड, रमाबाई रायाजी जाधव, मातोश्री काळेबाई, मातोश्री रणखांबे, सौ. ताराबाई जवळकर, श्रीमती यमुनाबाई लोखंडे, ठकुबाई साळवे, सरुबाई भालेवार इत्यादी महिला सहभागी झाल्या होत्या. यातील बऱ्याच महिला विदर्भातील होत्या."[5]

1934 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येवले येथे धर्मांतराची घोषणा केली. या घोषणेचे पडसाद विदर्भातही उमटले. या घोषणेला समर्थन देण्यासाठी विदर्भात ठिक ठिकाणी सभा, संम्मेलने व परिषदा होऊ लागल्यात. यामध्ये आंबेडकरी महिलांची उपस्थिती मोठ्याा प्रमाणात असे. काही ठिकाणी तर महिला वक्त्या सहभागी होत व धर्मांतराच्या घोषणेला पाठिंबा दर्शवित.

श्रीमती जाईबाई चौधरी या त्या काळातील आंबेडकरी समाजातील समाजसेविका होत्या. "नागपूरातील मंगळवारी वस्तीत त्यांनी 1920 ला अस्पृश्य मुलींसाठी चोखामेळा कन्याशाळा काढली अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत त्यांनी महिला शिक्षणासाठी हे पाऊल उचलले होते. त्यांनी रात्रीच्या स्त्री शिक्षणाच्या शाळाही काढल्या व आंबेडकरी महिलांमध्ये मोठी जागृती निर्माण केली. त्या डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशनच्या सभासदही होत्या. त्यांनी 1922 पासून 1964 पर्यंत दलितोद्वाराचे कार्य केले."[6] जाईबाई बरोबर श्रीमती वेणुताई भटकर व तुळसाबाई बनसोड यांनी ही महत्वाचे कार्य केले.

**अखिल भारतीय आंबेडकरी महिला परिषद – 1942** दि. 18, 19, 20 जुलै 1942 ला नागपूर येथे अखिल भारतीय आंबेडकरी वर्गिय परिषदेचे अधिवेशन घेण्यात आले. "याच परिषदेत 20 जुलैला अखिल भारतीय दलित महिला परिषदेचे पहिले अधिवेशन घेण्यात आले. या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. या परिषदेच्या अध्यक्षा सौ. इंदिराबाई पाटील ह्याा होत्या. या परिषदेत सौ. जाईबाई चौधरी, सौ. राधाबाई कामळे, कु. प्रभावती रामटेके, कु. कांताबाई बडगे, कु. मंजुळा कानफाडे, कु लतीका गजभिये, कु. सुलोचना नाईक, कु. विरेन्द्राबाई तिर्थकर, कु. चंद्रभागा पाटील, कु. कौशल्या नंदेश्वर यांची भाषणे झालीत."[7]

या परिषदेचे वैशिष्ट म्हणजे ही आंबेडकरी महिलांची अखिल भारतीय स्तरावरील पहिलीच परिषद होती. या परिषदेला स्वतः डॉ. आंबेडकर उपस्थित राहून परिषदेचे अवलोकन करीत होते. परिषदेला 20 ते 25 हजार महिला उपस्थित होत्या. एवढ्याा प्रचंड संख्येने आंबेडकरी महिला प्रथमच उपस्थित झाल्यामुळे महिलांमध्ये किती जागृती घडून आली होती याचे ही परिषद प्रतिक होती. या परिषदेत डॉ. आंबेडकरांनीही छोटेसे भाषण केले होते. याच महिला परिषदेच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अ. भा. दलित वर्गीय परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. जी. टी. मेश्राम यांना दिल्लीवरुन 3 ऑगस्ट 1942 ला पत्र पाठविलेले होते. त्यात डॉ. आंबेडकर लिहितात, "मला अत्यंत प्रभावित केले ते महिला परिषदेने, मी महिलांचा पक्षपाती आहे आणि सामाजिक कार्यात त्यांनी अधिकाधिक भाग घेणे मला आवडेल. अधिवेशनात हजारोंच्या संख्येने महिलांनी उपस्थित राहणे हे दृष्यच इतके विलोभनिय होते की, देवादिकांनाही ते पाहण्याचा मोह व्हावा. त्यांचा पेहराव, त्यांचा नीटनिटकेपणा आणि ज्या संकलित आत्मविश्वासाने महिला परिषदेत वावरत होत्या, यामुळे तर माझ्या अंतःकरणाला विशेष हर्ष झाला."[8]

आंबेडकरी महिलांच्या संदर्भातील बाबासाहेबांचे हे मत आंबेडकरी महिलांमध्ये जी सामाजिक जागृती घडून आली होती त्याचे द्योतक होते. बाबासाहेबांच्या लढ्याने त्यांच्यात आत्मविश्वास आला, स्वाभिमान निर्माण झाला आणि त्या पुरुषांबरोबर सामाजिक कार्यात अग्रेसर होऊ लागल्यात.आंबेडकरी महिलांमध्ये प्रचंड सामाजिक परिवर्तन घडवून आणणारी एक घटणा म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर होय. 14 ऑक्टोबर 1956 ला डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करुन बौद्ध धम्माचा स्विकार केली व नंतर आपल्या लक्षावधी अनुयायांना स्वतः दीक्षा दिली या दीक्षा समारंभाला पुरुषांबरोबर महिलाही प्रचंड प्रमाणात उपस्थित होत्या. पांढऱ्या शुभ्र साड्याामधील त्यांची उपस्थिती विलोभनिय अशीच होती. या घटनेने आंबेडकरी महिलांच्या जीवनात प्रचंड बदल घडवून आणला.

त्यांनी आपल्या जुन्या सर्व रुढी–प्रथा आणि परंपरांचा त्याग केला. व्रत वैकल्ये सोडून दिलीत. स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या बौद्ध धम्माचा स्विकार केल्यामुळे त्यांच्यात एक नवे आत्मतेज निर्माण झाले व त्यांनी नव्या जोमाने स्वतःला चळवळीत झोकून दिले.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर दुसऱ्या वर्षी "2 ऑक्टोबर 1957 ला नागपूर येथे सायंकाळी 4:00 वाजता श्रीमती शांताबाई दाणी यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय दलित महिलांची जंगी परिषद घेण्यात आली. या परिषदेला सुमारे 6 लक्ष लोक उपस्थित होते. त्यात 3 लक्ष महिला होत्या."[9]

यानंतरही रिपब्लीकन पक्षाच्या नेतृत्वात जी–जी आंदोलने झालीत त्या–त्या आंदोलनात महिला पुरुषांच्या बरोबरीने सहभागी झाल्या होत्या. 1974 च्या भूमिहीनांच्या सत्याग्रहातही महिलांचा प्रचंड सहभाग होता. रिपब्लीकन पार्टीच्या गटा–तटाच्या राजकारणातही आंबेडकरी महिलांचा सहभाग असतोच. मराठवाड्यात नामांतराचे जे आंदोलन सुरु झाले होते. त्याचे लोन विदर्भातही पसरले. विदर्भातही अनेक ठिकाणी मोर्चे निघालेत त्यात महिलांची उपस्थिती डोळ्यात भरण्यासारखी असे.

**मूल्यमापन :–**धर्मांतरानंतर आंबेडकरी समाजातील महिलांच्या सामाजिक जीवनामध्ये फार मोठे स्थित्यंतर घडून आले आहे. त्यांचे आचार–विचार, सण–समारंभ, संस्कार पद्धती यात प्रचंड बदल झालेला दिसून येतो. आंबेडकरी महिलांमधील या बदलाची प्रेरकशक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत.डॉ. आंबेडकरांच्या विचारांमुळे आंबेडकरी महिलांमध्ये जागृती निर्माण होऊन त्यांनी आपल्या अधिकारांसाठी आंदोलन सुरु केले. आंबेडकरी चळवळीने प्रथमच आंबेडकरी महिलांच्या सामाजिक जीवनाची कोंडी फोडून त्यांना सार्वजनिक कार्यात खेचून आणले व आंबेडकरी महिला आंबेडकरी चळवळीचा एक हिस्सा बनल्या त्या महिलांच्या संघटना उभारु लागल्या, पदे भुषवू लागल्या वक्ता म्हणून भाषणे करु लागल्या, एवढेच नाही तर हातात लेखणी घेऊन लिहू लागल्यात. आंबेडकरी चळवळीतील काही थोड्याच महिला पतीच्या कार्यात साथ देण्यासाठी म्हणून चळवळीत उतरल्या होत्या. परंतु जास्तीत जास्त महिला या स्वेच्छेने चळवळीत सहभागी झाल्या होत्या. अशाही अनेक महिला होत्या की त्या कुटुंबातील परुषांच्या विरोधाला न जुमानता चळवळीत सहभागी झाल्या होत्या. काही महिला तर घरातही आणि समाजातही दोन्ही आघाड्यांवर आपल्या हक्कांसाठी संघर्ष करीत होत्या.आजची आंबेडकरी महिला सर्वच आघाड्यांवर अग्रेसर होत आहे. जीवनातील असे कोणतेही क्षेत्र नाही, त्या आंबेडकरी महिलांनी आपला ठसा उमटविला नाही, आपले कर्तृत्व सिद्ध केले नाही. त्यांच्या या कर्तृत्वामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रचंड उर्जा उभी आहे.

**संदर्भ सूची**

1)भिडे, जी. एल. व पाटील एन. डी., 'महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, जुलै 1998, पृ. क्र. 11.
2)डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड 18 वा, भाग 1ला, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र', साधने प्रकाशन समिती, उच्चव तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2002, पृ. क्र. 143, 144, 145.
3)कोसारे, एच. एल., 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास', ज्ञान प्रदिप प्रकाशन, नविशुक्रवारी, नागपूर, 1984, पृ. क्र. 455, 456.
4)सा. जनता, संपादक – भा. र. कद्रेकर, दि. 20 नोव्हेंबर 1937.
5)मून, मिनाक्षी, फुले आंबेडकरी स्त्री चळवळ, समता प्रकाशन, लष्करीबाग, नागपूर, प्र. आ. 2002, पृ. क्र. 95.
6)कोलारकर, श. गो., 'आधुनिक विदर्भाचा इतिहास', श्री. मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर, 2003, पृ. क्र. 420.
7)कोसारे, एच. एल., 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास', ज्ञान प्रदिप प्रकाशन, नविशुक्रवारी, नागपूर, 1984, पृ. क्र. 456.
8)कित्ता, पृ. क्र. 458.
9)पवार उर्मिला व मून मिनाक्षी, 'आम्हीही इतिहास घडविला', सुगावा प्रकाशन, पुणे, द्वि. आ. 8 मार्च 2000, पृ. क्र. 116.

# विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील कर्तबगार महिला

**प्रा. डॉ. प्रज्ञा बागडे**
विभागप्रमुख, अर्थशास्त्र
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस.
कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

**गोषवारा-**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेली सामाजिक समतेची, स्वातंत्र्य व बंधुत्वाची चळवळ सर्व स्तरापर्यंत पोहचविण्यासाठी आंबेडकरी जनता कटीबद्ध आहे. त्यातही आंबेडकरी चळवळीतील स्त्री ही स्वत:ची जबाबदारी समजून चळवळीत काम करीत आहे, आपले योगदान देत आहे. आंबेडकरी चळवळीतून ती स्वाभिमानी, स्वावलंबी व आत्मनिर्भर होतांना दिसत आहे तसेच सर्व क्षेत्रामध्ये तीने आघाडी घेण्याचा प्रयत्न चालविला आहे. मग ते साहित्याचे क्षेत्र असो, शैक्षणिक क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, सांस्कृतिक क्षेत्र किंवा आर्थिक क्षेत्र असो. १९७० पर्यंत विदर्भातील आंबेडकरी चळवळीत योगदान दिलेल्या स्त्रीयांमध्ये प्रामुख्याने जाईबाई चौधरी, अंजनीबाई देशभ्रतार, सुलोचनाबाई डोंगरे, सीताबाई गायकवाड, गीतीबाई पवार, किर्तीबाई पाटील, इंदिराबाई पाटील, नलीनीताई लढके, पारबताबाई मेश्राम, दमयंतीबाई देशभ्रतार, चंद्रिकाबाई रामटेके, गीताबाई भगत, सोनुबाई लांजेवार, सुगंधाताई शेंडे यांचे योगदान विशेष राहिले आहे. आज महिलासंबधी सर्वत्र चालू असलेल्या समाज परिवर्तनाच्या अनेक चळवळीचा पायाच या कर्तबगार महिलांनी घातला आहे. वरील महिला आंबेडकरी चळवळीच्या प्रत्यक्षयोद्धा राहिलेल्या आहेत. स्त्री शिक्षण व स्त्री सुधारणा हा महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वारसा यांनी पुढे चालविला होता. यांच्या अथक प्रयत्नांमुळेच आंबेडकरी चळवळीतील पुढच्या पीढ्यांतील महिलांना दिशा दिलेली आहे. समाजातील कोणत्याही स्त्रीवर अन्याय व अत्याचार झाल्यास त्याविरुद्ध संघर्ष करण्यात आंबेडकरी चळवळीतील स्त्रीया आघाडीवर असतात. असे असले तरी आजही ग्रामीण भागातली दलित स्त्री पाहिजे त्या प्रमाणात सक्षम झालेली दिसत नाही. म्हणून आजही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेली सामाजिक समतेची, स्वातंत्र्य व बंधुत्वाची चळवळ गतीशील ठेवून सर्व स्तरापर्यंत व प्रामुख्याने ग्रामीण भागात पोहचविण्याची गरज आहे. त्यासाठी नवीन पीढीतील महिलांनी चळवळीला हातभार लावण्याची एवढेच नव्हे तर चळवळीत सक्रीय सहभाग देण्याची गरज आहे.

**बीजशब्द -** ***चळवळ, योगदान, गुलामगीरी, बहिष्कृत, नेतृत्व, समाजसेवा, रुढी-परंपरा, आत्मसन्मान.***

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झालेल्या दलित मुक्ती आंदोलनाचा महत्वाचा कालखंड म्हणजे १९२७ चा महाडचा सत्याग्रह आणि १९५६ चे धर्मांतर. या काळातच बाबासाहेबांच्या विविध आंदोलनाला सहकार्य देत आपल्या घरादाराची पर्वा न करता कमरेला पदर खोचून अनेक महिला घराबाहेर पडल्या. वर्णव्यवस्थेने लादलेल्या गुलामीचे जोखड झुगारुन समतेच्या लढ्यात सामील झाल्या. त्या काळात चळवळीत भाग घेण्यासाठी स्त्रीयांचे मन वळविणे सोपे नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांनी वाढत्या संख्येने चळवळीत सहभागी व्हावे, अशी वेळोवेळी आव्हाने केलेली दिसतात.

दलित स्त्रीच्या जीवनाची झालेली कोंडी फुटण्यास आंबेडकरी चळवळीमुळे प्रथम सुरुवात झाली. स्त्रीया सभेत श्रोता म्हणून हजेरी लावू लागल्या. त्यापैकी काही धीटाईने भाषणे करु लागल्या. काही शिकलेल्या स्त्रीयांनी लेखनी हातात धरुन आपल्या आकांक्षा, दु:खे बोलून दाखविण्यास प्रारंभ केला. मोर्चे, मिरवणूका, सत्याग्रह, मोहिमा यात भाग घेऊन काहींनी त्यासाठी तुरुंगवासही सोसला. दमयंतीबाई देशभ्रतार, गीताबाई गायकवाड, शांताबाई दानी यांच्यासारख्या स्त्रीयांनी स्थानिक स्वराज्य तसेच विधानमंडळाच्या निवडणूकाही लढल्या. आज आंबेडकरी चळवळीतील अनेक स्त्रीयांचा स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये सकारात्मक सहभाग आढळून येतो. अनेक स्त्रीया सरपंच म्हणून, सभापती म्हणून तिरंगा फडकवितांना दिसून येतात. एकंदरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेद्वारे स्त्रीला प्रदान केलेल्या अधिकारांमुळे व आंबेडकरी आंदोलनातील महिलांच्या सक्रीय योगदानामुळे आजची आंबेडकरी समाजातील स्त्री प्रत्येक क्षेत्रात प्रवेश करुन आपला ठसा उमटवित आहे.

**शोध निबंधाचे उद्देश-** प्रस्तूत शोध निबंधाचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

१) आंबेडकरी चळवळीतील महिलांचे अध्ययन करणे.
२) आंबेडकरी चळवळीतील महिलांचे योगदान तपासणे.

**उपकल्पना-** १) आंबेडकरी चळवळीत स्त्रीयांचे योगदान आहे.वरील उद्देश व उपकल्पना घेऊन प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यात आला आहे. शोध निबंध लिहितांना विदर्भातील आंबेडकरी चळवळीत प्रत्यक्षपणे सक्रीय सहभाग असलेल्या स्त्रियांची निवड करण्यात आली. तसेच त्यांनी चळवळीत दिलेल्या योगदानाला अधोरेखीत करण्यात आले.

२० जुलै १९४२ साली नागपूरात बाबासाहेबांच्या नेतृत्वात दलित महिला परिषद भरली होती. त्याकाळी त्या परिषदेला २५ हजारहून अधिक महिलांनी हजेरी लावली होती. याच वर्षी दलित महिला फेडरेशनच्या कार्यकारणीपासून बऱ्याच महिला चळवळीत उतरल्या होत्या. त्यानंतर १९४६ चा पुणे करार सत्याग्रह, धर्मांतर व पुढे रिपब्लिकन पक्ष, भूमिहीनांचा सत्याग्रह, नामांतर यासारख्या आंदोलनातून महिला हिरीरीने पुढे आल्या. एकूणच आंबेडकरी चळवळीत महिलांचे काय योगदान राहीले आहे? याचे या ठिकाणी अध्ययन करण्यात आले आहे.

**१. जाईबाई चौधरी :** सवर्णांच्या शाळेत जिथे अस्पृश्य मुलांना बसण्याची सोय नव्हती तिथे मुलींची गोष्ट फार दुरची होती. त्यामुळे मुलींना शिकविण्याबाबत समाजात उदासिनता असणे स्वाभविक आहे. मुलींनी शिकावं ही तळमळ जाईबाई चौधरीच्या मनात होती. यादृष्टीने जाईबाई चौधरी यांनी नागपूर येथे अस्पृश्य मुलींसाठी १९२४ साली शाळा सुरु केली. एका अस्पृश्य स्त्रीने अशा प्रकारची शाळा सुरु करावी ही एक अभूतपूर्व अशी घटना होती. १९४५ च्या महिला फेडरेशनच्या त्या प्रमुख कार्यकर्त्या होत्या. प्रतिकुल परिस्थितीत कसा विजय मिळवावा याचा आदर्श जाईबाईंनी घालून दिला.

**२. अंजनीबाई देशभ्रतार :** 'आंबेडकर प्रकाश संघ' पाचपावली, नागपूर विभागातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती १० ते १४ एप्रिलपर्यंत साजरी करण्यात आली. त्यावेळी महिला परिषदेच्या अंजनीबाई देशभ्रतार ह्या होत्या आणि त्याप्रसंगी त्यांनी प्रबोधनपर भाषण केले. अंजनीबाई व कृष्णराव देशभ्रतार या दांपत्याने श्री संत चोखामेळा उर्फ अनाथ अस्पृश्य मुलींचे वसतीगृह सुरु केले. अशा विविध क्षेत्रात त्यांनी प्रत्यक्ष काम करुन बाबासाहेबांच्या चळवळीत सक्रीय सहभाग घेतला.

**३. सुलोचनाबाई डोंगरे :** सुलोचनाबाई डोंगरे यांनी नागपूर शहरातील गोकुळपेठ येथे नव्याने सुरु झालेल्या डिप्रेस्ड क्लॉसेस गर्ल्स होस्टेलमध्ये सुपीरटेंडचे काम केले. सासरे व पती दोघेही बाबासाहेबांच्या चळवळीत काम करीत असल्यामुळे त्यांच्यासोबत राहून सुलोचनाबाईंना सामाजिक कार्याची आवड उत्पन्न झाली. दलित समाजाच्या सभा—संम्मेलनास त्या हजर राहू लागल्या. वेळप्रसंगी भाषणेही देऊ लागल्या. भाषणात त्या आपले विचार अतिशय कणखरपणे स्पष्टरीत्या व्यक्त करीत व श्रोत्यांवर त्याचा प्रभाव पडत असे. परोपकारी, स्वाभिमानी वृत्तीच्या सुलोचनाबाईंमध्ये बाबासाहेबांच्या चळवळीमध्ये राहून प्रखर आत्मविश्वास निर्माण झाला होता. ही बाब बाबासाहेबांच्या कानावर होती म्हणून १९४२ मध्ये 'अखिल भारतीय महिला परिषद' नागपूर या अधिवेशनाचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले. या अधिवेशनात २० जुलै रोजी समस्त महिला वर्गासमोर त्यांनी उद्बोधक भाषण दिले. विशेष म्हणजे ह्या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत: हजर होते. सन १९४४ साली कानपूरला महिला अधिवेशनासाठीही गेल्या होत्या.

**४. राधाबाई कांबळे :** राधाबाई कांबळेंचे कर्तृत्व लक्षणीय होते. राधाबाई कांबळे ह्या अत्यंत बाणेदार, निडर वृत्तीच्या आणि धडाडीच्या कार्यकर्त्या होत्या. त्या स्वत: गिरणी कामगार होत्या. तेथील मजुरांच्या सभा, सत्याग्रह, संम्मेलने व मोर्चे इत्यादीत त्या नेहमीच आघाडीवर असत. त्यांनी बाबासाहेबांच्या झुंझार नेतृत्वाखाली मजूर संघटनेचे कार्य केले. दलित कामगारांवर हल्ले होत तेव्हा राधाबाई कांबळे या दलित स्त्री कामगारांचे नेतृत्व करु लागल्या. त्यांनी स्त्रीयांना तिखटाच्या पुड्या सोबत नेण्याचा आदेश दिला होता. हल्ला करणाऱ्यांवर ह्या स्त्रीया तिखटाचा वापर करीत. त्यामुळे स्त्रीयांना हात लावण्यास कुणी धजत नसत. त्या चौथी शिकलेल्या असूनही त्यांचे भाषण मात्र अत्यंत स्फूर्तीदायक व बोधप्रद असे. सन १९४९ मध्ये गिरणी कामगारांची मोठ्या प्रमाणात कपात झाल्यामुळे हजारो गिरणी कामगारांचे संसार उध्वस्त होऊ नये म्हणून त्यांनी सुमारे १०० मजूर स्त्रीयांचा एक मोर्चा नागपूर मंत्रालयावर नेला. या मोर्चाचे नेतृत्व राधाबाईंनी केले. राधाबाईंनी सचिवालयावर धडक मोर्चा घेऊन जाताच लेबर सेक्रेटरी श्री. बेन्हाड यांनी स्त्रीयांच्या तक्रारी नीट ऐकून घेतल्या व सहानुभूतीपूर्वक गिरणी कामगारांचा विचार केला जाईल असे आश्वासन दिले. इतकेच नव्हे तर नोकर कपात ताबडतोब थांबविण्यात आली होती.

**५. लक्ष्मीबाई नाईक :** सन १९२९ ला लक्ष्मीबाईंनी अमरावती येथे अस्पृश्य महिला समाजाची स्थापना केली. सन १९४२ ला शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या स्थापनेच्या वेळी लक्ष्मीबाई बाबासाहेबांना भेटल्या तेव्हा बाबासाहेबांनी त्यांना विचारले, 'तुम्ही शिकलेल्या आहात पुढे कोणते कार्य करणार?' लक्ष्मीबाईंनी ताबडतोब उत्तर दिले, 'आम्ही समाज सेवा करणार' ते ऐकून बाबासाहेबांना फार आनंद झाला होता. १४ ऑक्टोबर १९५६ ला त्यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली त्यानंतर त्यांच्या अंत:करणात नवीन शक्ती, स्फूर्ती उत्पन्न झाली. लक्ष्मीबाई बाबासाहेबांनी दाखवून दिलेल्या आत्मउन्नतीच्या, बौद्ध धम्म

प्रसार कार्याच्या मार्गाला लागल्या व शेवटी त्या भिक्षुणी बनल्या आणि गावोगावी बौद्ध धम्माचा प्रसार व प्रचार करीत राहिल्या.

**६. विरेंद्राबाई तीर्थंकर :** विरेंद्राबाईचे शिक्षण सातवीपर्यंत झाले होते त्यानंतर नार्मल स्कूलचे ट्रेनिंग घेऊन त्या शिक्षिका म्हणून नागपूर कॉर्पोरेशनच्या शाळेत नोकरी करु लागल्या. विरेंद्राबाईंनी जन्मभर अविवाहीत राहून अशिक्षित महार वस्तीतील मुलामुलींना एकत्र करुन शिक्षणाचे बीज त्यांच्या मनात पेरणे सुरु केले. तसेच इतरही वस्त्यावस्त्यात जाऊन शिक्षण व स्वच्छता यांचे धडे देऊ लागल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीसाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वाहून घेतले होते. सामाजिक कार्यासाठी आपले संपूर्ण जीवन वाहून घेणारी व त्यासाठी आजन्म अविवाहीत राहणारी विरेंद्राबाईसारखी महिला मिळणे कठीणच.

**७. रतीबाई पुराणिक :** रतीबाई विशेष सुशिक्षित नव्हत्या तरी त्या वाचनप्रीय व बहुश्रृत होत्या. सार्वजनिक चळवळीत त्या प्रामुख्याने भाग घेत असत. वर्धा येथे पहिली बहिष्कृत भारत भगिनी परिषद त्यांच्याच परिश्रमाने भरली होती. बहिष्कृत भारत, ब्राम्हणेत्तर, विजयी मराठा वगैरे पत्रांचा त्यांनी बहिष्कृत वर्गात प्रसार केला होता. देशभक्त जमनालाल बजाज यांनी आपले लक्ष्मीनारायणाचे देऊळ अस्पृश्य वर्गासाठी खुले केले. याचे श्रेयही काही अंशी रतीबाईंना जाते. सन १९११ साली त्यांना वैधव्य आले तेव्हापासून त्यांनी आपले आयुष्य समाजसेवेत घालवले.

**८. कीर्तीबाई पाटील :** सन १९४२ मध्ये अस्पृश्य वर्गातील मॅट्रिक झालेल्या त्या पहिल्याच महिला होत्या. त्यामुळे १९४२ च्या नागपूरच्या महिला परिषदेच्या स्वागत समितीत कीर्तीबाई स्वागताध्यक्ष होत्या. सन १९४५ ला मुंबईला दलित फेडरेशनच्या परिषदेला त्या आवर्जून हजर होत्या. बाबासाहेबांच्या सभा जेव्हा-जेव्हा नागपूरला होत तेव्हा-तेव्हा त्या आवर्जून सभेला हजर राहत. नामांतराच्या लढ्यात त्यांचे सक्रीय योगदान राहीले आहे. कीर्तीबाईंनी 'पॉल कॅरस' या लेखकाच्या 'दी गास्पेल ऑफ बुद्धा' या इंग्रजी पुस्तकाचे मराठीत भाषांतर केले आणि 'तथागताची सत्यगाथा' या नावाने ते प्रसिद्ध केले. त्याचप्रमाणे 'बौद्धांची जीवनचर्चा' व 'बौद्ध जिज्ञासा' नावांची आणखी दोन पुस्तके लिहिली व ती प्रकाशित झाली.

**९. इंदिराबाई पाटील :** इंदिराबाई पाटील यांचे घर म्हणजे समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींचा, येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांचा जणू अड्डाच बनलेला असे. सतत वर्दळ असायची. लहानपणापासूनच वडीलांचे बाबासाहेबांच्या चळवळीतील कार्य पाहून इंदिरांना जणू वारसा हक्काप्रमाणे समाजकार्याची ओढ लागली. पतीसुद्धा बाबासाहेबांच्या चळवळीतील कार्यकर्ते. अशारितीने सासर आणि माहेर बाबासाहेबांच्या चळवळीत गुंतलेले होते. म्हणूनच बाबासाहेबांच्या क्रांतीकारक चळवळीमध्ये त्याही सामिल झाल्या. २० जुलै १९४२ साली अखिल भारतीय अस्पृश्य महिला परिषदेचे पहिले अधिवेशन नागपूरला घेण्यात आले. त्या महिला परिषदेच्या जनरल सेक्रेटरी इंदिराबाई पाटील ह्या होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत: त्या परिषदेला हजर होते.

**१०. नलीनीताई लढके :** नलीनीताई लढके यांचे पती आनंदराव लढके डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालविलेल्या दलितोद्धाराच्या चळवळीचे सक्रीय कार्यकर्ते होते. रामराज्य परिषदेचे करपात्री महाराज महिला परिषदेमध्ये हिंदू कोडबील विरुद्ध प्रचाराचे भाषण करणार होते. ते विरोधात काय बोलतात हे ऐकण्यासाठी नलीनीताई गेल्या होत्या. करपात्री महाराजांच्या भाषणातील मुद्दे हिंदू कोडबीलासंबंधी नव्हते. तसेच आम्हाला कायद्याची गरज नाही. अशा अर्थाचे भाषण त्यांनी महिलांसमोर केले. नलीनीताईंनी तिथे बोलण्याची परवानगी मागितली व हिंदू कोडबिलामुळे स्त्रीयांना मिळणारी सुरक्षितता व करपात्री महाराजांच्या निवेदनाचा फोलपणा भाषणात स्पष्ट केला. सन १९७७ च्या ५ सप्टेंबरला 'माध्यमिक स्तरावरील आदर्श शिक्षिका' म्हणून त्यांना राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला. महाराष्ट्र शासनातर्फे सावित्रीबाई फुले ८६–८७ हा पुरस्कारही त्यांना मिळाला. नंतर त्या अनेक संस्थावर सदस्य, अध्यक्ष तसेच सेक्रेटरी राहील्या.

**११. दमयंती देशभ्रतार:** दमयंतीबाईचे आईवडील दोघेही बाबासाहेबांच्या चळवळीत होते. नेहमी सभा–मिटींगाना जात, समाजकार्यात भाग घेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याबद्दल घरात नेहमीच चर्चा असायची. पुढारी लोक जात–येत असत. अशा वातावरणात त्या वाढल्या. सन १९५३ साली सिद्धार्थ प्राथमिक संघात त्या सेक्रेटरी झाल्या. १९५६ साली धर्मांतर केल्यानंतर अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या संस्थेच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात त्या काम करु लागल्या. रिपब्किलन पक्षाची स्थापना त्यावेळी झाली. ऑल इंडिया रिपब्लिकन पार्टी नागपूर विभागाच्या त्या संघटक होत्या. नाशिकच्या शांताबाई दानी, विदर्भातील दयमंतीबाई यांनी महिला मंडळाच्या माध्यमातून संबध महाराष्ट्रभर धार्मिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि कामगार क्षेत्रात दौरा केला. मराठवाड्यात शिरसगाव येथे अस्पृश्य बायकांना नग्न करुन धींड काढण्यात आली. त्यावेळी १५–२० हजार महिलांचा त्यांनी नागपूरला मोर्चा काढला आणि शासनाकडे गुन्हेगारांना कडक शासन व्हावे अशी मागणी केली. सन १९६४ ला दादासाहेब गायकवाडांच्या नेतृत्वाखाली भूमिहीनांचा

सत्याग्रह झाला त्यावेळी दयमंतीबाई सत्याग्रहात होत्या. त्यांना १५ दिवसांची जेल झाली. झोपडपट्टीचे मोर्चा आंदोलन यशस्वी करण्यासाठी दयमंतीबाईंनी अनेक महिलांसह संघर्ष केला. सन १९६७ साली रिपब्लिकन पक्षातर्फे एम. एल. ए. साठी निवडणूक लढल्या. १९६९ ते १९७५ मध्ये महानगरपालिका नागपूरमध्ये कार्पोरेटर होत्या. १९८४ ला काँगेसतर्फे आमदार म्हणून निवडून आल्या. ४ जून १९८५ ला मंत्री झाल्या. नागपूरच्या नामांतर मोर्चात त्या आघाडीवर होत्या.

**१२. पारबताबाई मेश्राम :** पारबताबाईंना बाबासाहेबांचा मोठाच अभिमान वाटायचा. १० वर्षाच्या होत्या तेव्हापासूनच बाबासाहेबांच्या कार्यासाठी फिरायच्या. राधाबाई कांबळे यांच्या सोबत कधी–कधी सभेला तर कधी मोर्चात जायच्या. बाबासाहेब निवडणूकीला उभे राहिले तेव्हा वस्त्या–वस्त्यात, गावा–गावात प्रचारासाठी फिरल्या. त्या प्रचारासाठी गोंदिया, भंडारा, कामठी, इंदोरा येथे जाऊ लागल्या. १४ ऑक्टोबर १९५६ ला बुद्ध धम्माचा स्विकार केला. जुने देव–देवता घरातून काढून टाकले आणि बुद्ध धम्माच्या प्रसार प्रचारासाठी आयुष्य वाहून घेतले.

**१३. चंद्रिका रामटेके :** चंद्रिका रामटेके आई वडीलांच्या लाडात वाढलेल्या एकुलत्या एक. बाबासाहेबांच्या चळवळीत त्यांनी स्वत:ला सामील केले. एका निवडणूकीत रिपब्लिकन पक्षाला मतदान होऊ नये म्हणून मतदान करु देत नव्हते. जिकडे–तिकडे असंतोष पसरला होता. जाळपोळ सुरु झाली. त्याही मातीच्या तेलाची शिशी आणि माचिस घेऊन फिरत होत्या. आग लावून द्यायच्या, घर पेटलं म्हणून पळापळ व्हायची आणि तेवढ्या वेळात मतदान करायच्या. पोलीसांनी अटकाव केला तेव्हा 'खबरदार महिलांना मारल तर' असे त्यांना म्हटले होते. १९५६ नंतर चंद्रिकाबाईंनी खेड्यापाड्यात जाऊन बौद्ध धम्माचा प्रसार केला. भूमिहीनांच्या सत्याग्रहाच्या वेळी १०० वर महिला तुरुंगात गेल्या होत्या. बायांना एकत्रित करायचं काम चंद्रिकाबाईंच होतं. बौद्धांना सवलती मिळाल्या पाहिजेत या मागणीसाठी त्या दिल्लीला कुंभारे, गवई, दादासाहेब गायकवाडांसोबत गेल्या होत्या.

**१४. शुद्धमती बोंधाटे :** शुद्धमतीबाईंनी बाबासाहेबांच्या चळवळीत काम केले. त्या नेहमीच अग्रेसर राहील्या. नामांतराचा लढा असो, बौद्धांच्या सवलतीसाठी असो किंवा दलितांच्या अन्याय अत्याचारांचा निषेध करणारा असो, शुद्धमती पुढेच असायच्या. त्या बाबासाहेबांच्या चळवळीत लहानपणापासूनच भाग घ्यायच्या. दलित चळवळीची पाळेमुळे तेव्हापासूनच त्यांच्या रुजली होती. सन १९४२ च्या अखिल भारतीय महिला परिषदेला त्या हजर होत्या. या अधिवेशनानंतर ठिकठिकाणी बाबांच्या आदेशावरुन वस्त्या–वस्त्यात समता सैनिक दल स्थापन केले. बाबासाहेब ज्या वेळी नागपूरला यायचे त्यावेळी शुद्धमती उत्साहाने प्रत्येक कार्यात भाग घ्यायच्या. सन १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर व लाखो अनुयायांसोबतच शुद्धमतीने आपल्या आईवडीलांसोबत बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. सन १९८० सालापासून समता सैनिक दलाच्या महिला नागपूर विभागाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.

**१५. सोनूताई लांजेवार :** सोनूताईंचे वडील नेहमीच बाबासाहेबांचे नाव घ्यायचे, सभा–भाषणांना जायचे, चर्चा चालायच्या. वडील बाबासाहेबांचे कट्टर अनुयायी होते. सन १९५६ साली कुटुंबियांसोबत दीक्षा घेतली. सोनूताईंनी बाबासाहेबांना १९५२ साली पाहीले. त्यावेळी बाबासाहेबांचे भाषणही ऐकलं होतं. १९५६ साली १४ ऑक्टोबरला धर्मांतराच्या वेळेस त्या उपस्थित होत्या. त्यानंतर त्या भारतीय बौद्ध महासभा, नागपूर या संस्थेच्या विदर्भ विभागाच्या अध्यक्षा झाल्या. १९५६ नंतर त्या भारतीय बौद्ध महासभेच्या अध्यक्षा झाल्या.

**१६. सुधाताई रामटेके :** सुधाताई लहानपणीच समता सैनिक दलाच्या तुकडीत सामिल झाल्या होत्या. सत्याग्रह, धरणे, मोर्चा आदी आंदोलनात तर आघाडीवरच होत्या. लढाऊवृत्ती लहानपणापासूनच होती. सन १९४२ साली संपूर्ण देशभर ब्रिटीशांच्या विरोधात भारत छोडो आंदोलनाची नांदी सुरु होती. त्यावेळी बाबासाहेबांनी 'डिप्रेस्ड क्लासेस' नावाची संस्था स्थापन केली होती. त्यावेळी आंदोलनातील विचार विनिमयात सुधाताईंनी भाग घेतला होता. या संस्थेचे पहिले अधिवेशन १९४२ मध्ये जुलै महिण्यात नागपूरला झाले. या अधिवेशनात महिलांचेही अधिवेशन भरविण्यात आले त्यावेळी बाबासाहेबांच्या हस्ते महिला मंडळाची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये सुधाताई सहसचिव होत्या. १९५६ ला धम्मदिक्षा समारंभ नागपूरला झाला त्यावेळी अनेक स्त्रीयांनी लोकांना खाद्य पुरविले त्यात सुधाताई सुद्धा होत्या. नामांतर मोर्च्याची आठवण सांगतांना त्या म्हणाल्या होत्या, 'नोकरी करणाऱ्या स्त्रीयांना समाजकार्यासाठी फार वेळ देता येत नाही तरीही सामाजिक बांधिलकीची जाणीव त्यांनी ठेवावी'.

**१७. सुगंधाताई शेंडे :** सुगंधाताई शेंडे या दलित समाजातील पहिल्या पीढीतील आघाडीच्या समाजसेविका, महाराष्ट्रातील अग्रगण्य लेखिका, प्रसिद्ध शिक्षणतज्ञ, आदर्शवादी विचारवंत व तत्वज्ञ म्हणून ओळखल्या जातात. महाराष्ट्रातील पददलित स्त्रीयांमधील पहिल्या मॅट्रिक उत्तीर्ण, पहिल्या पदवीधर, पहिल्या साहित्यिक, पहिल्या राजपत्रीत स्त्री अधिकारी होण्याचा मान सुगंधाताईंना जातो. शासनाने सावित्रीबाई पुरस्कार व दलित मित्र राज्य पुरस्कारने त्यांचा सन्मान केला आहे. पहिले बौद्ध साहित्य संमेलन नागपूर येथे आयोजित करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. भंडारा येथिल बौद्ध साहित्य संमेलनाचे

अध्यक्षपद त्यांनी भूषविले. 'आपले बाबा' हे बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र लहान मुलांना समजेल आशा सोप्या व आकर्षक भाषेत सर्वप्रथम लिहिण्याचे श्रेय सुगंधाताईंना जाते.

बाबासाहेबांनी बौद्ध धम्म स्विकारण्याचा निर्णय कसा व का घेतला इथपासून तो प्रत्यक्ष समारंभाचे आयोजन करण्यात कोणाचा, कसा सहभाग होता, प्रत्यक्ष सोहळा कसा पार पडला याचे सांगोपांग अभ्यासपूर्ण विश्लेषण 'बाबासाहेबांची धम्मदिक्षा' या त्यांच्या पुस्तकात सुगंधाताईंनी केले आहे.

**१८. द्रौपदाबाई रामटेके :** विदर्भातील एक जेष्ठ महिला कार्यकर्ती बहुजन समाजाच्या क्रियाशील व धडाडीच्या स्त्री नेत्या म्हणजे द्रौपदाबाई रामटेके. बाबासाहेबांच्या नागपूरला आगमनाच्या स्मृती जतन करुन त्यांनी त्यावर एक पुस्तक लिहिले या पुस्तकातून बऱ्याच महिलांनी प्रेरणा घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीत सामील झालेल्या महिलांचा त्यांनी नामांतराच्या पहिल्या वर्धापनदिनी सत्कार करुन त्यांच्या कार्याची दखल घेतली. टेका नाका, सिद्धार्थ नगरमध्ये बौद्ध, दलित व मुस्लीम समाजांमध्ये झालेल्या दंगलीत जो भेदभाव करण्यात आला त्याला वाचा फोडून त्यांनी दलीत व बौद्धांना न्याय मिळवून दिला.

**१९. मिनाक्षीताई मून :** मिनाक्षीताई मून मुळात गृहिणी परंतु घरचे वातावरण आंबेडकरी चळवळीचे. घरातच असलेले वाचनालय, सतत चर्चा, साहित्य संमेलनातील उपस्थिती या सगळ्यांचा परिणाम होऊन काहीतरी करण्याची जीद्द त्यांच्यात निर्माण झाली. बौद्ध धम्माचा अभ्यास करुन बौद्ध धम्मातील 'आदर्श भिक्षुनी' हे संशोधनात्मक पुस्तक त्यांनी ललीत स्वरुपात लिहिले. उर्मिला पवार यांच्या सोबत परिश्रमपूर्वक फिरुन मुलाखती गोळा करुन त्यांनी आम्ही इतिहास घडविला हा महिलांच्या संघर्षाचा ऐतिहासिक दस्तावेज तयार केला. 'आम्ही मैतरनी' या मासिकाच्या त्या संपादिका होत्या.

**२०. भिक्षुणी चंद्रशीला - :** सन १९५६ साली त्यांनी नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. तेव्हापासून त्या भारतीय बौद्ध महासभेचं कार्य करु लागल्या. १९५६ नंतर रिपब्लिकन पक्षाचे कार्य त्यांनी केले. १९६७ साली पक्षाचा राजीनामा देऊन पीतवस्त्र धारण केले. अर्थात भिक्षुणी झाल्या.

**निष्कर्ष-** अध्ययनाच्या अंती निष्कर्ष रुपाने असे आढळून येते की, समाज सुधारकांच्या व विशेषत: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेद्वारा स्त्रीला प्रदान केलेल्या समता, स्वातंत्र्य व अधिकारामुळेच आंबेडकरी स्त्री सर्व क्षेत्रात आपला ठसा उमटवित आहे. आंबेडकरी चळवळीतील स्त्रीयांनी अन्याय, अत्याचाराविरोधात अनेकदा आवाज उठविले आहेत. स्त्रीयांच्या रोजगाराच्या प्रश्नापासून ते स्त्रीयांच्या कल्याणकारी योजनांपर्यत त्यांनी मजल मारली आहे. एवढेच नाही तर ग्रामीण भागातील आंबेडकरी चळवळीतील स्त्री सरपंच म्हणून किंवा सभापती म्हणून तिरंगा फडकवितांना दिसून येतात. कोणत्याही समाजातील स्त्रीवर अन्याय व अत्याचार झाल्यास त्या विरुद्ध संघर्ष करण्यात आंबेडकरी चळवळीतील स्त्रीयाच आघाडीवर दिसतात. यावरुन शोध निबंधाची उपकल्पना 'आंबेडकरी चळवळीत स्त्रीयांचे योगदान आहे' ही ह्या ठिकाणी खरी ठरलेली दिसत आहे.

आजची आंबेडकरी चळवळीतील महिला काम करतांना जुन्या पीढीतील महिलांना आपला आदर्श मानीत आहेत. चळवळीत सहभागी होऊन समाजातील दु:खावर व प्रश्नांवर विचार व चिंतन करतांना दिसत आहे तसेच अंधश्रद्धा, रुढी परंपरा यापासून त्या दूर होत आहेत. विज्ञाननिष्ठ विचार करुन बुद्धीच्या कसोटीवर उतरणाऱ्या प्रश्नांचा उहापोह करतांना व समाधान शोधतांनाही दिसत आहेत.

**संदर्भ सूची-**

१)मून, वसंत (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धम्मप्रवास, मनोविकास प्रकाशन, मुंबई, १९८९.
२)मुक्तीगाथा, स्मरणिका, धम्म महिला परिषद, सप्टेंबर, २००४.
३)दैनिक तरुण भारत, (धम्मचक्र प्रवर्तन विशेषांक) गुरुवार, ६ ऑक्टोबर २०११.
४)लोकराज्य, धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक, ऑक्टोबर, २००६.
५)दै. सकाळ, दिक्षा विशेषांक, २०१२.
६)दै. सकाळ, दिक्षा विशेषांक, २०१३.

# विदर्भातील आंबेडकरी चळवळीत महिलांचे योगदान

**डॉ. सुजाता गौरखेडे**
सहा. प्राध्यपक
उम्मे सलमा गर्ल्स महाविद्यालय, नागपूर

**सारांश :** महाराष्ट्रात अस्पृश्यता निवारणाचे काम 12 व्या शतकापासून सुरू झाले त्यामुळे महाराष्ट्राला सामाजिक सुधारणेचे अग्रदूत म्हटल्या जाते. पण पाहिजे तसा बदल अस्पृश्यांच्या बाबत झाल्याचे दिसून आले नाही. अस्पृश्यांच्या सुधारणे करीता महत्वाचे कार्य महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी महाराष्ट्रात पहिली अस्पृश्यांची शाळा सुरु करून करण्याचा प्रयत्न केला. त्याला हातभार लावण्याचे काम कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात अस्पृश्यांना शासकीय नोकरीत 50 टक्के आरक्षण देऊन अस्पृश्यता निवारणाचा प्रयत्न केला. पण महाराष्ट्रात त्याकाळात जातीव्यवस्थेचा प्रभाव ऐवढा होता की त्यामुळे जेवढा बदल व्हायला पाहिजे होता तेवढा होऊ शकला नाही. संपुर्ण महाराष्ट्रातील चळवळी पैक्षा विदर्भातील चळवळ येथील सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थिती दलित चळवळीस अनुकूल व पोषक असल्याने ती स्वतंत्र व मजबुत होऊ शकली हे काही निरीक्षणांवरून मला लक्षात आले. विदर्भात महार जातीचे अधिक्य असून ही जात प्रगतीची तळमळ बाळगणारी कष्टिक मेहनती होती. या जातीचे काही लोक हे सधन शेतकरी, प्रगतिशील व्यापारी, सावकार आणि मालगुजार होते उदा. उदाहरणातः बॅरिस्टर राजभाऊ खोब्रागडे यांचे वंशज चंद्रपूर येथील मालगुजार असल्याच्या नोंदी आहेत. विदर्भातील दलित चळवळीला सशक्त करण्यास जर कोणती गोष्ट जवाबदार असेल तर ती म्हणजे येथील दलितांच्या लोकसंख्याचे अधिक प्रमाण हे होते. विदर्भातील दलित चळवळीचे विशेष हे की येथे दलित महिलांचे नेतृत्व पाहावयास मिळते. विदर्भातील महिलांनी दलित चळवळीत केवळ भागच घेतला नाही तर दलित चळवळीचे नेतृत्वसुद्धा केले. या चळवळीचे खास वैशिष्टय असे की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्पृश्य उद्धार चळवळीत महिलांच्या मनात बाबासाहेबांविषयी कोणतेही मतभेद नव्हते. उलट विदर्भातील महिलांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि कार्य जनसामान्यात रूजविण्याची महत्वाची भुमिका बजावली. या महिलांमध्ये प्रामुख्यांने तुळसाबाई किसन बनसोडे, जाईबाई चौधरी, अंजनाबाई देशभ्रतार, भागरथीबाई नंदेश्वर, वीरेंद्राबाई तीर्थंकर, कौसल्याबाई नंदेश्वर, कीर्तीबाई पाटील, इंदिराबाई पाटील, सुधाताई पाटील, राधाबाई कांबळे इत्यादी.

**शब्द संकेत :विदर्भातील स्त्री शिक्षण, बहिष्कृत भारत भगिनी परिषद, 1930, 1932, 1933 महिला परिषदा आणि विदर्भात दलित महिलांच्या सभा**

**संशोधन पद्धती : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलेब करण्यात आलेला आहे.**

**विदर्भात स्त्री शिक्षणाला सुरूवातः**''स्त्री शुद्रौ नाधीयता मिमिश्रुतिः'' असे स्मृतिवचन आहे. या वचनाप्रमाणे स्त्रियांनी व शुद्रांनी वेदाध्ययन करू नये असे बंधन हिंदु धर्माने घातले होते. त्यामुळे सवर्ण हिंदु स्त्री व दलित स्त्री यांचा शिक्षणाचा दर्जा समान पातळीवरचा होता. जितकी दलित स्त्री मागसलेली व अज्ञानी होती तितकीच एकंदर हिंदु स्त्री शिक्षणाचा बाबतीत मागे होती. भारतात इंग्रजांचा आगमनापासून आधुनिक शिक्षणाला सुरूवात झाली. यातून आगरकर, लोकहितवादी, रानडे यासारखे समाजसुधारक महाराष्ट्रात उदयास आले पण यांचा कल सवर्ण वर्गाकडेच होता. दलित उद्धार चळवळीचे जनक महात्मा ज्योतीबा फुले यांनी दलित स्त्री वर्गाला सुशिक्षित होण्याकरीता 19 व्या शतकाच्या मध्ये स्वतः शाळा स्थापन केली. विठ्ठल रामजी शिंदे यांनी महाराष्ट्रात तसेच विदर्भात अस्पृश्य मुलींच्या शाळा स्थापन करून त्यांच्या शिक्षणाला प्रामुख्याने प्रोत्साहन दिले.[1]

दलित स्त्रिचा दलित समाजाच्या अंतर्गत असलेला सामाजिक दर्जा हा समान पातळीवर होता ही बाबा लक्षात घेता दलित स्त्रिला स्वतःच्या सामाजिक दास्यत्वाच्या मुक्तीची चळवळ स्वतंत्रपणे उभारण्याची गरज मुळीच भासली नाही. दलित स्त्री व पुरूष यांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय प्रश्न एकच असल्यामुळे दलित समाजाच्या सर्वव्यापक उत्थानाच्या चळवळीत दलित स्त्री समरस व सहभागी होऊ शकली. दलित समाजाच्या उद्धारासाठी नागपूरला 1906 मध्ये 'महार सभा' स्थापन करण्यात आली होती. महार सभेचे अध्यक्ष विठोबा रावजी मून पांडे हे होते. 1914 मध्ये महार सभेच्या सदस्यांची संख्या 64 झाली. या 'महार सभेत' स्त्री सभासदांपैकी श्रीमती तुळसाबाई बनसोडे या

सभासद होत्या. दलित समाजाला शिक्षणाची संधी व सवलत जसजशी उपलब्ध झाले त्यानुसार मुलीच्या शिक्षणाचे प्रमाण विदर्भात वाढल्याचे दिसून येते.[2]

इ.स. 1907 साली पाचपावली नागपूर याविभागात 'चोखामेळा मुलींची शाळा श्री. किसनजी बनसोड यांनी सुरू करून विदर्भातील दलित स्त्री शिक्षणाला चालना दिली. इ.स. 1909 साली कालीचरण गणुजी नंदागवळी यांनी गोंदिया येथे स्वतःचे 3000 रूपये खर्च करून 'पहिली मुलींची शाळा सुरू केली. 1924 साली 'नवीवस्ती नागपूर येथे जाईबाई चौधरी यांनी 'संत चोखोबा कन्या शाळा' काढून स्त्री शिक्षणाला चालना दिली. इ.स. 1936 ला अंजनाबाई कृष्णराव देशभ्रतार यांनी अनाथ मुलींकरीता 'अस्पृश्य मुलींचे बोर्डींग' नवी–शुक्रवारी येथे सुरू करून मुलींच्या शैक्षणिक कार्यात हातभार लावला. व ख–या अर्थाने विदर्भातील महिलांनी दलित चळवळीच्या विकासाच्या कार्यात मोठयाप्रमाणात हातभार लावल्याचे दिसून येते.[3]

**बहिष्कृत भारत भगिनी परिषद** : 19 नोव्हेंबर 1927 ला वर्धा येथे 'बहिष्कृत भगिनी परिषद' स्थापन झाली आणि त्याच वर्षी सौ. नायडू यांच्या अध्यक्षतेखाली खरे थियटरमध्ये एक सभा आयोजित करण्यात आली. या सभेचे व्यवस्थापन सौ. बायनाबाई साखरे यांनी केले होते.[4]

**पहिली अखिल भारतीय महिला परिषद 1930** : नागपूर शहरात 8 ते 10 1930 मध्ये झालेल्या पहिल्या अखिल भारतीय परिषदेचे नेतृत्व करतांना जाईबाई चौधरी यांनी मुलींना पण मुलांप्रमाणे शिक्षणाची समान संधी मिळायला पाहिजे असे त्यांनी आपल्या भाषणतून सांगितले. या परिषदे मध्येच सगुणाबाई गावेकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्या अखिल भारतीय दलित महिला परिषद घेण्यात आली. या परिषदेमुळे 'स्त्री वर्गात' एकदम सामाजिक जागृती निर्माण झाली. स्त्रियांच्या प्रगतीकरीता अनेक मंडळे काढण्यात आली व त्या मंडळाद्वारे स्त्री–जागृतीचे ठिकठिकाणी अनेक कार्यक्रम होऊ लागले होते. या कार्यक्रमा अंतर्गत अस्पृश्यांच्या निरनिरळया वस्त्यात महिला मंडळे स्थापन केली होती.

1. 'दलित महिला मंडळ'
2. 'अस्पृश्य सुधारक लग्न सुधारक मंडळ'
3. 'अस्पृश्य महिला सुधारक मंडळ'
4. 'अस्पृश्य महिला समता सैनिक दल'
5. 'अनाथ अस्पृश्य मुलींचे बोर्डिंग व महिला मंडळ'
6. 'भगिनी मंडळ'
7. 'रमाबाई आंबेडकर महिला संघ'
8. 'अस्पृश्य मुलींची प्रायमरी शाळा महिला मंडळ'

इत्यादी महिला मंडळाद्वारे 'स्त्री' जागृतीच्या कार्यक्रमाला गती येऊन महिला सक्षम होण्यास याचा हातभार लागला.[5]

**ऑल इंडिया डिप्रेस्ड काँग्रेसचे अधिवेशन 1932 :** नागपूर शहराजवळील 'कामठी' येथे भरलेल्या ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लास काँग्रेसचे 1932 च्या अधिवेशनात 7 मे 1932 ला बाबासाहेब आंबेडकर हे नागपूर रेल्वेस्टेशन वरून कामठी मार्गे जात असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे इंदोरा भागातील गड्डीगोदामला पोहचताच या भागात 500 स्त्रीयांनी बाबासाहेबांचे स्वागत पुष्पहार घालून केले. त्याच बरोबर या स्त्रीयांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयजयकाराच्या घोषणा दिल्या. त्यामुळे काही वेळ बाबासाहेब त्या ठिकाणी थांबले व त्यांनी या सर्व भगिनींचा सत्कार स्विकारून पुढे गेले. या अधिवेशनात स्त्रियांनी मोठया संख्येने भाग घेऊन ही परिषद यशस्वी केली होती. येवढेच नव्हे तर सौ. शेवंताबाई ओगले व अंजनाबाई देशभ्रतार यांनी आपल्या भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य स्त्रियांकरीता केलेल्या कार्याचा गौरव करून त्यांच्या भुमिकेला आपला जोरदार पाठिंबा दिला होता. या अधिवेशनात कु. विरेंद्राबाई तीर्थकर यांनी दलित महिला संघटक म्हणून कार्य केले. त्या मध्यप्रांत–व–हाड दलित फेडरेशनच्या एक प्रान्तीक सेक्रेटरीसुद्धा होत्या.[6]

**इ.स. 1933 नागपूरची राष्ट्रीय सामाजिक परिषद :** 30 डिंसेबर 1933 ला राष्ट्रीय परिषदेमध्ये 'अस्पृश्यता आणि अस्पृश्यता निवारण' या विषयावर एक चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्रात कृष्ण बोस सारखे राष्ट्रीय नेता सहभागी झाले होते. या चर्चासत्रात वेणुबाई भटकर यांनी आपल्या भाषणात म्हटले की 'तशी तर मी अशिक्षित आहे. पण मला असे वाटते की जेव्हा पर्यंत अस्पृश्यांना स्पृश केले जात नाही

तेव्हा पर्यंत स्वराज्य मिळणे कठीण आहे. मी जातीत राहून जात दूरस्त करण्याचा प्रयत्न करेल.' वेणुबाई भटकर विदर्भातील दलित चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्या होत्या त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दलित चळवळीत प्रमुख्याने भाग घेत असे.[7]

**विदर्भात दलित महिलांच्या सभा :** 24 व 25 में 1936 ला नागपूरच्या कॉटन मार्केट येथील सौ अंजनाबाई देशभ्रतार यांच्या पुढाकारने दलित महिला सभेचे आयोजन करण्यात आले होते. डिंसेबर 1937 ला नागपूर मधील स्पृश्य महिलांनी 'अखिल भारतीय महिला परिषद' आयोजित करुन त्यात अस्पृश्य महिलानांही पाचरण केले होते. परंतु प्रत्यक्षात त्या परिषदेच्या कार्यकर्त्यांनी समाज–सेविका जाईबाई चौधरी व त्यांच्या सोबतच्या स्त्री कार्यकर्त्यांना जेवणाच्या वेळी दूर बसवून वेगळे वाढण्यात आले ही अपमानजनक वागणूक अर्थातच महार स्त्रियांना सहन झाली नाही आणि त्यांचे पर्यावसान म्हणून धरमपेठ, नागपूर येथे सखुबाई मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली 1 जानेवारी 1938 रोजी अस्पृश्य महिलांची परिषद भरवून तेथे मागील झालेल्या घटनेचा धिक्कार केला. आपली सुधारणा आपणच केली पाहिजे याबद्दल महार स्त्रीयांची खात्री झाली व त्यामुळे आत्मप्रतिष्ठा व आत्मोद्धाराचे ब्रीद घेऊन नव्या जोमोने महार स्त्रीयांनी डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणेने शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमाने सूद्धा गती घेऊन 1937–38 या काळात भंडारा, चांदूर बाजार, मलकापूर, बडनेरा, नागपूर, हिंगनघाट अशा अनेक ठिकाणी झालेल्या सभेतून महार स्त्रिया भाषणे देऊ लागल्या. याकाळातील महिला दलित चळवळीतील एक महत्वाचे वैशिष्टय म्हणजे बडनेरा येथे 25/05/1937 रोजी 'साहित्य महिला समाज संस्था' स्थापन झाली आणि रमाबाई आंबेडकर पुण्यतिथीच्या निमित्ताने साहित्यीक स्वरुपाचे कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता. ही विदर्भातील स्त्री दलित चळवळीची देन होती.[8]

**इ.स. 1942 अखिल भारतीय दलित महिला परिषद :** 20 जुलाई 1942 ला अखिल भारतीय दलित महिला परिषदेचे आयोजन नागपूर येथे करण्यात आले होते. या परिषदेत 25 हजार महिलांनी भाग घेला होता. यात स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. या परिषदेचे वैशिष्ट की, यामध्ये संपुर्ण भारतातील स्त्रीयांनी सहभाग घेतला होता.[9] या परिषदेची अध्यक्षा सुलोचना डोंगरे, सचिव इंदिरा पाटील आणि स्वागताध्यक्ष कीर्ती पाटिल या होत्या. या महिला परिषदेत जे ठराव पास झाले त्यात घटस्फोट घेणे व देणे, स्थावर जंगम इस्टेटीत महिलांना वाटा मिळणे वगैरे ठराव होते. या ठरावावर खालील भाषणे झाली. सौ. राधाबाई कांबळे, जाईबाई चौधरी, कं. मंजुळा कानफाडे, कु. लतिका गजभिये कु. सुलोचना, कु. वीरेंद्रबाई तीर्थकार, कु. चंद्रभागा पाटील, कु. कौसल्या नंदेश्वर आणि इंदिराबाई पाटील या दलित महिला परिषदेच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांनी अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेचे स्वागताध्यक्ष कै. जी. टी मेश्राम यांना दिल्लीवरून लिहिलेल्या 3 ऑगस्ट 1942 च्या पत्रात अत्यंत मार्मिक उद्गार काढले आहेत. डॉ. आबेडकर लिहितात, ''मला अत्यंत प्रभावित केले ते महिला परिषदेने. मी महिलांचा पक्षपाती आहे आणि सामाजिक कार्यात त्यांनी अधिकाधिक भाग घेणे मला आवडेल. अधिवेशनात हजारोच्या संख्येने महिलांनी उपस्थित राहणे हे दृश्यच इतके विलोभनीय होते की, देवादिकांना देखील ते पाहण्याचा मोह व्हावा. त्यांचा पेहेराव, त्यांचा नीटनेटकेपणा, आणि ज्या संकल्पित आत्मविश्वासाने त्या परिषदेत वावरत होत्या, त्यामुळे तर माझ्या अंतकरणाला विशेषच हर्ष झाला.'' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित स्त्री चळवळी विषयी व्यक्त केलेले मनोगत फारच बोलके होते.[10]

**निष्कर्ष:** महाराष्टात अस्पूश्यता आणि निरक्षरता निवारण्याचे कार्य महात्मा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांचा मदतीने केला. हाच वारसा पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चालविला. स्त्री, मानवी समाजाचा निम्मा पुरुषाप्रमाणेच महत्वाचा घटक आहे. तिचा विकास झाल्याशिवाय कोणत्याही कुटुंबाचा, समाजाचा आाणि राष्टाचा विकास होणार नाही. म्हणून तिच्या व्यक्तीमत्वाचा चौफेर विकास व्हावा ती स्वावलंबी व्हावी फक्त चूल आणि मूल एवढेच तिचे क्षेत्र नसुन, तिने घराचा उंबरठा ओलांडून जीवनाच्या विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवावे एवढया व्यापक स्वरुपाच्या तिच्या सक्षमतेचा विचार बाबासाहेब करीत होते.[11] त्यांच्यामुळे दलितांमध्ये विशेषत; दलित महिलांमध्ये विषमतेविरुध्द प्रतिकार करण्याची प्रक्रिया सुरु झाली. हाच दलित चळवळीत महिलांच्या योगदानाचा प्रारंभबिंदू होता.

विदर्भातील दलित चळवळीत दलित महिलांनी नेतृत्व करुन आपली कौटुबिंक जबाबदारी सांभाळून सामाजिक समतेच्या संग्रामात सहभागी होऊन आपली सामाजिक जबाबदारीही मोठया हिरिरीने पार पाडल्याचे दिसून येते. जाति–पोट जातींमधील भेदाभेद, त्यांच्यातील अनिष्ट प्रथा यांचा विरोध करीत

आपल्या मुला–मुलींच्या शिक्षणाविषयीची सजगता समाजात वाढविण्याची कळकळ महिला नेतृत्वाने केलेली दिसून येते. ऐवढेच नव्हे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यांचा तसेच तथागत भगवान बुध्दांच्या धम्माचा जागोजागी प्रसार करण्याचा विदर्भातील दलित महिलांचा पुढाकार दिसून येतो. मात्र डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतरच्या महिला दलित चळवळीत कुठेतरी बंदिस्तपणा, स्वार्थलोलुपता, ऊर्जाहीनता दिसत असली तरी ती पुर्णता नामुष्कीची अवस्था नव्हेच. एकेवेळी ऊर्जासंपन्न असलेली ही विदर्भातील दलित चळवळ आज अस्थिपंजर दिसत असली तरी आंबेडकरी निष्ठावंतानी निराश होण्याची काहीही गरज नाही आहे, तर दलित चळवळीला योग्य नेतृत्व मिळाले की, नक्कीच एखादया फिनिक्स पक्ष्याप्रमाणे नवतेजाने प्रकाशित होऊन उंच भरारी मारेल.

**संदर्भसूची**

1.कोसारे एच. एल, 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास', नेहा प्रकाशन प्लॉट नं. 120,गुरूनानक गार्डन समोर, गुरूनानकपूरा नागपूर. प्रथम आवृत्ती 1984., पृ. क. 483.

2.कित्ता पृ. क. 485.

3.डोंगरे कृष्णकांत कवडूजी, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत नागपूर शहराचे योगदान', बहुजन प्रसार केंद्र, नागपूर. प्रथम आवृत्ती 2012., पृ. क. 296, 297.

4. आवळे दीक्षित, 'नागवंशीय आंबेडकर चळवळीत महारांचे योगदान', पारमिता प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती 1998., पृ. क. 125

5.डोंगरे. डॉ.बा.आ.च.ना.श.यो. पृ. क. 305.

6.डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे' खंड 18, भाग – 1, प्रकाशक रोडगे प्रकाशन, लष्करीबाग नागपूर 2014 15., पृ क. 249.

7-The Commemorative Volume In Celebration of Dr. Babasaheb Ambedkar 125 Birth Anniversary, 'Dr. Babasaheb Ambedkar The architect of Moder India', Published By Shri Puranchandra Meshram Registar Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur. P.N. 644.

8.आवळे. 'ना.आ.च.म.यो. पृ. क 127.

9.नगराळे डॉ. मोहन भा., ' विदर्भातील दलित चळवळ' (डॉ.आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणापर्यंत) प्रकाशक– डॉ. प्रदीप हाडके, नागपूर – 03, प्रथम आवृत्ती 2015, पृ. क.136–137

10.. कोसारे. वि.द.च.इ. पृ.क. 489.

11.मूलजाधव सुशीला, 'भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री' कौशल्य प्रकाशक, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 2006, पृ. क. 90

# "विदर्भातील आंबेडकरी चळवळीत महिलांचे कार्य

**प्रा.डॉ. ज्वाला भा. डोहाणे,**
(अंशकालीन अधिव्याख्यात)
पाली व प्राकृत विभाग
डॉ. मधुकरराव वासानिक पी. डब्लु. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय,

**सारांश :—**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्म शताब्दी वर्षानंतर "दलित" या शब्दा बद्दल वाद निर्माण झालेला आहे. आज "दलित" हा शब्द वादाचा विषय वाटत असला तरी "दलित" या शब्दाचा उत्पत्तीमध्ये त्या काळाची एवं क्रांतीमय भूमिका होती. हा शब्द क्रांतीच्या गर्भातून उदयमुख हेताना दिसतो. "दलित" या शब्दातून क्रांतीच्या त्या काळात जयघोष दिसतो. "दलित" साहित्य हे क्रांतीच्या रूपाने उदयास येते होते. साहित्य आणि चळवळ अशा दोन रूपातून हे साहित्य भक्कमपणे आरंभी प्रवास करतांना दिसतो.काळ हा कोणासाठी थांबत नाही काळाचा अखंड प्रवास सतत सुरू असतो या अखंड प्रवासात शब्द, अर्थ, रंग, रूप आणि गरजा सर्व बदलून जातात कारण सर्वांना समरस व्हावे लागते. काळ हा भूतकाळाशी समरस होत नसतो आणि म्हणून बदलत्या काळाबरोबर अनेक जीवन मूल्ये सुध्दा असतात शब्दाचे अर्थ डॉ. आंबेडकरांनी माणसांना जीवनाकडे पाहव्याची जी प्रेरणा दिली. जे विचार दिला. ही प्रेरणाच निराली आहे. समाज वेवस्थेत ज्याचे हितसंबध सुरक्षित होते. त्या सर्वांच्या हित संबधात बाधा आणणारी आणि प्रत्येकाला आपले मूल्य बहाल करणारी ही प्रेरणा होती. त्यामुळे प्रेरणेनी मानसिक परिवर्तन करून सामाजिक आणि वाङ्मयीन परिवर्तन केले. हे मानसिक परिवर्तन करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने प्रथमत प्रंचड स्वरूपात झाल्यामुळे डॉ. आंबेडकर हे एकमेव प्रेरणास्थान ठरतात. डॉ. आंबेडकरांनी केलेला हा मुल्यात्मक बदल आहे आणि डॉ. आंबेडकरांच्या, जीवनातून आणि कार्यातून प्रेरणा घेवून आंबेडकरवादी स्त्री–पुरूष चळवणी साकार झालेल्या आहे.1928 पासून पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांच्या परिषदा सभा भरव्यावर डॉ. आंबेडकरांनी भर दिला होता. त्यामुळे पुढील काळात शांतीबाई दाणी सुलेचाना डोंगरे, राधाबाई कांबळे, यासारख्या आंबेडकरवादी स्त्रियांचे नेतृत्व पुढे आलेले दिसते. देवदासी प्रथेमध्ये स्त्रियांच्या शोषणाला अधिमानयता दिली असल्याने या प्रथेविरूध्द आंबेडकरी स्त्री–नेत्यांनी संघटन केलेले दिसते.

**शब्द संकेत** :विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील महिला कार्यकर्त्याआणि स्त्री चळवळीचे कार्य,

**संशोधन पद्धती : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.**

**आंबेडकरी चळवळीत स्त्रियांचा सहभाग त्यांचे कार्य :—**आम्हीही इतिहास घडविला या पुस्तकात आंबेडकरी चळवळीतील स्त्रीयांच्या सहभागाची नोंद घेण्याचा प्रयत्न केला आहे. गिरणी कामगारांच्या संघटना बांधणाऱ्या **राधाबाई कांबळे** मुलींसाठी शाळा सुरू करवाऱ्या जाईबाई चौधरी दलित वस्त्यांत फिरून स्त्री शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या वीरेंद्राबाई अशा स्त्रियांचा परिचय या पुस्तकातून होतो. उर्मिला पवार, व मिनाक्षी मून यांनी प्रस्तुत ग्रंथ संपादीत केले.

1)1931 मध्ये नागपूर येथे डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली एक महिला परिषद संपन्न झाली. त्यात पुण्याच्या सौ. गुणाबाई गाडेकर, अमरावतीच्या सौ. शेवता ओगले नागपूरच्या सौ. तुळसाबाई बंदिसोडे पाटील, जनाबाई चौधरी, अकोलांच्या कशीबाई मांडवधरे या स्त्रीयांना परिषदेत सहभाग होता.

2)22 मार्च 1934 च्या मलकापूर, शि. बुलढाणा येथील परिषदेत डॉ. आंबेडकरांच्या चळवळीतील स्त्रीयांही सहभागी झाल्यात सौ. कमलाबाई रेगे, [1] काशीबाई भगत, सखुबाई तायडे, रमाबाई, राधाबाई या स्त्रियांना या परिषदेत विशेष सहभाग होता.

3)डॉ. आंबेडकरांच्या स्त्री जागृती बरोबर मानवमुक्तीच्या कार्यात ज्या स्त्रियांनी परिषदा भरवून हातभार लावल्या तो याप्रमाणे.

अ)नागपूर येथील कॉटन मार्केट येथील परिषद 24, 25 मे 1936 पुढाकार सौ. अजनाबाई देशभ्रतार

ब)नागपूर येथील पाचपावली येथील परिषद (1 मार्च 1936) अध्यक्ष –सौ. भागीरवी देशभ्रतार

क)नागपूर येथील धरमपेठ येथील परिषद – 1 जानेवारी 1936 अध्यक्ष सौ. सुखुबाई मेश्राम

3)नागपूर उजरखेड येथील परिषद 1940 अध्यक्ष सौ. सुलोचना डोंगरे [2]

ई)1942 ची नागपूर येथील अस्पृश्य महिला परिषद या परिषद डॉ. आंबेडकरांनी मार्गदर्शन केले सौ. सुलोचना डोंगरे अध्यक्षखानी होत्या स्वागतध्यक्ष सौ. कीर्तीताई पाटील या होत्या तर जनरल सेक्रेटरी सौ. इंदिराबाई पाटील होत्या या परिषदेत सौ. जनाबाई चौधरी, सौ. राधाबाई कांबळे, सौ. प्रभावती रामटेके, कु कतिका गजभिये, सौ. मीनाबाई बडगे, कु. मंजुला कानफाडे, श्रीमती विरेंद्राबाई त्रिर्थकर, कु. कौशल्या नंदेश्वर या भगिनीनी ठरावावर भाषने केली होती.बोध्द धम्माची दीक्षा घेतली. तेव्हा 2 लाख स्त्रीयांनी एकाच वेळी बौध्द धम्म स्वीकारला होता. त्याचप्रमाणे स्त्रीमुक्ती संदर्भात आंबेडकरी चळवळीतील लेखीकांचे योगदान

महत्वाचे आहे. तारांबाई डोंगरे, यशोदाबाई चव्हान, सुंगधाबाई शेंडे, हिरा बनसोडे, मीना गडाकिये, प्रा. असना लोंखडे, कुमुद पावडे, प्रज्ञा पवर, करूना जमदाडे म्हणून स्त्रियांनी प्रसिध्दी मिळवीले.
स्त्री मुक्ती चळवळीतील हया कार्यकर्त्या आहेत.

**आंबेडकर चळवळीतील महिला कार्यकर्त्या :–**

1)**बेबी कांवळे** – यांनी "जिणं आमुच" पुस्तकात महार जातीवर होणाऱ्या अन्याय अत्याचारांचा आढावा घेतला आहे. त्या स्वतः बाबासाहेबांच्या अनेक सभाच्या साक्षीदार होत्या. बाबासाहेबांनी केलेल्या क्रांतीवर तिने अनेक कविता लिहिल्या आहेत.

2)**पवार** – "आम्ही इतिहास घडविला" या ग्रंथात दलित स्त्रीयांच्या कर्तत्वाचा इतिहास मांडला आहे. दलित स्त्रियांना इतिहास ग्रंथात [3] त्यांनी स्थाळ मिळुन दिले. ऊर्मिला पवार यांनी आंबेडकरी विचारांना पुढे नेण्याचे काम मोठे केले.

3)**सुधाताई रामटेके** – महिलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न.

4)**लक्ष्मीबाई नाईक** – अकोला येथे दलित स्त्रीयांसाठी प्रयत्न.

5)**वेणुताई भटकर** – यांनी विदर्भातील स्त्रीयांसाठी पहिली शाळा शुरू केली.

6)**श्रीमती सरस्वती घरडे** – अकोला जिल्हातील या स्त्रीने आंबेडकर चळवळीत मोठे योगदान दिले. महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या एक गाँव एक पाणपठा योजनेत सक्रिय योगदान दिले.

7)**राधाबाई काबंळे** – नागपूराच्या सिताबर्डी भागात त्या राहत असत. त्यांचे वक्तृत्व उत्तम होते. गिरनी कामगारांच्या कपात थांबवावी म्हणून त्यांनी नागपूर ला मोर्चा काढला होता.

8)**सुलोचना डोंगरे** – यवतमाळ जिल्हा – मुकींच्या वस्तीगृहात अधिक्षक म्हणुन काम करत.

**आंबेडकरवादी स्त्रियांच्या चळवळीतील कार्य :–**1927–32 या काळखंडात स्त्रियांनी सत्याग्रहात सहभाग घेतला. 1945 साली मुंबई येथे भरलेल्या महिला परिषदेमध्ये अध्यक्षा निमाबळ शिवराज यांनी या स्त्रियांना घटस्फोट व पुर्नविवाह करण्याचे हक्क बहाल केले. या काळात डॉ. आंबेडकरांची जयंती साजरी होण्याचे सत्र सुरू झाले. या जयंतीतुन स्त्री गीते सादर करू लागली. शिक्षण घेऊ लागली या काळात डॉ. कु. लोठे, विमलताई भोसले, गीताबाई गायकवाड, मुक्ता सर्वगोड, शांताबाई वडवळकर या स्त्रियांनी स्त्री संघटना बळकट करण्याचे कार्य कारू केले. ती साहित्याच्या क्षेत्रात प्रवेश करून साहित्य निमित्ती करू लागली. कवितेच्या क्षेत्रात ज्योती लांजेवार, मीना गजभिये, सुगंधा शेन्डे, सुरेखा भगत, प्रज्ञा लोखंडे, तर कलेच्या क्षेत्रात प्रतिभा इंगोळे, उर्मिला पवार, हिरा बनसोडे, स्वकथनांचा क्षेत्रात सुगंधा शेंडे तर स्वकथनाचा क्षेत्रात कमुद पावडे, मुक्ता सर्वगोड, बेबी डोवले, शांताबाई कांबळे यानि आपले अस्तित्व निर्माण केले. या सर्व साहित्यातून ही स्त्री सामाजिक न्यायासाठी संघर्ष करतांना दिसते. ती एकव्यक्ती नसून पुरूषांच्या बरोबरीचे तिला अधिकार आहे. या विचाराशी ती प्रमाणिक असत्याचे दिसून येते. तसेच या समाजावर होणाऱ्या अन्याय–अत्याचाराची नोंद केलेली आहे. या स्त्रियांची वैचारिक पातडी आजप्रर्यतच्या स्त्रीपेक्षा वरचढ असल्याचे दिसुन येते. तिचा हा संघर्ष सतत सुरु असलेल्या दिसून येते. तिचा एक भाग म्हणजे आंबेडकरवादी स्त्री ने लिहीलेले स्वंकथने याचा विचार करने अंत्यत महत्वाचे आहे.

**कुमुद पावडे :–** अंतस्फोट हे स्वंकथन आंबेडकरवादी स्त्री कडुन लिहिले गेलेले पाहिलेच स्वंकथन आहे. परंतु या स्वंकथन म्हणून सुरवातीला मान्यता मिळतांना दिसत नाही. हिरा बनसोडे म्हणतात "आज आंबेडकरी स्त्रियांची ही आत्मचरित्र" उपलब्ध झालेली आहेत. त्यात बेबीताई कांबळे, शांताबाई कांबळे यांचा उल्लेख करावा लागेल. प्रा. कुमुद पावडे यांचा अंतःस्फोट आत्चरित्रात्मक वाटत नाही. त्यांच्या आयुष्यातील या काही घटनांचे त्यांनी आत्मानिवेदन केले आहे. परंतु अगदी आलिकडच्या त्या घटना असल्यामुळे त्या महत्वाच्या वाटतात [4] अंतस्फोट मराठीतर्फे पहिले आंबेडकरी स्त्रीचे [5] आत्मकथन म्हणून त्यांच्या अंतरस्फोटाला ऐतिहासीक महत्व आहे.[6]

**बेबी कांबळे :–** "जिणं आमुच" ग्रामीण भागातील समाजाच्या रितीरिवाजावर प्रकाश टाकला आहे. हे स्वंकथन आंबेडकरवादी स्त्रीने लिहिलेले स्वंकथन आहे. डॉ. आंबेडकरांच्या भाषणातून प्रेरणा घेऊन त्यांनी जीवन जगायला सुरूवात केली. जिणं आमुच हे स्वंकथन मराठीतले पाहिले आंबेडकरी स्त्रीचे आत्मचरित्र म्हणुन बेबीताईच्या पुस्तकाला ऐतिहासिक महत्व आहे.

**शांताबाई कांबळे :–** हया आंबेडकरी समाजातील प्रथम महिला शिक्षिका म्हणुन त्यांना बहुमान प्राप्त झालेली आहे. माज्या जन्माची चित्रकथा हे स्वंकथन त्यांनी लिहुन पूर्ण केल्यानंतर पूर्वा या मासिकेतून 1983 पासून प्रसिध्द केले. यात आंबेडकरवादी साहित्यातील स्त्रीचे स्वंकथन आहे. या स्वंकथनाची पहिली आवृत्ती 1986 [7] मध्ये प्रकाशित झाली. दुसरी 1990 मध्ये प्रकाशित झाली हे स्वंकथन पुस्तक रूपाने 1986 मध्ये प्रकाशित झालेले असत्यामुळे आंबेडकरवादी रूपांने लिहिले हे स्वंकथन आहे.

**निष्कर्षः–** विसावे शतक हे आंबेडकरी महिला चळवळीकरिता अत्यंत महत्वाचे शतक मानले जाते. खऱ्या अर्थाने या शतकातील ही चळवळ म्हणजे सामाजिक पुनरूत्थनाची चळवळ होय, आंबेडकरवादी चळवळीचा मुख्य क्रेंद्रबिंदू या देशातील शोषित व बहिष्कृत समाज होय या शतकात "बाबासाहेब आंबेडकरांना" मिळालेले अभूतपूर्व यश हे त्यांच्या प्रमाणिक ध्येय निवढेमुळे मिळाले होते. डॉ. आंबेडकरांनी शोषित पीडीत दलित बहुजनाकरिता जो मानवमुक्तीचा लढा उभारला होता. बाबासाहेबांच्या चळवळीतील आंबेडकरावादी महिला चळवळीतील सहभाग व मुक्तिसंग्राम यात स्त्रियांच्या स्वंकथनात आलेला आहे. विषमवतावादी परंपरा या सर्व बाबींवर प्रकाश टाकून शतकानुशतके घातलेला बहिष्कार यातून उघडकीस आणला आहे. स्त्री ने आपले दुःख वेशीवर टाणुन स्त्रीयांच्या विविध चळवळीचा बिगुल वाजविला अन्याय मुक्त नवसमाज निर्माण करण्याचा समतेचा आशावाद नंव्या पीढीसाठी निर्माण केला.

**संदर्भसूची :–**


1) गाठाल डॉ. एस.एस. – भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन कैलाश पब्लिकेशन प्रकाशन औरंगाबाद पृष्ठ क्र. 316

2) गाठाल डॉ. एस.एस. – भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन कैलाश पब्लिकेशन प्रकाशन औरंगाबाद पृष्ठ क्र. 317

3) गाठाल डॉ. एस.एस. – भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन कैलाश पब्लिकेशन प्रकाशन औरंगाबाद पृष्ठ क्र. 322

4) बन्सोडे हिरा – दलित आत्मचरित्रातील स्त्रि चित्रहणन –सुगावा प्रकाशन पुणे–दि.म.88 पृष्ठ क्र. 49

5) मूल जाधव सुशिला – दलित स्त्रियांचे आत्मकथन सुगावा प्रकाशन पुणे दि.अ.88 उनी पृष्ठ क्र. 59

6) बर्नसन मॅक्सीन – जिणं आमुच – प्रस्तावाना मान सन्मान प्रकाशन पुणे दु.आ.1990, पृष्ठ क्र. 59

7) कांबळे अरूण – माझ्या जन्माची चित्रकथा प्रस्तावना सुगावा प्रकाशन पुणे दु.आ.1990 उनी पृष्ठ क्र. 22

# विदर्भातील आंबेडकरी चळवळीद्वारा आयोजित अधिवेशनाचे महत्व

**सचिन मा.बन्सोड**
इतिहास विभाग
नवप्रतिभा महाविद्यालाय, नागपूर.

**सारांश :**पश्चिम महाराष्ट्रात आधुनिक काळात सुरु झालेल्या चळवळीला जसा महारांचा इतिहास आहे. तसेच विदर्भात सुरु झालेल्या चळवळीला सुद्ध प्राचीन इतिहास असून रघुजीचा काळ महत्वाचा आहे. त्याला प्राचीन इतिहासाची पार्श्वभूमी आहे. कारण नागपूर हे नागांचे महत्वाचे केंद्र असल्याचे आणि त्यांच्याच नावावरून 'नागपूर' हे नाव त्यांच्या बहुसंख्येमुळे पडले असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले आहे. दुसरे मत सुद्धा लक्षात घेण्यासारखे आहे की, या प्रांतात महारांइतकी संघटीत जमात नाही. या मतावरुन विदर्भातील अस्पृश्य चळवळीचा इतिहास शोधता येईल. विदर्भातील उत्खणनातून प्राप्त झालेल्या बौद्ध अवशेषावरुन हे सिद्ध झाले आहे की, येथे मोठ्याप्रमाणात बौद्ध संस्कृती विद्यमान होती. त्यात राजांचा इतिहास आहे. अर्थात या इतिहासावरुन हे लक्षात येते की, या प्रदेशात महार बहुसंख्येने संघटीत होते. आणि या संघटनशक्तीच्या बळावरच त्यांनी इतिहास रचल्याचे जाणवते. पुढे रघुजीचा काळ हा चळीवळीसाठी सहाय्यभुत ठरला हे वेगळे या प्रांतात महारांना अस्पृश्य करुन इतर जाती पासून वेगळे करण्यात आले होते नाहीतर एकसंघ असलेली ही जात एवढी अल्पसंख्य कशी राहू शकते.? अस्पृश्यतेचे चटके इथेही बसत होते, परंतु संघटीतपणामुळे त्यांना पश्चिम महाराष्ट्रातील कडक निर्बंध इतका परिणाम येथे झालेला दिसत नाही. निर्बंध जरी नव्हते तरी अस्पृश्यतेच्या कळसामुळे त्यांच्या उन्नतीचे मार्ग कुंठीत झाले होते. अर्थात विदर्भात सुरु झालेल्या अस्पृश्योन्नतीच्या चळवळीला पश्चिम महाराष्ट्रातील चळवळीची प्रेरणा मिळाली. जानुजी कचरुजी खंडारे हे वऱ्हाडातील महार लोकांचे पहिले पुढारी होते. त्यांनी आपल्या लोकांच्या प्रगतीसाठी निरनिराळया प्रकारे सामाजिक कार्य केले. त्यांनी पुढारी या नात्याने सरकार कडून धर्मशाळा व विद्यार्थ्यांच्या वसतीगृहासाठी काही जागा व शेती मागून घेतली होती. हिंगणघाटचे विठोबा रावजी महार, यांच्या मागणीवरुन राघुजी भोसल्यांनी अंबाळ तलाव महारांसाठी खुला केल्याचे दिसून येते. नागपूर व चंद्रपूर या भागात शासकीय शाळेतून अस्पृश्य मुलांना प्रवेश नाकरल्यामुळे त्याविरोधात अस्पृश्यांनी मिरवणुका काढल्या होत्या. व त्याचा परिणाम अस्पृश्यांना शिक्षण मिळू लागले. महार समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून महार समाजाची सभा घेणे आवश्यक होते. त्यानुसार 18/12/1912 रोजी पैकू शेट्या यांच्या हस्ते मोतीबाग येथील वाड्यात खास सभा बोलविण्यात आली होती. इ.स. 1913 मध्ये टाऊन हॉल नागपूरला महार सभेचे आयोजन करण्यात आले होते. गोंदीया जिल्हायाचे लहानश्या गावाचे मालगुजार कालीचरण नंदागवळी यांनी गोंदीयात पहिली मुलींची शाळा काढली होती. तसेच महारांना सैनिकात भरती करावे या हेतूने या लोकांनी महत्वाची भूमिका बजावल्याचे दिसून येते. त्यामुळे नंतरच्या काळात भरलेल्या आंबेडकरी चळवळीची पार्श्वभूमी आणि अस्पृश्यता उद्धारचे कार्याची सुरूवात विदर्भातून झाल्याचे दिसून येते.

**शब्द संकेतः बहिष्कृत परिषदाचे विदर्भातील अधिवेशने 1920,1929,1930,1932,1942**

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**भारतीय बहिष्कृत परिषद नागपूर 1920 :** 1917 मध्ये भारतमंत्री मॉटेग्यु चेमस्फोर्ड भारतात आले असता अस्पृश्या समाजाच्या वतीने त्यांच्या राजकीय मागण्याबाबत सर नारायणराव चंदावरकर व विठ्ठल रामजी शिंदे यांच्या एका शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली होती. त्यानंतर साऊथबरो कमिटी भारतात आली. या कमिटी सामोर डिप्रेस्ड क्लास मिशनचे श्री. वि.रा. शिंदे यांनी राजकीय मांगण्याबाबत अशी मागणी केली की 'अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधित्व न देता त्यांच हितरक्षण उच्चवर्णीय हिंदु प्रतिनिधींच्या हाती सोपवावे' या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'हे लोक स्वतःच्या घरातील घाण साफ करून टाकायला अजून तयार नाहीत तर त्यांनी स्वराज्य का मागावे' असे मत प्रदर्शन केले 26 जानेवरी 1919 च्या टाईम्सच्या अंकात 'A Mahar on Home Rule' या लेखात केले होते.[1]

भारतीय बहिष्कृत परिषदेचे अधिवेशन नागपूर येथे 30 मे ते 1 जून 1920 रोजी आर्सेनल ग्राऊंडवर कस्तुरचंद पार्कवर भरविण्यात आले होते. अस्पृश्य समाजाच्या राजकीय हक्काच्या मागण्यासंबंधीच्या पार्श्वभूमीवर होत असलेली पहीलीच बहिष्कृत समाजाची परिषद असल्यामुळे ऐतिहासीक महत्वाची होती. या परिषदेचे नियोजित अध्यक्ष कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज हे होते. तर स्वागताध्यक्ष गोंदीयाचे कालीचरण नंदगवळी आणि सचिव गणेश आकाजी गवई व किसन फागूजी बनसोडे होते. या परिषदेला मद्रास, मुंबई, खडकपूर, मध्यप्रांत वऱ्हाड येथून 500 प्रतिनिधी उपस्थित झाले होते. डॉ. भीमराव आंबेडकर, सी. ना. शिवतरकर, शि. जा कांबळे, कदम, गो. गो. काळे, ऐदाळे, भोसले वगैर प्रतिनिधी बंबईवरून आले होते. तसेच कोल्हापूर ब्राह्मणेतर चळवळीचे प्रमुख कार्यकर्ते सर्वश्री रणदिवे, बाबुराव हैबतराव यादव, कोठारी, श्रीपतराव कांबळे, डिप्रस्ड क्लास मिशनचे सुपरिन्टेन्डेन्ट श्री. बर्वे ही मंडळी आलेली होती. तसेच नागपूरच्या सुशिक्षित सुधारकांपैकी सर्वश्री पंडित

सर गंगाधरराव चिटणीस, शंकरराव चिटणीस व हिंदु मिशनरी सोसायटीचे अधिकारी डॉ. परांजपे आदि उपस्थित होते.[2]

छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणतून ''काही वर्षापूर्वी माझ्या खोटया समजुतीने मी आपणाकडे बंधुप्रमाणे पहात नव्हतो. आता माझी चूक मला समजून आली आहे व यापूढे तुमच्यावर माझे बंधूसारखे प्रेम राहील अशी खात्री वाटते, हे सांगण्यास मला अभिमान वाटतो.''[3] शाहू महाराजांच्या भाषणानंतर किसन फागू बनसोडे यांचे भाषण झाले अनेक मान्यवरांचे भाषणे या परिषदेत झाली. डॉ. भीमराव आंबेडकरांनी आपल्या भाषणातून ''आपण जमलेले सर्व प्रतिनिधी बहिष्कृत वर्गाची उन्नती कशी होईल या दृष्टीने विचार करण्याच्या हेतूने जमलो आहोत. म्हणून आपल्या लोकांच्या उन्नतीच्या आड येणारी व्यक्ती मग ती बहिष्कृत असो किंवा उच्चवर्णी असो, तसेच एखादी संस्था असो पण ती आपल्या हिताच्याविरूद्ध एखादे कृत्य करीत असेल किंवा तसे कृत्य तिने मागे केले असेल तर त्या गोष्टीचा आपण निषेध करावा किंवा नाही? तेव्हा सगळे प्रतिनिधी एका आवाजाने म्हणाले की अलबत, आमच्या प्रगतीच्या आड येणारी कोणतीही व्यक्ती संस्था असो तिचा आपण तीव्र निषेध केलाच पाहिजे ही गोष्ट तुम्हा सर्वांना मान्य आहे काय?'' तेव्हा सर्वांनी त्यांना होकार दिला व विरोधक शांत झाले. नागपूर म्हणजेच या प्रांतातील जनतेचे सुदैवच म्हणावे लागेल की, 1920 ची बहिष्कृत परिषद बोलवण्याचा पहिला सन्मान येथील अस्पृश्य कार्यकर्त्यांना मिळाला. ही परिषद अस्पृश्यांच्या राजकीय जीवनात अग्रेसर होण्याकरीता महत्वाची परिषद ठरली.[4]

**भारतीय बहिष्कृत परिषद नागपूर 1920 परिणाम :** या परिषदेने देशातील कानाकोपऱ्यात असलेले सर्व सामान्य अस्पृश्य माणसाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रत्यक्ष दर्शनाचा योग घडून आला. त्यांना आपला पाठीराखा मिळाल्याचा आत्म विश्वास निर्माण झाला. या परिषदेची बातमी देशी–विदेशी वर्तमान पत्रात प्रसिद्ध झाल्यामुळे भारतात 6 कोटी अस्पृश्य समाज आहे आणि तो निग्रो गुलामा पेक्षाही हीन जीवन जगतो आहे याची कल्पना संपूर्ण जगाला आली. या परिषदेने राष्ट्रीय कॉंग्रेसचे लक्ष अस्पृश्यांच्या राजकीय प्रश्नांकडे अगदी खेचून घेतले व त्याचा परिणाम स्पटेंबर 1920 च्या कलकत्ता परिषदेत लाला लाजपत रॉय यांच्या अध्यक्षतेखली भरलेल्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनात पहिल्यांदाच 'अस्पृश्यांच्या प्रश्नावर' विचार करण्यात येऊन 'अस्पृश्यता न पाळणे' याचा अंर्तभाव कॉंग्रेसच्या पुढील कार्यक्रमात करण्यात आला हे एक वैशिष्टय 1920 च्या नागपूर परिषदेचे होते. या परिषदेमुळे भारताच्या राजकारणात डॉ. बाबासाहेब यांचे स्थान निश्चित झाले.[5]

**मध्यप्रांतीय बहिष्कृत परिषद 1929 :** 'अस्पृश्येच्या प्रश्नाकडे' संपूर्ण जगाचे लक्ष वेधले आहे हे पाहून नागपूर शहरातील अस्पृश्य पुढाऱ्यांनी समाजाच्या परिस्थितीची यथार्थ जाणीव व्हावी, हा उद्देश डोळयासमोर ठेऊन 'मध्यप्रांतीय बहिष्कृत परिषदेचे दुसरे अधिवेशन दिनांक 24 फेब्रुवारी 1929 रोजी लक्ष्मी विलास थियटर मियो हॉस्पीटल समोर, नागपूर येथे भरविले होते. या परिषदेचे अध्यक्ष म्हणून बंगाल प्रांताचे पुढरी बी. सी. मंडल यांना आमत्रित केले होते. पण ते काही कारणामुळे येऊ न शकल्यामुळे त्यांच्या जागेवर मुंबई प्रांताचे पुढारी डॉ. पुरूषोत्तम सोळंकी' यांना या परिषदेचे अध्यक्ष करण्यात आले होते.[6]

या परिषदेचे स्वागताध्यक्ष 'धर्मदास नगरारे हे आपल्या स्वागतपर भाषणात म्हणाले ''आम्ही ही परिषद तीन प्रश्नावर विचार करण्यासाठी बोलविली आहे.

1. सायमन कमिश्न बद्दलचे धोरण निश्चित करणे.
2. पंडित मोतीलाल नेहरू रिपोर्टचा विचार करणे.
3. मध्यप्रांतातील दलितांच्या परिस्थितीचा रिपोर्ट तयार करणे.

या परिषदेला नागपूर शहर, मध्यप्रांत व वऱ्हाडातील ठिक–ठिकाणाहून हजारो लोक सहभागी झाल्यामुळे चांगला प्रतिसाद मिळालेला होता. या परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश मिळून त्यांच्या मार्गदर्शनाने येथील कार्यकर्त्यांनी आयोजलेली ही परिषद संघटींतपणे यशस्वी झाली.[7]

**पहिली अखिल भारतीय दलित कॉंग्रेस परिषद नागपूर 1930 :** अखिल भारतीय कॉंग्रेसचे अधिवेशन 8 व 9 ऑगस्ट 1930 ला व्यंकटेश थियटर (हल्लीचे शाम टॉकीज) मध्ये घेण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या परिषदेचे अध्यक्ष होते. प्रस्तुत परिषदेत जे महत्वाचे ठराव पास करण्यात आले त्याचा वृत्तांत नागपूरच्या दै. महाराष्ट्राच्या 10 ऑगस्ट 1930 च्या अंकात प्रसिद्ध झाले होते. पहिला ठराव अध्यक्षानीच मांडला. ''राष्ट्रीय सभेने मान्य केलेले संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय या दलित कॉंग्रेसला मान्य नसून 'वसातीचे स्वराज्य' आमचे ध्येय आहे.'' दुसरा ठराव अ. कौंसिलात योग्य प्रतिनिधित्व मिळणे ब. सरकारी नोकरीत अस्पृश्यांची कायद्याने तरतूद व्हावी क. शिक्षण विषयक हेळसांडीची तक्रार सेक्रेटरी ऑफ स्टेटकडे करण्याचा अधिकार सुधारणा कायद्यात आम्हास मिळावा असे ठरावा मांडण्यात येऊन त्यावर परिषदेत शिक्कामार्तब करण्यात आले. त्याचबरोबर 'वर्तुळ परिषदेकरीता अस्पृश्यांचे एकमेव पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवड दलित कॉंग्रेस परिषद एकमताने करीत आहे असा ठराव परिषदेने मंजूर केला.[8]

**द्वितीय अखिल भारतीय दलित काँग्रेस परिषद नागपूर 1930 महत्व :** 1930 मध्ये नागपूरला झालेल्या अखिल भारतीय काँग्रेस परिषदेला दलित वर्गाच्या उत्थानाच्या चळवळीत एक विशेष राजकीय ऐतिहासिक महत्व आहे. या परिषदेत भारतातील सर्व अस्पृश्य समाज एका छत्राखली येऊन अखिल भारतीय पातळीवर भरविण्यात आलेले दलित काँग्रेसचे पहिले अधिवेशन होते. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्य वर्गाच्या पुढाऱ्यांनी आपला एकमेव नेतृत्व प्रथमतःच मान्य करून आपल्या राजकीय मागण्या भारतीय स्तरावर एकमुखाने समोर ठेवल्या. तिसरी महत्वाची गोष्ट इंग्लंडला होणाऱ्या गोलमेज परिषदेला अस्पृश्यांचे एकमेव नेते म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकारांची एकमताने निवड केल्या गेली. चवथी महत्वाची गोष्ट दलित वर्गाची अखिल भारतीय संघटना कायम करण्यात आले आणि पाचवी गोष्ट, या परिषदेत बहिष्कृत वर्गाच्या राजकीय जीवनाचा ध्येय धोरणात्मक मूलभूत पाया घातला गेला. माणुसकीस मुकलेल्या हया बहिष्कृत भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातील इतिहासाचे पहिले पान दलित काँग्रेसच्या अधिवेशनात लिहिले गेले.[9]

**द्वितीय अखिल भारतीय दलित काँग्रेस परिषद कामठी 1932 :** 7 व 8 मे 1932 रोजी अखिल भारतीय दलित काँग्रेस म्हणजेच ऑल इंडिया डिप्रेस्ड काँगेसचे दुसरे अधिवेशन कामठी येथे भरविण्यात आले होते. या परिषदेचे स्वागताध्यक्ष

कामठीचे हरदास एस. एन. हे होते. ही परिषद भरविण्याचा मुख्य हेतू 1. वर्तुळ (गोलमेज) परिषदेत सादर करण्यात आलेल्या अल्पसंख्यांकांच्या करारनाम्याचा विचार करणे व 2. अस्पृश्य समाजाची अखिल भारतीय स्तरावर मध्यवर्ती संघटना स्थापन करणे हे होते. या परिषदेचे अध्यक्ष मुनिस्वामी पिल्ले मद्रास हे होते.[10]

**द्वितीय भारतीय दलित काँग्रेस परिषद कामठी 1932 महत्व :** 7 व 8 मे 1932 ला कामठी येथे झालेल्या द्वितीय भारतीय दलित काँग्रेस परिषदेने दलित समाजाच्या राजकीय इतिहासात अत्यंत महत्वाचे असे प्रगतीचे पाऊल टाकले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाला सुरूंग लावण्याच्या हेतूने हिंदु नेत्यांचा प्रयत्न यात असफल झाला. बाबासाहेब आंबेडकरांना विराध करणारे हेमचंद्र खांडेकर श्री. पां.ना. राजभोज यांनी कामठीतील परिषदेत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. पण परिषदेला जमलेल्या लोकांनी त्यांना परिषदेच्या मंडपा बाहेर काढले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाच आपला पुढारी मानले. [11]

**तृतीय अखिल भारतीय दलित परिषद 1942 :** स्वतंत्र मजूर पक्षाद्वारे क्रिप्स मिशनपुढे अस्पृश्यांची राजकीय प्रश्न मांडले होते. तेव्हा लॉर्ड क्रिप्सने असे उद्गार काढले की मजूर पक्ष काही जातीय राजकारणाचा पाठपुरावा करू शकत नाही. हि घटना दिल्लीत घडली तेव्हा बाबासाहेबांनी सर्व पुढाऱ्यांना तारा पाठवून बोलावून घेतले आणि सर्व परिस्थिती त्यांच्यापुढे ठेवून नवी संस्था काढण्याचा आपला मनोदय प्रकट केला. नागपूरला अस्पृश्यांतर्फे जंगी परिषद भरविण्याचे आणि फेडरेशनची स्थापना व घटना तयार करण्याचे ठरविण्यात आले. बाबासाहेबांनी नाव व घटना अगोदरच तयार करून ठेवली होती. फक्त त्याला कायदेशीर स्वरुप या वेळी मिळाले. या तीन परिषदांची नावे पुढील प्रमाणे होती.

1) ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस कॉन्फरन्स्, थर्ड सेशन, 18 व 19 जुलै 1942.
2) ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस वुईमेन्स कॉन्फरन्स् 20 जुलै 1942.
3) समता सैनिक दल कॉन्फरन्स् 20 जुलै 1942.[12]

या तिन्ही परिषदेस सुमारे पाऊण लाख लोक उपस्थित होती. त्यात सुमारे 20 हजार स्त्रिया होत्या. नागपूर येथील मोहन पार्क या ठिकाणी नागपूरकरांनी परिषदासाठी प्रचंड मंडप उभरला होता. त्याला आंबेडकर, हरदास, काळू आहेरे व रमाबाई यांच्या नावाचे चार बाजूंनी चार दरवाजे केले होते. 18 व 19 जुलै 1942 च्या तिसऱ्या अधिवेशनासाठी अध्यक्ष म्हणुन बाबासाहेबांची अगोदर निवड करण्यात आली होती. परंतु त्यांना 9 जुलैच्या हुकुमान्वये व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात घेतल्यामुळे, त्यांना अध्यक्षपद भुषविता येत नव्हते. त्यामुळे या परिषदेचे अध्यक्ष मद्रासचे रावबहादूर श्री. एन. शिवराज, यांना देण्यात आले होते. बाबासाहेब आणि शिवराज आणि त्यांचे सहकारी नागपूरला 18 जुलै सकाळी 9 वाजता नागपूरच्या रेल्वे स्टेशनावर आगगाडीने पोहचले. तेव्हा त्यांची प्रचंड मिरवणूक स्टेशनपासून मोहन पार्क हॉटेलपर्यंत काढण्यात आली होती.[13]

राजकीय स्वरुपाचे पाच ठराव या परिषदेत घेण्यात आले. 1. क्रिप्स योजना अस्पृश्यांना नापसंत आहे, 2. घटना परिषद लवकर भरविण्यात यावी याबद्दल मागणी, 3. अस्पृश्यांच्या संरक्षणाची तरतूद घटनेत करण्याबद्दल मागणी. अस्पृश्यांच्या हिताची कामे करण्याबद्दल एक मोठी रक्कम प्रत्येक वर्षी अंदाजपत्रकात मंजूर करणे, पब्लिक सर्व्हिस कमिश्न, मोठया अधिकारांच्या जागा, कायदेमंडळ व स्थानिक स्वराज्य संस्था यात भरपूर प्रमाणात अस्पृश्यांना असाव्यात अशा मागण्या केल्या 4. अस्पृश्यांच्या निराळया वसाहती असाव्यात, त्यासाठी सेटलमेंट कमिश्नर असावा, अस्पृश्यांना सरकारी जमीनी द्याव्यात वगैर, 5. ऑल इंडिया कास्ट्स् फेडरेशनची स्थापना एक प्रमुख मध्यवर्ती राजकीय पक्ष म्हणून करणे.14

**समारोप :**विदर्भात आंबेडकरी चळवळीच्या उदय होण्यापूर्वीच महारांच्या उत्थानचे कार्य सुरू झाले होते. यात किसन फागुजी बनसोडे कालीचरण नंदगवळी विठोजी रावजी महार, गणेश आकाजी गवई इत्यादी नेते कार्य करीत होते. याचा परिणाम संपूर्ण महाराष्ट्रावर झाला त्यामुळेच विदर्भातील नागपूर येथे भारतीय बहिष्कृत परिषदेचे आयोजन करण्यात आले व परिषदेतून डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या अस्पृश्य उद्धार चळवळीच्या कार्याला सुरूवात झाल्याचे दिसून येते. 1929 च्या बहिष्कृत परिषदेमध्ये सायमन कमिश्न सामोर अस्पृश्यांचे ध्येय धोरण ठरविणे. पंडित मोतिलाल नेहरू यांनी तयार केलेला रिपोर्ट वर चर्चा करणे याबद्दल चर्चा करणे याकरीता भरली होती यामध्ये ही हजारो अस्पृश्य लोकांनी आपला सहभाग नोंदविला होता. पहिली अखिल भारतीय दलित कॉंग्रेस परिषद नागपूर 1930 या परिषदेत पहिल्यांदा संपूर्ण भारतातून लोक एकत्रित झाले व एक नविन राजकीय वळण अस्पृश्य उद्धार चळवळीच्या कार्याला प्राप्त होऊन भारतातील दलित चळवळीत डॉ. भीमराव आंबेडकर हे एकमेव नेतृत्व म्हणून उदयास आले हे विशेष. द्वितीय भारतीय दलित कॉंग्रेस परिषद कामठी 1932 येथील परिषेदेचे वैशिष्टय म्हणजे बाबासाहेबांना विरोध करणाऱ्या विरोधकांना स्वतः लोकांनी मंडपा बाहेर हाकलून लावले. व बाबासाहेब हे दलितांचे खरे उद्धारक आहेत हे निश्चित केले. तृतीय अखिल भारतीय दलित परिषद 1942 या परिषदेची विशेषतः म्हणजे या परिषदेत पाऊण लाखाहून अधिक लोक सामील झाले होते. यात 20 हजार महिलांनी सहभाग घेतल्यामुळे एक वेगळे स्वरूप या परिषदेला प्राप्त होऊन बाबासाहेबांनी अस्पृश्यांच्या हक्कासाठी नवीन राजकीय पक्ष स्थापन करण्याची घोषणा केली ज्याचे नाव ऑल इंडिया शेडल्यूड कॉस्ट फेडरेशन असे ठेवण्यात आले. त्याच बरोबर स्पृयांच्या बरोबरीन भारतीय संविधान निर्मिती प्रक्रियेत अस्पृश्यांना सृद्धा स्थान असावे अशी मागणी करण्यात आली. त्यामुळे विदर्भातील अधिवेशनातूनच डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या कार्याला सुरुवात होऊन, गती प्राप्त झाली व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य उद्धारचे कार्य विदर्भातूनच पूर्ण केल्याचे दिसून येते. त्यामुळे विदर्भात झालेली अधिवेशने आंबेडकर चळवळीचे दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण आहे.

**संदर्भसुची**


1. आंबेडकर बाबासाहेब डॉ. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे', खंड 18 भाग 1 1920–1935, रोडगे प्रकाशन लष्करी बाग, नागपूर पृ.क्र. 7.
2. कोसारे एच एल, 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास', नेहा प्रकाशन, नागपूर., प्रथम आवृत्ती 1984 पृ. क्र. 252.
3. गायकवाड प्रदीप 'राजर्षी शाहू महाराजांची निवडक भाषणे आणि आज्ञापत्रे', क्षितिज पब्लिकेशन, नागपूर प्रथम आवृत्ती बुद्ध जयंती 2002. पृ.क्र. 90
4. आंबेडकर डॉ.बा.आ.ले.आ.भा.खं. 18 भा. 1. पृ.क्र. 9.
5. डोंगरे कृष्णकांत कवडूजी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत नागपूर शहराचे योगदान' सुजित मुरमाडे बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर प्रथम आवृत्ती 14 ऑक्टोबर 2012. पृ. क्र. 136.
6. कित्ता पृ. क्र 159.
7. कित्ता
8. कोसारे वि.द.च.इ. पृ. क्र. 161
9. कित्ता पृ. क्र. 162.
10. बोभळे बाबाराव, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या चळवळीचा दृष्टीकोन', समता संगर प्रकाश दि पिपल एरा, 1, नेताजी मार्केट, सीताबर्डी, नागपूर. प्रथम आवृत्ती 14 ऑक्टोबर 2016., पृ. क्र. 66.
11. कित्ता.
12. आंबेडकर बाबासाहेब डॉ. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे', खंड 18, भाग 2 1936– 1945, रोडगे प्रकाशन लष्करी बाग, नागपूर पृ.क्र 388.
13. कित्ता
14. कित्ता पृ.क्र 388, 389

# विदर्भातील आंबेडकरी चळवळीत अस्पृश्य स्त्रीयांचे योगदान

प्रा. वासन्ती डी. खांडेकर
डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग
डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यु.एस.
कला आणि वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

**सारांश :** विदर्भ हा महाराष्ट्र राज्याचा एक भौगोलिक प्रदेश महाराष्ट्राच्या पूर्व दिशेला असून भारताच्या मध्यवर्ती ठिकाणी वसलेला आहे. विदर्भाचे क्षेत्रफळ ९8000 वर्ग किलोमीटर आहे. विदर्भात नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांचा समावेश असून, विदर्भाची विभागणी पूर्व विदर्भ व पश्चिम विदर्भ अशी करण्यात आली आहे. पूर्व विदर्भात नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यांचा समावेश होतो. तर पश्चिम विदर्भामध्ये अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम जिल्ह्यांचा समावेश होतो. पश्चिम विदर्भालाच वऱ्हाड प्रान्त म्हटल्या जातो. विदर्भाच्या पूर्व भागात संस्कृतीचा जास्त प्रभाव होता. समाजात संस्कृती आणि सभ्यता उत्क्रान्तीवादातूनच किंवा प्रक्रियेतून विकास पावतात. हा मानवाचा प्रवास समाजाच्या विकासाची दिशा आहे. सामाजिक जीवनात उतार–चढाव, भरती–ओहोटी येत असतात. हा विकासाचा प्रवास इतिहासाला जन्म देत असतो. सभ्यता आणि संस्कृती ह्या बाबी मानवनिर्मित आहेत. (1)

**शब्दसंकेत :** आंबेडकरी परिषदांमध्ये स्त्रीयांचा सहभाग, स्त्री सूधारणेचे कार्य आणि विविध कार्यात भाग.

**संशोधन पद्धती ::** ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना :** विदर्भातील चळवळीचा विचार करतांना असे दिसून येते की दलित स्त्रीयांचे नेतृत्व हे पुरूष नेतृत्वासोबतच स्त्रीयांचे नेतृत्व ही या चळवळीमध्ये फार मोठा सहभाग दिसून यतो. स्त्रीयांच्या नेतृत्वाचे वैशिष्टये हेच की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा आणि विचारांचा प्रभाव त्यांच्या मनावर पडलेला होता. स्त्रीयांच्या नेतृत्वाचे प्रयत्न हे अधिकच परिणामकारक झाले दिसून येते.

“स्त्री शुद्रौ नाधीयता मिमि श्रुति” असे स्मृति वचन आह. या वचनाप्रमाणे स्त्रीयांवर व शुद्रांवर हिंदू धर्माने नानाविध बंधने घातले होते त्यामुळे सवर्ण हिंदू स्त्री शिक्षणाच्या बाबत होती. ब्रिटिशाच्या शासनांपासून या देशात शिक्षणाच्या प्रसाराला चालना मिळाली यातूनच लोकहितवादी, महात्मा ज्योतिबा फुले इत्यादी समाज सुधारक उदयास आले. समाज सुधारकांची चळवळ फक्त उच्च वर्णातील वर्गापूरतीच मर्यादित होती. स्त्री वर्गावर सुधारणावादी विचारांचा ‘ओघ’ हा उच्चवर्गीय स्त्री समाजापर्यंत होता त्यामुळे दलित स्त्री वर्गावर या समान सुधारकांच्या चळवळीचा काही परिणाम होवू शकला नाही. त्या दलित समाजातील व अस्पृच्य असल्या कारणांनी दलित–अस्पृश्य चळवळीचे जनक महात्मा ज्योतिबा फुले यांनी दलित स्त्री वर्गाला सुशिक्षित करण्यासाठी 19 व्या शतकात शाळा स्थापन केल्या. अस्पृश्य मांग–महारांच्या मुलींना शिक्षण देण्याकरिता महाराष्ट्रात म्हणजे पूण्यात पहिली शाळा काढून दलित स्त्री समाजाच्या बौद्धीक उत्थानांचा, विकासांचा पाया प्रथम रचला. दलित स्त्रीयांच्या उत्थानाचा प्रयत्न करण्याचा मान महात्मा ज्योतिराव फुलेंनाच जातो. त्याचप्रमाणे सामाजिक क्रान्ती घडवून आणणाऱ्या समाज सुधारकांच्यामध्ये छत्रपती शाहू महाराज हे अग्रस्थानी आहेत. कै. विठ्ठल रामजी शिंदे यांनी दलित समाजाच्या उत्थानाकरिता फार मोठे कार्य केले. यांनी महाराष्ट्रात इतर ठिकाणी तसच विदर्भात अस्पृश्य दलित मुलींसाठी शाळा स्थापन करून त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले. (2)

अस्पृश्यांची चळवळ ही अस्पृश्य समाजाच्या उत्थानाच्या, विकासाच्या चळवळीशी निगडीत होती. अस्पृश्य समाजाला सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय सवलती उपलब्ध होत गेल्या आणि अस्पृश्य स्त्रीयांनी सुद्धा समाजाच्या प्रगतीच्या चढाओढीत म्हणजेच चळवळीत पुरूष वर्गाच्या बरोबरीने हिरिरीने सहभाग घेवून कार्य करीत होत्या. हिंदू समाजातील स्त्री वर्गाचा विचार करतांना हे लक्षात येते की त्रेवर्णिय हिंदू स्त्रीया आणि बहुजन समाजातील शुद्र समजल्या जाणाऱ्या वर्गातील सवर्ण अथवा अस्पृश्य वर्गातील स्त्रीयांच्या सामाजिक अडचणी, प्रश्न, समस्यामध्ये फार मोठे अंतर आढळते. त्रैवर्णिय स्त्रीयांना कोणतेही सामाजिक स्वातंत्र्य नव्हते. त्रैवर्णिय हिंदू स्त्रीयांना कोणत्याही प्रकारे घटस्‍फोट घेण्याचा अथवा विवाह विच्छेद करण्याचा अधिकार सुद्धा नव्हता. पूनर्विवाह सुद्धा करता येत नव्हता. पति निधनानंतर तिच्या डोक्याचे केशावपन करण्यात येत असे किंवा पतिसोबत सती जावे लागत होते. पतिगृही तिचा

कितीही छळ झाला तरी तिला स्वत:च्या आई-बापाच्या आश्रयाला जाता येत नव्हते कारण तिचे कन्यादान झाले असे कोणत्याही वस्तू दान केले की त्या व्यक्तिची मालकी होते. हेच हे दानाचे तत्व आहे. म्हणजेच त्रैवर्णीय हिंदू स्त्रीया ह्यासुद्धा वस्तु, मालमत्ताच समजली जात होती.ह्या स्त्रीयांना मानवी स्वतंत्र अस्तित्व हिंदू धर्मग्रंथात मान्य नव्हते. धर्मग्रंथाच्या आधारेच वस्तू सारखी स्त्रीयांची विल्हेवाट लावतांना तिचे कन्यादान केले जात होते. त्रैवर्णीय हिंदू स्त्री कायमची पुरूषाच्या गुलामगिरीत व सामाजिक दुष्ट, रूढी परंपराच्या बंधनात गुरफटलेली, होरपडली गेली होती असे दिसून येते. परंतु हुन्डा पद्धती ही तर त्यांच्या जीवनातील भयंकर सामाजिक रूढी होती आणि आजही त्या रूढी परंपरा पायी असंख्य स्त्रीयांचे बळी घेतले जात आहेत. (3)

बहुजन समाज व अस्पृश्य वर्गातील स्त्रीयां मात्र ह्या सर्व सामाजिक दास्यत्वाच्या बंधनापासून पूर्णत: मुक्त होत्या. बहुजन समाज वर्गातील स्त्री वर्गाला बरेच व्यापक सामाजिक स्वातंत्र्य होते. या स्त्रीयांना घटस्फोट आणि काडीमोड करण्याचा सामाजिक रूढीने अधिकार होता. ह्या स्त्रीयांना पति निधनानंतर पुनर्विवाह करता येत होता. घटस्फोट, काडीमोड घेतल्यानंतर पहिला पति जिवंत असतांना त्या स्त्रीला दुसरा घर-दार करण्याचा हक्क होता अश्या प्रकारच्या विवाहाला 'पाट लावणे' असे म्हटले जात होते. ह्या प्रथेला सामाजिक मान्यता होती. पति निधनानंतर तिला लहान दिरा बराबर विवाह करता येत होता त्याला गरसारी बांयधणे असे म्हटले जात होते. पति निधनानंतर या स्त्रीयांना तसेच बहुजन समाजातील स्त्रीयांना केशापपन करावे लागत नव्हते. पति निधनानंतर ह्या पतिपासून तिला जर मुले असतील व तिचा पूनर्विवाह झाला तर त्या दुसऱ्या पतिला ह्या मुला-बाळाची जबाबदारी सांभाळावी लागत असे ह्या मुलांना आणल्याघरची मुल असे संबोधण्यात येत असे परंतु बालविवाह प्रथा मात्र सर्वच समाजामध्ये रूढ झाली होती. अस्पृश्य समाजात - बहुजन समाजात सुद्धा बालविवाह प्रथा मान्यता पावली होती. या स्त्रीयांना काडीमोड करण्याचा अधिकारअसल्यामुळे कोणत्याही अन्याय प्रसंगी तिला आई-बापाचा आश्रय घेता येत होता. अस्पृश्य समाजातील स्त्रीयांना 'कन्यादान' तत्व मान्य नसल्याचे दिसून येते. पुनर्विवाह आणि पाट करून घटस्फोट-काडीमोड घेतलेल्या या स्त्रीयांना आपले वैवाहीक जीवन नव्याने सुरू करता येत होते. अस्पृश्य समाजात बहुपत्नीत्वाची चाल रूढ असल्या कारणांनी या स्त्रीयांना पुनर्विवाह करण्यास कोणतीच अडचण येत नव्हती. त्यावेळी स्त्री मात्र ह्या सर्व सामाजिक अनिष्ट रूढीपासून मुक्त असलेली दिसून येते. यावरून हे सिद्ध होते की या स्त्रीया ह्या सुरूवातीपासूनच सामाजिक स्वातंत्र्य उपभोगात आलेल्या आहेत.(4)

अस्पृश्य समाज त्या काळात अस्पृश्य व बहिष्कृत मानला जात होता. ह्या समाजाचा सामाजिक दर्जा कितीही कनिष्ट, हिन गणला गेला असला, तो दारिद्रयात खितपत असला तरी या समाजाचे आपल्या स्त्री वर्गाच्या सामाजिक दर्जा संबंधीचे आचार-विचार व व्यवहार हे पुढारलेले व आधुनिक होते हे मान्य करावेच लागेल. हे सुद्धा मान्य करावे लागते की या स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीचे स्वातंत्र्य होते. आर्थिक क्षेत्रात या स्त्री या पुरूषांच्या बरोबरीने मोल-मजूरी, मेहनत, शेतीतील कामे, गिरणीतील कामे असो अथवा गृहनिर्माण कामे आणि वेळ प्रसंग पडल्यास कोणत्याही प्रकारचे श्रममजूरीचे काम असो दलित स्त्रीया पुरूषांच्या सोबत व बरोबरीने कार्यरत राहिल्या असल्याचे दिसून येतात. अस्पृष्य समाज वर्गातील महार समाजालाच विदर्भात पूर्वी विणकरी हाच प्रमुख व्यवसाय होता. नागपरात भोसल्याच्या राजवाटीच्या काळात विणकर महारांना 'मेठ्ठ' असे संबोधण्यात येत असे. सर्वत्र ग्रामीण जनतेच्या गरजेचे व आवश्यकतेचे कापड प्रत्येक जिल्ह्यातून तयार करणारा विणकर हा महाराज होता. तेव्हा विणकरीच्या व्यवसायात या स्त्रीया ह्या पुरूषाच्या बरोबरीने बरच काही काम करीत होत्या उदा. कांड्या भरणे, चरख्यावर सुत कातणे, तान्हा लावणे, चींचोऱ्यांची (कांज्जी) गज्जी धाग्याना देणे इत्यादी कामात मदतच होती.(5)

हुंड्याची प्रथा या समाजात कधीच नव्हती. उलट सुधारणेच्या काळापूर्वी महार समाजात मुलींवर काही रक्कम घेण्याची वहिवाट होती परंतु ही प्रथा सऱ्हास वापरण्यांस येत नव्हती. नागपुरातील जाती पंचायतीच्या सभेत 1920 मध्ये मुक्तेवर पैसे घेवू नये आणि पाटाच्या बाईवर वा स्त्रीवर बापाने फक्त पंचवीस रूपये द्यावे असा निर्णय घेतला गेला होता. लग्नात मुलीच्या आई-बापांनी वर पक्षाला दागिने वगैरे देणे हे केवळ वर पक्षाच्या मर्जीवर व ऐपतीवर अवलंबून होते. अस्पृश्य समाजातील स्त्री ही लग्नादि व्यवहारात विकली जाणारी अथवा खरेदी केली जाणारी वस्तू समजली जात नव्हती. तसेच हुंडा सुद्धा दिला जात नव्हता. अशा समानतेच्या पातळीवर या समाजातील अस्पृश्य स्त्रोयांचा सामाजिक दर्जा असल्याचे दिसून येते. (6)

अस्पृश्य स्त्रीयांचा समाजांतर्गत असलेला सामाजिक दर्जा हा समान पातळीवर होता. या स्त्रीयांना स्वत:च्या सामाजिक दासत्वाच्या मुक्तीची चळवळ स्वतंत्रपणे उभारण्याची गरज मुळीच भासली नाही. या स्त्रीया आणि पुरूषांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व

राजकीय प्रश्न एकच व सारखेच असल्यामुळे या समाजाच्या सर्व व्यापक उत्थानाच्या चळवळीत यास्त्रीया समरस व सहभागी होण्यास प्रवृत्त झाल्या. अस्पृश्य समाजाच्या उन्नतिकरीता, विकासाकरीता नागपूरला 1906 मध्ये `महार सभा` संस्थास्थापन करण्यात आली होती. महार सभेचे विठोबा रावजी मून हे 1913 पर्यंत अध्यक्ष होते. नंतर 15 मार्च 1914 पासून टाकळी मिशन हाऊसचे रेव्हरंड जार्ज डेव्हनपोर्ट फिलिप हे अध्यक्ष आणि विठोबा रावजी मून हे सेक्रेटरी होते. त्यावेळी एकूणच 64 महारप्रमुख `महार सभे` चे सभासद होते. त्या स्त्रीयांपैको श्रीमती तुळसाबाई बन्सोडे (किसन फागू बनसोडे यांची पत्नि) ह्याएकट्याच महार सभेच्या सभासद होत्या. सामाजिक व शैक्षणिक जागृती घडवून आणणे हाच एक उद्देश्य घेवून महार सभेचे कार्य होते. अस्पृश्य समाजाला शिक्षणाची संधी व सवलती उपलब्ध करून देणे आणि मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढत राहावे त्यासाठी नेहमी प्रेरीत होवून कार्य करणे व शिक्षणाचा प्रचार व प्रसार या समाजात मोठ्या प्रमाणात व्हावा ही महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेमुळे या समाजातील स्त्रीयांच्या शिक्षणात विशेष महत्व देण्यात आल्याचे दिसते. (7)

अस्पृश्य स्त्री समाजाची व्यथा फार वेगळी होती. या स्त्रीया माणुसकीचे स्वतंत्र जीवन उपभोगण्यासाठी धडपडू लागल्या. माणूसकीचे हक्क मिळविण्याची अस्पृश्यांची चळवळ ही साधी-सोपी कधीच नव्हती. पावलो-पावली संघर्ष करावा लागला. सवर्ण हिंदूनी अस्पृश्यांच्या मुक्ती चळवळीचे पाय छाटण्याचे अत्यन्त कठोर आणि अघोरी कृत्य केले दलितांचा अतोनात छळ केला या समाजातील लोकांवर सवर्ण हिंदूनी गाव बहिष्कार, सामाजिक बहिष्कार टाकून त्यांच्या नोकरी-धंदा, बाजार दलितांची कोंडी केली. ह्या सर्व अन्याय-अत्याचारांची अग्निची आच या स्त्रीयांना सुद्धा लागली. निरनिराळ्या प्रकारे या स्त्रीयावर अन्याय होवू लागले. या समाजातील स्त्रीयांना शहरात मिलमध्ये (एम्प्रेस मिल, मॉडेल मिल) नोकरीनिमित्त जावे लागत असे त्याचप्रमाणे संत्रा मंडी (संत्रा मार्केट), भाजो मंडी, धान्य गंज (इतवारा) इत्यादी अनेक व्यापार-धंद्याच्या ठिकाणी (धान्य बाजार, बगडगंज) दलित स्त्रीयांना धंद्यासाठी अथवा मोलमजूरीकरीता जाणे अत्यावश्यक होते व आहे कारण आपल्या परिवाराचा - कुटूंबातील मुला-मुलींच्या पालन-पोषणाची जबाबदारी व पतिला आर्थिक सहकार्य मिळावे आणि आपला प्रपंच सुखी-समाधानाने जावे ह्याच भावनेने त्या सर्व स्त्रीया दाराबाहेर पडून आपली कर्तव्य पार पाडित होत्या. अशा वेळी या स्त्रीयांच्या आर्थिक दुबळेपणाचा फायदा घेण्यास त्या फुस लावण्यास बाटवणे जबरदस्तीने छेडखानी करणे व बेअब्रु करणे किंवा पळवून नेऊन वाम मार्गाला लावणे हे सर्व प्रकार शहरातून दलित स्त्रीयांच्या बाबतीत सर्रास चालू लागले होते. या स्त्रीयांच्या वाली कोणीही नव्हता ब्रिटिश सरकार ह्याकडे लक्ष देत नव्हते. मुसलमानांनी ही यांच्या स्त्रीयांचा असहाय परिस्थितीचा फायदा उचलेले दिसून येतो. या समाजाला आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराबद्दल जाणिक होवून आपण स्वत:चे संरक्षण आपण केले पाहिजे. ह्या जाणिवेन महार समाजातील तरूण पेटून उठला आणि ह्या सर्वांनी एकत्रित येवून आपल्यावर होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या अन्याय-अत्याचाराविरूद्ध प्रतिकार करण्याची शक्ती महारांनी दाखवून दिली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय वंचित समाज नवचैतन्याने आणि स्वाभिमानाच्या जिद्दीने पेटून सामाजिक क्रान्तीच्या संघर्षाचे रणसिंग फुंकले आणि विदर्भातील या स्त्रीयांना संरक्षण, सुरक्षा, आत्मबल निर्माण करणाऱ्या महार तरूण संघाच्या लोकांनी केला. आपल्यावर अन्याय-अत्याचार, शोषण, जुलूम करणाऱ्या विरूद्ध वंचित समाजातील युवकांनी संघर्ष करून लढा देतच राहिल आणि या स्त्रीयांनी सुद्धा या संघर्षात आपले साहस, धाडस पणास लावलेले दिसतात आणि आज सुद्धा अन्याय-अत्याचाराविरूद्ध आवाज उठविण्यात ते ही तत्पर असतात. आणि सर्व अस्पृश्य समाज ह्या स्त्रीयांच्या पाठीशी संघर्षासाठी पूर्ण शक्तीनीशी संघर्ष करण्यास तयार असतात. (8)

विदर्भातील सर्व वंचित समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून नेहमीच त्यापाठीशी एक शक्तो म्हणून उभा राहिला आहे. त्यामुळे या स्त्री-पुरूषांच्या जीवनावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा आणि कार्याचा फार मोठा प्रभाव पडला आणि प्रेरित केलेल्या सामाजिक क्रांतीच्या विचाराने दलित स्त्री सुद्धा सामाजिक क्रांतीला सामोरी गेली आपण पाहतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1927मध्ये दलित समाजाचा सार्वजनिक पाण्याचा व पाणवठ्याचा अधिकार प्रस्थापित करण्याकरिता महाडच्या चवदार तळ्याचा लढा उभा केला आणि त्याच सत्याग्रहाने अखिल जीवनात स्वाभिमानाने व माणूसकीने जगण्याची जाणिव अन्त:करणात प्रज्वलित अस्पश्य समाजामध्ये झाली.

1920 साली नागपूरला भारतीय बहिष्कृत परिषद कोल्हापूरचे छत्रपति शाहू महाराज यांच्या नेतृत्वात झाली. ह्या परिषदेला या समाजातील स्त्रीयासुद्धा पुरूष वर्गासोबत उपस्थित होत्या. ह्या परिषदेत मंजूर करण्यात आलेल्या सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या

ठरावावर सौ. तुळसाबाई बनसोडे व कु. रूक्मिणीबाई यांनी आपले विचार निर्भीडपणे मुलींच्या सक्तीच्या शिक्षणाची नितान्त आवश्यकता आहे. म्हणजे ह्या परिषदेत स्त्री शिक्षणावर भर देण्यात आलेला होता. आपले कुटूंब सांभाळून डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणेतून त्या स्वत:ला सक्षम बनविण्यास तयार झाल्या. (9)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय दलित कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन नागपूर येथे 8 व 9 ऑगष्ट 1930 रोजी घेण्यात आले होते. त्यावेळी दलित महिला परिषदेच्या पुण्याच्या सौ. गुणाबाई गडेकर यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आली होती ह्या दलित महिला परिषदेच्या स्वागताध्यक्षा सौ. शेवंताबाई ओगले, अमरावती आणि सेक्रेटरी सौ. तुळसाबाई बन्सोड पाटील, नागपूर, सौ. जाईबाई चौधरी, नागपूर व सौ. काशीबाई मांडवधरे, अकोला ह्या होत्या. ह्या परिषदेत अस्पृश्य समाजाच्या स्त्रीयांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आले. त्याचप्रमाणे स्त्रीयांना शिक्षण देण्याच्या बाबतीत या समाजातील लोकांमध्ये जागृती निर्माण कारण्याचे कार्य फार जोमाने करण्यात सुरू झाले होते.

वर्धा जिल्हा येथे वर्धा जिल्हा अस्पृश्य परिषद 6 एप्रिल 1934 रोजी बोरगांव (अलोडी) येथे घेण्यात आली होती. ह्या परिषदेत स्त्री शिक्षणासाठी सवलती मिळाव्यात तसेच वैवाहिक जीवनाबाबत सुधारणा घडवून आणण्या संबंध ठराव मंजूर करण्यात आले होते. अशाच प्रकारचे ठराव सर्व विदर्भातून निरनिराळ्या सभाद्वारे, परिषदाद्वारे मुलींच्या शिक्षणाला चालना व प्रोत्साहन देण्यातच झाला.

जिल्हा बुलढाणा मुक्काम, मलकापूर येथे अस्पृश्य महिला परिषद 28 मार्च 1934 ला मिसेस कमलाबाई रेगे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या परिषदेत महिलाने आपले विचार मांडताना सर्व स्त्रीयांनी ठराव मांडतांना सांगितले, 1) अस्पृश्य मुला-मुलींची शिक्षणाची सरकारी अहवाला प्रमाणे (रिपोर्ट) व्यवस्था करणे. 2) शारदा बिलाची अंमलबजावणी करणे. 3) मुलांचे नार्मल व मुलीचे फिमेल नार्मल शाळामध्ये अस्पृश्याच्या मुला-मुलींना जास्तीत-जास्त सवलती देणे. (10)

जिल्हा भंडारा, तुमसर येथे 1934 मध्ये अस्पृश्य महिलांची सभेत सौ. सुभद्राबाई रामटेके यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता ह्या सभेत दलित स्त्रीयांना आपले विचार मांडतांना सांगितले की सर्व स्त्रीयांनी आपआपल्या मुलांना-मुलींना शिक्षणाची आवड, गोडी निर्माण करावी त्यासाठी प्रयत्न करून आपणही थोडा फार शिक्षण घेण्याचा प्रयत्न करावा.

जिल्हा नागपूर कामठी येथे 1932 मध्ये अखिल भारतीय दलित कॉंग्रेसच्या अधिवेशनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अखिल भारतीय डिप्रेस्ड क्लासेस फेडरेशनची स्थापना केली होती. या दलित फेडरेशनच्या महिला संघटक म्हणून कार्य करणाऱ्या कु. वीरेन्द्रबाई तीर्थकर ह्या कार्य करित होत्या. ह्या मध्यप्रान्त वऱ्हाड येथिल दलित फेडरेशनच्या एक प्रान्तिक सेक्रेटरी (सचिव) होत्या. अस्पृश्य स्त्री चळवळीच्या कार्यात त्यांनी मोलाची कामगिरी केली. ह्या बरेच वर्षे चळवळीत कार्यरत राहिल्या.

नागपूर येथिल नवी शुक्रवारी येथे अनाथ अस्पृश्य मुलींचे बोर्डींग (वसतीगृह) ह्या ठिकाणी सौ. अंजनीबाई देशभ्रतार ह्या लेडी सुपरिंटेडेन्ट (महिला अध्यक्षिका) यांनी मध्य प्रान्त वऱ्हाड अस्पृश्य विद्यार्थींचे सम्मेलन 24 व 24 मे 1936 रोजी नागपूर कॉटन माकट येथे आयोजित केले होते. (11)

त्याचप्रमाणे नागपुरातील साऊथ अंबाझरी (उत्तर अंबाझरी) रोड वर असलेले आजचे अस्पृश्य मुलींचे वसतीगृह बोर्डिंग हे सौ. अंजनाबाई देशभ्रतार व त्यांचे पति कै. कृष्णराव देशभ्रतार यांनी स्थापन केले होते. या दांपत्यांनी अनेक अडचणींना सामोराजात व खस्ता खावून ते बरेच वर्ष चालविले होते आणि ह्या अस्पृश्य विद्यार्थीनींच्या सम्मेलनाच्या स्वागताध्यक्षा सौ. यशोदाबाई डहाट या होत्या.

1 मार्च 1936 रोजी पांचपावली, नागपूर येथे नागपूर जिल्हा अस्पृश्य महिला परिषद घेण्यात आली. त्या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेस पाठिंबा देणत आलेला होता. कारण येवले ह्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मात राहणे नाकारले होते व घोषणेत त्यांचे ब्रिद वाक्य होते. “मी हिंदू धर्मात जन्माला आलो हा माझा दोष नाही, पण मी हिंदू धर्मात मरणार नाही हे माझ्या हातात आहे.” आणि ही घोषणा सुद्धा काळानुसार सत्य झाली.

अस्पृश्य सुधारक लंडन सहाय्यक मंडळ, नागपूर येथे ऑगष्ट 1936 मध्ये संस्था स्थापन करण्यात आली होती या संस्थेचे अध्यक्ष श्री. हरिप्रसाद देवराव माणके होते व सहसेक्रेटरी सौ. अंजनीबाई देशभ्रतार आणि कु. विरेंद्राबाई तीर्थकर व सौ. द्रोपदाबाई सावरकर ह्या सदस्य होत्या आणि ह्या संस्थेद्वारा दलित महिलाच्या विकासाचा सुद्धा विचार केला जात होता. (12)

**अस्पृश्य महिला सुधारक मंडळ :** अस्पृश्य महिला सुधारक मंडळाची स्थापना सौ.जानकीबाई फुले (रावसाहेब फुले वकील यांच्या पत्नी) यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर इमामवाडा येथे 26 एप्रिल 1937 रोजी अस्पृश्य महिला सुधारक मंडळाच्या सभेत अस्पृश्य महिलांची सुधारणा त्यांनी स्वत:च्या पायावर उभे राहून उन्नती, विकास, उत्थानाच्या दृष्टिने विचार मांडण्यात आले अशा प्रकारे त्यांनी जागृत राहून सामाजिक, धार्मिक व आर्थिक हक्क मिळविण्यासाठी प्रयत्न करणे हा या मंडळाचा उद्देश होता. या मंडळाच्या अध्यक्षा कु. विरेन्द्राबाई तीर्थकर, उपाध्यक्ष सौ. अंजनीबाई देशभ्रतार, जनरल सेक्रेटरी सौ. राधाबाई कामळे ह्या होत्या.

अस्पृश्य महिला सभा द्वारा 1 जानेवारी 1938 रोजी धरमपेठ, नागपूर येथे सभा घेण्यात आली. या सभेच्या अध्यक्षा श्रीमती सखुबाई मेश्राम होत्या. या सभेत सौ. अंजनीबाई देशभ्रतार यांनी आपल्या भाषणात अस्पृश्य समाजातील स्त्रीयांनी आपली संपूर्ण सुधारणा व उन्नती, विकास करून घ्यावयाचीी, स्वाभिमानाची व स्वावलंबनाची चळवळ करून समाजाचे नि:स्वार्थीपणे कार्य केले पाहिजे. दुसरे लोक येवून आपली सुधारणा करतील, ह्या भ्रामक कल्पनेत राहू नये. ह्या भ्रामक कल्पना आपण सोडून दिलो पाहिजे आणि आपण आपल्याच पायावर उभे राहिले पाहिजे व आपली स्वत:ची आपल्या कुटूंबाची व समाजाची सुधारणा करणे अत्यावश्क आहे. त्याचप्रमाणे त्या सभेतच 'श्रीमती रमाबाई आंबेडकर महिला संघ' ही संस्था स्थापन करण्यात आली होती.

नागपूर जिल्हा उमरेड तालुका येथे 20 एप्रिल 1940 रोजी अस्पृश्य महिला परिषद घेण्यात आली. या परिषदेच्या अध्यक्षा सौ. सुलोचनाबाई डोंगरे ह्या होत्या. या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वावर विश्वास प्रकट करण्यात आला आणि त्यांच्या कार्याचा विचार सभेत मांडण्यात आला आणि तालुक्याच्या प्रत्येक ठिकाणी अस्पृश्य महिला समता दले स्थापन करण्यात यावे तसेच राज्यघटनेत असेब्लित अस्पृश्य महिलाकरीता राखीव जागा असावी अशा प्रकारे ठराव पास करण्यात आले.

नागपूर कामठी येथे अस्पृश्य महिलांच्या सभेत 'भगिनी मंडळ कामठी' या संस्थेची स्थापना 2 नोव्हेंबर 1940 रोजी करण्यात आली. ह्या संस्थेच्या अध्यक्षा सौ. भागाबाई मानवटकर व सेक्रेटरी सौ. जानकीबाई मानवटकर व सहसेक्रेटरी सौ. द्रोपदाबाई डहाट ह्या होत्या. सौ. जाईबाई चौधरी यांनी अस्पृश्य मुलींची प्रायमरी शाळा स्थापन करून दलित स्त्री वर्गात शैक्षणिक जागृती निर्माण करण्याचे व्रत अंगिकारले होते. गड्डीगोदाम, लष्करीबाग, अस्पृश्य कामगारांच्या वस्तीतून मुलींना शाळेत आणीत असे एका लहानशा घराच्या अर्ध्या भागात शाळा चालवित अस्पृश्य अशिक्षित आई-वडिलांना समजावून मुलींच्या शिक्षणाचे महत्व सांगून त्यांना शाळेत येण्यासाठी प्रवृत्त करणे. जाईबाई स्वत: दानपेटी हाती घेवून नागपूरच्या वस्ती-वस्तीत जाऊन देणगी गोळा करून त्या देणगीला अस्पृश्य समाजातील दलित चळवळीतील महिलांमध्ये जाईबाईचे हे कार्य अतुलनीय आहे. आज सुद्धा ह्या शाळेत मुली शिक्षण घेत आहेत. (13)

**अखिल भारतीय अस्पृश्य महिला परिषद 1942 :** अखिल भारतीय दलित महिला वर्ग परिषदेचे तिसरे अधिवेशन (मोहन पार्क म्हणजे कस्तुरचंद पार्क ह्या पार्कला मिना बाजार म्हणत असत.) श्रीमंत घरातील स्त्रीयासाठी बाजार भरत होता. नागपूरला 18, 19 व 20 जुलै 1942 रोजी भरविण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या परिषदेला उपस्थित होते. रावबहादूर एन. शिवराज यांची या परिषदेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली होती. याच वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना व्हाईसरॉयच्या मंत्री मंडळात घेण्यात आले होते. अखिल भारतीय महिला परिषदेचे पहिले अधिवेशन 20 जुलै रोजी घेण्यात आले आणि ह्या परिषद सौ. सुलोचनाबाई डोंगरे, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या दलित महिला परिषदेच्या स्वागताध्यक्षा सौ. किर्तीबाई पाटिल व जनरल सेक्रेटरी सौ. इंदिराबाई पाटिल ह्या होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत: या अखिल भारतीय दलित महिला परिषदेला स्वत: जातीने उपस्थित होते. ह्या दलित महिला परिषदेत वा अधिवेशनात सौ. जाईबाई चौधरी, सौ. राधाबाई कामळे, कु. प्रभावती रामटेके, कु. भीमाबाई बडगे, कु. मंजुळा कानफाडे, कु. लतिका गजभिये, कु. सुलोचना नाईक, अमरावती कु. विरेंद्राबाई तीर्थकर, कु. चंद्रभागा पाटिल, गोंदिया, कु. कौसल्या नंदेश्वर यांनी ठरावावर आपले विचार मांडले. कारण ह्या परिषदेत महिलाच्या, मुलांच्या -मुलींची विकासाच्या दृष्टीने ठराव मांडण्यात आले हाते. सर्वांगीण विकासासाठी.

नागपूरात घेण्यात आलेली ही पहिलीच दलित महिलांची अखिल भारतीय स्तरावरील परिषदेचे विशेष वैशिष्ट्य होते. विशेष म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वत: जातीने उपस्थित राहून या महिला परिषदेचे वा अधिवेशनाची कार्यवाहीचे अवलोकन करीत होते. या महिला परिषदेत 20 ते 25 हजार अस्पृश्य महिला उपस्थित झाल्या होत्या. एवढ्या मोठ्या प्रचंड संख्येने या महिला चळवळीच्या

इतिहासातील फार मोठी आणि पहिला प्रसंग होता. या दलित स्त्रीयांच्या प्रगतीची, जाणिवेची, प्रेरणेची गतिमानता ही भर भक्कमपणे रोवल्याची दिसून येत होती. (14)

या महिला परिषदेत डॉ. बाबासाहेब आपले वक्तव्य (भाषण) करतांना म्हणाले, स्त्री वर्गात जाणिव व जागृती निर्माण झाली आहे. आणि त्या अस्पृश्य समाजाची फार मोठी प्रगति घडवून आणण्यासाठी सक्षम, बलशाली झाल्या आहेत. याची जाणिव मला झाली आहे. स्त्रीयांनी व महिलांची संघटीत संस्था असावी, सामाजिक दुर्गुन, समस्या, नाहीसे करण्यात वा सोडविण्यास त्याची फार मोठी सेवा होईल. या समाजाचे कार्य जेव्हा मी करावयास लागलो तेव्हा मी निर्धार केला होता की पुरूषांच्या बरोबरीत व खांद्याला खांद्या मिळवून स्त्रीयांना सुद्धा पुढे नेता येईल. स्त्री समाजाने किती प्रमाणात प्रगती केली आहे यावरून मी दलित समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करतो. या अखिल भारतीय दलित महिला परिषदेतील महिलांची प्रचंड संख्येने असलेली उपस्थिती पाहून माझी खात्री आहे व मनातून मला आनंद ही वाटत आहे. डॉ. आंबेडकरांनी दलित महिलांना जो उपदेश केलो अत्यंत महत्वपूर्ण आहे किवा होता.

अखिल भारतीय अस्पृश्य महिला परिषदेचे स्वागताध्यक्ष कै. जी. टी. मेश्राम यांना दिल्लीवरून लिहिल्या पत्रात (3 ऑगष्ट 1942 च्या पत्रात) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिहतात. महिला परिषदेने मला अत्यन्त प्रभावित केले. मी महिलांच्या पक्षपाती व शुभचिंतक आहे आणि सामाजिक, शैक्षणिक कार्यात ह्या मलिांनी अधिका-अधिक पुढाकार घेणे मला आवडेल. अधिवेशनात हजारोंच्या संख्येने स्त्रीयांनी महिलांनी उपस्थित, हजर राहणे हे दृश्य सुद्धा इतके विलोभनिय होते. त्यांचा नीटनेटकेपणा, पेहरावा, राहणीमान आणि आत्मविश्वासाने त्या वावरत होत्या. हा त्यांचा निर्धारच माझ्या अन्त:करणात हर्ष निर्माण करणारा होता. ह्या चळवळीतील स्त्रीयांबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनोगत फारच बोलके आहे. ह्या दरम्यान स्त्री समाजात फार मोठी वैचारिक व सामाजिक, शैक्षणिक क्रान्ती घडून येण्यास मदत झाली आहे. अस्पृश्यांच्या उत्थानाच्या – विकासाच्या सामाजिक व राजकीय लढ्यात स्त्रीयांनी पुरूषांच्या बरोबरीने व खांद्याला खांदा लावून पावले उचलली. विचार जागृती, जाणिवे बरोबरच स्त्रीयांतील स्वाभिमान, आत्मविश्वास वाढलेला होता असेच समजून येते आणि त्या प्रत्यक्ष क्षेत्रांत पुढाकार घेवून कार्य करीत होत्या.(15)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नाशिक येथील येवले या ठिकाणी 1935 मध्ये धर्मांतराची घोषणा केल्यापासूनच हिंदू धर्मातील चाली-रिती, रूढी-परंपरा, प्रथा झुगारून देण्यासाठी बंडाचे निशाण या समाजानी उभारले होते. त्यामुळे या स्त्रीयांची मानसिक व वैचारिक परिवर्तनाची तयारी त्या वीस वर्षाच्या सतत जागृतीने व प्रेरणेने पूर्ण झालेली दिसत येते. सामाजिक परिवर्तन घडविण्याच्या दृष्टीने 14 एप्रिल 1956 रोजी सर्व अस्पृश्य समाजाने हिंदू धर्माचा त्याग करून सामूहिक धर्मांतर केले. तथागत भगवान बुद्धाच्या मानवतावादी, कल्याणकारी धर्माचा स्वीकार केला. स्त्री जीवनात या घटनेला अतिशय महत्व आहे.

हिंदू धर्मातील रूढी, अंधविश्वास जुनाट बुरसटलेल्या, परंपरागत अशा अनिष्ट चाली-रीती व जात्यंध विचार, धर्मभावना, अनिष्ट आचार, प्रथा, कुप्रथा या सर्वांचाच अस्पृश्य स्त्रीयाने क्षणात त्यांचा त्याग केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अस्पृश्य बांधवांना बौद्ध धर्माची दिक्षा दिली. त्या क्षणाला अस्पृश्य समाजाला समजून आले की आपण अस्पृश्यतेच्या, विषमतेच्या व जाती भेदाच्या गुलामगिरीतून मुक्त झाल्याचा परमोच्च आनंद झाली. अस्पृश्य स्त्री समाज सुद्धा फारच मोठ्या, प्रचंड संख्येने बौद्ध धर्माचा स्वीकार करण्याकरिता उपस्थित होता. इतका प्रचंड स्त्री समुदाय यापूर्वी कधीही एकत्रित आलेला नव्हात. ते दृश्य अत्यन्त विलोभनिय, मनोवेधक होते. पांढ्या शुभ्र साड्या परिधान केलेल्या स्त्रीयांचा अथांग महासागर विलोभनीय दिसत होता. शांत, गंभीर, शिस्तबद्ध परिवारातील सारेच लोक बायका-मुलासहित आपल्या उद्धार कर्त्याच्या हस्ते दीक्षा ग्रहण करण्यास उत्साहान व निर्धाराने आले होते. पुरूषांच्या बरोबरीने स्त्रीयांनी ही धम्मदीक्षा घेतली. श्रद्धेने व जाणीवेने स्त्री जीवनात या धर्म परिवर्तनाने महान क्रान्ती घडवून आणली. मानवतावादी नवा विचार आधुनिक जगाला मान्य पावला, मानवतावादी आचार विचार व्यवहार स्त्रीयांनी स्वीकारला आणि हीच स्त्री चळवळीची सार्थकता होती. (16)

प्रत्येक क्षेत्रात अस्पृश्य स्त्रीयांचे पदार्पण झाले आहे. ती संधी मिळेल त्या ठिकाणी आमनिर्धाराने आपले तेज दाखवित आहे. अस्पृश्य समाज जीवनाने ही स्त्री तेजाळलेली आहे. आज विविध क्षेत्रांत, शिक्षण, कला, संगीत, सामाजिक व राजकीय क्षेत्रात स्त्री पुढे गेली आहे. महाविद्यालयातून फार मोठ्या प्रमाणात स्त्रीया शिक्षण घेत आहेत. अस्पृश्य स्त्रीया, अध्यापिका तसेच प्राध्यापिका, प्राचार्य आहेत. डॉक्टर्स झालेल्या आहेत. सरकारी नोकऱ्यामध्ये अधिकाराच्या जागांवर त्या रूजू आहेत. संगीत, कलेत ही दलित स्त्रीया निष्णात आहेत. या स्त्रीया लेखिका, कवियत्री आणि संस्कृत विषयाच्या प्राध्यापिका सुद्धा आहेत.

नागपूरची अस्पृश्य महिला सीताबाई पाटिल ही नावाजलेली आखाड्याची वस्ताद आहे. ती कुस्तीपासून, आखाड्याच्या तलवार, भाला, दाडपट्टा आदि मर्दानी खेळात निष्णात आहे. जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असलेल्या गोंडखैरी पंचायत समितीची सदस्य म्हणून निवडून सुद्धा आली. (17)विदर्भातील अस्पृश्य स्त्री ही विधानसभा, लोकसभा, राज्यसभेतील सभासद सुद्धा आहेत आणि कोर्ट कचेरीत कायद्याची बाजू वकिल, जज, न्यायाधीश म्हणून शालीनी गायकवाड सांभाळीत आहेत. आज दलित स्त्री ही आता पूर्वीसारखी, हतप्रभ मरगळलेली स्त्री राहिलेली नाही. या स्त्रीया ह्या जागृत, स्वाभिमानी व माणूसकीच्या धर्माला बांधिलकी, अन्यायाचा प्रतिकार करण्याची शक्ती तिच्यात आली आहे. समाजाकरिता आपले उत्तरदायित्व काय हे समजण्याची ताकद तिच्यात आलेली आहे. मानवतावादी धर्माप्रति तिची श्रद्धा व निष्ठा अपार आहे. शील हा सर्वश्रेष्ठ धर्म होय अशी दलित स्त्रीयांची श्रद्धा, विश्वास आहे.या स्त्रीया ह्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपले दैवत मानतात. या स्त्रीया तथागत भगवान बुद्धाने दिलेल्या धर्माचे पालन करित असून आपली सर्वांगीण व पूर्णत्वाने उन्नती व विकास करण्याकरिता आहेत तरी सुद्धा दलित स्त्रीया अद्याप ही बऱ्याच पुढे जावयाच्या आहेत. ही चळवळ येथेच संपलेली नाही. अस्पृश्य स्त्री चळवळ गतिमान ठेवूनच प्रगतिपथाच्या मार्गाने सतत चालत राहणे आवश्यक आहे. तरी सुद्धा या स्त्री समाजाने आपली प्रगती केलेली आहे आणि या करतच राहणार यात काही शंका नाही. (18)

**संदर्भ :**

1. कोसारे एच.एल. 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास', नेहा प्रकाशन, नागपूर. द्वितीय आवृत्ती 2012 पृ.क्र. 483

2. आयुष्मती मुन मिनाक्षी संपादिका, 'फुले आंबेडकरी स्त्री चळवळ', प्रकाशक व मुद्रक प्रदिप गायकवाड, समता प्रकाशन, नागपूर. प्रथम आवृत्ती 2002. पृ.क्र. 86, 134, 162

3. लव्हात्रे बबन, 'मध्यप्रान्त वऱ्हाडातील अस्पृश्य महार चळवळीचा इतिहास', प्रकाशकआनंद लव्हात्रे, डॉ. आंबेडकर बौद्ध विद्यापीठ प्रकाशन नागपूर- 14. प्रथमआवृत्ती 2008, पृ.क्र. 47, 123, 145

4. डॉ. मेश्राम योगेन्द्र, 'दलित साहित्य उद्‌गम आणि विकास', प्रकाशक श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर. प्रथम आवृत्ती 2011, पृ.क्र. 74,

5. लोखंडे हि. गो., लोखंडे भाऊ 'डॉ. आंबेडकरी सत्याग्रह' प्रकाशक सुधीर प्रकाशन, जि. वर्धा, प्रथम आवृत्ती 2008, पृ.क्र. 19, 47,

6. खरात शंकरराव, 'अस्पृश्यांचा मुक्ति संग्राम', प्रकाशक श्याम दयावर्ण कोपडेंकर, प्रकाशन, तृतीय आवृत्ती 2009, पृ.क्र. 165, 177,

7. धर्मवीर, 'डॉ. अम्बेडकर और दलित आन्दोलन' प्रकाशक शेष साहित्य प्रकाशन, शाहदरा, दिल्ली. संस्करण (आवृत्ती) प्रथम 1992

8. डॉ. आम्बेडकर बाबासाहेब, 'अस्पृश्यों का विद्रोह गांधी और उनका अनशन', बुद्धिस्ट रनिंग रेल कर्मचारी कल्याण सहकारो संघ, मध्य रेल नागपूर, प्रकाशन 18 अक्तुबर 2018,अशोका विजयादशमी पुर्व संध्या.

9. डॉ. परिहार एम. एल., 'बाबासाहेब अम्बेडकर लाईफ एंड मिशन', प्रकाशक - बुद्धम् पब्लिशर्स, 21-ए, धर्म पार्क, श्याम नगर - ll, जयपुर-19. पहला संस्करण 14 अप्रैल 2017, पृ.क्र. 221, 228, 300

10.डॉ.नगराळे मोहन भा., 'विदर्भातील दलित चळवळ', प्रकाशक डॉ. प्रदीप हाडके, नागपूर - 03, प्रथम आवृत्ती 14 आक्टोबर 2015, पृ.क्र. 37, 64, 80, 123, 124, 132.

11. प्रा. डॉ. मस्के बी. आर., 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास', प्रकाशन क्र. 978, प्रकाशक व मुद्रक नभ प्रकाशन, श्याम नगर, अमरावती. प्रथमावत्ती 14 एप्रिल 2013, पृ.क्र. 47, 113, 114, 161, 170, 215, 301, 366

12. बोभळे बाबाराव, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या चळवळीचा दृष्टिकोण', समता संगर प्रकाश दि. पिपल,एस-1,नेताजी मार्केट, सिताबर्डी, नागपूर, प्रथम आवृत्ती 14 ऑक्टोबर 2017, पृ.क. 66.

13. निंबाळकर वामन, 'दलित साहित्य एक वाङमयीन चळवळ', प्रकाशक - प्रबोधन प्रकाशन, क्र. 20, रामबाग, नागपूर.

14. फडके य. दि., 'आंबेडकरी चळवळ' विद्या प्रकाशन, पुणे.

15. मून वसंत, 'मध्य पूर्व प्रान्त वऱ्हाडातील आंबेडकरी दलित चळवळ' प्रकाशन 1987.

16. खांडेकर ताराचन्द्र, 'आंबेडकर तत्वज्ञान : प्रचीती आणि आविस्कार', प्रकाशक गजाभाऊ देशमुख, प्रभा प्रकाशन, देवनगर (खामला), नागपूर, प्रथमावृत्ती जानेवारी 1983, पृ.क्र. 80, 156, 164, 175.

17. मनोहर यशवंत, 'दलित साहित्य सिद्धान्त आणि स्वरूप', प्रबोधन प्रकाशन-5, प्रकाशक वामन निंबाळकर, औरंगाबाद, पहिली आवृत्ती 14 जानेवारी 1978, पृ.क्र. 54, 70, 83, 99.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतरामागील ऐतिहासिक पार्श्वभूमी

**प्रा. डॉ. महेंद्र गायकवाड**
इतिहास विभाग
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व
वणिज्य महाविद्यालय, कामठी रोड, नागपूर

**सारांश :–** 14 ऑक्टोंबर 1956 ला बाबासाहेब डॉ. आंबेडकरांनी आपल्या पाच लाख अनुयायासोबत नागपूर येथिल पवित्र दीक्षाभूमिवर धर्मातर केले. धर्मातर ही त्यांची तत्कालीन कृती नसुन या कृतीमागे ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.या कृतीमागे 21 वर्षांचा साधनेचा आणि त्याकाळात घडलेल्या अनेक घटनांची पार्श्वभूमी आहे.या कृतीमागे राष्ट्रीय एकात्मतेचा आणि राष्ट्राच्या सांस्कृतिक वारश्याचा गहन विचार आहे.भारतीयांच्या जीवनाचा व संस्कृतिचा अभिन्न घटक असलेल्या व जगात भारताची बौद्ध राष्ट्र म्हणुन जी ओळख आहे ती कायम ठेवून आणि भारताला धम्मराज्य (धर्मराज्य नाही)करूण लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी टाकलेले दूरगामी पाऊल होय.या कृतितुन डॉ.आंबेडकरांच्या दुरदृष्ट्रीची आणि त्यांच्या असिम राष्ट्र प्रेमाची प्रचिती येते. भारतीय सभ्यता आणि संस्कृतीचा ऐवढा गहन विचार डॉ.आंबेडकरांशिवाय फार कमी लोकांनी केल्याचे लक्षात येते.डॉ.आंबेडकर ईसाई किंवा ईस्लाम यापैकी कोणताही धर्म स्वीकारूण देशाचे वाटोळे सहज करू शकले असते परंतु त्यांना भारताच्या इतिहासात विद्‌वंसक म्हणुन स्वतःचे नाव लिहुन ठेवावयाचे नव्हते.स्पृश्य हिंदूंनी डॉ.आंबेडकरांच्या समाजाला ज्या हाल–अपेष्ठा दिल्या पशुतुल्य किंबहुना पशुहुनही नित्कृष्ठ जीवन जगण्यास हजारो वर्ष ज्यांनी बाध्य केले या स्पृश्यांच्या कृतीविरोधात केलेले धर्मातर म्हणजे भारतावर केलेले अनंत उपकार होय.

**शब्दः संकेत– वर्णव्यवस्था,अस्पृश्यता,त्यांचे अधिकार, स्पृश्यांची करावयाची कामे,त्यांची सामाजिक,आर्थिक,राजकीय स्थिती,स्पृश्यांचे बहिष्काराचे शस्त्र,अस्पृश्यांचा छळ,डॉ.आंबेडकरांचा छळ, त्यांचा ब्राम्हणी धर्मव्यवस्थेत सुधारणा करण्याचा प्रयत्न आणि धम्मक्रांती**

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक सशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**पार्श्वभूमी** :–ब्राम्हणी धर्मव्यवस्थेत अश्पृश्यांचे जीवन नरकतुल्य यातनांनी भरून होते.या धर्मव्यवस्थेने त्यांना अमंगल,अशुभ आणि अपवित्रतेचा कलंक जन्मजात लावला होता.अस्पृश्यांनी स्पृश्यांची करावयाची कामे निर्धारित करूण ठेवली होती.त्याला त्या चाकोरी बाहेर जाता येत नव्हते.कोणी बाहेर जाण्याचा प्रयत्न करताच त्यांचा छळ करून बेदम मार दिला जात असे.ऐवढेच करूण स्पृश्यांची भुक भागत नसल्यामुळे बालके व म्हाता–यांना बेदम मार देवून त्यांची घरे जाळली जायची तसेच त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला जात होता.या बहिष्काराच्या शस्त्राने अस्पृश्यांचे जीवन नरकमय करूण टाकले होते.भारतीय संविधानात जरी अस्पृश्यता निर्मुलनाचा कायदा पास केला असला तरी स्पृश्य हिंदू अस्पृश्यांना हीन नजरेनेच पाहत होती.स्पृश्य–अस्पृश्यतेच्या या चक्रव्यूहातुन अस्पृश्यांना बाहेर काढण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी धर्मांतर करण्याचा निर्णय घेतला.धर्मातराने अस्पृश्यांच्या कपाळावर जन्मजात मारलेला अमंगलतेचा ठसा दूर होणार होता.दुस–या बौद्ध राष्ट्राशी भारतातील बौद्धांचा संबंध जुळणार होता आणि एका विज्ञाणनिष्ठ,समताधिष्ठीत धर्माशी भारतातील बौद्धांची नाळ जुळली जाणार असल्याने धर्मातर करण्यात आले.

**हिंदू धर्मातील वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थाः–**पूर्व वैदिक काळात वर्णाश्रम व्यवस्था उदयास आली.समाजात ब्राम्हण,क्षत्रिय,वैष्य आणि शुद्र हे चार वर्ण उदयास आले.वर्णव्यवस्थेतील ब्राम्हण,क्षत्रिय व वैष्य यांना समाज व्यवस्थेत उच्च स्थान देण्यात आले होते. समाजव्यवस्था चार पायाची शिळी होती.वरचा पाया ब्राम्हण,दुसरा पाया क्षत्रिय,तिसरा पाया वैष्य आणि वर्णव्यवस्थेतील अंतिम पाया म्हणजे शुद्र होय.यात वरच्या तिन्ही वर्णाना जसा श्रेष्ठ दर्जा देण्यात आला होता तसा शुद्रांना नव्हता.शुद्रांना वरच्या तिन्ही लोकांची सेवा करणे आवश्यक होते.असे असले तरी पुर्व वैदिक काळात वर्णव्यवस्था कठोर नसल्यामुळे व्यक्तिला एका वर्णातुन दुस–या वर्णात सहज प्रवेश मिळत असे.वर्णव्यवस्थेचा मुख्य आधार हा कर्म असुन जात नव्हता.पुढे उत्तर वैदिक काळात कर्म प्राधान्याला महत्व न राहता जन्माला महत्व प्राप्त झाले.जो ज्या जातीत जन्मेल त्याने त्याच जातीत जगले पाहिजे.कुणालाही वर्ण बदलविता येनार नाही .वर्णव्यवस्था जातीत बंदिस्त करण्यात आली.पुढे या वर्णाच्याच अनेक जाती जन्माला आल्या.सामाजिक बहिष्काराच्या शस्त्रामुळे पुढे पाचवा वर्ण ज्याला पंचम किंवा अंत्यज असे म्हटले जावू लागले तो जन्माला आला. पंचम वर्णातील जातीतील लोक हे जन्मजात अशुभ ,अपवित्र व अमंगल समजल्या जावू लागले.समाज पाच वर्णात आणि हजारो जातींमध्ये विभाजित झाला.

**तथागत बुद्धाची वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थे विरोधातील वैचारीक क्रांती :–**

इ.स.पुर्व 6 व्या शतकात धार्मिक क्षेत्रात वैचारीक क्रांती झाली.बौद्ध व जैन धर्माने सर्वाना धर्माची द्वारे खुली केली.त्यांनी जातीव्यवस्था,कर्मकांड आणि वर्णव्यवस्थेचा विरोध करूण जनतेला साधा व सोपा धर्म सांगितला.सामाण्यजन या धर्माकडे आकर्षित झाली.बौद्ध धर्म देश विदेशात प्रसारीत झाला.तथागताने अंत्यजांनाही भिक्षुसंघात प्रवेश देवून भिक्षूक पदावर बसविले.वर्णव्यवस्था व जातीयव्यवस्था जाचातुन शुद्रातीशुद्रांना सोडवुन समतामुलक समाजव्यवस्था स्थापित केली.शुद्रांनाही राजसिहासनावर बसण्याचा अधिकार दिला.त्यामुळे मौर्य घराण्यात सम्राट अशोकासारखा प्रजाहितेशी राजा भारतीय इतिहासात होवुन गेला.अशोकाने बौद्ध धर्माला राजाश्रय देवुन भारताला बौद्धमय केले.अशोकाने बौद्ध धर्माला जगभर पसरविले.ज्या वैदिक संस्कृतित शुद्रांना केवळ सेवा करण्याचे कार्य सोपविले होते.त्यांना राज्यकारभार करण्यास प्रतिबंधीत केले होते.अशा शुद्र वर्णातही जन्म घेवुनही सम्राट अशोकाने अतुलनिय कार्य करूण दाखविले.ते केवळ बौद्ध धम्माने शुद्रांनाही राजपदावर बसण्याचा दिलेल्या अधिकारामुळेच परंतु मौर्य घराण्या नंतर झालेल्या प्रतिक्रांतीमुळे बौद्ध धम्माद्वारा प्रस्तापित मुल्ये प्रतिबंधीत करण्यात आली.वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थेवर आधारीत वैदिक धर्माचे पुनरूज्जीवन करण्यात आले.शुद्र व अतिशुद्रांवर अत्याचाराचे सत्र सुरू झाले.त्यांचे माणविय अधिकार हिरावुन घेण्यात आले.प्रत्येक वर्णाचे कर्तव्य ठरवुन देण्यात आले.वर्णबाहय व्यवसाय करण्यास प्रतिबंध करण्यात आला.वैदिक समाज अनेक जाती–उपजातीत विभाजित झाला.रोटीबंदी व बेटीबंदी व्यवस्था निर्मान करण्यात आली.शुद्रांचा उपनयनाचा अधिकार हिरावुन घेण्यात आला.मनूस्मृतीने शूद्र व अतिशूद्रांचे शिक्षण,सत्ता,संपती व शस्त्रे जवळ बाळगण्याचा अधिकार हिरावुन घेतला.

पुढे भारतात ईस्लामी राज्याची स्थापना झाल्यावर शुद्र व अतिशूद्रांनी वर्णव्यवस्थेच्या व जातीव्यवस्थेच्या दास्यातुन मुक्ती करूण घेण्यासाठी ईस्लामचा मोठया प्रमाणावर स्वीकार करण्यात आला.इंग्रजी राजवटीत इसाई मिशन–यांनी शूद्र व अतिशूद्रांना मोठया प्रमाणात इसाई धर्मात दीक्षित केले.धर्मातराची चळवळ 20 व्या शतकापर्यत लहाण मोठया प्रमाणात सुरूच होती परंतु तिचे स्वरूप अल्प असल्यामुळे ब्राम्हणी व्यवस्थेने त्याकडे दुर्लक्ष केले.

**ब्राम्हणी धर्मातील अस्पृश्यता :–**भारतीय समाज व्यवस्थेत अनेक अस्पृश्य जाती आहेत. त्यांना अस्पृश्य, अतिशूद्र, अत्यंज, अवर्ण, परिया किंवा पंचम इ. नावाने संबोधले जाते. अस्पृश्य जातींना अमंगल, अपवित्र व अशुभ समजून समाजापासून बहिष्कृत करण्यात आले होते. अस्पृश्य जातींना हिंदू धर्माने बहिष्कृत केले असले तरी या जाती हिंदू धर्मातच जीवन जगत होत्या. त्यांच्या स्पर्शाचा, सवालीचा विटाळ मानीत असत. त्यांच्यासाठी सार्वजनिक विहीरी, पानवठे, देवळे व शाळा बंद करण्यात आल्या होत्या. सवर्ण हिंदूनी त्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचीत केले होते. अस्पृश्य अज्ञानात, दारिद्र्यात व सवर्णाच्या जाचात खिचपत पडले होते. अस्पृश्य रस्ते झाडणे, पायखाणे साफ करणे, मृत जनावरे ओढणे, जोडे शिवणे आणि तत्सम गावकीची कामे करुन पोटाची खळगी भरीत गावाबाहेरील उकिरड्यावर मोडक्या – तोडक्या झोपड्या म्हणजे यांचा निवारा होय. अंगावर जेमतेम लज्जा रक्षणापुरते फाटके – तुटके वस्त्र घालीत. अस्पृश्यांच्या पोटात पोटभर अन्न नाही, निवारा नाही, पोटासाठी स्थायी रोजगार नाही अशा अगतिक अवस्थेत तो जीवाच्या आकांतानी मरण येत नाही म्हणून माणुसकीला काळीमा फासणारे जनावराचे जीने जगत होता.

हिंदू समाजात अस्पृश्यता कायम स्वरुपाची आहे. सवर्ण हिंदूना अस्पृश्याचा स्पर्श झाल्यास सवर्ण हिंदू शुद्धीकरण विधी करुन शुद्ध होऊ शकतात. परंतु अस्पृश्यांना शुद्ध होण्याचे कोणतेही साधन नाही. ते जन्मजात अपवित्र समजले जात. त्यांच्या पोटी जन्माला येणारी अपत्येही अपवित्रतेचा कलंक कपाळावर घेऊन येत. अस्पृश्य सवर्ण हिंदूपासून दूर गावाबाहेर राहत. गावात एक भाग स्पृशांचा तर दुसरा अस्पृश्यांचा राहत असे. स्पृश्य हे बहुसंख्याक असून अस्पृश्य अल्पसंख्याक होते. दोन्हीच्या वस्त्या वेगळ्या असत. अस्पृश्यांचा दर्जा हिन तर स्पृश्यांना प्रतिष्ठा असे. स्पृश्य आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर तर अस्पृश्य परावलंबी असत.

अस्पृश्य हा वर्णबाह्य आणि चातुर्वर्ण्य चौकटी बाहेरचा असूनही तो स्वतःला हिंदू समजत असे पण सवर्णांनी त्यांना कधीही जवळ केले नाही. अस्पृश्य जाती ह्या वर्ण संकटातून जर काही जाती सामाजिक गुन्ह्यासाठी बहिष्कृत केले त्यातून निर्माण झाल्यात. जो अस्पृश्य ब्राम्हणी समाज व्यवस्थेने घालून दिलेली जाती बंधने मोडील त्याला कठोर शिक्षा देण्याची तजबीज केली होती. तसेच जातीबंधने मोडणाऱ्या अस्पृश्यांस मृत्यूनंतर नरकात किंवा पुढील जन्मात हिन योनित जन्म मिळणार अशी भिती घालून देण्यात आली होती. मनुस्मृतीतील अस्पृश्यांचे चित्रण, "या जातींनी गावाबाहेर रहावे. त्यांनी स्वतःला प्रेतावरील कपडे घ्यावेत. फुटक्या भांड्यात जेवन करावे, एका ठिकाणी राहू नये आणि हवे तर लोखंडाचे दागिने घालावित. इतरांनी त्यांच्यात मिसळू नये. त्यांची लग्ने त्यांच्यातच व्हावीत, पोटासाठी ते दुसऱ्यावर अवलंबून असावेत असावेत आणि अन्न त्यांना वेगवेगळ्या भांड्यात द्यावे, गावात त्यांनी रात्री येऊ नये, दिवसा कामासाठी यायचे झाल्यास राजाने ठरवलेली काही खूण धारण करुन यावे, त्यांनी बेवारशी प्रेते न्यावी, राजाज्ञेने शिक्षा झाली त्यांचे वध करावे, त्यांचे कपडे व दागिने त्यांनी घ्यावेत."[1]

मनुस्मृतीतील अस्पृश्यांच्या जीवनातील या चित्रणातून आपल्याला जीवनाचे काय चित्र होते याचा अंदाज करता येतो. अस्पृश्यांच्या वाटेला हे जीवन ब्राम्हणी समाज व्यवस्थेने दिलेले होते. अस्पृश्याला एक मानवच समजण्यात आले नव्हते. त्यांचे सर्व अधिकार हिरावून घेण्यात आले होते. पशुतुल्य जीवन त्यांच्या वाट्याला देणाऱ्या व्यवस्थेला तरीही तो चिकटून राहिला त्याला कोणीही प्रेमाने जवळ घ्यायला तयार नव्हते.

**अस्पृश्यांना ब्राम्हणी धर्म व्यवस्थेने दिलेले धार्मिक व सामाजिक जीवन :**हिंदू धर्म शास्त्रकारांनी त्यांच्याच धर्माचा एक घटक असलेल्या अस्पृश्य समुदायाला अशुभ, अमंगल व अपवित्र समजून आपल्या वस्तीपासून दूर ठेवले. अस्पृश्यांना अस्पृश्यतेच्या बंदीखाण्यात डांबून, शास्त्राच्या कठोर श्रृखलेत जखडून टाकले. अन्यायी व राक्षसी रुढींचा जागता पहारा त्यांच्यावर बसविण्यात आला. गावाखेड्यातील स्पृश्यांनी एक नियमावली तयार करुन अस्पृश्यांकडून त्या नियमांचे पालन करुन घेतले.

1)स्पृश्यांच्या वस्तीपासून अस्पृश्यांनी दूर अंतरावर रहावे.
2)अस्पृश्यांच्या झोपड्या दक्षिण या अशुभ दिशेला असल्या पाहिजेत.
3)अस्पृश्यांनी स्पृश्यांना शिवू नये किंवा सावलीचा विटाळ होऊ देऊ नये.
4)अस्पृश्यांनी जमिन, गुरे यासारखी संपत्ती संपादीत करु नये.
5)अस्पृश्यांने उत्तम छपराचे घर बांधणे हा अपराध आहे.
6)अस्पृश्यांनी मुलांची नावे अपराधसूचक ठेवावीत.
7)अस्पृश्यांनी स्वच्छ कपडे, बुट, घड्याळ, सुवर्णालंकार घालू नये.
8)अस्पृश्यांने स्पृश्यासमोर खुर्चीवर बसू नये.
9)अस्पृश्याने घोड्यावर बसून वरात काढू नये.
10)अस्पृश्याने मिरवणूक काढू नये.
11)अस्पृश्याने स्पृश्य व्यक्तीस नमस्कार करावे.
12)अस्पृश्याने सुसंस्कृत भाषा बोलू नये.
13)स्पृश्यांच्या उपवासाच्या दिवशी उपवास सोडतांना अस्पृश्याने बोलू नये. त्यांच्या बोलल्याने श्वासोच्छवासाने हवा व स्पृश्यांचे जेवन विटाळले जाते.
14)अस्पृश्यांनी स्वतःला स्पृश्य समजून त्यांच्यासारखे कपडे घालू नये.
15)अस्पृश्यांनी स्वतःच्या हिन दर्जाची जाणिव ठेवून त्याच दर्जाचे कपडे घालावेत ज्यामुळे तो ओळखू येईल.
16)अस्पृश्यांनी घरावर कौले घालू नये.
17)अस्पृश्यांनी सोन्या चांदीचे दागिणे घालू नये इ. बंधने अस्पृश्यांवर घालून त्यांना इतराप्रमाणे विकास करण्यापासून परावृत्त करण्यात आले. अस्पृश्याला तो अस्पृश्य आहे असे सुचित करणारे नाव, घर, कपडे, दागिणे इ. घालण्यास मजबूर केले.

**ब्राम्हणी धर्मव्यवस्थेने अस्पृश्यांना स्पृश्यांची करावयाची वाटून दिलेली कामे :–**ब्राम्हणी धर्मव्यवस्थेने अस्पृश्यांना स्पृश्यांची कोणती कामे बेगार म्हणून करावयाची याचे वाटप करुन देण्यात आले होते. ती कामे पुढीलप्रमाणे आहेत.

1)"स्पृश्यांच्या घरी विवाह समारंभ असेल त्यावेळी अस्पृश्यांनी निरोप देणे, दिवाबत्ती लावणे इ. कामे करावीत."[2]
2)स्पृश्यांच्या नवऱ्या मुलीशी अस्पृश्यांनी सोबत जावे.
3)स्पृश्यांच्या घरी असलेल्या कार्यक्रमाचा निरोप त्यांच्या नातेवाईकांना कळविणे.
4)स्पृश्यांच्या उत्सवात अस्पृश्यांनी घरकाम्या म्हणून कामे करावित.
5)स्पृश्यांच्या विशिष्ट उत्सवात अस्पृश्यांनी आपल्या स्त्रिया स्पृश्यांच्या करमणूकीसाठी द्याव्यात म्हणजे अस्पृश्यांनी स्पृश्यांच्या घरी राब–राब राबावे. त्यांच्या मोबदल्यात स्पृश्याकडून अस्पृश्यांस साधे माणूसकीचे अधिकार मिळत नव्हते. स्पृश्यांनी ही नियमावली श्रेष्ठत्वाच्या भावनेतून अस्पृश्यांवर लादली त्यामुळे "अस्पृश्य परिस्थितीने लाचार असल्यामुळे आणि वरुन धर्मग्रंथाची अज्ञा असल्यामुळे ते मुकपणे हे सर्व सहन करीत राहीलेत. उदरनिर्वाहाची सर्व साधने स्पृश्यांकडेच होती. अस्पृश्यांनी धनार्जन करु नये असा नियम करण्यात आला होता. पोटाळी खळगी भरण्याकरिता मेलेल्या जनावरांचे मांस खाण्याची पाळी त्यांच्यावर आली".[3]

स्पृश्यांनी अस्पृश्यांच्या पदरात वाढलेले शिळ्या भाकरीचे तुकडे व उष्टे अन्न खाऊन त्यांना जगावे लागे. अस्पृश्यांची वस्ती गलिच्छ व रोगराईचे केंद्र बनले होते. पुर्वजन्मी आपल्याकडून पाप झाले त्याची शिक्षा म्हणून आपण अस्पृश्यतेच्या

बंदीवासात आलो. या जन्मी यातून आपली सुटका नाही. धर्मशास्त्रांनी दिलेल्या आदेशानुसार कर्मे करावी जेणेकरुन पुढच्या जन्मी वरिष्ठ जातीत जन्म मिळेल या आशेवर अस्पृश्य गुलाम जीवन जगत होता.

**ब्राम्हणी धर्मव्यवस्थेत अस्पृश्यांची शैक्षणिक स्थिती :–**ब्राम्हणी धर्मव्यवस्थेने अस्पृश्यांकरिता शिक्षणाची दारे बंद केली होती. "अस्पृश्यांनी शिक्षण घेणे म्हणजे धर्मबाह्या वर्तन होते. अस्पृश्याने शिकतो म्हटले तरी स्पृश्य त्यांना आडकाठ्या आणून शिकू देत नव्हते. चुकून एखादा अस्पृश्य मुलगा शाळेत आलाच तर त्याला स्पृश्य मुलाजवळ बसू दिल्या जात नव्हते. इंग्रजी राजवटीत थोडा का होईना शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला. परंतु याही काळात स्पृश्यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणाला विरोध केला. स्पृश्यांच्या शिक्षणाला विरोध बघून अनेक अस्पृश्य मुले शाळा सोडून देत, अस्पृश्य मुलांना वेगळे बसवून अपमानास्पद वागणूक मिळत असे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही असे अनुभव आलेत".[4]

**अस्पृश्यांची ब्राम्हणी धर्मव्यवस्थेत आर्थिक स्थिती :–**अठरापगड दारिद्र्या हे अस्पृश्यांच्या पाचविलाच पुजले होते. त्यांची आर्थिक स्थिती दयनिय होती. स्पृश्यांना जसे व्यवसाय आणि उद्योग करता येत होते तसे अस्पृश्यांना धर्मव्यवस्थेने ठरवून दिलेलेच कार्य करावे लागत होते. अस्पृश्यांनी कोणता व्यवसाय करतो म्हटले तरी त्यांच्या मार्गात अस्पृश्यता आडवी येत होती. रुढी व परंपरांनी ठरवून दिलेला व्यवसायच त्यांना करावे लागत. अमंगल, अपवित्र व अस्पृश्यतेमुळे ते आर्थिकदृष्ट्या पंगू झाले होते. व्यापार, नोकरी व शेती त्यांना खुले नव्हते. विटाळामुळे गिऱ्हाईक मिळत नसल्यामुळे व्यापार करता येत नव्हता. शिवाशिवीमुळे त्यांना नोकरी नाही, गुणाने योग्य असूनही त्यांच्या हाताखाली काम करण्यास स्पृश्य तयार होत नसत. त्यामुळे अस्पृश्यांना नोकरी मिळत नसे. ग्रामीण भागात रुढी व परंपरेने ठरवून दिलेलेच काम केले पाहिजे असा अलिखित कायदाच होता. खालचे धंदे हिन प्रतिचे असून हा धंदा करणाऱ्यास हिन दर्जा देण्यात आला होता. अस्पृश्यांचे जीवन हे स्पृश्यांवर निर्भर करण्यात आले. अस्पृश्यांना उपजिविकेचे स्वतंत्र साधन नव्हते.

भूमिहीन अस्पृश्यांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला स्पृश्याकडून मिळत नसे. तरीही अस्पृश्यांना स्पृश्यांच्या शेतावर काम करावे लागत असे कारण काम केले नाही तर उपाशी राहण्याची वेळ येईल. मजूरी ठरविण्याचा त्याला अधिकार नव्हता. मिळेल त्या मजूरीत काम करणे हेच त्याच्या नशिबी होते. अस्पृश्यांच्या उदरनिर्वाहाची साधने पराधीन होती. अस्पृश्य भिक मागून जीवन जगत असे. कधी–कधी तर भूख शमविण्यासाठी मृत जनावरांच्या मांसावर जीवन जगावे लागत असे. स्पृश्यांनी फेकलेल्या पत्रावळीवरील उष्टे अन्न मिळविण्यासाठी अस्पृश्य गर्दी करायचे.

**ब्राम्हणी धर्मव्यवस्थेने अस्पृश्यांवर टाकावयाचे स्पृश्यांना दिलेल बहिष्काराचे अमोघ शस्त्र**

मनुस्मृतीतील कायद्याप्रमाणे अस्पृश्यांनी स्पृश्यांचा प्रतिकार किंवा स्वाभीमान व सन्मानाचे जीवन जगण्याचा प्रयत्न करताच स्पृश्य अस्पृश्यांवर बहिष्कार टाकित असत. गावातील दुकानदार त्यांना सामान देत नसे. कित्येक ठिकाणी त्यांचे रस्ते व पाणी बंद केले जात असे. स्पृश्यांच्या जुलुमामध्ये अस्पृश्य स्पृश्यांचा प्रतिकार न करता गुमान मार खात होते. स्पृश्य अस्पृश्यांना काम धंदा देत नव्हते. सार्वजनिक ठिकाणचे पाणी घेऊ देत नव्हते. अस्पृश्यांच्या झोपड्या पेटवून देत असत. म्हातारे, स्त्रिया व लहान बाळांना बेदम मार देत असत. ब्राम्हणी धर्मव्यवस्थेने अस्पृश्यांवर अनन्वीत अन्याय व अत्याचर करण्याचे अमोघ अस्त्र बहिष्कारांच्या रुपाने स्पृश्यांच्या हाती दिले होते. या अमोघ अस्त्राचा आधार घेऊनच स्पृश्य अस्पृश्यांवर अनन्वीत अन्याय व अत्याचर करीत असे, बिचारे अस्पृश्य आत्मनिर्भर नसल्यामुळे ब्राम्हणी धर्म व्यवस्थेचा प्रतिकार करण्याची कल्पना सुद्धा करु शकत नव्हते.

**अस्पृश्यांची ब्राम्हणी धर्मव्यवस्थेत राजकीय स्थिती :–**अस्पृश्य समाजात काही व्यक्ती नेतृत्व व राजकारण करण्यास लायक असल्या तरी राजकीय क्षेत्रापासून त्यांना वंचीत ठेवण्यात आले होते. इंग्रजी राजवटीत त्यांना राजकारणाची दारे उघडी करण्यात आली. परंतु त्यांचे नेतृत्व कोणीही स्विकारीत नसत. दुसरे असे की, अस्पृश्याला सामाजिक बहिष्काराला सामोरे जावे लागत असे तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्वी गोपाळबाबा वलंगेकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागुजी बन्सोड, अ. का. गवई, कालीचरण नंदागवळी आणि विठोबा मून इ. अस्पृश्यांचे राजकीय नेतृत्व करण्याचा प्रयत्न केला. या लोकांनी दलित उद्धारासाठी चळवळी उभारल्या आणि दलितांना जागृत करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील अस्पृश्यांना आत्मभान देण्यासाठी या लोकांचे कार्य महत्वाचे ठरले. या लोकांनी इंग्रजी सरकारला अस्पृश्यांना त्यांच्या नरकीय जीवनातून बाहेर काढण्यासाठी काही मागण्या केल्या होत्या. या लोकांनी अस्पृश्यांना संघटीत व जागृत करण्यासाठी नियतकालीके सुरु केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राजकारणात येण्यापूर्वी या लोकांनी अस्पृश्य समाजात एक राजकीय पूर्वपिटीका तयार केलेली होती. 1920 पासून अस्पृश्य समाजात डॉ. आंबेडकरांच्या रुपाने युगपुरुष नेतृत्व लाभल्याने या समाजाला एक उच्च विद्या विभूषित नेता मिळाला. त्यामुळे खऱ्या अर्थाने अस्पृश्यांच्या राजकारणाला गती आली. डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारणी सभा, समता संघ आणि समता सैनिक दल यासारख्या सामाजिक संस्थांच्या आधारावर अस्पृश्य समाजाला जागृत व संघटीत केले.

डॉ. आंबेडकरांनी सायमन कमिशनला निवेदन देऊन गोलमेज परिषदेत अस्पृश्य समाजासाठी दुहेरी मतदानाचा अधिकार, स्वतंत्र मतदार संघ आणि राखीव जागांची मागणी केली. त्यामुळे खऱ्या अर्थाने अस्पृश्यांकरिता राजकीय क्षेत्राची दारे मोकळी झालीत. डॉ.

आंबेडकरांनी 1936 ला स्वतंत्र मजुर पक्ष, 1942 ला ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन आणि 1956 मध्ये त्यांनी रिपब्लिकन पक्षाची संकल्पना करुन प्रभावी विरोधी पक्षाची गरज प्रतिपादन केली होती.डॉ. आंबेडकरांनी स्पृश्यांना रोखठोक सवाल विचारला होता की, "तुमचा हिंदू धर्म जिवंत ठेवण्यासाठी आम्ही अस्पृश्यतेच्या गुलामगिरीत राहीले पाहीजे काय?"[5] सहा कोटी अस्पृश्यांच्या मृत जीवनात आत्मतेजाचे, आत्मप्रत्ययाचे अमृत ओतून त्यांना आपल्या जन्मसिद्ध हक्कासाठी, आत्मोद्धारासाठी, राजकीय व सामाजिक स्वातंत्र्यासाठी रणक्षेत्रात उभे करण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले.

**ब्राम्हणी धर्मव्यवस्थेने अस्पृश्यांवर नानाविध कारणांमुळे केलेला छळ :** ब्राम्हणी धर्मव्यवस्थेने अस्पृश्यांच्या वाट्याला जे पशूहूनही निच जीवन वाट्याला दिले होते. त्यांचे जीवन परावलंबी करुन ठेवले होते. या नरक यातनेतून बाहेर पडण्याचा जर अस्पृश्यांनी प्रयत्न केला तर स्पृश्य त्यांच्यावर नानाविध कारणांनी त्यांचा छळ करायचे. मूकनायक आणि बहिष्कृत भारत या पत्रिकेमध्ये तसेच समकालीन विविध नियतकालीकांमध्ये या संबंधीची वर्णने पाहावयास मिळतात त्यातील अस्पृश्यांच्या छळाची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

1)अस्पृश्यांनी स्पृश्यांना राम राम व नमस्कार म्हणून नये, अन्यथा छळ.
2)अस्पृश्यांनी स्पृश्यांना साहेब व पायलागू म्हणावे अन्यथा छळ.
3)अस्पृश्यांनी स्पृश्यांप्रमाणे वागू नये, अन्यथा छळ.
4)अस्पृश्यांनी, स्पृश्यांच्या करमणूकीस्तव नाव तमाशा करण्यास नकार देऊ नये, अन्यथा छळ.
5)उष्टे अन्न व मृत मांस न खाणे, मेलेली जनावरे न ओढणे ह्या घाणेरड्या कामास नकार देताच छळ.
6)सार्वजनिक विहीरीतून पाणी भरल्यास छळ.
7)हॉटेलमध्ये चहा, भजी खाल्ली म्हणून छळ.
8)एखाद्या साथीच्या आजाराने कोणी मरण पावल्यास अस्पृश्यांवर जादू टोण्याचा आरोप करुन छळ केला जाई.
9)अस्पृश्य मुलांनी शाळेत प्रवेश घेतला म्हणून त्यांचा छळ.
10)अस्पृश्य नवऱ्यामुलाने घोड्यावर बसून बॅण्ड वाजऊ नये, अन्यथा छळ.
11)अस्पृश्यांनी पाणी पिण्यासाठी विहीर बांधली म्हणून छळ.
12)अस्पृश्य पलंगावर बसला म्हणून, स्वच्छ कपडे घातले म्हणून चांदीचे दागिणे घातले म्हणून छळ केला जाई.

### डॉ. आंबेडकरांना ब्राम्हणी धर्म व्यवस्थेद्वारा मिळालेल्या वागणूकीच्या काही अपमानजनक घटना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या उच्च विद्या विभूषित व्यक्तींना सुद्धा ब्राम्हणी धर्म व्यवस्थेद्वारा स्पृश्यांच्या छळास सामोरे जावे लागले. त्यांना जीवनात अस्पृश्यतेच्या अपमानजनक घटनांना सामोरे जावे लागले त्यातील काही घटना पुढीलप्रमाणे आहेत.

1)डॉ. आंबेडकरांचे सातारा वास्तवात डोक्यावरील केस कापून देण्यात कोणताही न्हावी तयार नव्हता.
2)डॉ. आंबेडकरांना गोरेगावला जातांना रेल्वे स्टेशनवर कोणताही टांगेवाला घेऊन जाण्यास तयार नव्हता.
3)डॉ. आंबेडकरांना बडोदा शहरी नाव व जात बदलून राहत असतांना पारशी लोकांना कळताच 15 ते 20 पारशी लोक लाठ्या घेऊन त्यांच्या अंगावर चालून आले आणि खोली खाली करण्याची आज्ञा दिली. बडोद्यात त्यांना राहण्यास कुठेही जागा मिळाली नाही.
4)बडोदा येथिल कार्यालयात डॉ. आंबेडकरांच्या हाताखाली काम करणारे कर्मचारी त्यांच्या टेबलवर फाईली दूरुन फेकित.
5)मुंबईच्या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करतांना स्टाफ रुममध्ये त्यांना पाणी पिऊ दिल्या जात नव्हते.
6)शाळा शिकत असतांना त्यांना स्पृश्य मुलापासून वेगळे बसविण्यात आले तसेच फळ्यावर लिहायला जात असता स्पृश्य मुलांनी ओरड करुन फळ्यामागील डबे काढून घेतले.
7)सार्वजनिक नळांवरील पाणी डॉ. आंबेडकरांना पिण्यास मनाई करण्यात आली होती.

**डॉ. आंबेडकरांचा ब्राम्हणी धर्मव्यवस्थेत सुधारणा करण्याचा प्रयत्न :**

**1) महाडचा सत्याग्रह :**20 मार्च 1927 ला डॉ. आंबेडकरांनी महाड येथील चवदार तळ्यावर जाऊन पाणी पिण्याचा समानतेचा हक्क प्रस्थापित करताच स्पृश्यांनी अस्पृश्यांवर हमला करुन त्यांची डोकी सडकून काढली. अस्पृश्यांनी स्पर्श केलेल्या चवदार तळ्यातून 108 घाघरी पाणी बाहेर काढून पंचगव्य (गाईचे शेण, गोमुत्र, दूध, दही व तूप) टाकून शुद्ध करण्यात आले.

**2) काळाराम मंदीर प्रवेशाचा सत्याग्रह :**डॉ. आंबेडकरांनी 2 मार्च 1930 ला सुरु केला. हे मंदिर प्रवेशाचे आंदोलन आमची आध्यात्मीक भूक शांत व्हावी यासाठी आम्ही सुरु केले नसून, ह्या आंदोलनामागे आम्हाला आमचे मानवीय अधिकार प्रगट करणे हाच उद्देश आहे. असे डॉ. आंबेडकर म्हणाले. अस्पृश्य हे हिंदू धर्मिय असूनही हिंदू देवतांच्या मंदिराचे आणि ईश्वराचे दर्शन घेण्याचा इतर स्पृश्यांप्रमाणे आम्हालाही हक्क आहे. हे सिद्ध करण्यासाठी हा सत्याग्रह करण्यात आला. हा सत्याग्रह करण्यात आला. हा सत्याग्रह 5 वर्षे चालल्यानंतर कायद्याने दार उघडण्यात आले. हिंदूच हदय परिवर्तन होऊन मंदिर प्रवेश दिला नाही.

**3) पर्वती मंदिर प्रवेश सत्याग्रह** 13/10/1929 ला अस्पृश्य व काही स्पृश्यांनी मिळून करण्याचा प्रयत्न केला परंतु देवळाची दार बंद असल्यामुळे दगड विटांचा मार खावून परत यावे लागले.

**4) मुखेड सत्याग्रह**1932 ला नाशिक जिल्ह्यातील मुखेड या गावी अस्पृश्यांनी हा सत्याग्रह केला परंतु स्पृश्यांच्या विरोधामुळे हा सत्याग्रह सुद्धा मागे घेण्यात आला.

**5) अंबादेवी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह :**अमरावतीतील अंबादेवी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह हे सर्व अतिशय परिणामकारक ठरलेत. अस्पृश्यांना विजय मिळाला असला तरी अस्पृश्यांना मोठी किंमत द्यावी लागली. रक्त सांडवावे लागले त्याची फलश्रृती काय? स्पृश्यांनी हे मान्यच केले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्मातच राहूनच अस्पृश्यांना मानविय अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला. स्पृश्यांचे हदय परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. स्पृश्यांच्या मनातील अस्पृश्यांविषयीची तुच्छ भावना दूर करण्याचा प्रयत्न केला परंतु स्पृश्य हिंदूनी त्यांच्या सुधारणांना कवडीचीही किंमत दिली नाही.

**धर्मांतराची घोषणा :** डॉ. आंबेडकरांचा जन्म हिंदू धर्मातच झाला. या धर्माच्या संस्कारातच ते वाढले. या धर्मातील विषमता त्यांनी पाहली आणि आपल्या जीवनात अनुभवलीही याच विषमतेत संपूर्ण अस्पृश्य समाज भरडून निघत होता हे त्यांनी प्रत्यक्षपणे पाहिले आणि म्हणूनच त्यांनी हिंदू धर्माचा सखोल अभ्यास, मनन व चिंतन करुन यातील विषमता समाजासमोर आणली एवढेच नाही तर ही विषमता नष्ट करुन समताधिष्टित समाज निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु त्यांना यश आले नाही. कारण हिंदू समाजरचनाच मुळात विषमतेच्या पायावर उभी होती आणि ही विषमता अतिशय खोलवर रुजलेली होती. विद्यमान परिस्थितीत ही विषमता नष्ट होणे शक्य नाही हे त्यांच्या लक्षात आले आणि यामुळेच त्यांनी हिंदू धर्म त्यागाचा निश्चय केला. इ. स. 13 ऑक्टोबर 1935 ला येवला येथे धर्मांतराची घोषणा केली. एकूणच, "डॉ. आंबेडकरांचे हे धर्मांतर हिंदू समाजाच्या विरोधात नव्हतेच किंवा ते हिंदू धर्माच्या द्वेषातूनही झालेले नव्हते तर ती एक अस्पृश्यांच्या धार्मिक स्वातंत्र्याची चळवळ होती. अस्पृश्यांच्या धार्मिक समानतेच्या हक्कांचा हा तेजस्वी लढा होता. अस्पृश्यांच्या जीवनात उषःकाल निर्माण करणारी ही एक धम्मक्रांती होती."[6]

**मुल्यांकन :** डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्म सुधारणेचे अनेक प्रयत्न करुनही स्पृश्य हिंदूचे हदय परिवर्तन होत नाही असे दिसून आल्यावर हिंदू धर्म त्यागाची घोषणा केली. स्पृश्यांकडून अस्पृश्यांना हक्क व अधिकार मिळेल अशी सुरुवातीला डॉ. आंबेडकरांना आशा होती. परंतु ती फोल ठरली. ज्या जातीविरहीत सुधारीत हिंदू धर्माचा त्यांनी कधीकाळी पुरस्कार केला होता त्या हिंदू धर्मातून बाहेर पडल्याशिवाय गत्यंतर नाही या निर्णयाप्रत ते आले. अस्पृश्यांना स्वाभिमानाचे दिवस प्राप्त करुन देण्यासाठीच धर्मांतराची घोषणा केली.

काही महाभागांनी या घोषणेचा विरोध केला. त्याविरोधाला उत्तर देतांना बाबासाहेब म्हणाले होते, "बुद्ध धर्म व हिंदू धर्म एकच आहे, ही गोष्ट खोटी आहे. त्यात जमिन अस्मानाचं अंतर आहे."[7]

डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्म द्वेषातून धर्मांतर केलेले नव्हते तर, "बाबासाहेबांनी राष्ट्रीयत्व व राष्ट्रीय एकात्मतेच्या दिशेने टाकलेले ते ठोस पाऊल होते."[8]

**संदर्भसूची**

1)गेडाम, डॉ. टी. जी., 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर', प्रकाशक सौ.शारदा गेडाम, प्रथमावृत्ती, 2006, पृ. क्र. 55, 56.
2)कित्ता, पृ. क्र. 58.
3)कित्ता, पृ. क्र. 59.
4)कित्ता, पृ. क्र. 72.
5)कित्ता, पृ. क्र. 104.
6)कित्ता, पृ. क्र. 25.
7)डहाट, डॉ. धनराज, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार', खंड 6, धम्म संकेत प्रकाशन, नागपूर, 2010, पृ. क्र. 100.
8)गान, डॉ. रमेश, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन कार्य एवं विचार, खंड 2, पी. डब्ल्यू. एस. आर्ट ॲन्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर, 2014, पृ. क्र. 289.

# बौध्द धर्माचे विदर्भाशी नाते

डॉ. राजेंद्र ज. कांबळे
कार्यकारी प्राचार्य व समाजशास्त्र विभाग प्रमूख
इंदिरा गांधी कला–वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर.

**सारांश :** विदर्भात बौध्द धर्माचा प्रसार कितपत होता, त्याचा प्रसार कितपत आणि कसा झाला. आज बौध्द धर्माचे काय अवशेष आढळून येतात हा प्रस्तुतच्या लेखाचा विषय आहे.भगवान बुध्दाच्या जन्माच्या आधीच विदर्भ देश निर्माण झाला होता. सातवाहन वंशाच्या राजांनी तीस पिढया राज्य करण्यापुर्वी तेथे त्या भागात अश्मक वंशाच्या राजांनी पंचेविस पिढया राज्य केले होते, अशी पुराणे साक्ष देत आहेत. भगवान बुध्दाच्या काळी विदर्भावर अश्मक राजवंशाचाच अधिकार असण्याचा संभव आहे. धर्मानंद कोशांबी यांनी आपल्या 'भगवान बुध्द' या ग्रंथात नमूद केल्याप्रमाणे, गोदावरीच्या परिसरात वास्तव्य करणारे बाबरी नावाचे एक गुरू आणि त्यांचे काही शिष्य यांच्या कानावर भगवान बुध्दाची किर्ती आली. त्यामुळे प्रेरित होऊन त्यांनी आपल्या शिष्यांना, काही प्रश्न बुध्दांना विचारण्याची आज्ञा देऊन पाठविले होते, असे 'सुत्तनिपात' नामक एका प्राचीन बौध्द ग्रंथात नमूद आहे. त्यांना भगवान बुध्दांचा उपदेश ऐकावयास मिळाला की नाही, याबद्यल कोठेच नोंद उपलब्ध झाली नाही. (१)मगधाधिपती सम्राट अशोकाच्या वेळी विदर्भात धम्म प्रचार कितपत झाला, हे कळावयास साधन उपलब्ध नाही. महाराष्ट्रात मुंबईजवळ सोपारे (प्राचीन शुपारिक) येथे अशोकाच्या आज्ञा कोरलेले त्रुटीत लेख सापडले. विदर्भाच्या शेजारी महाकोशलमध्ये अशोकाच्या आज्ञा कोरलेल्या अशरूपनाथ येथे आजही संरक्षित आहेत. विदर्भाच्या चांदा जिल्हयात देवटेक येथे जो शिलालेख आढळून आला त्यावर अशोकाच्या आज्ञापैकी काही मजकुर खोदलेला आहे. तथापी तो त्यानंतर बऱ्याच काळानंतर लिहिला असावा.विदर्भात भांदक (भद्रावती) माहुर, पातूर, सालबर्डी, रामटेक (नागार्जूनी गुहा) इत्यादी ठिकाणी प्राचीन कोरलेली लेणी आढळून येतात त्यापैकी रामटेक आणि भांदक येथील गुहा निश्चितपणे बौध्द धर्माच्या आहेत. रामटेक येथील छोटी गुहा प्रसिध्द माध्यमिक मताचा पुरस्कर्ता नागार्जून यांच्या नावाने प्रसिध्द आहे, आणि भांदक येथील विंध्यासन टेकडीतील चौफुलीच्या आकाराचे जे लेणे आहे त्यामध्ये समोरील तीन भुजाच्या शेवटी आसनावर असलेल्या बुध्दमूर्ती आजही विराजमान आहेत. नागार्जूनाचा काळ पहिले दुसरे शतक असा येतो. नागार्जूनाच्या बौध्द धर्मीय कामगिरी संबंधाने बौध्द महापंडीत राहुल सांकृत्यायन यांनी इंग्रजीतून एक मोठा ग्रंथ लिहला आहे, त्यात त्याच्या संबंधाने माहिती मिळते. भांदक येथील विंध्यासन लेण्यात प्रवेशद्वाराजवळ काही छोटे लेख कोरलेले आहेत. त्या लेखांची लिपी साधारणपणे पहिल्या दुसऱ्या शतकाची दिसते. तो काळ सातवाहक वंशाच्या आमदानीचा आहे. यावरून त्यांच्या काळात विदर्भामध्ये बौध्द धर्माचे अस्तीत्व होते हे स्पष्ट दिसते. (शेवाळकर १९४)

**शब्द संकेत** :भारतीय बौद्धजन समिती,बुद्ध जयंतीचे आयोजन आणि धम्मदीक्षा

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक सशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना :** विदर्भामध्ये गुप्त वाकाटक काळापर्यंत म्हणजे पाचव्या शतकापर्यंत बौध्द धर्माचे अस्तित्व होते असा सुगावा लागतो. त्यांच्या आमदानीतील एका चैत्य विहाराचे जीर्ण अवशेष नागपूर जिल्हयात मनसर येथे आढळून येतात. बौध्द तत्वज्ञानासंबंधाने फार मोठी कामगीरी केली अशी एक थोर व्यक्ती म्हणजे नागार्जून होय. तो एक महान रसायनज्ञ होता. त्याने रचलेला 'कक्षपुटी' म्हणून ग्रंथ प्रसिध्द आहे व नागार्जूनाला सिध्द नागार्जून असेही म्हणतात. या नागार्जूनाचा जन्म विदर्भात झाला. रामटेक येथे असलेली एक गुहा आणि टेकडी नागार्जूनाच्या नावाने अद्यापही कित्येक विद्वानांचे मत आहे की हा सिध्द नागार्जून माध्यमिक तत्वाचा पुरस्कार करणाऱ्या नागार्जूनाहून भिन्न आहे. तथापी 'कक्षपुटी' ग्रंथारंभी जो नमनाचा श्लोक आहे त्यावरून दोन्हीही व्यक्ती एकच होत असे वाटते. (शेवाळकर १९५)

नालंदा विद्यापीठाचे कुलगुरू पद अनेक वर्ष नागार्जूनाने भुषविली. नागार्जूनाच्या अमोल कामगिरीमुळे विदर्भाचे नांव बौध्द धर्माशी निगडीत झाले आहे. याशिवाय विजासन गुफा,पवनी येथिल स्तुप,पातुर येथिल लेणे,सालबर्डी येथिल गुफा ईत्यादी स्थापत्य विदर्भातील बौद्ध धम्माच्या सबंधाचा पुरावा देतात.मध्ययुगातील

संताच्या चळवळीवरही बौद्धांचा प्रभाव पडल्याचे दिसुन येते.संत यांच्या नंतर विदर्भात बौध्द धर्माचा प्रचार व प्रसार करण्यामध्ये श्री. वामनरावजी गोडबोले यांचा सिंहाचा वाटा आहे.२ जानेवारी १९९५ ला नागपूर येथे श्री वामन गोडबोले यांनी संशोधन कार्य व बुध्द दूत सोसायटी स्थापन करण्याकरीता सभा बोलावली होती. या सभेनंतर या सोसायटीची स्थापना भंते संघराखखीत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करण्यात आली व ३ जानेवारी १९५५ ला सायंकाळी ६ वाजता धनवटे चेंम्बर्सच्या गच्चीवर बुध्ददूत सोसायटी, नागपूर शाखेच्या उद्‌घाटन समारंभा निमित्त जाहीर सभा झाली. जवळ जवळ अडीच हजार लोक या वेळी उपस्थित होते (२)

**नागपूरातील पहिली बुध्द जयंती व दिक्षा समारंभ :—** गौतम बुध्दाचा जन्म 'ज्ञान व महापरिनीर्वाण' असा त्रिवार मंगलकारक दिवस म्हणजे 'वैशाख पौर्णिमा' हा होय. दि. ६/५/१९५५ ला वैशाख पौर्णिमा होती. या दिवशी भगवान बुध्दाच्या महापरिनिर्वाणाला २४९९ वर्ष पूर्ण होणार होते. त्याकरीता आलेल्या भिक्षु सागर यांचे नागपूर स्टेशनवर जंगी स्वागत करण्यात आले. सायंकाळी ६.०० वाजता बुध्द दूत सोसायटीच्या कार्यालयात त्रिशरण व सामुदायीक वंदना झाली. काही प्रतिष्ठीत वक्त्यांची भाषणे व भिक्षू सागर यांचे उपदेशपर प्रवचनही झाले होते.पण त्यापुर्वीच सिताबर्डी मेन रोडवर राहणारे श्री लक्ष्मण झगुजी कवाडे (खासदार जोगेंद्र कवाडे यांचे वडील) यांनी भिक्षू सागर यांचे कडून सोसायटीच्या कार्यालयातच बौध्द धर्माची दिक्षा घेतली. भिक्षु सागर हे मराठा समाजातील होते. ते नागपूरला आले तेव्हा श्री कवाडे यांनी ठरविले की मी या भिक्षुद्वारेच दीक्षा घेणार मला हिंदू धर्मात मरावयाचे नाही. बाबासाहेबांचे धर्मांतर होईल तेव्हा होईल. अशाप्रकारे श्री कवाडे हे खऱ्या अर्थाने नागपूरचे पहिले धर्मांतरीत बौध्द धर्मीय आहेत. त्यांनतर भिक्षू सागर तर्फेच श्री मनोहर शहाणे यांनीही बौध्द धर्म दीक्षा ग्रहण केली.

शनिवार दि. ७/५/१९५५ ला सायंकाळी ६.०० वाजता इंदोऱ्यातील बाळकृष्ण मोहल्ल्यात गोंडाणे भवन मध्ये बुध्ददूत सोसायटी इंदोरा शाखेचे उद्‌घाटन भिक्षू सागर तर्फे तसेच कंबोडीयाचे भिक्षू के.के. स्थितप्रज्ञ यांचे भाषणही झाले. रविवार दि. ८ मे १९५५ दुपारी तीन वाजता भगवान बुध्दाच्या भव्य प्रतिमेची हत्ती वरून जंगी मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक आनंद टॉकीजच्या मागील कोठारी बिल्डींग मधील बुध्ददूत सोसायटीच्या कार्यालयातून निघून श्री टॉकीज, आनंद भंडार, सिताबर्डी चौक, गांधी ब्रिज, संत्रा मार्केट, मेयो हॉस्पीटल, इतवारा चौक, महाल चौक, शुक्रवारी दरवाजा, नवी शुक्रवारी, उंटखाणा या मार्गाने रात्री ८.०० वाजता इमामवाडयात भिक्षू सागरजीच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत विसर्जीत झाली. (गोडबोले ६१)

याच सुमारास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जपानच्या विश्वशांती परिषदेमध्ये भाग घेवून भारतात परत आल्यावर बुध्ददूत सोसायटीच्या विद्यमाने १८ सप्टेंबर १९५५ ला धनवटे चेम्बर्सच्या गच्चीवर राजस्वमंत्री श्री भगवंतराव मंडलोई यांच्या अध्यक्षतेखाली श्री. तुकडोजी महाराजांच्या भाषणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. व्यासपिठा मागील भागात भगवान बुध्दाची विशाल प्रतिमा आणि धर्मचकांलंकित सुवर्णाक्षरातील 'चरक भिक्खवे चरिक' बहुजनहिताय बहुजन सुखाय' हा फलक व बुध्दवंदनेच्या रेकॉर्ड ध्वनी लावण्यात आल्या. (गोडबोले ६२)

**नागपूरात भारतीय बौध्दजन समितीची निर्मीती :—** डॉ. बाबासाहेबांनी १९५५ ला, वरली येथे बौध्द जयंतीच्या विसर्जन सभेत एक घोषणा केली होती. भगवान बुध्दाच्या धर्माशिवाय तरणोपाय नाही. जगाला शांती पाहिजे असेल तर या धर्माचा स्विकार केला पाहीजे. माझ्या धर्मांतराच्या कार्याला चालना देण्याकरीता मी भारतीय बौध्दजन समितीची स्थापना केली आहे. ती रजिस्टर्ड आहे. आपण त्यांचे वार्षिक एक रूपया शुल्क देवून सदस्य व्हावे. ही बाब गोडबोलेंना कळताच ते बाबासाहेबांना जाऊन भेटले व सदस्यत्व स्विकारून नागपूरला शाखा उघडण्यास परवानगी दयावी अशी विनंती केली. ते ऐकूण बाबासाहेब प्रसन्न झाले व अनूमती दिली. याच सुमारास भंते संघरख्खित यांनी 'बुध्द वदनमाला' नावाचे पुस्तक काढले होते. ते पुस्तक वामणराव गोडबोले यांनी नागपूरला आणून मॉरीस कॉलेज मधील पाली चे प्राध्यापक श्री किल्लेदार यांना मा.डो. पंचभाई भेटले व मराठीत अनुवाद करण्याकरीता मार्गदर्शन करा अशी विनंती केली. व ते पुस्तक मराठीत अनुवादीत झाले.

दिनांक १०/१०/५५ ला श्री गोडबोले यांनी बुध्ददूत सोसायटीच्या सदस्यांची सायंकाळी ७.०० वाजता सभा बोलावली व त्यात बुध्दश्रुत सोसायटी ही संस्था भारतीय बौध्द जनसमीतीची शाखा म्हणून रूपांतरीत करण्याबाबतचा ठराव पास केला.

दिनांक २२/०७/१९५६ ला सायंकाळी आषाढ पौर्णिमा हा दिवस धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून उत्साहाने साजरा केला गेला. या वेळी सर्वश्री भगवंतराव मंडलोई माननिय मंत्री, भवानी शंकर नियोगी माजी सर न्यायाधीश अ.रा. कुलकर्णी, प्रो. किल्लेदार यांची उद्‌बोधक भाषणे आयोजित केली होती.

**नागपूरातील २५०० वी बुध्द जयंती :—**१९५६ हे वर्ष म्हणजे या वर्षी तथागत बुध्दाची २५०० वी जयंती होय. त्या वेळी विदर्भ मध्य प्रदेशात मोडत होता व नागपूर ही मध्य प्रदेशाची राजधानी होती. भारतीय बौध्दजन समितीद्वारे या दिवशी नागपूरात २४ मे १९५६ ला मिरवणूक काढण्यात आली होती. ही मिरवणूक समितीच्या कार्यालयातून काढून नागपूरातील सर्व प्रमूख रस्त्यावरून फिरविण्यात आली. त्याकरीता २५० पंचरंगी धम्म पताका तयार केल्या होत्या. लोकांनी घराच्या छतावरून मिरवणूकीवर पुष्पवर्षाव केला. नागपुरच्या इतीहासात बुध्द जयंती प्रित्यर्थ इतकी मोठी कलरफुल मिरवणूक निघण्याची ही पहिलीच घटना होय. (गोडबोले ७६)

**आंबेडकरांच्या धर्मांतराकरीता नागपूरची निवड :—** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आक्टोबर १९५६ ला दिक्षा घेणार असे जाहीर केले होते. वामनराव गोडबोलेंची ईच्छा होती की बाबासाहेबांनी नागपूरला दिक्षा घ्यावी म्हणून त्यांनी बौध्दजन समितीची सभा १५ जुलै ५६ ला बोलाविली व ठराव मंजूर केला की, दिक्षेचा कार्यक्रम नागपूरला घेण्यात यावा. याबाबतचे छोटे पत्र गोडबोलेंनी बाबासाहेबांना लिहीले. त्याला बाबासाहंबांनी प्रतिसाद दिला. व दसऱ्याचे दिवशी ता. १४ आक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे सकाळी ९ ते ११ धम्म दिक्षा समारंभ होईल व संध्याकाळी माझे सर्व लोकांसाठी जाहीर व्याख्यान होईल. असे २३ सप्टेबर १९५६ ला एक निवेदन प्रसिध्द केले. (गोडबोले ८०)

**दिक्षेची पूर्व तयारी :—** नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर १४ आक्टोबर १९५६ ला आपल्या लाखो अनुयायांना बौध्द धर्माची दिक्षा देणार ही न भूतो न भविष्यती अशी एक ऐतिहासीक घटना घडणार होती. माता कचेरी जवळील जागा या करीता निर्धारित केल्या गेली. ही जागा वैक्सिन इंन्स्टीटयुटने गुरांच्या चराईकरीता राखुन ठेवली होती. २८/०९/१९५६ ला वैक्सिन इंन्स्टीटयुटचे डायरेक्टरनी 'ना हरकत पत्र' दिले. दि. २८/०९/१९५६ ते २०/१०/१९५६ या अवधीत दिक्षेच्या कार्यक्रमाकरीता ही जागा वापरण्याची लिखित अनुमती पत्र क्रं. २२९२/RC अनुसार दि. २८/०९/१९५६ ला मिळाली.

दिक्षेकरीता ही जागा मिळावी म्हणून २७ सप्टेंबर १९५६ ला अध्यक्ष नागपूर इंम्प्रुव्हमेंट ट्रस्टच्या नावे पत्र लिहून खसरा नं. २२१/२ व २२२ मौजा लेंड्रा ही जागा मिळण्याकरीता रितसर अर्ज केला होता. (गोडबोले ११०)

**धर्मांतर सोहळा :—** रविवार दि. १४ आक्टोबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माईसाहेब हे ठरलेल्या जागेकडे पोहचले, तसेच भंते चंद्रमणी व इतर भिक्षू मंचकावर आलेत. सर्वप्रथम रामजी आंबेडकर (डॉ. आंबेडकरांचे वडील) यांना श्रध्दांजली वाहीली. त्यानंतर भंते चंद्रमणींनी उभयतांना दिक्षा दिली. नंतर बाबासाहेबांनी या वेळी दिक्षार्थी कडून २२ प्रतिज्ञा वदवून घेतल्या. दिक्षेच्या रात्री ८ वाजता प्राचार्य म.भि. चिटणीस लिखीत 'युगयात्रा' या नाटकाचे मंचन केल्या गेले. भारतीय बौध्द महासभा, नागपूर शाखेच्या वतीने हा सामुदायीक दिक्षेचा कार्यक्रम घडवून आणला व एकाच वेळी पाच लाखांवर लोकांना बौध्द धर्माची दिक्षा दिली. (गोडबोले १४७)

**धर्मांतरासाठी नागपूरच कां? :—**

डॉ. आंबेडकर दिक्षेकरीता नागपूर का निवडले हे स्पष्ट करतांना सांगतात, ज्यांनी बौध्द इतिहासाचे वाचन केले असेल त्यांना हे कळून येईल की, भारतात बौध्द प्रसार जर कोणी केला असेल तर तो नाग लोकांनी केला. नाग लोकांची मुख्य वस्ती नागपूर येथे व आसपास होती असे दिसते. म्हणून या शहरांस 'नाग'—पूर म्हणजे नागांचे गाव असे म्हणतात. येथून नजिकच सुमारे २७ मैलापर्यंत वाहणारी जी नदी आहे ती नागनदी आहे. अर्थातच या नदीचे नाव येथे राहणाऱ्या लोकांवरून पडले आहे. आर्य लोकांनी नागांना जाळून टाकल्याचे दाखले पुराणात सापडतात. अगस्ती मुनीने त्यातून फक्त एक नाग मनुष्य वाचविला, त्याचेच आपण वंशज आहोत. आणि म्हणून नागपूर हे स्थळ निवडले आहे. (गोडबोले १६७)

नागपूरच्या दिक्षेनंतर दि. १६ आक्टोबर १९५६ ला चंद्रपूर येथे दिक्षा समारंभ पार पडला. १४ ऐप्रिल १९५७ ला भामटी परसोडी (नागपूर) येथे भव्य प्रमाणात कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात श्रीमती गोपिकाबाई बाजीराव ठाकरे, चिचोली जि. नागपूर या स्टेजवर चढल्या माईक हातात घेवून साडे अकरा एकर चिचोली येथील जागा दान देत असल्याची घोषणा केली. व २२ एप्रिलला कोर्टात रितसर दानपत्र लिहून दिले. आज या जागेवर भव्य विहाराची निर्मीती झाली व बाबासाहेबांच्या वस्तूंचे संग्रहालय तयार झाले.

धर्मांतरानंतर भारतीय बौध्द महासभेच्या वतीने १३ मे १९५७ ला पहिली बुध्द जयंतीचे आयोजन करण्यात आले. अध्यक्ष म्हणून श्रीलंकेचे बौध्द भिक्षू पुज्य पत्रासिरी यांनी स्थान भुषविले होते. डॉ. बाबासाहेबांच्या धर्मप्रचार प्रसाराचा कार्यक्रम पूर्ण करण्याकरीता श्री गोडबोले यांनी ६ डिसेंबर १९६० ला नागपूरला अखिल भारतीय बौध्द कार्यकर्ता धम्म संम्मेलनाचे आयोजन केले.

**सेवाग्राम येथील महापंडीत धर्मानंद कोसंबी यांची समाधी :—**

१८७६ साली गोव्यात जन्मलेले बुध्द धर्माचे गाढे विद्वान आचार्य धर्मानंद कोसंबी याची समाधी सेवाग्राम येथे आहे. आचार्य धर्मानंद कोसंबी यांनी श्रीलंका, ब्रम्हदेश, नेपाल, रशिया आदी देशात भ्रमण करून संस्कृत, पाली आदी भाषेत अभ्यास केला. यासोबतच अनेक पाश्चात्य भाषा अवगत केल्या. देशातील पाली भाषेचे पहिले प्रोफेसर होते. त्यांनी देशाच्या स्वातंत्र लढयातही भाग घेतला होता. वयाच्या सत्तरीत त्यांना मधुमेहासारखा दुर्धर आजाराने पछाडले. यावेळी गांधीजीच्या आमंत्रणावरून आचार्य धर्मानंद कोसंबी १९४७ च्या जानेवारीला सेवाग्राम आश्रमात आले त्यांच्यावर निसर्गोपचार करण्यात आले. शेवटी ४ मे १९४७ पासून आचार्य विनोबांच्या सल्ल्यानुसार आणि स्वत:च्या अनुग्रहानुसार त्यांनी 'आनापान' भावनेचा प्रयोग करून दि. ४ जुन १९४७ ला अवघे सहा महिने सुश्रुषा घेत येथेच देह ठेवला. सेवाग्राम येथे खरांगणा रोडवर (आजच्या सेवाग्राम रूग्णालयाच्या मागील बाजूला) त्यांची समाधी बांधण्यात आली.

बौध्द धर्मावरील अश्वघोषाचा 'विसुद्दीमग्ग' या मुलभुत ग्रंथाचे संशोधन करून संपादनातून बौध्द धर्माची जगाला ओळख करून देणारा ग्रंथ त्यांनी दिला (३)

संदर्भ :—

१)संपादक शेवाळकर राम, यशोधन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ नविन प्रशासन भवन मुंबई, नोव्हेंबर १९८८, पेज १९३.

२)गोडबोले वामनराव, धम्मदिक्षेचा अविस्मरणीय इतीहास, सुगत प्रकाशन, नागपूर, १३/१०/२०१३, पृ. ५६.

३)गडेकर अनिल, वर्धा पर्यटन, जिल्हा माहिती कार्यालय वर्धा — पृ — १०४.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर

**डॉ. प्रतिभा बी. पखिडे**
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस.
कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

**सारांश :–**जगाच्या इतिहासात असे प्रथमच घडून आले की, एकाच दिवशी, एकाच वेळी लक्षावधी लोकांनी धर्मांतर केले. सन १४ ऑक्टोबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबरोबर ५ लाख अनुयायाना बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. आपल्या बुद्धिमत्तेच्या बळावर बौद्ध धम्माचा उदात्त व समताधिष्ठित तत्वाची मांडणी करुन बौद्ध धम्म मानवतावादी आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगीतले. समता, स्वातंत्र्य व बंधुता यांनी परिपूर्ण आहे याच मातीतील असल्यामुळे बहुजन समाजाने तो काही प्रमाणात स्विकारला. भारतीय संस्कृती रक्षणाचे कार्य मौलिक वाटले व याच देशाच्या मातीतून निर्माण झालेला पण हिंदूच्या विषमतावादी तत्वज्ञानानी नष्ट केलेला बौद्ध धम्म स्विकारला परत एकदा भारतीय भूमीत या धर्माला पुनरुज्जीवीत करण्याचे महान कार्य केले नागपूरची दीक्षाभूमी पावन भूमी झाली. १४ ऑक्टोबर १९५६ चा दिवस इतिहासात अजरामर झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर एक चमत्कार म्हणावा लागेल बाबासाहेब आंबेडकराचे धर्मांतर कोटी कोटी जनतेचे दु:ख, दैन्य, दास्स नष्ट करणारे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतरामुळे हिंदू धर्माच्या अवतार कुंपनातून बुद्ध मुक्त झालेत व त्यांचे विचार समाजमनात मुक्त संचार करु लागले. मानुसकीची शिकवण देणाऱ्या बौद्ध धम्माचे ज्ञान समाजात रुढ व्हायला लागले. भारतीय समाजात एका नवीन स्वाभिमानी पिढीचा उदय व्हायला सुरुवात झाली. जीवनाच्या समृद्धीसाठी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक उत्थानाचे भीमपर्व भारतात सुरु झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे विचार प्रगतीशील जीवनाचा मार्ग दाखवणारे आहेत मानवाला विकासाच्या पथावर अग्रेसर होण्याला प्रेरणादायी ठरणारे आहेत.

**शब्दसंकेत :–** धर्मांतर, अधिकार, न्याय , जातीभेद, स्वाभिमानी, सत्याग्रह, मुक्तीचा मार्ग, मानवतावाद.

**संशोधन पद्धती** :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना** : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर हिंदू समाजातील आत्यंतिक विषम समाजरचनेवर प्रकाश टाकते. हिंदू धर्मातील असमानतेमुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धर्मांतर करावे लागते. हजारो वर्षापासुन हा अस्पृश्य समाज लाचारीचे, गुलामीचे जीवन जगत आला. कोणीतरी प्रज्ञासुर्य आमच्यातुन जन्माला येईल आणि हजारो वर्षाचे हे गुलामीचे पाश तोडून माणुस म्हणून जगण्याचा अधिकार आम्हाला मिळवून देईल. सृष्टीच्या गर्भचक्रात अस्पृश्याच्या नव्या जीवनाच्या कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या रुपाने अस्पृश्याच्या जीवनातील अस्तगंत झालेला सुर्य उदयास झाला. या नव्या सुर्याने अस्पृश्याच्या जीवनातील अंधार नष्ट केला.हिंदू धर्मातील अन्याय, अत्याचार आणि गृलामीच्या विरोधाची प्रतिक्रिया म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे धर्मांतर होय. उच्चवर्णीयांच्या स्वनिर्मित व स्वयंघोषीत धार्मिक गुलामगिरीत सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील अधिकारशुन्य व असहाय परिस्थितीत हजारो वर्षापासून हा अस्पृश्य समाज लाचारीचे आणि गुलामीचे जीवन जगत होता. परंतू हिंदू धर्मातील धर्मपंडीताना त्याची पर्वा नव्हती हिंदू समाजातील स्पृश्य आणि अस्पृश्य यांच्यातील विषमता धर्मांतराला जबाबदार ठरली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एका अस्पृश्य जातीत जन्माला आले असल्यामुळे त्यांना आपल्या जीवनात अमानुष रुढीचे तीव्र चटके व तिची दाहकता सोसावी लागली. लहानपणापासूनच बहिष्कृताचे जीवन त्याच्या वाट्याला आले. आपले दु:ख संपूर्ण अस्पृश्य समाजाचे दु:ख आहे असे समजून त्यांचे दु:ख कष्ट व वेदना नष्ट करण्यासाठी आजन्म लढा द्यावा लागला.

हजारो वर्षाचे कुंपन मानवी प्रगतीला बंधनकारक असेल तर ते तोडलेच पाहिजेत माणसामानसामध्ये जातीभेदाच्या ज्या भिंती उभारल्या गेल्या आहेत त्या तोडल्याच पाहिजे. सर्व मानवजात समान आहे या न्यायाने प्रत्येकाचा नैसर्गिक हक्क व अधिकार मिळाले पाहिजे. इ. स. १९२६ साली महाडच्या चवदार तळ्यावर सत्याग्रह केला त्या तळ्याचे पाणी पिऊन समाजातील प्रत्येक व्यक्तीचा हक्क त्या आंदोलनाने त्यांनी प्रस्थापित केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी मनुस्मृतीचे दहन केले हाही एक लढाच होता. हजारो वर्षापासून ज्या ग्रंथानी एका विशिष्ट वर्गावर

गुलामी लादली त्या ग्रंथाविषयीचा लढा होता. शुद्रांना, अस्पृश्यांना, महिलांना मानवीय अधिकारापासुन वंचित ठेवणे, त्यांना गुलामी करायला लावणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा ग्रंथ जाळून आपला निषेध नोंदविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निष्क्रिय अगतिक अशा समाजाला समतेच्या मंत्रानी नवी जागृती प्राप्त करुन दिली विचाराच्या आधारावर क्रांती घडवून आणण्यासाठी प्रवृत्त केले. मुसलमानाना मशिदीत जाण्याचा हक्क आहे, ख्रिश्चन लोकांना चर्चमध्ये जाण्याचा हक्क आहे त्याचप्रमाणे प्रत्येक हिंदूला देवळात जाण्याचा हक्क असलाच पाहिजे असा त्याचा दावा होता. नाशिकच्या काळाराम मंदिराचे दर्शन करण्याकरिता अस्पृश्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या नेतृत्वात सत्याग्रह करावा लागला. देवाचे दर्शन करण्याकरिता लढा द्यावा लागला तो लढा समतेचा लढा होता. सर्व शोषितांना न्याय

मिळवून देणाऱ्या समतेची तेजस्वी चळवळ होती. ''पांडव प्रताप ग्रंथाची मिरवणुक काढुन हा आमचाही अधिकार आहे हे त्यांनी हिंदूंना दाखवुन दिले''[१] पुण्याच्या पर्वती मंदिरात प्रवेश करण्यासाठीही अस्पृश्यांना सत्याग्रह करावा लागला ज्या ज्या वेळेस आपले अधिकार मिळविण्याचा प्रयत्न केला. जगाच्या पाठीवर कोणताही धर्म दुर्बलावर अत्याचार करायची शिकवण देत नाही. आपला स्वार्थ साधण्यासाठी धर्मालाही वेठीस धरणारे लोक माणूसकीलाही पारखे झालेले पशु होते.

जगाला सत्याचे आदर्शाचे धडे देणाऱ्या भारतीय संस्कृतीला एका विशिष्ट वर्गाने आपल्या स्वार्थासाठी धर्मग्रंथाचा आधार घेऊन विकृत स्वरुप आणले होते. भारतीय संस्कृतीला पूर्वीचे वैभव मिळवून देण्याचा त्याचा प्रयत्न होता. अस्पृश्य याच समाजाचे देशाचे नागरीक आहेत त्यांना माणूसकीचे अधिकार द्या एवढीच मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांची मेलेली मन जिवंत केलीत शतकानुशतके खितपत पडलेल्या समाजाला जागृत केले. त्याच्या गुलामीची जाणीव करुन दिली अन्यायाचा पाडाव करण्याकरिता मानवी मने बाबासाहेबाच्या हकिनी तयार झाली. शतकानुशतके गुलामगिरीत पडलेल्या समाजात नव्या प्रकाशाची निर्मिती करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'भारतरत्न'च नाहीत तर खऱ्या अर्थाने मानवरत्न ठरले. सनातन हिंदू समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जीर्ण परंपरेचा त्याग करण्याच्या बाबतीत सर्व मार्गांनी समजावून सांगितले परंतू काहीही फायदा झाला नाही. हिंदूची समाज व्यवस्था विषमतेवर आधारलेली होती हे लक्षात घेऊन ,''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साली येवला येथे धर्मांतराची घोषणा करावी लागली 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही' डॉ. बाबासाहेब आंबेडकराची ही धर्मांतराची घोषणा म्हणजे अस्पृश्य बांधवाच्या मुक्तीचा मार्ग होता. स्वतंत्र जीवनाचा उषःकाल करणारा महामंत्र होता. शतकानुशतकाच्या गुलामीच्या बेड्या झुगारुन देण्यासाठी त्यांना लाभलेली ती एक पर्वनी होती''[२]

धर्मांतराच्या घोषणेनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या अनुयायांकडून या घोषणेचे स्वागत झाले. धर्मांतराची घोषणा केल्यानंतर ,''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व धर्माचा सखोल अभ्यास केला. सर्व धर्म आपल्या सदविवेक बुद्धीवर तपासून पाहिले पूर्ण परीक्षणानंतर मानवाच्या मुक्तीवर उभा असलेला समताधिष्ठित मानवी स्वातंत्र्याला त्यांच्या व्यक्तीमत्वाला पोषक असा बौद्ध धम्म निवडला संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देणाऱ्या समता, स्वातंत्र्य, बंधुत्व यांचा महामंत्र देणाऱ्या गौतम बुद्धाकडे ते आकर्षित झाले''[३]जगातल्या दुःखी मानसाच्या डोळ्यातील अश्रु पुसल्याशिवाय मला शांती लाभणार नाही असे भगवान बुद्ध म्हणत डॉ. बाबासाहेब आंबेडकराना तेच करायचे होते समस्त दलित पिडीत लोकांचे दुःखाश्रु त्यांना पुसायचे होते त्याचे हरवलेले माणूसपण त्यांना परत मिळवून द्यायचे होते माणूस म्हणून जगण्याची नवी उमेद त्यांच्यात निर्माण करुन घ्यायची होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकारला त्यांनी धर्मांतर केले असे संबोधतो परंतु खऱ्या अर्थाने धर्मांतर नसून तो स्वधम्म स्वीकार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी आपल्या अस्पृश्य बांधवासोबत स्वीकारलेला बौद्ध धम्म हा आपल्या देशाचा आणि आपल्या पूर्वजाचा धम्म आहे एकेकाळी तो याच मातीतून उदयाला आला आणि संपूर्ण देशभर पसरला कोट्यावधी लोकांनी हा धम्म स्वीकारला भारतीय संस्कृतीला उन्नत करण्याचे महान कार्य बौद्ध धम्माने केले आहे एवढेच नव्हे तर विदेशातही भारतीय संस्कृतीची पताका या धम्माने फडकावली अशा या भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग असलेल्या बौद्ध धम्माला पुन्हा याच आपल्या भारत भूमित पुनरुजीवीत करण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले त्याचे हे कार्य देशासाठी, भारतीय संस्कृतीसाठी

गौरवास्पद आहे या धर्मांतरामुळे त्यांना धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त झाले बौद्ध धम्मात त्यांना समानता मिळाली त्यांच्यात स्वाभिमान निर्माण झाला यामुळेच त्यांना आपल्या जीवनाचे मूल्य कळून चुकले आपण कुणाचे गुलाम नाही ही भावना वाढीला लागली.माणुस केवळ भाकरीसाठी जगत नसतो, मानवाच्या जगण्यातही एक मूल्य आहे. मानवाच्या जगण्यात आणि कुत्र्या—मांजराच्या जगण्यात फरक राहीला नसता अशा या मृतवत जगण्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना मुक्त करण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे धर्मांतर वैयक्ति नव्हतेच यात त्यांचा कोणताही वैयक्तिक स्वार्थ दिसून येत नाही. अस्पृश्यांच्या संपूर्ण कल्याणाची तळमळ त्यांना होती हेच जाणवते.धर्मांतराने काय साध्य होणार? अस्पृश्याची सामाजिक, आर्थिक परिस्थिती तशीच राहणार असे बोलले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या धर्मांतराने समाजात ताठ मान करुन जगण्याची नवीन पिढी उदयाला आली आहे. स्वत:च्या जीवनाचे ते स्वत:च शिल्पकार बनू पाहात आहेत. सागरासारख्या अथांग पसरलेल्या बुद्ध तत्वज्ञानात सर्वानाच मुक्तपणे संचार करण्याची मुभा आहे. कुणी मोठा नाही, कुणी कनिष्ठ नाही. भारतीय संस्कृतीचा हा अनमोल ठेवा भारतापूरताच मर्यादीत नाही तर संपूर्ण जगात याला लौकीक प्राप्त झाला आहे. अशा धम्माचा स्विकार करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी देशाचा गौरवच केला आहे.

**निष्कर्ष :—**डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे भारत मातेच्या या महान सुपुत्राचे या देशावर अनंत उपकार आहेत. येथिल दलित, शोषित, पिडीत व बहुजन समाज त्याच्या या मानवीय कार्यासाठी सदैव ऋणी राहील.**धर्मातरामुळे बौद्धांच्या जीवनात क्रांतीकारक परिवर्तने झालीत कालपर्यत उकिरडयावरील खरखटया पत्राळी करिता भांडनारा हा समाज केवळ धर्मांतरामुळे इतर अस्पृश्य समाजाच्या तुलनेत विविध क्षेत्रात पुढे गेल्याचे निदर्शनास येते.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माचा स्विकार करुन बुद्धाचे तत्वज्ञान हा एक जीवनमार्ग एक मूल्य आहे. या मूल्यावर आधारीत एक नवा समाज निर्माण करायचा होता. बुद्धाचा धम्म समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय व मैत्री या जीवन मूल्यावर अधिष्ठित आहे. प्रज्ञा, शील, करुणा यात ओतप्रोत भरलेला आहे त्यामुळे असंख्य दु:खिताना तोंड देऊन आशावादी जीवन जगण्याचा दृष्टीकोण या धम्मात आहे म्हणून हिंदू धर्माचा त्याग करुन बौद्ध धम्माचा स्विकार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे धर्मांतर भारतीय इतिहासातील सुवर्णअक्षरानी लिहिल्या गेले. जगाच्या इतिहासात एक चमत्कारच म्हणावा लागेल. जगाच्या इतिहासात आपल्या नेत्यावर विश्वास ठेवून एकाच वेळी लक्षावधी लोकांनी धर्मांतर केले.

**संदर्भग्रंथ सूची :—**

१)गेडाम टी. जी., गेडाम शारदा, प्रकाशिका (२००६) 'डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे धर्मांतर', प्रथम आवृत्ती, धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सवी वर्ष.पृष्ठ क्रं १४१

२)मेश्राम प्रदिप, संपादक 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदीक्षेचा अविस्मरणीय इतिहास', सुप्रिया प्रकाशन, अलंकार चित्रपटगृह, नागपूर.पृष्ठ क्रं ४९

३)भिक्षु धर्मरक्षित,संपादक, (१९५६)'बौद्ध धर्म हाच मानवधर्म डॉ.आंबेडकर बी. आर.', समता प्रकाशन, कबीर चौक, वाराणसी पृष्ठ क्रं.४३

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतरः एक चिकित्सा

प्रा.डॉ. विठोबा म.चंदनखेडे
विद्या विकास महाविद्यालय,समुद्रपूर जि.वर्धा

**सारांश** :–14 ऑक्टोंबर 1956 चे नागपूर या विदर्भाच्या पावन भूमित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर म्हणजे मानवी वेदनेची, कल्याणसाठी, व्यक्तीस्वांतत्र्याची समतेची आणि मानवतावादाची खूप मोठी भीमगर्जना होती. हजारोवर्षापासून हिंदूधर्माने माणसाला पशुवतपणे वागवले. अशा हिंदूधर्माचा त्याग करून डॉ. आंबेडकरांनी लाखो अनुयांयासोबत बौध्द धम्म स्वीकारला. त्याच्या पाठीमागे अनेक सामाजिक, राजकीय सांस्कृतिक, ऐतिहासिक, आर्थिक आणि धार्मिक कारेण आहेत. डॉ. आंबेडकरांनी दि. 13 ऑक्टोंबर 1935 या दिवशी नाशिक जिल्हातील येवले या ठिकाणी धर्मांतराची घोषणा केली. त्या घोषणेत ते म्हणाले ''मी हिंदू धर्मात जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही.'' या ऐतिहासिक घोषणेंनतर तब्बल 21 वर्षांनी 14 ऑक्टोंबर 1956 रोजी नागपूर येथे पाच लाख अनुयांयासह बौध्द धम्माचा स्वीकार केला आणि एका नव्या युगाला सुरवात झाली असे म्हणता येईल. प्रस्तुत संशोधन लेखातून डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचा आढावा खालील प्रमाणे घेता येईल.

**शब्द संकेत** :वर्णव्यवस्था,जातीव्यवस्था,अस्पृश्यांचा छळ, धर्मातराची घोषना अनेक धर्मांचाअभ्यास आणि धम्मदीक्षा

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक सशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना :**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म हिंदू धर्मात झाला होता. या धर्मातील अमानवीयता, कमालीची विषमता त्यांनी जवळून पाहिली नव्हे तर अनुभवली याच विषारी विषमतेत देशातला अस्पृश्य समाज जात्याखाली भरडून निघत होता. म्हणून डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्माचा वरवर अभ्यास न करता सखोल मनन चिंतनातून या धर्मातील विषमता बाहेर आणली. पण ही विषमता केव्हाच नष्ट होणार नाही याची प्रचिती त्यांना आली कारण भारतीय विषमता फार खोलात रूजली होती. ती नष्ट करण्यात त्यांना अपयश आले म्हणून त्यांनी 1935 ला विचारपूर्वक ऐतिहासिक धर्मांतराची घोषणा घेतली होती. या घोषणे संदर्भात ख्यातमान साहित्यीक अरूण कांबळे लिहितात की,''डॉ. आंबेडकांची येवल्याच्या परिषदेतील ही भीमगर्जना जगभर दुमदुमली. निद्रिस्त हिंदू मन तर त्यामुळे खडबडून जागे झालेच, पण त्या बरोबरच जगभराच्या इतर धर्मीयांचे लक्ष डॉ. आंबेडकरांचे आणि त्यांनी चालविलेल्या अस्पृश्यांच्या चळवळीकडे गेले. धर्मांतराच्या या घोषणेचे पडसाद जगभर उमटले गोलमेज परिषदेतील डॉ. आंबेडकरांच्या सहयोगाने विद्वत्ताप्रचूर भाषणाने व गांधी–आंबेडकर वाग्युध्दाने डॉ. आंबेडकरांकडे जगाचे लक्ष वेधले गेलेच होतेच परंतू येवले येथील घोषणा म्हणजे अस्पृश्यांच्या अंतःकरणातील उष्ण लाव्हारस होता. या भूकंपाने सर्व जग हादरले.''[1] एकुणच डॉ. आंबेडकरांच्या धर्मातर घोषणेनं हिंदूसमाज अस्वस्थ झाला. तर बौध्द, शिख, ख्रिश्चन, मुस्लिम धर्मीय त्यांना आपल्या धर्मात ओढण्याचा ओटोकाट प्रयत्न सुरू झाला होता.

जगाच्या पाठीवर अनेक महामानव जन्माला आलेत अनेंकांना समाजाचा चांगला वाईट अनुभव आला. डॉ. आंबेडकर ज्या काळात जन्माला आले त्याकाळात हिंदू समाजात भीषण विषम परिस्थिती होती. भारतीय हिंदू धर्म जातीयवाद आणि वर्णव्यवस्थेने पोखरला गेला होता. सामाजिक एकता, समानता, बंधुत्व, सहकार्य हयासारखी आदर्श तत्त्वे हिंदू समाजातून कालबाहय ठरली होती. ही सर्व परिस्थिती डॉ.आंबेडकरांनी अनुभवली होती. याचा परिणाम त्यांच्या मनावर खूप मोठया प्रमाणावर झाला होता. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या पार्श्वभूमीच्या विचार करत असतांना त्यात मुख्यत्वे हिंदूधर्मातील ब्राम्हण क्षेत्रीय, वैश्य, शुद्र हि चार वर्ण, हिंदूधर्मातील अस्पृश्यता, निच पातळीचा जातीयवाद, महाडच्या चवदार तळयावरील सत्याग्रह, पुण्याच्या पर्वतीवरील अस्पृश्यांचा सत्याग्रह, नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह, मुखेडचा सत्याग्रह आणि मानवी मूल्याचा होणारा ऱ्हास या गोष्टीचा विचार प्रकर्षाने जाणवतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अगदी विचारपूर्वक आणि अभ्यास करूनच बौध्द धर्म स्वीकरण्याचा प्रयत्न केला. तोही भारतीय मातीला. असा धम्म त्यांनी मानवी कल्याणासाठी स्वीकारला. जो भारतीय भूमितून संपत चालला होता. एका अर्थाने डॉ. आंबेडकरांनी बौध्दधम्माचे पुर्नजिवन केले असे म्हणता येईल.हया संदर्भात डॉ.टी.जी. गेडाम यांची भूमिका विचारात घेण्यासारखी आहे ते लिहितात, '' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराची ही घटना ऐतिहासीकदृष्टया अतिशय महत्वाची आहे. बौध्द धम्माला भारताच्या इतिहासात अतिशय महत्वाचे स्थान आहे. भारतीय इतिहासाच्या प्रबोधन काळ्यात उदयाला आलेल्या या भारतीय धर्माने त्या काळात भारतीय जनमानसात आपली जबरदस्त छाप निर्माण केली होती. एवढेच नाही तर त्या काळात बौध्द धम्म संपूर्ण भारतभर पसरला होता. कोटयावधी लोकांनी बौध्द धम्माचा स्वीकार केलेला होता. असा हा भारत भूमितील धर्म कटकारस्थानाला बळी पडून भारत भूमितूनच हद्पार झाला. ही गोष्ट मनाला खिन्न करणारी आहे. परंतु अशा या समताधिष्ठित धम्माला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याच भूमित पुन्हा पुनरूज्जीवीत केले.''[2]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मातर हिंदू समाजातील एका विषम समाजरचनेवर प्रकाशज्योत टाकते. हिंदू धर्मातील विषम असमातेमुळेच डॉ. आंबेडकरांना धर्मांतराचे पाऊल उचलावे लागले. हिंदू धर्मातील अन्याय, अत्याचार आणि गुलामीच्या विरोधाची प्रतिकिया म्हणजे डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर होय. हिंदू समाजातील स्पृश्य आणि अस्पृश्य यांच्यातील कमालीची विषमता आणि त्यांची अस्पृश्यां विषयीची बेपर्वावृत्तीच धर्मांतराला कारणीभूत ठरली असे म्हणता येईल. म्हणूनच डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतर घोषणेबद्दल अरूण कांबळे सांगतात की,''डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेने धार्मिक जगतात तीव्र खळबळ निर्माण झाली. मुल्ला–मौलवी–पाद्री–भिक्खू डॉ. आंबेडकर व त्यांच्या अनुयायांनी आपल्या धर्मात प्रवेश करावा म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. यामध्ये शीख, आर्य समाजिस्ट आणि वीर शैवधर्मीय यांचाही समावेश होता.''[3] हिंदू

धर्म त्यागाच्या घोषणेनंतर डॉ. आंबेडकर पर्यायी धर्माचा शोध घेत असतांना त्यांनी त्याकाळात भारतात असणाऱ्या इस्लाम, ख्रिश्चन,शीख, बौध्द या धर्माचा अभ्यास सुरू केला. खरे तर डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्माची जेवढी चिकित्सा केली, तेवढीच इतर कोणत्याही धर्माची केली नसेल. त्यांच्या मते समाजाला उपयुक्त आणि व्यक्तीला न्याय या दोन मूल्याची परिपूर्ती धर्म करतो किंवा नाही हे पाहणे धर्मचिकित्सा विचारातील प्रमुख सूत्र आहे. धर्म हा माणासासाठी असतो, माणूस कधीही धर्मासाठी जगत नसतो. जो धर्म समस्त मानवमात्रांना उपयुक्त ठरेल व समताधिष्ठित न्यायाची उभारणी करेल तोच खरा धर्म असे डॉ. आंबेडकरांना वाटत. ''त्यांच्या बौध्द धम्म स्वीकारामागे राष्ट्रीयता, देशनिष्ठा, संस्कृती रक्षणाची भावना, सामाजिक प्रेमाची भावनाच आहे हे कोणीही नाकारू शकणार नाही. ते मानवतेचे महान उपासक असल्यामुळे स्वाभिमान व माणुसकी या बाबी त्यांना अत्यावश्यक वाटत होत्या व त्यासाठीच त्यांनी शेवटी बौध्द धम्माचा स्वीकार केला.''[4] म्हणजे डॉ. आंबेडकराना या देशावर आणि इथल्या माणसांवर खूप प्रेम होते या प्रेमापोटीच त्यांनी बौध्द धम्माचा स्वीकार केला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण बौध्द धर्मात धर्म निरपेक्षता होती आपलेपणा होता या संदर्भात डॉ. धनराज डाहाट म्हणतात, '' धर्मापेक्षा व्यक्तीला प्रथम स्थान येणे ही धर्मनिरपेक्षतेची कसोटी आहे. बौध्दधम्मात हेच तत्व असल्यामुळे धर्मनिपरपेक्ष राज्यात बौध्दधम्माला पोषक पर्यावरण आहे.''[5]

डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर आणि धर्मातराची घोषणा म्हणजे त्यांच्या व त्यांच्या अस्पृश्य बांधवांच्या मुक्तीचा मार्ग होता. त्यांच्या स्वतंत्र्य जीवनाचा उषःकाल करणारा महामंत्र होता. हिंदू धर्माच्या नावाखाली इतरांना गुलामीत ठेवण्याचा प्रयत्न उघड व्हावा व आतापर्यंतची स्पृश्य लोकांची विकृत धर्मभावना जगापूढे याची हाच मुख्य उद्देश डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरामागे होता. डॉ. आंबेडकरांच्या या धर्मांतरामुळे हिंदू धर्माच्या अवतार कुपणातून बुध्दमुक्त झालेत व त्यांचे विचार समाजमनात मुक्तसंचार करू लागलेत. डॉ. आंबेडकरांनी ककेले धर्मांतर खऱ्या अर्थाने मानवी कल्याण होते. तो एक स्वधम्मस्वीकार होता. एकस्वाभिमान होता. मानवी अस्मिता होता. एक ओलावा होता जगण्याचा या स्वधम्माबद्दल डॉ. गेडाम म्हणतात, '' रूढार्थाने आपण या बौध्द धम्म स्वीकारला धर्मांतर असे संबोधतो. परंतु खऱ्या अर्थाने तें धर्मांतर नसून तो स्वधम्म स्वीकार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवासोबत स्वीकारलेला बौध्दधम्म हा आपल्या देशाची आणि पूर्वजांचाच धम्म आहे. एकेकाळी तो याच मातीतून उदयाला आला. आणि संपूर्ण देशभर पसरला. कोटयावधी लोकांनी हा धम्म स्वीकारला होता. भारतीय संस्कृतीला उन्नत करण्याचे महान कार्य बौध्द धम्माने केलेले आहे. एवढेच नव्हेतर विदेशातही भारतीय संस्कृतीचा पताका या धम्माने फडकाविला. अशा या भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग असलेल्या बौध्द धम्माला पुन्हा याच आपल्या भारत भूमित पुनरूज्जीवीत करण्याचे महान कार्य डॉ. आंबेडकरांनी केले.त्यांचे कार्य देशासाठी, भारतीय संस्कृतीसाठी निश्चितच गौरवास्पद आहे. या धर्मांतरामुळे अस्पृश्यांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात विशेष बदल झाला नसला तर बौध्द तरी बौध्द धम्मामुळे त्यांना धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त झाले. बौध्द धम्मात त्यांना समानता मिळाली त्याच्यात कुणाचे गुलाम नाही, ही भावना त्यांचात वाढीला लागली. आपल्या प्रगतीचा मार्ग आपणच शोधला पाहिजे यासाठी जे प्रयत्न करू लागले आहेत. सर्व बुरसटलेल्या चालीरीती त्यांनी झुंगारून दिल्या आहेत. त्यांच्यामध्ये वैज्ञानिक भावनेचा विकास होत आहे. हि बाब निश्चितच भुषणावह आहे. धर्मातरामुळं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाला एक नवा जीवनमार्ग उपलब्ध करून दिला आहे. त्यांच्यामध्ये जीवन जगण्याची चांगले जीवन जगण्याची आशा निर्माण केली आहे.''[5]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न संपूर्ण भारत देश बौध्दमय करण्याचा होता.पण नियितीने डाव साधला. त्यांचे स्वप्न अपूर्ण राहीले. त्यांनी आपल्या बुध्दीच्या जोरावर नक्कीच आपला देश बौध्दमय केला असता. कारण धम्म मानवतावादी आहे. समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेने परिपूर्ण आहे. आणि याच मातीतील असल्यामुळे इतरांनाही तो स्वीकारण्यात कोणतीही अडचण निर्माण झाली नसती. परंतु डॉ. आंबेडकरांच्या निर्वाणानंतर बहुजन समाजाने बौध्द धम्म स्वीकारावा यासाठी शिस्तबध्द प्रयत्न झाले नाहीत. बौध्द धम्माच्या तत्त्वज्ञानाची बहुजन समाजापुढे योग्य पध्दतीने मांडणी करण्यात आली नाही हे खेदाने म्हणावे लागेल. पण बाबासाहेब काही काळ जिवंत असले असते तर नक्कीच भारत देश बौध्दमय झाला असता. देशातला बहुसंख्य बहुजन समाज धम्माकडे वळला असता.

**मुल्यांकन :–**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर म्हणजे एका नव्या युगाचा प्रारंभ आहे. हजारो वर्षापासून खितपत पडलेल्या मुक्या जीवाना जगण्याचा अधिकार मिळवून देण्याचे काम बाबासाहेबांच्या धर्मांतराने केले असे म्हणता येईल. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मानची मूल्याची पेरणी करणे म्हणजे धर्मांतर होते. एका मानवतावादी, विज्ञानवादी विचारांचा विजय म्हणजे धर्मांतर होते. भारतातल्या लाखो अस्पृश्यांना बाबासाहेबांनी धर्मांतराने मानवी प्रवाहात आणले. त्यांचा स्वाभिमान जागा केला. भारतातल्याच मातीतल्या धम्माला जिवंत करण्याचे काम डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांना सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि धार्मिकदृष्टया सक्षम करण्याचे काम धर्मांतराच्या माध्यमातून केले असे म्हणता येईल. प्रस्तुत संशोधन लेखातून मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतरावर प्रकाश टाकण्याचे काम केले आहे.

**संदर्भ :–**

1) अरूण कांबळे, धर्मांतराची भीमगर्जना, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती–1996, पृ.19
2) डॉ. टी.जी.गेडाम, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, शारदा प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती 2006, पृ. 11
3) अरूण कांबळे, धर्मांतराची भीमगर्जना, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती–1996, पृ.20
4) डॉ. टी.जी.गेडाम, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, शारदा प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती 2006, पृ. 315
5) लोकेश मेश्राम, धम्मचेतना विशेषांक, तारांगण प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती–2019, पृ.30

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धम्मक्रांतीविषयक दृष्टीकोण

**प्रा.डॉ. रत्नपाल एम. डोहणे**
कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय,
पेट्रोलपंप, जवाहरनगर, त.जि. भंडारा

**सारांशः–** स्वातंत्र, समता, बंधुता, न्यायाची शिकवन देणाऱ्या बुद्ध धम्माची स्थापना तथागत भगवान बुद्धांनी केली. या महान धम्माचे भारतीयांना यथार्थ दर्शन सम्राट अशोकानंतर महामानव, प्रज्ञासुर्य, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर या ठिकाणी बौद्ध धम्माची दिक्षा देऊन धम्मचक्र प्रवर्तीत केले. यावेळी जनसमुहाला मार्गदर्शन करतांना डॉ.आंबेडकर म्हणतात,''हे (नागपूर) ठिकान निवडण्याचे कारण निराळे आहे.ज्यांनी बौद्ध इतिहासाचे वाचन केले असेल त्यांना हे कळुन येईल की भारतात बौद्ध प्रसार जर कोणी केला असेल तर तो नाग लोकांनी केला.''[१]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ मध्ये धम्मदिक्षेनंतर नवदिक्षीत बौद्ध समाजाला मार्गदर्शन केले की, आता तुमची जबाबदारी मोठी आहे. तुमच्याबद्दल आदर वाटेल अशी कृती तुमच्याकडून झाली पाहिजे. बौद्ध धम्माच्या दृष्टीने भारतभूमी शुन्यवत आहे. म्हणून आपण चांगल्या रितीने धर्म पाळण्याच्या निर्धार केला पाहिजे. हे साध्य झाले तर आपल्याबरोबर देशाचाच नव्हे तर जगाचाही उद्धार होईल. त्यासाठी उपासकांनी दर रविवारी विहारात जाऊन उपदेश ग्रहण करावा या विचारातूनच समाजामध्ये सामाजिक व धार्मिक क्रांती घडून येईल. बौद्ध धम्म हा वास्तववादी धम्म आहे. जे मानवाला अनुभवता आले नाही किंवा ज्यांचे अस्तित्व सिद्ध करता आले नाही अशा कोणत्याच गोष्टीवर बुद्धाचा विश्वास नव्हता. म्हणजेच बौद्ध धम्म हा मानवी जीवनात पूर्णत्व साधने व समृद्ध जीवनप्रणाली असून कर्म हेच जगातील नैतीक व्यवस्थेचा आधार मानणारा एकमेव धम्म आहे. आपल्या इंद्रीयावर ज्याचे ज्ञान व आकलन होते अशा गोष्टीवर विश्वास ठेवणारा आहे. बुद्ध धम्म हा विज्ञानावर आधारित आहे. याबाबत डॉ. आंबेडकरांचा दृष्टीकोण होता की, विज्ञानामुळे जागृत झालेल्या समाजाला बुद्धाचा धम्म स्वीकारू शकेल. अन्यथा तो समाज नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. आधुनिक जगाने आपल्या संरक्षणासाठी बुद्ध धम्म हाच खरा धम्म होय.डॉ.बाबासाहेब आंबेडकर धम्मदीक्षा समारोहातील उपस्थितांना मार्गदर्शन करतांना म्हणतात,''आम्ही झगडतो आहोत ते इज्जती करिता । मणूष्यमात्राला पूर्णावस्थेत नेण्याकरिता आम्ही तयारी करित आहोत.त्यासाठी वाट्टेल तो त्याग करण्याची आमची तयारी आहे.''[२]

**शब्द संकेत :धर्मांतरामागिल दृष्ट्रीकोण, बुद्ध धम्माची माणवी मुल्य आणि धम्मक्रांती**

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक सशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना :** शतकानुशतके भारतात अनिष्ट वाईट प्रथा, परंपरा व हिंदू धर्माची अमानवीय प्रथा अस्तित्वात होती. 'महाड' व 'नाशिक' येथे अस्पृश्यांवर होणारा अन्याय सवर्णांची हिंदू धर्मातील अस्पृश्यांकडे बघण्याचा दृष्टिकोण, अस्पृश्यांनी शिक्षण घेणे, मानवी स्पर्श, समाज कौटुंबिक अत्याचार इत्यादी कारणांमुळे डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर करणार म्हणून हिंदू धर्मात मोठी खळबळ माजली होती. डॉ. आंबेडकरांनी आपल्या प्रचंड प्रयत्नांनी अस्पृश्य समाजाला जागृत केले. त्यांच्यात स्वाभीमान त्यांच्यात नवचैतन्य रूजविण्याचे व नव्या जीवनाला प्रत्यक्षात सुरवात करून एक जिद्द निर्माण केली. धर्मांतर हा अस्पृश्यांच्या मुक्तीचा जिव्हाळयाचा विषय होता. त्यासाठी बाबासाहेबांनी धर्मांतराचा विचार लोकांना सांगतांना म्हणतात की, धर्मांतराच्या घोषणेची सार्थकता पटल्याशिवाय कोणीही धर्मांतर करू नये. मी सांगतो म्हणून धर्मांतर केले पाहिजे असे नाही. तुमच्या बुद्धीला पटेल तरच होकार दया. धर्मांतर करण्यासाठी बाबासाहेबांनी जवळपास २० वर्षाचा कालावधी घेतला. या काळात जगातील अनेक धर्माचा, धर्मग्रंथाचा त्यांनी अभ्यास केला. शेवटी जो धर्म ते स्वीकारणार होते तो भारतीय धर्मच असणार असेही सांगत होते. 'अस्पृश्यता नष्ट करा, माणूसकीचे सर्व हक्क, अधिकार दया.' मात्र हिंदू बांधवांनी मानले नाही म्हणून नाईलाजाने त्यांना धर्मांतर करावे लागले. धर्मांतराच्या वेळेस बौद्ध बांधवांना २२ प्रतिज्ञा दिल्या त्यावरून त्याचा महान दृष्टीकोण लक्षात येते.

**धर्मांतर करण्यामागील दृष्टीकोण :—**

डॉ. आंबेडकरांनी ज्या चळवळी केल्या त्यामागे हिंदू धर्मात परिवर्तन घडवून आणावयाचे होते. आपल्याला जातीव्यवस्थेवर आधारित सर्व मानवनिर्मित अडथडे मोडायचे आहेत. सर्वांना प्रगती करता येईल, सर्वांना नागरी हक्क देण्यात येतील. आपल्या चळवळीतून हिंदू समाज नव्याने निर्माण करता आला तर देशाची खरी सेवा होईल. हिंदू धर्माला जडलेला जातीभेद आणि अस्पृश्यतेचा महारोग दूर करण्यासाठी अनेक ग्रंथ लिहिली. विधायक योजना मांडली.

धर्म हा मनुष्याकरिता आहे. मनुष्य धर्माकरिता नाही. या जगात जर संघटन करायचे असेल, समाज एक संघ करायचा असेल तर हिंदू धर्माचा त्याग करा, जो धर्म तुम्हास माणुस म्हणून म्हणावयास तयार नाही तो धर्म नसुन माणुसकीला कलंक आहे. जो धर्म काही वर्गांना शिक्षणापासून दूर ठेवतो त्यांना धनसंचय करू देत नाही, शस्त्र हाती घेऊ देत नाही तो धर्म नसून माणसाच्या जीवनाची विटंबना आहे. जो धर्म अज्ञानाला अज्ञानी व निर्धनांना निर्धन रहा असे सांगतो तो धर्म नसून शिक्षा आहे. माणसाची प्रगती विविक व व्यक्तीस्वातंत्र्यावर होते. माणसाच्या बुद्धीला विचार करायला हिंदू धर्म वाव देत नाही. शिक्षण हेच माणसाच्या उद्धाराचे माध्यम आहे. हिंदू धर्म म्हणजे मातृद्रोही धर्म होय. लिंग, वर्ण, वर्ग अनेक भेदाभेदांची कैफियत म्हणजे हिंदू धर्म होय. अशा पद्धतीचा दृष्टीकोण बाबासाहेबांचा होता.

**बुद्ध धम्माची माणवी मुल्य :—**

विवेक व विज्ञाननिक असलेल्या बौद्ध धम्माचा सखोल अभ्यास करून बौद्ध धम्माची दिक्षा घेतली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,''बुद्ध धर्म शिक्षण,शील चारित्र्य,व्यक्तिस्वातंत्र्य,समता व लोकशाहीचे व्यासपीठ आहे.''[३] डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मासंबंधी दृष्टीकोण सांगत असतांना बुद्धीप्रामाण्यावर आधारित मूल्ये सांगीतली. हिंदू धर्म त्याच्या कसोटीत उतरू शकत नाही म्हणून डॉ. आंबेडकरांना बौद्ध धम्म प्रभावीत केले त्यांनी भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न उराशी बाळगले. बौद्ध धम्म हा विवेकावर आधारलेला आहे. व्यक्तीचे आचरण, वर्तणूक यावर व्यक्तीला सुख व दु:ख प्राप्त होतो. या धम्मात अज्ञान, अंधश्रद्धेला महत्व नाही. स्वातंत्र, समता व बंधुत्व या तत्वावर आधारित शिकवन आहे. तसेच बौद्ध तत्वज्ञान त्रिकालाबाधीत सत्य आहे असे नाही तर काळानुसार, परिस्थितीनुसार त्यास परिवर्तन होऊ शकते. खऱ्या अर्थाने बौद्ध धम्म हा माणवी मूल्यांची जोपासना करणार आहे. बहुजन हिताय, बहुजन सुखाय अशा मानवजातीला कल्याणकारी तत्वज्ञान आहे. एकंदरीत लोकशाहीचे संवर्धन करण्यासाठी, मानवतावादी मूल्ये रूजविण्यासाठी बाबासाहेबांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला. थोडक्यात डॉ. आंबेडकरांचा बौद्ध धम्म, राष्ट्रवाद हा धर्मनिरपेक्षता आणि मानवता मूल्यांवर आधारीत आहे.

**संदर्भ :—**

१.लोकराज्य,धम्मचक्र प्रवर्तन सूवर्ण महोत्सव विषेशांक,ऑक्टोंबर २००६,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,महाराष्ट्र शासन पृष्ठ क्रं ५

२.कित्ता पृष्ठ क्रं.६

३.भारत भाग्य विधाता डॉ.बाबासाहेब आंबेडकर लोटस ऑण्ड कोब्रा पब्लीकेशिंन हाऊस,नागपूर प्र.आ.२०१७ पृष्ठ क्रं.९५

सहायक संदर्भग्रंथ

१.बौद्ध आणि त्यांचा धम्म — डॉ.बी.आर. आंबेडकर.

२.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार, शंकरराव खरात, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पूणे.

३.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, किर धनंजय, पॉपुलर प्रकाशन, मुंबई.

४.डॉ. भिमराव रामजी आंबेडकर चरित्र, खैरमोडे चांगदेव, सुगाव प्रकाशन, पूणे.

५.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, खरात शंकरराव, रौप्य महोत्सवी प्रकाशन, पुणे.

६.बुद्ध तत्वज्ञान आणि प्रबोधन क्रांती, निरंजन पाटील, प्रज्ञाबोधी साहित्य प्रकाशन, कल्याण.

# "धम्मक्रांतीचे महत्व"

प्रा.डॉ. उमेश जनबंधू
बॅरि. शेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविदयालय
खापरखेडा. ता. सावनेर जि. नागपूर

**सारांश :** भारत हा देश धर्म या संकल्पनेचा उद्गाता राहीलेला आहे. भारतात प्रथम हडप्पा संस्कृती उदयास येऊन तीने संपूर्ण मानवजातीला अनेक नव्या गोष्टी व प्रथा उपलब्ध करुन दिल्या आहेत. हडप्पा कालीन माणूस हा निसर्गाला अनुरुप असे साधे सोपे संय्मीत व शांत जीवन जगत असे. अधिकृतरित्या धर्म नावाची संकल्पना त्यावेळी उदयास यायची होती परंतु ते निसर्गाची पूजा करीत असत. वृक्ष नाग, बैल, शेती हे त्यांच्या पूजास्थानी होते. तरी त्यांचा ते अवडंबर करीत नव्हते. एक प्रकारे हडप्पा संस्कृती ही धर्मातीत होती कारण तेथील संशोधनात कोणतेही मंदीर किंवा धर्मग्रंथ कुठेही सापडलेले नाही. मानवी जीवनाला अनुकूल होईल असे एकजिन्सी जीवन ते जगत होते. परंतु काही काळानंतर भारतात युरेशियनांचे (आर्यांचे) आगमन वैभवाला पोहोचलेली हडप्पा संस्कृती उध्वस्त होण्यासाठी कारणीभूत ठरली. परकीय युरेशियन हे लोक रानटी, युध्दखोर, कपटी, षडयंत्री , भयंकर स्वार्थी ,माणसातील पशुवृती असलेले हे लोक होते. यांनी येथे येऊन विविध कटकारस्थाने करुन भारतात राहणा–या मुळनिवासींना टप्या टप्याने जिंकून त्यांना गुलाम करुन, त्यांचे शिक्षण हिसकावून काल्पनिक देवदेवता, धर्मग्रंथ, विविध रितीरिवाज, वर्णजाती, कर्मकांडे, स्वर्गनर्क आत्मा परमात्मा विविध अंधश्रध्दा निर्माण करुन त्यांच्यावर लादून त्यांच्यावर नियंत्रण प्रस्थापित केले. व त्याला धर्म ही संकल्पना दिली. आणि ही कल्पना पुढे वाढत जाऊन त्यास त्यांनी वैदीक धर्म असे म्हटले.

**शब्द संकेत : वैदिक,बौद्ध व जैन धर्म,इतिहासातील धर्मांतरे आणि डॉ.आंबेडकरांनी केलेले धर्मांतर**

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक सशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना :**वैदीकांच्या वर्णजाती व्यवस्थेतुन पुढे अस्पृश्यतेचा उदय झाला. त्याचे घातक व विकृत परिणाम भारतीय समाजावर होऊ लागले. समाजातील एकता, शांतता, मानवता, संपूर्णपणे लयास गेल्याने त्यांच्या विरोधात आवाज उठविणे तत्कालीन सत्पुरुषांनी सुरु केले. क्रियेची प्रतिक्रिया होऊ लागली. त्यामध्ये चार्वाक, वर्धमान महावीर, व गौतम बुध्द यांचे नाव घेता येईल. या सर्वानी "मानव मानव एक समान" चा संदेश दिला. वैदिक धर्माच्या कृत्रीम बंधनातुन मुक्त होण्याचे आव्हान केले. परिणामी वैदीकी अवडंबराने त्रस्त असलेल्या सर्वसामान्य लोकांनी तो धर्म व मानवद्रोही विचार सोडून चार्वाकांनतर ते जैन व बौध्द धर्माकडे वळले, येथूनच पुढे भारतात धर्मातरांची परंपरा उदयास आली. सर्वाना सर्व काळ मुर्ख बनविला येत नाही. याप्रमाणे मानवाला स्वअस्तिवाची जाणीव झाली की, मनुष्य स्वतःमध्ये बदल करतो. टाकाऊ टाकून देतो नवजीवन धारण करतो तसे धर्मातराचे झाले आहे. "धर्माचा खरा हेतू माणसाच्या उन्नतीसाठी म्हणजेच त्याला अधिक चांगला बनविण्यासाठी, एक परिपूर्ण माणूस बनविण्यासाठी किंवा प्रबुध्द माणूस बनविण्यासाठी असतो. माणूससर्वप्रथम माणूस आहे. तो धर्मापेक्षा अधिक महत्वाचा आहे. आणि धर्म त्यांच्यासाठी आहे. असे जेव्हा आपण मानतो त्यास आपण मुलतःमानवतावादी दृष्टीकोन म्हणतो. या मानवतावादी दृष्टीकोनाचा सर्वच धर्म स्विकार करतात असे नाही. धर्माच्या विचारसरणीचे लोक धर्मासाठी माणूस आहे. याच विचाराची पेरणी करतात. त्यामुळे धर्माच्या सहअस्तित्वाला धोका निर्माण होतो" (1) ''भारतात परचक्र आल्यापासून धर्मातर उदय पावले असे नाही. वैदीक धर्मजनित वर्णजातीच्या वावटळीला तोंडदेणा–या शक्ती उदय पावल्या तेव्हापासूनच धर्मातंराची बीजे भारतभुमीत पक्की रुजली. षडदर्शनांनी आपल्या विचारांना धर्मसहिष्णुतेची इंद्रपताका मानून धन्य होण्यात काय हशील आहे? बुध्द महावीर व चार्वाकांच्या काळापासून धर्मातराचा संकटकालीन मार्ग अस्तित्वात आला.'' (2) ज्या धर्माला आपण हिंदूधर्म म्हणतो तो पूर्वीच्या वैदीक धर्मच होय. म्हणूनच याबाबत डॉ. बाबासाहेब आंबडेकर म्हणतात. ''विषमता हिंदुधर्माच्या रक्तातच आहे. दोघेही परस्परावर अवलंबून आहेत. एकनाश पावला की दूसरा जगत नाही. अशा धर्मात सुधारणा होणे अशक्य प्राय आहे. म्हणून मी आता धर्मातराचा निर्णय घेतला आहे.''(3)

प्राचीन व मध्ययुगीन काळापासून भारतात धर्मांतराचे प्रकार चालत आलेले आहेत. पुढेही ते चालत राहणार आहेत. याबाबत स्वामी विवेकानंद म्हणतात'' भारत के गरीब समाज मे इतनी बडी संख्या मे मुसलमान आये कहा से यह धर्मांतर निश्चितही तलवार के बलपर नही हुआ/बल्की भट ब्राम्हण, जमीनदार, साहुकारो से खुद को छुडाने के लिए हुआ है/सारा सारा अफगानिस्तान और आज का बंगाल तथा सारा काश्मिर बौध्द था वह मुसलमान बननेपर कैस मजबूर हुआ? अगर हिंदुओने बौध्दो का तिरस्कार

और उनपर अत्याचार नही किया होता तो वे क्यो मुस्लिम बन जाते? इसपर सभी धर्ममार्तंडोने घरवापसी और लव्ह जेहाद के पहले गंभीरता से सोचना चाहिए''(4)

मुनष्य जेव्हापासून या पृथ्वीवर जन्माला आला, तेव्हापासून तो स्वतःमध्ये नियमितपणे गरजेनुसार बदल करित आला आहे. जे काळानुसार टाकाऊ वाटले ते सोडले व जे योग्य – उपयुक्त वाटले ते धारण केले असा त्याचा इतिहास राहिला आहे. म्हणून मनुष्य पाषाणयुगातून, धातुयुगाकडे व धातूयुगातून विज्ञानयुगाकडे व आता संगणकयुगाकडे वाटचाल करतांना दिसतो आहे. तसे धर्माबाबतही झाले आहे. जे अयोग्य धर्म वाटला– अनुपयुक्त, त्रासदायक, मानवीजीवन जगण्यास कठीण करणारा वाटला त्याला सोडून देण्याचे काम त्याने केले व नविन पर्याय शोधुन नविन धर्म स्विकारण्याचे काम त्याने केले आहे. हे कार्य प्रत्येक कालखंडात होत राहिले आणि पुढेही होत राहणार आहे. धर्मांतर करणे हा मानवी विकासातील एक टप्पा आहे. त्याला थांबविणे कदापीही शक्य नाही.

भारतात ग्रीक, शक, हुण, अरबी, मोगल, पोर्तुगिज, डच, इंग्रज, फ्रेंच आले. त्यांनी स्वतःची संस्कुती विचारधारा, परंपरा सोबत आणली त्यातील उपयुक्त जे वाटले ते स्विकारण्याचे कार्य भारतीयांनी केले म्हणूनच भारतात विभिन्न रुढी, परंपरा दिसतात त्याचे ते कारण आहे. जे चांगले ते आपले समजून त्यांचा अंगीकार केला आहे. याबाबत संशोधक मणिमाला लिहितात'' इस्लामी अभियान के पूर्व ब्राम्हण धर्मियोंका हरस्तरपर सीधा संघर्ष बौध्दोके साथ था जब भारत मे नयी शक्तीने आपने पैर जमाये तो ब्राम्हणी व्यवस्था मे खलबली मची. हिंदूधर्म और वर्ण व्यवस्था पर प्रहार भी हुआ ! ऐसे मे दलित तथा पिछडो को बल मिला और नया रास्ता भी, एन. आर. सागर लिखते है की, इस्लाम के भारत प्रवेश के साथ ही एक बार फिर दलित समुदाय के मन मे समानता और सन्मान की भूख जाग उठी. वे आशा भरी निगाहो से उसकी और देखने लगे, मुस्लिम शासको और धार्मिक नेताओने ने इस अवसर को अपने धर्म के प्रचार प्रसार के लिए उपयुक्त अवसर और भारत मे अपने पैर दृढता से जमाने का एक सुयोग माना, यही कारण है की, दलितो का इस्लाम मे मुक्त हदय से स्वागत किया गया ! दलितोने भी इसे अपने उत्थान का सुअवसर माना और इस्लाम की और मित्रता का हाथ बढाया'' (5) हाच प्रकार नंतर भारतात आलेल्या ख्रिश्चन धार्मियांनीही केला.

आधुनिक भारतातील अधिकृत धर्मांतराची मोठी घटना म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले धर्मांतर होय. (14 ऑक्टो 1956) म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर धर्मांतरापुर्वी म्हणतात'' या देशातील हिंदू संस्कृती ही अमानवी व्यवस्था आमच्या माणूसपणासाठी आजही दरवाजे बंद करुन बसली आहे. त्यामुळे ही व्यवस्थाच काढून टाकण्याचा निर्णय मी घेतला आहे.''(6) '' स्वतंत्र समाज के लिए धर्म आवश्यक है. लेकीन हर धर्म ग्राहय नही होता'' (7) ''धर्मातराने अस्पृश्यांचा नैतिक दर्जा कायमचा उंचावेल याचा त्यांना आत्मविश्वास होता. बौध्द धम्माइतका दुस–या कोणत्याही धर्मात ज्ञानाच्या मुल्यावर आणि अज्ञानाच्या हीनतेवर भर देण्यात आलेला नाही'' (8) असे त्यांचे म्हणने होते व ही व्यवस्था काढून टाकण्याचे सामर्थ्य या धर्मांतरात आहे. ही धर्मातर क्रांती कोणतेही आमिषन दाखविता धाकदडपशाही न करता, विचारानेच केलेली धर्मक्रांती होय. याला वैश्विक जीवनामध्ये आज वेगळे महत्व प्राप्त झालेले आहे. या दृष्टीने त्यांनी बौध्द धर्म 22 प्रतिज्ञासह स्विकारुन आपल्या अनुयायांना दिले आणि म्हटले ''बौध्द धम्माच्या दृष्टीने भारताची भूमी शुन्यवत आहे. उत्तमरीतीने धम्म पाळला पाहिजे बौध्द धर्माने आपल्या देशाचा उध्दार व जगाचा उध्दार होणार आहे.'' (9) ''रुढार्थाने त्यांनी धर्मातर केले असे आपण संबोधतो परंतु ते ख–या अर्थाने धर्मातर नसून तो स्वधम्म स्विकार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवासोबत स्विकारलेला बौध्द धम्म हा आपल्या देशाचा आणि आपल्या पूर्वजांचाच धम्म आहे. एकेकाळी तो याच मातीतून उदयाला आला, आणि संपूर्ण भारतभर पसरला. कोटयावधी लोकांनी हा धम्म स्विकारला होता. भारतीय संस्कृतीला उन्नत करण्याचे महान कार्य बौध्द धम्माने केले आहे. एवढेच नव्हे तर विदेशातही भारतीय संस्कृतीचा पताका या धम्माने फडकाविली आहे. अशा या भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग असलेल्या बौध्द धम्माला पुन्हा याच आपल्या भारत भुमित पुनरूज्जीवीत करण्याचे महान कार्य डॉ. आंबडेकरांनी केले. त्याचे हे कार्य देशासाठी, भारतीय संस्कृतीसाठी, निश्चितच गौरवास्पद आहे. या धर्मांतरामुळे अस्पृश्यांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात खुप विशेष बदल झाला नसला तरी बौध्द धम्मामुळे त्यांना धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त झाले. बौध्द धम्मात त्यांना समानता मिळाली. त्याच्यात स्वाभिमान निर्माण झाला. यामुळेच त्यांना आपल्या जीवनाचे मुल्य कळून आले. आपण कुणाचे गुलाम नाही ही भावना त्यांच्यात वाढीला लागली. आपल्या प्रगतीचा मार्ग आपणास शोधला पाहिजे. यासाठी ते प्रयत्न करु लागले आहेत. सर्व जुन्या बुरसटलेल्या चालीरीती त्यांना झुगारुन देऊन त्यांच्यामध्ये वैज्ञानिक भावनेच्या विकास होतांना दिसतो आहे. ही बाब निश्चितच भुषणावह आहे. '' (10) डॉ. आंबेडकरांनी जे धर्मातर केले त्याचे अनेकांनी स्वागतही केले "तरुण भारत कार भाऊसाहेब गं.त्र्य. माडखोलकर

यांनी बाबासाहेबांनी समर्थन केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनाही त्याचे समर्थन केले ''गाडगे बाबांचेही त्यांना आशिर्वाद मिळाले होते''(11) आता प्रश्न असा निर्माण होतो की डॉ. आंबेडकरांनी बौध्द धर्माला भारतात पुनरुज्जिवित करण्याच्या प्रयत्न धर्मातराच्या रुपाने केला त्याचे काय महत्व आहे किंवा त्याचे काय अनुकूल–प्रतिकूल परिणाम झाले. ते पाहणे महत्वाचे ठरेल.

- आपला याच जन्मात नविन पुनरजन्म झाला याचा अस्पृश्यांना प्रथमता भास झाला.
- हिंदूधर्मातील देव, ईश्वर, आत्मा–परमात्मा, स्वर्ग, नर्क, मोक्ष, कर्मकांड पुरुषार्थ यापासून दुरावा निर्माण झाला.
- हिंदू धर्म ग्रंथ खोटया तत्वज्ञानावर आधारित असून ते थोतांड आहे हे लक्षात आले
- पशुहत्ये पासून दुरावा पत्करने योग्य आहे असे समजून त्यासी दुरावा पत्करला.
- हिंदू प्रथेतील भूत, खेत, मुहुर्त पाहणे, पंचांग पाहणे, देवदेवतांच्या जत्रांमध्ये जाणे बंद झाले.
- बौध्द विहार संस्कृती उदयास येऊ लागली. बौध्द तत्वज्ञानानुसार विचार व आचरण करण्याचा प्रयत्न सुरु झाला.
- मानसिक बदलाला सुरुवात होऊन मी आता हिंदू–महार नाही. मी बौध्द आहे. ही नविन ओळख निर्माण करण्यासाठी धर्मांतरीत व्यक्ती व समाज प्रयत्न करु लागला.
- ग्रामीण भागातील गावकीची कामे, बलुत नित्कृष्ठ कामे सोडने सुरु झाले.
- घरी स्वच्छता पाळणे सुरु केले अंगावरील कपडे निटनिटके वापरणे सुरु केले
- मुलामुलींना शिक्षणदेण्यासाठी विशेष प्रयत्न करणे सुरु केले. शिक्षणाचे जीवनातील महत्व त्यांच्या लवकर लक्षात आले.
- शिक्षणाच्या आकर्षणातूनच या नविन धर्मातरीत बौध्द समाजात लेखक, वकील, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, अधिकारी वर्ग नव्याने उदयास आला. परिणामी आर्थिक संपन्नता येऊ लागली.
- धर्मातरामुळे जुने व्यवसाय सोडल्याने नविन व्यवसाय शोधण्यासाठी प्रयत्न सुरु झाले. त्यामध्ये स्वतःचा जम बसवायला सुरुवात केली गेली.
- धर्मातरामुळे गावकीकडून त्रास होऊ लागल्याने खेडे सोडून शहराकडे जाण्याचे प्रमाण वाढले.
- लिंगभेदात्मक विषमतेचे प्रमाण कमी होऊन कुटुबांत मुलीना, स्त्रियांना मानाचे स्थान देणे सुरु केल्या गेले.
- बौध्द धर्माच्या नियमानुसार नामकरण, साक्षगंध, लग्नाविधी, अत्यंसंस्कार, सण इ. साजरे करण्यावर भर देणे सुरु झाले.
- हिंदू पारंपारिक सणतिवारा पासून स्वतःला अलिप्त ठेवण्यासाठी प्रयत्न सुरु केले.
- बौध्द धर्माच्या संस्कृतीनुसार मुलीमुलांचे नावे ठेवण्यात येऊ लागली.
- बौध्द धर्माच्या प्रचार व प्रसार करण्यासाठी ''बौध्द महासभा'' सारखे धार्मिक संघटन उभे करुन प्रचाराला गती देण्यासाठी प्रयत्न सुरु केले गेले.
- बौध्द भिक्खु–भिक्खुनीची निर्मितीसाठी प्रयत्न सुरु केले गेले.
- स्वतःच्या समाजाची नक्की ओळख म्हणून गावागावात डॉ. आंबेडकरांचे पुतळे व बुध्दीमुर्तीची स्थापना करण्यात येऊ लागली.
- गावोगावी शहरोशहरी नवधर्मांतरीत बौध्दांच्या वतीने प्रबोधनाचे कार्य सुरु झाल्याने गावातील इतर समाजचेही मनपरिवर्तन होऊन उचनिच कल्पना दिवसे दिवस मागे पडू लागली.
- आंतरजातीय, पोटजातीय विवाहाचे प्रमाण वाढू लागले.
- आत्मभान आल्याने साहित्य निर्मितीची प्रक्रीया सुरु झाली. दलित साहित्य, विद्रोही साहित्य, नाटयलेखन मोठया प्रमाणात सुरु झाले. सम्मेलने सुरु झाली.
- दलितांची मुलेमुली उच्च वर्णियांच्या मुलांशी शिक्षणात बरोबरीची स्पर्धा करु लागली.
- धर्मांतरामुळे नैतिक व भौतिकविकास वाढून त्याला गतीशिलता मिळाली.
- अंधःश्रध्दा, वर्ण, जाती अनिष्ठ, रुढी, परंपरा नष्ट करण्यासाठी विविध सामाजिक धार्मिक संघटना स्थापन करुन प्रबोधनाचे कार्य धर्मांतरीत बौध्दांकडुन संपुर्ण भारतात सुरु केले गेले आहे. त्यासाठी तन मन धन देणे सुरु आहे.
- समाज विकासाकरिता लहान मुलासाठी संस्कार शिबिरे, युवकासाठी समता सैनिक दल काम करु लागले.

- दीक्षाभुमी, चैत्यभुमी, महू, महाडचे तलाव, बौध्दगया, सारनाथ, लुबींनी वै. क्षेत्र अस्मितेची केंद्रे बनली.
- सर्व समस्यांची गुरुकिल्ली राजकीय सता यामध्ये आपला प्रभाव वाढविण्यासाठी प्रयत्न सुरु झाले. दबागट निर्माण केला.
- देशाच्या संविधानाबाबत प्रचंड सन्मानाची भावना वाढीस लागली.
- धर्मांतरीतांनमध्ये लोकशाही, धर्मनिरपेक्षता, विज्ञानवादी विचारसरणीतुन महत्व देण्याची प्रवृत्ती वाढली.
- इतर देशातील बौध्दाशी संपर्क वाढविणे, धम्मप्रसार कार्यात सहकार्य घेणे सुरु केले. विदेशातील बौध्दभिक्खू भारतात बौध्द धर्माचा प्रचार करण्यासाठी आले. त्यांचा आदर सत्कार वाढला.

**निष्कर्ष** : हिंदू धर्मियांचे प्रबोधन करुन त्यांना बौध्द धर्माकडे वळविण्यासाठी 'चलो बुध्द की और' ही मोहिम राबविणे सुरु केले आहे त्यात त्यांना यशही मिळत आहे इ. असंख्य आणि विविध परिणाम धर्मांतरामुळे झालेले दिसून येतात म्हणूनच शेवटी विशेष प्रतिक्रीया देताना ख्रिश्चन धर्म सोडून बौध्द धर्म स्विकारणारे प्रा. डॉ. इसादास भडके म्हणतात. "बौध्द धम्मामुळे मला माझी अस्मिता मिळाली. माझ्यातला स्वाभिमान सजग होऊ लागला. शिक्षणाचे महत्व मला कळू लागले. आमचे पूर्वज कोण होते. ही अस्मितेची जाणीव धर्मांतरामुळे बाबासाहेबांनी करुन दिली. इतिहास आपलाही आहे. हा दृढ विश्वास निर्माण झाला. ख–या अर्थाने माझी बौध्द मानसिकता आकाराला आली.''(12) संत कबिर म्हणतात'' जिस तन लागे वही तन जाने बीजा क्या जाने गव्हारा रे '' (13) या प्रकारे दलितांनी स्वतःमध्ये बदल घडवुन आणुन आपला इतिहास रचला तो पिढयांपिढया प्रेरणा देणारा ठरला आहे.

संदर्भ :–


1)गडपायले राहुल (मुख्य संपादक) दै. सकाळ :– दीक्षा विशेषांक आक्टो–2019 नागपूर पृष्ठ क. 51

2)किता पृष्ठ क. 47

3)किता पृष्ठ क. 47

4)किता पृष्ठ क. 47

5)गेडाम डॉ. टी. जी. :– डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, प्रकाशक प्रा शारदा गेडाम, नागपूर 2006 पृष्ठ क. 21

6)कांबळे डॉ. राजेंद्र :– डॉ. बाबासाहेब आंबडेकरांच्या धर्मातराचे परिणाम सुधीर प्रकाशन बोरगाव, वर्धा एप्रिल 2007 पृष्ठ क. 33

7)माथुर डॉ. प्रदीप :– महात्मा गांधी और डॉ. आंबडेकर इशिका प्रकाशन जयपूर 2010 पृष्ठ क. 178

8)डॉ. साळवे मधुकर :– डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक, राजकीय, धार्मिक चळवळ, नालंदा प्रकाशन पुणे एप्रिल 2010 पृष्ठ क. 351

9)कित्ता पृष्ठ क. 353

10)गेडाम डॉ.टी.जी :– पुवौक्त पृष्ठ क. 325

11)गडपायले राहुल (मुख्य संपादक) दै. सकाळ दीक्षाविशेषांक पृष्ठ क. 47

12)कित्ता पृष्ठ क. 53

13)मनोहर डॉ. यशवंत :– डॉ बाबासाहेब गौरवग्रंथ, प्रकाशक कुलसचिव, नागपूर विद्यापिठ, नागपूर एप्रिल 1991 पृष्ठ क.187

# आंबेडकरी धम्म चळवळीपुढील आव्हाने

**डॉ. प्रियराज महेशकर**
इतिहास विभाग प्रमुख
प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय,
सावित्रीबाई फुले ज्ञान मार्ग, न्यू नालवाडी,वर्धा

**सारांश :**पुर्वास्पृश्यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन ६३ वर्षांचा काळ लोटला तरी त्यांच्यामध्ये पूर्वाश्रमीच्या हिंदू धर्मिय उपासना पद्धतींचे 'सातत्य' वेगळया स्वरूपांत अजूनही टिकून आहे. ब्राम्हणी देवांदिकांची उपासना करणे, बुद्धाची चैतन्यपूजा करणे, बुद्धमूर्तीला फळांचा नैवद्य दाखविणे, तिची साग्रसंगीत पूजा करणे, बुद्धमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करणे, सत्यनारायणाप्रमाणे परित्राण पाठ करणे, पौर्णिमेच्या निमित्ताने उपवास करणे, मृत्यूपरांतचा तेरवी सारखा विधी करणे अशा कांही आचरणातून बौद्धांमध्ये ब्राम्हणी हिंदू धर्मीय जीवनाचे 'सातत्य' अजूनही टिकून असल्याचे दिसते. किंबहुना परित्राणपाठ, पौर्णिमेचे उपासतापास याद्वारे ते अलीकडे वाढत असल्याचे संशोधनात आढळले. अर्धशतकाच्या वाटचालीत संस्थात्मक पातळीवर धम्म चळवळीची प्रभावी बांधणी करण्यात आलेल्या अपयशामुळे व धम्म चळवळीच्या न झालेल्या मिशनरीकरणामुळे, हिंदू धर्म त्यागानंतर निर्माण झालेली आध्यात्मिक कर्मकांडाची पोकळी परित्राणपाठ, विपश्यना, ध्यानधारणा, पौर्णिमेचे उपवास अशा नव्या कर्मकांडानी व्यापली जात आहे. त्यामुळे २०५६ सालापर्यंत आंबेडकरी बौध्द धम्माचा विज्ञानवादी, इहवादी, क्रांतिकारी पर्याय धूसर होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

**शब्द संकेत : बौध्दांमधील हिंदू धर्मिय परंपरांचे सातत्य,जुन्या प्रथांची वहिवाट आणि बौद्ध धम्माच्या उच्च तत्वांना गालबोटसंशांधन पद्धती :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रास्ताविक** १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या ५ लाखांहून अधिक अनुयायांना बौध्दधम्माची दीक्षा देत त्यांची ब्राम्हणी धर्मव्यवस्थेच्या छळ, गुलामी व सांस्कृतिक तुरुंगातून मुक्तता केली.[१] या मुक्ततेचा सुवर्ण महोत्सव साजरा होत असतांनाच बौद्ध धम्मात दीक्षित पुर्वास्पृश्यांच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनांत झालेले 'बदल' व त्यांच्यात पुर्वाश्रमीच्या हिंदूधर्मिय प्रथा परंपरांचे अजूनही टिकून असलेले 'सातत्य' याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखकाने आचार्य पदवी संशोधनासाठी केला होता. त्यातून सापडलेल्या तथ्यांच्या आधारावर डॉ. आंबेडकरांच्या धम्मापुढे कुठली प्रमुख अंतर्गत आव्हाने आहेत याची चर्चा येथे केली आहे.

**बौध्दांमधील हिंदू धर्मिय परंपरांचे सातत्य** :अजूनही विद्यमान बौद्धांच्या जीवनात काही हिंदू धर्मिय प्रथा परंपरांचे सातत्य दिसून आले. डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञांमधील पहिल्या पाच प्रतिज्ञांनुरूप ६४ टक्के धम्मदिक्षितांनी देव व दैव या कल्पनांचा त्याग केला असला तरी उर्वरित ३६ टक्के नवबौद्ध हे अजूनही हिंदू धर्मिय मानसिकतेत अडकून असून ते गणपती, लक्ष्मी, दुर्गा, गजानन महाराज, साईबाबा, विक्तुबाबा आदींची उपासना करतांना आढळले.[२] पण त्यांच्यावर असलेल्या स्व समाजाच्या दडपणामुळे त्यांना उपरोक्त देवादिकांच्या उपासना घरात लपूनछपूनच कराव्या लागत असल्याचे दिसले. बुद्धालाही देव बनवून बुद्धमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करणे, तिला फळांचा नैवैद्य दाखविणे, तिची साग्रसंगीत पूजा करणे अशा धम्मविसंगत बाबीही बौद्धांकडून होत असल्याचे दिसले.[३]

हिंदू धर्म त्यागानंतर पुर्वास्पृश्य नवबौद्धांमध्ये निर्माण झालेली आध्यात्मिक कर्मकांडाची पोकळी चमत्कारवादी परित्राण पाठाच्या कर्मकांडाने भरली जात असल्याचे धक्कादायक वास्तव निदर्शनास आले. ८५ टक्यांपेक्षा अधिक धम्मदीक्षित बौद्ध परित्राणपाठाच्या आहारी गेल्याचे दिसून आले.[४] परित्राण पाठ हा बौद्धांचा सत्यनारायण पूजापाठच झाला आहे.[४] हाताला परित्राणाचा 'पांढरा धागा' बांधलेले आंबेडकरी अंधश्रद्ध! सर्वत्र दिसून येत आहेत. अशा पांढरा धागा बांधलेल्या हातांनी बौध्दमय भारताच्या व्हिजनची उभारणी होईल असे वाटत नाही. धम्मासाठी जी बौद्ध पूजापाठाची पद्धत विकसित झाली त्यात प्रामुख्याने त्रिसरण, पंचशील व बुद्धवंदना या बाबतीत सर्वत्र सारखेपणा आहे. मात्र इतर गाथांच्या बाबतीत मतभिन्नता व विधींच्या बाबतीत विविधता आहे.

बहुतांश बौद्धानुयायांना वंदनांचा अर्थ माहीत नसला तरी त्या हिंदू आरत्यांप्रमाणे मुखोद्गत करून म्हटल्या जात असल्याचे दिसून आले. तरूण पिढीला त्रिसरण वगळता इतर वंदनांची माहिती नसल्याचे जाणवले.[५]

परित्राण पाठाप्रमाणेच अलीकडील पंधरा वीस वर्षाच्या काळात आर्थिकदृष्ट्या स्थिर झालेल्या बौद्धांमध्ये 'विपश्यना' व 'ध्यानधारणा' हे धम्माचरणाचे प्रकार प्रचलित झालेले असून ते आंबेडकरी विचारवंतांमध्ये वादविवादांचे विषय झाले आहेत. प्रत्यक्ष पाहणी करतांना २२ टक्के बौद्धांनीच प्रत्यक्ष शिबिरात सहभागी होऊन 'विपश्यना' व 'ध्यान धारणा' अनुभवली असल्याचे आढळले. अलिकडील विपश्यनेचे वाढते स्तोम बौध्दधम्माचे मिशन गतीशून्य करू शकते.[६]

धर्मांतरानंतर पुर्वास्पृष्य बौद्धांच्या धार्मिक जीवनातून पुरोहितशाहीची हकालपट्टी झाली. त्या जागी भिक्खू आले. एकूणच धम्म चळवळ गतिमान करणे अपेक्षित असलेल्या भिक्खूंकडून मात्र आंबेडकरी बौद्ध धम्म विसंगत परित्राण पाठ व इतर अंधश्रद्ध बाबींचे अनुसरण मोठ्या प्रमाणांत केले जात आहे. आंबेडकरांचा आधुनिकतावादी बौद्ध धम्म नाकारून काही भिक्खू धम्मदीक्षितांना सनातन बौद्ध आचरणात गुंतवू पाहात आहेत.[७] हा आंबेडकरी बौध्द धम्मापुढील सर्वात मोठा धोका म्हणता येईल. धर्मांतरितांनी 'मंदिर' ही संकल्पना नाकारित 'विहार' उभारले. विहारांमध्ये धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक अशा प्रकारचे कार्यक्रम होऊ लागल्यामुळे नव्या बौद्ध समुदायाची धार्मिक व सांस्कृतिक केंद्रे म्हणून विहारांचा उदय झाला. मात्र धम्मदीक्षेच्या अर्धशतकातच गटबाजी, निधीची कमतरता यामुळे बहुतांश बौद्ध विहारे अर्धवट विकसित अवस्थेत पडून आहेत. बरीच बौद्ध विहारे योग्य देखरेखी अभावी बकाल व अस्वच्छ स्थितीत उभी आहेत.[८] त्यामुळेच ५३.३३ टक्केच बौद्ध वर्षातून एखादे वेळेसच विहाराकडे जात असल्याचे पाहणीत आढळले. अशीच स्थिती राहीली तर नजीकच्या काळात आज अस्तित्वात असलेली विहारे सुध्दा नामशेष होतील किंवा समाजकंटकांच्या अतिक्रमणात हरवतील.

नवबौद्ध धम्म स्विकारल्यानंतरच्या उत्साहात लगोलग कांही जुन्या अंधश्रद्ध गोष्टींचा त्याग धर्मांतरितांनी केला असला तरी आज नव्या स्वरूपात अंधश्रध्दांचा शिरकाव त्यांच्यात झाल्याचे आढळले. ५९ टक्के बौद्ध मानसिकदृष्ट्या अंधश्रध्दांमध्ये गुंतून असल्याचे दिसले.[९] वास्तुशांती सारख्या विधीला 'गृहप्रवेश' असा पर्यायी शब्द बौद्धांनी निर्माण केला असला तरी हा बदल केवळ शब्दापुरताच मर्यादित असल्याचे दिसले कारण गृहप्रवेशाच्या वेळी परित्राण पाठाचे आयोजन करून वास्तूतील वाईट 'शक्ती' शांत करण्याची अंधश्रद्धा नव्या स्वरूपात नवबौद्ध जोपासत असल्याचे आढळले.[१०]

वडीलधाऱ्या व्यक्तीच्या मृत्युनंतर मुंडण करण्याची प्रथा ९८.६७ टक्के बौद्धांनी बंद केली आहे. मात्र धम्मविसंगत 'तेरवी' हा आत्म्याशी संबंधित हिंदू धर्मिय विधी अजूनही ४४ टक्के बौद्ध करीत आहेत. शिवाय जे 'तेरवी' करीत नाहीत ते बौद्ध 'तिसरा दिवस' करीत आहेत. मृत्योपरांतच्या आदरांजली कार्यक्रमालाही हिंदू धर्मातील पाप—पुण्य या संकल्पनांशी जुळणारी 'पुण्यानुमोदन' अशी बौद्ध धम्म विसंगत संज्ञा दिलेली आहे.[११]

धम्मदीक्षेनंतर धर्मांतरित बौद्धांनी बुद्ध जयंती, भीम जयंती, धम्मचक्रप्रवर्तन दिन असे नवे उत्सव प्रबोधनपर स्वरूपात साजरे करण्याची परंपरा निर्माण केली आहे. मात्र त्यांच्यातील ६३ टक्के बौद्धांवर कांही सामाजिक, मानसिक कारणांमुळे पुर्वाश्रमीच्या हिंदू सण—उत्सवांचा प्रभाव अजूनही असल्यामुळे ते दसरा, दिवाळी, होळी, रक्षाबंधन असे सण साजरे करतात. बौद्धांमध्ये विशेषत: बौद्ध स्त्रियांमध्ये अलिकडच्या काळात पौर्णिमेचे महत्व वाढले असून त्या प्रत्येक महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेचा दिवस 'उपवास' करून साजरा करीत असल्याचे आढळले.[१२] हिंदूच्या ग्रंथपारायणाप्रमाणे पावसाळयात—वर्षावासात ''बुद्ध आणि त्यांचा धम्म'' या ग्रंथाचे सामुहिक वाचन करण्याची टूम बौद्धांमध्ये वाढत असल्याची दिसली. बौध्दांनी विवाह पध्दतीमधून शुभत्वदर्शक हिंदू चिन्हे, पंचांग व पुरोहित बाद केले असले तरी वधूला वराच्या पाया पडायला लावणे, वधूला वराच्या डावीकडेच बसविणे या बौध्द विवाहातील हिंदूप्रमाणेच असलेल्या बाबी धम्माच्या समतावादी तत्वाशी पूर्णत: विसंगत आहेत.[१३] २०५६ कडे वाटचाल करतांना त्या विसर्जित करणे अत्यावश्यक आहेत.धम्म दीक्षेनंतरच्या काळांत बौध्दांनी बौध्द संस्कृतिदर्शक अशोकचक्र, स्तुपाकार, तोरणाकार, बोधीवृक्षाच्या आकारातील आकृत्या अशा प्रतिक चिन्हांचा वापर स्वत:ची घरे तसेच सार्वजनिक इमारती बांधतांना आकर्षकपणे केलेला आहे. परंतु अलिकडे मिश्रजाती समूहांच्या वसाहतींमधून राहणारे नवमध्यम वर्गीय धम्मदीक्षित बौध्द गृह स्थापत्यात बौध्द प्रतिक चिन्हांचा वापर करीत नसल्याचे स्पष्टपणे दिसून आले.[१४]

**निष्कर्ष**

१. बौध्दांमध्ये हिंदू धर्मिय उपासना पद्धतींचे 'सातत्य' वेगळया स्वरूपांत अजूनही टिकून आहे.

२. बुध्दाला देवत्व देऊन बुध्दाचीही ब्राम्हणी देव—देवतांप्रमाणे पुजा—अर्चा केली जात आहे.

३. धम्मदीक्षित बौध्दांमध्ये परित्राणपाठाचे कर्मकांड मोठया प्रमाणात वाढले आहे.

४. बुध्द वंदना आशय लक्षात न घेता आरत्यांप्रमाणेच म्हटल्या जात आहेत.

५. धम्मदीक्षित बौध्दांमध्ये विपश्यनेचे वाढत असलेले स्तोम धम्माचे मिशन गतिशून्य करीत आहे.

६. काही बौध्द भंते धम्मदीक्षितांना सनातन बौध्द आचरणात गुंतवित आहेत.

७. सांस्कृतिक केंद्र म्हणुन उभी असलेली विहारे, गटबाजीच्या राजकारणमुळे व उपासकांच्या दूर्लक्षामुळे बकाल बनत आहे.

८. बहुतांश बौध्द विज्ञानवादी धम्म स्विकारूनही अंधश्रध्दांमध्ये गुंतुन असल्याचे दिसतात.

९. मृत्योपरांतच्या कार्यक्रमात 'पुण्यानुमोदन' अशी धम्म विसंगत संज्ञा आलेली आहे.

१०. धम्मदीक्षित पुर्वाश्रमीचे हिंदू सण–उत्सव अजून साजरे करीत आहे.

११. बौध्द विवाह पध्दतीमध्ये अजुनही पितृसत्ताक पुरूषप्रधान प्रथा चालू आहेत.

१२. बौध्द संस्कृतीदर्शक सांस्कृतिक प्रतीक चिन्हांचा वापर कमी होत चालला आहे.

**संदर्भः**


१. कांबळे, गौतमीपुत्र (२००६). ***धम्मक्रांतीचे सांस्कृतिक अवकाश*** (निबंध)धम्मक्रांतीची फलश्रृती. पुणेः तक्षशीला प्रकाशन,पृ.१४२.

२. महेशकर,प्रियराज(२०१४). ***धम्मचक्र प्रवर्तनः प्रयोजन आणि पर्यावसान.*** वर्धाः उत्कर्ष प्रकाशन, पृ.१३८.

३. भोळे, भा.ल.(२००५). ***धम्मचंक्रदिनाची दिशा भरकटली आहे काय?*** (लेख) परिवर्तनाचा वाटसरू

४. महेशकर,प्रियराज(२०१४). पुर्वोक्त,पृ.२६३.

5- Beltz, Johannes (2005). ***Mahar,Buddhist and Dalit.*** New Delhi: Manohar Publication, p.191.

६. मनोहर,यशवंत (२००५). ***आंबेडक?*** नागपूरः युगसाक्षी प्रकाशन,पृ.०५.

७. मनोहर,यशवंत (२००५). ***आंबेडकरी बौध्दभिक्खू कसा असावा?*** नागपूरः युगसाक्षी प्रकाशन,पृ.०५.

८. महेशकर,प्रियराज(२०१४). पुर्वोक्त,पृ.१५७.

९. कित्ता,पृ.१७१.

१०. कित्ता,पृ.१५१.

११. मनोहर,यशवंत (२००७). ***अभिनव बौध्द आचारप्रणाली.*** नागपूरः युगसाक्षी प्रकाशन,पृ.२७.

१२. गायकवाड, आर.पी.(२००८). तथागतांच्या धम्मात पौर्णिमांचे महत्व. लातूरः प्रकाशक–महानंदा गायकवाड, पृ.१४.

१३. महेशकर,प्रियराज(२०१४). पुर्वोक्त,पृ.२०४.

१४. कित्ता,पृ.२२४.

# वंचित समाजाच्या धर्मांतराचे परिणाम

अभिजीत मेंढे
सहा. प्राध्यापक
वसंतराव नाईक शसकीय कला व
समाज विज्ञान संस्था, नागपूर

**गोषवारा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी हिंदु धर्माचा त्याग करून आपल्या लाखो अनुयायासह बौद्ध धर्माचा स्वीकार केला. एका व्यक्तिच्या आवाहना वरून झालेले जगाच्या इतिहासामध्ये पहिले मोठे धर्मांतर असावे. हे धर्मांतर बळाचा वापर करून नव्हे तर आत्मप्रेरणेने, स्वखुशीने आणि शांततेच्या मार्गाने झाले. बुद्धानंतर प्रथमच इतक्या विशाल जनसमुहाला एकाच वेळी धर्म दीक्षा देण्याचा पहिलाच प्रसंग असावा. बुद्धकाळात व त्यानंतरच्या काळात बौद्ध धर्माचा प्रसार झाला तो मुख्यतय राजाश्रयाने झाला. श्रीमंत, ज्ञानी ब्राह्मण व राजघराण्यातील लोकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळे हा धर्म वर पासुन खालपर्यंत झिरपत सामान्य जनांपर्यंत आला. परंतु डॉ. आंबेडकरांनी सामान्यातील अतिसामान्यांना म्हणजेच शेवटच्या मानवाला बौद्ध धर्माची दीक्षा देऊन बौद्ध धर्माचा अवरूद्ध झालेला मार्ग पुन्हा सुरू केला. दलितांच्या प्रगतीचे अवरूद्ध झालेले मार्ग उघडण्यासाठी धर्मांतर कितपत यशस्वी झाले. हे पाहणे आवश्यक आहे. धर्मांतराचे सामाजिक, राजकीय, आर्थिक परिणाम कसे झाले व एकुणच धर्मांतरीत झालेल्या समाजाचा कितपत विकास झाला व हिंदु धर्मीयांच्या दृष्टिकोनात काही बदल झाला का हे पाहणे आवश्यक वाटते. विदर्भातील दलित समाजाचा या धर्मांतरामध्ये समावेश असल्याने धर्मांतराचे विदर्भातील परिणाम पाहणे क्रमप्राप्त ठरते. परंतु धर्मांतराचे परिणाम ताबडतोब प्रतिबिंबित होणे शक्य नाही. काळाच्या ओघात अनुकूल प्रतिकूल परिणाम स्पष्ट होत गेल्याने थोडेसे कालमर्यादेच्या बाहेर जाऊन अध्ययन करावे लागेल.

**शब्दसंकेत : धर्मांतर, शुद्रातिशुद्र, अस्पृश्य, बावीस प्रतिज्ञा, धार्मिक बदल, नवबौद्ध, बहिष्कार, नवधर्मांतरीत**

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक सशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना : :** एकेकाळी भारताचा प्रमुख धर्म असलेला बौद्ध धर्म भारतातून जवळपास लुप्त झाला होता. भारताच्या काही महत्वाच्या ठिकाणीच बौद्ध धर्माचे अस्तित्व शिल्लक होते. विदर्भात बौद्ध धर्माचे अस्तित्व दाखवणारे भौतिक अवशेष उपलब्ध होते. परंतु १९३१ च्या जनगणनेनुसार संपूर्ण वऱ्हाडमध्ये बौद्ध धर्मीयांची संख्या फक्त ०५ होती.[१] यावरून वऱ्हाडमधील बौद्ध धर्माच्या अनुयांयाच्या अस्तित्वाची कल्पना येते. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा आपल्या अनुयांयाना दिली आणि विदर्भभुमित नाममात्र अस्तीत्वात असलेल्या बौद्ध धर्माचे पुनरूज्जीवन झाले. विदर्भातील बहुतांश महार जातीने बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्यामुळे विदर्भातील बौद्ध धर्मीयांची संख्या वाढू लागली. १९७१ च्या जनसंख्या अहवालानुसार पश्चिम विदर्भाची लोकसंख्या ५७,२९,४०० होती. यामध्ये ७३५३०० बौद्ध अनुयांयी होते. एकुण लोकसंख्येच्या तुलनेत बौद्ध धर्मीयाची संख्या १२.८३ टक्के होती.[२] विदर्भातील लाखो दलितांनी हिंदु धर्माचा त्याग करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि विदर्भ भुमित बौद्ध धर्माचे चक्र पुन्हा गतिशील केले.

**धर्मांतराचे सामाजिक परिणाम :** हिंदु समाज चातुवर्ण्यव्यवस्थेवर आधारलेला होता व या चातुवर्ण व्यवस्थेत अस्पृश्यांना अतिशुद्राचे स्थान असल्यामुळे इतर वर्णाची सेवा करणे हाच अस्पृश्यांचा धर्म बनला होता. अस्पृश्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळे प्रथम तो हिंदु धर्माच्या कक्षेतून बाहेर पडला. तसेच, वर्णव्यवस्थेच्या जोखडातून मुक्त झाला. अस्पृश्यता ही आपल्या पूर्व जन्माचे फळ आहे ही कल्पना नुतन धर्मांतराने नष्ट केली. ब्राह्मणी समाज व्यवस्था विशिष्ट वर्णाचे हित जपणारी व शुद्रातीशुद्राचे खच्चीकरण करणारी आहे हे स्पष्ट झाल्याने धर्मांतरीत अस्पृश्यांना विकासाच्या संधी उपलब्ध झाल्या. पश्चिम विदर्भातील अस्पृश्य समाजात धर्मांतरामुळे सामाजिक परिवर्तनाचे वारे वाहू लागले.

विदर्भातील महार समाज अनेक पोटजातीमध्ये विभागलेला होता. या पोट जातीत रोटी व्यवहार होत असला तरी बेटी व्यवहार होत नव्हता. धर्मांतरामुळे सर्व समाज बौद्धमय झाला त्यामुळे पोट जाती अंतर्गत विवाहाला चालना मिळाली. परंतु पोट जाती अंतर्गत विवाहाचे प्रमाण अत्यल्प आहे. धर्मांतरामुळे महार समाजाच्या परंपरागत समाज रचनेत परिवर्तन होण्यास सुरूवात झाली.[३] हे परिवर्तन मंद गतीने होऊ लागल्याचे दिसुन येते. या संबंधी डॉ. आंबेडकर म्हणतात की जुन्या पिढीतील लोकांच्या नसानसात हिंदु धर्म भिनलेला होता व अशांना हिंदु धर्म ताबडतोब सोडा असे म्हटले तर त्यांना ते जमणार नाही.[४] धर्मांतराने महार समाजाच्या अंत:प्रवाहात परिवर्तन होण्यास सुरूवात मात्र निश्चितच झाली होती. हिंदु धर्माची कात तो हळू हळू टाकू लागला व त्यातून जुन्या–नव्याचे द्वंद होणे अपरिहार्य होते.

**धर्मांतराचे राजकीय परिणाम :** धर्मांतरामुळे दलित समाजात राजकीय जाणीव निर्माण झाली होती. पण काँग्रेस व इतर राजकीय पक्षांनी दलितांच्या राजकीय अस्तीत्वाची म्हणावी तशी दखल घेतली नाही. डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर करतांना धर्मांतरीत दलित हे पर्यायी राजकीय शक्ती म्हणून उदयास यावेत हे ध्येय समोर ठेवले होते. धर्मांतरीत दलितांना सामाजिक परिवर्तनाच्या लढ्या बरोबर राजकीय परिवर्तनाच्या लढ्यात गतिशील करण्याचा मानस होता. म्हणून राजकीय हक्काच्या जागृतीमुळे संघर्ष करण्याची मनोवृत्ती इतर दलितांच्या तुलनेत धर्मांतरीत दलितामध्ये जास्त दिसून येते. यामागे इतर कारणांप्रमाणे धर्मांतराने झालेले परिवर्तन हे सुद्धा एक कारण होते. राज्यघटनेने दिलेले आरक्षण व घटनात्मक तरतुदीचा लाभ धर्मांतरीत दलित घेतांना दिसतात. नोकरीतील आरक्षण, राजकीय आरक्षण व आनूषंगिक तरतुदींची जाणिव धर्मांतरीत दलितांना दिसुन येत असल्याने त्यांचा लाभ घेण्यासाठी तसेच सवलतीचे समर्थन व सरंक्षण करण्यासाठी तो झगडत असतो.[५] भूमिहीनांचे आंदोलन, केंद्र व राज्य सरकारामध्ये दलितांचे आरक्षणाबाबतचे संघर्ष याची उत्तम उदाहरणे आहेत.

**धर्मांतरीत दलितांनी वाईट चाली रिती सोडल्या :** दलितांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करण्यापूर्वीच वाईट चालीरिती सोडून देण्याची चळवळ सुरू झाली होती. खेड्या पाड्यातील दलितांनी गावकीची कामे बंद केली; मृत प्राण्यांचे मांस खाणे व मृत प्राण्याची विल्हेवाट लावणे बंद केले. जे लोक या चालीरितींचा त्याग करित नसत त्यांना समाजातून बहिस्कृत केले जात असे. धर्मांतरामुळे या कार्याला गती मिळाली. हे पुढील दिलेल्या उदाहरणावरून दिसुन येईल, हिगणांबु ता. अकोट, जि. अकोला येथील जे काही धर्मांतरीत दलित बौद्ध तत्वांप्रमाणे न वागता पूर्वीच्या अनिष्ट चालीरितीने वागत अशा लोकांची नावे प्रकाशीत करून त्यांना समाजाने बहिष्कृत केले होते. यात रावजी गणपत आठवले, किसन गणपत आठवले, फजूर्डा किसन आठवले, सुखदेव रावजी आठवले, नामदेव रावजी आठवले हे होते हे लोक गावातील पाटलांच्या घरी शेण काढणे तसेच उरलेले अण्ण खाणे असे त्यांच्यावर आरोप होते.[६]

**धर्मांतरामुळे खेड्यतील दलितांमध्ये परिवर्तन झाले :** धर्मांतरामुळे सामाजिक सुधार कार्याला गती मिळाली खेड्यातील परिवर्तनाबद्दल दलित चळवळीचे अभ्यासक शंकरराव खरात यांच्या मते, महाराष्ट्रात खेडोपाडी बौद्ध धर्म स्वीकारण्याची लाट पसरली आणि दीक्षा सभारंभ झाल्यावर दुसऱ्याच दिवासापासुन नवदीक्षित बौद्धांनी गावातील स्पृश्य समाजाची गुलामी पद्धतीची सर्व कामे करावयाची बंद केली. शेकडो वर्षापासुन पिढ्यांपिढ्या भाकरीच्या तुकड्यासाठी हीन प्रतिची कामे करावी लागत होती. गावची झाडलोट करणे, देशमुख–देशपांडे, पाटिल–कुळकर्णी यांच्या वाड्यात, घरी–दारी झाडलोट करणे ही कामे त्यांनी बंद केली. मृत जनावरे ओढून नेणे बंद केले. स्मशानभूमित मेलेल्या मढ्याची लाकडे टाकणे बंद केले. गावकाम केल्याबद्दल घरोघरी भाकरी मागुन खाण्याची जी वहीवाट होती ती सुद्धा बंद केली. सणासुदीला, लग्न कार्याला इतर सभारंभांच्या प्रसंगी पिढ्यांपिढ्या लाकडे फोडावयाची काम बंद केली. स्वत:च्या चरितार्थासाठी नवदीक्षित बौद्धांना स्वतंत्र धंदा करणे भाग पडले. ते आता मजुरी, गवंडी काम व शेतमजुर म्हणून काम करू लागले.[७] पश्चिम विदर्भातील गाव खेड्यांची स्थिती जवळपास वरिल प्रमाणेच होती.

**धार्मिक बद्दल :** धर्मांतरीत दलितांनी मरी आई, म्हसोबा, जनाई–जोरवाई इत्यादी देवतांची पुजा करणे बंद केले. होळी, दिवाळी, दसरा इत्यादी हिंदुच्या सणांमध्ये सहभागी होत नाहीत. परंतु हिंदु धर्म व संस्कृती व विचारधारेतून धर्मांतरीत दलित पूर्ण पणे बाहेर पडला आहे असे दिसत नाही. आता दलितांमध्ये बुद्धाची व डॉ बाबासाहेब आंबेडकरांची दैवत म्हणुन पुजा केली जाते. उभयातांच्या प्रतिमा धर्मांतरीत दलितांच्या घरात दिसुन येतात. महारवाड्यचे नामांतर बौद्धवाडा, भिमवाडा, आंबेडकर नगर, गौतम नगर, इत्यादी नांवामध्ये झाले आहे. बौद्ध वस्तीमध्ये आंबेडकरांचे पुतळे बसवले जाऊ लागले. पूर्वीचा दलित पंढरपूर, आळंदी, शिंगणापूर इत्यादी धार्मिक स्थळी जात असे. धर्मांतरीत दलित नागपूरची दिक्षा भूमी व मुंबई येथील चैत्यभूमीच्या दर्शनासाठी जातो. परंतु धर्मांतरीत दलित समाजाने पूर्णपणे हिंदू देवदेवतांचा त्याग केला आहे असे दिसत नाही. आजही बऱ्याच धर्मांतरीत बुद्ध अनुयायांच्या घरात बुद्ध आंबेडकरांच्या प्रतिमा बरोबर हिंदु देवदेवतांच्या प्रतिमा दिसतात व त्यांची यथासांग पुजा केली जाते, नवस केले जातात.

**महार ऐवजी बौद्ध लिहू लागले :** बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर पूर्वीच्या महार जाती ऐवजी बौद्ध असे लिहू जाऊ लागले. मोरेगाव भाकरे येथील श्री. पुणाजी उकर्डाजी जंजाळ यांनी आपल्या नातवाचा शाळेत प्रवेश करतांना 'महार' या जाती ऐवजी 'बौद्ध' टाकवयास लावले. प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापकांशी वाद घातला.[८] धर्मांतरीत महार मुले शाळेत घालतांना 'महार' या जातीमध्येच नोंद घेऊन त्यांना हिंदु धर्मात कसे ठेवता येईल हे पहिले जात असे तर महार जातीचा त्याग करून बौद्ध लिहूण स्वाभिमान दाखवण्याचा प्रयत्न काहीजण करत होते. पुढे मिळणाऱ्या सरकारी सवलती धर्मांतरीत झाल्यामुळे मिळतील किंवा नाही या बाबत साशंकता असल्यामुळे बरेच बौद्ध धर्मांतरीत दलित आपली महार ही मूळ जात नोंदवित असत. आजही हे प्रकार दिसुन येतात.

धर्म परिवर्तनाच्या संक्रमण काळात दलितामध्ये अंतर्गत कलह निर्माण होणे अपेक्षीत होते. जुन्या रूढी परंपरांना कवटाळून बसणारा वर्ग हिंदु धर्माच्या प्रभावा खाली होता त्याच बरोबर त्यांचे आर्थिक व आनुषंगिक हितसंबंध त्यात गुंतले असल्यामुळे हा वर्ग जुन्या परंपरा सोडण्यास धजावत नव्हता. परिणामी सामाजिक बहिष्काराचे अस्त्र वापरावे लागले आहे.

**धर्मांतराचे राष्ट्रीय परिणाम :** धर्मांतर करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसमोर राष्ट्रीय हिताचा विचार होता. प्रचंड संख्येने असलेले अस्पृश्य हिंदु धर्माचा त्याग करून मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्मामध्ये गेले असते तर त्याचे भारताच्या भावी राजकारणावर दुरगामी परिणाम होण्याची भीती होती. डॉ. आंबेडकरांना राष्ट्रीय बांधीलकी ठेऊन धर्मांतर करायचे होते. आपल्या धर्मांतरामुळे राष्ट्रीय ऐक्याला व राष्ट्रीय सुरक्षेला बाधा येणार नाही असे आश्वासन डॉ. आंबेडकरांनी महात्मा गांधीना दिले होते. धार्मिक, सामाजिक व मानसिक मुक्ती देणारा याच मातीत जन्मलेला बौद्ध धर्म स्वीकारल्याने राष्ट्रीय ऐक्य साधले गेले. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरामुळे राष्ट्राच्या अखंडत्याला धोका निर्माण झाला नाही. ही बाब फाळणीमुळे निर्माण झालेल्या तत्कालिन परिस्थितीच्या सदर्भात तपासून पाहणे महत्वाचे आहे.

**बावीस प्रतिज्ञा :** धम्मदीक्षा सभारंभाच्या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दीक्षा विधीचा एक भाग म्हणून बावीस प्रतिज्ञा दीक्षार्थी कडून वदवून घेतल्या. या प्रतिज्ञा पुढीलप्रमाणे

१) मी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही. २) मी राम व कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही. ३) मी गौरी, गणपती इत्यादी हिंदु धर्मातील कोणत्याही देव देवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही. ४) देवाने अवतार घेतले यावर माझा विश्वास नाही. ५) बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे हे मी मानत नाही. ६) मी श्राद्धपक्ष करणार नाही; पिंडदान करणार नाही. ७) बौद्ध धम्माच्या विरूद्ध विसंगत असे कोणतेच आचार कर्म मी करणार नाही. ८) कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणाचे हातून करून घेणार नाही. ९) सर्व मनुष्यमात्र समान आहेत असे मी मानतो. १०) मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करेल. ११) मी भगवान बुद्धाच्या अष्टांग मार्गाचा अवलंब करेल. १२) मी बुद्धाने सांगितलेल्या दहा पारमिता पाळेल. १३) मी सर्व प्राणिमात्रावर दया करेल व त्यांचे लालन पालन करेल. १४) मी

चोरी करणार नाही. १५) मी व्यभिचार करणार नाही. १६) मी खोटे बोलणार नाही. १७) मी दारू पिणार नाही. १८) मी प्रज्ञा, शिल, करूणा या तिन तत्वाचा अवलंब करेल. १९) मी जुन्या, मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या आणि मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदु धर्माचा त्याग करतो व बुद्धाच्या धर्माचा स्वीकार करतो. २०) बुद्ध धर्म हा खरा धर्म आहे अशी माझी खात्री आहे. २१) माझा नवा जन्म होत आहे असे मी मानतो. २२) आज पासुन मी बुद्धाच्या शिकवणीप्रमाणे वागण्याची प्रतिज्ञा करतो. या प्रतिज्ञा बौद्ध धर्मातील उपासकासाठी आवश्यक आहे.

**धर्मांतराची दुसरी बाजू :** दलित समाजाने बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळे जसे अनुकूल परिणाम झाले तसेच प्रतिकूल परिणामही दिसुन येतात ते पुढील प्रमाणे

**सामाजिक दुरावा :** हिंदु धर्म व समाज व्यवस्थेचा घटक असलेल्या दलितांनी हिंदु धर्माचा त्याग केल्यामुळे धर्मांतरीत दलित व हिंदु यांच्या मध्ये सामाजिक दुरावा निर्माण झाला. धर्मांतरीत दलित स्वत:ला बौद्ध समजु लागले तर हिंदु त्यांना अस्पृश्य समजु लागले.कायद्यानुसार अस्पृश्यता नष्ट झाली, सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळली जात नसली तरी अस्पृश्यतेचे संपूर्ण उच्चाटन मात्र झाले नाही. एकुण हिंदु समाजाची नवबौद्धांकडे पाहण्याची मानसिकता पूर्वीप्रमाणेच होती. नवबौद्धाला सामाजिक स्थान देण्यास हिंदु मानसिकता तयार नव्हती परिणामी उभय समाजात दुरावा निर्माण झाला.[९] समकालात बरेच परिवर्तन झाले आहे.

**नवबौद्ध तरूणांची हिंदु देव देवतावर टीका :** हिंदु धर्मशास्त्रात अस्पृश्यांनी कशाप्रकारे राहावे, अस्पृश्याचे सामाजिक स्थान कोणते याचे सविस्तर विवेचन केले आहे. स्पृश्य हिंदु दगड धोंड्याची, पशुची पुजा करित; गोमुत्र पवित्र समजुन पित. मात्र, अस्पृश्यांचा स्पर्ष किंवा साधी सावली ही चालत नसे. धर्मांतरीत झालेल्या दलितांनी हिंदु धर्मातील धार्मिक अवंडबरावर प्रकाश टाकला. देव–देवतांचे खरे स्वरूप उघड केले, अंधश्रद्धा–रूढी परंपरा यावर टीका केली जाऊ लागली. हिंदु धर्मातील देवदेवतांवर टीका होऊ लागल्यामुळे स्पृश्य हिंदु समाज धर्मांतरीत दलित यांच्यात दुरावा निर्माण झाला. दलितांनी हिंदु धर्म सोडला असल्यामुळे त्यांना हिंदु धर्मावर व देवतावर टीका करायचा अधिकार नाही असे स्पृश्य हिंदु म्हणू लागले तर दुसऱ्या बाजुला हिंदुंचे धर्मांतरीत दलितांप्रति वर्तन पूर्विप्रमाणेच होते.[१०]

**अस्पृश्य व नवबौद्धांत दुरावा :** भारतातील सर्व अस्पृश्यांनी एकाच धर्मात प्रवेश करावा असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. परंतु महाराष्ट्रातील महार या जातीनेच डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरास पाठींबा देऊन त्यांच्या सोबत मोठ्या संख्येने बौद्ध धर्मात प्रवेश केला. चांभार, मातंग, भंगी इत्यादी अस्पृश्य जातीनी हिंदु धर्मात राहणे पसंत केले. धर्मांतरापूर्वी काही प्रमाणात एकसंघ असलेल्या अस्पृश्य जातींमध्ये धर्मांतरामुळे दुरावा निर्माण झाला. या जाती अल्पसंख्याक असल्यामुळे हिंदु धर्मात राहून आपले हित सांभाळता येईल असाही त्यांचा मानस असावा. त्याच बरोबर धर्मांतरीत दलितांना शह देण्यासाठी स्पृश्य हिंदुनी या जातींना चुचकारत काही प्रमाणात जवळ केले. परिणामी दलितांच्या हिताच्या प्रश्नावर धर्मांतरीत दलित व हिंदु अस्पृश्य यांच्यात मतभिन्नता दिसुन येते.

**धर्मांतरामुळे सवलतीवर परिणाम :** दलितांना विविध घटनात्मक सवलती देण्यात आल्या होत्या. शिक्षण, नोकरी इत्यादी मध्ये आरक्षणाची तरतुद होती. दलित बौद्ध झाल्यामुळे त्यांना या सवलती पासुन वंचीत व्हावे लागले. धर्मांतरा नंतर अवघ्या पंधरा दिवसातच केंद्र सरकारने नवबौद्धांच्या शैक्षणिक सवलती काढून घेतल्या. घटनेच्या कलम ३४१ ला दुरूस्ती जोडण्यात आली. याद्वारे अनुसूचीत जातीच्या सवलती हिंदु व शिख धर्म स्वीकारणाऱ्या दलितांनाच लागु ठेवल्या व बौद्धांना त्यातून वगळण्यात आले.[११] परिणामी सवलतीसाठी बऱ्याच नवबौद्धांनी महार म्हणून नोंद केल्याचे दिसुन येते. महाराष्ट्रात मात्र नवबौद्धांना सवलती मिळत राहील्या. सवलती रोखण्या मागे संभावित हिंदु धर्माची गळती रोखणे व बौद्ध धर्माच्या वाढीला पायबंद घालणे हे कारण असावे.

**नवधर्मांतरीत दलितांवर अत्याचार :** धर्मांतरीत झालेल्या दलितांच्या स्पृश्य हिंदु निरनिराळ्या प्रकारे छळ करू लागले. उदा. मजुरी बंद करणे; शेतात व गावशिवारात जाऊ न देणे; विहीरीवर पाणी न भरू देणे; दुकान, दळण

बंद करणे; प्रत्यक्ष शारीरिक हिंसा करणे, सामाजिक बहिष्कार घालणे इत्यादी प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले. विदर्भातील दलितांनी मोठ्या प्रमाणात धर्मांतर केल्यामुळे येथील दलितांनाही स्पृश्य हिंदुच्या अत्याचारास बळी पडावे लागले हे पुढील काही घटना वरून दिसुन येते.

- अकोट फैल येथील दलितांनी बौद्ध धर्म दिक्षा घेतली तसेच गावकीची कामे सोडली असता त्यांचेवर सामाजिक बहिष्कार व अत्याचार करण्यात आला.[१२]
- कामरगाव येथे कामदार महारांनी काम करण्याचे सोडल्यामुळे त्यांचेवर अन्याय अत्याचार करण्यात आला. त्या संदर्भात आर. एस. गवई यांची सभा कामरगाव येथे २३/०५/५१ ला झाली.[१३]
- दारव्हा तालुक्यात जि. यवतमाळ येथील दलितांवर अन्याय झाल्याचे बौद्ध जन समिती दारव्हा यांच्या पत्रावरून समजते.[१४]
- दर्यापूर तालुक्यातील जावळी गावातील दलितांनी बौद्ध धर्म स्वीकारला तसेच गाव कामदारकी सोडल्यामुळे तेथील स्पृश्य हिंदुनी दलितांवर अत्याचार केले त्यांना गाव सोडून जाण्यास भाग पाडले पोलीसांनी योग्य ती कार्यवाही केली नाही.[१५]
- कुष्टा बु ।। ता. अचलपूर येथील दलितांनी मेलेली गुर ओढणे सोडून दिले, आंबेडकर जयंती साजरी केली म्हणून बहिष्कार घातला. पोलीसांनी योग्य ती कार्यवाही केली नाही.[१६]
- मालखेड, ता. दारव्हा, जि. यवतमाळ येथील दलितांनी मेलेली गुर ओढली नाहीत म्हणून बहिष्कार घालण्यात आला.[१७]
- वरूड कुलट, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथील दलितांनी बौद्ध धर्म स्वीकारला तसेच गावकामदारकी सोडली त्यामुळे त्यांच्यावर बहिष्कार घालण्यात आला.[१८]
- बग्गा, ता. चांदूर, जि. अमरावती येथील महारांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला. दलित स्त्रीयांना शेतामध्ये मारहाण केले असता उलट बौद्ध लोकांवर पोलीसांनी केस केली.[१९]
- शिरजगाव, ता. चांदूर, येथील लोकांनी बौद्ध धर्म स्वीकारल्याने व महारकीची कामे सोडल्यामुळे शेतमजुरी बंद केली त्यांची गुरे कोंड वाड्यत घतली.[२०]
- अमरावती जिल्ह्यातील निरूळ, ता. अमरावती; बोरगाव ता., अचलपूर; लिहीरा ता. मोर्शी; कठोरा बु ।।, ता. अमरावती; राजुरा, ता. अमरावती इत्यादी ठिकाणी दलितांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे व गावकामदारकी सोडल्यामुळे अत्याचार झाले.[२१]
- वाशिम तालुक्यात २१ गावामध्ये धर्मांतरीत दलितांवर बहिष्कार पडला होता राजुरा येथे एक वर्शापासुन बहिश्कार असुन बौद्ध वस्ती उजाड करण्यात आली आहे. ग्रामवासी अशा जनतेस काँगेस गुंडानी आणि अरेरावांनी बुद्धजना विरूद्ध भडकवून दिले आहे.[२२]

विदर्भातील धर्मांतरीत दलितांना स्पृश्य हिंदुच्या अन्याय अत्याचाराला बळी पडावे लागल्याने वरिल घटनांवरून दिसुन येते. दलितांनी हिंदु धर्माचा त्याग करून बौद्ध धर्मात प्रवेश केल्यामुळे हे अत्याचार झाले तसेच परंपरागत गावकामदारकीची कामे सोडून दिले व मेलेले गुरे ओढणे सोडून दिले त्यामुळे स्पृश्य हिंदु समोर मोठा प्रश्न निर्माण झाला. शिवाय आतापर्यंत आपल्यापुढे झुकणारा दलित स्वाभिमाने जागतो आहे हे बऱ्याच स्पृश्य हिंदुना मानवणारे नव्हते. धर्मांतरीत दलितांना धडा शिकवण्यासाठी अत्याचाराचे व सामाजिक बहिष्काराचे अस्त्र वापरले गेले. दलितावर अत्याचार होत असतांना पोलीस यंत्रणा प्रस्तापितांच्या बाजुने असल्याचेच दिसुन येते. धर्मांतरीत दलितावरिल अत्याचार व सामाजिक बहिष्कारामुळे दलितांना हिंदुचे खरे स्वरूप स्पष्ट होऊ लागले. या घटनांमुळे दलित चळवळीला बळ मिळत गेले. दलितांचे संघटन होण्यास मदत झाली.

धर्मांतरामुळे पश्चिम विदर्भातील दलित समाजावर व्यापक प्रभाव पडल्याचे दिसुन येते. धर्मांतर हे दलित चळवळीतील मैलाचा दगड होता. डॉ. आंबेडकरांनी दलितांना नव्या वाटेवर आणून सोडले होते. त्या वाटेवर अनेक खाचखळगे होते व ते पार करण्याचे धाडस धर्मांतरीत दलितांना करावयाचे होते.

**निष्कर्ष:** दलितांना धर्मांतराचा प्रत्यक्ष सामाजिक व आर्थिकच नव्हे तर व्यापक मानवी नितीमूल्यांचा दृष्टीने फायदा झालेला दिसुन येतो. तसेच, धर्मांतरीत दलितांमध्ये राजकीय कृती करण्यासाठी आवश्यक असलेली अंतर्गत एकजुट निर्माण झाली. धर्मांतरामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेतून बाहेर निघून शहरी अर्थव्यवस्थेशी जोडल्या गेले. त्यांच्यामध्ये पारंपारिकतेला कवटाळून बसण्याची वृत्ती फारच कमी झाली. त्यामुळे नवे शिक्षण घेण्यात त्यांनी पुढाकार घेतलेला दिसुन येतो. धर्मांतरामुळे इतर हिंदू समाजासोबत असलेला संबंध कमी झाला व त्यामुळे व्यापक राजकीय परिवर्तनासाठी आवश्यक असलेली एकजुट निर्माण झालेली नाही.

## संदर्भसूची

१. Hutton J, H, Sensus of India 1931 Vol. I. India Part II Imperial Tables, P. Delhi Manager of Publication, 1933, p. 516.

2- Socio Economical Review 1980-81, Akola - p. 13, Amravati - p. 17, Yavatmal- p. 16 to20, Buldhana – p. 13 to 18, Publication Govt. of Mahararashtra Bombay.

३. लोकमत दि. १९/१०/१९८८ ले प्रदिप आगलावे डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर एक समाजशास्त्रीय विश्लेशण

४. गवई, वामन हौसाजी– पश्चिम विदर्भातील दलितांच्या (विशेष करून नवबौद्ध व महार) राजकीय जागृतीचे विश्लेषणात्मक अध्ययन (१९३० ते १९८५), पृ. २१३

५. गवई, उपरोक्त, पृ. २०३

६. पत्रक बौद्ध मंडळ हिंगणी बु ता. अकोट, सकले जवळ का. (किसन छापखाना अकोट)

७. खरात शंकरराव, अस्पृष्यांचा मुक्तिसंग्राम, पृ. १८६

८. गवई, उपरोक्त पृ. ३२५

९. गवई, उपरोक्त पृ. २२५

१०. गवई, उपरोक्त, पृ. २३०, २३१

११. धेपे, रामचंद्र, आरक्षण हेच मागासवर्गियांचे सरंक्षण, प्रकाशक सौ. मंदा धेपे, पृ. ३२

१२. गवई, उपरोक्त पृ. ३०४

१३. पत्रक, शामराव अभावे कामरगाव

१४. पत्रक, बौद्धजन समिती दारव्हा, १७/१२/१९५७

१५. गवई, उपरोक्त पृ. ३०९

१६. पत्रक– परिषदेच्या आयोजना संदर्भात श्री नामदेवराव मोहाडे सचिव जिल्हा शेका के.

१७. प्रबुद्ध भारत, २३/०६/५६

१८. प्रबुद्ध भारत, २३/०८/५६

१९. गवई, उपरोक्त पृ. ३१३

२०. गवई, उपरोक्त पृ. ३१३

२१. गवई, उपरोक्त पृ. ३१४

२२. मस्के, बी. आर., विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास

# Dr. Ambedkar and his Dhamma

**Dr. (Mrs). Anjali Andrew**
**Dept. of History**
**Hislop College, Nagpur**

**Abstract** : One of the important leader from Maharashtra who walked tall on National stage and left a lasting imprint on the polity and social chemistry of India is Dr. Bhimrao Ramji Ambedkar he was crusader in the cause of the upliftment of the lower catses. Bhimrao was born on 14th April 1891 at Mhow (in M. P.)[1] and married Ramabai in 1905, who died in 1935 later[2].

In Bhimrao married, Dr. Sharada Kabir who came from Saraswat Brahmin family of Bombay in 1948.[3]

Bhimrao Ambedkars four generation of another family had served in British army. His father attained the non commissioned rank of Subhedar major. He had experienced more interaction with the British, he had seen the cosmopolitan world around and was more literate and modern in outlook and progressive by temperament as compared to other communities. With his father's encouragement Ambedkar went in for higher education. After matriculation he went to U.S.A. on scholarship offered by the Maharaja Gaikwad of Baroda and studied Economics, Sociology, Pol. Sci., Anthropology and Ethics in Columbia University. He also earned Ph. D. in Economics and there, the American Declaration of Independence deeply impressed him4.

**Struggle for Upliftment of Dalits**

On his return to India, Ambedkar had to undergo all the weired and humiliating experience that are part of an untouchable's everyday life. Since Gaikwad of Baroda had given him a scholarship. He was obliged to work in Baroda administration. Later he returned to Bombay and took the job, of a teacher at the Sydenham College, he began organizing the depressed castes; In July 1924, Ambedkar started on organization in Bombay called 'Bahiskrit Hitkari Sabha' for the moral and material progress of the untouchables. He resorted to method of agitation and launched Satyagraha to establish civic rights of the untouchables to entre Hindu temples and draw water from public wells[5].

Dr. Ambedkar single handedly lifted the Dalits of the country from the morass of poverty, injustice, social rejection, inferiority complex, helplessness and ingnorance and gave them, dignity self respect as well as the will to right for their own human right.

He made assiduous attempts to ameliorate the plight of the untouchables from and within the steel frame of Hindu social structure. He attacked the caste system, struggled and Try to banish the concept of pollution by touch, experimented within political and social movement, only to demonstrate that the problem had no solution within the Hindu fold. Finally he along with millions of his followers renounced Hinduism and embraced Buddhism, the religion as he believed that was rational and compatible with modern science and would regulate the moral and ethical conduct of the man in the world of science.

The main trust of Dr. Ambedkar's massage was that educational and political empowerment of dalits with organizational strength would alone bring them the cherished freedom and dighnity.

A legitimate share for the dalits in political power of the day was all that he wanted. All other movement he launched served this purpose. His demand for separate electorates for the scheduled castes was meant to stress his argument in political terms and dalits be treated as a minority, community and not an integral part of the Hindu community.

**Budha and Dhamma**

He propounded a most revolutionary meaning of the word 'Dhamma' the vedic meaning of the word 'Dharma', the Dharma as enunciated by the Brahmins and as propounded in the Purvanmimansa of Jamini meant nothing more that the performance of certain Karmas, Dhamma to Brahmins meant keeping upto observances i.e. Yogans, Yogas and sacrifices to God. That was the essence of Vedic Religion.

But, the word Dhamma as used by Buddha had nothing to do with rituals or observances. In place of karma Buddha substituted morality as the essence of Dhamma. In fact it might be stated that the Buddha, who made morality the essence and foundation of religion.

Religion is a part of social inheritance of one's life and dignity and pride are bound up with it. It is not easy to abandon one's religion.

It must be emphassed that for Ambedkar, the Dhamma of Buddha was not just a personal solution or a gate way for the dalits from suffocating cast oppression of the Hindus. It was much more than that, it was for him religion of the future world. A modern spiritual philosophy acceptable to the human society as a whole. His interpretation of Buddhas life and teaching of his seminal work. Buddha and his Dhamma is greatest of his view. He considered Buddha a rational preacher who believed that the solution to main problem had to be found in this life alone and there was no life after death. Poor had nothing to loose except their grief and poverty.

What mechanism would be there to regulate the society's moral and ethical conduct, Ambedkar asked, his answer was Buddha and his 'Dhamma' is geared to this view. But whatever be the causes, the fact remain that people have developed an inquiring mind in respect of religion.

The duty of a Buddhist is not merely to be a good Buddhist, his duty is to spread Buddhism, he believed that to spread Buddhism is to serve mankind.

Ambedkar was reluctant to confine his activities to dalit amelioration alone is empty evident from the names of the political parties he established to serve the entire nation. He successively established independent labour party in India.

Later, he founded the scheduled caste federation of India in 1942. He was a member and the minister for labour in the Viceroys Governing Council between 1942 and 1946. Later he was chosen as the Chairman of the Constitution drafting committee of Constituent assembly. He was the Law Minister in Nehrus first cabinet of independent India.

Finally, true to his words that I Would not dies an Hindu Ambedkar embraced Buddhism along with nearly a million followers at a public ceremony in Nagpur on October 14, 1956, and committed his rest of his life mission, he decided would be to spread the message of Lord Buddha[6]. The duty of a Buddhist is not merely to be a good Buddhist. But his duty is to spread Buddism. They must believe that to spread Buddhism is to serve mankind.

**References**

1)Keer Dhananjay ,(Reprint 2018),Dr.Babasaheb Ambedkar Life and Mission Papular Publication,Mumbai page,9

2)Bagade Pradhnya (Edited 2019),Bharat Bhagya vidhata Dr.Babasaheb Ambedkar,Lotus and Cobra Publishing House,Nagpur ,page 309

3) Ibid p.310

4 Keer Dhananjay,op cit,pp.26-

5)Ibid 69

6)Bagade Pradhnya,op,cit.pp.311-312

# नागपुरच्या बौद्ध धम्मदीक्षा समारंभात महारेतरांचे योगदान

डॉ. सुर्यकांत महादेवरा कापशीकर
इतिहास विभागप्रमुख
यशोदा गर्ल्स आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज
स्नेह नगर, नागपूर

**सारांश** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपुर येथे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायांसोबत बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. ते बौद्ध धम्माकडे आकर्षित होण्यासाठी कृष्णाजी अर्जुन केळूसकर यांची महत्वाची भूमिका होती. आंबेडकरांनी धर्मांतर घोषणा केयानंतर डॉ. हरिसिंग गौर यांनी त्यांना बौद्ध धर्म स्वीकारण्याविषयी सुचविले होते. धर्मानंद कोंसंबी यांनी आंबेडकरांशी बौद्ध धर्माविषयी चर्चा केली होती. नागपुरमध्ये बौद्ध धम्माची पायाभरणी करण्यासाठी डॉ. भवानी शंकर नियोगी, डब्ल्यु. आर. पुराणिक आणि अनंत रामचंद्र कुलकर्णी यांनी प्रयत्न केले होते. वामनराव गोडबोले यांना धम्म दीक्षा समारंभाच्या आयोजनासाठी भगवंतराव मंडलोई, सोहनसिंग, श्यामजी खेता आणि तत्कालीन मुख्यमंत्री रविशंकर शुक्ला यांनी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहकार्य केले. देवप्रिय वली सिन्हा यांनी मोलाचे योगदान दिले. दीक्षा महास्थविर चंद्रामणी आंबेडकरांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. भिक्खू सद्धतिस्स महाथेरो, भिक्खू संघरत्न महाथेरो, लखनौचे भिक्खू प्रज्ञानंद, भिक्खू पञ्ञातिस्स, भिक्खू परम शांती व भिक्खू सुमेध हे समारंभास उपस्थित होते. नानकचंद रत्तू, वा. का. परमार, जी. टी. परमार, कुरील, डी. ए. कुट्टी, शंकरानंद शास्त्री, शंकर म्हसदे, घनश्याम तळवटकर, भालचंद्र पेंढारकर, बी. एस. कबीर, भास्करराव कद्रेकर, ए. जी. पवार, राजाराम भोळे, सोहनलाल शास्त्री, काशीनाथ साळुंके, म. भि. चिटणीस, भालचंद्र फडके, आर. जी. खंडारे, हे सक्रिय होते. यु बा स्वे, यु नु, पी. बी. सेनगुप्ता, अरविंद बाऊआ, महाथेरो पञ्ञलोक, कोझीखोडे भिक्खू धर्मानंद, भिक्खू संघरक्षित, रामस्वामी पेरीयार यांनी शुभसंदेश पाठविले होते. त्यामुळे नागपुर येथील बौद्ध धम्म दीक्षा समारंभात आंबेडकरांच्या स्वजातीय महार अनुयायांबरोबरच अनेक महारेतर अनुयायांनी सुद्धा मोलाचे योगदान दिले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**शब्द संकेत :–नागपुर, बौद्धधम्म, दीक्षा, समारंभ, महारेतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

**संशोधन पद्धती** : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपुर येथे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायांसोबत बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. ही घटना भारताच्या सामाजिक इतिहासातील एक अभूतपूर्व घटना मानली जाते. या बौद्ध धम्म दीक्षा समारंभात आंबेडकरांच्या स्वजातीय महार अनुयायांचाच सहभाग होता असे नाही तर हा समारंभ यशस्वी करण्यासाठी अनेक महारेतर अनुयायांनी सुद्धा मोलाचे योगदान दिले. किंबहुना महारेतरांच्या अमूल्य योगदानामुळे नागपुर येथील बौद्ध धम्म दीक्षा समारंभ यशस्वी झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. परंतु महारेतरांच्या या कार्याकडे इतिहास संशोधकाचे दुर्लक्ष झालेले दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नागपुर येथील १४ ऑक्टोबर १९५६ च्या बौद्ध धम्म दीक्षा समारंभातील महारेतरांच्या योगदानावर संशोधकीय प्रकाश टाकण्याचा प्रयास प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**बौद्ध धम्माकडे कल** :डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लहानपणापासूनच बौद्ध धम्माविषयी आस्था होती. विद्यार्थीदशेत असताना ते कृष्णाजी अर्जुन केळूसकर यांनी लिहिलेले बुद्धचरित्र वाचून प्रभावित झाले होते[१] पुढे कोलंबिया विद्यापीठात मिस रिस डेव्हिस यांच्या Buddhism: A Study of the Buddhist Norms या सारख्या अनेक ग्रंथांच्या अभ्यासामुळे ते बौद्ध धम्माकडे आकर्षित झाले. महाड परिषदेनंतर आपल्या सहकार्यासह ते महाडमधील बुद्ध लेणी पाहावयास गेले होते. १९३४ मध्ये शिवतरकर, आईसकर, प्रधान, कवळी यांच्यासह त्यांनी अजिंठ्याची लेणीसुद्धा बघितली होती. १९३३ मध्ये गणेश आकाजी गवई यांनी 'आंबेडकर मुस्लिम धर्म स्वीकारणार' अशी अफवा पसरविली असता 'आपला कल बौद्ध धर्माकडे आहे' असे त्यांनी सुभेदार सवादकर यांना सांगितले होते.

**धर्मांतर घोषणा** :डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३५ मध्ये धर्मांतराची घोषणा केली. त्यांनी बौद्ध धम्म स्वीकारावा म्हणून महाबोधी सोसायटीच्या सचिवांनी 'आपण आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्माचा स्वीकार करावा' अशी विनंती केली होती. डॉ. हरिसिंग गौर यांनीही त्यांना बौद्ध धर्म स्वीकारण्याविषयी सुचविले होते. 'आंबेडकर बौद्ध धर्म स्वीकारणार' टाइम्स ऑफ इंडिया मध्ये २६ ऑक्टोबर १९३५ रोजी प्रसिद्ध झालेली ही बातमी वाचून धर्मानंद कोंसंबी यांनी आंबेडकरांशी बौद्ध धर्माविषयी चर्चा केली होती. लोकनाथ या इटालियन भिक्खूने देखील १० जून १९३६ रोजी आंबेडकरांना भेटून बौद्ध धर्म स्वीकारण्याविषयी सुचविले होते. बडोदा हिंदू महासभेचे सचिव पंडित आनंदप्रिय यांनी आंबेडकरांसोबत धर्मांतर

घोषणेविषयी सविस्तर चर्चा केली होती, ''आंबेडकरांशी चर्चा केल्यानंतर ते मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्म स्वीकारतील असे वाटत नाही. तूर्तास त्यांचा कल बौद्ध धर्माकडे आहे. त्यांना तडकाफडकीने धर्मांतर करण्याची घाई नाही. ते प्रथम आपल्या अनुयायांना प्रशिक्षित करतील व त्यांचे मतपरिवर्तन झाल्यानंतर ते मोठ्य संख्येने बौद्ध धर्माची दीक्षा घेतील.''[२] असे त्यांनी आपल्या दिल्लीच्या कार्यालयास कळविले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपुर येथे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन पंडित आनंदप्रिय यांचे भाकीत खरे केले.

**नागपुरातील बौद्ध धर्माची पार्श्र्वभूमी** :नागपुर हे प्राचीन काळापासून बौद्ध धम्माची ऐतिहासिक पार्श्र्वभूमी असलेले शहर असल्यामुळे आंबेडकरांनी नागपुर येथे बौद्ध धम्माची दीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. नागपुरातील आंबेडकरी अनुयायांनी महारेतरांच्या मदतीने बौद्ध धम्माचा प्रचार प्रसार सुरू केला होता. वामनराव गोडबोले यांच्या पुढाकाराने ०३ जानेवारी १९५५ रोजी नागपुरात बुद्धदूत सोसायटीची शाखा स्थापन करण्यात आली. डॉ. भवानी शंकर नियोगी— अध्यक्ष, डब्ल्यु. आर. पुराणिक— उपाध्यक्ष आणि अनंत रामचंद्र कुलकर्णी— सचिव असलेल्या या शाखेचे उद्‌घाटन महास्थवीर संघरक्षित यांनी केले होते. त्यांनी गोडबोले यांच्या सिद्धार्थ वाचनालयास भेट दिली होती. भिक्खू एस. सागर यांच्या अध्यक्षतेखाली ६ मे १९५५ रोजी नागपुरात बुद्धजयंती उत्सव साजरा करण्यात आला.[३]त्यांच्या हस्ते बुद्धदूत सोसायटीच्या इंदोरा शाखेचे उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी कंबोडीयातील भिक्खू के. के. स्थितप्रज्ञ यांनी धम्मोपदेश केला होता. मध्यप्रांताचे राजस्वमंत्री भगवंतराव मंडलोई यांच्या अध्यक्षतेखाली १८ सप्टेंबर १९५५ रोजी या तुकडोजी महाराजांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी अनंत रामचंद्र कुलकर्णी यांनीसुद्धा भाषण केले. नागपूर येथे एक प्रशस्त बौद्धविहार बांधण्यासाठी सरकारकडून चांगली जागा मिळवून देण्याचे आश्वासन भगवंतराव मंडलोई यांनी गोडबोले यांना दिले होते. ०३ ऑक्टोबर १९५५ रोजी डॉ. भवानी शंकर नियोगी यांचे उपोसथ या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. इंदोर्यारत रामरतन जानोरकर, सी. व्ही. राजपूरे यांच्या उपस्थितीत बौद्ध धम्मविषयक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. संघरक्षित यांच्या बुद्धवंदना मालाचे मराठी भाषांतर करण्यासाठी मा. डो. पंचभाई यांनी नागपुरातील मॉरिस कॉलेजमधील पाली भाषेचे प्रा. शंतनू किल्लेदार यांच्याशी संपर्क केला होता. आंबेडकरी अनुयायांनी बुद्धदूत सोसायटीच्या माध्यमातून नागपुरात बौद्ध धर्माचा प्रचार प्रसार केला. आंबेडकरांनी ४ मे १९५५ रोजी दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाची (भारतीय बौद्धजन समिती) स्थापना केल्यानंतर बुद्धदूत सोसायटीची शाखा त्यात विलीन करण्यात आली. समितीच्यावतीने नागपुरात २७ जुलै १९५६ हा आषाढी पौर्णिमेचा दिवस धम्मचक्रप्रवर्तन दिन म्हणून साजरा केला गेला. या प्रसंगी भगवंतराव मंडलोई, डॉ. भवानी शंकर नियोगी, अनंत रामचंद्र कुलकर्णी व प्रा. शंतनू किल्लेदार यांची भाषणे झाली. शिवाय १९५६ मध्ये नागपुरात २५०० वा बुद्ध जयंती महोत्सव आयोजित करण्यात आला. दीनदयाल गुप्ता यांच्या यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. रामनाथन, प्राचार्य चतुर्वेदी, दीक्षित, बा. ना. वैद्य यांच्या उपस्थितीत, बेझनबाग येथे डॉ. भवानी शंकर नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली अनंत रामचंद्र कुळकर्णी यांच्या उपस्थितीत, कामठी येथे हेमचंद्रराव चांदोरकर यांच्या अध्यक्षतेखाली बुद्ध महोत्सव साजरा करण्यात आला.

**धम्मदीक्षा समारंभाची पूर्वतयारी:** नागपुरातील बौद्ध धम्म दीक्षा समारंभाची संपूर्ण जबाबदारी वामनराव गोडबोले यांच्याकडे असली तरी अनेक महारेतरांनी या दीक्षा समारंभासाठी मोलाचे योगदान दिले. समारंभाच्या पूर्वतयारीसाठी आंबेडकरांशी चर्चा करण्यासाठी गेले असता प्रल्हाद वाघमारे हे न्हावी समाजातील आंबेडकरी अनुयायी त्यांच्यासोबत होते. मध्यप्रांताचे राजस्वमंत्री भगवंतराव मंडलोई दीक्षा समारंभासाठी जागा व इतर सोईसुविधा मिळवून देण्यात सहकार्य केले होते. दीक्षा समारंभाची ध्वनिव्यवस्था एन. डी. मोरे यांच्याकडे होती. परंतु एवढ्या मोठ्या समारंभाला पुरतील एवढे साहित्य त्यांच्याकडे नसल्यामुळे वीर इलेक्ट्रॉनिक्सचे मालक आहुजा यांनी अतिरिक्त ध्वनिव्यवस्था केली होती. प्रकाश व्यवस्थेची जबाबदारी जोशी यांच्याकडे होती. आसनव्यवस्था पुंडलिक मूल यांच्याकडे होती. परंतु त्यांच्याकडे पुरेसे साहित्य नसल्याने डॉ. भवानी शंकर नियोगी यांनी आपल्या घरातील खुर्च्या व सोफासेट दिला होता.[४] नागपूरमधील प्रसिद्ध सुतार सोहनसिंग यांनी मंचावरील सुतारकाम त्याचप्रमाणे आंबेडकरांसाठी खास बुलेटप्रूफ डायस (पूलपीठ) तयार केले होते. समारंभासाठी निधी उभारण्यासाठी सीताबर्डीवरील रामेश्वर प्रिंटिंग प्रेसमधून पावतीपुस्तके छापण्यात आली. दीक्षार्थ्यांना देण्यात येणा—यांना प्रवेशपत्रावर क्रमांक टाकण्यासाठी एस. एम. कोठारी ॲण्ड सन्समधून एक नंबरील मशीन विकत घेण्यात आले होते. आंबेडकरांसह भिक्खूंच्या निवासाची व्यवस्था श्यामजी खेता यांच्या 'श्याम हॉटेल'मध्ये केली होती. नागपुर फ्लाइंग क्लबचे अध्यक्ष बाबूराव धनवटे यांनी धम्मदीक्षेच्या वेळी विमानातून पुष्पवृष्टी परवानगीसुद्धा दिली होती. परंतु वैमानिक उपलब्ध नसल्याने पुष्पवृष्टी होऊ शकली नाही. नागपूर सुधार प्रन्यासचे अभियंता घाणेकर यांनी, त्याचप्रमाणे नागपूर नगरपालिकेच्या पदाधिकार्यांनी दीक्षार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याची, निवासाची, शौचालयाची, विजेची व्यवस्था करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. दीक्षा समारंभाचे चित्रीकरण करण्यासाठी माहिती व नभोवाणी मंत्रालय दिल्लीचे डॉ. बी. व्ही.

केसकर यांना तसेच ध्वनिमुद्रण करण्यासाठी स्थानिक आकाशवाणीलासुद्धा पत्र पाठविण्यात आले होते. आंबेडकरांचे मुंबईतील सहकारी सवादकर, गायकवाड व कबीर यांच्या प्रयत्नाने मुंबईहून धम्मदीक्षेसाठी नागपूरला येणा—यांना दीक्षार्थ्यांसाठी खास रेल्वेगाडीसुद्धा सोडण्यात आली होती. १३ ऑक्टोबर १९५६ रोजी दीक्षा मैदानावर भीक्खूंच्या हस्ते परित्राणपाठ करण्यात आले. त्यासाठी पिंपळाच्या झाडाची आवश्यकता होती तेव्हा महाराजबागेतून रोपटे मागविण्यात आले होते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे धम्मदीक्षा समारंभासाठी बुद्धमूर्तीची गरज होती तेव्हा मध्यप्रांताचे तत्कालीन मुख्यमंत्री रविशंकर शुक्ला यांनी अजब बंगल्यामधील बुद्धमूर्ती उपलब्ध करून दिली होती.[५]

**देवप्रिय वली सिन्हा :** बौद्ध धम्म दीक्षा समारंभात कलकत्त्याच्या महाबोधी सोसायटीचे सचिव देवप्रिय वली सिन्हा यांचे महत्वाचे योगदान होते. आंबेडकरांनी त्यांच्याशी समारंभाच्या पूर्वतयारीसंबंधी वेळोवेळी चर्चा केली होती. आपण महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते दीक्षा घेणार असल्याचे त्यांनी सिन्हा यांना कळविले होते. शिवाय समारंभासाठी पाच भिक्खू आणण्याची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविली होती. परंतु ऐनवेळी चार भिक्खू आल्याने सिन्हा यांनी गोडबोलेंना सांची येथील भिक्खू पन्नातिस्स यांना तार करून बोलविण्यास सांगितले होते. आंबेडकर बौद्ध धम्म स्वीकारणार म्हणून खुश झालेल्या सिन्हानी स्वत: दीक्षा समारंभात सहभागी होण्याचे ठरविले होते. त्यासाठी ते दोन दिवस आधीच नागपुरात आले होते. दीक्षाभूमीवर जाऊन त्यांनी पाहणी केली होती. त्यानंतर श्याम हॉटेलमध्ये आंबेडकरांशी चर्चा केली होती. धम्मदीक्षेच्या आदल्या दिवशी १३ ऑक्टोबर १९५६ ला रात्री दीक्षाभूमीवर त्यांनी आंबेडकरी अनुयायांना संबोधित केले होते. त्याचबरोबर गौतम बुद्धाचे चरित्र व भारतातील प्रसिद्ध बौद्धस्थळे यावर आधारित मॅजिक लॅटर्न शोसुद्धा दाखविला होता.[६]

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी धम्मदीक्षेच्या समारंभात देवप्रिय वली सिन्हा मंचावर उपस्थित होते. धम्मदीक्षेनंतर त्यांनी आंबेडकरांना एक बुद्धमूर्ती भेट दिली तसेच एक हजार रुपयांचा धनादेश सुद्धा दिला. समारंभानंतर आंबेडकरांनी त्यांना श्याम हॉटेलमध्ये ''१९३५ मध्ये मी जेव्हा धर्मांतराची घोषणा केली. त्यावेळी तुम्ही मला पत्र लिहून आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्मात प्रवेश करण्याची विनंती केली होती. मी तुमच्या त्या पत्रास उत्तर दिले नाही, पण तेव्हापासून मी हे साध्य करण्यासाठी शक्ती लावली त्याची परिणती म्हणजे आजचा हा लाखो लोकांनी केलेला बौद्ध धर्माचा स्वीकार होय. आपण वीस वर्षांपूर्वी लिहिलेल्या पत्राचे हे उत्तर होय.'' असे संगितले होते.[७] धम्मदीक्षा समारंभानंतर सिन्हा यांनी भिक्खू गणासह कामठी येथील सिद्धार्थ बौद्धविहारास भेट देऊन तेथे बुद्धचरित्र व बौद्धस्थळावर आधारित मॅजिक लॅटर्न शो सादर केला होता. नागपूरवरून परत गेल्यानंतर सिन्हा यांनी २५ ऑक्टोबर १९५६ रोजी आंबेडकरांना पत्र पाठवून धम्मदीक्षा समारंभाविषयी चर्चा केली. आंबेडकरांनीसुद्धा सिन्हा यांच्या पत्रास उत्तर देऊन ''बौद्ध धर्मोपदेशकांनी केवळ वैरागी बनण्यापेक्षा समाजसेवक बनावे.'' अशी अपेक्षा व्यक्त केली होती.

**महास्थवीर चंद्रमणी :** आंबेडकरांनी १९४३ मध्ये कुशीनगर येथे भारतातील वयोवृद्ध बौद्ध भिक्खू महास्थवीर चंद्रमणी यांच्याशी बौद्ध धम्माविषयी चर्चा केली होती. १९५६ मध्ये त्यांच्या हस्ते दीक्षा घेण्याचे आंबेडकरांनी ठरविले. देवप्रिय वली सिन्हा, भिक्खू सुमेध तसेच भिक्खू संघरक्षित यांनीसुद्धा आंबेडकरांना चंद्रमणीं यांचे नाव सुचविले होते. चंद्रमणी यांनी आंबेडकरांच्या विनंतीस मान देऊन धम्मदीक्षा देण्याचे निश्चित केले होते. त्यासाठी ते दोन दिवस आधीच नागपुरात आले होते. त्यांच्या निवासाची व्यवस्था श्याम हॉटेलमध्ये करण्यात आली होती. तेथे त्यांनी आंबेडकरांशी धम्मदीक्षा समारंभाविषयी सविस्तर चर्चा केली होती. एवढेच नाहीतर दीक्षाभूमीवर जाऊन पूर्वतयारीची पाहणीसुद्धा केली होती. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी ते आपल्या पाच सहकारी भिक्खूंसह मंचावर उपस्थित होते. सर्वप्रथम त्रिसरण व पंचशील म्हणून त्यांनी आंबेडकरांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली.[८] शुभसंदेशाच्या वाचनानंतर आशीर्वादपर छोटेसे भाषणसुद्धा केले. धम्मदीक्षा समारंभानंतर २३ ऑक्टोबर १९५६ रोजी मुंबईतील भोईवाड्यत महास्थवीर चंद्रमणी यांचा स्वागत समारंभ सिद्धार्थ महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. बी. जी. गोखले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केला गेला. ''चंद्रमणी यांनी बाबासाहेबांना बौद्ध धर्माची दीक्षा देऊन भारतात बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन घडवून आणले.'' असे विचार यावेळी गोखले यांनी व्यक्त केले होते.

**अन्य भिक्खूंचे कार्य :** बौद्ध धम्म दीक्षा समारंभास श्रीलंकेचे भिक्खू सद्धतिस्स महाथेरो, भिक्खू संघरत्न महाथेरो, लखनौचे भिक्खू प्रज्ञानंद व भिक्खू पञ्त्रातिस्स हे उपस्थित होते. शिवाय भिक्खू परम शांती व भिक्खू सुमेध हेसुद्धा दीक्षा समारंभासाठी आले होते. धम्मदीक्षेपूर्वी १३ ऑक्टोबर १९५६ रोजी भिक्खूंच्या हस्ते दीक्षाभूमीवर परित्राणपाठ करण्यात आले. दुसर्या दिवशी धम्मदीक्षेच्या वेळी सर्व भिक्खू महास्थवीर चंद्रमणी यांच्यासह मंचावर विराजमान होते. १५ ऑक्टोबर १९५६ रोजीसुद्धा सर्व भिक्खू दीक्षाभूमीवर उपस्थित होते. भिक्खू सद्धतिस्स महाथेरो यांनी ''बाबासाहेबांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणाच्या २५०० व्या वर्षी धम्मविजय घडवून आणला.'' असे विचार व्यक्त केले

होते.[९] नागपूर महानगरपालिकेर्ते आंबेडकरांना मानपत्र देण्यात आले. ह्या कार्यक्रमास हे भिक्खूगण उपस्थित होते. १६ ऑक्टोबर १९५६ रोजी चंद्रपूरच्या बौद्ध धर्माची दीक्षा समारंभास भिक्खूगण उपस्थित राहिले होते. कामठीतील सिद्धार्थ बौद्धविहारात झालेल्या कार्यक्रमात त्यांनी धम्मोपदेश दिला होता.

**उपस्थित अन्य सहकारी अनुयायी :** या धम्मदीक्षा समारंभास जवळपास सहा लाख आंबेडकरी महार–महारेतर अनुयायी महाराष्ट्रासह गुजरात, कर्नाटक, पंजाब या राज्यांतून समारंभासाठी आले होते. आंबेडकरांसोबत त्यांचे वैयक्तिक कार्यवाहक नानकचंद रत्तू हे दिल्लीहून, गुजरात सौराष्ट्रमधून वा. का. परमार, जी. टी. परमार, उत्तरप्रदेशातून कुरील, कर्नाटकातून डी. ए. कुट्टी, पंजाबमधून शंकरानंद शास्त्री, मध्यभारतातून शंकर म्हसदे, महाबोधी सोसायटीचे देवप्रिय वली सिन्हा, मुंबईहून घनश्याम तळवटकर, भालचंद्र पेंढारकर, बी. एस. कबीर, भास्करराव कद्रेकर, नाशिकहून ए. जी. पवार, राजाराम भोळे, सोहनलाल शास्त्री, काशीनाथ साळुंके, औरंगाबादहून म. भि. चिटणीस, भालचंद्र फडके, आर. जी. खंडारे, नागपुरातील भवानी शंकर नियोगी, अनंत रामचंद्र कुलकर्णी इत्यादी मंडळी या दीक्षा समारंभास उपस्थित होती. अनेक महारेतरांनी या प्रसंगी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.[१०] नागपुरातील ख्रिश्चन फादर व डॉ. वि. भि. कोलते हेसुद्धा समारंभास हजर होते. या बौद्ध धम्म दीक्षा समारंभात महारांसह इतर अस्पृश्य जातीच्या लोकांनी त्याचप्रमाणे ख्रिश्चन व मुस्लीम धर्मीयांनीसुद्धा बौद्ध धर्माची दीक्षा घेतली होती.

**मान्यवरांचे शुभसंदेश :** नागपुर येथील बौद्ध धम्म दीक्षा समारंभाकरिता ब्रह्मदेशाचे प्रधानमंत्री यु बा स्वे, माजी प्रधानमंत्री यु नु, पूर्व पाकिस्तान बुद्धिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष पी. बी. सेनगुप्ता, बौद्ध धर्मांकुवर सभा कलकत्ताचे अरविंद बाऊआ, रंगूनचे महाथेरो पञ्ञलोक, कोझीखोडे येथील महाबोधी बुद्धिस्ट मिशनचे भिक्खू धर्मानंद, भिक्खू संघरक्षित, मद्रासचे रामस्वामी पेरीयार यांनी आपल्या शुभसंदेशातून आंबेडकरांचे अभिनंदन केले होते. कोलंबोतील भिक्खू अमर सुरीया यांनी ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मदीक्षेमुळे अखिल बौद्ध शासनाचा दर्जा वाढेल व भारतात शास्त्रोक्त पायावर पुन्हा बुद्ध शासन प्रस्थापित होईल.''[११] असे विचार आपल्या शुभसंदेशात व्यक्त केले होते.

**समारंभातील इतर घटना :** दीक्षा समारंभाचे ध्वनिमुद्रण केंद्रीय प्रसारण कार्यालय आणि आकाशवाणीने केले तर भारत सरकारच्या फिल्म डिव्हीजनने चित्रीकरण केले. ते एक महिन्यानंतर देशभरातील सर्व सिनेमाघरांत डॉक्युमेन्टरीच्या स्वरूपात दाखविण्यात आले होते. आंबेडकरांनी सोबत आणलेल्या टेपरेकॉर्डवर बाळू कबीर यांनी या समारंभाचे ध्वनिमुद्रण केले होते. देश–विदेशातील ३० पत्रकार व छायाचित्रकारांनी या समारंभाचे वृत्तांकन केले. नवयुग साप्ताहिकाच्या प्रतिनिधींनी आंबेडकरांची मुलाखत घेऊन विशेषांक प्रसिद्ध केला होता. तरुण भारत चे पत्रकार ग. र्त्यं. माडखोलकर यांनीसुद्धा त्यांची मुलाखत घेऊन धम्मदीक्षेचा संपूर्ण वृत्तांत प्रसिद्ध केला होता. धम्मदीक्षा समारंभानंतर रात्री दीक्षाभूमीवर डॉ. म. भि. चिटणीसांच्या 'युगयात्रा' या नाटकाचा प्रयोग करण्यात आला. त्यात नभोवक्त्याची जबाबदारी भालचंद्र फडके यांनी बजावली होती.[१२]

**बौद्ध धम्म दिक्षेनंतरचे कार्य :** नागपुर येथील धम्मदीक्षेनंतर बौद्धधम्माच्या प्रसारकार्यास गती आली. पुण्यात शिवाजी नगर येथील वि. रा. रणपिसे यांच्या अध्यक्षतेखालील सभेत धम्मदीक्षेनिमित्त अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात आला. यावेळी ज. वि. चव्हाण, आर. डी. साळुंके, राज साळवे, एम. डी. शिंदे, ओव्हाळ इत्यादींची भाषणे झाली. भुसावळ येथे मांगवाड्यातील सभेत १७ ऑक्टोबर १९५६ रोजी आर. जी. खंडाळे यांनी ''बाबासाहेबांच्या पावलावर पाऊल ठेवून मांग लोकांनी बौद्ध धर्माची दीक्षा घ्यावी.'' अशी विनंती केली. या प्रसंगी आर. सी. शेलार, नागू तुळशीराम कसबे इत्यादींची भाषणे झाली. मुंबईत फोरास रोड येथे १४ नोव्हेंबर १९५६ रोजी डॉ. बी. जी. गोखले यांच्या अध्यक्षतेखाली नवबौद्धाचा सत्कार करण्यात आला.[१३] त्यानंतर त्यांचे 'बुद्धाचे पंचशील' या विषयावर व्याख्यान झाले. या सभेला बौद्धपंडीत डॉ. जगदीश कश्यपसुद्धा उपस्थित होते. माटुंगा लेबर कॅम्प येथे रंगनाथ स्वामी रणाधीर यांच्या अध्यक्षतेखाली संत महंतांचा मेळावा भरून त्यात निरनिराळ्या पंथांतील साधू, संत, महंत, वारकरी, जोगी वैरागी, जती, कानाडे इत्यादींनी धम्मदीक्षेस पाठिंबा दिला. वरळी येथे आचार्य अत्रे यांच्या उपस्थितीत नवबौद्धांचा स्वागत समारंभ घेण्यात आला. ''भारतीय बौद्ध धर्म स्वीकारून बाबासाहेबांनी अस्पृश्यांचाच नाही तर संपूर्ण मानवजातीचा उद्धार केला आहे.'' असे विचार अत्रे यांनी व्यक्त केले होते.[14] श्रीलंकेतील 'वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट'चे डॉ. मलाल शेखर यांनी गोडबोले यांना पत्र पाठवून धम्मदीक्षेनंतरच्या बौद्ध धम्म प्रसारासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले होते. ९ नोव्हेंबर १९५६ रोजी भिक्खू संघरक्षित यांनी आंबेडकरांची भेट घेऊन 'भारतातील बौद्ध धर्माचा भविष्यकाळ' या विषयावर चर्चा केली होती. धम्मदीक्षेनंतर बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी नागपुरात भिक्खू संघरक्षितांची साप्ताहिक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. त्यांचे पहिले व्याख्यान ६ डिसेंबर १९५६ रोजी होणार होते, परंतु त्याच दिवशी आंबेडकरांचे दिल्लीत महापरिनिर्वाण झाले म्हणून

कस्तूरचंद पार्क येथे झालेल्या शोकसभेत संघरक्षितांनी उपस्थित नवबौद्धांना आंबेडकरांनी आरंभलेले गौरवपूर्ण कार्य पूर्णत्वास नेण्याचे आवाहन केले होते.[15]

**मूल्यमापन** : नागपुर येथील बौद्ध धम्म दीक्षा समारंभ केवळ महार जातीपुरता मर्यादित होता आणि यात फक्त महांचाच सहभाग होता असा आक्षेप नेहमीच केला जातो. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्वसमावेशक नीतीमुळे पुरोगामी आणि सुधारक प्रवृतीच्या अनेक महारेतरांनी या समारंभात सक्रिय कार्य केले. आंबेडकरांना बौद्ध धम्माकडे आकर्षित करण्यामागे महारेतरांची भूमिका होती हे तर स्पष्ट आहेच परंतु बौद्ध धम्म दीक्षा समारंभाच्या पूर्वतयारीपासून ते तो पूर्ण होईपर्यंत एवढेच नाही तर बौद्ध धम्म दीक्षा समारंभाच्या यशस्वीतेनंतर सुद्धा महारेतरांनी मोलाचे योगदान दिले हे अभ्यासाअंती लक्षात येते. किंबहुना महारेतरांच्या उल्लेखनिय योगदानामुळे नागपुर येथील बौद्ध धम्म दीक्षा समारंभ यशस्वी झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ सुची**


1. कांबळे, अरुण (१९९६) धर्मातराची भीमगर्जना, आवृत्ती १, सुगावा प्रकाशन, पुणे, पृष्ठ २४

2-गोडबोले, वामनराव (२००४) बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मदीक्षेचा अविस्मरणीय इतिहास, आवृत्ती २, प्रकाशक दिगंबर भगत, नागपुर, पृ. क्र. ६०

3. कित्ता, पृ. क्र. १४८

4.कित्ता, पृ. क्र. १४६

5.प्रबुद्ध भारत (१९५६), दीक्षा विशेषांक

6.गोडबोले, उपरोक्त, पृ. क्र. १६२

7.प्रबुद्ध भारत, उपरोक्त

8.प्रबुद्ध भारत, उपरोक्त

9.गोडबोले, उपरोक्त, पृ. क्र. १५२

10.प्रबुद्ध भारत, उपरोक्त

11.फडके, भालचंद्र (२००५) डॉ बाबासाहेब आंबेडकर, आवृत्ती २ श्रीविद्या प्रकाशन, पुणे पृ. क्र. २७३

12.प्रबुद्ध भारत (१० नोव्हेंबर १९५६) संपादक डॉ बाबासाहेब आंबेडकर, मुंबई

13.प्रबुद्ध भारत (१० नोव्हेंबर १९५६) संपादक डॉ बाबासाहेब आंबेडकर, मुंबई

14.प्रबुद्ध भारत (१ डिसेंबर १९५६) संपादक डॉ बाबासाहेब आंबेडकर, मुंबई

15.संघरक्षित महास्थविर, डॉ आंबेडकर आणि बौद्ध धम्म, The Corporate Body of Buddha Education Foundation Taipei, Taiwan, पृ. क्र. ३२

# विदर्भातील आंबेडकरी समाजाचे सामाजिक समतेचे आंदोलन

प्रा. डॉ. बी. आर. मस्के
इतिहास विभाग प्रमुख
वसंतराव नाईक कला व समाजविज्ञान संस्था नागपूर,

**सारांश :** आंबेडकरी चळवळीतील एक महत्वपुर्ण आयाम म्हणजे मंदिर प्रवेश सत्याग्रह होय. तत्कालीन समाजव्यवस्थेने दलितांना अस्पृश्य मानून सर्व मानवी अधिकार नाकारले होते. त्यांना सार्वजनिक पाणवठयावर पाणी भरण्याचा अधिकार नव्हता. राजकीय संस्थांमध्ये सहभागी होण्याचा अधिकार नव्हता. मंदिरात जावून देवदर्शन व पुजा अर्चना तर दूर पण मंदिरात प्रवेश करण्याचा सुध्दा त्यांना अधिकार नव्हता. अश्या विषमतावादी वातावरणात बाबासाहेबांनी परखड भूमिका घेऊन मंदिर प्रवेशाची सत्याग्रहाची साखळी बनविली. काळाराम मंदिर प्रवेश, पर्वती मंदीर प्रवेश सत्याग्रहाची सुरूवात अमरावतीचे अंबादेवी मंदीर प्रवेशातून झाली हे विशेष उल्लेखनीय बाब आहे. म्हणुन मंदिर प्रवेशास अन्यनसाधारण महत्व आहे. अंबादेवी मंदिर सत्याग्रह हा अमरावती येथील प्राचीन अंबादेवी मंदिरात प्रवेशासाठी सत्याग्रह हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली 26 जुन 1927 रोजी सुरू झाला. या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश देण्यात यावा यासाठी अस्पृश्यांनी देवस्थान कमिटीकडे दोन वेळा अर्ज केला. सुरूवातीला अर्ज फेटाळले गेले. नंतर मात्र देवस्थानचे एक विश्वस्त दादासाहेब खापर्डे यांनी अस्पृश्यांना हे मंदिर खुले करून देण्याचे आश्वासन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिले. हिंदु धर्म हा प्राणिमात्रांवर दया करावी, सर्व मानव ही ईश्वरांची लेकरे आहे अशी शिकवण देतो. परंतु त्याच हिंदु धर्मात त्या ईश्वरांची पूजा करण्यासाठी देखील बहुसंख्य दलितांचा अधिकार नाकारला जात होता. अस्पृश्यांना प्रवेश दिला तर मंदिरे बाटतील, सामाजिक अनर्थ घडेल अशी समजुत होती. ही बाब बाबासाहेबांना मान्य नव्हती.मानवी समानतेसाठी ज्याप्रमाणे चवदार तळयांचा सत्याग्रह करावा लागला. त्याचप्रमाणे दर्शनासाठी हा मंदिर प्रवेश सत्याग्रह नव्हता. तर हिंदु असुनही हिंदुच्या मंदिरात प्रवेश मिळत नसल्यामुळे तो समानतेचा अधिकार मिळविण्यासाठी हा मंदिर प्रवेशाचा संघर्ष होता. हिंदु दलितांच्या मंदिर प्रवेशामुळे मंदिर व मंदिरातील मूर्ती अपवित्र व अशुध्द होत नाही हे ही सिध्द करण्याचा हेतू या चळवळीमागे होता. विदर्भातील अंबादेवी मंदिर व इतर सामाजिक समतेचे लढे यांचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्रातील पर्वती मंदिर, काळाराम मंदिर यांचेही सत्याग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सुरू झाले.

**शब्द संकेत : चळवळ,पाणवठे, काळाराम मंदिर, अंबादेवी सत्याग्रह, पर्वती, खापर्डे, सामाजिक समता इत्यादी.**

**संशोधन पद्धती : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वाकार करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना :** अमरावतीमधील अंबादेवी मंदीर इतिहास प्रसिध्द आहे. याच मंदीरातून श्रीकृष्णाने रूकमीनीचे हरण केले होते. अशी आख्यायिका महाभारतात आहे. या मंदीरात दलितांना मात्र प्रवेश नव्हता. यासाठी या मंदीरात प्रवेश घेण्यासाठी गोविंदराव मेश्राम यांनी मंदीर पंचकमिटीकडे अर्ज केला होता. तो अर्ज 1926 मध्ये मंदिर पंचकमिटीने फेटाळला. पुन्हा एकदा संपतराव नाईक यांनी दलितांच्या मंदीर प्रवेशासाठी अर्ज केला. परंतू हयावेळी सुध्दा पंचकमिटीने प्रतिकूलता दाखविली. त्यामुळे दलित समाजात नैराश्याचे वातावरण निर्माण झाले.[1]अशावेळी दादासाहेब बागवे या सत्यशोधक सुधारकांनी पुढाकार घेऊन आपल्या राहत्या घरी दादासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेऊन अंबादेवी मंदिर कमेटीकडे मंदीर प्रवेशासाठी पुन्हा अर्ज पाठविण्याचा ठराव केला. शिवाय कमिटीने यावेळी अनुकुल प्रतिसाद दिला नाहीतर तिव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला. दादासाहेब बागवे यांच्या आक्रमक भुमिकेमुळे दलितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. परंतु पंचकमिटीने मात्र कोणत्याही परिस्थितीत मंदिर प्रवेश दलितांना देणार नाही अशीच भुमिका घेतली. तेव्हा अस्पृश्यांनी सत्याग्रह करण्याचा ठाम निर्धार केला. सत्याग्रहाचे यशस्वी नियोजन करण्याकरीता सत्याग्रह समिती स्थापन करण्यात आली. यात दलित्ततेर पुढारी सहभागी झाले. त्यात डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अध्यक्षपद स्विकारण्यात आले. व्ही. बी. चौबळ, रावसाहेब दिवे, दादासाहेब पाटील, दलपतसिंह चौहान तथा नानासाहेब अमृतकर इत्यादी मंडळीनी सहभाग घेतला. या सत्याग्रह समितीने संपूर्ण अमरावती जिल्हा चांदुरबाजार, अचलपूर, इत्यादी ठिकाणी विविध सभा घेऊन अस्पृश्यवर्गामध्ये जनमत निर्माण केले. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सुध्दा आपल्या

अध्यक्षतेखाली तालुका सत्याग्रह परिषदा घेवुन स्पृश्य बहुजन समाजाला अंबादेवी मंदीर प्रवेश सत्याग्रहाविषयी वस्तुस्थितीची जाणीव करून दिली.[2] त्यामुळे अनेक पुरोगामी स्पृश्य मंडळीनी सत्याग्रहास आपला पाठींबा जाहीर केला.

**आंबेडकरी समाज व स्पृश्यांचा सहभाग :** अस्पृश्य समाजाच्या मंदीर प्रवेशाच्या न्याय हक्कासाठी अमरावती येथे नेकोलेट पार्कवर दि. 28 ऑगस्ट 1927 रोजी बॅ. नानासाहेब तिडके यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. या सभेस डॉ. पंजाबराव देशमुख, एस. वाय. पाटील, नानासाहेब अमृतकर, वामनराव घोरपडे, दलपतसिंह चव्हाण इत्यादी दलित्ततेर मंडळी उपस्थित होती. तसेच डॉ. शिवाजीराव पटवर्धन सुध्दा होते. त्यात डॉ. पटवर्धनानी सूचना मांडली की, पंचकमिटीचे मन वळविण्यासाठी एक महिण्याचा कालावधी द्यावा. पंचकमिटीची समजूत घालावी, स्पृश्य–अस्पृश्यात मतभेद होवुन दुरावा निर्माण होण्यापेक्षा सामंजस्याने मंदिर प्रवेशाचा प्रश्न सुटल्यास चांगलेच होते. त्यामुळे सभेने पटवर्धनांच्या सूचनेचे स्वागत केले व सत्याग्रह एक महिना पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. दरम्यानच्या काळात अस्पृश्यांच्या मंदीर प्रवेशासाठी डॉ. पटवर्धनांनी अस्पृश्य हिंदुचे मने वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु आपल्या कार्यात ते अपयशी ठरल्यामुळे अस्पृश्यांसमोर सत्याग्रहाशिवाय दुसरा पर्याय उरला नाही. अस्पृश्यांचा मंदिर प्रवेश व्हावा याकरिता दुसरा पर्याय उरला नाही. अस्पृश्यांचा मंदीर प्रवेश व्हावा याकरीता डॉ. पंजाबराव देशमुख खुप परिश्रम घेत होते.[4] त्यांना या सत्याग्रहापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न कर्मठ हिंदुनी केला.

मराठा हायस्कुलचे अध्यक्ष डॉ. पंजाबराव देशमुख, गोपाळराव देशमुख, हे आपल्या हायस्कुलमधील विद्यार्थ्यांना जबरदस्तीने अस्पृश्यांच्या चळवळीत सहभागी करून घेत आहे अशी अफवा उठविली. या दरम्यानच्या काळात मांगोजी महार या अस्पृश्य व्यक्तीने मंदीरात प्रवेश केल्यामुळे त्यास न्यायालयाने एका महिण्याची शिक्षा दिली. पेशाने वकील असलेल्या डॉ. पंजाबराव देशमुखानी मांगोजी महाराजाच्या बाजुने युक्तीवाद केला.[5] त्याची निर्दोष सुटका झाली. यामुळे अस्पृश्य समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेश आंदोलनामध्ये अनुकुल व प्रतिकुल भूमिका असलेल्या दोन्ही गटात तडजोड करण्यासाठी बॅरिस्टर बागवे यांनी तीन कलमी योजना जाहीर केली. परंतू मंदीर सत्याग्रह कमिटीने बॅरिस्टर बागवे यांची तडजोड योजना फेटाळुन लावली व मंदीर आंदोलन चालविण्याचा निर्धार केला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विदर्भातील नेतृत्व :** डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाचा उदय मुंबई प्रांतात होत असतांनाच विदर्भाला त्यांच्या व्यक्तिमत्वाचा व विचारांचा प्रत्यक्ष प्रत्यय आला. 1920 साली बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव विदर्भात वाढू लागला तशी अनुयायांची संख्या वाढू लागली. विदर्भातील प्रभावी नेते गणेश आकाजी गवई, किसन फागोजी बनसोडे, कालीचरण नंदागवळी संपतराव नाईक इत्यादीच्या बरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व विदर्भात सर्वसामान्य होऊ लागले. त्यांनी मंदीर प्रवेशाची न्याय भुमिका विषद करून या लढयास तात्वीक अधिष्ठान प्राप्त करून दिले. डॉ. आंबेडकरांनी चळवळीला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देत असताना चळवळीचा प्रसार व प्रचारांसाठी तत्कालीन प्रसारमाध्यांच्या साधनांचा अवलंब केला.[6] त्यांनी काढलेल्या मूकनायक बहिष्कृत भारत, जनता या वृत्तपत्रांतुन घटनांना प्रसिध्दी देऊन चळवळ गतिशील केली.

जोपर्यंत आम्ही स्वतःला हिंदू म्हणवीत आहोत व तुम्ही आम्हास हिंदू आहात तोपर्यंत देवळात जावुन देवदर्शन घेणे हा आमचा हक्क आहे असे आम्ही समजतो. अशी परखड भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली. काळाराम मंदीर प्रवेशापूर्वी पश्चिम विदर्भातील अमरावती येथे सुरू झालेले मंदीर प्रवेश आंदोलन महत्वाचे आहे. डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वामुळे आंदोलनास नवीन ऊर्जा प्राप्त झाली. त्यांच्या नेतृत्वाने या आंदोलनाला नवी ऊर्जा मिळाली.[7]

**वऱ्हाड प्रांतिक अस्पृश्य परिषद अमरावती :**अंबादेवी मंदीर प्रवेशांचे आंदोलन गतिशील करण्यासाठी दि. 13 व 14 नोव्हेंबर 1927 रोजी डॉ. पंजाबराव देशमुख, गणेश आकाजी गवई आदी मंडळीनी वऱ्हाड प्रांतिक अस्पृश्य परिषद भरविली. परिषदेच्या अध्यक्षपदी डॉ. आंबेडकरांची निवड करण्यात आली. आंबेडकरांसोबत त्यांचे सहकारी देवराव नाईक, शिवतरकर, रा. दा. कांबळी, दा. वि. प्रधान आदी प्रमुख

पुढारी मंडळी हजर होती. इंद्रभूवन नाटयगृहात ही परिषद झाली. बॅरि. तिडके, डॉ. पंजाबराव देशमुख, चौबळ वकील, केशवराव देशमुख, डॉ. पटवर्धन इत्यादी पुढारी या परिषदेला उपस्थित होते.[8] या परिषदेला अस्पृश्य व स्पृश्य जनसमुदाय मोठया प्रमाणात उपस्थित होत्या.

**प्रत्यक्ष सत्याग्रह :** डॉ. पंजाबराव देशमुखांनी प्रास्ताविक भाषणात अंबादेवी मंदीर प्रवेश सत्याग्रहाचे व सभेचे महत्व सांगितले. डॉ. आंबेडकरांनी या सभेत अत्यंत अभ्यासपुर्वक भाषण केले. भाषणातील एक उतारा पुढीलप्रमाणे, 'सांस्कृतिक दृष्टीने मंदीर प्रवेशाचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे, हिंदूत्व ही जितकी स्पृश्यांची मालमत्ता आहे, तितकीच अस्पृश्यांची हया हिंदूत्वाची प्राणप्रतिष्ठा जितकी वसिष्ठ सारख्या ब्राम्हणांनी, कृष्णासारख्या क्षत्रियांनी हर्षासारख्या वैशांनी तुकारामासारख्या शुद्रांनी केली. तितकीच वाल्मिकी, चोखामेळा, रोहीदास इत्यादी अस्पृश्यांनी केली आहे.[9] हिंदूत्वाच्या नावाखाली उभारलेली मंदीरे जितकी स्पृश्यांची तितकीच अस्पृश्यांची आहेत. त्यावर जितका स्पृश्यांचा तितकाच अस्पृश्यांचा वारसा आहे. अस्पृश्यांचा समान हक्क मिळविण्याचा जो आग्रह आहे तो सत्याग्रहाच्या मार्गाने मिळविण्याचा प्रयत्न करावा.

अंबादेवी देवस्थान कमिटीचे अध्यक्ष गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांनी सनातनी मंडळीचे मत परिवर्तन करण्यासाठी तीन महिण्याचा अवधी मागितला होता. या अवधीत तडजोडीचे प्रयत्न देखील करण्यात आले. अस्पृश्यांचा मंदिर प्रवेशाचा प्रश्न सोडविण्यासाठी रा. ब. ब्रम्ह यांच्या अध्यक्षतेखाली जोग चौकात सभा झाली. या सभेत तात्पुरते मंडळ स्थापन करण्यात आले. या मंडळाने अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशास अनुकुल वातावरण तयार करण्याचे प्रयत्न सुरू केले.[10] या प्रयत्नाचा भाग म्हणजे 21 सप्टेंबर 1932 रोजी बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली वाईचे पंडित दिवेकर शास्त्री यांचे व्याख्यान यांच्याच अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत अस्पृश्यांना अंबादेवीच्या मंदीरात जाऊ देण्याचा ठराव प्रचंड बहुमताने पारित करण्यात आला.

अस्पृश्यांच्या मंदीर प्रवेशाच्या वातावरण निर्मितीसाठी वीर वामनराव जोशी, दिवेकर शास्त्री, पी. वाय. देशपांडे, गुलाबराव बक्षी, डॉ. सबनीस, सौ. विमलाबाई देशपांडे इत्यादी मंडळी सभा पत्रके स्वाक्षऱ्याच्या माध्यमातुन जनमत अनुकुल करीत होते. रा. ब. ब्रम्ह बाबासाहेब खापर्डे ही मंडळी पंच कमिटीला भेटून मंदीर प्रवेशास अनुमती देण्यास आली.[11] प्रदिर्घ संघर्षानंतर अमरावतीचे मंदिर अस्पृश्यासाठी खुले झाले. हा लढा शांततेने संयमाने व तडजोडीच्या माध्यमातून लढला गेला.

**विदर्भातील इतर सामाजिक समतेचे लढे :** याच कालखंडामध्ये अस्पृश्यांना हिंदू मंदिरामध्ये व सार्वजनिक पाणवठयावर प्रवेश मिळावा म्हणून व्यापक जन आंदोलन उभारण्यात आली. डॉ. बाबासाहेबांनी जनसमूहाला सामाजिक समतेच्या लढयासाठी कार्यप्रवण बनविले.[12] विदर्भात पाणवठे व मंदिर प्रवेशाचे लढे प्रदिर्घ काळ चालले. अमरावती येथील यशवंतराव देशमूख या सत्यशोधक समाजाच्या नेत्याच्या माध्यमातून विहीरीवर पाणी भरू देणेसाठी आंदोलन झाले. अस्पृश्य वर्गाची पिण्याच्या पाण्याची गैरसोय होती. त्यासाठी 1923 मध्ये कायदे कौन्सिलकडून संमत्ती घेतली. बुलढाणा जिल्हयातील जळगाव जामीद येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी दोन सार्वजनिक विहीरी अस्पृश्यांसाठी खुली करण्यात आली. हरिजन सेवक संघाच्या माध्यमातून पश्चिम विदर्भातील सार्वजनिक खाजगी पाणवठे, विहीरी, मंदिरे अस्पृश्यांसाठी पिण्याचा पाण्याचा प्रश्न मिटविला. अचलपूर येथील दत्त दरबार यांच्या नावाने प्रसिध्द असलेले दत्त मंदिर बहिष्कृत्यकतासह सर्व जाती धर्माच्या लोकांसाठी उघडण्यात आले.[13] गांधीवादी जमनालाल बजाज यांनी अस्पृश्यांसाठी मदत केली. हरिजनांना सार्वजनिक पाणवठे, मंदिरे, खानावळी, हॉटेल इत्यादी सार्वजनिक ठिकाणी प्रवेश असावा म्हणून हरिजन सेवा संघाच्या वऱ्हाड प्रांत प्रमुख श्रीमती दुर्गाबाई देशमुख यांनी पत्रक काढले. अकोला येथील ब्रिजलाल बियानी, संभूजी खंदारे यांनी केले. त्यांच्यामागे डॉ. बाबासाहेबांची प्रेरणा होती.

**केंद्रीय कायदे मंडळातील आंबेडकरी समाजाच्या प्रश्नांविषयी चर्चा :** अमरावतीच्या अंबादेवी मंदिर प्रवेश आंदोलनाप्रमाणे संपूर्ण भारतभर अस्पृश्यांना हिंदू मंदिरात प्रवेश देण्यात यावा यासाठी केंद्रीय कायदे

मंडळातील श्रीरंगा अय्यर यांनी मंदिर प्रवेशाचे बिल 24 मार्च 1933 रोजी मांडले. दरम्यान नविन निवडणुका घेण्याकरिता सरकारने कायदेमंडळ बरखास्त करण्यात आले. ते बिल परत घेतले. बाबासाहेब 14 फेब्रुवारी 1933 ला निवेदन प्रसिध्द केले. त्यात म्हटले की, अस्पृश्यांना आता मंदिर प्रवेशापेक्षा भौतिक, उच्चशिक्षण, पदव्या, नौकऱ्या आणि उपजिविका चालविण्याची उत्तम साधने उपलब्ध करून देणे.[14] हाच त्यांच्या उन्नतीचा मार्ग आहे. अस्पृश्य समाजाच्या निवारण्यासाठी पाणवठे, मंदिरे खुली करण्याच्या चळवळीचे विश्लेषण करतांना असे दिसून येते की, अल्पकाळापर्यंतच अस्पृश्यांची हिंदू मंदिरे व विहीरी खुल्या करण्याची मोहीम जोमात होती. परंतु थोडयाच दिवसात ही मोहीम थंडावली. वर्तमानपत्रातून काही काळ गाजावाजा करण्यात आला. गांभीर्यता काहीच नव्हती. विदर्भातील नाव घेण्यासारखे प्रसिध्द मंदिरे खुली करण्यात आली नाही.[15] पाणवठयाबाबतीत सुध्दा असेच झाले. एकदा खुले झालेले मंदिर, पाणवठे काही काळानी शुध्द करून घेतली जात व पुन्हा तिथे अस्पृश्यांना प्रवेश नसे.

**निष्कर्ष :** मंदिर प्रवेश व पिण्याच्या पाण्याच्या सामाजिक समतेच्या आंदोलनामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विदर्भातील नेतृत्व तावून–सुलाखून निघाले. दलित प्रश्नांवर सामाजिक लढा प्रखर झाला. यामुळे पुढील आंदोलनाला प्रेरणा मिळाली. चवदार तळे, काळाराम मंदिर प्रवेश यासाठी लढे उभारले, आंदोलन केले. अस्पृश्य समाजाला गतिशिल करण्यासाठी डॉ. आंबेडकरांची महत्वाची भूमिका पार पाडली. विदर्भात झालेल्या या लढयाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्पृश्य पुरोगामी विचारांच्या नेत्यांचे मार्गदर्शन लाभले व विदर्भातील दलित समाजाला सामाजिक, धार्मिक व राजकीयदृष्टया गतिशिल करण्याचे कार्य या आंदोलनाने केले असे म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ :**

1. आंबेडकर, बी. आर. (संपा) : बहिष्कृत भारत, दि. 03 एप्रील 1927.
2. कडवे, रघूनाथ : भारत भूषण, डॉ. पंजाबराव देशमुख, 1986, पृ. 59.
3. कारंजकर, भि. दे. : अमरावती शहराचा इतिहास, भाग 1 व 2, 1978 पृ. 544.
4. मोहिते, उत्तमराव :जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता, डॉ. पंजाबराव देशमुख, 1983, पृ. 128.
5. आंबेडकर, बी. आर. (संपा) : बहिष्कृत भारत, दि. 16 सप्टें. 1927.
6. भगत, एस. बी. : अमरावती जिल्हयातील सामाजिक सांस्कृतिक चळवळीचे ऐतीहासिक सर्वेक्षण, अप्रकाशित शोधनिबंध, पृ. 225.
7. आंबेडकर, बी. आर. (संपा) : बहिष्कृत भारत, दि. 25 नोव्हेंबर 1927.
8. फडके, य. दि. : विसाव्या शतकातील, महाराष्ट्र खंड 3, 1997, पृ. 265.
9. आंबेडकर, बी. आर. (संपा) : बहिष्कृत भारत, दि. 18 जाने. 1929.
10. करंजीकर भि. दे. : पुर्वोक्त, पृ. 800.
11. फडके, य. दी. : विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड 3 रा, 1997, पृ. 265.
12. कोसारे, एच. एल. विर्दभातील दलित चळवळीचा इतिहास 1984, पृ. 242.
13. कित्ता, पृ. 242.
14. कित्ता पृ. 243
15. मस्के डॉ. बी. आर. : विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास पृ. 127–128.

# डॉ. आंबेडकरांचे श्रमिक कल्याणविषयक तत्वज्ञान आणि मजूर पक्षाचे विदर्भातील योगदान –एक अध्ययन

**डॉ.दिपाली दी.भावे**
सहयोगी प्राध्यापिका
इतिहास विभाग प्रमुख
विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस, नागपूर

**सारांश :** डॉ. भिमराव रामजी आंबेडकर इ.स. 1926 मध्ये मुंबई प्रांताच्या विधिमंडळाचे सदस्य झाले. त्यांनी विधीमंडळाबाहेर श्रमिक जनतेचे लढे उभारले तर विधिमंडळात या श्रमिक कष्टकरी जनतेच्या प्रश्नांवर चर्चा घडवून आणली. डॉ. आंबेडकरांनी खोती पध्दती, महार वतने आणि सावकारी नियंत्रण या ग्रामिण जनतेच्या जिव्हाळयाच्या प्रश्नावर मोलाची कामगिरी केली. बाबासाहेबांच्या मते मनूस्मृतीने भारतीय श्रमिकांची विभागणी केली. डॉ. आंबेडकरांनी 1936 मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. या पक्षाचा करार जाहीरनामा अत्यंत महत्वाचा ठरला कारण पुढील काळात 'दारीद्रय निमूलन' कार्यक्रमावर या जाहीरनाम्याचा प्रभाव पडला आहे. अन्य कामगार नेत्यांच्या सहकार्याने स्वतंत्र मजूर पक्षाने मुंबई, मध्यप्रांत, वऱ्हाडमध्ये महत्वाचे स्थान प्राप्त केले. फेब्रुवारी 1937 मध्ये झालेल्या निवडणूकीमध्ये मजूर पक्षाने सतरा उमेद्वार उभे केले त्यापैकी पंधरा उमेद्वार विजयी झाले. डॉ. आंबेडकरांनी श्रमिकांच्या सामाजिक आर्थिक, शारीरिक आणि राजकीय बाबींबरोबर व त्यांच्या मानसिक आणि सांस्कृतिक विकासाचाही विचार केला. थोडक्यात भारतातील श्रमिक व शेतकरी यांच्या अवस्थेचा डॉ. आंबेडकरांकनी अतिशय जिव्हाळयाने, गांभीर्याने विचार केला आणि त्यावर उपाययोजना सूचविली. विदर्भातही स्वतंत्र मजूर पक्षाने लक्षवेधी कामगिरी केली. स्वतंत्र मजूर पक्षाने रेवाराम कवाडे, नंदागवळी, राधाबाई कांबळे, बाबू हरदास, रावसाहेब ठवरे इ. महत्वाचे नेते दिले. बाबासाहेबांच्या स्वतंत्र मजूर पक्षाने स्वबळावर अनेक चळवळी संघटीत केल्या. मुंबई महापालिकेतील कामगारांच्या समस्याची सोडवणूक केली. मध्यप्रांत आणि वऱ्हाड (वर्तमान विदर्भ) नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागतील बिडी उद्योगातील कामगारांच्या हक्कांसाठीही स्वतंत्र मजूर पक्षाने अनेक लढे दिले. मजूरपक्षाच्या या यशस्वी कामगिरीमूळे डॉ. आंबेडकरांना राष्ट्रीय पातळीवरचे कामगारनेते म्हणून मान्यता मिळाली.

**शब्द संकेत : प्रारंभिक चळवळी,वर्गलढा, स्वतंत्र मजूर पक्ष, श्रमिकांविषयची भूमिका, स्वतंत्र मजूर पक्षाचे कार्य, डॉ. आंबेडकरांची कल्याणविषयक भूमिकाः–**

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**डॉ. आंबेडकरांच्या प्रारंभिच्या चळवळीः–**

डॉ. भिमराव रामजी आंबेडकर अर्थशास्त्रातील सर्वोच्य पदवी आणि कायदेशास्त्रातील सर्वोच्य पदवी – बॅरिस्टर पदवी मिळवून एप्रिल 1923 मध्ये भारतात परत आले. लवकरच त्यांनी राजकारणात आपल्या बुध्दीमत्तेच्या जोरावर प्रवेश केला. 1926 मध्ये मुंबई प्रांताच्या विधिमंडळाचे सदस्य म्हणून बॅ. आंबेडकरांची नीयुक्ती झाली.[1] बॅ. आंबेडकरांनी मुंबई प्रांताच्या विधि मंडळ सभागृहामध्ये चर्चेत भाग घेतला आणि विधी मंडळाबाहेर जनतेचे भव्य लढे उभारले. या लढयामध्ये ग्रामिण गरीब जनता उस्फूर्तपूर्ण सामिल झाली. या लढंयाद्वारे जनतेच्या समस्या, त्यांच्यावर होणारे अन्याय प्रकाशात आले. याबाबतीत खोती पध्दती, महार वतने आणि सावकारी नियंत्रण या ग्रामिण जनतेच्या जिव्हाळयाच्या प्रश्नावर त्यांनी मोलाची कामगिरी केली.[2]

सावकारी नियंत्रण, खोती पध्दती आणि महारवतनाविरूध्द केलेल्या लढयावरून डॉ. आंबेडकरांची ग्रामिण जनतेबद्दलची वाटणारी कळकळ लक्षात येते. म्हणून आंबेकडरांनी उभारलेल्या या लढयामध्ये तत्कालीन अनेक समाज सुधारक सामील झाले. त्यात कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचाही समावेश होता. डॉ. आंबेडकरांची कामगारकल्याणविषयक भूमिका हळूहळू व्यापक झाली आणि तिचे रूपांतरण पुढे भूमिहीन गरीब, कूळे, शेतकरी आणि औद्योगिक कामगारांच्या चळवळी आणि लढयात झाले.

**भारतातील वर्गलढा :–**

डॉ. आंबेडकरांच्या मते कार्ल मार्क्सच्या फार पूर्वीच भारतात वर्गलढा सूरू आलेला होता. मनूस्मृतीने वर्णावर आधारीत धर्माची निर्मिती करून श्रमिकांची विभागणी केली. त्यावेळी श्रत्रियांनी ब्राहमणांविरूध्द जे अनेक संघर्ष केले ते संघर्ष वर्गलढयाचे उदाहरणे आहेत.[3]

भारतातील श्रमिक संघटना आणि राजकीय पक्ष यांच्या इतिहासाचे अध्ययन केल्यास असे लक्षात येते की, भारतातील या श्रमिक संघटना आणि राजकीय पक्षांनी दलित आदीवासी आणि कामगार यांच्या

आर्थिक आणि सामाजिक न्यायाची कोणतीही जवाबदारी स्विकारली नाही. असे डॉ. आंबेडकरांचे प्रामाणिक मत होते.

**स्वतंत्र मजूर पक्षाच्या उदयापूर्वीची परिस्थिती:—**

डॉ. आंबेडकराच्या स्वतंत्र कामगार पक्षापूर्वीही भारतात अनेक कामगार संघटना कार्यरत होत्या. स्वांतत्र्यपूर्व काळातील राष्ट्रीय कॉग्रेसमध्ये भांडवलदार, कारखानदार मंडळींचा समावेश होता. ही मंडळी आपल्या लाभा सामोर दलित पद्दलित, गरीब, श्रमिक आणि शेतकरी वर्गाच्या कल्याणाचा विचार करणार नाहीत[4] आणि बाबासाहेबांचा साम्यवादी पक्षावरही विश्वास नव्हता.अशा पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकराचे श्रमिक तत्वज्ञान समजावून घेतांना त्यांनी श्रमिक तत्वज्ञान विषयक जे भाषण आणि स्पष्टीकरण केले त्याचेही अध्ययन करणे आवश्यक आहे. श्रमिकांच्या कल्याणाकरीता त्यांनी 15 ऑगस्ट 1936 रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापणा केली.[5] या नविन पक्षापासून त्यांना अनेक अपेक्षा होत्या. या नविन पक्षाचे नाव 'स्वतंत्र मजूर पक्ष' का ठेवले? याचे स्पष्टीकरण करतांना ते म्हणाले की, अन्य राजकीय पक्षाशी शक्य तेथे सहकार्य करण्याची नव्या पक्षाची तयारी असेल पण तरीही हा नवा पक्ष अन्य राजकीय पक्षापेक्षा वेगळा आणि स्वतंत्र असेल. सर्व कष्टकरी मजूर अस्पृश्य नसल्याने अस्पृश्य मजूरासहीत सर्व श्रमजीवी कष्टकरी मजूरांचे हित साधण्यासाठी व त्यांचे कल्याण करण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापण केला.[6]

बाबासाहेबांनी जनता या आपल्या मूखपत्रात संपादकाच्या लेखणीतून आपले विचार मांडले की "आर्थिक लढयात स्पृश्य आणि अस्पृश्य शेतकरी, कामकरी वर्गाचे हितसंबंध एकजीव आहेत. अस्पृश्य वर्गाला आपला आर्थिक लढा स्पृश्य शेतकरी, कामकरी वर्गाच्या सहाय्यावाचून स्वतंत्रपणे लढता येणार नाही. 1936 साली डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजून पक्षाची स्थापना करतांना आपल्या पक्षाचा जाहिरनामा घोषित केला.

औद्योगिक कामगारांच्या संदर्भात जाहिरनाम्याने औद्योगिक कामगारांच्या भरती, बढती व बडतर्फीच्या नियंत्रणासाठी कायद्याची गरज स्पष्ट केली. आवश्यक वेतन, भरपगारी रजा, कामाचे तास निश्चित करणे, स्वस्त व आरोग्यपूर्ण निवासव्यवस्था यासाठी स्वतंत्र कायदयाचा पुरस्कार करण्यात आला. घरबांधणी आणि आरोग्यासाठी गावपातळी वरील नियोजन तसेच खेडयांचे आधुनिकीकरण इत्यादी बाबींचा समावेश बाबासाहेबांच्या मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात करण्यात आला.[8] नंतरच्या काळात भारतात 'गरीबी हटाव' कार्यक्रमाकरीता आखण्यात आलेल्या वीस कलमी आर्थिक कार्यक्रमासारख्या अनेक कार्यक्रमावर या जाहीरनाम्याचा प्रभाव पडलेला आहे.[9]

डॉ. नरेंद्र जाधव आपल्या 'डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्वज्ञान' या ग्रंथात म्हणतात की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करून भारताच्या राजकीय क्षितीजावार एका परिवर्तनशील सम्यक क्रांतीची मूहूर्तमेढ रोवली." तत्कालिन भारतातील अनेक महान व प्रसिध्द अशा नेत्यांशी विचारविमर्श केला. या कामगारनेत्यांनी केलेले आंदोलन आणि उभारलेल्या लढंयामध्ये त्यांनी सक्रीय भाग घेतला होता. त्यातून त्यांच्या हे लक्षात आहे की कामगारांचे प्रश्न सोडवायचे असल्यास कामागारांनी राजकीय सत्ता हस्तगत केली पाहिजे. असे विचार त्यांनी पेरांबुर येथील आपल्या भाषणात प्रतिपादीत केले. अन्य कामगार नेत्यांच्या सहकार्याने स्वतंत्र मजून पक्षाने त्यावेळी मुंबई आणि मध्यप्रांत, वऱ्हाडमध्ये महत्वाचे स्थान प्राप्त केले. त्यांच्या पक्षाने सतरा उमेद्वार निवडणूकीच्या रिंगणात उभे केले. त्यापैकी फेब्रुवारी 1937 ला झालेल्या निवडणूकीमध्ये त्यांचे पंधरा उमेद्वार विजयी झाले.[10]

**डॉ. आंबेडकरांची श्रमिकांविषयची भूमिका:—**

भारतातील श्रमिक व शेतकरी यांच्या अवस्थेचा जेवळयाचे, गांभीर्याने आणि कळकळीने बाबासाहेब आंबेडकरांनी विचार केला आणि त्यावर उपाययोजना सुचविली.[11] त्याप्रमाणे इतर भारतीय पुढाऱ्यांनी असा विचार केल्याचे आढळत नाही. कारण या गरीब कामगारांच्या हलाखीच्या परिस्थितीची त्यांना पूर्ण जाण होती. ही परीस्थिती त्यांनी स्वतः अनूभवलेली असल्यामुळे यातून कामगारवर्गाला बाहेर काढणे, त्यांच्या राहणीमाणात सुधारणा करणे या कार्याला त्यांनी प्राथमिकता दिली. कष्टकरी श्रमिक, शेतकरी ही सुध्दा माणसे आहेत म्हणून त्यांना ही मनवतेने वागविणे आवश्यक आहे. त्यांना न्याय्य मानवतेचे, माणूसकीचे हक्क प्राप्त झाले. पाहिजेत यासाठी त्यांनी प्रत्यक्ष आंदोलन केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या श्रमविषयक तत्वज्ञानाचा विचार करतांना एक महत्वाची बाब अधोरेखित होते ती ही की, त्यांनी श्रमिकांच्या सामाजिक, आर्थिक, शारीरिक आणि राजकीय बाबींबरोबरच त्यांच्या मानसिक आणि सांस्कृतिक विकासाचाही विचार केला. बाबासाहेब म्हणतात की, व्यक्तीला जर एक उत्तम नागरीक बनायचे असेल तर सामान्य नागरीकांचे कर्तव्य पार पाडण्यास आपल्या व्यक्तित्वाचा विकास

करण्यास आणि आपल्या विशेष उत्तरदायित्वाच्या परीपूर्तीसाठी त्याला विरंगूळा आवश्यक आहे. आणि म्हणूनच मनुष्याच्या श्रमाची सीमा निर्धारीत होणे अत्यंत आवश्यक आहे.औद्योगीक क्षेत्रातील मजूर आणि ग्रामिण भागातील कूळ, भूमिहीन, शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी, गरीब जनता यांच्याकरीता डॉ. आंबेडकरांनी महत्वपूर्ण कामगिरी केली. कामागार चळवळीच्या बाबतीत डॉ. आंबेडकरांच्या भूमिकेनुसार स्वातंत्र्यपूर्वकाळातील कामगार संघटना या कामगारांच्या हक्कांसाठी लढत होत्या पण त्यांच्यातील अस्पृश्य कामगारांचे माणूस म्हणून जे प्रश्न होते त्याबाबत त्या पूर्णपणे उदासिन होत्या स्वतंत्र मजूर पक्षाचा डॉ. आंबेडकरानी तयार केलेला हा जाहीरनामा आजही भारतातील पिडित, शोषित जनतेच्या आर्थिक विमोचनाचा आर्थिक कार्यक्रम म्हणून महत्वाचा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पक्षाद्वारे लोकांमध्ये जागृती निर्माण केली याचे अपेक्षित परिणाम समोर आले. कष्टकरी श्रमिक शेतकरी वर्ग एकजूट झाला आणि संघर्षास तयार झाला. कोकणातील, मुंबई प्रांतातील शेतकरी बाबासाहेबांच्या कार्याने आणि भाषणांनी जागृत झाले. यावेळी ते आपसातील भेदभाव विसरून एकजूट होऊ लागले. ते मोठया संख्येने मजून पक्षात सामिल झाले. कोकणात स्पृश्या स्पृश्यता, जातीभेद इत्यांदींला महत्व न देता मराठा, कुणबी, महार, मांग, चांभार आणि मुसलमान इत्यादी सर्व शेतकरी स्वतंत्र मजूर पक्षाच्या झेंडयाखाली हजारोंच्या संख्येने एकत्र आले. विदर्भातही स्वतंत्र मजूर पक्षाने अल्पावधीत लक्षवेधी कामगिरी केली.

**विदर्भातील स्वतंत्र मजूर पक्षाचे कार्य :–**

विदर्भातील स्वतंत्र मजूर पक्षाच्या सदस्यांनी इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद घ्यावी अशी ऐतिहासिक कामगिरी बजावली. इ. स. 1924 मध्ये सरकारतर्फे (Labour Enquiry Committee) लेबर इन्कवायरी कमिटी स्थापना करण्यात आली.[12] ही समिती कामगारांच्या आर्थिक, सामाजिक स्थिती, त्यांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी स्थापण करण्यात आली होती. यावेळी मजूर पक्षाचे वैदर्भिय नेते. रेवाराम कवाडे, नारायण गंभीरे, राधाबाई कांबळे इत्यादी कामगार नेत्यांनी या लेबर समितीसमोर निर्भीडपणे साक्ष दिली. नागपूरच्या महिला कामगारही यात आघाडीवर होत्या. रावसाहेब फुले यांच्या नेतृत्वाखाली नागपूर येथे मजूर पक्षाची शाखा स्थापन झाली. राधाबाई कांबळे यांनी बाबासाहेबांच्या झुंझार नेतृत्वखाली मजूर संघटनेने मोलाचे कार्य केले. हजारो लोकांसामोर तुफानी भाषण देण्याऱ्या त्या विदर्भातील पहिल्या महिला पुढारी होत्या.

पुढे इ. स. 1929 साली कष्टकरी श्रमिकांच्या परिस्थितीची पाहणी करण्याकरीता ब्रिटीश सरकारमार्फत एक लेबर कमिशन भारतात आले. या कमिशनला मुंबई व नागपूर येथील मजुरांशी संबंधित असलेल्या अनेक नेत्यांची साक्ष घ्यावयाची होती. त्यानुसार नागपूर विभागामध्ये गिरणी व बिडी मजूरांशी संबंधीत असलेल्या अनेक नेत्याची साक्ष घेतली. नागपूर विभागातील गिरणी व बिडी मजूरांचे प्रतिनिधी म्हणून बाबू हरदास एल. एन., रावसाहेब ठवरे, कालीचरण नंदागवळी अशा अनेक पुढाऱ्याप्रमाणे राधाबाई कांबळे यांचीही स्वतंत्रपणे साक्ष घेण्यात आली. विदर्भातील हे कामगारनेते मजूर पक्षाचे कार्यकर्ते होते.[13]

**डॉ. आंबेडकरांची कल्याणविषयक भूमिकाः–**

मनमाड येथे जी. आय. पी. रेल्वे दलितवर्ग कर्मचारी परिषदेसामोर दिनांक 12 फेब्रुवारी 1938 रोजी अध्यक्षीय भाषणात डॉ. आंबेडकर म्हणाले की, दलित मजूर कामगार या नात्याने आज तूम्ही एकत्र येत आहात. स्वातंत्र्य मिळविण्याचे व सर्व अडचणींतून मुक्त होण्याचे साधन सत्ता हेच होय. धार्मिक व आर्थिक शक्तीपेचा राजकीय शक्ती अधिक परीणामकारक आहे. आपल्या व्याख्यानामध्ये ते पूढे म्हणाले की एक दिवस दलित वर्ग संघटित होईल व त्यांना मिळालेल्या राजकीय सत्तेचे त्यांना महत्व कळून येईल आणि मग ते आपल्या सामाजिक मुक्तीसाठी त्याचा परीणामकारक उपयोग करून घेतील.

डॉ. आंबेडकरांच्यामते भारतीय श्रमिक वर्गाचे दोन मोठे शत्रू आहेत.

अ) ब्राहमणवाद

ब) भांडवलवाद

बाबासाहेबांच्या मतानुसार ब्राहमणवाद म्हणजे स्वतंचता, समानता आणि बंधूभाव या लोकशाही तत्वांना विरोध करणारी वृत्ती होय आणि या वृत्तीचे जनक ब्राहमण आहेत ही ब्राहमणशाही काही विशिष्ट वर्गाना संधीची समानता ही नाकारते. यावेळी बाबासाहेबांनी मजूरांना आग्रहाने सांगितले की, श्रमिकांनी स्वतःमध्ये असलेल्या ब्रामहणवादाच्या एका रूपात भांडवलवादी व्यवस्थेचा अंत करण्याकरीता संघटित व्हावे आणि यातूनच कामगारोचे ऐक्य घडूनक येईल.[14]

बाबासाहेब आपल्या व्याख्याणामध्ये पुढे म्हणाले की, भारत हा कामागार संघटनांची नितांत आवश्यकता असणारा देश आहे. कारण भारतातील वर्तमान कामागार नेतृत्व स्वार्थी आणि पथभ्रष्ट आहे. मात्र स्वतंत्र मजूर पक्षाजवळ त्याचा स्वतंत्र व स्पष्ट असा कार्यक्रम आहे. स्वतंत्र मजूर पक्ष कामगारांच्या हिताला सर्वोच्य प्राधान्य देतो. या पक्षाचे ध्येय आणि उद्दिष्ट स्पष्ट आहेत. अशाप्रकारे आपले कामगार कल्याणविषयक विचार त्यांनी स्पष्टपणे जनतेसमोर मांडले.

वंश, जात आणि धर्मामूळे कामगारामध्ये भेदभाव निर्माण होते आणि कामगारांचे ऐक्य घडून येण्यास अडचण निर्माण होते. पण बाबासाहेबांच्या स्वतंत्र मजूर पक्षाने गरीब, श्रमिक शेतकरी इत्यादींच्या कल्याणाच्या आवश्यकतेवर अधिक भर दिला. स्वतंत्र मजूर पक्षाने जनसमूदायाला शिक्षित केले, जनजागृती केली. त्यांच्यासमोर योग्य विचारसरणी प्रस्तूत केली आणि त्यांना वैधानिक मार्गाने राजकीय कार्य करण्याकरीता संगठीत केले. यामुळे त्यांच्या पक्षाला अमाप प्रसिध्दी मिळाली आणि त्यांच्या पक्षांचे नाव सर्वतोमुखी झाले. इ. स. 1937 ला झालेल्या निवडणूकीत त्यांच्या पक्षाने उभे केलेले सतरापैकी पंधरा उमेद्वार विजयी झाले. हिच मजूर पक्षाने केलेल्या कार्याची जनतेने दिलेली पावती होय.

15 सप्टेंबर 1938 रोजी मुंबई विधीमंडळ Industrial Dispute Bill या विधेयकावर महत्वपूर्ण भाषण करतांना बाबासाहेब आंबेडकर यांनी संप करण्याच्या कामगारांच्या न्याय्य हक्काची बाब उचलून धरली आणि कामगारांच्या संपाचा हक्क हा पवित्र अधिकार मानला. या Industrial Dispute Bill यावर बाबासाहेबांनी तीव्र शब्दात टीका केली आहे.[15]

**निष्कर्षः—**मजूरपक्षाने स्वबळावरही अनेक चळवळी संघटीत केल्या. मुंबई महापालिकेतील कामगारांच्या अनेक समस्यांची सोडवणूक केली आहे. विशेष उल्लेखनीय घटना त्योवळी मध्यप्रांत आणि वऱ्हाड (वर्तमान विदर्भ) नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागातील बिडी उद्योगातील कामागारांच्या हक्कासाठीही स्वतंत्र मजूर पक्षाने संघर्ष केला. मजूर पक्षाच्या या यशस्वी कामगिरीमुळेच डॉ. आंबेडकरांना राष्ट्रीय पातळीवरचे कामगारनेते म्हणून मान्यता मिळाली.

**संदर्भसूची :—**


1. डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्वज्ञान, सुगावा प्रकाशन पूर्ण, पृ.क्र.49
2. कित्ता, पृ. क्र. 49
3. ताराचंद्र खांडेकर, डॉ. आंबेडकर — श्रमिक कल्याण आणि गांधीवाद मीमांसा, पृ. क्र. 25
4. गांरजे, मा. फ. (संपा), डॉ. आंबेडकरांची भाषणे खंड 2 पृ. क्र. 140
5. खांडेकर, पृ. क्र. 1
6. खांडेकर, पृ. क्र. 1. 2
7. खांडेकर, पृ. क्र. 1
8. गांजरे 3.80
9. पवार, उर्मिला मिनाक्षी मुन, आम्हीही इतिहास घडविला, पृ. क्र. 131
10. जाधव, पृ. क्र. 59
11. खांडेकर, पृ. क्र. 16
12. उनि. पवार, मुन, पृ. क्र. 131
13. कित्ता
14. गांजरे पृ. क्र. 2. 136
15. खांडेकर, पृ. क्र. 19

# समता सैनिक दलाचे सामाजिक कार्यातील योगदान

.
प्रा.उज्जवला दिगंबर गोंडाणे,
इतिहास विभाग प्रमुख,
श्री निकेतन कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

**सारांश** :–समता सैनिक दलाची स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली. 19 मार्च इ.स. 1927 साली बाबासाहेबांनी महाडला एक परिषद भरवली होती. महाडच्या सत्याग्रहा पूर्वीची ही परिषद होती. या परीषदेत समता सैनिक दलाची स्थापना करण्यात आली. इ.स. 1927 चा काळ पाहता चवदार तळयाचा सत्याग्रह आणि मनुस्मृतीचे दहन या महत्वाच्या घटना आहेत. समाजात अस्पृश्यावर अन्याय, अत्याचार होतच होते. सगळा समाज विषमतेत जळत होता. बाबासाहेबांच्या चळवळीमुळे समाजात जागृती होत होती. शेकडो वर्षे मान खाली घालून चालणारे लोक आता मान वर करू लागले होते. माणसे मुक्तीच्या वाटा चालू लागली होती. सवर्णांना हे आवडणे शक्य नव्हते, त्यांचा वर्चस्वाचा अहंकार दुखविला जाणे साहजिक होते. हे स्वाभिमानाचे नवे वारे सवर्ण समाजाला आवडत नसे आणि त्याचा परिणाम म्हणून गावा–गावात सवर्णांकडून अस्पृश्यावर हल्ले होण्याचे प्रमाण वाढले. अशावेळी गावागावातील लोकांच्या रक्षणासाठी, चळवळीची ताकद वाढविण्यासाठी आणि महाडच्या सत्याग्रहाच्या यशस्वितेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता सैनिक दलाची स्थापना केली होती आणि आजही ही संघटना कार्यरत आहे.

डिसेंबर 1927 सालच्या दुसऱ्या परिषदेची तयारी सुरू असतानाच बाबासाहेबांनी बहीष्कृत हितकारिणी सभेतील दलित व दलितांच्या कार्यकर्त्यांशी विचार विनिमय करून दि. 04 सप्टेंबर 1927 रोजी समाज समता संघाची मुंबईत स्थापना केली. समता स्थापन करावयाची म्हणजे प्रामुख्याने दलितांना भारतीय समाजात एकरूप करून घ्यावयाचे. खराखुरा भारतीय समाज घडवून आणून, त्याची ताकद पिळवणुकीविरूध्द उभी करावयाची जे आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळवायचे आहे ते स्वातंत्र्य केवळ हिंदू, मुसलमानांचे नसेल तर दलितांचेही असेल; हा अर्थ त्या स्वातंत्र्याला प्राप्त करून देण्यासाठी समाजात समता आणण्याचे प्रयत्न करणे, हे समता समाज संघाने आपले ध्येय ठरविले.

**शब्द संकेत : समाज समता संघ,महाड सत्याग्रह,समता सैनिक दल आणि विदर्भ**

**संशोधन पद्धती : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे.**

**संघाचा प्रचार व प्रसार** :–

समता समाज संघाच्या कार्याचा प्रचार व विस्तार व्हावा यासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी 1928 साली दे.वि. नाईक यांच्या संपादकत्वाखाली 'समता' हे नियत कालिक सुरू केले. श्री पाल्येयशास्त्री आणि भा.वि. ऊर्फ मामा वरेरकर यांनी धार्मिक मंत्रोच्चार व पूजेचे कार्यक्रम करून काही दलितांना जानवी घातली, त्याकाळी मामा बरेरकर 'दुनिया' हे साप्ताहिक चालवीत. त्यांत या अशा मजकुरांना ते आग्रहाचे प्रसिध्दी देत. तसेच सत्यशोधक समाजाने चालविलेल्या चळवळीने विवाहविधी ब्राह्मणांकडून करून न घेता. आपल्याच चळवळीच्या कार्यकर्त्यांकडून करून घेण्याचे ठरविले. त्या धर्तीवर अस्पृश्य लोकांनी आपले लग्नविधी आपणच करावेत. अशा संघाने दलितांमध्ये जागृती केली.

**राष्ट्रीय जागृती निमार्ण करणे** :–

1928 च्या सार्वजनिक गणेशोत्सवात आपण प्रामुख्याने भाग घ्यावा व कार्यक्रमात तसेच कार्यकारी मंडळात अस्पृश्यांचे लोक असावेत आणि त्यासाठी 'समाज समता संघा' तर्फे चळवळ करावी. असे बाबासाहेबांनी ठरवले. यासाठी बाबासाहेबांनी बोलणी केली. परंतु मंडळाने अस्पृश्यांना भाग घेता येणार नाही असे कळवले, तेव्हा संघाने गणपती बसल्यानंतर मंडळापुढे निदर्शने केली. या दिनदर्शनात मोरे व संभाजी तुकाराम गायकवाड यांनी देखील महार समाज सेवा संघातर्फे भाग घेतला. त्यामुळे लोकांत जागृती झाली. अशी ही जागृती करण्याचे काम बाबासाहेबांनी आपल्या चळवळीद्वारे करून, आपली चळवळ ही केवळ दलितांची नाही तर सर्व हिंदुची व सर्व भारतीयांची आहे, ही राष्ट्रीय जागृती त्यांनी दलितात निर्माण करून जातीजातीत आलेल्या कुपमंडुकवृत्तीवर कोरडे ओढले.

**समाज समता संघाचा विस्तार** :–

समाज व समता संघा च्या कार्याचा मुंबईबाहेर सर्वत्र शाखा काढून विस्तार करण्याचे कार्य चालु होते. टिळक हे जरी स्वातंत्र्याच्या चळवळीने अग्रणी होते, तरी त्यांच्या घरात अस्पृश्यांना एका सीमेपर्यंतच प्रवेश दिला जात होता. हे हिंदू धर्मांचे व चातुर्वर्ण्याचे पुरस्कर्ते होते. महात्मा गांधी स्वतः जरी अस्पृश्यता

पाळत नव्हते, पण हिंदू धर्माच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे तेही पुरस्कर्तेच होते. आणि तसे ते स्पष्टपणे बोलून ही दाखवत. पण ब्रिटीशांनी आणलेल्या भांडवलशाहीने खुद टिळकांच्या घरातील अस्पृश्यतेला टिळक निधन पावल्यानंतर धक्का दिला. टिळकांची दोनही मुले रामचंद्र व श्रीधर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे खास दोस्त होते. हे बंधू मुंबईस आले तर डॉ. आंबेडकरांचा भेटल्याशिवाय पुण्यात परतत नसत. बाबासाहेब पुण्यात गेले तर त्यांना गायकवाड वाडयात आपल्या राहत्या, घरी घेऊन जाण्याचा ते प्रयत्न करीत. श्रीधर पंतांचा सामाजिक चळवळीकडे फार ओढा होता. समता समाज संघाची शाखा पुण्याला सुरू करावी व संघाचे कार्यालय आपल्या घरी, गायकवाड वाडयात सुरू करावे, असे त्यांनी बाबासाहेबांना वेळोवेळी बोलून दाखवले होते.

**महाड सत्याग्रह परिषदे**त **विदर्भाचा सहभाग** :–

डॉ.आंबेडकरांच्या जीवीत कार्यातील एक महत्वपूर्ण घटना म्हणजे संपुर्ण अस्पृश्य समाजाला एका झेंडयाखाली आणुन मानवी हक्कासाठी त्यांना बंड करावयास लावने ही होय.युद्धाला सुरूवात करण्यापुर्वी कुशल सेनापती आपल्या सैन्याची आणि रणनितीची जशी आगावू योजना आखतो त्याप्रमाणे महाडच्या चवदार तळयापासुन मानवी स्वातंत्र्याचे रणसिंग फुंकण्याचा निश्चय डॉ.आंबेडकरांनी केला.त्यासाठी कार्यक्रम आखला अस्पृश्यांच्या या धर्मसंग्रमात ''नागपूर शहरातुन किसन फागुजी बनसोड,कालिचरन नंदागवळी,विठोबा रावजी मुनपांडे,धर्माजी अमृत सोमकुवर,दामोदर मुरारी खापर्डे,रामचंद्र डोमाजी वासनिक,उमाजी गुनोबा खांडेकर,रघुनाथ शिवराम शंभरकर,संभाजी शिवाजी घोडघाटे ,विठोबा चिंदुजी फुलमाळी,गणपत सखाराम ढोक,विश्रमशिवराम सवाईथुल,डोमा जयराम पंचभाई,कारूजी कान्हाजी डोंगरे,लहानुजी हिराजी गजभिये,अंतुजी वाभाजी मडकवारे,मुकुंदा तुकाराम मुरारकर,जयराम पैकू गायकवाड,सुकाजी उरकुडा कोटांगळे,रेवाराम विठोबा कवाडे इत्यादी कार्यकर्ते आपल्या शेकडो सहका–यासह चवदार तळयाचे पाणी चाखण्याकरिता डॉ.आंबेडकरांचे बरोबर हजर होते.तर स्त्री कार्यकर्ता तुळसाबाईबनसोड,जाईबाई चौधरी,राधबाई कांबळे,रूक्मिीनीबाई नारायने यांचासुद्धा समावेश होता''[1]

**समता सैनिक दलाचे प्रथम राष्ट्रीय अधिवेशन** :–भारतातील इतर समाजाप्रमाणे अस्पृश्य समाजाला निसर्गाने बहाल केलेले मुलभुत मानवी हक्क मिळावेत व देशात समता प्रस्तापित होवुन अस्पृश्यांनाही राजकीय वाटा मिळावा या हेतुने मध्यप्रांत व–हाडातीन पुढारी व हरिदार बाबू आवळे यांनी डॉ. आंबेडकरांशी विचार विमर्श करूण संपुर्ण भारतातील अस्पृश्यांना संघटीत करण्यासाठी नागपूर येथे अखिल भारतीय बहिष्कृत परिषद दि. 17 ते 19 जुलै 1942 ला आयोजित केली.यावेळेस बाबू आवळे यांनी डॉ.आंबेडकरांचे विचार पसरविण्याचे कार्य खेडया–पाडयात,जिल्हा,तहसिलात सभा,संमेलने,शिबिरे घेवून पोहचविले.त्यामुळे, ''अखिल भारतीय समता सैनिक दलाचे प्रथम राष्ट्रीय अधिवेशन नागपूर येथिल मोहन पार्कवर उभारण्यात आलेल्या दलित वर्गिय परिषदेच्या मंडपात 20 जुलै 1942 ला पंजाबचे पूढारी गोपालसिंह (खासदार) यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आले होते.''[2] या परिषदेत डॉ.आंबेडकर व अन्य मान्यवर उपस्थित होते.डॉ.आंबेडकरांनी मध्यप्रांत व–हाडातील दलाची भरभरून स्तुती केली.या अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी समता सैनिक दलातील कार्यकर्त्यांनी इतर पूढारी व बाबू आवळे यांनी अविश्रांत मेहनत घेतली व हे अधिवेशन यशस्वी केले.

दीक्षाभूमीवर समता सैनिक दलाच्या दोन दिवसीय 92 व्या राष्ट्रीय अधिवेशनात निळी टोपी हेच क्रांतीचे निशाण आणि समता सैनिक दल म्हणजे आंबेडकरी क्रांतीचा जाहीरनामा असल्यास सूर आळवला गेला. क्रांतीचा नवा बाणा दाखविण्यासाठी दीक्षाभूमीच्या मैदानात कवायती करण्यात आल्या

तत्पूर्वी, संविधान चौक ते दीक्षाभूमी असा समता मार्चही काढण्यात आला. खुल्या चर्चासत्रात समता सैनिक दल सामाजिक आंदोलनात पुढे असेल, असा संकल्प भारतीय बौध्द महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर यांनी व्यक्त केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील समता सैनिक दल हे शौर्याचे प्रतीक आहे. शील हे चळवळीचे अधिष्ठाता आहे. निर्भिडपणे चळवळीसाठी बलिदान करण्यासाठी कार्यकर्ता सक्षम असावा लागतो .समता सैनिक दलाची एकसंघ चळवळ उभारतांना शील शौर्य आणि बलिदान या त्रिसूत्रींचे पालन कार्यकर्त्यांनी करावे, असे आवाहन आंबेडकरी विचारवंत डॉ. धनराज डहार यांनी या अधिवेशनातून केले.

महाड सत्याग्रहाची चळवळ ही दलितात आत्मजागृती व दलितेतरात समाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी केली. तर 'समता समाज संघ ' स्थापून दलितांच्या स्वतंत्र चळवळीची कक्षा भारतीय समाजात पसरविली व त्यासाठी सवर्णातील पुरोगामी विचारांच्या तरूणांना त्यात सामिल करून घेणे, त्यांच्यातील अंगभूत शक्तीना खऱ्या स्वातंत्र्याच्या शक्ती म्हणून उत्तेजीत करणे, ही डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांच्या विचारांची दिशा होती. दलितांना समानता हवी ही मागणी मिळवावयाची असेल तर ज्यांच्याबरोबर त्यांनी समानता हवी आहे ते ही मागासलेले आहेत म्हणून अस्पृश्यतेविरूध्दची लढाई ही एकट्या अस्पृश्यांनी स्वतंत्रपणे करून चालणार नाही, तर स्पृश्यातील मागासलेपण घालवण्यासाठी त्यांचे ही सामाजिक प्रबोधन केले पाहिजे. ही भूमिका त्यांनी मनाशी पक्की केली यासाठी श्रमिक म्हणून शेतकरी व शेतमजूरांना संघटीत करून त्यांचे प्रश्न हाताळायचे व सोबत अस्पृश्यता जिचा उगम संरजामशाहीच्या काळात झाला आहे व नवी भांडवलशाही समाजव्यवस्था आणणारे ब्रिटीश जुन्या व नव्या अर्थसंबंधांना टिकवून धरून आहेत. त्या ब्रिटीशांविरूध्द् म्हणजेच साम्राज्यशाहीविरोधी लढाईत झोकून देण्याचा त्यांनी निर्णय घेतला. थोडक्यात एकाच वेळी साम्राज्यशाही विरोधी कामगार... शेतकरी क्रांतीचे ध्येय त्यांनी आंगीकारले अस्पृश्यांच्या सामाजिक मुक्तीची चळवळ व कामगार शेतकऱ्यांची वर्गीय चळवळ या हातात हात घालून चालल्या पाहिजेत हीच अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात बाबासाहेबांची भूमिका होती.

बाबासाहेब ही व्यक्ती नव्हती तर ती एक समष्टी होती . त्यांना आपल्या सर्व कमजोऱ्यांसह जगणाऱ्या दलित जनतेला घेऊन परिवर्तन करायचे होते. तेही करीत असतांना त्या दलित जनतेला भूगोल आणि इतिहास हा पारखून त्यांत , ती फिट्ट बसली पाहिजे, याचा विचार करायचा होता. तसेच ती पुन्हा आगीतून फुफाटयात पडू नये म्हणून ईश्वर कल्पनेच्याही फाशात ती अडकू नये. याचा विचार करूनच त्यांनी मुस्लिम, ख्रिश्चन धर्म किंवा शिख पंथ नकारले व शेवटी गौतम बुध्दाने सांगितलेल्या बौध्द धर्माचाच अंगिकार करण्याचा निर्णय घेतला. यातही त्यांनी बुध्दाने सांगितलेल्या मूळ धर्म ज्यात नंतर त्यामध्ये घुसडलेल्या महायान वा हिनयान पंथाची शिकवण नाही, याची त्यांनी काळजी घेतली. अशा रितीने दलित जनतेला अंधश्रध्देतून मुक्त करून स्वतंत्र बुध्दीने जगण्याची ताकद देण्यायाच त्यांचा प्रयत्न होता.

<u>**संदर्भ**</u> :–

1)डोंगरे कृष्णकांत,''डॉ.आंबेडकरांच्या चळवळीत नागपूर शहराचे योगदान''बहुजन साहित्य प्रसार केंद्र नागपूर प्र.आ.2012,पृष्ठ क्रं.149

2)पाटील चंद्रषेखर,''आंबेडकरी चळवळीचे संनानी ॲड.बाबू आवळे,'' बहुजन साहित्य प्रसार केंद्र नागपूर प्र.आ. 2016,पृष्ठ क्रं.31

सहायक संदर्भसूची

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड – 1, संपादक : मा.फ. गांजरे
2. दलित व कम्युनिस्ट चळवळीचा सशक्त दुवा – कॉम्रेड आर.बी. मोरे
3. राज्य आणि अल्पसंख्यांक – डॉ. भिमराव रामजी आंबेडकर
4. 6 डिसेंबर 1956 – राजा जाधव
5. विद्यार्थ्यांनो जागृत व्हा ! – डॉ. बी. आर. आंबेडकर
6. जाती प्रथेचे निर्मुलन – डॉ. बाबासाहेब आंबेडकर
7. भाषावार प्रांतरचनेवर विचार – डॉ. बाबासाहेब आंबेडकर
8. क्रांती आणि प्रतिक्रांती – डॉ. बाबासाहेब आंबेडकर
9. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – ज्ञानेश्वर भिवगडे
10. भारतीय आदर्श व्यक्तीमत्वे – वृषाली फडके
11. आंबेडकरी विचार – मोतीराम कटारे
12. अखिल भारतीय दलित हक्क संमेलनाचा ठराव – भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)
13. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल – रत्नाकर गणवीर

# पुणे कराराच्या अंमलबजावणीमध्ये डॉ. आंबेडकरांच्या 'स्वतंत्र मजूर पक्षाची' भुमिका.

डॉ. वंदना ह. तागडे
नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज, कारंजा (घा.)

**सारांश** : ब्रिटीश भारतात व्यापारी म्हणून आले आणि भारताचे राज्यकर्ते बनले. सुरुवातीला भारताचा व्यापार ईस्ट इंडीया कंपनीमार्फत चालायचा. पण 1958 साली ब्रिटनच्या राणीने ब्रिटीश भारताचा राज्यकारभार ब्रिटीश सरकारकडे दिला. इंडियन कॉन्सील ॲक्ट 1861, इंडीयन कौन्सिल ॲक्ट 1892, मोर्ले मिंटो सुधारणा कायदे 1909 व 1919 चा कायदा पास करुन भारतीयांना राज्यकारभारात भाग घेण्याची संधी प्राप्त झाली. पुढे यावर आधारित 1935 चा कायदा ब्रिटीश पार्लमेंटने पारित केला. त्यानुसार 1937 साली मद्रास, मुंबई, बंगाल, संयुक्त प्रांत, पंजाब, बिहार, मध्यप्रांत व वऱ्हाड, आसाम, सरहद्द प्रांत, ओरिसा व सिंध या ठिकाणी निवडणुका घेण्याचे ठरले. या निवडणूकीत 15 जागा अस्पृश्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्या होत्या.[1]

अशाप्रकारे 1935 च्या कायदयाने दलितांना मतदानाचा हक्क देवून त्यांच्या अस्तित्वाची दखल ब्रिटीशांनी घेतली. राखीव जागेसाठी एकच अस्पृश्य उमेदवार उभा असेल तर तो बिनविरोध निवडून येत असे. पण एका राखीव जागेसाठी चारहून अधिक उमेदवार उभे असल्यास प्राथमिक निवडणूक होवून यामध्ये मतदान करण्याचा अधिकार फक्त अस्पृश्य मतदारांनाच होता. जास्तीत जास्त चार उमेदवार निवडता येईल व या चारमधून एकाची निवड करण्यासाठी अस्पृश्याबरोबर स्पृश्य देखील मत देवू शकत असे.1935 च्या कायदयाप्रमाणे निवडणूका घेण्याचे ठरले तेव्हा इतर पक्षाप्रमाणे 1937 च्या निवडणूकीत डॉ. आंबेडकरांच्या गोटातही विचारविनिमय सुरु झाला. 1926 पासून डॉ. आंबेडकर मुंबई विधानपरिषदेत सरकार नियुक्त सभासद असल्यामुळे त्यांना कामकाजाचा अनुभव होता. निवडणूकीच्या निमित्याने भारतीय कामकरी व शेतकरी वर्गावरील धार्मिक व सामाजिक विषमतेचा पगडा दूर करुन संघटना बांधण्याचे डॉ. आंबेडकरानी ठरविले.[2] वर्णजाणीव झाल्यावर सर्व भेद नष्ट होईल याला आंबेडकरांचा विरोध होता. अस्पृश्यतेचे निर्मूलन झाल्याशिवाय शेतकरी, कामकरी वर्गाच्या आर्थिक लढयाचा संघटित तोंड लागणार नाही असे आंबेडकरांचे म्हणणे होते.[3] अस्पृश्यांच्या लढयाला राष्ट्रीय स्वरुप यावे तसेच कामगार, शेतकरी यांच्या लढयांशी अस्पृश्यांचा लढा एकत्रित जोडण्याचे डॉ. आंबेडकरांनी ठरविले. यासाठी डॉ. आंबेडकरांनी दिनांक 15 ऑगष्ट 1936 रोजी 'स्वतंत्र मजूर पक्षाची' स्थापना केली.[4] हा पक्ष स्थापन करतांना पक्षाची घटना व ध्येय ठरवितांना इंग्लंडच्या लेबर पार्टीला त्यांनी नजरेसमोर ठेवले होते.[5] कारण राऊंड टेबल कॉन्फरन्सकरीता ते लंडनला गेले असतांना तेथील ब्रिटीश मजूर पक्षाचे पुढारी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी त्यांचा परिचय व चर्चा झाली होती. कामगार पक्षाचा जनक जेम्स कीर हार्डी यांच्या कार्याचा प्रभाव डॉ. आंबेडकरांवर पडला होता. स्वतंत्र मजूर पक्षाचे 'जनता' हे साप्ताहिक मुखपत्र होते.[6] सुरुवातीला त्यांचा उद्देश अस्पृश्य वर्गासाठीच 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन करण्याचा होता. पण अस्पृश्यतेत्तर वर्गातील स्नेहयांची त्यांना अनुमती असल्यामुळे त्यांचे सहकार्य मिळेल; तसेच ज्या मतदार संघात अस्पृश्यांना राखीव जागा नाही पण त्यांची संख्या जास्त आहे. या मतांचा उपयोग नवीन पक्षातर्फे उभे राहण्याऱ्या कोणत्याही वर्गाच्या उमेदवाराला होईल' यामुळे त्यांनी अस्पृश्यतेत्तरांना संधी दिली. आंबेडकरांनी यावेळी दादासाहेब गायकवाड, जी.व्ही. प्रधान, अनंतराव चितळे, रुद्रेकर, आर.आर. भोळे, दौलतराव जाधव यांच्याशी चर्चा घडवून आणली.[7] स्पृश्यास्पृश्यता नष्ट करुन निवडणूकीत सत्ता प्राप्तीसाठी डॉ. आंबेडकरांचा हा प्रयत्न होता.

**शब्द संकेत :पूणे करार,स्वतंत्र मजुर पक्ष,विदर्भातील लोकांचा सहभाग**

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलेब करण्यात आलेला आहे.**जनता' मध्ये त्यांनी 1935 च्या अधिनियमाविषयी पार्टीची भुमिका, आर्थिक नितीसंबंधी कार्यक्रम, सामाजिक ग्राम संघटन, शिक्षण, शासनसंबंधी विचार मांडले. जीवनाच्या स्वातंत्र्याविरुध्द कार्यरत असणाऱ्या अन्यायी अर्थव्यवस्था बदलायला पाहिजे.[8] अर्थात अस्पृश्यांबरोबर संपूर्ण देशाचा विचार डॉ. आंबेडकरांनी केला.स्वतंत्र मजूर पक्षातर्फे मुंबई प्रांतात उभे केलेल्या उमेदवारांना बहुजन समाजाकडून जोराचा पाठींबा मिळत असल्याने या पक्षाला यश मिळेल असे त्यांना वाटत होते. बहुजनांकडून पक्षाच्या भावी कार्यक्रमाविषयी विचारणा करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.1935 च्या कायदयानुसार मुंबई विधानमंडळ द्वीसभागृही बनले होते. मुंबई विधानपरिषदेतील सभासदांची संख्या 30 तर विधानसभेत 155 सदस्य असतील अशी तरतूद होती. 175 पैकी 115 जागा सर्वसाधारण होत्या. 60 जागा मुसलमान, अँग्लो इंडियन, युरोपीयन, भारतीय, ख्रिश्चन स्त्रिया, जमीनदार, व्यापारी, उद्योगपती, मजूर यांच्यासाठी होत्या. 115 साधारण जागांपैकी 15 राखीव जागा अस्पृश्यांच्या वाटयाला होत्या. केवळ 15 जागा जिंकल्याने कुठलाही फायदा होणार नाही तर उरलेल्या सवर्ण हिंदू उमेदवार निवडून आणून विधानपरिषदेतील बळ वाढविण्याकरीता त्यांनी इतर उमेदवारांना पाठींबा दिला. स्वतंत्र मजूर पक्षाच्या मध्यवर्ती मंडळात 1) डॉ. भिमराव आंबेडकर, सितारामजी केनी, रेवजीबूवा डोळस, भास्करराव रुद्रेकार, म.व्ही. दोंदे, डी.व्ही. प्रधान, सुरवा चिटणीस, बाबुजी, जी.एम. जाधव, देवराव नाईक, जे.एस. ऐदाळे यासारखी मंडळी होती.या पक्षाचा ध्वज लाल रंगाचा होता. मधोमध स्वतंत्र मजूर पक्ष असे लिहिले होते. **11** तारे ब्रिटीश भारतातील 11 प्रांताचे द्योतक होते.[9] या देशातील एकुणच शोषित पिडित लोकानी आपले परावलंबित्व सोडून स्वतःच राजकारणात पुढे यावे व आपल्या कल्याणाचा मार्ग प्रशस्त करावा असे स्पष्ट केले. हा पक्ष कष्टकरी जनतेच्या कल्याणासाठी असल्यामुळे '' दलित' या शब्दाऐवजी 'मजूर' हा शब्द स्विकारला.[10]

1935 च्या नवीन घटनेत भरपूर दोष असून जबाबदार शासन पध्दतीच्या दृष्टीने त्यात उणीव असल्याचे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले. वरिष्ठ सभागृहाला त्याचा प्रखर विरोध होता. राज्यपालाला जास्त राखीव अधिकार जबाबदार राज्य पध्दतीला धोकादायक असल्याने आपला पक्ष विरोध करेल असे स्पष्ट करुन त्यांनी या पक्षाच्या माध्यमातून आर्थिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.शेतकरी, कामगार लोकांच्या समस्या सोडवून त्या सोडविण्याचा प्रयत्न बाबासाहेब करीत असे. अशीच परिषद 01/01/1938 ला रत्नागिरी जिल्हातील दापोली येथे भरली. या परिषदेला संबोधतांना डॉ. आंबेडकर म्हणाले की, शेतकऱ्यांनी संघटना करुन आपली शक्ती मजबूत करायला पाहिजे कारण हया पाठिंब्यावरच स्वतंत्र मजूर पक्षाची शक्ती वाढेल त्यामुळे तुमच्या हिताचे अनेक कायदे करता येईल. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी त्यांनी खोती पध्दती नष्ट करणारे बील कायदे मंडळात मांडले.[11] पक्षाच्या कार्यक्रमपत्रिकेतील मुद्दे प्रत्यक्ष कृतीत आणण्याचा त्यांनी ध्यास धरला होता.शेतीच्या उत्पादनात वाढ व सुधारणा लॅन्डमार्गेज, बॅंका, शेतकरी उत्पादक सहकारी संघ, व्यापारी सोसायटीची स्थापना, या माध्यमातून आर्थिक प्रश्न सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. नैसर्गिक संपत्तीला अनुसरुन पक्षानेनवे उद्योगधंदे काढण्यासाठी तांत्रिक शिक्षणाचा व्यापक कार्यक्रम हाती घेतला. औद्योगिक धंदयावर राज्याची मालकी हे पक्षाला मान्य होते. खोतीपध्दती, मालगुजारी नष्ट करण्यासाठी विशेष प्रयत्न केल्या गेले. कामगारांना नोकरीची हमी, कामाचे कमी, तास योग्य पगार, पगारी रजा, बोनस, पेन्शन यासंबंधीचे कायदे करण्याचा या पक्षाने प्रयत्न केला. सोशल इन्शुअरन्स नामक योजना, लॅंडसेटलमेंट योजना, सुरु करुन तत्कालीन कर आकारणी पध्दतीला स्वतंत्र मजूर पक्षाने विरोध केला. पक्षासंबंधी बोलतांना डॉ. आंबेडकर म्हणतात जे जे शक्य आह ते ते करण्यासाठी आमचा पक्ष प्रयत्न करील. ग्राम विकासासाठी गावातील लोकांना शिक्षण जरुरीचे आहे.[12] तेव्हा डॉ. आंबेडकरांना शिक्षणासंबंधीचा दृष्टीकोन विषद करतांना म्हटले 'आमचा पक्ष मोफत व सक्तीचे शिक्षण अंमलात आणेल. साक्षरतेचा प्रसार करेल, तांत्रिक शिक्षणावर भर देईल, प्रादेशिक शिक्षणासाठी विद्यापीठे स्थापिली जाईल.[13]

एकंदरीत स्वतंत्र मजूर पक्षाचा कार्यक्रम विशाल व व्याप तसेच देशहित व समाजहीत साधणारा होता. ते म्हणतात राजकीय सुधारणा अपूऱ्या असल्या तरी त्यामुळे स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा होईल पूर्ण स्वातंत्र मिळवायचे असेल तर इंग्रज सरकारबरोबर सैन्य व सामुग्री जमवून बंड पुकारायला पाहिजे. असहकाराचा मार्ग अपूरा आहे.[14]

त्यांच्यामते कोणतीही गोष्ट घडून येण्यासाठी कायदा हवा, सामाजिक सुधारणा कायदे करुन होणार नाही. पण आर्थिक, शैक्षणिक प्रगती कायदयाने होणार म्हणून उन्नतीचे कायदे घडवून आणण्यासाठी समाजहिताला जागणारे प्रतिनिधी विधानमंडळात पाठवायला पहिजे.[15]

स्वतंत्र मजूर पक्षाच्या तिकीटांवर निवडणूक लढवू इच्छिणाच्या संबंधी डॉ. आंबेडकर म्हणतात, उमेदवाराला इंग्रजी भाषा अवगत असायला पाहिजे. उमेदवार तरुण असावा, पक्षाशी एकनिष्ठ असावा. उमेदवारचा स्वतः श्रीमंत बनण्याचा उद्देश नसावा, उमेदवाराने सामाजिक कार्य केलेले असावे या अटी मान्य करणाऱ्यालाच पक्षाचे तिकीट देण्याचे डॉ. आंबेडकरांनी ठरविले होते.[16] त्यामुळे स्वतंत्र मजूर पक्ष विशिष्ट वर्गीयांचाच आहे हा आरोप त्यांनी खोटा ठरवून कृष्णाजी महादेव काळोखे सारख्या मातंग उमेवाराला या पक्षाने उमेदवारी दिली.स्वतः आंबेडकरांनी मुंबईच्या 'ई' व 'एम' वार्डातून माणूस चिन्ह घेवून निवडणूक लढविली. त्यांच्या विरोधात श्री.बी.बी. पालवणकर आणि बाळकृष्ण जानूजी देवरुखकर उभे होते. सुरत मतदार संधातून डॉ. पुरुषोत्तम सोळंकी, कुलाबा मधून सुभेदार विश्राम सवादकर (झाड चिन्ह) भाऊराव गायकवाड नाशिक मतदार संघातून (घोडा) अशाप्रकारे वेगवेगळया मतदारसंघात वेगवेगळे उमेदवार डॉ. आंबेडकरांनी उभे केले होते.[17]

विधानसभेच्या सर्वसाधारण जागांकरीता स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने अनंतराव चित्रे (रत्नागिरी उत्तर), ॲड विनायक गडकरी (पुणे पूर्व), सुरेन्द्रनाथ टिपणीस (कुलाबा), भालचंद्र प्रधान (खानदेश पूर्व) बरवले (सोलापूर) यासारखे उमेदवार निवडणूक लढवित होते.[18] पहिली निवडणूक म्हणजे प्राथमिक निवडणूक ही 1 डिसेंबर 1936 रोजी घेण्यात आली. त्यानंतर स्वतंत्र मजूर पक्षाचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनी 14 जानेवारी 1937 ला एका पत्रकाद्वारे मध्यप्रांत वऱ्हाड प्रांतातील स्वतंत्र मजरू पक्षाच्या उमेदवाराची नावे राखीव व सर्वसाधारण जागेसाठी जाहीर केली होती. संभूजी खंडारे (अकोला बाळापूर खेडे विभाग), यादवराव चिखलीकर (चिखली मेहकर) संपतराव नाईक (एलीचपूर दर्यापूर मेळघाट), डी.के. भगत (यवतमाळ दारव्हा खेडे विभाग) देवाजी खोब्रागडे (चांदा ब्रम्हपूरी), केशव नारायण देव (हिंगणघाट वर्धा), राघव घोडीचोर (भंडारा साकोली), पंजाबराव देशमुख (अमरावती) यासारखे उमेदवार उभे केले होते.[19]

**विदर्भातील लोकांचा सहभाग** : स्वतंत्र मजुर पक्षातर्फे राखिव व सर्वसाधारण जागेकरिता दिनांक 14 जानेवारी 1937 ला एका पत्रकाद्वारे 15 नावाची यादी जाहिर करण्यात आली.व त्या जागा लढविण्यात आल्या त्यापैकी 5 उमेदवार निवडुन आले तसेच स्वतंत्र असे 2 उमेदवार निवडुन आले त्यांची नावे खालिलप्रमाणे 1)एल.एन.हरदास (नागपूर– कामठी) 2)राघोबाजी घोडिचोर (भंडारा– साकोली) 3)देवाजी भिकाजी खोब्रागडे (चांदा–ब्रहमपूरी) 4) डी.के.भगत (यवतमाळ–दारव्हा) 5) सीताराम पाटील (नागपूर–उमरेड) व स्वतंत्र उमेदवार म्हणुन 1)दशरथ लक्ष्मण पाटील (हिंगनघाट –वर्धा) 2)गणपतराव जांभुळकर (छिंदवाडा–सौसर) यांनी समोर जाऊन स्वतंत्र मजुर पक्षात प्रवेश केला. अश्याप्रकारे मध्यप्रांत विधानसभेत अस्पृश्य समाजाचे 7 सभासद कार्यरत झाले.नागपूर –कामठी मतदार संघातील स्वतंत्र मजुर पक्षाचे अधिकृत उमेदवार एल.एन.हरदास यांच्या विरूद्ध तुलाराम साखरे स्वतंत्र उमेदवार म्हणुन उभे राहले व पराभुत झाले व नंतर ते स्वतंत्र मजुर पक्ष सोडुन कॉग्रेसमध्ये गेले.नागपूर शहरातील ''इमामवाडा महिला सुधारक मंडळ'' या संस्थेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्म

दिवसी 14 एप्रिल 1937 ला निवडुन आलेल्या लोकांचा सत्कार करण्यात आला. फेब्रुवारी 1937 रोजी मतदान झाले. सुरेन्द्र टिपणीस, विश्राम संवादकर, काळोखे इ. चा पराभव झाला पण इतरत्र स्वतंत्र मजूर पक्षाला घवघवीत यश आले.[20] काँग्रेससारख्या सामर्थ्यवान पक्षाशी टक्कर देवून विजय संपादन केला होता. या निवडणूकीत अस्पृश्य उमेदवारांना त्यांच्या जातीची 82ः मते मिळाली होती.या निवडणूकीत काँग्रेसने श्रीमंत वर्गाचे प्रतिनिधी उभे केले होते तर डॉ. आंबेडकरांनी मध्यमवर्ग, शेतकरी, नोकरदार अशा सर्व स्तरातील मजुरांना केन्द्रबिंदू मानले होते. प्रांतिक सरकारच्या कायदेमंडळात मजूर पक्षाने अस्पृश्यांसाठी राखीव ठेवलेल्या 15 जागांवर 13 उमेदवार निवडून आले आणि सर्वसाधारण जागेवर वरील जातीतील 2 उमेदवार निवडून आले. हे स्वतंत्र मजूर पक्षाच्या युतीचे यश म्हणता येईल.

**मुल्यांकन** : डॉ. आंबेडकरांनी समाजोध्दाराचा विचार सदैव केला. हे करतांना चूकीचे निर्णय घेणाऱ्या कॉग्रेस पक्षाची कानउघडणी करण्यास त्यांनी मागेपुढे पहाले नाही. स्वतंत्र मजूर पक्ष व मजूर पक्षाच्या पाठिंब्यावर मुंबई प्रांतात निवडून आलेल्या आमदारांनी समाज आणि राष्ट्रहिताच्या दृष्टिने महत्वपूर्ण मतप्रदर्शन केले. खोती वतन नष्ट करण्यासाठी मनी लेंडर्स बील, रुममेट बील सभागृहात मांडली. शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी अनेक महत्वाच्या सूचना केल्या. खरे मंत्रिमंडळाचे धोरण कसे कारखानदार धार्जिणे आहे. कॉग्रेस सावकार,जमीनदार यांच्या शोषणास कसे आळा घालू शकत नाही हे उघडकीस आणण्याचे प्रयत्न डॉ.आंबेडकरांनी केले. ज्यावेळी शेतकऱ्याचे कर्ज निवारण, कुळ कायदा, जमीन महसूल तंबाखूवरील कर, कर्ज तहकुबी यासारखी बीले कायदेमंडळात चर्चेला येईल तेव्हा स्वतंत्र मजूर पक्षाने क्रांतीकारी विचार मांडले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे राज्यकर्ता पक्षाचे लक्ष वळविण्यासाठी शेतकऱ्यांचे मोर्चे त्यांनी काढले. अशाप्रकारे डॉ. आंबेडकरांनी 1937 ते 1942 या काळात शेतकरी चळवळीला दिशा देण्याचे कार्य केले. याप्रसंगी इंग्रज राज्यकर्त्यांच्या धोरणाचे वाभाडे काढण्यासही बाबासाहेब कचरले नाही.अशाप्रकारे समाज व राष्ट्रहित लक्षात घेवून स्वतंत्र मजूर पक्षाने डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली कार्य केले. दलितांचा आर्थिक, राजकीय, सामाजिक विकास व्हावा याचा त्यांनी कायदयाच्या अंगांनी विचार केला. केवळ विचार करुनच थांबले नाही तर विचारांना कृतीची जोड दिली आणि शोषित पिडीत वर्गाला न्याय मिळवून दिला.

**– संदर्भ –**


1. नरवडे, शेषराव – 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्वतंत्र मजूर पक्ष', निर्मल प्रकाशन, नांदेड, 26 जानेवारी 2012, पृष्ठ क्र. 21.
2. माने, भगवान – 'आंबेडकरी राजकीय चळवळीचे भवितव्य आणि दलितांचे राजकारण' सुगावा प्रकाशन,पुणे, 6 डिसेंबर 2013, पृष्ठ क्र. 40
3. पवार, ज.वि. – 'विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर' मेत्ता प्रकाशन, मुंबई, 26 जून 2013, पृष्ठ क्र. 84
4. संपादक काळे, खंडेरावजी – 'डॉ. आंबेडकरांचे विविध दृष्टिकोन', लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, 25 जुन 2012, पृष्ठ क्र. 232.
5. पवार, ज.वि. – 'विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर' मेत्ता प्रकाशन, मुंबई, 26 जून 2013, पृष्ठ क्र. 84
6. फडके, य.दि. – 'आंबेडकरी चळवळ' श्रीविद्या प्रकाशन, तृतीय आवृत्ती, 26 जानेवारी 2007, पृष्ठ क्र. 84
7. संपा कांबळे, बबन – 'वृत्तरत्न सम्राट', 2 ऑक्टोंबर 2008
8. आंबेडकर, बाबासाहेब – 'भारतीय श्रमिक आंदोलन दशा – दिशा और दलित परिप्रेक्ष्य', अनुवाद, रामगोपाल आझाद, समता प्रकाशन, नागपूर, 1 जानेवारी 2006, पृष्ठ क्र. 9.
9. नरवडे, शेषराव – 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्वतंत्र मजूर पक्ष', निर्मल प्रकाशन, नांदेड, 26 जानेवारी 2012, पृष्ठ क्र. 30.
10. कुबेर, डब्ल्यू एन – 'आधुनिक भारत के निर्माता भीमराव आंबेडकर', प्रकाशन विभाग सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, पंचम संस्करण, 2013, पृष्ठ क्र. 43
11. संपा. प्रदिप गायकवाड – 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे, खंड 2, पृष्ठ क्र. 127
12. नरवडे, शेषराव – 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्वतंत्र मजूर पक्ष', निर्मल प्रकाशन, नांदेड, 26 जानेवारी 2012, पृष्ठ क्र. 34.
13. खरात, शंकरराव – 'डॉ. आंबेडकरांची पत्रे, क्षीतीज प्रकाशन, नागपूर 6 डिसेंबर 2001, पृष्ठ क्र. 184
14. नरवडे, शेषराव – 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्वतंत्र मजर पक्ष', पृष्ठ क्र. 37.
15. तत्रैव – पृष्ठ क्र. 37
16. संपा. बबन कांबळे – 'वृततरत्न सम्राट', 2 ऑक्टोंबर, 2007
17. नरवडे, शेषराव – 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्वतंत्र मजूर पक्ष', पृष्ठ क्र. 39
18. तत्रैव – पृष्ठ क्र. 40
19. कोसारे, एल.एच. – 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास', ज्ञानदीप प्रकाशन, नागपूर, 1984, पृष्ठ क्र. 319.

20- नरवडे, शेषराव – 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्वतंत्र मजूर पक्ष', पृष्ठ क्र. 43

## बुलडाणा जिल्हयातील महार चळवळीमागील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा

**डॉ. किशोर मारोती वानखडे**
**एम.एस.ई.बी. कॉलनी शेगाव रोड खामगांव,**

**सारांश :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाज सुधारकांमध्ये असलेले स्थान अग्रणी आहे. एक राजनितिज्ञ, इतिहासकार, तत्ववेत्ता, समाजसुधारक, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजात मानवतावाद निर्माण करण्यासाठी केलेले कार्य संपूर्ण भारतीय इतिहासात अग्रस्थानी आहे. भारतातील चार्तुवर्ण्य व्यवस्था झुगारून देण्याचे कार्य गौतम बुध्द, संत कबीर, महात्मा फुले यांनी केले. त्यांच्याच विचारांचा, कार्याचा प्रभाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेवर पडला. त्यातूनच भारतीय समाजाच्या उत्थापनासाठी आणि सामाजिक समतेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले कार्य इतिहासाच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचे आहे. डॉ बाबासाहेबांचे समाज विषयक विचार सखोल, गंभीर, वस्तुनिष्ठ व समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पनांवर आधारित होते. त्यांच्या विचारसरणीत इहवाद आणि बुध्दीप्रामाण्यवाद या बाबी प्रकर्षाचे आढळतात. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधूता हे त्यांच्या सामाजिक विचारातील वैचारिकतेचा मूळ गाभा आहे. आदर्श मानवी समाज निर्माण करण्यावरच भारतातील समाजसुधारकांनी भर दिला. आदर्श सामाजिक, मानवामधील सर्जनशील जीवन निर्माण करणारे आदर्श असे समाजरचनेचे प्रारूपाचे तत्वज्ञान डॉ. बाबासाहेबांनी आपल्या विचारातून, लेखनीतून, समाजप्रबोधनातून मांडले.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये चार्तुवर्ण्य व्यवस्थेतील अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या महार जातीला वैचारीक आणि सामाजिक पातळीवर आणण्यासाठी केलेले प्रयत्न तसेच महार जनआंदोलने यावर प्रकाश टाकण्यात झालेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेमुळे बुलडाणा जिल्हयातही सामाजिक चळवळींना प्रेरणा मिळून या जिल्हयात झालेल्या महार जनआंदोलनांविषयी माहिती विशद करण्यात आलेली आहे.

**शब्दकुंजी :- सामाजिक विचार, महार परिषदांचे आयोजन, व त्यांचा परिणाम.**

**शोधनिबंधाचा उद्देश :-**

१.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचारांचे अध्ययन करणे.

२.बुलडाणा जिल्हयातील महार जनआंदोलनाचे अध्ययन करणे.

३.बुलडाणा जिल्हयातील समाज जिवनात झालेले बदलाचा आणि वैचारिक क्रांतीचे अध्ययन करणे.

४.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बुलडाणा जिल्हयातील महार चळवळीमागील प्रेरणेचे अध्ययन करणे.

**संशोधन पध्दती :-**“बुलडाणा जिल्हयातील महार चळवळीमागील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा” या शोधनिबंधामध्ये ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चार्तुवर्ण्य व्यवस्थेविरूध्द सुरू असलेल्या लढयाचे नेतृत्व करण्याचे कार्य केले. सामाजिक चळवळीला प्रोत्साहन देण्यासाठी समाजात समानता निर्माण करण्यासाठी आणि न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधूता या तत्वप्रणालीवर आधारित भारतीय समाज निर्माण करण्यासाठी भारतात सुरू असलेल्या धार्मिक, जातीय विषमतेच्या लढयाला वैचारिक आणि न्यायिक बाबींकडे देण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले. जातीपातीमध्ये विभागलेला भारतीय समाज आणि चार्तुवर्ण्य व्यवस्थेमुळे भारतीय समाजात उपेक्षीतांची, वंचितांची होत असलेली सामाजिक, शैक्षणिक कुचंबणा दुर करण्यासाठी सामाजिक संघटनाची अत्यंत आवश्यकता आहे हे बाबासाहेब जाणून होते. त्यामुळे वंचित समाजाला मानवता वादाच्या प्रवाहात आणण्यासाठी, त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक विकासासाठी एकसंघ असणे आवश्यक आहे या विचारांमुळेच त्यांनी महाराष्ट्रात विविध वैचारिक आणि सामाजिक पातळीवर चळवळींचे नेतृत्व केले. वंचित, उपेक्षीत, अस्पृश्य दलित समाजाला सामाजिक विषमतेतून, चार्तुवर्ण्य व्यवस्थेच्या जोखाडातून बाहेर काढण्यासाठी, जातीपातीचे बंधने तोडण्यासाठी वैचारिक प्रबोधन करण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले. वर्ण व्यवस्थेला स्वार्थीपणे प्रमाणभूत माणणारे सामाजिक विचार हे समाजविरोधी, मानवताविरोधी आहेत हे बाबासाहेब जाणून होते. त्यामुळेच वंचित, दलित समाजात जनजागृती करण्यासाठी आणि समाज एकसंघ करण्यासाठी, समाजमनात समानता निर्माण करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी विविध चळवळीतून महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात जनचळवळी सुरू केल्या. त्यातूनच जाती व्यवस्थेचे, सनातनी विचारांचे आणि चार्तुवर्ण्य व्यवस्थेचे जोखड, धार्मिक गुलामीचे बंधने तोडून समाजात वैचारिक, सामाजिक प्रबोधनाची चळवळ सुरू झाली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पुण्यातील महार चळवळ :-**

दलित समाजाला सामाजिक चळवळीत आणून समानतेच्या तत्वाची जाणीव करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली महार समाजाची पुणे येथे २० जुलै १९२७ रोजी परिषद झाली.[१] सामाजिक कार्यासाठी विशेषत: दलित मागसवर्गीयांच्या कल्याणासाठी झटत असलेले बाबासाहेबांनी या सभेत मानवता, आणि जातीयतेच्या विरोधाला न जुमानता महार जातीमध्ये सामाजिक, वैचारिक प्रेरणा निर्माण करण्याचे कार्य केले. पुणे येथे झालेल्या मातंग, महार परिषदेचे अध्यक्ष दिनबंधूचे संपादक डॉ. नवल हे होते. या परिषदेमध्ये डॉ. साळुंखे, सुभेदार घाडगे, मि. राजाभोज, के.एम. जाधव, श्री. गायकवाड, घाडगे, वायंदंडे, बुलडाण्यातील आनंदस्वामी, पंढरीनाथ पाटील, धुंडीराज ठेंगडी, शंकरराव पोतनीस यांसारखे व्यक्ती उपस्थित होते.[२] या परिषदेमुळे महाराष्ट्रात महार जातीच्या उत्थापनासाठी नवप्रेरणा निर्माण झाली. त्याचाच परिणाम म्हणजे संपूर्ण राज्यात ब्राम्हणेतर परिषदांच्या आयोजना बरोबरच महार परिषदांचे आयोजन करण्यात आले. चातुवर्ण्य व्यवस्थेला झुगारून देऊन सामाजिक न्यायाने प्रस्थापित होणाऱ्या समाजाला नव दिशा निर्माण करण्याचा आशावाद या चळवळीमुळे निर्माण झाला. याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेबांनाच जाते.डॉ. बाबासाहेब यांच्या कार्याचा परिणाम पंढरीनाथ पाटील यांच्यावरही पडला. विदर्भातही सामाजिक चळवळीतून सामाजिक एकात्मता आणि समानता निर्माण करण्याची प्रेरणा पंढरीनाथ पाटील यांनी घेतली. बुलढाणा जिल्हयातील असल्याने त्यांनी सत्यशोधक विचारसरणीच्या प्रसाराबरोबरच महार, धनगर, मातंग ब्राम्हणेतर चळवळीच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला न्याय, स्वातंत्र्य, समानता, समता, बंधूता या तत्वप्रणालीवर आधारित असलेला समाज निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले. डॉ. बाबासाहेबांचे बुलडाणा जिल्हयातील सहकारी असल्याने त्यांच्या प्रेरणेमुळेच बुलडाणा जिल्हयात विविध ठिकाणी महार परिषदांचे आयोजन करून महार बांधवांना सामाजिक न्यायाची, वैचारिक आणि न्यायिक समानतेची शिकवण व हक्कांची जाणीव निर्माण करण्याचे कार्य पंढरीनाथ पाटील यांनी केले.

***बुल्ढाणा जिल्हयातील महार परिषदा :-***डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याची प्रेरणा घेऊन बुलडाण्यातील असंख्य कार्यकर्त्यांनी सामाजिक चळवळीत, दलित वंचितांना, महारांना सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी संपूर्ण जिल्हयात परिषदांचे आयोजन केले. समानता तत्वावर आधारित समाजव्यवस्था, ब्राम्हणेतर चळवळ आणि दलितांच्या सामाजिक उध्दारासाठी सुरू केलेल्या हया बुलडाणा जिल्हयातील चळवळी समाजजीवनावर दुरगामी परिणाम टाकून गेल्या. त्यातूनच बुलडाणा जिल्हयात दलितांसाठी, महारांसाठी त्यांच्या न्यायासाठी सुरू झालेली आंदोलने इतिहासाच्या दृष्टीकोनातून महत्वाची आहेत.

**हिंगणा कारेगाव येथील महार परिषद :-**सनातन विचार सरणीचे बंड मोडून काढून समाजात उपेक्षीतांना, वंचितांना न्यायाचे स्थान प्राप्त करून देण्यासाठी पंढरीनाथ पाटील यांनी बुलढाणा जिल्हयात वंचितांच्या सामाजिक हक्कासाठी परिषदांचे आयोजन केले. त्यामध्ये महारांना सामाजिक जाणीव निर्माण होऊन समतेच्या प्रवाहात आणण्यासाठी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक लढयाला बळकट करण्यासाठी महारांनी घेतलेल्या परिषदा हया इतिहासाच्या साक्षीदार आहेत. १७ व १८ नोव्हेंबर १९२४ रोजी खामगांव तालुक्यातील हिंगणा कारेगाव येथे खामगाव तालुक्यातील पहिली सत्यशोधक परिषद झाली.[३] या सत्यशोधक परिषदेचे अध्यक्ष म्हणून गणपतराव पाटील यांनी काम पाहिले. सत्यशोधक विचारसरणी बरोबरच तळागळातील जनतेला सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी पंढरीनाथ पाटील, गणपतराव पाटील, कृष्णराव पाटील, रंगराव देशमुख, नरसिंग देशमुख यांनी विचारमंचावर विचार प्रकट केले. याच मंडपामध्ये खामगावचे प्रसिध्द वकिल श्री. बोबडे यांचे नेतृत्वाखाली प्रथमच खामगाव तालुका चांभार परिषदेचे आयोजन झाले. १८ नोव्हेंबर १९२४ मध्ये सत्यशोधक मंडपातच श्री. एल.एस. भटकर यांच्या अध्यक्षतेखाली महार परिषदेचे आयोजन करण्यात आले.[४] पंढरीनाथ पाटील यांनी डॉ. बाबासाहेबांचे विचार आणि त्यांच्या महार चळवळीमागील भूमिका या महार परिषदेत विशद केली. याबरोबरच आनंदस्वामी, श्रीयुत गवई, एल.एस. भटकर यांनीही महार समाजात जनजागृती करण्याबाबत विचार व्यक्त केले. या परिषदेचे यशस्वी आयोजनामागे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचीच विचारप्रेरणा महत्वाची होती. या महार परिषदेमध्ये चिखली, खामगांव, जळगाव जामोद, मलकापूर या तालुक्यातून असंख्य महार बांधव एकत्रीत आले होते. हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या सामाजिक क्रांतीचाच परिणाम होता.

**सातगाव भूसारी येथील महार परिषद :-**डॉ. बाबासाहेबांच्या संपूर्ण महाराष्ट्रातभर होत असलेल्या चळवळींमुळे बुलडाणा जिल्हयातही बहुजन समाज जागृत झाला. महार बांधवांतही सामाजिक उत्थापनाच्या या कार्यात आणि परंपरेने निर्माण केलेले जोखळदंड उखडून फेकण्याची प्रेरणा निर्माण झाली. त्याचाच परिणाम म्हणजे सातगाव भूसारी येथे झालेली

महार परिषद होय. इ.स.१९२७ मध्ये सातगाव भुसारी येथे वऱ्हाड प्रांतीय अस्पृश महार परिषदेचे भव्य आयोजन केले होते. या परिषदेतील मुख्य वक्ते एम.के. जाधव हे मुंबई विदयाविठातून बी.ए. उत्तीर्ण झाले होते. अथक प्रयत्नातून जाधव यांनी अखिल भारतीय प्रशासकीय सेवेतील आय.ए.एस. परीक्षा उत्तीर्ण केली. ही परीक्षा पास होणारे जिल्हयातील महार जातीतील ते पहिलेच व्यक्ती होते त्यामुळे त्यांचा सत्कारही १९२७ च्या महार परिषदेत करण्यात आला या परिषदेला विदर्भाबरोबरच मराठवाडयातूनही हजारो लोक उपस्थित होते.[५] सत्यशोधक चळवळीत अग्रेसर असलेले बुलडाण्याचे पंढरीनाथ पाटील, मारोती काळुजी जाधव हे महार चळवळीत अग्रभागी होते. आंबेडकरी चळवळ तळागळापर्यंत पोहोचवण्याचे कार्य त्यांनी केले. पुन्हा सातगाव भूसारी येथेच २ एप्रिल १९४५ रोजी महार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते[६] यामध्ये प्रामुख्याने महार परिषद यशस्वी करण्यासाठी सातगाव भूसारीचे मारोती जाधव यांनी महत्वाचे कार्य केले. त्यांच्याच नेतृत्वात ही महार परिषद यशस्वीरीत्या पार पडली या परिषदेच्या यशस्वीतेसाठी बुलडाणा जिल्हयातील ब्राम्हणेतर चळवळीतील असंख्य नेत्यांनी पुढाकार घेतला व आंबेडकरी चळवळ, आंबेडकरी विचारधारा, डॉ. बाबासाहेबांचे समाजात समता, बंधूता प्रास्थापित करण्याचे ध्येय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य या महार परिषदेमार्फत पोहोचवण्याचे कार्य केले.

**बहिष्कृत समाज परिषद, मंगरूळ दस्तगीर :-**बहिष्कृत समाज परिषद या नावाने मंगरूळ दस्तगीर येथे दि.९ व १० नोव्हेंबर १९२९रोजी परिषद झाली या परिषदेला अस्पृश्य व्यक्तींची मोठया प्रमाणात उपस्थिती होती त्यामध्ये प्रामुख्याने मातंग, मांग, भंगी, महार, धनगर या जातीतील असंख्य स्त्री व पुरूष मोठया संख्याने उपस्थित होते. अस्पृश्य वर्गाचे अधिकार पुढे मांडण्यासाठी दलित वर्गातील व्यक्तींनी पुढाकार घेतला पाहिजे तसेच महार जनचळवळीबरोबरच जातीय एकोपा निर्माण होण्यासाठी बहुजन वर्गातील व्यक्तींनी आंतर जातीय विवाहाला प्रोत्साहन दिले पाहिजे. या विषयांवर प्रामुख्याने चर्चा करण्यात आली. तसेच याच परिषदेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि महार चळवळी मागील भुमिका पंढरीनाथ पाटील यांनी स्पष्ट केली.[७] इ.स. १६ जानेवारी १९२९ मध्येही सोनाळा तालुका जळगांव जामोद येथेही बाम्हणेत्तर परिषदेचे आयोजन करण्यात येवून महार चळवळीसाठी सभा मधून प्रोत्साहन देण्यात आले होते.[८]

**बुलडाणा जिल्हयातील इतर परिषदा :-**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रेरणेने महाराष्ट्रात असंख्य ब्राम्हणेतर परिषदांचे आयोजन करण्यात आले. भारतीय समाजातील जातीयता या भीषण समस्येविरोधात जनसामान्यांत चळवळी निर्माण करण्याचे कार्य या थोर महात्म्याने केले. त्यांच्याच कार्याची प्रेरणा घेऊन वऱ्हाड प्रांतातील बुलडाणा जिल्हयातील जनसामान्यांच्या न्याय हक्कांसाठी दलित, वंचित समाजातील व्यक्तींनी चळवळी निर्माण केल्या. बुलडाणा जिल्हयात महार चळवळी बरोबरच, मातंग, पाटिल, मराठा हया ब्राम्हणेतर चळवळी निर्माण झाल्या. त्यातूनच किन्ही महादेव ता. खामगांव, सातगाव भूसारी, वरखेड, हिंगणा कारेगांव, जळगांव जामोद, मलकापूर, चिखली नायगांव या ठिकाणी महार परिषदांबरोबर इतर जातीय बांधवांनी समाज जनजागृती करण्याच्या कार्याच्या हेतूने परिषदांचे आयोजन केले. महार चळवळीत डॉ. आंबेडकर यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन बुलडाण्यातील पंढरीनाथ पाटील, आनंदस्वामी, एल.एस.भटकर, गणपतराव पाटील, कृष्णराव पाटील, मारोती जाधव, गवई, बोबडे वकील यांसारख्या पुढाऱ्यांनी समाजात जनजागृती करण्याचे कार्य केले. या चळवळीच्या यशस्वीते मागे डॉ. बाबासाहेबांचे ओजस्वी व्यक्तीमत्व कारणीभूत होते. त्यांच्याच प्रेरणेतून, वैचारिक क्रांतीतून सर्वसामान्य दलित वंचित घटकांना संविधानातून न्याय देण्याचे कार्य या थोर विभूतीने केले.

**महार परिषदांची यशस्वीता व त्याचा परिणाम :-**डॉ. बाबासाहेबांनी त्यांच्या समाज चिंतनातून मानवतावादी आदर्श समाजाचे प्रारूप उभे राहिले. भारतीय समाज व्यवस्थेच्या परिवर्तनासाठी भारतातील जाती, जातीभेद निर्मूलन अस्पृश्य, दलित, वंचितांच्या उध्दारासाठी त्यांनी कार्य केले. त्यांच्या समाज जातीभेदविरहीत, चिंतनातून भारतीय समाजक्रांतीचा पथ दिपस्तंभा सारखा उजळून गेला आहे. त्यामुळे बाबासाहेब आदर्श अशा भारतीय विश्वसमाजाच्या जडणघडणीचेही शिल्पकार आहेत. माणूस धर्मासाठी, नसून मानवतेसाठी आहे. एकसंघ समाज निर्माण करण्यासाठी एकोणिसाव्या शतकापासून सुरू झालेल्या समाजसुधारणांचे अंतिम टप्यात बाबासाहेबांनी यशस्वी नेतृत्व केले. समाजात स्थिरता, जातीभेदविरहीत मनुष्य, निर्माण करण्यासाठी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राबरोबरच भारतातही विविध परिषदांचे, चळवळीचे नेतृत्व केले. चवदार तळे सत्याग्रह, काळाराममंदीर प्रवेश, अंबानगरी मंदीर प्रवेश, महाड, नाशीक, मुखेड पूणे यांसारख्या असंख्य ठिकाणी दलितांना, वंचितांना त्यांच्या न्यायहक्कासाठी सुरू केलेल्या चळवळीमुळे असंख्य समाज बांधव बाबासाहेबांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहिला. स्वातंत्र्याच्या उंबरठयावर असलेला भारत तत्कालीन परिस्थितीमध्येही धार्मिक आणि जातीय गुलामगिरीने जोखडलेला होता. संविधान निर्माते बाबासाहेबांनी या सर्व गोष्टींचा अथांग चित्तीने सतत चिंतन, मनन

करून घटनात्मक तरतुदीच्या सहाय्याने सर्व वंचित घटकांना न्याय, स्वातंत्र, समता, बंधुता या तत्वांकडे नेण्याचे कार्य त्यांनी केले. वंचितांच्या उध्दारासाठी केलेल्या कार्यामुळे आज भारतात सर्व घटकांना न्यायीक समानतेने वागणूक दिली जाते यांचे सर्वश्री श्रेय बाबासाहेबांनाच जाते.संपूर्ण महाराष्ट्रात होत असलेल्या महार चळवळींमुळे समाजमनावर दुरगामी परिणाम झाले. इ.स. एप्रिल १९५६ मध्ये जळगांव जामोद येथे महार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते या परिषदेचा मुख्य उददेश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धर्म स्वीकारण्याचा जो निर्णय घेतला होता त्याचे पूर्णपणे समर्थन करण्यात आले. या परिषदेमुळे बुलढाणा जिल्हयातील असंख्य महार बांधवांनी १४ ऑक्टोंबर १९५६ मध्ये नागपूर येथे डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली असंख्य बौध्द धर्माचा स्वीकार केला.

**मुल्यमापन:-**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तीमत्व हे समाज मनावर प्रभावी परिणाम करणारे होते त्यांच्या विचाराने, कृतीने लेखनाने समाज मनावर दूरगामी परिणाम झाले. वंचित, दलित अस्पृश्य समाजाच्या उध्दारासाठी कार्य करीत असतांना तळागळातील सर्व सामान्य व्यक्तींनाही त्यांनी चळवळीत सहभागी करून घेतले. त्याच्याच परिणाम म्हणजे जे सहकारी डॉ. बाबासाहेबां सोबत होते त्यांनी बहुजन विचार धारेचा प्रसार करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये नव्हे तर संपूर्ण भारतात विविध चळवळींचे सक्षमपणे नेतृत्व केले. महाराष्ट्रात दलित वंचितांच्या अस्पृश्यांच्या चळवळीला नवचैतन्य देण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. बुलडाणा जिल्हयातही विविध जनसामान्यांच्या चळवळीचे प्रतिनिधित्व करणा—या लोकनेत्यांवर बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव परिणाम पडला त्यातुनच या जिल्हयामध्ये सामाजिक उत्थापनाची चळवळ सुरू झाली. पुणे येथील १९२७ च्या महार परिषदेमध्ये उपस्थित असलेले बुलडाणा जिल्हयातील आंनदस्वामी, पंढरीनाथ पाटील यांनी डॉ. बाबासाहेबांच्या सामाजिक समतेच्या विचारांची प्रेरणा घेऊन बुलडाणा जिल्हयातही विविध परिषदा, चळवळीचे नेतृत्व केले. या जिहयातील महार बांधंवाना सामाजिक न्याय देण्यासाठी जाती व्यवस्थेच्या जोखाडातून मुक्त करण्यासाठी सातगाव भुसारी, हिंगणा कारेगाव, मंगरूळ दस्तगिर यांसारख्या असंख्य ठिकाणी महार परिषदांचे यशस्वी आयोजन केले त्यांच्या या कार्यात एस.एल.भटकर, मारोती जाधव, बोबडे वकील, कृष्णराव पाटील, गणपतराव पाटील, आंनदस्वामी यांसारख्या असंख्य बहुजन विचारधारेच्या लोकनेत्यांनी सहकार्य केले त्याच्याच परिणाम महार बांधवांमध्ये एकतेची भावना निर्माण झाली. बुलडाणा जिल्हयातील महार बांधंवांना विविध ब्राम्हणेत्तर, महार चळवळीच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे कार्य उभयतांनी केले. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधूता या तत्वप्रणालीवर आधारित समाज निर्मीतीची भावना जनसामान्यामध्ये निर्माण झाली हाच बहुजन समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला. महाराष्ट्रात झालेल्या महार परिषदा आणि चळवळीमुळेच एकसंघ समाज निर्माण होऊन त्याची परिणामी धर्म परिवर्तनात झाली, याचे सर्वस्वी श्रेय समाजक्रांतीचे उद्‌गाते, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेबांनाच जाते

**संदर्भग्रंथ :-**

**1.**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे व लेख, खंड १८, भाग १ शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन मुंबई. पृष्ठ क्रमांक ५७.

**2.**तत्रेव पृष्ठ क्रमांक ५८.

**3.**बाहेकर आ. अ. समाजभूषण पंढरीनाथ पाटील एम.पी. गौरवग्रंथ ३० मे १९६८ पृष्ठ क्रमांक १६२.

**4.**दांडगे ना. जा. समाजभूषण पंढरीनाथ पाटील यांचे चरित्र, साई ऑफसेट प्रिंटर्स, बुलडाणा पृष्ठ क्रमांक १६२.

**5.**बाहेकर आत्माराव अर्जुन, डॉ. पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटील यांची स्मरणीका, चिखली पृष्ठ क्रमांक २७.

**6.**बाहेकर आ. अ. समाजभूषण पंढरीनाथ पाटील एम.पी. गौरवग्रंथ ३० मे १९६८ पृष्ठ क्रमांक ८०.

**7.**पंढरीनाथ पाटील यांचा पत्र संग्रह, शाहू संशोधन केंद्र, शिवाजी विदयापीठ कोल्हापूर १६ जानेवारी १९२९ चे प्रोसेडींग फाईल क्रमांक १४३.

**8.** १९२९ च्या महार परिषदेचे प्रसिध्दी पत्रक जळगांव जामोद.

**विदर्भातील आंबेडकरी चळवळीत, वर्तमानपत्रे, साहित्याच्या माध्यमातून समाज सुधारकांनी दिलेले योगदान**

डॉ.सौ. ज्योती वसंत खडसे
सहयोगी प्राध्यापक
इतिहास विभाग प्रमुख
धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर

---

**सारांश –**प्राचीन भारताच्या इतिहासाचा मागोवा घेतल्यास भारतात साधारण पाच हजार वर्षापूर्वी एक समृध्द संस्कृती अर्थातच सिंधू संस्कृती विकसित झाल्याचे पुरावे मिळतात. त्यानंतरच्या काळातील संस्कृती म्हणजे वैदिक संस्कृती होय. वैदिक संस्कृतीचा प्रारंभीचा काळ म्हणजे ऋग्वेदकाळ. ज्या काळात व्यक्तिच्या गुणकर्माला महत्व दिसून येते. मात्र उत्तर वैदिक काळ जो ब्राम्हणकाळ या नावानेही ओळखला जातो. त्या काळात वर्णव्यवस्थेतून जाती व्यवस्थेचा उदय झाला. गुणकर्माचे पूर्वीचे महत्व जाऊन जन्माला महत्व प्राप्त झाले. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हया चार प्रमुख वर्णातून अनेक उपजाती निर्माण झाल्या. त्यांच्यात भेदाभेद निर्माण झाले. प्रारंभी असलेल्या शुद्रवर्णियांच्या स्थितीत बदल होत गेले व त्यांचे जीवन दिवसे अत्यंत हलाखीचे बनत गेले. मानवी समाजाला अस्पृश्य हा कलंक लागला तो शतकानुशतके, हया समाजाला सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विविध अधिकारांपासुन वंचित ठेवण्यात आले होते.

भारतात ब्रिटिश सत्तेची स्थापना झाल्यावर पाश्च्यात्य संस्कृती, ज्ञान, विज्ञानाचा प्रचार ब्रिटिशा मागोमाग भारतात झाला. इंग्रजी शिक्षणामुळेही भारतीयांच्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारत गेल्या. त्याचीच परिणिती म्हणजे हिंदू धर्मातील मानसिक व सामाजिक गुलामगिरी विरूध्द समाज सुधारकांनी बंड पुकारले.

महात्मा जोतीराव फुले यांनी शिक्षण, समानता आणि समान संधी हयासाठी सत्यशोधक समाज व साहित्याच्या माध्यमातून कार्य केले. दयानंद सरस्वतीचा आर्य समाज, परमहंसाचे आणि प्रार्थना समाज हयांनी सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात चळवळी केल्या. लोकहितवादी, गोपाळ हरी देशमुख, रानडे, आगरकर ह्यांच्या विचारांनी सामाजिक सुधारणांना पाठिंबा दिला व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी प्रत्यक्ष कृतीतून या सामाजिक क्रांतीला चालना दिली होती. त्यामुळे महाराष्ट्र सामाजिक क्रांतीच्या क्षेत्रात अग्रणी राहिला. मात्र शुद्राची गुलामगिरी संपली नव्हती.

तथाकथित समजल्या जाणाऱ्या वरिष्ठ हिंदू समाजाच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय गुलामगिरीत मात्र शुद्र समाज खितपत पडला होता. त्या समाजात आत्मविश्वास व स्वाभिमान निर्माण करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यासाठी त्यांनी विभिन्न स्तरावर चळवळी केल्या. त्यांच्यासोबत त्या काळात विदर्भातील असंख्य लोक सहभागी झाले व त्यांनी अस्पृश्यता निवारणासाठी कार्य केले. त्यासाठी वेगवेगळया माध्यमांचा वापर करण्यात आला. प्रस्तुत शोध कार्यात समाज सुधारणेच्या चळवळीत वृत्तपत्र, साहित्य याच्या माध्यमातून कार्य करणाऱ्या सुधारकांच्या कार्यावर चर्चा करण्यात आलेली आहे.

**शब्द संकेत : किसन बनसोडे,फत्तुजी शेंडे,कालिचरन नंदागवळी आणिनानासाहेब गवई**

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक संशेधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना :–**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'आधी विचार मग संचार' ह्याा वचनाप्रमाणे त्यांनी 1924 च्या जुलै महिन्यात 'बहिष्कृत हितकारिणीची सभा' नामक संस्थेच्या वतीने दलितांच्या स्वातंत्र्याची चळवळ सुरू केली होती. स्वाभिमान, स्वावलंबन व आत्मोध्दार हया सूत्रत्रयीवर ती अधिष्ठित होती. सामाजिक समता प्रस्थापित झाल्याविना समाजवाद प्रत्यक्ष कृतीत उतरणार नाही अशी बाबासाहेबांची ठाम समजूत होती. आतापर्यंत दलित म्हणून नाकाराले गेलेले सामाजिक स्वातंत्र्य, बौध्दिक स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य व राजकीय स्वातंत्र्य या चतुःसुत्रीवर नवा धर्म, नवा समाज अधिष्टित व्हावा असे आंबेडकरांचे ध्यैर्य होते व त्या ध्येयपूर्तीसाठी त्यांनी अनेक मार्गाचा अवलंब केला. त्यात वृत्तपत्र व साहित्य हे प्रभावी माध्यम वापरले होते. त्यांनी हिंदू समाजाच्या पुनर्घटनेची मागणी केली. ती हिंदू समाजाच्या कशी हिताची व राष्ट्राच्या कल्याणाची आहे हे विषद करून सांगण्यासाठी त्यांनी 'बहिष्कृत भारत' नावाचे पाक्षिक सुरू केले होते.[1]

सामाजिक व आर्थिक विषमतेने ग्रस्त भारतातील माणुस उन्नत व्हावा, जात, वर्ग आणि संप्रदाय विहिन सामाजिक बंधुता प्रत्यक्षात यावी व सर्व घटकांमध्ये सुसंवाद निर्माण व्हावा हे डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न होते व त्यासाठी जनजागृती होणे आवश्यक होते. त्यासाठी बाबासाहेबांनी अग्रलेख, स्फुटलेख, पत्रे या प्रकारचे लेखन मुख्यत्व त्यांनी स्वतः काढलेल्या व चालविलेल्या वृत्तपत्रातून केले. शिवाय अनेक ग्रंथ लिहिले. डॉ. बाबासाहेबांनी अनुक्रमे पुढील वृत्तपत्रे सुरू केली आणि चालविली

होती. मुकनायक, 1920, बहिष्कृत भारत, 1927, जनता, 1930, प्रबुध्द भारत 1956 (प्रबुध्द भारत हे 56 साली जनता पत्राचेच नवे नाव होते) डॉ. बाबासाहेबांच्या वृत्तपत्रांमध्ये नैतिकतेचा माणुसकीचा आग्रह धरण्यात आला होता. वृत्तपत्रांनी संकुचित होऊ नये. सर्वजन कल्याणाची भूमिका घ्यावी असे त्यांचे स्पष्ट मत होते व त्यानुसार त्यांनी कार्य केले.[2]

डॉ. बाबासाहेबांनी प्राचीन काळापासुन चालत आलेली चातुर्वर्ण्य व्यवस्था नाकारली. त्यांच्या मते, चातुवर्ण्यामुळे माणसांना उपयुक्त गोष्टी करता येत नव्हत्या. एवढेच नाही तर यामुळे माणसाची जीवनशक्ती कमकुवत होते व माणसाचे सामर्थ्य खच्ची होते, असे त्यांचे मत होते. हे स्पष्ट करतांना त्यांनी "ीव ूमतम जीम नदजवनबींइसम ंदक ीवू जीमल इमबवउम नदजवनबींइसमे हा संशोधनात्मक ग्रंथ अस्पृश्यांच्या मूळ उत्पत्ती बाबत लिहिला तसेच 'शूद्र मुळचे कोण? असा नवी दृष्टी देणारा ग्रंथ लिहिला या ग्रंथात अस्पृश्यवर्ग व शूद्रवर्ग यांच्या उत्पत्ती संबंधाने सखोल असे अभ्यासपूर्ण विवेचन करून जनमानसाला त्यावर विचार करण्यास बाध्य केले. डॉ. आंबेडकरांच्या कार्याचाच परिपाक म्हणता येईल. अनेक दलित समजले जाणाऱ्या समाजातील लोक पुढे आले. त्यांनी डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेली चळवळ सुरू ठेवली होती.[3]

**किसन फागुजी बनसोडे –**विदर्भातील दलितोध्दाराचे व दलित चळवळ बळकट करण्याचे महत्वपूर्ण योगदान ज्यांनी दिले. त्यात प्रामुख्याने किसन फागुजी बनसोडे यांचे नाव घ्यावे लागते. त्यांनी 19 व्या शतकाच्या शेवटच्या काळात व विसाव्या शतकाच्या प्रारंभी दलितांच्या न्याय हक्कासाठी लढा दिला. त्यांनी इ.स. 1901 मध्ये 'सन्मार्ग बोधक अस्पृश्य समाज' ही संस्था नागपूर येथे स्थापन केली आणि सतत विस वर्षे जागृतीचे कार्य केले. त्यांच्या अस्पृश्योध्दाराच्या कार्यामुळे केवळ विदर्भातच नाही तर महाराष्ट्रात जागृती घडून आली. त्यांनी आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी वर्तमानपत्रासारखे प्रभावी माध्यम निवडले. त्यात 1) निराश्रित हिंद नागरिक 1910 मोहोपा येथून प्रकाशित करण्यात आले (हॅडप्रेस प्रकाशन).

दुसरे वृत्तपत्र 'विटाळ–विध्वंसक' 1913 गोंदिया, हॅडप्रेस प्रकाशन इथून प्रकाशित करण्यात आले. तिसरे 'मजुर पत्रिका' 1918 तसेच चौथे वर्तमानपत्र चोखामेळा 1919–1936 या वर्तमानपत्रातून त्यांनी जनजागृतीचे कार्य केले. अस्पृश्यांच्या प्रश्नाला वाचा फोडली. ते उत्तम शिक्षक होते. अस्पृश्य मुलामुलींना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी 1907 मध्ये नागपूर येथील पाचपावली भागात 'चोखामेळा कन्या शाळा' व 1914 मध्ये चोखामेळा वसतीगृह स्थापन केले. यासाठी जनजागरणाकरिता त्यांना वर्तमानपत्राचे माध्यम उपयोगी ठरले होते.

किसन बनसोडे यांनी शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रात जनजागृती करण्याचे अत्यंत महत्वाचे कार्य केले. ते संत वाङ्मयाचे केवळ संशोधक आणि अभ्यासक नव्हते तर त्याबाबत त्यांनी बरीच ग्रंथ निर्मिती केली होती. 1942 मध्ये त्यांनी श्री संत चोखामेळा चरित्र प्रकाशित केले. त्या काळात दलित समाजाला भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टा, त्यांचे जीवन, त्यांच्या आयुष्यातील दाहक समस्यांवर त्यांनी असंख्य कवणे लिहून समाजासमोर अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या समाजाच्या वेदना मांडल्या.

किसन बनसोडे यांनी केवळ वृत्तपत्रातून लेख वा कवणेच लिहिली नाही तर नाटके लिहून नाटकांसारख्या प्रभावी माध्यमाचा समाज प्रबोधनासाठी उपयोग केला. त्या काळात त्यांची चोखामेळा (देवदर्शन), सत्यशोधक जलसा ही नाटके खूप लोकप्रिय झाली होती.

त्यांनी महाराष्ट्राच्या नावाजलेल्या 'ज्ञान–प्रकाश', 'सकाळ', 'सुबोध पत्रिका', 'केसरी' या वृत्तपत्रातून अनेक लेख लिहून अस्पृश्यांच्या ज्वलंत प्रश्नाकडे समाजाचे लक्ष वेधण्याचा व अस्पृश्यांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे अत्यंत महत्वपूर्ण कार्य केले.

किसन बनसोडे यांना मजुरांच्या समस्यांनी सुध्दा अस्वस्थ केले होते. त्यांच्या समस्या दूर व्हाव्या आणि त्यांच्या मागण्या व्हिटले कमिशन पुढे ठेवण्याचे काम त्यांनी केले होते. अशाप्रकारे किसन फागुजी बनसोडे यांनी वृत्तपत्र व साहित्याच्या माध्यमातून आंबेडकरी चळवळीत आपले योगदान दिलेले दिसून येते.[4]

**फत्तुजी बापुजी शेंडे –**विदर्भातील अस्पृश्योद्वार आंदोलनातील आणखी एक महत्वाचे नाव म्हणजे फत्तुजी बापुजी शेंडे होय. त्या काळात दलित समजल्या जाणाऱ्या समाजात शिक्षणाचे प्रमाण फारच कमी होते व शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही याची जाणीव फत्तुजी शेंडेना झाली होती. त्यासाठी त्यांनी नागपूर येथील इंदोरा येथील मजुरांच्या वस्तीत इ.स. 1898 मध्ये मुलांची प्राथमिक शाळा व रात्रीचे वाचनालय सुरू केले होते. वाचनाने जनजागरण होऊ शकते याचे महत्व त्यांनी ओळखले होते. 1904 मध्ये त्यांनी 'तरूण महार मंडळा'ची स्थापना केली होती. या संस्थेद्वारे त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू केली होती. सक्तीच्या शिक्षणाची एक म्युनिसिपल प्रायमरी शाळा निर्माण करण्यात आली त्यात फत्तुजींचे योगदान मोठे होते.[5]

**कालीचरण नंदागवळी –** विदर्भातील आंबेडकरी चळवळीत कालीचरण नंदागवळी यांचे मोलाचे योगदान असलेले दिसुन येते. इ. 1901 ते 1950 पर्यंत कालीचरण नंदागवळी यांनी अस्पृश्यांच्या उध्दारासाठी सतत प्रयत्न केले होते. त्यांनी स्वखर्चाने गोंदिया येथे मुलींसाठी शाळा स्थापन केली होती. 1914 मध्ये 'भारतीय महार पंचायत' स्थापन करून परिषदेच्या माध्यमातून अस्पृश्यता निवारणासाठी कार्य केले. किसन बनसोडे यांनी सुरू केलेले 'विटाळ विध्वंसक' वर्तमानपत्र चालविण्यात कालीचरण नंदागवळी यांनी अतिशय मोलाचे सहकार्य केलेले दिसून येते.[6]

**नानासाहेब गवई –** सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांमध्ये महत्वाचे नाव होय. दलितांमध्ये सामाजिक सुधारणा घडवून आणणे, त्यांच्या जीवीताचे मुख्य ध्येय होते. अस्पृश्य समाजातील मागासलेपणाची कारणे शोधून ती दूर कशी करता येतील यासाठी त्यांनी कार्य केले. विसाव्या शतकातही अस्पृश्यांची स्थिती अत्यंत वाईट होती. नानासाहेब गवई अर्थातच गणेश आकाजी गवई यांनी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मार्गदर्शनात दलितोध्दाराचे कार्य केले. 1909 मध्ये त्यांनी भूगाव येथे 'महार लायब्ररी' नावाचे वाचनालय सुरू केले होते. 1910 मध्ये नानासाहेब गवई यांनी 'बहिष्कृत भारत' नावाचे वर्तमानपत्र सुरू केले होते. या वृत्तपत्राच्या द्वारे त्यांनी जनजागृतीचे कार्य केले. अशा रितीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या चळवळीत ग्रंथालये, लेखन, वृत्तपत्र व ग्रंथ संपदेच्या माध्यमातून विविध सुधारकांनी आपले योगदान दिले.[6]

**स्त्रियांचे योगदान –**विदर्भातील आंबेडकरी चळवळीत अनेक स्त्रियांचे मोलाचे योगदान दिसून येते. त्यात अकोला जिल्हयातील श्रीमती सरस्वती घराडेंचे योगदान मोठे आहे. महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या 'एक गाव एक पानवठा' या योजनेत त्यांनी सक्रिय योगदान दिले. जाईबाई चौधरी यांनी गरीबीवर मात करून 1924 ला नागपुरला चोखामेळा शाळा काढली व अनेक सभांमधून जनजागृतीचे कार्य केले. उर्मिला पवार व मिनाक्षी मून यांनी आम्हीही इतिहास घडविला हा ग्रंथ लिहिला त्यात एकूण 47 स्त्रियांच्या मुलाखती घेण्यात येवून दलीत चळवळीत त्यांच्या योगदानाचा अभ्यास करण्यात आला होता. त्यात 47 पैकी 16 स्त्रिया नागपूरच्या होत्या. अशा रितीने विदर्भातील आंबेडकरी चळवळीत विविध स्त्री–पुरूषांनी आपले योगदान दिलेले दिसून येते.[7]

**निष्कर्ष –** प्राचीन भारताला समृध्द अशा संस्कृतीचा वारसा लाभला असतांना कालांतराने समाजात कठोर चातुर्वण्य व्यवस्था, जातीभेद, अस्पृश्यता सारखे कलंक समाजाला लागले. या कलंकांना दूर करण्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकांना दिली. साधनांचा अभाव, जनतेचे सहकार्य नाही अशा परिस्थितीत सामान्यामधून असामान्य असे लोक पुढे आले व त्यांनी अस्पृश्य समाज, दुर्लक्षित घटक स्त्रिया यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले. दलितांच्या समस्या समजून घेवून त्या विविध स्तरावर, विविध मार्गानी सोडविण्याचा प्रयत्न केला. आज त्यांच्याच प्रयत्नांचा परिणाम म्हणता येईल की, स्वतंत्र भारताच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रात समाजातील सर्व घटकांचा सारखा सहभाग दिसून येतो व अस्पृश्य सारखी अत्यंत निंदनिय गोष्ट भारताच्या राज्य घटनेने अमान्य केलेली आहे. यातच या सुधारकांच्या योगदानाचे महत्व दिसून येते.

**संदर्भ सूची**


1)मनोहर यशवंत निबंधकार डॉ. आंबेडकर, संघमित्रा बुक हाऊस, नागपूर, प्रथमावृत्ती 1988, पृ. 18, 19.

2)अ)किर धनंजय, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानस आणि तत्व विचार, श्री गजानन बुक डेपो, पुणे 30, पुनर्मुद्रन 1977, पृ. 32, 33.

ब)बहिष्कृत भारत, 20 मे 1927.

3)खरात शंकरराव, अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, तृतीय आवृत्ती, 25 जून 2009, पृ. 97

4)अ) कोलारकर, आधुनिक विदर्भाचा इतिहास 1885–1947, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती 2003, पृ. 513, 514.

4)ब) ळनचजं ।सचंदंए क्ंसपज ब्वदेबपवनेदमे ेंदक क्ंसपज च्वमजतलए चपदह ठववोए श्रंपचनतए प्दकपंए थ्पतेज म्कण 2013ए च्ण 12ण

5)वक्काणी नी. आ., आधुनिक विदर्भ का इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ. 263.

6)अ) जनता खास अंक – ब्राम्हणोत्तर चळवळीचे ध्येय व डॉ. आंबेडकरांचे कार्य, पृ. 75.

6)ब)ज्ञनउंत ।रंलए क्ंसपज च्ंदजीमतद ।दकवसंदए ळवनजंउ ठववा ब्मदजतमए क्मसीप 2006ए च्ण 13.15ण

7)कोलारकर, आधुनिक विदर्भाचा इतिहास 1885–1947, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आ. 2003, पृ. 517.

8)गाठाळ, भारतीय इतिहासातील स्त्रिया, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, सुधारित आवृत्ती 2017, पृ. 322.

# स्वातंत्र्यपूर्व विदर्भातील वंचितांच्या चळवळीतील वृत्तपत्राचे समाज प्रबोधनातील योगदान

प्रा.सतिश बं. राठोड
(इतिहास विभाग)
वसंतराव नाईक शासकिय कला व
समाज विज्ञान संस्था, नागपूर

**गोषवाराः** मुद्रणकलेचा विकास हा मानवी इतिहासातील एक क्रांतीकारी शोध आहे. त्यामुळे ज्ञानाचा संचय व प्रसार करणे अधिक सोयीचे झाले, जनजागृती करण्यास गती मिळाली याच मुद्रणकलेचे प्रभावी साधन म्हणजे वृत्तपत्र होय. जागतिक महत्त्वपूर्ण घटनांना, आंदोलनांना, शासकीय धोरणांना निर्णयाप्रत पोहचवण्यात वृत्तपत्रांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. भारतातही राजकीय, सामाजिक प्रबोधनात वृत्तपत्राचे फार मोठे योगदान राहिले आहे. भारतात जरी वृत्तपत्राची सुरूवात पाश्चात्यांनी केली तरी येथील अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा, धर्माचे तर्कशुद्ध विवेचन, स्त्री; जातीव्यवस्था व त्या अंतर्गत भरडल्या जाणाऱ्या दुर्लक्षित वंचित घटक आदी बाबतीत सुबुद्ध भारतीयांनी भारतीय भाषेमध्ये सुरू केलेल्या वृत्तपत्रांचे कार्य लक्षणीय राहिले आहे.

**शब्दसंकेत** :वऱ्हाड समाचार, फणींद्रपुर मणिप्रकाश, प्रमोद सिंधु, सुधारक, सोमवंशीय मित्र, महार सुधारक, विटाळ विध्वंस, महारांचा सुधारक, मुकनायक, बहिष्कृत भारत,जनता, सिंहगर्जणा.

**संशोधन पद्धती : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलेब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तापना** :—देशात वृत्तपत्राची सुरूवात झाल्यानंतर पाच—एक दशकानंतर महाराष्ट्रात मराठी वृत्तपत्राना सुरूवात झाली इ. स. 1832 ला. सुरू झालेल्या जांभेकरांच्या 'दर्पण' ला प्रथम मराठी वृत्तपत्राचा मान जातो.[1] संपूर्ण महाराष्ट्रात विदर्भाव्यतिरिक्त उर्वरित महाराष्ट्र वृत्तपत्र सुरू होण्या बाबतीत अग्रेसर राहिला. त्या मानानाने मराठी वृत्तपत्रांची सुरूवात विदर्भात थोड्या विलंबानेच झाली. त्याचे कारण एक तर हा प्रदेश मालगुजारीचा आणि इतर महाराष्ट्राच्या तुलनेत 35—36 वर्षानंतर हा प्रदेश ब्रिटिश अंमलाखाली आला त्यामुळे शिक्षणादी सुधारणाही विलंबानेच झाल्या. परंतु इ. स. 1867 ला अकोला येथून निघणाऱ्या वऱ्हाड समाचारने ही उणीव भरून काढली.[2] त्यानंतर वैदर्भ (1870 अकोला) 'फणींद्रपूर मणिप्रकाश' (1876 नागपूर), 'प्रमोद सिंधू' (1879 अमरावती) आदी वृत्तपत्र सुरू झाली. या सर्व वृत्तपत्राचा भर हा आधुनिक ज्ञान विज्ञानाचे महत्त्व, शासकीय धोरण, राजकीय जागृती, त्याच बरोबर सामाजिक प्रबोधन त्या अंतर्गत स्त्री विषयक प्रश्न, जाती व्यवस्था आदी विषयावर होता. परंतु वर्ण व्यवस्था—जातीव्यवस्थे अंतर्गत सर्वाधिक झळ पोहचलेल्या पीडित वंचित दलित समुदायाच्या समस्यांला अग्रक्रम नव्हता, विशेषकरून त्या संदर्भात प्रकाश टाकणारी वृत्तपत्रे असावीत असे. दलित समुदायातील सुशिक्षित तरूणांची तीव्र इच्छा होती.[3] त्यामुळे आपल्यावर झालेला व सुरू असलेला अन्याय याला वाचा आपणच फोडू शकतो व त्या संदर्भात जनजागृती करावयाची असेल तर त्याची सुरूवात आपणच केली पाहिजे असा विचार दलित समुदयातील सुशिक्षित सुबुद्ध घटकांना वाटू लागले व त्याच प्रेरणेतून दलित विचार धारेची वृत्तपत्रे आंबेडकरांच्या वृत्तपत्र कार्याला सुरू होण्या आधिच सुरू झालीत.महाराष्ट्रात दलित विचार धारेची वृत्तपत्रे सुरू होण्या आधी दलित समुदयातील काही सुशिक्षित मंडळीनी इतर वृत्तपत्रात प्रभावी कार्य केले होते. दलितातील पहिले पत्रकार म्हणून गोपाळबुवा वलंगकर याना ओळखले जाते. त्यांनी 'सुधारक', 'दिनबंधू' आदी वृत्तपत्रातून दलितांच्या समस्यावर प्रभावी लेखन कार्य केले. दलितांचे पहिले संपादक म्हणून असल्याचा मान शिवराम जनाबा कांबळे यांना जातो. जुलै 1908 मध्ये त्यांनी 'सोमवंशीम मित्र' हे वृत्तपत्र सुरू केले.[4] विदर्भातील दलित वर्गाच्या उत्थानासाठी वृत्तपत्राच्या माध्यामातुन सर्व प्रथम प्रभावीपणे कार्य करण्यास कोणी सुरूवात केली असेल तर ते म्हणजे किसन फागोजी बनसोड यांनी अस्पृश्योद्धाराचे कार्य व दलित चळवळ बळकट करण्यात विदर्भातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. किसन फागोजी बनसोड यांनी 1901 मध्ये 'मराठा दिन बंधु' इ. स. 1906 अंत्यज विलाप, आणि 1907 'महार सुधारक' अशी वृत्तपत्रे सुरू केली अशी नोंद आहे.[5] परंतु ऐतिहासिक पुराव्याविना ती प्रकाशित झाली की नाही? केव्हा प्रकाशित झाली? कुठुन प्रकाशित झाली? अशी प्रश्ने निरूत्तर राहतात या संदर्भात काही ऐतिहासिक तथ्ये मिळाली असती तर आंबेडकरी विचार धारेचे प्रथम दलित संपादक असल्याचा मान त्यांना गेला असता. किसन फागोजी बनसोड यांच्या ज्या पत्राची पोच व अभिप्राय आढळतात त्यात "निराश्रित हिंदी नागरिक" (1910— मोहोपा येथून प्रकाशित), "विटाळ—विध्वंस" (1913 गोंदिया येथुन प्रकाशित), "मजूर पत्रिका" (1918), "चोखामेळा" (1919—1936) या पत्रातून त्यांनी जागृतीचे कार्य केले. त्यांच्या "महारांचा सुधारक" या पाक्षिक पत्राची जाहीरात दिनबंधुच्या 27 एप्रिल 1907 च्या अंकात छापली गेली होती.[6]

किसन फागोजी बनसोड यांनी वृत्तपत्राद्वारा न्याय, समता व वंचित समुदायाच्या सन्मानासाठी आपल्या लेखनीतून लढा दिला. आंबेडकर पूर्व काळात आंबेडकरी विचारांचा प्रभावी वापर करून अन्यायविरूद्ध लोकजागृती करण्याचे महान कार्य त्यांच्या लेखनीने केले. बनसोड यांचे चरित्रकार ना. रा. शेंडे म्हणतात "'गुरूवर्य बनसोड'

यांनी आपल्या तेजस्वी लेखणीचे दर्शन घडवून दलित वर्गात अन्यायाप्रित्यर्थ आणि न्यायासाठी समतेसाठी प्रतापी झुंज देण्यास जी सर्व स्पर्शी व्यापक जागृती निर्माण केली. त्याला दलित वर्गाच्या इतिहासात तोड नाही त्यांची वृत्तपत्रे ही समाज क्रांती घडवून आणण्याचे प्रभावी अस्त्र ठरले".[7] सामाजिक समतेचा पुरस्कार करताना बनसोड यांनी आपल्या लेखनातून पंथभेद, पोटभेद मानु नये असे आवाहन केले आहे. महारांच्या वतनाची वास्तविकता मांडताना ते म्हणतात की,

थु : तुमच्या तोंडावर लेक हो ऽऽ
कसले वतनदार महार तुम्ही, कसले वतनदार
वतनदाराची बघा लेकरे फिरती दारोदार ।।[8]

अस्पृश्यबांधवांच्या उन्नती करिता लोकजागृतीचे महत्कार्य बनसोड यांनी केले त्यांच्या कार्याचा प्रभाव संपूर्ण महाराष्ट्रभर होता. त्यांच्या या कार्याचे कौतुक वि. रा. शिंदे, "भाला" कार भा. ब. भोपटकर व लो. टिळक यांनी केले होते.[9]

पश्चिम विदर्भातील दलित पुढारी गणेश आकाजी गवई यांनी 1914 मध्ये 'बहिष्कृत भारत' या नावाचे एक पाक्षिक पत्र सुरू केले. दलित समाजाने स्वःउत्थानासाठी स्वतःच पुढाकार घ्यावा अशी भूमिका ते या पत्रातून मांडतात.[10] भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्वाचे पुढारी दादासाहेब खापर्डे यांच्याकडे शाळेतून हाकलून दिल्यामुळे एका दलित विद्यार्थ्यांने तक्रार केली असता त्या विद्यार्थ्याला हतोत्सहीत करणारे उत्तर खापर्डे यांच्याकडून मिळाले. खापर्डे यांच्या या भूमिकेचा खरपुस समाचार "बहिष्कृत भारत" या पत्रामध्ये घेतला गेला. महारांना शाळेत घेण्याबद्दल जर तुमची ही भूमिका आहे तर तुम्ही स्वराज्य काय कमवणार? असा प्रश्न उपस्थित करून त्यांच्या भूमिकेवर टीका करण्यात आली.[11] पश्चिम विदर्भातील दलितांच्या प्रश्नांना अग्रक्रम देऊन त्या संदर्भात हिरहिरीने भूमिका मांडण्याचे कार्य "बहिष्कृत भारत" ने केले. या व्यतिरिक्त दलितांच्या प्रश्नांना प्राथमिकता देऊन लिखान करणारे 'सिंहगर्जना' हे साप्ताहिक यवतमाळ येथून म. बा. मेश्राम नावाचे गृहस्थ चालवीत.

**मुल्यमापन** : दलित समाजाला उचित मार्गदर्शन, त्यांच्या हिताची चर्चा, समुदायाच्या वेदना, शासकीय धोरणात या दुर्लक्षित घटकाचे प्रश्न व त्याचा विचार होण्यासंबंधीचे आवाहन. तर्कशुद्ध व न्याय रित्या मांडण्यामध्ये डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेल्या 'मुकनायक' (1920), 'बहिष्कृत भारत' (1927), 'जनता' (1930) या वृत्तपत्राचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. बाबासाहेबांच्या "बहिष्कृत भारत" मधून विदर्भातील घटनांचे वृत्त येत असत येथील दलित प्रश्नावर बातमी व लेखामधून मार्गदर्शन करण्यात येई. श्री अंबादेवी सत्यग्रहाच्या अनुषंगाने आलेली बातमी, अमरावती येथील बहिष्कृत वर्गाच्या सभेची बातमी, विदर्भातील दलितावर होणाऱ्या अन्यायवर अनुकुल प्रतिकुल भुमिकांची चर्चा या वृत्तपत्रातून होत असे.[12]

स्वातंत्र्यपूर्व विदर्भातील दलित समुदायाच्या प्रश्नावर प्रबोधन करण्यामध्ये, अशिक्षीत, सामाजिक, आर्थिकव राजकीय दृष्ट्या वंचित असलेल्या दलित समाजाच्या प्रश्नांना अग्रक्रम देऊन त्याला चळवळीचे स्फुरण देण्यामध्ये या वृत्तपत्रांचा हिचा वाटा होता. हे पत्रे चालविणाऱ्या सुबुद्ध व्यक्तीना राष्ट्रीय प्रश्नांची जाण नव्हती असे नाही परंतु आपाल्याच समाजाच्या समस्या इतक्या महाकाय होत्या की दलितांच्या प्रश्नांना अग्रक्रम देणे त्यांना क्रमप्राप्त होते व त्यांच्या या कार्याचे ध्येय पण.

**संदर्भ सूची**

1.मेश्राम, स. य.राजकीय प्रबोधन आणि मराठी वृत्तपत्रे,विसा बुक्स प्रकाशन अमरावती. पृ. 21
2. कित्ता. पृ. 21
3. मस्के, ब. रू., विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, नभ प्रकाशन, अमरावती, पृ. 312.
4. पानतावणे ग.,पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर,प्रकाशक अरूणवी पारगावकर,पूणे. पृ. 16.
5. शेंडे, ना. रा., दलितोध्दारक गुरूवर्य बनसोड, श्री शेष प्रकाशन भंडारा, पृ. 28.
6. मस्के, ब. रू., पृ. 313
7. शेंडे, ना. रा., पृ. 28
8. मस्के, ब. रू., पृ. 313
9. मेश्राम, स. य., पृ.113
10. शेंडे, ना. रा., पृ. 28
11. पानतावणे, पृ. 49 12. मस्के, पृ. 315

# 'पश्चिम विदर्भातील सत्यशोधक समाज व आंबेडकरी चळवळीचे कार्य एक तात्विक दृष्टीकोन

**डॉ. उध्दव नं. कांबळे**
**तत्वज्ञान विभाग**
**वंसतराव नाईक शासकीय कला व**
**समाजविज्ञान संस्था, नागपूर**

**सारांश–** एकोणिसाव्या शतकाला भारत देशात अनन्यसाधारण असे महत्व आहे. याच शतकात खऱ्या अर्थाने भारतात प्रबोधनाला सुरुवात झाली, प्रबोधनाचा उषःकाल झाला. वैज्ञानिक प्रगती मुळे परंपरागत संदर्भ बदलून नवे संदर्भ तयार झाल्याने जग मानवाच्या आवाक्यात आले. औद्योगिक क्रांतीने आर्थिक, औद्योगिक क्षेत्रात व्यापक परिवर्तने घडवून आणली. दळणवळण क्षेत्रातील क्रांतीने स्थितिशील जगाला प्रचंड गतीने गतिशील केले. प्रथमच मानवाला जगाची खरी ओळख झाली. या प्रभावापासून समाज अलिप्त राहू शकत नव्हता. शेकडो वर्ष स्थितीशील असलेला समाज या शतकातील घडणाऱ्या घटनामुळे जागा होऊ लागला. नवीन विचारांना चालना मिळाली. समाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, मुल्यांची चिकित्सा केली जाऊ लागली. परंपरागत व्यवस्थेला आव्हाने दिली जाऊ लागली.

हजारो वर्षापासून गुलामगिरीत जीवन जगत असलेला समाज हिंदूधर्म परंपरेच्या बेडया तोडून टाकण्यासाठी सज्ज झाला. हिंदू धर्मातील वाईट चालीरिती, रुढीपंरपरा, सामाजिक विषमता, जातीप्रथा, अस्पृश्यते विरुध्द संघटीत चळवळी केल्या जाऊ लागल्या. भारतात झालेल्या प्रबोधनाचे खरे श्रेय हे ब्रिटीशसत्तेला जाते. ब्रिटीशामुळे धर्मव्यवस्थेला, समाजव्यवस्थेला धक्के बसू लागले. त्यांच्यामुळे सर्वच श्रेत्रात परिवर्तनाला सुरुवात झाली. याचाच परिणाम सुधारणा चळवळीवर झाला. सुधारणा चळवळीला बळकटी प्राप्त झाली. यामध्ये अनेक चळवळींचा नामोल्लेख करता येतो. ख्रिश्चन मिशनरी चळवळ, ब्रम्हासमाज, परमहंस सभा, प्रार्थना समाज, आणि सत्यशोधक समाज चळवळ आदि चळवळीचे प्रबोधनामध्ये भरीव योगदान दिसून येते. यापैकी एक महत्वपुर्ण चळवळ म्हणून सत्यशोधक चळवळीचे योगदान राहिलेले आहे.

**शब्द संकेत :सत्यशोधक चळवळ,आंबेडकरी चळवळीचे कार्य व अस्पृश्यांच्या हितांसाठी कार्य**

**संशोधन पद्धतीः ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना :–** महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीमध्ये सत्यशोधक समाजाचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. ब्राम्हण, भट, उपाध्ये, जोशी इत्यादी पुरोहिताच्या दास्यातून शुद्र लोकांना मुक्त करण्याकरीता महात्मा ज्योतिबा फुले यांनी सप्टेंबर 1873 रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना पुणे येथे केली. एकेश्वरवाद, पुरोहित वर्गाचा निषेध, मूर्तीपुजा विरोध, तीर्थयांत्रांना विरोध, परलोक, स्वर्ग–नरक, या कल्पनांना विरोध, सर्वांच्या कल्याणासाठी समतेची व बंधुत्वाची भावना, व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार हे तत्वे सत्यशोधक समाजाने स्विकारलेली होती. सत्यशोधक समाजाचे कार्यक्षेत्र हे फक्त पुणे हेच नव्हते तर संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांचा कार्याचा प्रचार पसार दिसून येतो. विदर्भातही सत्यशोधक समाजाचे कार्य विशेष उल्लेखनीय झालेले आहे. ते पुढील प्रमाणे आहे.

**पश्चिम विदर्भातील सत्यशोधक समाज व दलित चळवळीचे कार्य –**

सत्यशोधक समाजाने समाजाची उन्नती करण्यासाठी कार्य केले. चळवळीच्या माध्यमातून महात्मा फुले यांनी आपल्या कार्याची व्याप्ती वाढविली. चळवळीचे क्षेत्र महाराष्ट्रभर विस्तारले. एकंदरीत सत्यशोधक समाजाचे कार्य अनेक टप्यात पार पडले. त्यापैकी 1895 ते 1910 दरम्यान सत्यशोधक चळवळ पश्चिम महाराष्ट्रातून मध्यप्रांत वऱ्हाडमध्ये पोहचली.

सत्यशोधक समाजाच्या संस्थापक सदस्यामध्ये वऱ्हाड प्रांतातील रहिवाशी लक्ष्मणराव हरी शिंदे यांचे नाव होते. बुलढाणा जिल्हयातील बापूजी हरी शिंदे व रामचंद्र हरी शिंदे हे दोन बंधू प्रारंभापासूनच सत्यशोधक समाजाचे कार्य करीत होते. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेपासून वऱ्हाडमध्ये सत्यशोधक चळवळ रुजू लागली होती.

वऱ्हाड प्रांतात समाजाच्या प्रसारासाठी स्वतः येण्यास महात्मा फुले यांना जमले नाही. म्हणुन त्यांनी आपले विश्वासु नारायण लोखंडे यांना वऱ्हाड प्रांतात पाठविले. लोखंडे यांनी 1886 मध्ये मराठा, माळी, साळी, कोष्टी इ. बहुजन समाजात जागृती करण्यात यश मिळविले. अमरावती जिल्हयात करंजगाव येथे 1900 मध्ये आणि 1901 मध्ये अकोला जिल्हयात सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. यानंतर पश्चिम विदर्भात सत्यशोधकांचा प्रवास सुरु झाला.

ब्राम्हण पुरोहिताशिवाय धार्मिक विधी करण्यासाठी व्यापक चळवळ सत्यशोधकांनी हाती घेतली. अनेक विधी ब्राम्हणाशिवाय केले जाऊ लागले. विवाह हे सत्य शोधक पध्दतीने केले जात.वाठोडा जि. अमरावती येथे

कलावतीबाई योगाजी यांचा विवाह सत्यशोधक पध्दतीने 23 मार्च 1927 रोजी लागला सत्यशोधक समाजाने धार्मिक कार्याबरोबर शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेतले. शेतकऱ्याचे शोषण करणाऱ्याविरुध्द आंदोलने केली. शेतकरी आंदोलनाचे बुलढाणा जिल्हयात आंनद स्वामी यांनी नेतृत्व केले. सत्यशोधक चळवळीने ब्राम्हणाच्या पुरोहितशाहीला व धार्मिक अधिकाराला आव्हान दिले. समाज जागृतीसाठी सभा, सम्मेलने, परिषदा भरविल्या, वृत्तपत्र, मासिके, पुस्तके काढुन समाजाला वस्तुस्थितीचे ज्ञान करुन दिले. सत्यशोधक समाजाचे कार्य करणाऱ्यामध्ये अनेकांचा वाटा राहिलेला आहे. विशेषतः हरीभाऊ चव्हाण, कृष्णराव भालेकर, धर्माजी डुंबरे या वऱ्हाड बाहेरील लोकांचेही योगदान राहीलेले आहे.

वऱ्हाड प्रातांत सत्य शोधक चळवळीच्या पाठोपाठ दलितांची चळवळ सुरु झाली. दोन्ही चळवळीतीलं सुधारक सामाजिक सुधारणांचे पुरस्कर्ते होते. सत्यशोधक चळवळीच्या अनेक कार्यक्रमांना अमरावतीचे गणेश गवई व नागपूरचे किसन बनसोडे हे दोन महत्वाचे पुढारी हजर राहत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म. फुले यांना गुरुचे स्थान दिले आहे. त्यांनी स्वतः सत्यशोधक चळवळीत कार्य केले नाही. परंतु सत्यशोधक चळवळ म्हणजे समतेची, सद्मार्गाची चळवळ आहे असे विचार मांडले.

सत्यशोधक चळवळीच्या माध्यामातून व दलित चळवळीच्या पुढारी नेत्यांच्या मदतीने पश्चिम विद्र्भात समाज सुधारणेचे अनेक प्रयोग केले गेले. अस्पृश्यता निवारणाचा पहिला प्रयोग अमरावती जिल्हात बेलोरा गावचे यशंवतराव देशमुख यांनी केला. त्यांच्या घरी अस्पृश्य समाजाचा स्वयंपाकी होता. त्यांनी 1914 मध्ये अमरावती येथे भरलेल्या महार समाजाच्या जाहीर सभेत 'जाती बांधव' म्हणुन संबोधले. मी स्वतः देशमख असलो तरी महाराच आहे असे त्यांनी प्रतिपादन केले.

अस्पृश्यता निवारणामध्ये मंगरुळ दस्तगिरचे गणपती महाराज यांचे कार्य महत्वाचे आहे. ते सत्यशोधक विचाराचे होते. त्यांनी त्यांच्या कार्याची सुरुवात घरापासून केली. त्यांच्या चुलीपर्यंत अस्पृृश्यांना प्रवेश होता. राघवानंद माणिका , काकोजी इंगळे या अस्पृश्यांचा त्यांनी सन्मान केला. दस्तगीर येथील विठ्ठल मंदीर अस्पृश्यांना खुले केले.

सत्यशोधक ब्राम्हणेत्तर परिषदामध्ये दलितांचा सहभाग असे. अकोला जिल्हा परिषद 3 व 4 जून 1920 रोजी घेण्यात अकोट येथे घेण्यात आली. या परिषदेच्या स्वागत मंडळावर महार समजाचे तुलसीदास साधु यांचाही समावेश होता. डिसेंबर 1925 मध्ये 'अखिल' भारतीय ब्राम्हणेत्तर परिषद' अमरावती येथे झाली. यावेळी वेगवेगळया पाच परिषदा भरविण्यात आल्या होत्या. अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद यापैकी एक होती.

**मुल्यांकन :** काळाच्या ओघात सत्यशोधक चळवळीचे अनेक गट पडले. यामध्ये वऱ्हाड प्रांतातले डॉ. पंजाबराव देशमुख, आनंदराव कठके, उत्तमराव मोहिते, पंढरी पाटील यांचा समावेश होतो. सत्यशोधक समाजाचा सुधारक नेत्यांनी अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. दलित चळवळीला समांतर असलेल्या सत्य शोधक चळवळीने दलित चळवळीला उर्जा मिळवून दिली. एकून सत्यशोधक चळवळीने डॉ. आंबेडकरांच्या उदयापूर्वी दलित समाजाच्या सामाजिक, धार्मिक प्रश्नांना स्थान दिले. अस्पृश्यांच्या हितांसाठी कार्य करणाऱ्या प्रारंभिक चळवळीमध्ये सत्यशोधक चळवळीचे स्थान फार महत्वाचे आहे.

**संदर्भ :–**


1) खैरमोडे चांगदेव भगवानराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीची पार्श्वभुमी, 1088
2) मुंगूडकर मा.प., महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ, 1954
3) चोपडे अशोक, विदर्भातील सत्यशोधक चळवळीचे साहित्य, 2003
4) कोसारे एच.एल, विदर्भातील दलित चळवळींचा इतिहास, 1984
5) पाटील पंढरीनाथ, महात्मा फुले, 1989
6) मस्के बी.आर., विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, 2012

# पहली गोलमेज परिषद में डॉ. बाबासाहब अम्बेडकर की भूमीका को विदर्भ का योगदान

**प्रा. अरविंद म. पुनवटकर**
डॉ. हरिभाऊ आदमने कला व
वाणिज्य महाविद्यालय, सावनेर,

---

**गोषवारा :** भारत के राष्ट्रवादियों तथा देशभक्तों में डॉ. अम्बेडकर को साम्प्रदायिकवादी होने की संज्ञा दी अथवा नही, उन्हें इस बात की चिन्ता नही थी। वह सत्ता की दौड में नहीं थे, अपितु जनतंत्र : स्वतंत्रता तथा अपने लोगों के लिए समता के पक्ष में थे। इधर विदर्भ के नागपुर और धुळे, जळगाव, मुंबई की महार जनता नाशिक में समता हेतु कालाराम मंदिर में प्रवेश हेतु तत्पर थी। 28 मार्च 1931 में रामनवमी के दिन दंगल होने के संभावना गॉर्डन को थी। उन्होने पुलिस बंदोबस्त रखा था।[1] बाबासाहब का स्पष्ट मत था, ''हमारा लक्ष्य जीवन के सभी क्षत्रों–राजनीतिक, धार्मिक तथा सामाजिक में एक व्यक्ति, एक मूल्य के आदर्श को व्यवहारतः प्राप्त करना हैं चूंकि इस लक्ष्य की प्राप्ति की दिशा में प्रतिनिधि सरकार एक साधन है, इसलिए दलित धर्म इसको अधिक महत्व देते है, और चूंकि हमारे लिए इसका अधिक महत्व है, मैंने आपसे आग्रह किया है कि इस लक्ष्य की पूर्ति के लिए, आप ऐसी घोषणा की आवश्यकता महसूस करें।[2]
''राष्ट्र का निर्माण केवल भौगोलिक आधार पर नही हो सकता, समंदर, पहाडऋ, नदियां, जमीन का टुकडा राष्ट्र निर्माता के सिध्दांत का आधार नहीं होता, उसके निर्माता में वहां के मनुष्य ही सबल पात्र है, और वह समाज, वंश जाति, भाषा सम्प्रदाय, संस्कृति व धार्मिक मान्यताएं उसका ठोस आधार है। जब तक वह अपने हितों की वहां रक्षा हो रही है यह महसूस नहीं करता तब तक वह किसी धार्मिक राष्ट्रवाद का समर्थक या पोषक नहीं हो सकता। क्या हिन्दू राष्ट्रवाद या कोई धार्मिक राष्ट्रवाद एक वर्ग विशेष के अधिकारों की परिपूर्ति के खातिर ही जन्म लेगा और ऐसा होता है तो भारत में आज रह रहे 50 करोड हिन्दुओं का क्या?''[3] बाबासाहब का यह सवाल सोचने पे मजबुर करता है।

**शब्द संकेत : आंबेडकरी आंदोलन,गोलमेज परिषद और सामाजिक परिवर्तन मे विदर्भ की जनता का सहयोग**

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक संशोधन पद्धती का स्वीकार किया गया है।**

**प्रस्तावना :** 1930 की सबसे महत्वपूर्ण राजनीतिक घटना ब्रिटिश सरकार की ओर से लंदन में आयोजित 'गोलमेज परिषद' थी। परिषद का आयोजन साइमन कमीशन की रिपोर्ट पर कारवाई करने के उद्‌देश्य से किया गया था। सरकार ने कहा कि वह भारतीयों से परामर्श करके भारत का नया संविधान तैयार करना चाहती है। गोलमेज परिषद में 89 प्रतिनिधि आमंत्रित किए गए थे। उसमें से 16 तो ब्रिटेन के तीनों राजनीतिक दलों के प्रतिनिधि थे। 53 भारतीय प्रतिनिधियों में भारतीय राष्ट्रीय कांग्रेस के अलावा सभी दलों और हितो के प्रतिनिधि थे। महामहिम आगा खाँ, सर मुहम्मद शफी, मुहम्मद अली जिन्ना और फुजलुल हक मुसलमानों के नुमाईदे थे। सरदार उज्ज्वल सिंह सिक्खों के, डॉ. बी. एस. मुंजे हिंदु महासभा के और के. टी. पॉल भारतीय ईसाइयों के प्रतिनिधि थे। अलवर बड़ौदा, भोपाल, बीकानेर, कश्मीर और पटियाला के नरेशों के अलावा सरकार अकबर हैदरी, सर सी. पी. रामास्वामी अय्यर, सर मिर्जा इस्माइल देशी रियासतों के प्रतिनिधि थे। अस्पृश्यों का प्रतिनिधित्व करने के लिए डॉ. आंबेडकर और रायबहादुर श्रीनिवास आमंत्रित किए गए थे। दलितों के प्रवक्ता के रूप में डॉ. आंबेडकर का चयन अपने में एक विशेष बात थी। यह केवल उनका निजी सम्मान ही नहीं था। इसके साथ ही यह भारतीय राजनीति में अछूतों का शेष हिंदू समाज से अलग, स्वतंत्र तथा नए अल्पसंख्याक घटके के रूप में मान्यता देने की शुरूआत भी थी।[4]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जातिवाद, सामतावाद, पुंजीपती आदी के खिलाफ लढ रहे थे तभी वह अंग्रेज सरकार के साथ भी उनकी लढाई जारी थी। गोलमेज परिषद मे उन्होने अपने भाषण में कहा था की, भारत की अंग्रेजी सरकार में उनकी कमी है जब हम आज की मौजूदा दशा की अंग्रेजी सरकार के पूर्व की दशा से मुकाबला करते हैं तो हम पाते हैं, और हम भारत की जिस घृणास्पद स्थिति में पहले रह रहे थे, उसी घृणास्पद स्थिति में आज भी रह रहे है। ब्रिटिश शासन जो इतने लम्बे अर्से तक भारत में रहा, उसने हमारे भले के लिए कुछ भी काम किए होते तो हम खुशी से उसे स्वीकार करते लेकिन असलियत तो यह है कि हमारी (दलित वर्ग की) पूर्व मौलिक स्थिति में कोई बदलाव नहीं आया। वास्तविकता तो यह है कि अंग्रेजी शासन ने भारत में जिस तरह का सामाजिक ढांचा पाया उसे वैसा ही मान लिया और उसी व्यवस्था का अंग्रेज ईमानदारी से मानते रहे। हमारे प्रति जो सामाजिक बुराईयां थीं वह उसी प्रकार धडल्ले से कायम रही उनमें अग्रेजों के 150 वर्ष का शासन काल में कोई सुधार नहीं किया गया।

इसलिए अब हम भारत में ऐसी सरकार चाहते है जो देशहित में भारत के सामाजिक व आर्थिक मौजूदा कानूनों को बदलने में पूर्ण समर्थ हो। किसी ऐसी सरकार से क्या लाभ जो नेक इरादा रखते हुए भी हमारी समस्याओं को हल करने में असमर्थ हो।हम दूसरे सत्ता सम्पन्न लोगों के रहमो–करम, दया और मर्जी पर अब नहीं जीना चाहते हैं और न ही हम सत्ताधारियों के हाथों खिलौने बनना चाहते हैं हम कहना चाहते हैं कि हम भारत में एक उत्तरदायी सरकार चाहते हैं लेकिन हम यह नहीं चाहते कि सरकार के बदलाव में केवल मालिकों का ही बदलाव हो। अगर

आप जिम्मेदारी के साथ बदलाव करना चाहते हैं तो ऐसी व्यवस्था हो जिसमें विधायिका में सभी वर्गो को पूर्ण और वास्तविकता प्रतिनिधित्व प्राप्त हो।[5]

ब्रिटिश प्रतिनिधि पुनः आश्चर्यचकित हुए, जब डॉ. आंबेडकर ने यह कहा : ''ऐसी सरकार फिर किसके काम की? यह एक ऐसी सरकार है जिसने यह महसूस किया कि पूंजीपति मजदूरों को जीवनयोग्य वेतन नहीं देते हैं, और काम की अच्छी दशायें भी नहीं हैं, और उसने यह महसूस किया कि जमींदार लोग जन–समूहों को चूसे जा रहे हैं, फिर भी सरकार ने उस सामाजिक बुराइयों का अन्त नहीं किया जिन्होंने दलित वर्गो के जीवन को अनेक वर्षो तक धूमिल बनाये रखा। यद्यपि सरकार के पास इन बुराइयों को समाप्त करने के लिए कानूनी शक्तियां हैं, फिर भी उसने सामाजिक तथा आर्थिक जीवन की वर्तमान संहिता में संशोधन नहीं किया, क्योंकि उसे भय था कि सरकार द्वारा हस्तक्षेप उसके प्रति प्रतिरोध पैदा करेगा।'' इसलिए ''हमको एक ऐसी सरकार चाहिए, जिसमें सत्ताधारी लोग अपनी विभाजित आज्ञाकारिता को देश के सर्वोत्तम हितों की सेवा में लगायेंगे।''[6]

लन्दन पहुंचने के पश्चात डॉ. आंबेडकर ने सबसे पहला कार्य अल्पमत समिति को एक स्मरण–पत्र प्रस्तुत करने का किया। उसमें दलित वर्गो की सुरक्षाओं का विवरण था। अन्य सुरक्षाओं सहित, डॉक्टर साहेब ने निम्नाकिंत मांगे रखी

1) अस्पृश्यता को समाप्त कर, समान नागरिकता स्थापित की जाये,
2) सभी को समान अधिकारों के उपयोग के लिए स्वतंत्रता दी जाये,
3) सवर्ण हिन्दुओं द्वारा दलित वर्गो के बहिष्कार को एक अपराध घोषित किया जाये,
4) दलित वर्गो के लिए केन्द्रीय तथा प्रान्तीय विधान सभाओं में पर्याप्त प्रतिनिधित्व प्रदान किया जाए,
5) प्रथम दस सालों के लिए उन्हें वयस्क मताधिकार तथा पृथक निर्वाचन दिया जाये और तत्पश्चात उन्हे संयुक्त निर्वाचन सहित आरक्षित सीटें दी जाए,
6) सरकारी सेवाओं में दलितों को पर्याप्त स्थान दिए जाएँ अर्थात सेवाओं का पुनर्गठन इस प्रकार किया जाए कि सभी समुदायों का पर्याप्त प्रतिनिधित्व हो जाये।
7) दलित वर्गो की अन्य कठिनाइयों का निराकरण किया जाये और भेदभाव की नीति तथा उनके हितों की उपेक्षा से उनकी विशेष विकासात्मक योजना द्वारा रक्षा की जाए, और
8) मंत्री–परिषद के निर्माण तथा सरकार की निर्णय–प्रक्रिया में, दलित वर्गों को स्थान दिए जाएं।[7]

इंग्लंड के गोलमेज परिषद में जब गांधीजीने अस्पृश्यों के नेता हम ही है, डॉ. अम्बेडकर नही ऐसी बात बोली। तब विदर्भ से काफी आंबेडकरवादी नेताओंने गांधीजी नही तो डॉ.बाबासाहेब आंब्डकरही हमारे नेता है इस पकार के काफी तार लंडन भेजे.बाबू हरदास ने हजारों टेलीग्राम कामठी से इंग्लंड भेजकर कहाँ कि अस्पृश्यों के नेता गांधी नही डॉ. अम्बेडकर है, ऐसा कहकर इंग्रजों के मन में डॉ. अम्बेडकर के प्रति सहानुभूती पैदा की।

**मुल्यमापन :** पहली गोलमेज परिषद में डॉ. आंबेडकर के योगदान और उपलब्धि की समीक्षा करते हुए डॉ. एम. एस. गोरे ने यह मत व्यक्त किया है कि भारत के आंबेडकर ने गोलमेज परिषद में भाग लेनेवाले पर विशिष्ट छाप छोडी। उन्होंने दृढता और स्पष्टता से दलित वर्गो के हितों की हिमायत की। यद्यपि साइमन कमीशन ने अस्पृश्यों के लिए पृथक निर्वाचन मंडल और विशेष मताधिकार की उनकी माँग स्वीकार नहीं की थी, किंतु डॉ. आंबेडकर ने पहली गोलमेज परिषद में अपने सुयोग्य पक्ष प्रतिपादन से इस पूरे मुद्दे को पुनः विचारणीय बना दिया। डॉ. बाबासाहब अम्बेडकर के इस कार्य में विदर्भ की जनता ने पुरा सहयोग दिया। गोलमेज परिषद में अस्पृश्यों का नेता कौन? यह सवाल खडा किया गया तब विदर्भ की जनता ने डॉ. बाबासाहब अम्बेडकर को ही अपने नेता के तौर पर चुना और तार, खतो द्वारा अपना सहयोग दिया।

**संदर्भ सूची –**

1)य. दि. फडके – आंबेडकरी चळवळ, श्री विद्या प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, 1998, पृ.क्र. 32
2)डॉ. डी. आर. जाटव – राष्ट्रीय आन्दोलन में डॉ. अम्बेडकर की भूमिका, समता साहित्य सदन, जयपूर, प्रथम संस्करण–1989, पृ. क्र. 65.
3)सुरेश पाटील – दलित इंडिया, संगीता प्रकाशन, दिल्ली, प्रथम संस्करण, 2010, पृ.क्र. 65.
4)विवेकानंद तिवारी – अछूत मतवाद के सच गांधी और अम्बेडकर, सरला साहित्य मण्डल प्रकाशन, प्रथम संस्करण, 2011, पृ.क्र. 323.
5)डॉ. छेदीलाल साथी – दलित व पिछडी जातियों की स्थिती, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, पृ.क्र. 76, 77.
6)डी. सी. डीन्कर – स्वतंत्रता संग्राम में अछूतो का योगदान, गौतम बुक सेंटर, दिल्ली, 2007, पृ.क्र. 198.
7)डी. सी. डीन्कर – स्वतंत्रता संग्राम में अछूतो का योगदान, गौतम बुक सेंटर, दिल्ली, 2007, पृ.क्र. 197, 198.

# "सामाजिक परिवर्तन के परिप्रेक्ष में आंबेडकरी आंदोलन का योगदान"

मनोहर भी. येरकलवार
सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस.
कला व वाणिज्य महावि॥लय, नागपूर

**सारांश:** सामाजिक परिवर्तन यह समाजशास्त्र का आरंभ से ही एक चिंतन का विषय रहा है। समाज शास्त्रियों को जो सामाजिक परिवर्तन का अर्थ अभिप्रेत था, वही अर्थ डॉ. बाबासाहब अंबेडकरजी को भी अभिप्रेत था। इसलिए उन्होंने केवल विचारों तक ही सीमित नहीं थे। समाज व्यवस्था में परिवर्तन लाने के लिए अपना आंदोलन खड़ा किया और वह आंदोलन आज भी तेजी से चल रहा है। उन्हीं के कार्यों को आगे बढ़ाने के लिए बाबासाहब के विचारों एवं तत्वों पर समाज में चलनेवाले आंदोलन को अंबेडकरवादी आंदोलन कहा जाता है। यह आंदोलन किसी एक जाति, धर्म, पंथ या संप्रदाय के लोगों की समस्याओं को कम करने के लिए नहीं चलाई गई थी। इस आंदोलन में पूरे मानव जाति के पिछड़े हुए समस्याग्रस्त व्यक्तियों को सही तरह से रास्ता दिखाने के लिए यह आंदोलन छेड़ा जा रहा है। सामाजिक परिवर्तन के माध्यम से जाति, वंश, धर्म, अस्पृश्यता, सामाजिक मानवतावाद, सामाजिक समानता आदि सामाजिक विचारों में पुनर्निर्माण की प्रक्रिया होती है।

**शब्द संकेत : आंबेडकरी आंदोलन,उद्देश और सामाजिक परिवर्तन**

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक संशोधन पद्धती का स्वीकार किया गया है।**

**प्रस्तावना :**परिवर्तन प्रकृति का नियम है। चाहे वह परिवर्तन सामाजिक हो, आर्थिक हो, भौगोलिक हो, शैक्षणिक हो, धार्मिक हो, तथा तकनीकी हो। परिवर्तन यह अन्त एवं बाह्य कारणों से होता है। 'किसी भी युग में पूर्व की अपेक्षा आदर्श तथा मूल्य में परिवर्तन आता है, तो उसे आंतरिक परिवर्तन की संज्ञा दी जाती है। जबकि समाज के रीति—रिवाज, धर्म, वर्ग, जाति आदि का परिवर्तन बाह्य परिवर्तन कहलाता है।''[१] व्यक्ति के विचारों में, गुणों में, भावनाओं में या उसके व्यवहार में जो परिवर्तन होता है। उसे अन्त परिवर्तन कहलाता है। और भौतिक वस्तुओं के उपयोग के माध्यम से व्यक्ति के जीवन में जो परिवर्तन होता है, उसे बाह्य परिवर्तन कहा जाता है। इस तरह से समाज में भी दो प्रकार से परिवर्तन आ सकते हैं।

प्राचीन काल से भारतीय जीवन सभ्यता के विकास क्रम को देखने से यह पता चलता है कि, इसमें कई उतार—चढ़ाव देखने को मिलते हैं। बाहर से आए सभी विदेशियों ने इस देश के मूलनिवासी समाज पर अन्याय—अत्याचार कर उन पर अपना हुकूमत चलाने का काम किया गया। चाहे वह आर्य हो, मुस्लिम हो, पोर्तुगीज हो, या फिर ब्रिटिश हो। इन सभी विदेशियों ने इस देश के मूलनिवासियों के साथ कभी न्याय की दृष्टि से व्यवहार नहीं किए। हजारों सालों से भारतीय मूल निवासी अपने ही इलाके में दूसरों के द्वारा अन्याय, अत्याचार की चक्की से पीसे हुए दिखाई देते हैं। 'इन मूलनिवासी समाजों में अनुसूचित जाति, अनुसूचित जनजाति तथा अन्य पिछड़ा वर्ग भी शामिल है। जो आज भी विकास की अग्र पंक्ति से कोसों दूर है।''[२] हजारों वर्षो से इन मूल निवासियों को उनके अधिकार दिलाने के लिए कई महामानव ने प्रयास किए। इनमें भगवान बुद्ध, सम्राट अशोक, संत कबीर, संत तुकाराम, शिवाजी महाराज, क्रांतिबा ज्योतिबा फुले, शाहू महाराज, रामास्वामी पेरियार, नारायण गुरु, बाबासाहेब आंबेडकर, जोगेंद्रनाथ मंडल, माननीय कांशीरामजी इनके अथक प्रयासों से एवं कड़ी मेहनत से समाजव्यवस्था में सकारात्मक परिवर्तन दिखाई दे रही है। डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारत में सामाजिक परिवर्तन संबंधी दृष्टिकोण पर ध्यान देते थे। पहले भारतीय समाज के सामाजिक प्रश्नों के अनुसार उनमें सामाजिक सुधार चाहते थे। भारत के

समाजसुधारकों का सामाजिक सुधारों के विषय में उनका दृष्टिकोण बहुत ही संकुचित था। डॉ. बाबासाहेब आंबेडकर का मत था कि, राजकीय सुधारों की अपेक्षा सामाजिक सुधार अधिक महत्वपूर्ण है। सामाजिक सुधार से ही समाज में परिवर्तन होगा ऐसी उनकी बिल्कुल भी अपेक्षा नहीं थी। उनका यह स्पष्ट मत था कि, सामाजिक सुधार का काम सामाजिक व्यवस्था में मौलिक एवं सकारात्मक परिवर्तन लानेवाला होना चाहिए।

डॉ. बाबासाहेब आंबेडकर का आंदोलन का मुख्य उद्देश्य था कि, भारतीय समाजरचना की दोषों को कम करके उनमें सुधार लाना था। और सर्व सामान्य लोगों को न्याय दिलाना तथा स्वातंर्त्य, समता, बंधुता स्थापित करके एक आदर्श समाजव्यवस्था का निर्माण करना था। 'इसलिए उन्होंने स्वतंत्रता, समता, बंधुता तथा सामाजिक न्याय से रहित धर्म का त्याग करके आदर्श समाज की रचना के लिए बौद्ध धर्म का स्वीकार किया। और हिंदू समाज रचना में परिवर्तन लाने के लिए वर्ग व्यवस्था और जाति व्यवस्था पर लगातार प्रहार किए।''[३] व्यवहारिकता के धरातल पर भारतीय हिंदू समाज के स्वरूप में हुए क्रमिक परिवर्तनों का अवलोकन करने के पश्चात बाबासाहेब डॉ. अंबेडकर ने यह महसूस किया कि, 'यहाँ के सामाजिक जीवन के विभिन्न पक्षों का अनुसंधान तथा विश्लेषण किया जाए। ताकि उससे वर्ग, जाति, आश्रम, छुआछूत, परिवार, विवाह, धर्म, संस्कार आदि का समाजशास्त्रीय विवेचन किया जा सके।''[४] डॉ. बाबासाहेब के समाज सुधार विषयक विचार सीमित नहीं थे। समाज सुधार के माध्यम से समाज व्यवस्था में सकारात्मक बदलाव होना चाहिए। अन्यथा समाज सुधार का कोई अर्थ नहीं होता। 'इसलिए उन्होंने तत्कालीन समाज सुधारकों के सुधारनावादी विचारों का कड़ा विरोध किया था। समाजवादी लोगों के आर्थिक सुधार भारतीय सामाजिक समाज व्यवस्था में परिवर्तन लाने में असमर्थ रहे। इसे उन्होंने सिद्ध किया था।''[५]

महाराष्ट्र में सामाजिक परिवर्तन की शुरुआत संत महात्माओं और समाजसुधारको की कड़ी मेहनत से हुआ है। उन्होंने समाज की बुराइयाँ का कड़ा विरोध किया और समाज को सही रास्ते पर ले जाने के लिए जीवन भर प्रयासरत रहे। तब जाकर कई समाज में धीरे—धीरे परिवर्तन होने लगा। भारतीय समाज व्यवस्था में एक ही धर्म में रहने वाले लोगों की सामाजिक स्थिति भिन्न—भिन्न थी। हिंदू धर्म में शूद्र लोगों को मंदिर में प्रवेश नहीं था। उनके साथ सभ्य समाज द्वारा जाति के आधार पर भेदभाव किया जाता था। शूद्र समाज के लोगों को सभ्य समाज द्वारा अस्पृश्य कहा जाता था। इन लोगों द्वारा हर तरह से शोषण किया जाता था। इस तरह से इन लोगों को शोषण से मुक्ति दिलाने के लिए अनेक समाज सुधारकोंने प्रयास किए। जिनमें राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, पेरियार रामास्वामी नायकर, नारायणा गुरु, डॉ. बाबासाहेब अंबेडकर इन के अथक प्रयासों से शुद्र जाति में परिवर्तन आना प्रारंभ हुआ।

अंबेडकरवाद यह पुरोगामी वाद के जैसा नहीं है। अंबेडकरवाद में नकार, विद्रोह है। यह वाद विज्ञाननिष्ट है। इसमें ईश्वर, आत्मा, अंधश्रद्धा, रूढ़िवादी परंपरा इसका निर्मूलन किया गया है। यह धर्म शास्त्र और शब्द प्रमाण को नकारा जानेवाला साहित्य है। अंबेडकरवादी साहित्य यह कोई बौद्धिक कसरत करने वाली संकल्पना नहीं है। इसमें मनुष्य के कल्याण के लिए प्रत्यक्ष वातावरण निर्माण करनेवाली व्यवस्था लोकशाही मूल्य आधारित समाज निर्मिती है। अंबेडकरवाद याने बाबासाहब अंबेडकर के विचारों पर चलनेवाला मार्ग है। बाबासाहब ने अहिंसा के मार्ग पर चलते हुए लड़ाई लढी और उसमें जीत हासिल की। उन्होंने अपना आंदोलन सही तरह से चलना चाहिए इसलिए गरीब, शोषित, वंचित, आदिवासी, अल्पसंख्यक लोगों का विकास करने के लिए संविधान में कानून के माध्यम से प्रावधान करके रखे। बाबासाहब के विचारों का आंदोलन उनके पश्चात आज भी चलाई जा रही है। इसी आंदोलन को अंबेडकरवादी आंदोलन कहा जाता है। आज दलित साहित्य के नाम पर जो साहित्य है।

उस साहित्य के दो भिन्न श्रेणियां हैं। अंबेडकरवादी, मार्क्सवादी एवं हिंदुत्ववादी। ‘भगवान बुद्ध ने पूर्वप्रकट किया हुआ विचार को विकसित करने की प्रक्रिया को ताराचंद खांडेकर इन्होंने अंबेडकरवाद ऐसा कहा है।’[६]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ने दलित, शोषित, आदिवासी, अल्पसंख्यक समाज की सामाजिक समस्याओं का निर्गुण करने के लिए जीवनपर्यंत प्रयास किए। उन्ही के इस महान कार्य के माध्यम से भारतीय सर्वहारा समाज में परिवर्तन होना प्रारंभ हुआ है। बाबासाहेब अंबेडकर जी के समाज परिवर्तन के कार्य को आगे चलाने वाली विचारधारा को ही अंबेडकरवादी विचारधारा कहा जाता है। बाबासाहब अंबेडकर के आदर्श, विश्वासों, योग दर्शन के अद्‌भुत विचारों के आग्रह को अम्बेडकरवादी आन्दोलन कहा जाता है। अंबेडकरवादी का तात्पर्य होता है कि, वह व्यक्ति अथवा संगठन बाबासाहेब अंबेडकर द्वारा स्थापित मानवीय मूल्यों व आदर्शों तथा उनके विचारों का अनुपालन करनेवाला होता है।

अंबेडकरवादी आंदोलनकर्ता किसी भी धर्म, जाति, रूढ़िवादिता, अंधविश्वास, कर्मकांड, अज्ञानता और किसी भी प्रकार के भेदभाव को नहीं मानता। अंबेडकरवाद मानव को मानव से जोड़ने का, या मानव को मानवता के लिए बनाने का नाम है। अंबेडकरवाद वैज्ञानिक तथ्यों के आधार पर मानव के उत्थान के लिए चलाए जा रहे आंदोलन को कहा जाता है। व्यक्ति विकास के अंतिम लक्ष्य को प्राप्त करने की दृष्टि से स्वतंत्र, समता, बंधुता और न्याय इन मानवीय मूल्यों को आधारभूत मानकर संपूर्ण समाज में परिवर्तन लानेवाले दर्शन को अंबेडकरवाद कहते हैं। अंबेडकरवाद मानव मुक्ति का मार्ग है। इस तरह से मानव गरिमा के लिए चलाया गया आंदोलन को अंबेडकरवाद कहा जाता है। यह ऐसी विचारधारा है, जिसके माध्यम से प्रस्तापित समाजव्यवस्था के गुलाम लोगों को गुलामी से मुक्त कर मानवतावाद स्थापित करता है।

अंबेडकरवादी आंदोलन यह आंदोलन अन्याय करनेवाली व्यवस्था के खिलाफ था। इस आंदोलन के माध्यम से भारतीय सर्वहारा समाज को न्याय दिलाने का एवं समाज में जागृति लाने का कार्य किया गया है। भारत के दलित, शोषित, आदिवासी के मूल समस्याओं को सुलझाने के लिए इस आंदोलन को देश के हर कोने में ले जाकर लोगों में जागृति लाई है। इस तरह से इस अंबेडकरवादी आंदोलन ने देश भर में समाज जागृति का कार्य किया है। इस आंदोलन के माध्यम से देशभर के दलित, आदिवासी, अल्पसंख्यक समाज में परिवर्तन होते हुए दिखाई देता है। इस तरह से यह अंबेडकरवादी आंदोलन ने सिर्फ समाज में परिवर्तन लाने तक ही सीमित नहीं रहा, बल्कि समाज के प्रत्येक व्यक्ति को शिक्षित बनाने के लिए प्रयास किया। अंबेडकरवादी आंदोलन ने समाज में सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक विकास करने का प्रयास किया गया। इस आंदोलन को चलाने में माननीय काशीराम जी का बहुत बड़ा योगदान रहा है। उन्होंने उस समय के समाज को राजनीति के स्थान प्राप्त करने कराने के लिए अग्रेषित किए। इस तरह से आज दलित, शोषित, आदिवासी, अल्पसंख्यक समाज का जो विकास हुआ है, वह सिर्फ डॉ. बाबासाहेब अंबेडकरजी के कार्यो से और अंबेडकरवादी आंदोलन के माध्यम से जन—जन तक यह विचार पहुँच गए और समाज में परिवर्तन हो रहा है।

इस आंदोलन के माध्यम से समाज के समस्याओं को सरकार द्वारा निर्मूलन कराने को मजबूर किया गया। इसके माध्यम से सरकार द्वारा इस समाज के विकास के लिए विभिन्न तरह की योजनाओं का अवलंब कराने को मजबूर किया है। इस तरह से इसमें अंबेडकरवादी आंदोलन का बहुत बड़ा योगदान है। आज के सामाजिक परिवर्तन के परिपेक्ष में भारतीय समाज के दलित, शोषित, आदिवासी, अल्पसंख्यक एवं महिलाओं का जो सामाजिक विकास हुआ है और जो विकास हो रहा है। उस विकास के लिए अंबेडकरवादी आंदोलन कर्ताओं के

द्वारा चलाया गया आंदोलन का महत्वपूर्ण योगदान है। इस योगदान के जरिए भारतीय समाज में परिवर्तन हो रहा है। आधुनिक परिपेक्ष में भारतीय समाज शिक्षा के माध्यम से विभिन्न क्षेत्रों में अग्रेसर होते हुए दिखाई दे रहे हैं। भारतीय समाज को शिक्षा के बारे में जागरूक करने का कार्य अंबेडकरवादी आंदोलन के माध्यम से ही हुआ है।

निष्कर्ष :— भारतीय समाज को अपनी समस्याओं के विरोध में लड़ने का एवं अपने हक और अधिकार मिलाने के लिए संगठित होकर संघर्ष करने की ताकत अंबेडकरवादी आंदोलनों के माध्यम से मिली है। आज हर तरफ जो विकास दिख रहा है। इस विकास के पीछे बहुत बड़ा अंबेडकरवादी आंदोलन का योगदान है। अगर अंबेडकरवादी आंदोलन चलाई नहीं जाती तो आज की समाजव्यवस्था बहुत ही समस्याग्रस्त दिखाई देती। अंबेडकरवादी आंदोलन कर्ताओं ने समाज की मूल जड़ों को जानकर समाज को विकास के मुख्य प्रवाह में लाने के लिए उनमें जागृति लाई और उसके माध्यम से लोग जागृत होकर अपने अन्याय और हक्क के लिए इकट्ठा हुए। बाबासाहब अंबेडकर के सपने को साकार करने के लिए लोग संगठित हुए और संगठन बनाए। अपने समाज के प्रति उत्तरदायित्व को निभाने के लिए, समाज को मुख्य प्रवाह में लाने के लिए एवं समाज को शिक्षित बनाने के लिए अम्बेडकरवादी अन्दोलकोने कार्य किये। आज भी भारत में गरीबी, भुखमरी, अशिक्षा की समस्या बहुत बड़ी है। अंबेडकरवादी विचारधाराओं के माध्यम से समाज में इस तरह से परिवर्तन लाना है, तो समाज के कोने कोने में जाकर समाज को जागरूक करना होगा ! तब जाकर कहीं भारतीय समाज का सर्वांगीण विकास हो सकता है।

संदर्भ :—


१. उपाध्याय, सौरभ. (२०१२), 'भारत में सामाजिक परिवर्तन' इसीका पब्लिशिंग हाउस, जयपुर. पृष्ठ क्रमांक. १.

२. गजभिए, संजय. (२०१०), 'अन्य पिछड़ा वर्ग और डॉ. बाबासाहेब आंबेडकर' सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, पृष्ठ क्रमांक. ९.

३. अगलावे, प्रदीप. (२००५), 'महान समाजशास्त्री बाबासाहेब डॉ. अंबेडकर' सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, पृष्ठ क्रमांक. १७५.

४. गजभिए, संजय. (२०१०), 'अन्य पिछड़ा वर्ग और डॉ. बाबासाहेब आंबेडकर' सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, पृष्ठ क्रमांक. १००.

५. अगलावे, प्रदीप. (२००५), 'महान समाजशास्त्री बाबासाहेब डॉ. अंबेडकर' सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, पृष्ठ क्रमांक. १८०

६. खांडेकर, ताराचंद. (१९८१), 'अंबेडकर तत्वज्ञान : प्रचित्ति आणि अविष्कार', प्रभा प्रकाशन, नागपुर पृष्ठ क्रमांक. ५५.

# नागलोक : बौद्ध धम्म के प्रचार और प्रसार मे योगदान

प्रा. दिपमाला प्रभू सुरवसे
इतिहास विभाग
मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यु.एस.
कला व वाणिज्य महाविद्यालय,नागपूर

---

**सारांश :** बौद्ध संस्कृती मे निसर्ग, कला एवं सौदर्य को असाधारण महत्व प्राप्त है। आज हम देखते है, की , पुरे विश्व में बौद्ध संस्कृती का प्रभाव दिखई देता है। बौद्ध साहित्य को देखते है तो बौद्ध आचार्यों ने भी सौदर्यशास्त्र और कला को विशेष महत्व दिया है। आज 1956 के बाद में अगर देखा जाये तो बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर ने बौद्ध धम्म का स्वीकार कर अपने समाज को भी इस बौद्ध संस्कृती का परिचय दिया है , और उस बौद्ध संस्कृती को आगे ले जाने के लिए प्रेरित किया। आज हम देखते है की, पिचले 65 सालो में भारत में कई जगो पर बौद्ध विहार, बौद्ध शिविर – ध्यान केंद्र और बौद्धधम्म प्रशिक्षिण केंद्रो का निर्माण हूवा है। विदर्भ के इतिहास में अपना महत्वपूर्ण स्थान रखने वाले बौद्ध पर्यटन स्थल अस्तित्व में है। आज हम देखते है की पूरे विश्व के बौद्धो का श्रद्धास्थान दीक्षाभूमी, ड्रेंगन पॅलेस, शांतीवन हो या नागलोक यह अपने आप मे एकं विशेष ऐसा स्थान रखते हैं। लेकिन इन सभी में नागलोक की पर्यटन स्थल के रुप में उस की एक विशषता है। ना सिर्फ भारत बलकी विश्व में नागलोक यह बौद्ध प्रशिक्षण केंद्र के रुप मे प्रसिद्ध है। इस लिए नागलोक देखने के लिए समुचय विश्व के लोग पर्यटक के रुप में आते है।

**शब्दसंकेतः बोधिसत्व, पर्यटन, सौदंर्यशास्त्र और बौद्ध धम्म के प्रचार**

**संशोधन पद्धती : ऐतिहासिक संशोधन पद्धती का स्वीकार किया गया है।**

**प्रस्तावना :** आज नागलोक स्थल भारत ही नही विश्व के अन्य देशों का भी प्रमुख आकर्षण केंद्र बन चुका है। नागलोक परिसर 15 एकड मे बना हूआ है इस को एक बौद्ध पर्यटन स्थाल के रुप में जाना जाता है। नागलोक की निर्मिती की योजना सन 1994 की गई थी। नागलोक यह नागपूर से 10 की. मी. की दुरीपर बना हुआ है। नागलोक में सन 2002 से निवासी धम्म प्रशिक्षण की सुवात कि गई है। यह धम्म प्रशिक्षण करीबन 18 सालो से मोफत में चलाया जारहा है। नागलोक केंद्र के निर्मान का संपूर्ण श्रेय धम्मचारी लोकमित्र इन को जाता है। शुरुवात में केवल धम्म प्रशिक्षण हेतू स्थापित किया गया नागलोक केंद्र अपने प्राकृतिक सौदर्य और धार्मिक गतीवीधीयां के कारण एक बौद्ध पर्यटन स्थल के रुप में विकसित हूआ दिखई देता है। अन्य स्थलो के भांती इस मे भी बुद्ध और बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आहंबेडकर इन की मुर्तीया इस के अलावा अन्य भी अनोखी ऐसी वस्तूये पर्यटकों को दिखाई देती है। जैसे बुद्धसुर्य विहार , नागार्जुन प्रशिक्षण केंद्र , भव्य ग्रंथालय, धर्मशाला , छात्रावास एवं ध्यान साधना केंद्र. यह इमारतीयो की सौदर्य एवं महत्व दिखने को मिलता है।

**नागलोक की रचना :** बौद्ध संस्कृती का पूननिर्माण याने नागलोक है। नागलोक स्थित सभी इमारते नालंदा विश्वविद्यालय का प्रारुप है। जो आधुनिक नालंदा के जैसा प्रतित होता है। यह इमारते ईंटो से बनी हुई है और उपर का छत चंद्राकार मोड मे बनाया गया है। यह बौद्ध लेणी और स्तुपो के आकार जैसा दिखाई देता है। धम्मचारी लोकमित्र की कल्पनाओं को मूर्ती रुप में देने का महत्वपूर्ण काम किया है इंग्लैण्ड के स्थापत्य–अभियंता प्रो, खिस्तोफर चार्ल्स बेनिंजर ने। जिन्होंने नागलोक के पूरे इमारतो का नक्शा बनाया है। इस परिसर मे कुल 12 इमारते है जिसका उपयोग विविध गतीविधियों के लिये किया जाता है।

**1) बुद्धसुर्य विहार :–**इस विकार का निर्माण 1998 सन मे किया गया है। इस विहार मे स्थापित ''बुद्धमूर्ती धम्मचक्र प्रवर्तन मुद्रा'' मे है। इसका नामकरण बुद्धसुर्य ऐसा इसलिए किया गया है क्योंकि एक सुर्य की भॉती धम्म का ज्ञान यहॉ प्राप्त होता है। सुर्य की भॉती धम्म का ज्ञान यहॉ प्राप्त होता है। सुर्य किसी मे भेद नही करता उसी प्रकार बुद्ध की शिक्षा भी हमे समान रुप मे मिलती है।

**2) नागार्जुन धम्म प्रषिक्षण केंद्र** :–भारत के विभिन्न प्रांतो से यहॉ युवाओं को आठ माह का निवासी धम्मप्रशिक्षण दिया जाता है। तथा त्रिरत्न बौद्ध महासंघ के केंद्र के रुप मे भी जाना जाता है। विभिन्न

राज्यों से आये विभिन्न भाषा बोलनेवाले और विभिन्न संस्कृती एवं जाती से यहॉ प्रशिक्षणार्थी युवा आते है। इस धम्मसेखिय प्रशिक्षण में बौद्ध जीवन का महत्व डॉ. आंबेडकर की द्ष्टी से पढाया जाता है। प्रशिक्षण का विषय ही है, ::बौद्ध धम्म, डॉ. आंबेडकर और समाजकार्य'' इस के तहत उन्हे सामाजिक परिवेश मे स्वयंम जाग्ती और ध्यानभावना पढाई जाती है।

**3) 56 फूट चलत बुद्ध मुर्ती :**यह बुद्ध मुर्ती पर्यटकों का प्रमुख आकर्षण केंद्र है। सन 2009 मे इस बुद्धमुर्ती को स्थापित किया गया है। डॉ, आंबेडकर चलत बुद्ध हो ऐसा चाहते थे क्योंकि बुद्ध जीवन के अन्त तक चलते रहे और लोगों को धम्म बताते रहे। उन्ही की दृष्टी को ध्यान मे रखते हुए 56 फूट की इस बुद्धमुर्ती का निर्माण किया गया । यह मुर्ती तायवान के मुर्तीकार 'वेन–क्वी' ने किया है। और इसको पूर्णरुप उसे आर्थिक सहकार्य भन्ते कॉन–सिन (चीन) ने दिया है। इस के अलावा तायवान, चीन आदि देशो से भी भिक्षुओं ने दान के रुप मे आर्थिक सहकार्य दिया है। ताकी, यहॉ आनेवाला हर व्यत्की प्रेरणा ले की, अच्छी जीवनप्राप्ती के लिए स्वयंम जागृती महत्वपूर्ण है।

**4) डॉ, बाबासाहेब की पूर्णाकृती प्रतिमा :** नागपूर मे बौद्ध, धम्म की दीक्षा लेकर अभूतपूर्व क्रांती करनेवाले डॉ, आंबेडकर का पूर्णाकृती पुतला भी इस परिसर की शान बना हुआ है। बाबासाहब की वह धम्मक्रांती, धम्मदृष्टी हमेशा समाज को जागृत करती रहे इस उद्देश्य से यह दीक्षा समारंभ के समय का पुतला बनाया गया है। जिसे देखते ही धम्मदीक्षा समारोह के समय की बाबासाहब की छवी ऑखो के सामने आ जाती है।

**5) संबोधी परायण शाला :** सुंदर , शांत वातावरण मे बुद्ध की मुर्ती और उस वास्तु की एक विशिष्ट संरचना इस 'संबोधी' नामक वास्तु मे देखने मिलती है। यहॉ पे त्रिरत्न बौद्ध, महासंघ के अंतर्गत चलाये जानेवाले सभी कियाकलाप संपन्न होते है। डॉ.बाबासाहेब का ''प्रबुद्ध भारत'' बनाने का सपना साकार करने मे यहॉ पर दी जानेवाली शिक्षा अपनी महत्वपूर्ण भूमिका निभाती है। इस के अलावा यहॉ पे शाक्यकुल, गुध्रकूट जैसी अन्य वास्तु भी है इन मे से हर किसीका धम्म गतिविधियों को सुचारु रुप से चालू रखने मे अहम योगदान है।

**6) आंतरराष्ट्रीय केंद्र** : बौद्ध शिक्षा एवं संस्कृती का एक आंतरराष्ट्रीय केंद्र के रुप मे नागलोक भारत एवं विश्वभर मे विख्यात है। भारत के हर कोने से आये हुये छात्र यहॉ पर बुद्ध धम्म की शिक्षा ग्रहण करते है। लगभग हर राज्यसे यहॉ पर छात्र आते है। इसलिए नागलोक को डपदप पदकपं भी कहा जाता है। इस के अलावा यहॉ पर प्रशिक्षण प्राप्त विद्यार्थी चीन,थायलंड,तायवान,इंग्लैड आदि राष्ट्रों मे जाकर बौद्ध धर्म का अगला अध्ययन पूरा कर रहे है। आंतरराष्ट्रीय दर्जे के अनेक बौद्ध पंडीत, विव्दान यहॉ पे आ चुके है। जिसके परिणाम स्वरुप अन्य बौद्ध राष्ट्रो की संस्कृती के साथ आदान–प्रदान होता है।

**मुल्यमापन :** नागलोक स्थल बौद्ध संस्कृती और धम्म को खुद मे समेटे एक अनोखा बौद्ध पर्यअन स्थल है। बाबासाहब जिस 'प्रबुद्ध भारत' को बनाना चाहते थे उसके बनने की शुरुवात यहॉ के हर वास्तु, मुर्ती एवं छात्रो मे दिखाई देती है। उसकी एक अहम विशेषता यह भी है कि, यह पूरी तरह से लोगों द्वारा इकट्ठा किये दान पर चलता है, इसमे कुछ भारतीय तथा शेष सभी विदेशी दानदाता व्यत्की है। भारत को बुद्धमय करने के प्रवाह मे नागलोक की भूमिका एक बौद्ध पर्यटन स्थल और एक बौद्ध अध्ययन केंद्र के रुप मे अनन्यसाधारण है। महान बौद्ध गुरु दलाई लामा जी ने नागलोक के बारे मे अपना मत व्यक्त करते हुये कहा है, ''नागलोक केंद्र यह डॉ, बाबासाहेब के कार्य को आगे ले जाणे मे पूरी तरह से कार्यरत है, जो मानवीय मूल्य करुणा, मैत्री और मानवतावाद को आगे ले जा रहा है''। (पु, दलाई लामा, नागलोक 2014)

**संदर्भ सुची**

1) लोखंडे भाऊ–नागपूर नगरी त्रिशताब्दी इतिहास ग्रंथ–नागपूर नगरी इ, उप–समीती पृष्ठ–कं,–445
2) संघरक्षित उर्गेन–बौद्ध धम्म और शिक्षण
3) लोकमित्र धम्मचारी–बुद्धयान अंक–2 (1997) आंबेडकरवाद– सिंहनाद प्रकाशन
4) प्रा. प्रभाकर लालविजय– बौद्ध धर्म का विकास – धम्मचारी लोकमित्र का योगदान

# विदर्भातील बौध्द पर्यटन स्थळे

**प्रा. प्रणोती सु. कांबळे**
(पाली विभाग प्रमुख)
डॉ. मधुकर राव वासनिक पी.डब्ल्यु.एस.
कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

**सारांश :–**महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ विभागात नागपूर जिल्हा मोडतो हा नागपूर जिल्हा भारताच्या जवळ–जवळ मध्यभागी असुन भारताचा शुन्य (0) मैलाचा दगड नागपूर शहरात आहे. देशाच्या मध्य भागात असल्याने देशातील महत्वाचे लोहमार्ग व महामार्ग नागपूर जिल्हातून जातात. नागपूर शहर हे महाराष्ट्र राज्याची उपराजधानी आहे.या उपराजधानीत नागपूर शहर दीक्षा भूमी ही आंबेडकरवादी बौध्द धर्मिय यांचे हे एक महत्वाचे केंद्र आहे. हे विदर्भातील बौध्दांचेच नव्हे तर भारतातीय जागतीक बौध्द धर्मीयांचे केंद्र आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी आपल्या लाखो अनुयायांसह बौध्द धम्माची दीक्षा घेतली होती. म्हणुनच या भूमीला दिक्षाभूमी म्हटले गेले आणि येथे एक भव्य असा स्तुप उभारला गेला आणि हा स्तुप आकाराने भव्य आहे.या स्तूपाला धम्मचक्र स्तूप असेही म्हटले जाते.जगाच्या इतिहासातील ती एक अपूर्व घटना घडली ती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या ठिकाणी बौध्दधम्माची दीक्षा दिली. ते दीक्षा मैदान आता दीक्षाभूमी या नावाने जगभरात ओळखल्या जाते व ते स्थळ जागतील बौध्दांचे प्रेरणास्थान बनले आहे. आणि भारतातील बहुजनांचे बौध्दधम्माची वळण्याचे प्रेरणास्थान झाले आहे. दीक्षाभूमी हे केवळ एक स्थळ नसून विचारांचे मानवमुक्तीचे केंद्र आहे.

**शब्द संकेत : दीक्षाभूमी, ड्रगल पॅलेस ,शांतीवन चिचोली, मनसर,**

**संशोधन पद्धती :ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**प्रस्तावना :** दीक्षाभूमीची तुलना मुसलमानाचे हज व ख्रिश्चनाच्या पवित्र जेरूसलेम व वॅटीकन सिटीशी होऊ लागली आहे. संपूर्ण जगात दिक्षाभूमीकडे मानवतावादाचे प्रतिक म्हणुन बघितले जाते. दीक्षाभूमी केवळ श्रध्देचे स्थान नसुन ते सामाजिक राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणीक चळवळीचे प्रेरणास्थान बनलेले आहे. ते केवळ भारतीतील मागासवर्गीय वर्गाचेच आकर्षक केंद्र बनले नसून जागतिक कीर्तीचे ते पर्यटन स्थळ झाले आहे. आणि आज दीक्षाभूमी एका मार्गदर्शकाची भूमिका बजावत आहे. नागपूरच्या एका ओसाड जागेला अचानक एवढे महत्व का प्राप्त झाले याचा इतिहास जाणून घेणे आणि दीक्षाभूमीवरच्या वादळ वाऱ्यांनी क्रांतीकारी चळवळीला कशी प्रेरणा मिळते हे पाहणे महत्वाचे आहे.

**दीक्षाभूमीची जडण घडण :–**डॉ. बाबासाहेबांनी 14 ऑक्टोबर 1956 ला लाखो अनुयायांसोबत दीक्षा घेतली आणि अकाळी 6 डिसेंबर 1956 ला महापरिनिर्वान झाले. नागपूरच्या नागभूमीत बाबांना बौध्दधर्माची दीक्षा घेऊन भारताच्या इतिहासात त्यांनी आपले नाव अजरामर केले. या पवित्र अशा दीक्षामैदानावर बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणाच्या दीड महिण्यानंतर म्हणजे जानेवारी 1957 ला पौर्णिमापासुन आढवडयानी प्रत्येक रविवारी नागपूरातील बौध्द लोकांना बुध्द वंदना आणि बुध्द आणि त्यांचा धम्म यांचे पठन केले जाई त्या काळी दीक्षाभूमी एक मोकळे मैदान होते.[1]

आंबेडकरी चळवळीत कार्य करणारे कार्यकर्ते आंबेडकरांचे तत्वज्ञान प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी बौध्द जनतेला मार्गदर्शन करण्याचे महत्वपूर्ण कार्य पार पाडीत होते. अशा परिस्थितीत सुवर्ण अश्या संधीचा फायदा घेऊन हरिदास आवळे, मेंढे गुरूजी, भीमराव गजघाटे, किसन गायकवाड, लीलाधर माटे, होलूजी खापर्डे इत्यादी कार्यकर्ते एकमेकांच्या सहकार्याने केले होते.[2] आंबेडकर जयंतीच्या एक दिवसा आधि 13 एप्रील 1956 ला रात्री 9 वाजता एकस्तंभ उभा केला आणि त्या स्तंभावर एक भगवान बुध्दाची मुर्ती बसविले. ती सुध्दा एका रात्रीच रिकाम्या शासकीय जागेवर कोणी अतिक्रमण केले. त्यामुळे सिताबर्डी पोलिस ठाणे नागपुर येथे अज्ञान व्यक्तीवर खटला दाखल करण्यात आला व पुढे "नागपूर चे तहसीलदाराने लॅन्ड रेव्हेन्यू ॲक्ट 1963 अन्वये स्मारक समितीचा, बौध्द महासभेचा आणि शेडयुल्ड कास्ट फेडरेशनच्या प्रमुख पुढाऱ्यांवर खटला भरला".[3] शासकीय जमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमण करता येत नाही. म्हणून न्यायाधिशांनी विचारले की, "दीक्षाभूमीवर हा स्तंभ बेकायदेशीर कोणी बांधला तर काही पुढाऱ्यांनी शिक्षेच्या भितीपायी लोकांनी बनविल्याचे सांगीतले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे कार्यवाह म्हणविवारे आर.आर. पाटील यांनी ही आम्हाला माहित नाही. असे सांगितले. पण आवळेबाबु यांना प्रश्न विचारला असता. त्यावर त्यांनी मी बांधले आहे. असे स्पष्ट उत्तर त्यांनी दिला. त्यानंतर काही दिवस आवळे बांबूवर खटला सुरू होता. शेवटी न्यायाधिशांनी त्यांची सुटका केली.[4]

कदाचीत आंबेडकरी चळवळीचे आवळे बाबु यांनी या दीक्षा मैदानावर बुध्दाचा पुतळा बसविला नसता तर कदाचित ही भूमी बौध्दांना मिळाली नसती. हे ऐतिहासीक कार्य नाकारता येत नाही.मुंबई राज्याचा शासनाने ती जागा बौध्दांना द्यावी या साठी पहिला प्रयत्न 27 जुलै 1958 रोजी झाला. या दिवशी त्या वेळचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हान होते. ते त्यांचे चहापाण्याचे आयोजन नागपूरातील दिक्षामैदानाजवळ राहण्याऱ्या डॉ. ना.भा. खरे यांच्या बंगल्यावर करण्यात आले होते. डॉ. खरे यांच्या बंगल्यावरील चहापार्टीच्या कार्यक्रम प्रसंगी त्यांच्या स्वागताला कॉम्रेड ए.बी. बर्धन, बच्छराज व्यास, डॉ. ना.भा. खरे, आमदार पंजाबराव शंभरकर, संपादक हरिकिसन अग्रवाल, रामरतन जानोरकर, हरेश्रर चहांदे व कृष्णा थुल उपस्थित होते. त्या सर्वांनी बाबू आवळे यांच्या इशाऱ्यामुळे आक्षेप न होता निवदेनावर स्वाक्षऱ्याकेल्या.[5]
संपूर्ण भारतातील बौध्दांचे पवित्र स्थळ दीक्षाभूमी असल्या नागपूरातील बौध्द अ. बौध्दांनी देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर या राष्ट्राने मात्याने धम्मदिक्षा दिली. ती भूमी सरकार कडून प्राप्त व्हावी या करिता प्रयत्न केले. जेंव्हा मुंबई मुख्य प्रांताचे मुख्य मंत्री यशवंतराव चव्हान साहेबांचे आगमन झाले. तेव्हा सर्व कार्यकत्यांनी त्यांना पुष्पहार घालुन स्वागत केला आणि त्यांच्या हातात मागणीचे निवेदन दिले.[6] मुख्यमंत्राच्या चहापार्टीच्या कार्यक्रमा प्रसंगी आंबेडकरी चळवळीतील कार्यकत्यांनी, बाबु आवळे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातुन म्हणाले की, "बाबासाहेब आंबेडकर यांनी दीक्षाभूमीवर लाखो बौध्दांनी बुध्दधम्माची दीक्षा दिली." तसेच बुध्दाचा धम्म आपल्या मातृभूमीत पुन्हा परत आणला व भारतावर महान उपकार केले. अशी ही दीक्षाभूमी आमा बौध्दांचे श्रध्दास्थान आम्हाला मिळाले पाहिजे.[7] अशी भूमिका मांडून मुख्यमंत्र्याना निवेदन दिले. तेव्हा मुख्यमंत्र्यांनी या निवेदनावर दीक्षाभूमी देण्यात येईल. असे अश्वासन दिले. ही दीक्षाभूमीची जागा बौध्दांना मिळावी या करिता नागपूरातील अन्य राजकीय पक्षातील पुढारीपण अग्रेसर होते.अशा प्रकारे यांनी एवढी मोठी ऐतिहासीक कामगीरी केली. जर मेहनत व पुढाकार घेतला नसता. तर आमचा बौध्द म्हणुन घेण्याचा अधिकारच हिरावला गेला असता. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नागपूरातील ऐतिहासीक धम्मक्रांतीनंतर निर्माण झालेली दीक्षाभूमी हे आवळेबाबु, भिमराव गजघाटे, किसन गायकवाड, मेंढे गुरूजी, लिलाधर माटे, होलुजी खापर्डे, यांच्या संघर्षाचे फळ आहे.[8]
धर्मातराच्या महत्वूपर्ण घटनेत नागपूर हे शहर जगाच्या नकाशात भारतातील नवे बौध्द स्थान म्हणून झलकु लागले. दीक्षाभूमी या नावाने नागपूर ला एक नवे अस्तित्व प्राप्त होणे हा नागपूरचा सन्मान होय. दीक्षाभूमीच्या जडण घडणीत अनेक संस्थांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.
**ड्रगन पॅलेस :–**नागपूर पासून उत्तरपूर्वला केवळ 15 कि.मी. अंतरावर "कामठी" हे ठिकाण आहे. कर्मवीर दादासाहेब कुंभारे परिसर येथे बौध्द साहित्यातील सध्दर्मपुंडरिक सुत्र यावर आधारित साहित्याचे प्रतिक तयार करण्यात आले ते ड्रॅगल पॅलेस टेम्पल नावाने प्रसिध्द आहे.[9]
1993 साली कामठीत बिडी कामगारांच्या समस्यांसाठी आरमरण उपोषण करीत असताना. जपानी धम्मसेविका नोरिको ओगावा भंते आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्यासह सुलेखाताई भेटल्या आणि धम्मसकेत्य आभासार आले. इ.स. 1999 मध्ये ॲड सुलेखाताई कुंभारे आणि जपानच्या नोरिको ओगावा यांच्या ओगाव सोसायटीच्या माध्यमातुन, परस्पर सहकार्यातून "ड्रॅगन पॅलेस" ही भव्य वस्तु धम्मसंदेश प्रसारित करण्यासाठी सज्ज झाले. ही वास्तु जगातील अप्रतिम कलाकृती ठरले कर्मयोगी दादासाहेब कुंभारे यांच्या सुकंन्या ॲड सुलेखाताई यांनी 10 एकड जागेत या बौध्द प्रतिभांची निमित्ती केली. जपान तर्फे भेट मिळालेली ही बुध्द मूर्ती 864 किलो वजनाची असून चंदनाच्या अखंड लाकडापासून बनाविण्यात आली आहे. अद्योनिमित्ती डोळयांच्या या मुर्तीमध्ये वेगवेगळया कोणातून विविध भावमुद्रा दृष्टीस पडतात. सतत शांतीपूर्व वातावरण निर्मित्तीची व स्वच्छतेची दखल घेतली जाते. त्यामुळे परिसरात प्रवेश करणाऱ्याला सुखशांती आणि समाधानाची अनुभूती होते.विश्वाला मैत्रीच्या एकसुत्रात बांधणारी ही वास्तु भारत–जपान मैत्रीय प्रतिक असुन बौध्द संस्कृतीचा वारसा आहे. या वास्तुंमधून तथागतांच्या पंचशिल तत्वांचा संदेश सतत ध्वनित होतो. त्यातुन मानसिक शांती लाभते. या वास्तुच्या निमीर्त्तीने कामठी हे बौध्द स्थळ म्हणून भारताच्या नव्हे तर जगाच्या नकाशामध्ये पर्यटन क्षेत्र म्हणून प्रसिध्द आहे.
**शांतीवन चिचोली :–**नागपूर कळमेश्वर मार्गावर 15 कि.मी. अंतरावर फेटरीपासुन पश्चिमेकडे वळण घेतल्यानंतर चिचोली नावाचे छोट गाव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक या ठिकाणी उभारण्याचे श्रेय त्यांचे घनिष्ट सहकारी आयु. वामनराव गोडबोले यांचे आहे. प्रशस्त वास्तु तयार करून तेथे बाबासाहेबांचे स्मृतीस्थळ उभारले. येथे बाबासाहेबांच्या जिवनाची महत्वाचे वस्तुचे, संग्रहालय आणि मुर्तीची प्रतिष्टापना केलेली आहे. धम्मचक्र अनुवर्त्तन दिन, पोर्णिमा बुध्द आणि डॉ. आंबेडकर जयंती या

प्रसंगाला समाज बाबासाहेबांच्या आणि बुध्दाचा मैत्री करूणा शांती अहिंसेचा संदेश घेऊन जातात. हीच संस्कृती महत्वाची भूमिका ठरते.

**मनसर :–**मनसर, रामटेक, नगरधन, नागार्जुन टेकडी हे परिसर प्राचीन काळी भगवान बुध्दाचा अनुयासांचा असुन भगवान बुध्दाचे स्तुप, चैत्य, विहाराचे अवशेष आजही येथे विद्यमान आहेत. हया बाबी त्यांनी शोधन काढळे. व 1958 साली आठ पाणी–पुस्तक लिहून प्रकाशित केले होते. अनेक पत्रेक काढले व रामटेक प्राचिन काळापासुन बौध्द कालीन क्षेत्र असुन नागार्जुन हे विश्वविद्यालय आयुर्वेदाचार्य असून यांचे निवासी वास्तव्य येथे होते. त्यांच्या नावाने प्राचीन टेकडी आजही विद्यमान आहे. फारमोठया प्रमाणात येथे भिक्षुसंघ होता. त्यांच्या सहवासामुळे नागार्जुन येथे वाढला व मोठा झाला त्यांचा अपमृत्यु होणार असे भविष्य सांगण्यात आले होते. तो अपमृत्यु भिक्षुसंघाच्या सहवासामुळे टळला नागार्जुनाच्या पावनस्पर्शाने हा परिसर प्राचीन काळा पासुन प्रसिध्द असुन त्यांचा जन्म विदर्भात झाला असे नमुद आहे.[10]

नागपूर जबलपुर मार्गावर 40 कि.मी. अंतरावर असलेले आधुनिक “मनसर” हे स्थळ प्राचिन बौध्द संस्कृतीचे प्रतिक आहे. बोधिसत्व नागार्जुन स्मारक संस्थान व संशोधन केंद्राकडून मनसर नावाच्या गावापासून 1 कि.मी. अंतरावरील टेकडीवर उत्खनात सापडलेले भव्य स्तुप चैत्य आणि राजमहल, भिक्षु निवास इ. बौध्द प्रतिमांच्या प्रत्यक्ष प्रमाणावरून साक्षांकित झाले आहे. हे स्थळ राष्ट्रीय स्मारक स्थळ घोषित करण्यात आले.

प्राचीन काळातील दोन लाख वर्षे पूर्वीचा समाज मानव येथे वास्तत्य करीत होता. येथील 1997 पासून सुरू केलेल्या उत्खननात प्राप्त शस्त्र, साहित्यावरून येथे आदि मानवाचे निवास असल्याचे कळते. ई.सन 2 च्या शताब्दी पासून सातव्या शताब्दी पर्यंत तीन वेगवेगळया स्तरांमध्ये पुरावशेष प्राप्त झालेले आहेत. 14 मीटर व्यासाच्या प्रथम स्तुपासह नंतर विस्तृत करीत गेलेले चार स्तूपांचे अवशेष सापडले. दगडी आणि विटांचे स्तर उत्तरोत्तर प्रगत असल्यावरून निरनिराळया राण्यांच्या राज्यकाळात त्यांचे संवर्धन करण्यात आल्याचे दिसते.

दक्षिणपूर्व दिशेत 8 मीटर व्यासाचे छोटे स्तुप आहे. अंतीम भागात पुरूषमेध चे अवशेष सापडेल वाकाटक गुप्त शैलीचे बांधकाम असण्याचे शास्त्रज्ञांनी नमुद केले असले. तरी सर्व प्रमाणीत चिन्हांवरून तेथे नागवंशीयाचे निवास पुजास्थान आणि नागवंशियाचे निवास पुजास्थान आणि नागवंशिय सांस्कृतीचे प्रतिक दिसून येतात. बौध्द आचार्य नागार्जुन यांचे वास्तव्य या ठिकाणी नाकारता येत नाही.

बुध्दिस्ट सेमिनरी ची स्थापना करून पालि साहित्याचे गाळे अभ्यासके विचारवंत डॉ. प्रभाकर गणविर यांच्या अध्यक्षेत मध्ये बौध्द धम्म संस्कृती संवर्धनाचे कार्य जोमाने चालत आहे. विसाव्या शतकातील मूळ जपानी आचार्य भंते नागार्जुन सुरई ससाई यांच्या अथक प्रयत्नांमुळे स्थळ उत्खनन करून पुरानावशेषांच्या प्रगटीकरणाने विश्वाच्या नकाशावर प्रकाशीत झाले. हेच बौध्द संस्कृतीचा प्रवाह निरंतर वाहत असन्याचे प्रमाणे आहे. आजचे अभ्यासक, संशोधक, पर्यटक आणि प्रेक्षणिय स्थळांच्या दृष्टीने या मनसर स्थळाचे महत्व अमुल्य आहे. तसेच बौध्द धम्म हा नैतिकतेवर आधारित असून बौध्द धम्मात माणवाच्या कल्याणाचा मार्ग सांगितलेला आहे.[11] बुध्दाच्या धार्मिक कार्यासाठी दीक्षाभूमी ही पवित्रभूमी आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता हे मानवी मुल्य मानवी जीवनाकरिता अत्यंतर आवश्यक आहेत. या मुल्यांचा प्रचार व प्रसार होणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची :–**

1)लोखंडे भालचंद्र – महारांचे महान दिव्य – भिमबोधी मिशन सोसायटी नागपूर– ऑक्टो.–1986 – पृ.क्र. 148
2)कित्ता पृ. क्र. 149
3)कित्ता पृ. क्र. 149
4)जामगडे विनायक (संपा) –कर्मवीर बाबु हरिदास आवळे – गौरव विशेषांक पृ.क्र. 5
5)कित्ता पृ. क्र. 5
6)व्दादशीवार सुरेश (संपा), लोकमत हॅलो नागपूर –6 ऑक्टो. 2011 पृ.क्र. 5
7)डॉ. पाटील चंद्रशेखर – आंबेडकर चळवळीचे सेनानी बहुजन साहित्य प्रसार केंद्र नागपूर – प्रथम आवृत्ती – मार्च 2016
8)डॉ. बोदेले मालती – द्वर्वार्चान बौध्द स्थळ – पंचशिल ग्राफीस नागपूर प्रथम आवृत्ती – 2009, पृ.क्र. 26.
9)व्दादशीवार सुरेश (संपा) – लोकमत हॅलो नागपूर –6 ऑक्टो. 2011 पृ.क्र. 5
10) बुध्दिस्ट इंडिया – सम्यक क्रांति दिन विशेषांक – 2004
11) आवळे दीक्षित – इतिहासतज्ञ चंद्रनाग आणि बौध्द स्थळंचा शोध व बोध

# विदर्भातील आंबेडकरी आंदोलन

**प्रा. डॉ. भाऊ लोखंडे**
वैशाली विहार, मॉडेल टाऊन, नागपूर – 14.

---

**सारांश** : अख्ख्या भारतात बहिष्कृत किंवा दलित चळवळीची सुरूवात महाराष्ट्रातील नागपूरातूनच झालेली दिसून येते. बुद्धकाळापासून तळागाळातील जीवांना येथे मायेची व सहानुभूतीची ऊब मिळू लागली. ती थेट सिद्ध व नाथांच्या माध्यमातून सर्व संता पर्यंत पोचली. नानक, कबीर असोत की नामदेव, तुकाराम सर्वांनीच दीन दलित जनतेचा कळवळा व्यक्त केला. चक्रधरासारख्या महापुरूषाने जातीभेदाला मूठमाती देण्याचा प्रयत्न केला प्रत्यक्ष कृतीतून. परंतू आधुनिक युगात महात्मा फुल्यांनो आरंभिलेले कार्य खऱ्या अर्थाने दीनदलित बहुजनांच्या उत्थानाचा प्रारंभबिंदू ठरले. सर्वच प्रांतात संतांच्या स्तरावर भक्तीपुरते मर्यादित असलेले हे कार्य समाजमनावर प्रत्यक्ष कृतीने बिंबवून त्याला आंदोलनाचे स्वरूप मिळवून दिले ते महत्मा फुले यांनीच.

महात्मा फुले यांना गुरू मानून त्याच्या कार्याची विविध स्तरावर व्याप्ती वाढविण्याचे महान कार्य बोधिसत्व बाबासाहेब आंबेडकर यांनी आरंभिले.दक्षिणेत इ.व्ही. पेरियार यांनी धमाल उडवून दिली. तर महाराष्ट्रात नागपूर मुंबईत पहिल्यांदा आणि पर्यायाने अखिल भारतात बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनाच्या नौबती झडू लागल्या. या आंदोलन व चळवळीने अंतिमत: आंबेडकरी क्रान्तीचे रूप घेतले.तथाकथित अस्पृश्य किंवा दलित समाजात भयंकर अपमान जनक आणि शरीरच नव्हे तर मनाला विकलांग करणाऱ्या गुलामगिरी विरूद्ध केवळ उठून उभे राहण्याची नव्हे तर सर्वशक्तीनिशी लढण्याची तयारी व ताकद निर्माण करणे, हे त्या काळात तरी चमत्कारिक अशक्य कोटीतील कार्य मानले पाहिजे. आपण माणूस आहोत आणि माणूस म्हणून जगण्याचा आपल्याला पूर्ण हक्क आहे, हे प्रेरक तत्व शतकानुशतकाच्या जीवंत असून मृतप्राय वाटणाऱ्या जीवांमध्ये पेरणे सोपे नव्हते.

**शब्द संकेत : वतनदारी प्रथेचे निर्मुलन,1920 ची नागपूर परिषद,1942 चे शे.का.फे.चे आयोजन**
**संशोधन पद्धती : ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

अब्राहम लिंकनच्या भाषेत, “गुलामाला गुलामगिरीची जाणीव देवून त्याला बंडखोरीला उद्युक्त करण्याचे महत्कार्य “बाबासाहेबांनी प्राणाची बाजी लावून केले.” “लोकमान्य टिळक जर अस्पृश्य असते तर त्यांनी “स्वातंत्र्य माझा जन्मसिद्ध अधिकार आहे व तो मी मिळवणारच” असे कदापीही म्हटले नसते. ते म्हणाले असते, “अस्पृश्यता विनाश हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच.शतकांच्या विकलांग मनात स्वाभीमानाची ज्वाला जागविण्यात बाबासाहेबांनी पुढाकार घेतला.”

तत्कालीन अस्पृश्य गणलेल्या महार जमातीचे बावन्न हक्क म्हणजेच महारकीचे किंवा वतनदारीचे जणू पाशच त्यांच्या गुलामगिरीचे मूळ कारण ठरले.हे हेरूनच बाबासाहेबांनी त्या वतनदारीच्या विनाशासाठी मुंबई कायदेमंडळात 1928 साली आणि नंतर पुन्हा 1937 साली महार वतन बिल आणले होते. दोन्ही बाजुंनी विरोध नोंदविला जात असतांना आधुनिक ‘जनतेचा जाणता राजा’ म्हणून ज्यांना गौरविण्यात येते त्या राजर्षी शाहू छत्रपतींनी आपल्या संस्थानात महारवतने संपवून संपवून त्यांना इतर प्रतिष्ठित व्यवसाय व नोकऱ्यांमध्ये सामावून घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला.जोपर्यंत महार वतनांचे आमीष नष्ट होत नाही तोपर्यंत दलितांचा विकास असंभव आहे या भावनेतून बाबासाहेबांनी “शेवंग्याचा शेंगा” च्या झाडाचे उदाहरण दिले. जोपर्यंत ते झाड परसात होते तोपर्यंत त्या घरातील तरूण भाऊ कामासाठी घराबाहेर पडत नसत. त्यातच गुजराण करीत. घरच्या म्हाताऱ्याने हे ओळखून अेके दिवशी ते झाडच जमीनदोस्त केले. मग झक मारून त्यांना उदरनिर्वाहासाठी घराबाहेर पडून कामे शोधावी लागली. अगदी त्याच धर्मीवर बावन्न हक्कातच गुरफटून राहणाऱ्या दलितांची अवस्था होती. वतनदारी विनाशाचा विरोध करणाऱ्यादलितांना उद्देशून बाबासाहेब म्हणतात, “अज्ञानी जनता जुन्या परंपरेने आंधळी झालेली असते. हातचे, मग ते कितीही अल्प असो, सोडून पळत्याच्या पाठी, मग ते कितीही मोठे असो, लागणे हा धाडसी खेळ जनता सहसा खेळत नाही.” आपल्या कार्याचे मर्म ओळखून त्वेरेने आपल्या संस्थानात वतनदारीला पूर्णविराम देणाऱ्या राजर्षी शाहूमहाराजांबद्दल बाबासाहेब

म्हणतात, “शाहू छत्रपती महाराज हे महाराचे शत्रू नव्हते. त्यांच्यासारख्या सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता व पुढे लाभेल को नाही याबद्दल आम्हास शंकाच आहे.” अशाप्रकारे दलित चळवळीचा जीवघेणा फास ठरलेल्या वतनदारी किंवा बावन्न हक्कांची कबर बांधून तीवर पाय ठेवूनच दलित अस्मितेने आपली क्रान्तीयात्रा आरंभिली.

बाबासाहेब आंबेडकरांनी दलित चळवळीची जी महान तीर्थक्षेत्रे नव्ह क्रान्तीकेंद्रे निर्माण केली त्यात महाड, नाशिक, मुंबई, नागपूर, येवले, औरंगाबाद, आदि प्रामुख्याने समाविष्ट आहेत. बाबासाहेबांनी बहिष्कृत हितकारिणी सभा प्रथम मुंबईत आरंभिलीआणि पर्यायाने त्यांच्या क्रान्तीपर्वाचे लोण नागपूरापर्यंत मोठ्या वेगान पसरले. नागपूरात भोसलेंच्या काळात ब्राह्मण मंडळींचा मोठ्या प्रमाणात शिरकाव झाला आणि महार मंडळीचा लोंढा नागपूरात आला तो काही प्रमाणात वस्त्रोद्योगासाठी. भोसल्यांच्या राजवटीत आणि मोठ्या प्रमाणावर टाटाने सुरू केलेल्या कापड गिरण्यांमुळे. कोष्टी समाज विणकरीचे काम करी आणि महार समाज ही विणकरीतच गुंतला होता. पुरूषांचे कपडे महार तयार करीत तर स्त्रियांच्या साड्या वगैरे कोष्टी तयार करीत. नागपूरात शेती व व्यापारातही महार आघाडीवर होते. त्यांची घरे पक्की असत.विदर्भभर महार समाजातील लोक विखुरले होते. पाटीलकी, जमिनदारी व व्यापार त्यांना लाभला होता.1877 साली नागपूरात एम्प्रेस मिल सुरू झाल्यावर महार मंडळींची कामगार म्हणून भरपूर संख्या वाढली. इंग्रज साहेब आणि पारशी यांच्याकडे महार लोकांना प्राधान्याने कामाला ठेवण्यात येत असे.

इंग्रज व पारश्यांच्या संपर्कामुळे या समाजात टापटीप, स्वच्छता,नीटनेटकेपणा आणि आधुनिकतेची आवड निर्माण झाली आणि त्यांची आर्थिक घडी नीट बसायला मदत झाली. आणि त्यांना स्वतंत्रपणे आंदोलनात उडी घ्यायची मोकळीक मिळाली. त्यामुळे त्यांचे आपल्या समाज सुधारणेकडे लक्ष वेधले. त्यांनी महार पंचायती स्थापन केल्या. त्यांच्या प्रमुखांना ‘शेटे’ म्हणत. एकोणविसाव्या शतकाच्या शेवटी काही लोक आंग्लशिक्षा विभूषित झालेत. त्यांना अस्पृश्यतेची झळ आणि सामाजिक व आर्थिक गुलामगिरी अस्वस्थ करू लागली. त्याची मुळे त्यांना धार्मिक ग्रंथात दिसू लागलो. विदर्भात याच अवस्थेतून किसन फागोजी बनसोडे यांचा ‘सन्मार्ग बोधक अस्पृश्य समाज’ अस्तित्वात आला. मध्यप्रांत व वऱ्हाडच्या कौन्सिलवर त्यांचे नॉमिनेशन व्हावे म्हणून त्यांनी राज्यपालांना विनंती अर्ज केला होता. विठोबा मून संतपंडे यांनी 1903 साली रामटेकच्या अंबाडा तलावावर महारमंडळींना स्नान करण्याची परवानगी देणारा हुकूम राजे भोसलेंकडून मिळविला होता. तेथे घाट बांधून अंबाला तलावाकाठची 50 बाय 40 फुटाची जागा गणेश फडणविस नामक मालगुजाराकडून विकत घेतली होती. रामटेकला 1906 मध्ये रामनवमीच्या निमित्ताने भरलेल्या सभेत “अत्यंज समाज कमिटी” स्थापण्यात विठोबा मून यांनी पुढाकार घेतला. त्यांच्याच पुढाकाराने महार मंडळींना गोमांस भक्षणापासून अलिप्त ठेवून समाज सुधारणा करण्यास प्रवृत्त करण्यात आले. समाजाच्या धार्मिक सुधारणेला चालना देणारे विठोबा मून संतपंडे हे समाजात धर्मगुरूच्या पदवीपर्यंत पोहोचलेत. अस्पृश्यांना शाळेत प्रवेश दिल्यास उच्च जातीय नाराज होतील म्हणून त्यांना प्रवेश नाकारला जाई. त्याविरूद्ध नागपूरच्या दलित मंडळींनो आवाज उठविला. मिशनरी शाळांमध्ये अस्पृश्य मुलांना शिक्षण मिळायची वाट मोकळी झाली असली तरी शासकीय शाळांत प्रवेश मिळावा म्हणून मिरवणूका काढण्यात आल्यात. 1912 मध्ये जैराम पैकू शेटे यांचे वाड्यात मोतीबाग येथे समाजाची सभा बोलावून शिक्षण प्रसारावर चर्चा करण्यात आली. सभेच्या निमंत्रण पत्रावरून शिक्षणाबद्दलचो आवड प्रकट होते. त्यात लिहिले होते, “व्हिक्टोरिया सरकारच्या अंमलापासून विद्येचा सुकाळ असल्यामुळे कित्येक लोकांच्या सुधारणा होवून ते योग्यतेस चढले. आम्ही अनाथ, ह्यामुळे आमच्या वर्गातील कोणीही विद्या शिखरावर पोहचू शकत नाही व विद्याहीन असल्यामुळे राजसेवा घडत नाही. त्यामुळे फार उत्कंठा लागली आहे. विद्यादानानी आमच्या क्लासाची उन्नती करून घ्यावी याबद्दल सभा करणे ठरले आहे.”

अशा प्रकारे केवळ जात पोटजातींच्या उद्धारार्थ कार्यरत असलेला विदर्भ भविष्यातील विकासाची स्वप्ने रंगवीत पंच कमिट्यालाच समाजसेवेचे व चळवळीचे माध्यम मानीत होता. स्वत:च्या हत्तीच्या अंबरीत माहूत म्हणून एका महाराची नेमणूक करणाऱ्या आणि दलिताला हॉटेल घडवून देवून तेथे नित्यनेमाने स्व: जावून चहा पिणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांचा 1918 मध्ये बाबासाहेबांशी गाठ पडली. आणि त्यांच्याच आश्रयाने 1920 ला ‘मूकनायक’ नामक नियतकालिक सुरू झाले आणि दलित

चळवळीला कंठ फुटला. पांडुरंग भटकर नावाच्या विदर्भातील अमरावतीच्या दलित गृहस्थांची या पत्राचे संपादक म्हणून बाबासाहेबांनी नियुक्ती केली होती. सर नारायणराव चंदावरकरांच्या अध्यक्षतेखाली 1917 ला नोव्हेंबरमध्ये अस्पृश्य वर्गाची सभा झाली. या सभेत ग. आ. गवई उपस्थित होते. त्यातच बाबासाहेबांचा सत्कार होणार होता ते परदेशातून शिक्षण आटोपून परत येणार होते पण ते उपस्थित राहू शकले नाहीत. वि. रा. शिंदे यांनी साऊथबरो कमिशन पुढे दिलेली साक्ष अस्पृश्यांच्या हिताला बाधक आहे असे जाणून बाबासाहेबांनी ते लोकांच्या समोर आणण्याचे ठरविले आणि त्यासाठी दलितांच्या राजकीय आकाक्षांना आकार व आवाज देण्यासाठी शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली परिषद घेण्याचे ठरविले. ही परिषद 30, 31 मे आणि 1 जून 1920 साली नागपूरच्या कस्तुरचंद पार्कवर आयोजित करण्यात आली. वि. रा. शिंदे यांच्या डिस्प्रेड क्लास मिशन च्या माध्यमातून दलित हितविरोधी निवेदनाचा निषेध या परिषदेत करण्यात येणार होता त्यासाठी आलेल्या ठरावाला गणेश अक्का गवई विरोध करू शकले नाहीत. तो ठरावा असा, "बहिष्कृत वर्गाचे सुधारलेल्या कौन्सिलात जे प्रतिनिधी घ्यावयाचे ते सरकारी नेमणुकीने किंवा त्यांच्या जातवार संघातर्फे न घेता बहिष्कृतेतरातर्फे कौन्सिलात निवडून गेलेल्या प्रतिनिधी मार्फत नेमण्यात यावेत." अशी जी सूचना खास बहिष्कृत वर्गाच्या उन्नतिप्रित्यर्थ स्थापन झालेल्या डिप्रेस्ड क्लास मिशनने केली होती. त्यामुळे सर्व अस्पृश्य वर्गाचे मत अस्वस्थ झाले आहे. कारण बहिष्कृतेतर वर्गाच्या प्रतिनिधींना बहिष्कृत वर्गाचे प्रतिनिधी नियोजित करण्याचा जर अधिकार दिला तर ज्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे बहिष्कृत वर्गाचे नष्टचर्य ओढवले आहे ती चातुवर्ण्य व्यवस्था कायम करण्यास आमच्यातील जे लोक कबूल होतील अशाच लोकांना प्रतिनिधी नेमण्यात येईल. त्या अर्थी या परिषदेचेच अस ठाम मत आहे की, डिप्रेस्ड क्लास मिशनने आपल्या आश्रितांचा असा उघडपणे द्रोह केल्यामुळे ती बहिष्कृत वर्गाच्या विश्वासास अपात्र ठरली आहे.

विदर्भाचा व पर्यायाने नागपूरचा हा गौरवपूर्ण सन्मान आहे की 1920 ची पहिलीवहिली अखिल भारतीय परिषद आयोजित करण्याची संधी त्यांना प्राप्त झाली. या परिषदेच्या माध्यमातूनच दलितांच्या चळवळीला आगळेवेगळे अस्तित्व आणि स्वतंत्र अस्मिता लाभली. यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भावी नेतृत्व उदय पावले. दलितांच्या हिताची जपणूक डॉ. आंबेडकर अहर्निष डोळ्यात तेल घालून कशी करतात याचा अनुभव दलित जनतेला प्रत्यक्षच घेता आला. विठ्ठलरामजी शिंदे यांचे डिस्प्रेड क्लास मिशनचे कार्य आईचे नसून दाईचेच असल्याचे या परिषदेत डॉ. आंबेडकरांनी सप्रमाण सिद्ध करून दाखविले. या परिषदेत डॉ. आंबेडकरांनी केवळ दूध आणि पाणीच वेगळे केले असे नाही तर दलित समाजातील जातीपोटजातीत दबा धरून बसलेले विटाठ भेदाचे विकार देखील दूरसारण्यासाठी त्यांनी विविध पोटजातीतील कार्यकर्त्यांचे एकत्र भोजन करवून समतेचे उदाहरण घालून दिले. परस्पर पोटजातींना एकजीव करण्याचा पहिला प्रयत्न याच परिषदेत झाला. त्याचे सारे श्रेय डॉ. आंबेडकर यांनाच जाते. मध्यप्रांत व वऱ्हाड महार परिषदेचेच 9 वे अधिवेशन 7 व 8 फेब्रुवारी 1920 ला चिखली येथे झाले. 1920 सालीच वरोरा येथे महार समाजाची सभा झाली. वरिष्ठ जातीशी हातघाई करून सुद्धा बरोबरीचे हक्क मिळविण्याचा सल्ला किसन फागोजी बनसोडे यांनी दिला. दारू न पिण्याचा व स्वच्छ राहण्याचा उपदेश श्री. घाडगे यांनी केला. या परिषदेत उपस्थित राहिल्यावर शाहू महाराजांनी हा अर्वाचीन इतिहासातील संस्मरणीय प्रसंग होय असे उद्गार काढलेत. रेल्वे प्रवासात महाराजांचा प्रत्येक स्टेशनवर सत्कार करण्यात आला.सभास्थळावर महाराजांना प्रचंड मिरवणुकीने जयजयकाराच्या गजरात आणण्यात आले. स्वागताध्यक्ष कालिचरण नंदागवळी होते. अस्पृश्य समाजाव्यतिरिक्त उच्चभ्रू समाजातील व काय मराठा समाजानेही स्वत:ला महाराजांपासून चार कोस दूर ठेवले. नागपूरकर भोसल्यांनी महाराजांची भेट घेणे दूरच शिकारीच्या बहाण्याने नागपूर बाहेर पळ काढला. राजदरबारी लवाजमा मिरवणुकीत नव्हता. नगाडावाद्ये किंवा उंटघोडे हत्ती यापैकी कशाचेही तेथे दर्शन होत नव्हते. सरदार भालदार वा चौपदार कुणीच नव्हते. खऱ्या अर्थाने शाहू महाराज जनतेचे राजे दिसत होते. शाहू महाराज आपल्या भाषणात म्हणालेत, "समाजसेवेच्या पवित्र कार्यात पुढारीपणाचा डींडीम पिटणारे व बहिष्कृतांविषयी खोटी सहानुभूती दाखविणारे, समाजास खाली ओढण्याची कुटिल नीती चालू ठेवीत असतात. समाजास तुडविणारी अशी बेजबाबदार माणसे लोकांचे पुढारी म्हणून मिरवितात. अस्पृश्य हा शब्द कोणाही माणसाला लावणे हे फार निंध आहे. तुम्ही अस्पृश्य नाही. तुम्हास अस्पृश्य मानणाऱ्या पुष्कळ लोकांपेक्षा जास्त बुद्धीमान जास्त पराक्रमी, जास्त सुविचारी, जास्त स्वार्थ त्यागी असे तुम्ही हिन्दी

राष्ट्राचे घटक  अवयव आहात. आपण बरोबरीची भावंडे आहेत. आपले हक्क समसमान तरी खास आहेतच. या सत्कार्यात जे लपंडाव करितात त्यांची लबाडी ओळखण्याची समज हल्ली जनतेस खास आलेली आहे." (जातीभेद मोडण्याच्या) कामी सुरूवात उच्च म्हणविणाऱ्या जातीकडूनच झाली पाहिजे. प्राचीन काळापासून वंशपरंपरागत उपभोगिलेले वर्चस्व त्यांनी सोडण्यास तयार झाले पाहिजे. जपानातील जातिभेदाचा बीमोड होण्यास मोठे कारण उच्च वर्गाचे सामुराई लोकांनी सुरूवात केली हेच आहे. तसे झाले नसते तर जपानची स्थिती कधीही सुधारली नसती. आपण मला आज आपला म्हटले आहे. त्याचप्रमाणे शेवटपर्यंत प्रेम दृढ ठेवा. मी देखील कितीही अडचणी आल्या, कितीही त्रास झाला तरी त्याला न जुमानता आपल्या उन्नतीच्या महत्कार्यास शक्य तेवढा हातभार लावण्यास कधीही मागेपुढे घेणार नाही." या परिषदेत डॉ. परांजपे, किसन फागु बनसोडे, श्री. कोठारी, कालिचरण नंदागवळी, श्रीपतराव शिंदे आदिंची भाषणे झालीत.

त्यानंतर 1942 साली 19 व 20 जुलैला नागपूरातच अखिल भारतीय दलित वर्ग परिषद संपन्न झाली. अध्यक्षपदी रा. ब. एन. शिवराज होते, अखिल भा. शे.का. फे. ही नागपूरातच साकार झाली. विदर्भात अनेकविध दलित चळवळी साकार झाल्यात. अस्मिता प्राप्तीसाठीचा संघर्ष सतत तेवत राहिला. कालांतराने 1956 साली डॉ. बाबासाहेबांनी बौद्ध धर्माचा स्वीकार नागपूर मुक्कामी दीक्षाभूमीवरच केला. नागांचे नगर ते नागपूर अशी प्राचीन व्युत्पत्ती देत त्यांनी नागपूरचे महात्म्य वर्णिले. दुसऱ्या वर्षी 1957 ला रिपब्लिकन पक्षही नागपूर येथेच स्थापन झाला. तत्पूर्वी प्रेसिडियम ही येथेच तयार करण्यात आले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म महू येथे झाला. रत्नागिरी त्यांच्या पूर्वजांचे मूलनिवास स्थान होते. मुंबई व दिल्लीत त्यांचे सर्वाधिक काळ वास्तव्य होते. परंतु नागपूर ही विदर्भाची नाडी त्यांना चांगलीच गवसलेली होती. त्यामुळे त्यांनी आपली महत्वपूर्ण चळवळ नागपूरातूनच सुरूकेली. पक्ष स्थापना, पक्ष बांधणी किंवा संघटन बाधणी त्यांनी नागपूरातूनच केली. बौद्ध धर्माचा स्वीकार देखील त्यांनी नागपूरातूनच केला. त्यामुळे आधी कर्मभूमी असलेले नागपूर त्यांच्यासाठी धर्मभूमी ठरले.

बहिष्कृत हितकारिणी सभेपासून प्रारंभ झालेली दलित चळवळ नंतर स्वतंत्र मजूर पक्ष आणि शेडुल्ड कास्ट फेडरेशन असे परिवर्तन करीत करीत अंतिमत: रिपब्लिकन पक्षाच्या रूपात परिवर्तीत झाली. मजुरांचे संघटन, समता सैनिक दलाची उभारणी, भूमिहिनांचा सत्याग्रह, बौद्ध धर्म दीक्षा समारोह किंवा धम्मचक्र प्रवर्तन या सर्व चळवळीच्या नागपूरातील बदलते दलित वास्तवाच्या यशापयशाचा मागोवा घेण्यासाठी त्या इतिहासपर्वात पाऊल टाकून त्यांची मिमांसा करण्यासाठी आपल्याला मनावरील संयम ढळू न देता अत्यंत तटस्थ बुद्धिने विश्लेषण करण्याची गरज आहे.

**संदर्भसूचीः**

१) सपा. जामगडे विनायक, बाबू रामरतन जानोरकर ७८ वी जयंती स्मरणिका, ८ ऑगस्ट, २००९.

२) भांगे, हंसराज (संपा), 'बाबांचे शिलेदार', आंबेडकरी चळवळीचे सहकारी सत्कार मंच, नागपूर प्र. आ. २०१५.

३) कोसारे, एच. एल., 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास (स्वातंत्र्यपुर्व काळ)', नेहा प्रकाशन, गुरूनानकपुरा, नागपुर.

४) डोंगरे, कृष्णकांत, 'आंबेडकरी चळवळीची दिशा आणि दशा', बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपुर, प्र. आ. २०१८.

५) पाटील चंद्रशेखर, 'आंबेडकरी चळवळीचे सेनानी बाबू आवळे', बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपुर, प्र. आ. २०१६.

६) जामगडे, विनायक, 'आंबेडकरी चळवळीत ॲड. हरिदास बाबु आवळे यांचे योगदान', प्रकाशन, डॉ. बाबासाहेब अध्यासन, नागपुर विद्यापीठ, नागपुर, प्र. आ. २००९